# ‘जैन कर्मसिद्धांत आणि पुरुषार्थ’–एक अभ्यास (कर्मविपाक आणि कर्मस्वातंत्र्य)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यावाचस्पति (Ph.D.)
पदवीसाठी सादर प्रबंध


शोधछात्रा

सौ. निर्मला पोपटलाल कोठारी **M.A. in Prackrit**

मार्गदर्शक

प्रो. डॉ. रेखा नवीनचंद्र जैन **M.D. Ph.D**

बालमुकुंद लोहिया
संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ


२०११

**Form 'B'**

I hereby declare that the thesis entitled ''जैन कर्मसिद्धांत आणि पुरुषार्थ (कर्मविपाक आणि कर्मस्वातंत्र्य) – एक अभ्यास''

completed and written by me has not previously formed the basis for the award of any Degree or other similar title upon me of this or any other University or examining body.

Sd/-

Place : Pune | Research Student

Date : | **Sou. Nirmala Kothari**

**Form 'C'**

This is to certify that the thesis entitled ''**जैन कर्मसिद्धांत आणि पुरुषार्थ (कर्मविपाक आणि कर्मस्वातंत्र्य) – एक अभ्यास**''

which is being submitted herewith for the award of the Degree of Vidyavachaspati (Ph.D.) in '**संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र**'

of Tilak Maharashtra University, Pune is the result of original research work complete by **Smt. Nirmala Kothari** under my supervision and guideance. To the best of my knowledge and belief the work incorporated in this theses has not formed the basis for the award of any Degree or similar title of this or any other University or examining body upon her.

Sd/-

Place : Pune

Research Student

Date :

**Prof. Dr. Rekha Jain**

# कृतज्ञता

आज हा प्रबंध उत्तमप्रकारे पूर्ण करून, सादर करतांना, अत्यंत, आनंद होत आहे. ह्या चार वर्षांच्या, 'अखंड अभ्यास, मनन, चिंतनाचे, साकाररूप' हा प्रबंध आहे. माझे 'परमआराध्य, पंचपरमेष्ठी, विद्यमान वीस तीर्थंकर आणि सिमंधर प्रभू,' ह्यांच्या अखंडकृपा वर्षावाने, पूर्णत्वाला गेलेला हा प्रबंध, त्यांच्या पावनचरणी समर्पित आहे. माझे श्रद्धास्थान 'संत शिरोमणी आ. विद्यासागर गुरुवर आणि माझे ज्ञानगुरु पंडित रतनलालजी बेनाडा', ह्यांचे शुभाशीर्वाद, मार्गदर्शन, आणि त्यांच्याकडून झालेल्या शंकासमाधानाने, मार्ग सुलभ होत गेला. त्यांची विशेष 'अनुकंपा व अनुग्रहाबद्दल', मी सदैव नतमस्तक आहे.

ह्या प्रबंधपूर्तीच्या अवघड, अखंड कार्यात, अनेकांचे दृश्य-अदृश्य, अमूल्य सहकार्य लाभले म्हणूनच, हे कार्य सफल झाले. प्रबंधाच्या ध्येय्यनिश्चितिनंतर, डॉ. रेखा जैन ह्या मला मार्गदर्शन म्हणून लाभल्या हे माझे भाग्य आहे. त्यांची 'विषयाची जाण, भाषा प्रभुत्व, दांडगा व्यासंग, समजविण्याची अत्यंत सहज, सोपी, पद्धती, अत्यंत सहकार्य,' ह्यामुळेच प्रबंध साकारला गेला. 'प्राप्त परिस्थितीचा शांतपणे सामाना करणे, प्रसंगी तटस्थता, अत्यंत समता, नाव-प्रसिद्धीच्या मागे न जाणे', त्यांच्या ह्या गुणांमुळे, मला प्रबंधाबरोबरच, व्यवहारातही खूपच मोलाची शिकवण मिळाली. त्यांच्या ह्या 'अमूल्य मार्गदर्शन, शिकवण, उपदेश,' ह्यांची मी शतशः ऋणी आहे. ह्या दीर्घ प्रबंध काळात, अनेकदा आलेले 'नैराश्य, उदासिनता', ह्या सर्वांमधून मला 'मार्ग दाखवून, प्रोत्साहन देवून, प्रेरित करणारी', माझी मैत्रिण डॉ. उदिता शहा, हिचे मी मनःपूर्वक आभार मानते. प्रबंधाच्या निश्चितीपासून, 'सतत, वेळोवेळी, मार्गदर्शन, सूचना, सहाय्य', करून मला आपला अमूल्य वेळ देणाऱ्या, माझ्या गुरु डॉ. नलिनी जोशी, ह्यांची अंतःकरणपूर्वक कृतज्ञता व्यक्त करते. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, मा. भटसर, मा. पाटील सर, ह्यांचे मार्गदर्शन सहकार्य, लाभले म्हणून वेळेत प्रबंध पूर्ण करणे शक्य झाले. माझे यजमान श्री. पोपटलालजी कोठारी यांची मी कृतज्ञ आहे. केवळ त्यांनी इच्छा, आग्रह, त्यांचा माझ्या ज्ञान व बुद्धीवरील विश्वास आणि अमूल्य सहकार्य' माझ्यामागे असल्यानेच, मी हे धाडस करू शकले. ह्या अखंड प्रवासात, सतत मला सहकार्य करणारे, मला समजवून घेणारे माझे परिजन, माझा मुलगा नीरज, माझे कर्मचारी, ह्या सर्वांच्या मदतीबद्दल, मी शतशः ऋणी आहे.

प्रबंधाच्या छपाईचे काम करण्यात, मला सहर्ष सहकार्य करणारी, माझी मैत्रिण सौ. स्वाती गेलडा आणि तिचे यजमान गौतमजी गेलडा, ह्यांचे मनापासून आभार मानते. ह्या सर्व कामात मदत करणारे, लक्ष्मण, प्राची, निलेश आणि अन्य सर्वांचे, जे अमूल्य सहकार्य लाभले त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करते. सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानते.

**धन्यवाद,**

आपली कृतज्ञ,

**सौ. निर्मला कोठारी**

# संक्षेपाक्षरसूची

| | |
|---|---|
| अ.पा. | = अष्टपाहुड |
| आ.प. | = आप्तपरीक्षा |
| आप्त. मी. | = आप्तमीमांसा |
| आ. सा. | = आराधनासार |
| उत्त. अ. | = उत्तरअध्ययन |
| क. पा. | = कषायपाहुड |
| का. अ. | = कार्तिकेयानुप्रेक्षा |
| क्ष. सा. | = क्षपणासार |
| गो. क. | = गोम्मटसार कर्मकांड |
| गो. जी. | = गोम्मटसार जीवकांड |
| ज्ञा. | = ज्ञानार्णव |
| त. सू. | = तत्त्वार्थसूत्र |
| ति. प. | = तिलोयपण्णत्ति |
| त्रि. सा. | = त्रिलोकसार |
| बृ. द्र. सं. | = बृहद्द्रव्यसंग्रह |
| ध. | = धवला |
| नि. सा. | = नियमसार |
| पं. का. | = पंचास्तिकाय |
| पं. वि. | = पद्मनंदी पंचविंशतिका |
| पं. सं. प्रा. | = पंचसंग्रहप्राकृत |
| प. पु. | = पद्मपुराण |
| प. प्र. | = परमात्मप्रकाश |
| पु. सि. उ. | = पुरुषार्थसिद्ध्युपाय |
| प्र. सा. | = प्रवचनसार |
| बा. अ. | = बारसअनुप्रेक्षा |
| भ. आ. | = भगवती आराधना |
| म. पु. | = महापुराण |
| म. बं. | = महाबंध |
| मू. आ. | = मूलाचार |
| मो. मा. प्र. | = मोक्षमार्ग प्रकाशक |
| र. क. श्रा. | = रत्नकरंडश्रावकाचार |
| रा. वा. | = राजवार्तिक |
| ल. सा. | = लब्धिसार |
| व.श्रा. | = वसुनंदी श्रावकाचार |
| श्लो. वा. | = श्लोकवर्तिक |
| ष. खं. | = षट्खंडागम |
| स्या. मं. | = स्याद्वादमंजरी |
| स. सा. | = समयसार |
| स. सि. | = सर्वार्थसिद्धि |
| सा. ध. | = सागरधर्मामृत |
| ह. पु. | = हरिवंशपुराण |

# निवेदन

ह्या प्रबंधात काही 'पारिभाषिक शब्दांची' यादी दिली आहे. वर्तमानरूढ व्याकरणाप्रमाणे जरी, ते शब्द दुसऱ्या पद्धतीने, (दीर्घ इ.), लिहले जात असेल तरी, येथे 'आगमाप्रमाणे' लिहले गेले आहेत. कृपया त्याची नोंद घ्यावी.

अतिचार
अनादि-आदि-सादि
अनासक्ति
अनुमति
अणु
अरति
अविभाग-प्रतिच्छेद
अविरति
अशुचि
आसक्ति
आस्रव
इत्यादि
उत्पाद-व्यय-ध्रौव्य
उपादान
औदयिक
औदारिक
केवलज्ञान (ज्ञानाचे विशेषण)
गति ('चारगति' ह्या अर्थाने असेल तर)
गती (वेग अर्थाने असेल तर)
गुप्ति
गुणहानि
घाति-अघाति
घनोदधि
धातु
च्युत
जाति
दृष्टिकोन
नीति
नियति
निरुक्ति
निवृत्ति
परमाणु
परिषह
पुद्गल
पर्याय (हा शब्द 'अवस्था' ह्या अर्थाने असल्याने, 'ती पर्याय' असे म्हटले जाते.)
पर्याप्ति
प्रकृति (आठ कर्म अपेक्षेने)
प्रवृत्ति (निवृत्ति-प्रवृत्ति संदर्भातील)
प्रज्ञप्ति
बुद्धी
भीती
मेरू
मृत्यू
योनि
रुचि
लब्धि
लोकाकाश-अलोकाकाश
वास्तु
विधि
विरक्ति
व्युच्छित्ति
व्युत्पत्ति
संगति
समिति
समुद्घात
सम्यग्दर्शन
सविपाक-अविपाक
साधू
स्थिति
सूची
स्तुति

# पारिभाषिक शब्दांचे अर्थ

प्रबंधात आलेल्या काही पारिभाषिक शब्दांचे अर्थ येथे दिले आहेत. प्रबंधात तळटिपा (Foot Notes) न देता, एकत्रितपणे सुरुवातीलाच परिभाषा दिल्या आहेत. अन्य काही परिभाषा, वर्णनाच्या ओघात, विषयसमाप्तिनंतर नमूद केलेल्या, 'पुरुषार्थात' दिल्या गेल्या आहेत. कृपया त्याची नोंद घ्यावी.

१) **अंगुल –** 'पुदगलाच्या एक अविभागी (अंशाला) तुकड्याला परमाणु म्हणतात'

अनंतानंत परमाणुंचा – १ अवसन्नासन्न

८ (आठ) अवसन्नासन्नचा – १ सन्नासन्न

८ सन्नासन्नांचा – १ त्रुटिरेणु

८ त्रुटिरेणुंचा – १ त्रसरेणु

८ त्रसरेणुंचा – उत्तम भोगभूमिजांचा १ केसाग्र

८ केसाग्रांचा – मध्यम भोमभूमिजांचा १ केसाग्र

८ केसाग्रांचा – जघन्य भोगभूमिजांचा १ केसाग्र

८ केसाग्रांचा – कर्मभूमिजांचा १ केसाग्र

८ केसाग्रांची – १ लिख

८ लिखांची – १ यूका

८ यूकांची – १ जू

८ जूंचा – १ अंगुल (उत्सेधांगुल) – म्हणजेच 'अंगुल म्हणजेच उत्सेधांगुल' होय.

**अंगुलाचे तीन भेद** – उत्सेधांगुल, प्रमाणांगुल, आत्मांगुल

''५०० उत्सेधांगुलाचा एक प्रमाणांगुल होतो. 'ज्या काळात मरत–ऐरावत क्षेत्रात जे जे मनुष्य असतात, त्या त्या मनुष्यांचा अंगुल आत्मांगुल म्हणवला जातो.''

२) **अंतर्मुहूर्त** : 'आवलीपेक्षा जास्त व मुहूर्तच्या पेक्षा कमी काळ. ह्यामध्ये ३७७३ श्वासोच्छवास होतात.'

३) **अतिचार** : 'कोणतेही करण्यायोग्य कार्य न केल्यास आणि त्या करण्यायोग्य पदार्थांचा त्याग न केल्यास, जे पाप होते त्याला अतिचार म्हणतात. इंद्रियांची असावधानता वा व्रतात शिथिलता अतिचार होय.

४) **अत्यंताभाव** : 'एका द्रव्यांचा इतर द्रव्यांमध्ये त्रिकाल अभाव असणे.'

४) **अनुदिश** : 'जे प्रत्येक आठ दिशांमध्ये असतात, त्यांना अनुदिश विमान म्हणतात. अनुदिशविमान मधे एक, तथा दिशा, विदिशांमध्ये आठ असतात, म्हणून त्यांना अनुदिश म्हणतात.'

**५) अन्योन्याभाव** : ‘एका पुद्गल द्रव्याच्या वर्तमान पर्यायाचा, दुसऱ्या पुद्गल द्रव्याच्या वर्तमान पर्यायात अभाव असणे.’

**६) अभव्य** : ‘जे जीव संसारातून सुटून सिद्ध होत नाहीत, त्यांना अभव्य म्हणतात. ज्यांच्यात सम्यग्दर्शन इत्यादिभाव प्रकट करण्याची योग्यता नसते, त्यांना अभव्य म्हणतात’.

**७) अवसर्पिणी** : – ‘ज्या काळात आयु, बल, शरीराची उंची, सुख, भोग इत्यादींचा ऱ्हास होतो, त्या काळाला अवसर्पिणी म्हणतात.’

**८) अविपाक** : ‘तपाचरणाने वेळेपूर्वीच बांधलेल्या कर्मांचा क्षय करणे. मोक्षमार्गात उपादेय ही निर्जरा, सम्यग्यदृष्टि व्रतधारींनाच होते’.

**९) अस्तिकाय** : ‘बहुप्रदेशांच्या समूहला काय म्हणतात. अस्तित्व म्हणजे सत्ता होय. अस्तित्व व कायत्वसहित, जे आहे त्यांना अस्तिकाय म्हणतात. पाच द्रव्य (काल सोडून) अस्तिकाय आहेत.’

**१०) आवली** – ‘असंख्यांत समयांची एक आवली होते.’

**११) आहारकशरीर** : ‘सहाव्या गुणस्थानवर्ती परमऋद्धीधारी मुनिंकडून, सूक्ष्मपदार्थ जाणण्यास, संयमरक्षणासाठी, तीर्थवंदनाहेतू, अन्यक्षेत्रातील केवली वा श्रुतकेवलींजवळ पाठवण्यासाठी, त्यांच्या डोक्यापासून, जो एक हात स्फटिका समान धवल पुतळा निघतो, त्याला आहारक शरीर म्हणतात.’

**१२) उत्सर्पिणी** : ‘ज्या काळात आयु, बल, शरीराची ऊंची, सुख, भोग, इत्यादींची वृद्धी होते, त्या काळाला ‘उत्सर्पिणी म्हणतात.’

**१३) उपयोग** : ‘चैतन्याला अनुसरून होणारा आत्मपरिणाम म्हणजे उपयोग होय.’

**१४) औदारिक** : ‘जे शरीर दुसऱ्यांना अडवते वा दुसऱ्याकडून अडवले जावू शकते, अशा स्थूल शरीराला औदारिक शरीर म्हणतात.’ मनुष्य व तिर्यंचाना हे शरीर असते.

**१५) कल्याणक** : ‘भव्यजीवांसाठी असणाऱ्या कल्याणकारी संधींना कल्याणक म्हणतात, जे प्रसंग जगतासाठी अत्यंत कल्याण व मंगलकारी असतात त्यांना कल्याणक म्हणतात.’

**१६) गर्हा** : ‘आपल्या पापांची प्रगटरूपाने निंदा करणे.’

**१७) गैवेयक** : ‘मनुष्यशरीरातील रचनेतील ग्रीवाप्रमाणे, ह्यांचे निवासस्थान असल्याने, त्यांना ग्रैवेयक म्हणतात.’ ह्यांची संख्या ९ असून, हे एकावर एक असतात.

**१८) छदमस्थ** : ‘छद्म ज्ञानावरण, दर्शनावरणाला म्हणतात, त्यात जे असतात ते छदमस्थ होय. छदमस्थ म्हणजे अल्पज्ञ होय.’

**१९) तैजस** :‘औदारिक, वैक्रियक, आहारक ह्या शरीरांना कांती देणारे ते तैजस शरीर होय.’

**१७) त्रसनाडी** : ‘तीन लोकांच्या बरोबर मध्यभागी, १ राजू रुंद व १ राजू जाड तथा थोडी

कमी १३ राजू उंच त्रसनाडी आहे. ह्या त्रसनाडीत दोन इंद्रिय ते पंचोद्रिय, हे त्रसजीव असतात.'

**१८) धनुष्य** : 'सहा अंगुलांचा १ पाद, २ पादांची १ वितस्ति, दोन वितास्तिंचा १ हात, २ हातांचा १ रिक्कू, दोन रिक्कूचा १ दंड वा धनुष्य (म्हणजे ४ हाताचा १ धनुष्य) आणि दोन हजार धनुष्यांचा १ कोस होय.'

**१९) निंदा** : 'आपल्या पापांची मनात स्वयं ग्लानी करणे.'

**२०) निदान** : 'भोगाकांक्षेमुळे ज्यामध्ये वा ज्याकारणाने चित्त नियमाने ग्रस्त होते, त्याला निदान म्हणतात. भोगांची लालसा निदान होय.'

**२१) निश्चय नय** – 'परमार्थाच्या विशेषणाने संशयाविरहित निश्चयअर्थाला ग्रहण करणारा, असा जो अभेद व अनुपचाराने वस्तूचा निश्चय करतो तो, निश्चयनय होय.'

**२२) पर्याप्तक** : 'आहार, शरीर, इंद्रिय, श्वासोच्छवास, भाषा, मन, ह्या सहांच्या निष्पत्तीला पर्याप्ति म्हणतात. ह्या सहा प्रवृत्तीमध्ये परिणमन करण्याचा शक्तीला व त्या शक्तीमुळे पुदगला स्कंधांच्या निष्पत्तीला पर्याप्ति म्हणतात.'

**१) निवृत्तिअपर्याप्तक** : 'जोपर्यंत शरीरपर्याप्ति पूर्ण होत नाही म्हणजे, एक समय कमी शरीरपर्याप्ति संबंधी अंतर्मुहूर्तपर्यंत निवृत्तिअपर्याप्त म्हणतात.'

**२) लब्ध्यपर्याजक** : 'अपर्याप्तकनामकर्माच्या उदयाने, एकेंद्रियादिजीव, आपआपल्या योग्य पर्याप्तींना पूर्ण न करता, उच्छवासाच्या १८ व्या भाग प्रमाण अंतर्मुहूर्तातच मरतात, त्या जीवांना लब्ध्यअपर्याप्तक म्हणतात.'

**३) अपर्याप्त** – 'सहा पर्याप्तींच्या अभावाचा जो हेतू आहे त्याल अपर्याप्त नामकर्म म्हणतात.'

**२३) प्रध्वंसाभाव** : 'कोणत्याही द्रव्याच्या वर्तमान पर्यायाचा, त्याच द्रव्याच्या भविष्यकालीन पर्यायात अभाव असणे.'

**२४) प्रमाद** : 'कषायसहित अवस्था म्हणजे प्रमाद होय. चार संज्वलनकषाय आणि ९ नोकषाय ह्यांचा तीव्र उदय म्हणजे प्रमाद होय. धार्मिक कार्यात निरुत्साह म्हणजे प्रमाद होय.'

**२५) प्राग्भाव** : 'कोणत्याही द्रव्याच्या वर्तमान पर्यायाचा, त्याच द्रव्याच्या पूर्व पर्यायात अभाव असणे.'

**२६) पल्य** : चारकोस योजन विस्ताराच्या गोल खड्याचे घनफळ काढणे. म्हणजे १ योजन खोल खड्डा, उत्तम भोगभूमीतील, एका दिवसापासून सात दिवसाच्या आत, जन्मलेल्या मेंढीच्या, करोडो केसांचे अविभागी खंड करून, त्या खंडित केसाग्रांनी, पृथ्वीच्या समतला तो खचाखच भरावा. शंभर शंभर वर्षात, एक एक केस काढले असता, जेवढ्या वेळेत तो खड्डा खाली होईल त्याला 'व्यवहार पल्य' म्हणतात. व्यवहारपल्याच्या केशराशीतून, प्रत्येक

केसखंडाला, असंख्यात करोडो वर्षाचे जेवढे समय, तेवढे खंड करून, त्याने दुसरा खड्डा भरून , परत एकेका समयात, केस काढले असता, जेवढ्या वेळेत हा दुसरा खड्डा खाली होईल, त्या काळाला 'उद्धार पल्य' म्हणतात. ह्या उद्धार पल्याच्या केसराशीतून, प्रत्येक केसखंडाचे असंख्यात वर्षांच्या समयप्रमाणे खंड करून, तिसरा खड्डा भरून, एकेका समयात एकेक केसखंड काढला असता, जेवढ्या वेळेत तो खाली होईल, त्या काळाला 'अद्धापत्य' म्हणतात.

'दहा कोडाकोडी व्यवहार पल्याचा एक व्यवहार सागर, दहा को. कों. उद्धार पल्यांचा एक उद्धार सागर, दहा को.को. अद्धापल्यांचा एक अद्धासागर' होतो. एक करोड X १ करोड = कोडाकोडी होय. अशा दहा को. को. पल्यांचा एक सागर होतो.

**२७) म्लेंच्छ** : 'विजयार्धपर्वत व गंगा - सिंधू नद्यांमुळे, भरतक्षेत्राचे सहा खंड झाले आहेत त्यातील दक्षिणेकडचा मध्यभाग आर्यखंड असून, अन्य पाच म्लेच्छखंड असतात. हे लोक धर्मक्रियारहित असतात. जे आचार-विचारापासून भ्रष्ट असतात आणि ज्यांना कर्माचा विवेक नसतो.'

**२८) मानुषोत्तर** : 'पुष्करवर द्वीपाच्या मध्यभागी, कुंडलाकाररूपाने स्थित पर्वत. ह्या पर्वताला मनुष्य ओलांडू शकत नाही. म्हणून त्याला मानुषोत्तर म्हणतात. म्हणून अडीच द्वीपाला मनुष्यलोक म्हणतात. हा विस्तार ४५ लाख योजन आहे.''

**२९) योजन** : 'चार कोस म्हणजे एक योजन. ह्याला लघु योजन म्हणतात. ह्या योजन लाच ५०० ने गुणले असता, एक महायोजन बनते. म्हणून २००० कोसचा एक महायोजन होतो.' (४ X ५००=२०००)

**३०) राजू** : 'असंख्यात योजनांचा एक राजू होतो. एक हजार किलोग्रॅम वजनाचा, एक गोळा, इंद्रलोकापासून फेकल्यास, खाली येतांना सहा महिन्यात तो जेवढा लांब जाईल त्याला राजू म्हणतात.'

**३१) वातवलय** : 'ह्या लोकाला चारही बाजूंनी, परिवेष्ठित तीन वायूमंडळ आहेत. ह्यांच्या दाबाने हा लोक वेढलेला आहे. हे स्थिर स्वभावाले असतात. प्रथम घनोदाधि, नंतर घनवात, शेवटी तनुवातवलय आहे. तनुवाताच्या चारी बाजूंनी अनंतअलोकाकाश आहे.'

**३२) विजयार्ध** : 'भरतक्षेत्राच्या मध्यभागी हा पर्वत आहे.'

**३३) वैक्रियक :** 'जे आणिमा इत्यादी आठ गुणांच्या ऐश्वर्याने, एक अनेक, लहान-मोठा, इत्यादिरूप केले जातात त्याला वैक्रियक शरीर म्हणतात.'

**३४) व्यतिरेक** : 'अन्वय व व्यतिरेक शब्दाने सर्वत्र, विधि-निषेध जाणले जाते. पर्याय व्यतिरेकी असतात. जी व्यतिरेकी, अनित्य व आपल्या काळात द्रव्यासह तन्मय असते,

अशा द्रव्य अवस्था विशेषाला वा धर्म वा अंशालाच पर्याय म्हणतात'.

**३५) श्रेणी** : 'सातव्या गुणस्थानानंतर श्रेणी मांडली जाते. वर जाण्याचे दोन मार्ग सांगतात.'

**१) उपशमश्रेणी** : ' ज्या ठिकाणी चरित्र मोहनीय कर्माचा उपशम करत , जीव पुढे जातो त्याला म्हणतात. ह्यामधे ८ ते ११ गुणस्थान होतात. ह्या श्रेणीत जास्तीतजास्त चारवेळा व एका भवात फक्त दोन वेळाच चढू शकतात. पाचव्यांदा क्षपक श्रेणीच मांडली जाते. ह्या उपशम श्रेणीतून निश्चितरूपाने जीव खाली उतरतो. कदाचित ह्यात मरण होवू शकते.'

**२) क्षपक श्रेणी** : 'ज्याठिकाणी चरित्र मोहनीचा क्षय करत जीव पुढे जातो. ह्यात ८ ते १० व १२ वे गुणस्थान होते. ह्या श्रेणीवर आरूढ जीव नियमाने केवल ज्ञान प्राप्त करणारच म्हणून, ह्यात मरण नाही'.

**३६) शल्य** : पीडा देणारी वस्तू, या तीन सांगितल्या असून, त्या ''माया, मिथ्यात्व, निदान'' ह्या आहेत.

**३७) सत्शुद्र** : 'नीचवृत्तीचा आश्रय घेणाऱ्यांना शुद्र म्हणतात. ब्राह्मणादि तीन वर्णांची सेवा करणारे ते शुद्र होय. ह्यात जे दीक्षा योग्य असतात वा ज्यांच्या हातचे अन्नपान खाल्ले जाऊ शकते, त्यांना सत्शुद्र म्हणतात.'

**३८) समवशरण** : 'तीर्थंकर नामकर्मप्रकृतीच्या उदयाने प्राप्त अतिशयांचे धाम असणाऱ्या धर्मसभेला समवशरण म्हणतात. जेथे सर्व प्राणी समानता, समता भावाने, एकसमान शरण प्राप्त करून, दिव्यध्वनीचा आस्वाद घेतात.

**३९) सर्वार्थसिद्धि** : 'ज्यांचे पुन: ह्या भवांमधे आगमन होत नाही त्याला अनुत्तर म्हणतात. अनुदिश विमानांवर, विजय, वैजयन्त, जयन्त, अपराजित, सर्वार्थसिद्धि नावांचे पाच अनुत्तर विमान आहेत.'

**४०) सविपाक** : 'यथासमय फळ देवून बांधलेले कर्म निघून जाणे त्याला सविपाक निर्जरा म्हणतात.'

**४१) संवेग** : 'संसार अथवा संसारास कारणभूत, पापांपासून भयभीत होणे संवेग होय.'

**४२) स्याद्वाद** : 'अनेकांतधर्माचे कथन करणारी भाषा, पद्धती म्हणजे स्याद्वाद होय स्यात् म्हणजे कथंचित् व वाद म्हणजे कथन करणे होय.'

**४३) क्षयोपशम** : 'वर्तमानकालीन सर्वघाती स्पर्धकांचा उदयाभावी क्षय, भविष्यकालीन त्याच स्पर्धकांचा सद्वस्थारूप उपशम व देशघाती स्पर्धकांचा उदय, अशा कर्म अवस्थेला क्षयोपशम म्हणतात.

# अनुक्रमणिका


| प्र.क्र. | नाव (विषय) | पृष्ठसंख्या |
|---|---|---|
| | **प्रस्तावना :** | **१ ते ६** |
| | **१) प्रबंध विषयाचा शोध आणि महत्त्व** | |
| | **२) आत्तापर्यंत झालेल्या संशोधनांपेक्षा वेगळेपणा** | |
| | **३) विषयाची व्याप्ती आणि अभ्यासासाठी घेतलेल्या ग्रंथांची नावे** | |
| | **४) संशोधनासाठी उपयोजिलेली पद्धती** | |
| १) | **'जैन दर्शनातील महत्त्वाचे मुद्दे व त्यांची पुरुषार्थदृष्टीने समीक्षा'** | **७ ते ६७** |
| | १)'सद्वस्तूमीमांसा':- सहाद्रव्ये, साततत्त्वे, पुण्य-पाप, त्रैलोक्यविचार | ७ ते ४५ |
| | २) 'कर्मसिद्धांत':- मुख्य- उपभेद, दशकरण | ४६ |
| | ३) 'आचारविवेचन':- श्रावकचार व प्रतिमावर्णन | ४६ |
| | ४) 'अनेकांतवाद':-लक्षण, भेद, महत्त्व इत्यादि | ४६ ते ५० |
| | ५)'मन':-लक्षण-भेद, वर्णन, लेश्या, कषाय, अध्यवसाय, इत्यादिदृष्टीने वर्णन | ५१ ते ५८ |
| | ६) १) 'साहीत्यिक पुरुषार्थ' | ५९ ते ६५ |
| | २) 'कला' | |
| २) | **'पुरुषार्थ ह्या मुद्दयाचे विविध दृष्टीने सविस्तर वर्णन'** | **६८ ते १११** |
| | **उपविभाग १.** | |
| | १)'पुरुष' शब्दाची व्युत्पत्ति- अर्थ, स्वरूप, इत्यादि दृष्टीने, 'जैन व इतर दर्शनातील' उल्लेख. | ६९ ते ७५ |
| | २)'वैदिक' परंपरेतील 'पुरुषार्थ' व त्यांचे 'अविष्कार', 'जैन' परंपरेतील 'पुरुषार्थ' व त्यांचे 'अविष्कारः' ह्यांची 'जीवनोपयोगितेच्या दृष्टीने समीक्षा' | ७७ ते ८५ |
| | ३)जैन दार्शनिक ग्रंथात 'पुरुषार्थ' शब्दाचा शोध. 'चारही पुरुषार्थांचे', उल्लेख, स्वतंत्र विचार-विस्तार आणि वेगळेपणा. | ८६ ते ९९ |
| | ४) जैन दर्शनानुसार'मनुष्यगतीचे'वैशिष्टय, स्वातंत्र, दुर्लभता, श्रेष्ठत्व व स्थान. | १०० ते १०२ |
| | ५)'उपादान- निमित्त, पाचसमवाय', यांचा परस्परसमन्वय, संबंध, महत्त्व,गौणता. | १०३ ते ११० |
| | **उपविभाग २.** | |
| | **'पुरुषार्थाच्या प्राप्तीचे ( आराधनेचे ) उपाय : कार्यपद्धती.** | **११२ ते १४७** |
| | १)'श्रावक व श्रावकव्रते आणि अकरा प्रतिमा '- पुरुषार्थदृष्टीने समीक्षा | ११३ ते १३६ |
| | २) विविध भावनंचे 'पुरुषार्थदृष्टीने' चिंतन :- | १३७ ते १४२ |
| | अ) बारा भावना:- | |
| | ब) सोळा भावना:- | |
| | क) मैत्री भावना:- | |
| | ड) व्रत भावना:- | |

| | | |
|---|---|---|
| | ३) 'पुरुषार्थाच्या' आराधनेची सार्थकता- मुकुटमणी:'सल्लेखना' | १४३ ते १४५ |
| | **उपविभाग ३** | **१४८ ते १८२** |
| | **'पुरुषार्थाच्या आराधनेची (प्राप्तीची)साधने : -** | |
| | १) 'रत्नत्रयः ' पुरुषार्थाचा आरंभ. | १४९ ते १५४ |
| | २) 'पुरुषार्थाचे' प्रथम साधनः 'तप'१५५ ते १६३ | |
| | ३) 'पुरुषार्थाचा' क्रमिक विकासः 'गुणस्थान' | १६४ ते १७४ |
| | ४) 'पुरुषार्थाचा' परमोत्कर्ष : 'ध्यान' | १७५ ते १८० |
| | **उपविभाग ४** | |
| | **'पुरुषार्थाची प्रेरणास्थाने वा आदर्श'** | **१८३ ते २१२** |
| | १) 'तीर्थंकर''- आदिनाथ, शांतिनाथ, नेमिनाथ, पार्श्वनाथ, महावीर, ह्यांचा कार्यक्षेत्रांची 'पुरुषार्थ' दृष्टीने समीक्षा, आणि आगमात उद्धृत अन्य उदाहरणे: | १८४ ते १९८ |
| | २) श्रुत आराधना - | १९९ ते २०२ |
| | ३) गुरुउपदेश- | २०३ ते २०८ |
| | ४) धर्म संगति- | २०९ ते २११ |
| **३)** | **'जैन तत्त्वज्ञानात कर्मसिद्धांताचे स्थान'** | **२१३ ते २८८** |
| | **उपविभाग १** | |
| | **'जैन तत्त्वज्ञानात कर्मसिद्धांताला अग्रस्थान मिळण्याची कारणे: मीमांसा'** | **२१४ ते २२१** |
| | **उपविभाग २.** | |
| | **'अष्टकर्मांची पुरुषार्थदृष्टीने समीक्षा'** | **२२२ ते २६८** |
| | १) कर्माचे स्वरूप, लक्षण, भेद, इत्यादिरूप सामान्य वर्णन- | २२२ ते २२६ |
| | २) 'कर्मसिद्धांतातील', महत्त्वाच्या, मूळ,संकल्पनांचा आढावा- | २२७ ते २३८ |
| | ३) 'अष्टकर्म':- मूळ व उत्तर प्रकृतिः लक्षण-भेद, आस्रवांची कारणे- | २३९ ते २५९ |
| | ४) 'स्थितिबंध':-स्वरूप, भेद, वैशिष्ट्ये, इत्यादि विवेचन- | २६० ते २६२ |
| | ५) 'अनुभागबंध':- स्वरूप, लक्षण, भेद, इत्यादि विवेचन - | २६३ ते २६५ |
| | ६) 'प्रदेशबंध':- लक्षण, भेद, वैशिष्ट्ये, इत्यादि विवेचन - | २६६ ते २६७ |
| | **उपविभाग ३** | |
| | **'दशकरण': कर्मांच्या दहा अवस्थांची पुरुषार्थदृष्टीने समीक्षा** | **२६९ ते २८७** |
| | **उपसंहार (निष्कर्ष)** | **२८९ ते २९२** |
| | **तक्ते (Tables)** | **२९३ ते २९७** |
| | **संदर्भ-ग्रंथ-सूची** | **२९८** |

# प्रस्तावना

१) प्रबंध विषयाचा शोध आणि महत्त्व

२) आत्तापर्यंत झालेल्या संशोधनांपेक्षा वेगळेपणा

३) विषयाची व्याप्ती आणि अभ्यासासाठी घेतलेल्या ग्रंथांची नावे

४) संशोधनासाठी उपयोजिलेली पद्धती

## १) प्रबंध विषयाचा शोध आणि महत्त्व

'जीवन' ही एक शाळा आहे. 'स्थळ-काळ-मर्यादित' लौकिक शिक्षण, जगाची आणि विविध विषयांची, 'स्थूल' ओळख करून देतात. आयुष्यभर खरे शिक्षण मात्र, ह्या 'जीवनरूपी' शाळेतून, विविध अनुभवातूनच, मिळत राहते. 'धर्म व आध्यात्माकडे', मी अपघातातूनच वळले. मात्र सततच्या अभ्यासाने, त्यात विशेष 'रुचि आणि गती' निर्माण झाली. गेली ३० वर्षे अखंड 'अभ्यास, वाचन, चिंतन, मनन,' अव्याहतपणे चालूच होते. ह्या 'अभ्यासाच्या' विशेष आवडीने, 'एम.ए.च्या' अभ्यासक्रमासाठी, 'प्राकृतचा गंध' नसतांनाही, प्रवेश घेतला. त्याचवेळी 'सन्मति-तीर्थ' संस्थेशी, 'प्राकृत-जैनॉलॉजी', अभ्यासक्रम शिकण्याच्या निमित्ताने, जोडली गेले. त्यानंतर गेली २० वर्षे ह्या संस्थेतून, 'अध्ययन, अध्यापनाचे,' सत्र आजपर्यंत चालू आहे. त्यातूनच 'तौलनिक' अभ्यास करण्याची संधी मिळाली. 'भगवद्‌गीता, बौद्ध ग्रंथ धम्मपद, पतंजलीचे योगसूत्र', अशा तौलनिक अभ्यासाने, विचारांची दिशा बदलली. त्यामुळे 'इतर दर्शनांकडे' बघण्याची, 'विशिष्ट चौकटीत बद्ध असणारी बुद्धी' मुक्त झाली.

ह्या अखंड अभ्यासाच्या वेळीच, 'प्रबंधाचे' विचार सुरू झाले होते. फक्त 'पदवीची' पूर्तता व्हावी, इतकीच अपेक्षा वा इच्छा माझी नव्हती. ३० वर्षांच्या ह्या अखंड अभ्यासाने, 'सिद्धांतांची' 'जाण' व 'समज' दिली होती, ती ह्या 'प्रबंधात' प्रतिबिंबित व्हावी, ही इच्छा होती. एखादा नवशिका जसा विषय निवडतो, तशी विषय निवडण्याची माझी पद्धती नाही. कोणत्याही विषयात प्रवेश करण्याचे अनेक द्वार असतात. जैनॉलॉजीतही 'आचार, कला, भाषा, तत्त्वज्ञान' अशा अनेक मार्गांने प्रवेश होवू शकतो. माझी, 'तत्त्वज्ञानातच, विशेषच रुचि, गती' असल्याने, तत् संबंधी विषयाची निवड करण्याचे नक्की केले गेले. जैन 'तत्त्वज्ञानाचा' मूळ आधार असणारे, अशी 'नवतत्त्वे, सहा द्रव्ये' आहेत. ह्या दोन्ही विषयात, पूर्वीच प्रचंड काम झालेले असल्याने, मात्र संकलन करून, 'प्रबंध' करण्याची इच्छा नव्हती. 'नवा दृष्टिकोन, नव्या सादरीकरणाला', त्यात वाव नसल्याने त्या विषयाखालोखाल, किंबहुना त्या इतकाच महत्त्वाचा विषय म्हणून, 'कर्मसिद्धांताला' पसंती दिली गेली.

जैन तत्त्वज्ञानात 'कर्मसिद्धांताचे' अनन्यसाधारण स्थान आहे. 'कर्मसिद्धांताचे' जाणकार असो वा 'ज्ञानीपंडित स्वाध्यायी असो, वा श्रावक' असो, दैनंदिन व्यवहारात, संभाषणात, पावलोपावली, हा 'कर्मसिद्धांत' डोकावताना दिसतो.

* 'प्रवचनाला येण्याची प्रबळ इच्छा होती हो ! पण 'अंतराय' कर्मच आडवे आले.'

* 'माझ्या 'ज्ञानावरणीय कर्माचा' उदयच असा आहे की, शिकवलेले, वाचलेले लक्षातच राहत नाही'.

* ‘काय बाई हे, ‘दर्शणावरणीय कर्म’, सामायिकाला बसले की, झोपच येते’.

अशा ‘कर्म’ संबंधी वाक्यांचा, वापर सर्रास होतांना आढळतो. ‘जैन दर्शन’ मुळातच ‘निवृत्तिप्रधान’ असून, ‘वैराग्याचा’ पुरस्कर्ता आहे. त्यामुळेही ‘कर्मविषयाला’ वारंवार खतपाणी मिळून, त्याची पुष्टीच होतांना दिसते. ‘आगमातही’ असे उल्लेख, सहजी दृष्टीस पडतात. जसे

१) ‘‘कडाण कम्माण ण मोक्खु अत्थि’’।

२) ‘‘न तस्स दुक्खं विभयंति नाइओ । न मित्तवग्गा न सुता न बंधवा ।
एक्को सयं पच्चुण होई दुक्खं । कत्तारमेव अणुजाई कम्मं ।।’’ उत्त. अ. १३/२३

ह्याउलट काही ठिकाणी ‘पुरुषार्थवाचक’ उल्लेख आढळतात.

१) ‘‘अप्पा चेव दमेयव्वो, अप्पा हु खलु दुद्दमो ।
अप्पा दंतो सुही होइ, अस्सि लोए परत्थ य’’ ।। उत्त.अ. १/१५

२) ‘‘वरं मे अप्पा दंतो, संजमेण तवेण य ।
मा हं परेहि दम्मंतो, बंधणेही वहेहिं य ।।’’ १/१६

३) ‘‘अप्पाणमेव जुज्झाहि, किं ते जुज्झेण बज्झओ ।
अप्पाणमेव अप्पाणं जईत्ता सुहमेहए ।।’’ उत्त. अ. ९/३५

‘आगमात’ सर्वत्र अशी विविधता दिसत असली तरी, प्रत्यक्षात ‘कर्माचा’ प्रचंड प्रभाव जाणवतो, हे मात्र नक्की आहे. ‘कर्मसिद्धांताचे’ वर्णन ही ‘जैनांची’ विशेषता असून, त्याचे ‘अनन्यसाधारण’ महत्त्व आहे, ह्यात दुमतच नाही. मात्र जसजसे ‘अभ्यास, चिंतन, मनन, सूक्ष्म’ होत गेले, तेव्हा मात्र, स्पष्टपणे सैद्धांतिक विचार ‘पुरुषार्थाकडे’ झुकणारा आहे हे, प्रकर्षाने जाणवले. ‘कर्मसिद्धांताला अबाधित ठेवून, ‘पुरुषार्थाच्या’ छटा ‘आचार व तत्त्वज्ञानात’, कशा आणि कोठे दिसतात, हे शोधणे, हा उद्देश ठरला. ‘कर्माकडे’ वळलेली, त्याच्या भीतीने झाकोळलेली दृष्टी, ‘पुरुषार्थाकडे’ वळवावी, ह्या मुख्य उद्देशानेच माझ्या विषयाचे शीर्षक :

**‘‘जैन कर्मसिद्धांत आणि पुरुषार्थ’’: एक अभ्यास**

**(कर्मविपाक आणि कर्मस्वातंत्र्य)**

असे निश्चित केले गेले.

## २) आत्तापर्यंत झालेल्या संशोधनांपेक्षा वेगळेपणा

जैन दर्शनातील 'कर्मसिद्धांताचे' अढळ स्थान आणि त्याचे 'अनन्यसाधारण' महत्त्व हे सर्वश्रुतच आहे. ह्या विषयाचे 'समग्र, परिपूर्ण' विवेचन, 'कर्मसिद्धांताच्या' मूलाधार ग्रंथांमध्ये आढळते. आधुनिक ग्रंथांमध्येही, त्याच्या 'छटा, सार, स्वतंत्र', चिंतनही आढळते. ह्या मूळ ग्रंथांमध्ये, ह्या 'कर्म' विषयाच्या विवेचनाचा ताणाबाणा, इतका आणि असा काही घट्ट विणलेला आहे की, त्यात माझ्या विचारांची एक सुई देखील, मी घालू शकत नाही. मात्र ह्या 'कर्मसिद्धांताची' 'गूढता आणि रहस्य', मला सदैव आकर्षित करते. पूर्णतः 'नास्तिक' असणाऱ्या जैन धर्माने, 'ईश्वर' तत्त्वाला न स्वीकारता, त्या जागी, अत्यंत 'सूक्ष्म, विशद, तर्कनिष्ठ, परिपूर्ण', विवेचनाद्वारे 'कर्मसिद्धांताला' प्रस्थापित केले. त्याचमुळे जनामनावर त्या 'कर्मांचा' पगडा, त्याची भीती ही प्रकर्षाने जाणवते. त्याचाच परिणाम म्हणून हळूहळू, ती पराधीनता, 'वर्तनावर, आचारावर, विचारावर, व्यवहारावर', दिसू लागली. त्याची विपरीतता अशी झाली की, प्रत्येक 'चुकीचे खापर वा जबाबदारी कर्मांवर' थोपवून, 'नामनिराळे होण्याची, हतबल होण्याची, नियतिवादाकडे' दृष्टी ठेवण्याची प्रवृत्ती, वाढीला लागली. 'पुरुषार्थ प्रधानता,' आणि 'व्यक्तिस्वातंत्र्यावर', निर्भर असणारा हा 'स्वावलंबी' धर्म, 'नियतिवादी' होतो की काय, अशी भीती वाढू लागली. 'कर्म प्रधानता' आणि 'नियतिवाद' ह्यांच्या प्रभावाने, 'अनेकांताचे' बीज असणारे, 'पुरुषार्थ' झाकोळले गेले. 'अनेकांताचा' बिगुल वाजवणारे जैन दर्शन, 'एकांतवादी' नक्कीच नाही, हे मला सिद्ध करायचे आहे.'एकांतवाद, निरुद्यम, मिथ्यानियतीच्या' पुटांनी, मलिन झालेला हा आरसा, मला 'अनेकांत' दृष्टीने स्वच्छ करून, प्रकर्षाने झळकणारा 'पुरुषार्थ' समोर आणायचा आहे. कारण 'अनेकांताचे बीज पुरुषार्थ' आहे तर, 'पुरुषार्थाचा पाया वा आधार 'अनेकांत' आहे. 'उपादान शक्ती' प्रत्येक द्रव्याचा स्वभाव आहे. ह्या 'उपेक्षित' झालेल्या 'स्वभावधर्माकडे', मला लक्षवेधायचे आहे. 'निवृत्तिप्रधानता' कायम ठेवूनही, 'जीवनपराङ्मुखता, संन्यास, वैराग्याची' छटा पुसायची आहे.

जैन धर्म 'मोक्ष' पुरुषार्थावर आधारित 'निवृत्तिप्रधान' आहे, ह्यात शंकाच नाही. मात्र 'अतिनिवृत्ति, अतिउदासिनता, अतिधार्मिकता', ह्या कारणांनी 'अभिनिवेशता' वाढलेली प्रकर्षाने जाणवते. 'सुंदर तत्त्वांचा' खुला खळाळता, हा 'जैनत्वाचा' जिवंत झरा, 'साचेबंद' होण्याची भीती स्वस्थ बसू देत नाही.

जैन धर्मात 'साधू' आणि 'श्रावकधर्माचे' स्वतंत्र प्रतिपादन केलेले आहे. मात्र काही धार्मिक लोक, 'व्यर्थ हाव, प्रसिद्धीसाठी,' साधूधर्माचे पालन 'श्रावकधर्माप्रमाणे' करतांना आढळतात. वास्तविक 'श्रावकांचा प्रवृत्तिमार्ग,' विशिष्ट चौकटीत, नियमांमधे, राहून करावयाचा आहे. हा मार्ग नक्कीच 'पलायनवाद, अरसिकता, कर्तव्यपराङ्मुखता' शिकवित नाही. 'कर्मसिद्धांताची

महत्ता, श्रेष्ठता,' असूनही, हा धर्म कसा आणि किती 'पुरुषार्थवादी' आहे, ह्याकडे मला लक्ष वेधायचे आहे. साक्षात् 'अनुभूतीतून, आत्मसामर्थ्याने, केवलज्ञानाने,' यथार्थ सत्य जाणून, 'जसेच्या तसे' उपदिष्ट वर्णन आगमात आहे. अत्यंत 'परिपूर्ण, विज्ञाननिष्ठ' ह्या वर्णनात, 'तीर्थंकरांनाही' नव्याने काही मूलभूत बदल करावे लागले नाही. 'द्रव्य, क्षेत्र, काल, भावानुरूप', वरवर थोडेफार बदल स्वीकारले गेलेत. अशा परिस्थितीत, 'मी नव्याने काय सांगणार?' मला फक्त, 'दृष्टी, मान्यता, अभिप्राय' बदलायचा आहे. 'नय, अनेकांत' समोर ठेवून, 'नवतत्त्वांचे' पुनर्परीक्षण करावयाचे आहे. आधार 'तत्त्वज्ञानाचाच' घेतला आहे. 'विषयांचे पैलू आणि बघणाऱ्याची दृष्टी', ह्यातील 'काय व कसे' बघायचे हे मी नक्की केले. मी एक 'श्रावक,' (अभ्यासक) म्हणून त्याकडे बघणार असून, तत्त्वांच्या बाजूने 'पुरुषार्थ' बाजू बघणार आहे आणि हेच माझ्या ह्या 'प्रबंधाचे' खास वेगळेपण आहे.

### ३) विषयाची व्याप्ती आणि आधारभूत ग्रंथांची नावे

जैन मान्यतेनुसार 'तीर्थंकर-परंपरा' अव्याहतपणे चालू आहे. आजही 'आगमरूपाने', त्यांचे उपदेश ऐकण्याचे भाग्य, 'श्रावकांना' लाभत आहे. 'जैन दर्शनाचा' मुख्य आधार 'मोक्ष' पुरुषार्थच आहे. ह्या 'मोक्ष' पुरुषार्थावरच, 'साततत्त्वे, सहाद्रव्ये, नवपदार्थ, कर्मसिद्धांत', इत्यादी तत्त्वांची रचना झालेली दिसते. 'कर्मबंध, उदय, उदीरणा, मार्गणा, गुणस्थान,' अशा कठीनतर विषयांचे सूक्ष्म सविस्तर वर्णन, 'कर्मसिद्धांताचा' विषय आहे. अत्यंत 'समग्र, वस्तुनिष्ठ, तर्कशुद्ध,' ह्या विवेचनात, कोणत्याही 'शंका वा प्रश्नांना' जागाच ठेवलेली नाही. जीवामधे 'प्रतिसमय होणाऱ्या भाव, परिणामांची मांडणी, त्यांचे फळ', इत्यादींचे 'सूक्ष्म गणिती पद्धतीने' विवेचन आढळते. अत्यंत 'गहन, क्लिष्ट, गंभीर', अशा ह्या विषयाच्या स्पष्टीकरणासाठी, विपुल ग्रंथसंपदा रचली गेली. 'प्रबंधात' ह्या विषयाच्या सादरीकरणासाठी मूलगामी, 'शौरसेनी' प्राकृतात रचलेल्या, 'दिंगबर' संप्रदायातील ग्रंथ घेण्याचे मी ठरविले आहे. 'कर्मसिद्धांताचा' विषय हा 'करणानुयोगाचा' भाग आहे. त्यात प्रामुख्याने, 'पंचसंग्रह, गोम्मटसार कर्मकांड, लब्धिसार, क्षपणासार, धवला', ह्या ग्रंथाचा मुख्यरूपाने आधार घेतला जाणार आहे. माझा विषय 'पुरुषार्थ व कर्मसिद्धांत' दोन्ही असून, 'श्रावकांच्या दृष्टिकोनातून विषय मांडणी करणार आहे. त्यामुळे त्या त्या विषय विस्तारासाठी, आवश्यक ग्रंथांचा आधार घेतला जाणार आहे. आगमयुगातील 'भगवती आराधना', दार्शनीक ग्रंथांपैकी 'तत्त्वार्थसूत्र' आणि त्यांचे टीकाग्रंथ, उत्तरकालीन व अभिजात संस्कृतचा नमुना असणारे 'पुरुषार्थसिद्ध्युपाय', अशा ग्रंथांचा आधार मी घेणार आहे. 'कुंदकुंदांचे' साहित्य जरी, 'द्रव्यानुयोगाचा' विषय असले तरी, सर्वच 'अनुयोगांचे' प्रतिनिधित्व करणारे म्हणून, ते समानरूपाने आधार म्हणून ठेवले आहेत. प्रसंगानुरूप विषय प्रस्तुतिसाठी अन्य, आवश्यक ग्रंथांचे संदर्भ घेतले जाणार आहेत. 'जैन तत्त्वज्ञानाचा' कणा असणाऱ्या, ह्या

विषयाचा आवाका, अफाटच आहे. सर्व बाजूंनी, त्याला स्पर्श करणे केवळ अशक्यप्रायच आहे, आणि माझा तसा उद्देशही नाही. मूळतःच अत्यंत नीटनेटकेपणाने, हा विषय आगमात असल्याने, त्यातून मूळ, 'कर्म शब्द, त्याच्या व्याख्या, भेद, बंध व त्याची कारणे, भेद, दशकरण', अशा दृष्टीने विषय मांडला आहे. ह्या सर्व 'तत्त्व' आणि 'कर्मसिद्धांतातून' लपलेला, गर्भित, 'पुरुषार्थ', मी डोळ्यांसमोर आणणार आहे. एका दृष्टिक्षेपात 'तत्त्वे, द्रव्ये, सिद्धांत', समोर आणून, त्यातील 'पुरुषार्थचे' महत्त्व दृढ व्हावे, हाच ह्या प्रबंधाचा उद्देश आहे.

## आधारभूत ग्रंथ

'कर्मसिद्धांतावर' रचलेल्या शेकडो ग्रंथ संपदेतून, 'प्रबंधाच्या' दृष्टीने काही निवडक ग्रंथच विचारात घेतले आहे. त्यांचा ढोबळ आढावा देत आहे.

| पुस्तकाचे नाव | आचार्यांचे नाव | काळ | भाषा | विषयवर्णन |
|---|---|---|---|---|
| १. षट्खंडागम | आ. भूतबली<br>आ. पुष्पदंत | इ.स. १ ले शतक | शौरसेनी प्राकृत | 'कर्मसिद्धांत, गुणस्थानचर्चा', करणारे सैद्धांतिक ग्रंथ |
| २. धवलाटीका | आ. वीरसेन | ७ वे शतक | शौरसेनी प्राकृत | षट्खंडागमाच्या विषयाचा विस्तार |
| ३. भगवती आराधना | शिवकोट्याचार्य | २ रे शतक | शौरसेनी प्राकृत | चार आराधना, ज्ञान, अंहिसा भावना, सल्लेखना इ. |
| ४. कुंद्कुंदाचे साहित्य | आ. कुंदकुंद | इ.स. २, ३ रे शतक | शौरसेनी प्राकृत | 'द्रव्यानुयोगाचे' आधारभूत ग्रंथ असून, शुद्धआत्मवर्णन. |
| ५.तत्त्वार्थसूत्र व यांचे टीकाग्रंथ | आ. उमास्वामी<br>आ. पूज्यपाद<br>आ. अकलंक | इ.स. ३ रे शतक | संस्कृत | आगम उपदेशांचा सार, सर्व विषयांना समर्पित ग्रंथ. |
| ६. पंचसंग्रह | अज्ञात | ६ वे शतक | शौरसेनी आर्षप्राकृत | कर्मसिद्धांत |
| ७. कार्तिकेयानुप्रेक्षा | स्वामी कार्तिकेय | ८ वे शतक | शौरसेनी प्राकृत | वैराग्यवर्धक बारा भावना |
| ८. द्रव्यसंग्रह | सिद्धांतचक्रवर्ती नेमिचंद्राचार्य | १० वे शतक | शौरसेनी प्राकृत | द्रव्य, तत्त्व, रत्नत्रय, वर्णन |
| ९.गोम्मटसारकम्मकांड-लब्धिसार,क्षपणासार | सिद्धांतचक्रवर्ती नेमिचंद्राचार्य | १० वे शतक | शौरसेनी प्राकृत | कर्मसिद्धांत, गुणस्थान इ. 'करणानुयोगाचे'आधार ग्रंथ |
| १०.पुरुषार्थ सिद्धयुपाय (रत्नकरंडश्रावकचार) | अमृतचंदाचार्य<br>आ.समंतभद्र | ११ वे शतक | संस्कृत | श्रावकाचार, रत्नत्रयवर्णन 'चरणानुयोगाचा' ग्रंथ |

### ४) संशोधनासाठी उपयोजिलेली पद्धती :

जैन 'तत्त्वज्ञानाची' अभ्यासक म्हणून, गेली कित्येक वर्षे मूलगामी जैन ग्रंथांचे, 'वाचन, चिंतन, अभ्यास' करीतच होते. त्याची फलश्रुतिरूप प्राप्त, विशेष 'गती व रुचि,' मुळेच विचारमंथन आणि चिंतन मननातून, 'पुरुषार्थ' ह्या विषयावर लक्ष केंद्रित केले. ही प्रेरणा घेवून, आत्तापर्यंत केलेल्या अभ्यासाची, नव्यादृष्टीने पुर्नरचना करण्याचे काम येथे केले आहे. त्यासाठी ह्या सततच्या 'स्वाध्यायाचा, अभ्यासाचा, अव्याहत अध्यापनाचा' खूपच फायदा झाला. त्याचबरोबर वेळोवेळी 'शिबिर, संगोष्ठी, वाचनेत,' सहभागी होण्याने, 'शोधपेपराच्या वाचनाने,' नवी दिशा मिळत गेली. 'गुरुजनांच्या, ज्ञानीपंडितांच्या' बरोबर सतत झालेल्या चर्चा, 'प्रश्नोत्तरांमुळे' समाधान होत गेले. त्या सर्वांचे प्रत्यक्ष साकाररूप हा 'प्रबंध' आहे.

'पुरुषार्थ' ह्या विषयाला केंद्रस्थानी ठेवूनच, पुढच्या 'प्रकरणांची' रचना केली गेली, त्यानुसार 'प्रबंध' विषयाची रूपरेषा, साकारली गेली.

# प्रकरण १

# ''जैन दर्शनातील महत्त्वाचे मुद्दे आणि त्यांची 'पुरुषार्थ' दृष्टीने निरीक्षणे''

प्रस्तावना :

१) 'सद्‌वस्तुमीमांसा - सहा द्रव्ये, सात तत्त्वे, पुण्य-पाप, त्रैलोक्यविचार'-

२) 'कर्मसिद्धांत - मुख्य-उपभेद, दशकरण' -

३) 'आचारविवेचन - श्रावकाचार व प्रतिमावर्णन' -

४) 'अनेकांतवाद - लक्षण, भेद, महत्त्व इत्यादि' -

५) 'मन - लक्षण-भेद, वर्णन, लेश्या, कषाय, अध्यवसाय, इत्यादि दृष्टीने वर्णन' -

६) १)'साहित्यिक पुरुषार्थ' -

२) 'कला' -

**प्रस्तावना :**

'जैन दर्शन' हे, अनेक अंगाने विचार करणारे, परिपूर्ण दर्शन आहे. प्रत्येक विषयाचा 'समग्र, सखोल, सूक्ष्म' विचार, 'जैनांनी' केलेला आढळतो. 'तत्त्व, द्रव्य, कर्म, आचार, मन, खगोल, भूगोल, ज्योतिष, वैद्यकशास्त्र, कला, साहित्य,' प्रत्येक विषयांच्या चिंतनाचे श्रेय 'जैनांना' जाते. ह्या सर्व विषयांचे वर्णन करण्यास, विपुल ग्रंथसंपदाही रचली गेली. हे सर्व विषय, म्हणूनच स्वतंत्र अभ्यासाचा भाग आहे. त्या सर्वांना मांडणे केवळ अशक्यच आहे. 'प्रबंधाचा' उद्देशही तसा नसल्याने, 'पुरुषार्थ' ज्यातून प्रतिबिंबित झाला आहे, असे जेवढे मुद्दे आढळले, त्यावरच विचार केला आहे. त्यापैकी 'तात्त्विकमीमांसा' संक्षेपाने करून, त्यात दृष्टीत्पत्तीस येणाऱ्या 'पुरुषार्थाचेच' चिंतन करून, त्यावर भर दिला आहे. सर्व विषयांची यथायोग्य वर्गवारी करून, येथे ओळख करून देत आहे. त्यापैकी काही मुद्दे 'प्रबंधात' यथायोग्य ठिकाणी घेतले गेले आहेत. म्हणून त्यांचे विवेचन टाळून, त्याव्यतिरिक्त जे अन्य विषय आहेत, त्यांचा आढावा ह्या विभागात प्रकर्षाने मांडला आहे. विषयात गर्भित 'पुरुषार्थाकडे' लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

## १) 'सद्वस्तुमीमांसाः सहा द्रव्ये, सात तत्त्वे, पुण्य-पाप, त्रैलोक्यविचार'

**भूमिका** : भारतीय सर्व दर्शनांनी जीवाचा, त्याचा 'सुखाचा, अपवर्ग, मोक्ष, परमप्राप्तव्य,' इत्यादींचा विचार केलेला दिसतो. प्रत्येक दर्शनाने आपले विशिष्ट 'तत्त्वज्ञान' सांगितले आहे. काही 'तत्त्वे,' ही, सर्वच'दर्शनांमधे' समानरूपाने आढळतात, ज्याला आपण 'वैश्विकसत्य' म्हणू शकतो. 'जैन दर्शनाचेही' असेच काही सिद्धांत आहेत, जे 'अटळ, अढळ, महत्त्वाचे' आहेत. त्यांना 'जैनांचे' वैशिष्ट्य वा वेगळेपण म्हणता येईल. त्यापैकी ह्या विभागात 'द्रव्य, तत्त्व, पाप-पुण्य, त्रैलोक्यविचार, उपादान-निमित्त, व पाच समवाय, आगम, अहिंसा,' ह्या विषयांचा ऊहापोह मांडला आहे. त्यापैकी 'उपादान-निमित्त, पाच समवाय' हा विषय, 'दुसऱ्या प्रकरणातील, प्रथम उपविभागात' मांडला आहे. 'आगमाचा' समावेश, 'दुसऱ्या प्रकरणातील, चतुर्थ उपविभागात' केला आहे. 'अहिंसेचे' विवेचन, 'दुसऱ्या प्रकरणातील, दुसऱ्या उपविभागात,' केले गेले आहे. त्याव्यतिरिक्त अन्य विषय येथे मांडण्यात आले आहेत.

### १) द्रव्य : विषय ओळख :

जैन तत्त्वज्ञानातल्या महत्त्वाच्या विषयांपैकी, 'द्रव्य' हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. 'जैन' दर्शनाने, ह्या 'विश्वाला' अनादि मानले असून, 'द्रव्यांचा' समूहरूप मानले आहे. मुख्यरूपाने सहा 'द्रव्ये' सांगितली आहेत. द्रव्याला, 'गुण व पर्यायांचा' पिंड मानले असून, 'परिणमन' हा त्याचा स्वभाव आहे. 'गुणांना' द्रव्यांचे,'अन्वयी' विशेष मानले आहे. कारण ते 'द्रव्याच्या' सर्व

भागात व सर्व अवस्थांमध्ये असतात. 'पर्यायांना', द्रव्यांचे, 'व्यतिरेक' विशेष मानतात, कारण पर्याय 'एकसमयमात्र' असतात. ह्या 'अनंत गुणांना' आणि 'त्रिकाली पर्यायांच्या' पिंडरूप 'द्रव्याला', केवलज्ञानात युगपत् जाणले जाते. द्रव्याचे वर्णन, 'गुण-पर्याय' असे जरी क्रम अपेक्षेने असले तरी, मूळतः 'द्रव्यात' असा भेद नाही. 'द्रव्य' हा मुद्दा 'तत्त्वज्ञानात' महत्त्वाचा असल्याने, त्याचा खूपच समग्र, परिपूर्ण विचार जैनांनी केला. त्यामुळेच, त्यासाठी 'द्रव्यानुयोगाची', स्वतंत्र शाखाच निर्माण झाली. ह्यामध्ये प्रामुख्याने 'कुंदकुंदाच्या साहित्याचा' निर्देश करावा लागेल. ह्या विपुल ग्रंथसंपदेत, हा 'द्रव्य' विषय खूपच सूक्ष्मतेने मांडला आहे. त्या वर्णनात न जाता, स्थूलपणे आढावा घेवून, निर्देशनास आलेला 'पुरुषार्थ' मांडला आहे.

**विषयविस्तार :**

'तत्त्वज्ञानात' अत्यंत महत्त्वाचा असणाऱ्या, ह्या 'द्रव्य' विषयांचे वर्णन, आगमात लक्षण[१], भेद[२], विशेषता[३] अशा अंगाने केलेले आढळते.

अ) 'द्रव्याच्या' लक्षणाचा विचार, ''सत् व उत्पाद-व्यय-ध्रौव्य, गुणसमूह, गुणपर्यायवान, त्रिकाली पर्यायपिंड,'' अशा विविध दृष्टीने केलेला दिसतो.

ब) भेदाचे वर्णन, ''मुख्य-सामान्य, द्रव्य, स्व-पर, चेतन-अचेतन, मूर्त-अमूर्त, क्रियावान,'' अशा विविध अर्थाने केलेले आढळते.

क) 'द्रव्याची' वैशिष्ट्ये, ''प्रदेश, संख्या, अभेदता, तादात्म्यता, स्वभाव, परिणमन,'' अशा अंगाने वर्णिली आहेत.

१) 'द्रव्याचे' वर्णन 'गुण-पर्यायाशिवाय' होवूच शकत नाही. ह्या 'गुणांचा' ऊहापोह आगमात, लक्षण[४], वैशिष्ट्य[५], द्रव्य-गुणसंबंध[६], अशा विस्ताराने केला गेला आहे.

* 'गुणांचे' सामान्य, लक्षण देवून, 'साधारण-असाधारण, स्वभाव-विभाव,' असे भेद वर्णन दिसते.

* 'गुण' वैशिष्ट्यात, ''त्याचे अनेक अर्थ, गुणांश, अविभाग प्रतिच्छेद, भेदाभेद, गुणांतराचा अभाव, प्रत्येक गुणाची स्वतंत्रता, ज्ञानाशिवाय अन्य सर्व गुणांची निर्विकल्पता, सामान्यगुण, विशेषगुण,'' असे विस्तृत विवेचन केले गेले आहे.

* 'द्रव्य-गुणाच्या' संबंधात, ''गुणांना द्रव्याचे विशेष, सहभागी, अन्वयी म्हटले आहे. गुणांचा आश्रय द्रव्य, अनुजीवी-प्रतिजीवी गुण, द्रव्याचे अनंत गुण,'' असे वर्णन आढळते.

२) 'द्रव्याच्या' पर्यायांचे वर्णनही आगमात, लक्षण[७], भेद[८], विशेषता[९] अशा क्रमाने केले गेले आहे.

* 'पर्यायाचे,' सामान्य लक्षण, 'द्रव्यांश, द्रव्यविकार', अशा अर्थाने वर्णन दिसते.

* ‘पर्यायाच्या’ भेदात, ‘‘सहभागी-क्रमभावी, द्रव्य-गुण, अर्थ-व्यंजन, कारण शुद्ध-कार्यशुद्ध, स्व-पर,’’ असे वर्णन आढळते.

* ‘पर्यायाच्या’ वैशिष्ट्य वर्णनात, ‘‘स्वतंत्र निर्देश करण्याचे कारण, व्यतिरेकी अंश, क्रमभावीपणा, स्वतंत्रता, प्रयोजन,’’ असा आढावा घेतला आहे.

अशा प्रकारे ‘द्रव्य-गुण-पर्याय’ ह्यांच्या सखोल अभ्यास चिंतनातून, त्यात गर्भित ‘पुरुषार्थ’ निदर्शनास आणला आहे.

**‘द्रव्य’ संकल्पनेत अध्याहृत ‘पुरुषार्थ’:**

१) ‘‘द्रव्य अनादिनिधन आहे, सत् आहे, उत्पादव्ययध्रौव्यात्मक आहे.’’

‘द्रव्याची अनादिनिधनता, ध्रौव्यता,’ जाणल्याने, मरणाची भीती नष्ट होण्यास मदत होते. आगमात ‘सम्यग्दर्शनाच्या’ प्राप्तीत, ज्या ‘सात भयांचा नाश’, आवश्यक मानला आहे, त्या सात प्रकारच्या भयांचा नाश, ह्या ‘द्रव्य’ स्वरूपाला जाणल्याने होते. ‘उत्पाद वा व्यय’ हे फक्त, ‘पर्यायांचे’ होत असल्याने व ते ‘स्वयमेव’होत असल्याने, ‘उत्पन्न करणे’ ह्या वृथा ‘अभिमान वा अहंकाराचा,’ निरास होण्यास मदत होते. ‘द्रव्याच्या ध्रौव्याची’ खात्री पटली की, ‘व्ययाची’ व्यर्थ ‘भीती वा दुःख’ नाहीसे होते.

२) ‘‘द्रव्य कधी आपला स्वभाव सोडत नाही.’’

◆ ह्या ‘स्वभाव ज्ञानाची’ खात्री पटली की, संसार दशेतील, ‘कर्मप्रभावाने व्यक्त, आणि प्राप्त कमतरता,’ खुल्या दिलाने स्वीकारण्याची शक्ती मिळते. जे आत्ता प्राप्त नाही, त्या ‘प्राप्तव्याकडची’ वाटचाल, अधिकच सुसह्य होण्यासाठी ‘प्रेरणा वा शक्ती’ मिळते. ‘द्रव्याच्या’ सामान्य गुणांपैकी, एक ‘वस्तुत्व’ गुण आहे. ह्या-गुणाने प्रत्येक ‘द्रव्य’ आपआपली ‘प्रयोजनभूत’ क्रिया करीतच असते. त्यावरून हे दृढ होते की, कोणतेच ‘द्रव्य’ निरर्थक नाही. व्यवहारात, ‘कर्मप्राप्त दुर्बलतेने उपहास, अपमान, नाचक्की’ होत असली तरी, परमार्थतः आपले ‘स्वतःचे मूल्य’ असल्याचे कळते. ह्या ज्ञानाने, आपल्याच ‘शक्तींची,’ नव्याने ओळख होवून, जणू जीवनाला, ‘नवा अर्थ, नवे ध्येय, नवे उद्दीष्ट्य प्राप्त होते, हाच खरा ‘पुरुषार्थ’ आहे.

३) ‘‘द्रव्य अन्यरूप परिणमन करीत नाही.’’

प्रत्येक ‘द्रव्य’ त्याच्या ‘द्रव्यत्व’, या सामान्य गुणाने, सदैव परिणमनशील असते. हे परिणमन मात्र, त्याच्या ‘स्व’ द्रव्य-क्षेत्र-काल-भाव रूपानेच होते. त्यानुसारच अवस्थांतर घडत असते. ह्या परिणमनात ‘कर्म’ हे निमित्त असले तरी, ‘जीव’ हेच ‘उपादान’ आहे. ह्यामधे कोणी, ‘ईश्‍वर वा व्यक्ती वा परिजन वा अन्य’, जबाबदार नाहीत. कोणीही ‘कर्ता-धर्ता-हंता’ नाही, ही खात्री झाली की, कर्म प्राप्त ‘अपयश वा दुःखाचे,’ खापर इतरांवर टाकणे, वा

'उपलब्ध पुण्यप्राप्त, भोग-सुखांचे श्रेय लाटणे', ह्या गोष्टींना आळा घालण्याची, 'बुद्धी वा शक्ती' प्राप्त होते. त्यामुळे बदलणाऱ्या अवस्थांमुळे होणारे, दुःखही कमी होते.

४) ''द्रव्य अनन्यशरण आहे''

'द्रव्यातील' सामान्य गुणांपैकी 'अस्तित्व' गुणामुळे, 'द्रव्य' सदैव आहेच. त्या 'सत्' स्वभावाला टिकवण्यास, कोणालाही शरण जाण्याची गरज नाही. वर्तमानात प्राप्त 'प्रतिकूलता, कमतरता,' ह्या फक्त 'कर्म' उदयाने होणाऱ्या अवस्था आहेत. त्यामुळेच त्या परिस्थितीत 'हतबलता, हीनता, दीनता, परावलंबनता,' न स्वीकारण्याची प्रेरणा, ह्या 'ज्ञानाने' मिळते. ह्या विधानानेच 'जैन धर्माची स्वावलंबनता, व स्वतंत्रता' अधिकच पुष्ट होते. किंबहुना हे विधान त्या 'पुरुषार्थाचे' द्योतकच आहे.

५) 'सर्व द्रव्य सप्रतिष्ठित आहेत.' द्रव्यातील सामान्य गुणांपैकी एक, 'अगुरुलघु' ह्या गुणामुळे-

* 'एक द्रव्य दुसऱ्यात काही करू शकत नाही'.

* 'एक द्रव्य अन्य द्रव्यरूप होत नाही'.

* 'द्रव्यांची संख्या कमी जास्त होत नाही'.

* 'एक गुण अन्य गुणरूप होत नाही'.

* 'व्यवहारात परद्रव्यात कर्तृत्व' दिसत असले तरी, त्यात 'मी' फक्त निमित्त आहे, ह्याचे 'भान', हे ज्ञान करवते. त्यामुळे व्यर्थ 'अहंकार, कर्तृत्व, भोक्त्वृत्व,' नष्ट होण्यास मदत होते'.

* 'व्यवहारात, 'पुद्‌गलपर्यायरूप' अवस्थेने, 'ज्ञानी, सुंदर, श्रीमंत, दिसत असले वा त्या प्राप्त 'अनुकूलतेचा' अत्यंत गर्व असला तरी, ती मात्र 'पर्याय आहे, नाशवंत आहे, अन्य द्रव्य आहे,' हे जाणले की व्यर्थ 'मोह-राग-व्देष' कमी करण्यास बळ मिळते.

* 'स्व' प्रभुत्वाची, सामर्थ्याची, अनंतगुणांची, ही नवी ओळख, अंतर्बाह्य 'सम्यक् पुरुषार्थाची' नांदीच ठरू शकते'.

६) ''प्रत्येक द्रव्य कोणाच्या तरी ज्ञानाचा विषय सदैव असतेच''

'द्रव्यातील' सामान्य गुणांपैकी 'प्रमेयत्व' नावाने गुण आहे. ह्या गुणानेच 'द्रव्य' सदैव 'ज्ञानाचे ज्ञेय,' ठरते. ह्यापासून एकही 'द्रव्य' गुप्त राहू शकत नाही. ह्या विधानाने सर्वप्रथम 'केवलज्ञानाची' सिद्धी होते. 'जीवाकडून घडणारे पाप, अपराध, दुष्कृत्य सदैव ज्ञानात झळकते', ह्या जाणिवेने, 'पापाची भीती, अपराधांची ग्लानी, दुष्कृत्यांची निंदा,' होण्यास मदत होते. त्यामुळे सहजी 'वाईटाचा त्याग' व 'सदाचाराचे ग्रहण' हा, 'पुरुषार्थ' घडू शकतो. त्याचबरोबर जर 'आत्माही द्रव्य' आहे तर, 'ते ही जाणले जाते वा त्याला 'मी' जाणू शकते,' हा विश्वास त्या 'केवलज्ञानाच्या' प्राप्तीसाठीच्या, 'पुरुषार्थाचे' प्रथम पाऊलच ठरू शकते. आत्तापर्यंत

कर्मोदयाने प्राप्त पुदगलाने, 'स्व' ला जाणण्याचा प्रयत्न होता. त्यापेक्षा 'मीच', 'स्व' ज्ञानशक्तीने, 'अरूपीसह सर्वांना जाणू शकते'. हा दृढ विश्वास, पुढच्या 'प्रखर पुरुषार्थाची' नांदी ठरू शकतो. कारण 'ज्ञान' हा, 'आत्म्याचा गुण आहे, तो सहभागी आहे, अन्वयी विशेष आहे, सर्व अवस्थांमध्ये राहणारा आहे, परिणमनशील असला तरी, अन्य गुणरूप होणार नाही'. ह्या खात्रीने सर्व 'संशय, चिंता, भीती,' मूळापासून नष्ट होण्यास नक्कीच सुरुवात होवू शकते.

७. 'गुण-पर्यायांच्या समूहाला 'द्रव्य' म्हणतात. 'गुण' द्रव्याच्या सर्व भागात व अवस्थांमध्ये असतात तर, 'पर्याय' एकसमयवर्ती असतात.''

♦ 'गुणांच्या परिणमनाला 'पर्याय' म्हणतात. त्या क्रमवर्ती असतात. सतत बदलतात.' जर प्रत्येक 'पर्याय' एक समयवर्तीमात्र आहे तर, प्रत्येक 'वस्तू वा द्रव्य', प्रतिक्षण परिणमन करीत आहे, हे सिद्धच आहे. जर मूळच 'द्रव्यात' हे परिणमन घडत आहे तर, 'मीच' त्याच 'स्वभावाला, दुःखाला, अपमानाला, अपयशाला, कमतरतेला,' का धरून ठेवले आहे ? किंबहुना 'दुःख, शोकच' का करीत आहे ? कारण ती 'पर्यायतर' आत्ता नाहीच. 'मीच माझ्यातला' हेकेखोरपणा का धरून ठेवला आहे ? 'बदलांचा स्वीकार' आनंदाने का करीत नाही ? ह्या सत्याची, जाणीव होवू लागते. 'गुण' तर सदैव आहेच, त्यावरच दृष्टी जाण्यास मदत होते. 'ज्ञान-दर्शन-चैतन्य-आनंद-सुख' ह्या, 'स्व-गुणांचे', हे सम्यक् 'भान', नव्याने त्या 'गुणांचे' महत्त्व, स्पष्ट करतात. ह्या 'गुणांने श्रीमंत' अशा 'स्व' चे महत्त्व, अधिकच दृढ होवून, 'अवस्थां' च्या विषयींचा, 'राग-द्वेष' काही प्रमाणात जरी कमी झाला तरी, 'श्रावकासाठी' तो श्रेष्ठ 'पुरुषार्थच' ठरेल.

### अ) 'जीवद्रव्य'- भूमिका :

'तत्त्वज्ञानाचे' विवेचन असो वा 'संसार-मोक्ष' ह्या, दोन्ही पक्षांचे विवेचन असो, त्यात 'जीव' प्रधान 'द्रव्य व तत्त्व' आहे. कारण तोच 'ज्ञान-दर्शन' स्वभावी आहे. संसार दशेत, 'प्राण धारण करणारा म्हणून, तो 'जीव' म्हणवला जातो. तो 'अनंत गुणांचा स्वामी' असून, 'प्रकाशात्मक, अमूर्तिक, सत्ताधारी' पदार्थ आहे. त्याला 'मात्र कल्पना वा पंचमहाभूतांच्या' मिश्रणाने उत्पन्न संयोगी पदार्थ मानले नाही. शरीरात असला तरी, तो त्यापासून भिन्न 'ज्ञाता-द्रष्टा' स्वभावी आहे. तो लोकाकाशप्रमाण 'असंख्यात' प्रदेशी असून, संसार दशेत तो 'संकोच-विस्तार शक्तीने' प्राप्त शरीरप्रमाण आहे. संख्याअपेक्षेने जीव 'अनंतानंत' आहेत. 'पुरुषार्थपूर्वक' साधना करून, कर्मनाश करून, 'परमात्मपद' प्राप्त करण्याची क्षमता असणारा आहे. अशाप्रकारे सर्व तत्त्वज्ञानच, 'जीव' द्रव्यासाठी असल्याने, त्याचे विस्तृत वर्णन आगमात केले जाते.

**विषयवर्णन :**

आचार्यांनी 'जीव द्रव्याचे' वर्णन विविध दृष्टीने केलेले आहे. त्यात -

* 'जीवाचे' लक्षण[१०],-'दश-प्राणधारी, उपयोग, चैतन्य, कर्ता, भोक्ता, औपशमिक भाव,' इत्यादि दृष्टीने केले आहे.

* 'जीवाचे' भेद[११] सांगतांना,''संसारी-मुक्त, भव्य-अभव्य, त्रस-स्थावर, संज्ञी-असंज्ञी, बहिरात्मा-अंतरात्मा-परमात्मा, जलचर-स्थलचर-नभचर, अंडज-पोतज-गर्भज, कार्य-कारण,'' अशा विविध अंगांनी सविस्तर विस्तार केला आहे.

* 'जीवाचे' अन्य गुण व वैशिष्ट्ये सांगतांना[१२], ''ज्ञान-दर्शन, सामान्यगुण, अन्य ४७ गुण, सूक्ष्मता-महानता, शुद्धत्व-अशुद्धत्व, सर्वव्यापिपना, देहप्रमाणता, संकोच-विस्तार, प्रदेश-संख्या,'' अशा पद्धतीने विचार केलेला दिसतो.

* ह्या शिवाय 'जीवाचा' विचार[१३], ''पर्याप्त-अपर्याप्त, संज्ञीत्व, प्राण, शरीर, योग-उपयोग, चेतना, लब्धि, सिद्धत्व, उर्ध्वगमनस्वभाव,'' अशा दृष्टीनेही केलेला आढळतो. ह्याशिवाय 'तत्त्वार्थसूत्राच्या' दृष्टीने विचार केला तर, हालचालीच्या अपेक्षेने 'त्रस-स्थावर', दृश्यतेच्या अपेक्षेने 'सूक्ष्म-बादर', मनाच्या अपेक्षेने 'समनस्क-असमनस्क', लैंगिक-अलैंगिक अपेक्षेने 'संमूर्च्छन, गर्भ, उपपात', जन्मस्थान योनी अपेक्षेने 'सचित-अचित इत्यादि,' शरीरअपेक्षेने 'औदारिक इत्यादि पाच शरीरे,' गती, अपेक्षेने 'देव इत्यादी चार गति,' इंद्रिय अपेक्षेने 'एकेंद्रिय ते पंचेद्रिय, त्याशिवाय 'लिंग, लेश्या, कर्म,'' इत्यादि दृष्टीनेही विचार केलेला दिसतो. आगमात केलेल्या, ह्या विस्तृत ऊहापोहाला आधारभूत घेवून, त्याच्या सूक्ष्म अभ्यासातून, त्यावरील चिंतनात्मक निष्कर्ष, 'पुरुषार्थाच्या' अंगाने मांडला आहे.

**गर्भितपुरुषार्थ :**

१) 'जीव' हे 'द्रव्य' असून, ते 'ज्ञान-दर्शन' गुणांनी युक्त आहे. 'ज्ञाता-द्रष्टा' स्वभावी आहे.'

ह्या विधानाने 'स्व' ला 'जाणण्याची व पहाण्याची' जबाबदारी 'स्व' चीच आहे, हे भान होते. 'ज्ञानाने' काय जाणावे आणि 'दर्शनाने' काय पहावे, ह्या 'निर्णयाचे स्वातंत्र्य' हाच 'पुरुषार्थ' आहे. सद्य, 'प्रलोभन, आकर्षण, भौतिक सुखांच्या,' विपुलतेने व्याप्त वर्तमान परिस्थितीत तर, हा 'पुरुषार्थ' फारच महत्त्वाचा म्हणावा लागेल.

२) 'चैतन्ययुक्त जीवाचे लक्षण उपयोग आहे'

'चैतन्ययुक्त' जीवाच्या चेतना वर्तमानात, 'कर्मफल, कर्म व ज्ञान,' अशा तीनरूपात दिसतात. त्यापैकी स्थावर जीवांना प्राप्त, 'कर्मफलचेतना' मात्र, 'कर्माच्या फळांचे' वेदन करविणारी असते. त्यात 'प्रतिकाराची शक्ती', वा त्या 'फळाला बदलण्याचा' 'पुरुषार्थ', त्या

जीवांमधे नसतो. त्रस जीवांना, 'कर्म व कर्मफल,' दोन्ही चेतनेचे वेदन होते. बुद्धिपूर्वक 'इष्ट-अनिष्ट' विकल्परूपाने, विशेष 'राग-द्वेषरूप' होणारे परिणाम, म्हणजे 'कर्मचेतना' असते. ज्ञानाहून भिन्न, अन्य भावांमधे, 'मी करतो,' असा अनुभव तेथे असतो. त्यामुळे हे 'कर्म काय, कसे, किती, कोणते, केव्हा करायचे,' वा नाही, हे स्वातंत्र्य, हाच 'पुरुषार्थ' आहे. 'ज्ञान' चेतना शुद्ध असते. ही चेतना 'स्व'कडे जाण्याची प्रेरणा देते. 'उपयोग नेमका कसा, कोठे, किती लावावा किंवा न लावावा' हा 'पुरुषार्थ', सर्वस्वी जीवाधीन आहे. 'योग व उपयोगाचा,' योग्य जागी 'सम्यक् वापर' करण्याचा 'विवेक', हाच 'पुरुषार्थ' आहे

३)'जीव 'अनंतगुणांचा' स्वामी आहे. कर्मांच्या नाशाने 'अनंतचतुष्टयाची' प्राप्ती होते.'

मूलतः जीव 'अनंत ज्ञान, अनंतदर्शन, अनंतसुख, अनंतवीर्य,' ह्या गुणांनी परिपूर्ण आहे. ह्या 'स्वज्ञानाने,' कर्मोदय प्राप्त 'अल्पज्ञानाचा खेद', कर्मोदयाने प्राप्त, 'भौतिक सुखांच्या कमतरतेचे दुःख', कर्मोदयाने प्राप्त, 'शारीरिक दुर्बलतेने येणारी लाचारी', नष्ट होण्यास मदत होते. 'अनंतवीर्य हा माझा स्वभाव आहे,' ह्या विश्वासाने, 'स्व' सामर्थ्याची 'सम्यक' जाण व भान होते. 'वीर्य' हा आत्म्याचा 'स्वभाव' आहे. तो 'नष्ट करण्याचे वा त्यावर आवरण टाकण्याचे' सामर्थ्य कोणत्याही कर्मात नाही. ह्या 'स्वभावाची' पूर्ण व्यक्तता, फक्त 'वर्तमान पर्यायात' करण्याचा 'पुरुषार्थ', मला करावयाचा आहे, ही प्रेरणा मिळते.

४) 'स्वदेहपरिणाम, कर्ता, भोक्ता, संसारीपणा, संकोचविस्तार, शरीर, प्राण, पर्याप्ति, हे ' कर्माधीन आहेत वा कर्माच्या अवस्था आहेत, असे म्हणता येईल' .

अ) आगमात वर्णित 'पाच शरीर' कर्मोदयाने प्राप्त होतात. 'पाच शरीर, त्यांच्या रचना, प्रदेश, महत्त्व, प्रदेश, स्थूलता-सूक्ष्मता', ह्यांच्या 'सम्यक्' श्रद्धानाने, प्राप्त देहाच्या 'सुंदरतेचा, आकाराचा, लावण्याचा' व्यर्थ 'अहंकार, मोह', दूर होण्यास मदत होते. ह्या पाच शरीरांपैकी, 'औदारिक' शरीरानेच 'मोक्षप्राप्ती' चा 'पुरुषार्थ' घडू शकतो. म्हणून ते 'शरीर मिळण्याचे भाग्य लाभले' तर, त्या शरीराचा 'उपयोग' कसा व कोठे लावावा, हा 'विवेकच पुरुषार्थ' आहे.

ब) ह्या पाच 'शरीरांपैकी', सर्वात सूक्ष्म अशा 'कार्मणशरीराची' ओळख झाली की, ते 'पुदगलद्रव्य आहे, परद्रव्य आहे, प्रदेश-प्रचयरूप आहे, मला शरीर, गति, जाति, भवभवात फिरविणारे आहे व ते मी नष्ट करू शकते'. ही खात्री, 'जीव' तत्त्वाच्या प्राप्तीच्या 'पुरुषार्थाचे', प्रथम पाऊलच आहे.

क) ह्या 'शरीराच्या' मदतीने 'जीव' मृत्युनंतर, 'विग्रहगतीने' जावून, योग्य ठिकाणी जन्म घेतो. हे 'गमन, मोडे, आहार-अनाहार', इत्यादींचे विस्तृत वर्णन, 'मिथ्या मान्यता, व्यर्थ रूढी, परंपरा, अंधविश्वासाला' नष्ट करणारे आहे. त्यानेच 'जीव' संसारी म्हणवला जातो व प्राप्त 'शरीराकार, शरीरप्रमाण' होतो. म्हणून संसारदशेत 'कर्ता व भोक्ता' ठरतो. जैनांनी केलेले हे

'विग्रहगतीचे' वर्णन, अत्यंत 'परिपूर्ण आणि विज्ञाननिष्ठ' आहे. जीवाच्या 'जन्म-पुर्नजन्माचा', हा प्रवास 'जीवद्रव्यावर' अधिकच प्रकाश ठाकणारा आहे.

ड) 'पर्याप्त-अपर्याप्त' ह्यांचे 'सम्यक्ज्ञान' भ्रामक कल्पना, दूर करण्यास प्रेरक ठरते. 'सहा पर्याप्तीच्या पूर्णतेवर' जीवाचे जगणे निर्भर असल्याने, 'व्यर्थ मान्यता,' गळून पडतात. 'गर्भात प्रवेश' केल्यावर जीव 'अंतमुर्हूतात', सहा पर्याप्ति पूर्ण करतो हे समजले तर, 'भृणहत्यारूप जीवहिंसा' टळू शकते. 'पर्याप्ति' पूर्ण करणारा जीवच, आपले जीवन 'निर्माण व संचलन' करण्यास सक्षम होतो. 'शरीरपर्याप्ति' म्हणजेच वैज्ञानिक परिभाषेतील, 'क्रोमोझोम्स व जीन्स' होय.

इ) ♦ 'दशप्राण, त्याची पूर्णता, अपूर्णता, त्यानुसार प्राप्त संज्ञी-असंज्ञीपणा', ह्यांचे वर्णन, इतक्या वैज्ञानिक पद्धतीने आहे की, ते थक्कच करते. 'जैन' आगमातील 'जीवाचे, प्रकार-भेद-उपभेद, जाति, योनि इंद्रियशक्ती, रचना,' ह्यांचे 'विस्तृत, तर्कशुद्ध, विज्ञाननिष्ठ' विवेचन, जैनांच्या प्रगल्भ 'जैवशास्त्रज्ञान जैनिटिक शास्त्रज्ञानाची' पुष्टी करणारे आहे. ह्यासर्वांसह 'कर्मसिद्धांताला' जोडून, त्यांचा साधलेला समन्वय, हा तर जैनांचाच खास 'पुरुषार्थ' आहे. ह्यांचे 'अध्ययन, मनन, चिंतन', 'सम्यक्' पुरुषार्थाकडे नेणारे आहे.

५) 'औपशमिक इत्यादी पाच भाव 'जीवाचे' स्वतत्त्व, निजभाव आहेत' जीव द्रव्याशिवाय इतर 'द्रव्यांमध्ये' हे पाच भाव नसतात. 'औपशमिक, क्षायोपशमिक, क्षायिक, औदयिक', हे चार भाव 'कर्मसापेक्ष' आहेत. त्यात कर्मांचा 'उपशम, क्षय, क्षयोपशम, उदयाची,' आवश्यकता असते, त्यासाठी जीवाचे 'परिणाम' आवश्यक असतात, त्यासाठी 'परिणामांप्रती सजगता' आवश्यक असते.

* उपशमात, 'परिणामविशुद्धीने,' कर्मांच्या शक्ती 'अव्यक्त' असतात. म्हणूनच 'आत्मशक्ती' पूर्ण 'जागृक' असतात. तो 'उपशम' पुरुषार्थ सूचक आहे.

* 'क्षायोपशमिक' भाव सदैव असतोच. ह्या भावाने, 'पूर्णता-अपूर्णता' स्पष्ट होते. क्षयोपशम फक्त 'घातिकर्मांचा' होतो. म्हणूनच सदैव थोडे तरी, 'ज्ञान-दर्शन-वीर्य चारित्र' प्रगटच असते. मात्र क्षायोपशमिक 'अज्ञानाने' प्रगट, 'आंशिक ज्ञान', विपरीत असल्याने, 'बंधात' कारण ठरते. 'ज्ञानाला' कोठे लावावे वा 'ज्ञानाने' काय जाणावे हा, 'पुरुषार्थनिर्भर' भाग आहे. अनादि 'कर्मोदयाच्या' अखंड प्रवाहात, उत्कृष्ट 'क्षयोपशम' लाभणे, हा पुण्याचा भाग आहे. ह्या प्राप्त क्षयोपशमात, 'प्रयत्नपूर्वक, सत्पुरुषार्थ, विवेक, सत्संगति, सम्यग्ज्ञानाची आस, ध्यास,' हा फक्त 'पुरुषार्थाचा' भाग आहे.

* 'क्षायिक' भाव ह्यात कर्मांचा पूर्ण 'क्षयच' असतो. हा क्षय 'पुरुषार्था' शिवाय शक्य नाही ह्या भावाने प्राप्त, 'क्षायिक ज्ञान, दर्शन, दान, लाभ, भोग,' इत्यादींचे स्वरूप जाणले की,

'सांसारिक क्षुल्लक, नाशवंत, भोग, सामग्री, वस्तूंची,' तुच्छता अधिकच स्पष्ट होवून, 'आकर्षण' कमी होण्यास मदत होते.

* 'औदयिक' भावात 'कर्मांचा उदय' असल्याने, त्याचे 'साक्षात् फळ' जीव भोगतो. ह्या भावाने प्राप्त, 'चारगति, अज्ञान, असिद्धत्व,' हे भाव बंधात निमित्त ठरत नाहीत. 'मोहनीय कर्माच्या' उदयाने असणारे, 'चार कषाय, तीन लिंग, मिथ्यादर्शन, असंयम, सहा लेश्या,' हे भावच 'बंधात कारण' ठरतात. हे जाणले की, 'कषायांची शमता, संयम, पालन, लेश्याशुद्धी, सम्यग्दर्शनाची प्राप्ती,' अशा 'पुरुषार्थाकडे' वाटचाल सुरू होते. 'गति वा जाति वा अज्ञानाच्या' नावाखाली, 'नियतिवादी' बनण्याचा प्रयत्न नष्ट होवू शकतो.

*♦ 'पारिणामिक भाव' हा, 'स्वतंत्र, स्वाभाविक, कर्मनिरपेक्ष' असा, 'त्रिकाली जीव स्वभाव' आहे. कारण प्रथम चार भाव 'पर्यायरूप' आहेत, मात्र 'शुद्ध पारिणामिक भाव द्रव्यरूप, नित्य, व्यापक' आहे. पारिणामिक भावात वर्णित', 'जीवत्व' हा भेदच, 'असाधारणभाव' असून 'शद्ध द्रव्यार्थिकनयाचा' विषय असल्याने, 'नित्य, निरावरणरूप' आहे. कारण मुक्त जीवांमध्ये, 'औपशमिक' इत्यादी भाव आणि 'भव्यत्व-अभत्वाचा' अभाव सांगितला आहे. (त.स् १०/१३) कारण ते, 'भाव व भव्याभव्यत्व', मात्र 'पर्याय' आहेत. 'जीवत्व' म्हणजेच 'चैतन्य' असून, हाच 'निश्चयप्राण' आहे, त्याला 'आयु' वा अन्य कशाचीही आवश्यकता नाही. तो सदैव आहे, आणि तो 'बंध-मोक्ष' पर्याय परिणतीने रहित आहे. ह्यावरूनच 'जीवाचा अविनाशीपणा, अनादिपणा' सिद्ध होतो. हा विश्वासच, 'पुरुषार्थ' आहे. हा 'जीवत्व' गुण 'पारिणामिक भाव' आहे म्हणून, पारिणामिक भावात 'पुरुषार्थ' चालत नाही, कारण ते तर 'उपादानच'आहे. शुद्ध 'पारिणामिक भाव', हा भावनारूप नसल्याने, तो 'मोक्षाचे उपादान' कारण नाही.ह्या शुद्ध 'परिणामिक भावात' शक्तिरूप 'मोक्ष' अनादि पासून आहेच. फक्त त्याची व्यक्तता महत्त्वाची आहे. 'शुद्ध परिणामिक भाव' निष्क्रिय आहे, कारण संसार वर्धक 'रागादि परिणतिरूप' तो नाही. तसेच मोक्षाला कारण 'ज्ञानचेतनारूपही' तो नाही. तो 'ध्येयरूप' असून, 'ध्यानाचा' आश्रय आहे. पण 'ध्यानरूप' नाही. किंबहुना अन्य, 'बाह्य-अंतर पुरुषार्थाचा', तो आधार आहे. जीवाचे 'भव्यत्व वा अभव्यत्व' फक्त केवलीगम्य आहे. मात्र बाह्य लक्षणांवरून, आवड, निवड, रुचि, इत्यादिवरून, त्याची प्रचिती येते. 'स्व-भव्यत्वाची' खात्री, दृढ श्रद्धान, तसेच दृढ चारित्र, ह्यानेच 'पारिणामिक-भावरूप' उपादान प्राप्तीचा 'पुरुषार्थ' घडू शकतो.

६) 'क्षायोपशामिक इत्यादि पाच लब्धि, उत्तरोत्तर चेतनेच्या अंतर्मुखतेकडे जाण्याचा पुरुषार्थच आहे.'

ह्या पाच लब्धि क्रमशः, 'जीवाच्या' परिणामांची, 'उन्नतता व उत्कर्षता' दर्शवणाऱ्या आहेत. परिणामांची 'शुद्धता व अशुद्धतेवरून,' जीवाची 'उन्नती वा अवनती' ठरते. 'सैद्धांतिक

भाषेत', पुण्यानुबंधी पुण्याला 'लब्धि' म्हणतात. उत्तरोत्तर उन्नत होणारा, हा 'पुरुषार्थ' मोक्षमार्गाकडे नेणारा आहे. ह्या पाच लब्धि म्हणजे, 'अव्यक्त' ते 'व्यक्त' पुरुषार्थाचा प्रवास आहे.

* हिताहित विवेकप्राप्तिरूप 'क्षयोपशम लब्धि', सर्वच प्राणिमांत्रामध्ये विद्यमान असते. मात्र 'कर्मोदयप्रभावाने ती भोगांमधे' लावली जाते. ही लब्धि 'पुण्योदयाने, स्वयमेव' प्राप्त होते. त्यामुळे समजण्याची शक्ती प्राप्त होते. 'तत्त्वनिर्णयाइतपत बुद्धीची प्रगल्भता' असते. मात्र त्यामुळे 'ज्ञानाभिमानाचा' धोका, पोकळ 'उपदेश' देण्यात सार्थकता, 'चर्चा-उपदेशातच' सीमितता येवू शकते. येथेच 'जागरूक' पुरुषार्थाची' आवश्यकता आहे. कारण ही लब्धि फक्त, 'संज्ञी, पंचेद्रिय जीवांना, जागृतावस्थेत, अंतर्मुहूर्तमात्रच' होते. त्यातही 'घाति-अघातींच्या अप्रशस्त प्रकृतींचा अनुभाग', अनंतगुणा हीन होवून उदयात येतो. म्हणूनच 'मोक्षमार्गात' पुढे जाण्यास, ही 'लब्धि' अत्यंत आवश्यक आहे, कारण अनादि पासून असणाऱ्या अखंड 'कर्मोदय' धारेतही, अशा संधी स्वयमेव प्राप्त होतात. त्यांचा लाभ घेऊन 'सत्पुरुषार्थ' जागा करण्यासाठी, ह्या सुवर्णसंधीत 'उपयोग', योग्य दिशेत लावण्यइतपत 'विवेक व जागरूकता', हाच 'पुरुषार्थ' आहे. हे मात्र 'प्रयत्नपूर्वक व बुद्धिपूर्वकच' घडू शकते.

* 'क्षयोपशमलब्धि' हे 'कारण' असून, ही 'विशुद्धिलब्धि' हे त्याचे 'कार्य' आहे. 'विशुद्धिलब्धीच्या' फळरूपाने 'मिथ्यात्व व कषाय', दर समयाला मंद झाल्याने, 'सदाचार' वाढू लागतो आणि 'भोगासक्ति' थोडी कमी होते. ही 'लब्धिही जरी 'स्वयमेव' घडत असली तरी, ही 'दिव्यत्वाची भेट, ही विशुद्धीच, जीवनशोधनाची' संधी ठरते. कारण ह्या 'विशुद्धिलब्धिशिवाय' मोक्षमार्गाचा 'पुरुषार्थ' शक्यच नाही. तरीही लौकिक 'दान, दया, सेवा,' इत्यादितच अडकून पडण्याचा, 'धोका' येथे असतो. ह्यात 'इतिश्री' न मानता पुढे गेल्यास, प्राप्त विनयगुणाने, 'आत्मदोष व परगुण' दिसू लागतात. 'सम्यग्दर्शनाच्या उपगूहन, उपबृंहन, वात्सल्य, स्थितिकरण,' ह्या गुणांची प्राप्ती होते. 'नम्रतेचा स्वीकार, हृदय शुद्धी, मृदुता' हाच ह्यातला महत्त्वाचा 'पुरुषार्थ' आहे. 'क्षयोक्षमलब्धिरूपाने' प्राप्त 'ज्ञानाभिमान', या 'हृदयशुद्धीने' दूर करण्याचा 'प्रयत्न वा पुरुषार्थच', उत्थानाकडेच नेणारा ठरतो.

* ही 'विशुद्धता, नम्रता', आणून शिष्य बनणे शिकवते. 'देशना' ह्या निमित्ताने प्राप्त, ही 'देशनालब्धि' ज्ञानाची 'पर्याय' आहे. ह्या 'नम्रतेने, तत्त्वरुचीने', योग्य 'गुरुची' प्राप्ती 'स्वयमेव, पुण्योदयानेच' होते तरी, गुरुंच्याचरणी 'समर्पणभाव, अनन्यभक्ती, विनय, प्रेम' हा व्यक्त 'पुरुषार्थ' तेथे महत्त्वाचा आहे. ह्या 'समर्पणाने' परिणामांची विशुद्धी होवून, 'स्वयमेव' कर्मांचे 'अपकर्षण' होवून, निर्जरा होते. कारण 'मंदकर्मोदयाने लब्धिरूपशक्ती', स्वयमेव प्राप्त होतात. मात्र त्या 'मंदोदयाचा योग्य उपयोग' केला तर, 'पुरुषार्थात' वाढ होते, जी 'अपकर्षानाला' कारण ठरते. ही 'समर्पण' भावना गुरुरूपाने फलित होते, जी शिष्यांच्या 'उर्ध्वगमनात' सहाय्यक

ठरते. आणि खरे 'आत्माध्ययन' घडू लागते.

* प्रतिसमय वाढणाऱ्या 'विशुद्धीने,' चिंतन, आत्माध्यासनाने, 'आयुकर्म' सोडून, अन्य सात कर्मांची स्थिति, 'अंतःकोडाकोडी,' सागर प्रमाण होवून, सत्तेतील कर्मात, 'संक्रमण, अपकर्षण, उत्कर्षण' होवू लागते. अनेक स्थित्यंतरे 'कर्मात' होतात. पूर्वबद्ध कर्मांची 'स्थिति क्षीण' होते, 'उदय' ढिला होतो, हे सर्व 'बुद्धिपूर्वक, फक्त 'तत्त्व विचारात मग्न होवून, समतेचा स्वीकार करून, तदरूप होणे, ह्या पुरुषार्थाने' घडते. ह्या 'प्रायोग्यलाब्धिमुळे', यथार्थ तत्त्वनिर्णय होते.

*♦ 'जैन दर्शनाच्या' अकाट्य नियमानुसार, 'एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यात काही करू शकत नाही' त्याची पुष्टी येथे होते. जीवाच्या 'अंतरंगपुरुषार्थाने, स्व-चतुष्ट्याच्या मर्यादा पाळल्याने, अंतर्मुखता, आत्मसंमुखता' वाढली की, 'कर्मपुद्‌गलात स्वयमेवच उलथापालथ' सुरू होते. 'तीन करणांसह,' अनेक बदल होतात, 'दृष्टी निर्मल होते, खरे वैराग्य, ध्यान, तपाच्या बळाने, अंतर्दृष्टी उघडते आणि बाह्य-आभ्यंतर, तात्त्विक व्यवस्थेच्या साक्षात्कार रूपाने, शुद्ध सम्यग्दर्शन' प्राप्त होते.

*♦ ह्या 'लब्धींच्या' यथार्थ ज्ञानाने, 'सुप्त पुरुषार्थाला' चालना मिळते. प्रथम 'तीन लब्धि' बऱ्याच प्रमाणात, 'पुण्य वा नियतिवर अवलंबून असल्या तरी, त्या पुण्यप्राप्तसंधीचा 'सदुपयोग' करणे, हा जीवाचाच 'पुरुषार्थ' आहे. ह्या 'पुरुषार्थानेच' प्रायोग्य व करणलब्धि, प्राप्त होतात. हा 'बाह्याकडून-अंतर्मुखतेकडचा' प्रवास, 'तत्त्वविचार-चिंतनाचा आश्रय, आत्मस्वरूपातील तद्‌रूपता, पूर्ण समता आणि शमता', हा उत्तरोत्तर वाढणारा 'पुरुषार्थ', कर्मात उलथापालथ करण्यात समर्थ ठरतो. 'कर्मसत्ता वा उदय,' ह्यांचा उगाचच बाऊ करण्याची गरज नाही. 'पुरुषार्थ' फक्त, 'स्व' चतुष्ट्याच्या मर्यादा, 'जाणण्याच्या व पाळण्याच्या' आहे. त्याने कर्मोदयातही,' साधना वा पुरुषार्थ ' घडू शकतो, हा विश्वास दृढ होतो.

**ब) 'पुद्‌गलद्रव्य' - भूमिका :**

'जैनदर्शनाने' सत्याचा शोध, 'आत्मानुभूती' ने केला आहे. आगमात वर्णित 'सहा द्रव्ये,' त्या 'आत्मानुभूतीद्वारा' कथित, एक 'सत्य' आहे. त्या सहा द्रव्यांपैकी, 'पुद्‌गल' हे द्रव्य आहे. हा जैनदर्शनाचा 'पारिभाषिक' शब्द आहे. ह्याची व्याख्या 'पुरणाद् गलनाद् पुदगल इति संज्ञा' अशी आढळते (रा.वा.५/१/२४, २६/१२). त्यानुसार 'पुदगल' हा, 'पुरण-गलन स्वभावी, मूर्तिक, जड, द्रव्य' आहे. ह्या 'पूरण-गलन' स्वभावाने, 'स्कंध' निर्माण होतात. 'परमाणु वा अणु' हा, 'पुदगलाचा अविभाजित' असा एकप्रदेशी अंश आहे. हा परमाणु, 'नित्य, अविनाशी, सूक्ष्म, केवलीगम्य' असून, त्यात 'एक रस, एक गंध, एक वर्ण, दोन स्पर्श (स्निग्ध वा रुक्ष, शीत वा उष्ण)' असतात. 'परमाणु' हे 'कार्य व कारण' असून, त्याच्या 'परस्पर बंधाने' जगताची 'चित्रविचित्रता' निर्माण होते. ह्या सहा द्रव्यांमध्ये, 'जीवाइतकेच' महत्त्वाचे असे, हे 'पुदगलद्रव्य,'

मानले जाते. तौलनिक अभ्यास 'करणाऱ्यांना सहजच दिसते की, 'वैशेषिक' हे भारतीय 'परमाणुवादाचे' जनक आहेत. मात्र जैनांची 'पुदगलमीमांसा सूक्ष्म, यथार्थ, विज्ञानगामी' आहे. ह्याचा पुरावा 'तत्त्वार्थसूत्राच्या' पाचव्या अध्यायात आहे. 'निरीक्षण, चिंतन, आध्यात्मिक सामर्थ्य,' ह्या माध्यामाने सुमारे २५०० वर्षापूर्वी, नोंदवलेले हे निष्कर्ष नक्कीच, 'प्राचीन भारतीय अणुविज्ञानाचे' जनक, 'महर्षी कणादां' च्या निष्कर्षापेक्षा वेगळे आहेत. प्रत्येक परमाणुतील, 'स्पर्शादि गुण, त्याच्या पर्याय, स्कंधनिर्मितीचे वर्णन,' जैनांची विशेषता स्पष्ट करणारे आहे. 'विविध दृष्टिकोन आणि तलग्राही सूक्ष्मता', ही जैन शास्त्रांची, 'वैशिष्टे वा पुरुषार्थच' आहे. कारण हे अन्वेषण, 'आत्मानुभूतीची' प्रक्रिया आहे. ह्या सविस्तर अभ्यास, चिंतन-मननातून, त्यात गर्भित 'पुरुषार्थ', येथे निदर्शनास आणला आहे.

**विषयवर्णन :**

जैन दर्शनातील, 'तत्त्वज्ञान' वर्णनातील, ह्या महत्त्वाच्या विषयाचे, विस्तृत वर्णन 'द्रव्यानुयोगाचा,' भाग आहे. आचार्यांनी हे वर्णन करतांना बराच विस्तार केला आहे. लक्षण[१४] सांगताना, 'गुण अपेक्षेने, निरुक्ति अर्थाने' वर्णन केले आहे.

भेदामध्ये[१५] ''अणु-स्कंध, स्वभाव-विभाव, देश-प्रदेश'' असा विस्तार केला आहे. पुद्‌गलाची वैशिष्ट्ये सांगतांना[१६], ''सामान्य-विशेष स्वभाव, विशेषगुण, प्रदेश, पर्याय, उपकार, शक्ती, अस्तिकायपना, मूर्तत्व, क्रियावान,'' अशा दृष्टीने विस्तार केलेला दिसतो.

**गार्भित पुरुषार्थ :**

१)'पुद्‌गल, पूरण-गलन स्वभावी असून, परमाणु हे शुद्ध, मूर्त, एकप्रदेशी,उत्पाद-व्यय,-ध्रौव्यात्मक असून, तेच मूळ पुदगल द्रव्य आहे.'

जैन दर्शनाने 'जीव' द्रव्याप्रमाणेच, 'पुद्‌गलालाही' द्रव्य मानले आहे. 'पुद्‌गलही' त्याच्या 'सामान्य व विशेष' गुणांनी युक्त आहे, म्हणजे 'द्रव्य' अपेक्षेने तेही 'ध्रौव्य' आहे. 'अस्तित्व' गुणाने ते ही, 'सत्' आहे. 'वस्तुत्व' गुणाने सदैव, 'अर्थक्रियाकारित्व' त्यात होते. 'द्रव्यत्व' गुणाने 'परिणमशील' आहे. त्याचा एक 'आकार आहे, प्रमेयत्व गुणाने' तेही 'ज्ञानाचे ज्ञेय' बनते. 'अगुरुलघुत्व गुणाने, दुसऱ्या द्रव्यात ते काही करू शकत नाही, त्यांचे गुणही इतर गुणरूप' होत नाहीत.

♦ 'पुदगल द्रव्याच्या' ह्या 'यथार्थ ज्ञानाने,' श्रद्धा 'सम्यक्' होण्यास मदत होते. ते ''सत् आहे तर मी नाश कोणाचा करू? त्या द्रव्यात, त्याच्या प्रयोजनभूत क्रिया व परिणमन, हे त्याच्याच स्व चतुष्टयात होते तर, मी कशाचे कर्तेपण घेत आहे? जर एक द्रव्य दुसऱ्यात काही करू शकत नाही तर, मला प्राप्त सुख वा दु:खात ते जबाबदार कसे ? हा मोह, ममत्व का व कशाचे?'' ह्या

'सत्याकडे दृष्टी' जाणे, हाच पुरुषार्थ, आहे.

२) ''पुद्‌गल स्पर्श, रस, गंध, वर्णात्मक असून, जड, अचेतन आहे. 'जीव', त्याला 'शरीर- आहार, इंद्रिय, श्वासोच्छवास', इत्यादि रूपाने ग्रहण करतो''

'पुद्‌गल मूर्त आहे, जड, अचेतन' आहे, म्हणूनच तो 'चैतन्यमय' जीवात काही करू शकत नाही. शिवाय जड असल्याने, जीवाला 'सुख वा दु:ख' देण्याचे 'ज्ञान' त्याला नाही. 'जीव- पुदगलाचा' निमित्त- नैमित्तिक संबंध आहे. म्हणून ते 'जीवाच्या' विभावभावात, 'निमित्त' मात्र आहेत. ह्या यथार्थ ''ज्ञान-दर्शनाने, ज्याचा गर्व आहे असे शरीर, ज्याची आसक्ति आहे असा आहार, ज्यावर लुब्ध व्हावे अशी इंद्रिये, अचेतन-जड'' आहे हे जाणले की, 'अभिमान - अहंकार' नष्ट-भ्रष्ट होण्यास मदत होते. ज्याची 'मिजास होती, ज्यावर दृष्टी होती तेच', मात्र 'क्षणभंगूर पर्याय' आहे तर, हा 'ताठा वा गर्व' कशाचा करायचा? ही जाणीव, 'सम्यक पुरुषार्थाकडे ' नेणारी ठरते. त्या 'रंग-रूपाचा, बाह्य आकर्षण व प्रलोभनांचा', पसारा मनाला मोहवितो, परंतु ते 'मनही, व तो पसाराही,' आपले नाहीच, ही'जाण' खऱ्या'एकत्वाकडे' नेणारी ठरते.

३) ''ह्या पुद्‌गलाचे अणु व स्कंध हे भेद आहेत. पुद्‌गलाचे अंनत गुण व शक्ती आहेत.''

पुद्‌गलाच्या 'पूरण-गलन' स्वभावाने 'स्कंध' बनतात, बंधातही पुद्‌गलाचे 'रूक्ष व स्निग्ध' हे गुण कारण आहेत. 'चित्रपटाप्रमाणे हा फिरणारा विश्वाचा पसारा, हा ह्या 'स्कंधांचा खेळ आहे. हे त्याचे 'स्व' परिणमन आहे व ते होते ही 'स्वयमेव'. 'मी वा अन्य कोणी,' त्याला बनवणार नाही. 'द्रव्यबंध' हा, साक्षात्‌'कार्मणवर्गणांचे' कर्मरूप बनणे आहे. त्याला निमित्तक 'भावकर्म', जीवाचे असले तरी, तेही 'पुद्‌गल' आहे, म्हणूनच 'बंध' आहे. तो जीवाचा 'स्वभाव' नाही, हे 'ज्ञान, वा शास्त्रीय भाषेत म्हणायचे तर, हे भेद ज्ञान पुरुषार्थवर्धक' आहे.

४) '' द्रव्य सहा असून, ते नित्य आहेत, अवस्थित आहेत, अनादिअनंत आहेत, लोकाकाशाच्या एकच प्रदेशावर सर्व स्थित आहेत  व सर्व द्रव्यांचे परस्परांवर उपकार आहेत. जीवप्रमाणेच पुद्‌गलही क्रियावान द्रव्य आहे.''

'सर्व द्रव्य' लोककाशाच्या एकाच प्रदेशावर ,'स्व' अवगाहन शक्तीने, आणि 'अवगाहनत्व' ह्या 'आकाश' द्रव्याच्या उपकराने, स्थित आहेत . 'जीव' संसारात असो वा 'सिद्धशीलेवर,' तो असणार, 'लोकाकाशातच', हे त्रिवार सत्य आहे. 'पुद्‌गलाला' सोडून वा पळून जाता येत नाही वा जायचेही नाही. 'शरीर,वचन, मन, सुख-दु:ख', इत्यादी त्या पुद्‌गलाचे, 'जीवावर,' उपकार आहेत. त्या 'उपकाराचे महत्त्व' जाणून, पुद्‌गलप्राप्त 'शरीर, बुद्धी, मन, वक्तृत्व, प्रगल्भता,' ह्या सर्वांच्या आश्रयाने, धर्माचरण रूप 'चरित्र, संयम, ध्यान, तप' करून, त्या 'पुद्‌गलालाच' दूर करायचे, हाच 'पुद्‌गल' द्रव्यात'गर्भित पुरुषार्थ आहे. ह्या  'अनंत-चतुष्टययुक्त' चेतन जीवावर,

हे अचेतन‘पुद्‌गल द्रव्य,’ ज्ञान नसूनही, व्यवहारातही इतके ‘उपकार’ करते, आणि ‘मोक्ष पुरुषार्थातही’ हे ‘पुद्‌गलच’ उपकारी ठरते. ‘पुद्‌गलाच्याच’ आश्रयाने, त्याच्याच मदतीने, त्यालाच दूर करून, ‘स्व’ ची प्राप्ती करायची, हाच‘पुरुषार्थ’ आहे. ‘पुद्‌गलाला’ वाईट समजून, उगाचच त्याच्याशी झगडा महत्त्वाचा नसून, त्या ‘पुद्‌गलरूपी’ निमित्तांचे, खरे ‘ज्ञान, जाण व खरा उपयोग’ करण्याचा, ‘विवेक’ हे जीवाचे‘पुरुषार्थ’ आहे. ‘जीवद्रव्य’ फक्त‘जीवद्रव्यावर’ ‘उपकार’ करते आणि अन्य ‘अचेतन द्रव्य,’जीवावर उपकार करतात.

**क,ड,ई) धर्म–अधर्म–आकाशद्रव्य–प्रस्तावना :**

‘जैन’ दर्शनाने ‘सहा द्रव्यांच्या समुहाला ‘विश्व’ मानले आहे’. त्या सहा द्रव्यांपैकी, ‘धर्म–अधर्म’ ही दोन्ही द्रव्ये, संपूर्ण ‘लोकाकाशात व्याप्त, असंख्यात प्रदेशी, अमूर्त, संख्या अपेक्षेने एक एक अखंड द्रव्ये’ आहेत. ‘गतिशील वा गतियुक्त स्थितिशील, जीव व पुद्‌गल स्कंध वा अणुंच्या, गतीत वा स्थितीत’ ही द्रव्ये, ‘उदासीन, वा सहकारी कारण’ आहेत. ह्या दोन द्रव्यांच्या निमित्ताने, ‘अखंड आकाशद्रव्याचे विभाजन लोक–अलोक,’ अशा रूपाने झाले आहे. त्यामुळेच सामर्थ्य असूनही, या दोन ‘द्रव्यांच्या अभावाने’, जीव–पुद्‌गल द्रव्यांना, ‘लोकाकाशेच्या सीमेबाहेर’ जाता येत नाही. ही दोन्ही द्रव्ये, ‘अजीव, निष्क्रिय, नित्य, अचेतन, अवस्थित, अस्तिकाय’ द्रव्ये आहेत. ह्या दोनद्रव्यांचा उल्लेख जैनांशिवाय, अन्य दर्शनांनी केला नाही.

जैन दर्शनात ‘आकाश’ द्रव्याला, ‘सर्वव्यापक, अखंड, अमूर्त,’ द्रव्य म्हणून स्वीकारले आहे. ‘सर्व द्रव्यांना सामावून’ घेण्याची क्षमता असणारे, हे ‘द्रव्य’ आहे. मूळतः हे ‘अखंड द्रव्य’ असून, अन्य ‘द्रव्यांच्या अस्तित्वाने’ त्याने दोन भाग होतात. ह्या ‘अनंत अलोकाकाशाच्या’ मध्ये,अन्य द्रव्य असल्याने, तेवढाच भाग ‘लोकाकाश’ म्हणवला जातो. सर्व द्रव्यांना ‘अवगाहन’ देणे, हा ह्या द्रव्याचा ‘उपकार’ आहे. ह्या ‘शक्तीच्या विचित्रतेनेच’ मर्यादित लोकाकाशाच्या एकेका प्रदेशावर, सर्व ‘द्रव्ये’ राहू शकतात.

**विषयकथन :**

ह्या ‘द्रव्यांचे’ विस्तृत विवेचन, विविध अंगांनी आगमात आढळते.

१) ‘धर्म–अधर्म’ द्रव्यांचे वर्णन लक्षण[१७] करतांना,‘विशेषगुण, उदासीन निमित्त, कथंचित् प्रधानता,’ असे वर्णन केले आहे.

* ह्या ‘द्रव्यांची’ वैशिष्टये[१८] ‘अमूर्तिकपणा, अजीवपणा, प्रदेश, अखंडता, संख्या, अस्तिकाय,’ इत्यादि वर्णनासह सांगितले आहे.

* ह्या ‘दोन द्रव्यांची सिद्धी’ आचार्य,[१] नित्यपरिणमनता, अस्तित्व,’ अशा अंगाने करतात.

२) ‘आकाशद्रव्याची’ ओळख करून देतांना आचार्य, भेद–लक्षण[२०] सांगतात.

* ह्या 'द्रव्याचे' वैशिष्टय[२१] 'आकार प्रदेश, विशेषगुण, स्वभाव, आधार, अवगाहनत्व', अशा दृष्टीने सांगितले आहे. ह्या द्रव्यांच्या विशेष चिंतन- मननातून, दृष्टीस येणारा पुरुषार्थ स्पष्ट करीत आहे.

**पुरुषार्थाला स्थान :**

१)''धर्म-अधर्म द्रव्य निष्क्रिय असून, जीव-पुद्‌गलांच्या गति व स्थितीमध्ये, ते उदासीन निमित्त आहेत.''

जैन दर्शनात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या,'उपादान निमित्त,' ह्या विषयाचे महत्त्व अधिकच स्पष्ट करणारे, हे उत्तम उदाहरण म्हणता येईल.'निमित्ताचे महत्त्व, यथार्थज्ञान, त्याच्या मर्यादा, आणि त्याबरोबर 'उपादानाचे श्रेष्ठत्व, व महत्त्व, दृढ होते. निमित्त फक्त 'जाणण्यायोग्य' असतात आणि उपादान 'आश्रययोग्य' असतात, हाच 'पुरुषार्थ' आहे.

२)'जीव-पुद्‌गल क्रियाशील द्रव्ये आहेत'गति व स्थिति त्यांचीच उपादान शक्ती आहे, तरी ह्यासाठी'धर्म- अर्धम'द्रव्यां चे निमित्त आवश्यक आहे'.

♦ ही द्रव्ये 'निष्क्रिय, जड' आहेत प्रत्येक द्रव्ये परस्परांवर 'उपकार' करतात.ही 'अजीव , निष्क्रिय,जड'द्रव्ये सुद्धा उपकार करतात. त्यावरून कोणतेही 'द्रव्य' निरर्थक नाही, ही खात्री वा हा विश्वास 'पुरुषार्थाला' बळ देणारा आहे. व्यवहारात दिसणारा, 'स्वार्थीपणा वा रस्सीखेच वा, ढोंगीपणा,' खरच लज्जास्पदच आहे. ह्या 'द्रव्यांचे उपकार', जीवाला 'निस्वार्थसेवा' करण्याची प्रेरणा देणारे ठरतात.'जीव अनंतवीर्याचा' स्वामी असूनही, वर्तमानात त्याची प्राप्ती नाही, कारण त्या पुरुषार्थाला, 'अंहभावाने' मर्यादा पडतात. तो 'अहंभाव', ही 'द्रव्ये' बाहेर काढून फेकतात. कारण व्यवहारतही जीवाचे,'गमन, आगमन, बोलणे, मनोयोग, वचनयोग, काययोग,' इत्यादिंसाठी तसेच 'पुद्‌गलांच्या वर्गणा प्रसारीत होण्यातसुद्धा', ही 'द्रव्ये' आवश्यक आहेत. कर्मनाशानंतरही त्या 'सिद्धशीलेवर' जाण्यासही, ह्या 'द्रव्याची' आवश्यकता आहेच. ह्या द्रव्यांचे सम्यक्‌ज्ञान,'अहंकाराला' मुळासकट नष्ट करण्यास मदत करतात.

३) 'आकाश द्रव्य, अनंत असून सर्व द्रव्यांना अवगाहना' देणारे आहे.

ह्या 'द्रव्याच्या' अफाट, अचाट, स्वरूपाचे ज्ञान, 'लोकाकाशातल्या,' आपल्या असणाऱ्या 'नगन्य अस्तित्वाची' जाणीव करून देतात. सर्व द्रव्यांची'स्वयंचलित व्यवस्था,' भल्याभल्या 'कार्यप्रवण गुरुंच्या कौशल्याला' आह्वान देणारी आहे. त्या 'भव्यत्वाची' प्रचिती, 'मीपणा' नष्ट करणारी ठरू शकते. ह्या सर्व 'द्रव्यांना' सामावून घेण्याची क्षमता, ह्या 'द्रव्यात' आहे. म्हणूनच असंख्यात प्रदेशी 'लोकाकाशात', अनंतानंत जीव, अनंतपुद्‌गल द्रव्य राहतात. ह्या सर्व 'द्रव्यांचे उपकार,' सूक्ष्मतेने अभ्यासले तर ते, ह्या 'जीवाला' व्यवहारात, 'जीवन उदात्तपणे, विशालतेने,

इतरांच्या अस्तित्वाला मान देवून कसे जगावे', ह्याचा जणू पाठच शिकवतात. ते 'जीव द्रव्याने ते शिकणे', हाच ह्या द्रव्यातील 'पुरुषार्थ' आहे.

**फ) कालद्रव्य :**

जैन दर्शनाने 'काल' हे स्वतंत्र द्रव्य मानले आहे. 'निश्चयदृष्टीने' कालद्रव्याला'कालाणु' म्हणतात. 'लोकाकाशाच्या' एकेक प्रदेशावर, एक एक कालाणु, 'रत्नांच्या राशीप्रमाणे, स्थित आहेत. ह्याचमुळे 'कालद्रव्याला' अस्तिकाय मानले नाही. द्रव्यांच्या'परिणमनात' हे 'उदासीन' निमित्त आहे. सर्व 'द्रव्य' वास्तविक आपल्याच 'उपादान शक्तीने' परिणत होतात, त्यावेळी तेथे 'कालद्रव्य उदासीन' रूपाने असते. व्यवहारकाळ हा, 'समय, निमेष, घडी, अहोरात्रि', इत्यादिरूप सांगितला जातो, तो पराश्रित आहे. 'निश्चय काळाचे' जघन्य परिमाण 'समय' असून, त्याची उत्कृष्ट सीमा' युग' सांगितली जाते. एका युगात 'उत्सर्पिणी, अवसर्पिणी' दोन कल्प होतात. ह्या 'काल' द्रव्याचे स्वतंत्र चिंतन आगमात आढळते.

**विषयकथन :**

आगमात 'कालवर्णन', हे 'लक्षण-भेद[२२] विविक्षेते करतांना, व्यवहार- निश्चय, दीक्षा-शिक्षा, निक्षेप, स्व-पर, ग्रहण-वासना', अशी दृष्टी ठेवली आहे.

* निश्चयकाळाबद्दल सांगतांना[२३] 'त्याचे लक्षण, गुण-कार्य, सहकारीपणा, स्वभाव, एकप्रदेशीपणा,अस्तित्व, प्रयोजन, हेतू, निष्क्रियता', अशा अंगाने केले आहे.

* व्यवहार काळाचे कथन[२४] 'निर्देश,निमित्त, मर्यादा, तीनकाळ, अंतर', इत्यादि दृष्टीने केले आहे.

* काळाचे वर्णन 'उत्सर्पिणी- अवसर्पिणी' अशा दृष्टीनेही केले जाते.[२५]

**गार्भितपुरुषार्थ :**

१) 'निश्चयकाळ अरूपी, अमूर्त, एकप्रदेशी, नित्य, अवस्थित, निष्क्रिय द्रव्य आहे'

प्रत्येक द्रव्यात' द्रव्यत्व' गुणामुळे 'परिणमन' होतच असते.'कालद्रव्य' हे बाह्य निमित्त आहे.'उपादान-निमित्ताचा' सुरेख संगम व उत्कृष्ट 'अनेकांतवाद,' ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे, ही 'द्रव्ये' आहेत. अनादिकाळापासून 'जीव' भ्रमण करीत असला तरी, तो नष्ट झाला नाही. त्याची ' अंतरंग, उपादानरूप शुद्धता' नष्ट झाली नाही,'कर्मवशाने संसारात असला वा पुरुषार्थाने शुद्धही झाला तरी, जीव राहणारच', हा विश्वासच 'आत्मस्थिरतारूप पुरुषार्थ घडविण्यात' प्रेरक ठरू शकतो.

२) 'निश्चयकाळ रत्नाच्या राशीप्रमाणे लोकाकाशाच्या प्रदेशावर स्थित आहे. ते स्वयं परिणमन

करीत नाही. दिवस, तास, इत्यादी ह्या त्याच्या पर्याय आहेत.'

'व्यवहारकाळ' हे, 'निश्चयकाळचे' पर्याय आहेत, म्हणजे त्या नष्ट होणाऱ्या आहेत. निश्चयकाळ तर, 'परिणमनात-वर्तनेत' निमित्त आहे. त्यामुळे 'काळ वा वेळ आली नाही' ह्या व्यर्थ कारणाने होणाऱ्या,'कामचुकारपणा, पळपुटेपण, वा आळसाला', नक्कीच दूर करता येते. कारण कार्याच्या 'आरंभाला वा पुरुषार्थाला', काळ आडवा येवू शकत नाही. द्रव्यात 'परिणमन' तर चालूच आहे. ते 'सम्यक्' दिशेने करणे, ह्याला 'काललब्धि वा काळ' आवश्यक नाही. 'निमित्ताला निमित्ताप्रमाणे' घेणेच 'पुरुषार्थ' आहे. हा 'कालद्रव्य व त्याचा पर्याय ज्ञानाने,' जीवनाची 'क्षणभंगुरता' अधिकच प्रकर्षाने जाणवते. 'व्यवहारात जगण्यास, 'स्व' ला ओळखण्यास, आणि प्राप्त करण्यास विशिष्ट मर्यादित कालावधीच', लाभला आहे तर, त्या 'काळाचे' महत्त्व, व 'वेळेचे मूल्य', कालद्रव्याच्या यथार्थ ज्ञानाने स्पष्ट होवून,'अंतर्मुखता' वाढते.

**षड् – द्रव्यांवर एकत्रित चिंतन :**

सर्व 'द्रव्यांच्या सखोल अभ्यास, चिंतन, मननाने' हे स्पष्ट झाले की------

१) 'प्रत्येक द्रव्याचे भिन्न अस्तित्व असून, ते त्रिकाली आहे'.

२) 'ती सर्व द्रव्ये, उत्पाद-व्यय-ध्रौव्यात्मक आहेत'.

३) 'सर्व द्रव्ये सामान्य-विशेष, गुण-पर्यायांनी युक्त आहेत.'

४) 'सर्व द्रव्ये नित्यपरिणमशील असून, त्यांची सत्ता, आपापल्या, द्रव्य-क्षेत्र-काल-भावां पुरती मर्यादित आहे.'

५) 'सर्व द्रव्ये अनंतधर्मांनी युक्त असून,परस्परांवर उपकार करणारे आहेत, तरी ही ती द्रव्ये, परस्परांमध्ये ढवळाढवळ करित नाहीत वा पररूपाने परिणमन करीत नाही'.

६) 'ती सर्व द्रव्ये, नित्य, अवस्थित, अनादि-निधन, आहेत. जीव-पुद्गल द्रव्ये सोडून, अन्य निष्क्रिय आहेत, जीव द्रव्य सोडून, अन्य अचेतन आहेत, तर पुद्गलद्रव्य सोडून, अन्य अमूर्तिक आहेत. काल सोडून, अन्य अस्तिकाय आहेत'.

७) 'पुद्गल द्रव्य स्कंधरूप बनण्याची क्षमता असणारे आहे तरी, ते स्वभावविरोधी परिणमन करीत नाही वा आपल्या रूपिपणा सोडत नाही'.

८) 'द्रव्यांच्या ह्या वैशिष्टयांनी, ती द्रव्ये आणि हे विश्व टिकून आहे.

♦ पुरुषार्थद्वारा प्राप्त केवलज्ञानाने ज्ञात, ह्या सर्व द्रव्यांचे ज्ञान, माझ्यासाठी असून ते मलाच होते. हे सर्व जाणूनही, जीव द्रव्यच 'स्व' शी एकनिष्ठ का नाही?'

* ''स्व- द्रव्य क्षेत्र-काल- भावाने स्वयंपूर्ण असूनही, त्याच्याशी 'तन्मयता' का नाही?'

* ''जीवद्रव्यच 'परनिमित्ताने' विभावरूप का परिणमन करते?''

* ''कर्माच्या उदयाने, त्यात तन्मयतेने, 'ज्ञानस्वभाव' सोडून, राग-द्वेषरूप का होतो?''

* ''उत्पाद-व्ययात्मक 'पर्यांयावरच' दृष्टी का आहे? 'ध्रुव' प्राप्तीची ओढ का नाही''

* ''सर्व द्रव्यांचे 'जीवावरचे' उपकार हे, जीवातच असणाऱ्या 'गुणांना जागृत' करणारे आहेत. ती द्रव्ये नकळत, ह्या 'गुणांच्याप्रगटीकरणाच्या पुरुषार्थाला' चालना देणारीच आहेत.''

* ''१२ भावनांमधील'एकत्व' ह्या भावनेचा उल्लेख ह्याच, अर्थाने तर नसेल ना? त्या एकत्वाच्या अनुभूतीतून साकारणाऱ्या 'आत्मसौंदर्याचा,' अनुभव न घेतल्याने तर हे भ्रमण असेल ना? सतत सुखी होण्याचे, माझेच प्रयत्न व्यर्थ वाया जाण्याचे, हेच तर कारण नाही ना? ह्या प्रश्नांनी मनात जन्म घेतला. चिंतनाला सुखात झाली ,'खऱ्या सुखाची प्राप्ती', ही निकड, प्रकर्षाने भासू लागली,'' हाच सहा द्रव्यांमधील 'पुरुषार्थ' असावा, अशी मनोमन खात्री झाली.

## २. तत्त्व – प्रस्तावना

'जैन दर्शनाची' इमारत, ज्या 'आधारांवर' स्थित आहे, त्यापैकी 'तत्त्व' हा एक महत्त्वाचा आधार आहे. जैन तत्त्वज्ञानातील 'मूळ गाभा व अंतरंग', म्हणून 'तत्त्वांचा' निर्देश केला जातो. 'प्रयोजनभूत' वस्तूच्या स्वभावाला 'तत्त्व' म्हटले जाते.'निश्चयनयाने' कथन केले तर, मात्र 'शुद्धात्माच प्रयोजनभूत तत्त्व' आहे, असे म्हणता येईल. संसार दशेत, 'कर्मबंधनाने' युक्त जीवाचे, 'बंधमुक्त' होणे हेच प्रयोजन आहे. मुख्य भेद सांगतांना, 'हेय-उपादेय' विवक्षेने, 'तत्त्वाचे' दोन भेद आहेत. विशेष प्रकाराने 'सात' भेद कथन केले जातात. 'पुण्य-पापाचा' अंतर्भाव 'आस्रव' तत्त्वातच होत असला तरी, व्यवहार विवक्षेने, विशेषरूपाने हे, कथन 'नवपदार्थ' रूपाने केले जाते.

**विषयकथन :**

'जैन तत्त्वज्ञानातील', अत्यंत महत्त्वपूर्ण ह्या विषयाचे विस्तृत विवेचन केलेले आढळते.

* आचार्यांनी हे विवेचन लक्षण[२६]-भेद रूपाने कथन करतांना, 'निजस्वरूप, वस्तुस्वभाव, श्रुतज्ञान, तत्त्वार्थ, तीन, सात, नवभेद', असा विस्तार केला आहे.

* तत्त्व वैशिष्ट्ये[२७], 'एकत्व, प्रधानता, आधार, पर्याय, संबंध, प्रयोजन,' अशा अंगाने वर्णिली आहेत.

* ह्या सात तत्त्वांपैकी, जीव, अजीव (पुद्गल) या तत्त्वांचे वर्णन, 'द्रव्यविभागात' विस्ताराने केले गेले आहे. 'बंध' तत्त्व 'कर्मप्रक्रियेत' महत्त्वाचे असल्याने ते, विस्ताराने 'कर्मप्रकरणात' कथन केले आहे. अन्य तत्त्वांचा विषयविचार येथे केला आहे.

**अ) आस्रवतत्त्व : ओळख**

जैन दर्शनात 'द्रव्यांइतकेच' 'तत्त्वे' हा महत्त्वाचा विषय आहे. ''जीवाद्वारे प्रतिक्षण, मन-वचनकायेने, ज्या काही शुभाशुभ प्रकृति घडतात, त्यानिमित्ताने'कर्म रूपाने परिणत कार्मणावर्गणा ज्या मार्गाने आत येतात (झिरपतात) त्या मार्गाला 'आस्रव' म्हणतात''. ह्या 'कर्म' बनण्यात निमित्त असणारे, 'जीवाचे भाव' हे 'भावास्रव' असून, त्या निमित्ताने साक्षात् येणाऱ्या 'कर्मरूपवर्गणा', हे 'द्रव्यास्रव' आहे. ह्या सर्व प्रक्रियेत 'कषाय' महत्त्वाचे असल्याने, 'कषाययुक्त आस्रव', हा 'सांपरायिक' म्हणवला जातो तर, 'कषायरहित' आस्रव हा 'ईर्यापथ' म्हणवला जातो. अर्थातच हे 'आस्रव' आगामी बंधाचे कारण ठरत नाहीत. आगमातील हे विस्तृत कथन, 'तत्त्वार्थ-सूत्राच्या' सहा-सात अध्यायात, सोप्या भाषेत कथन केले आहे.

**कथनपद्धती :**

* आगमात हा 'आस्रव विस्तार', लक्षणभेद[२८] रूपाने करतांना, 'भेद-प्रभेद, द्रव्यास्रव-भावास्रव, सांपरायिक-ईर्यापथ, शुभ-अशुभ, मन-वचन-काय,' अशा अंगाने केला आहे.

* 'आस्रवांची' वैशिष्टये आचार्य[२९], 'पुद्गलग्रहण, तरतमता, योगद्वार, विस्रसोपचय, निवृत्तीचे उपाय, आस्रव-बंधात अंतर व युगपत्पणा, त्या त्या कर्मांच्या आस्रवास योग्य परिणाम, पुण्य-पापाचा अंतर्भाव, ज्ञानी-अज्ञानीचा अभिप्राय,' अशा विस्ताराने सांगतात.

* 'आठ कर्मांच्या' आस्रवात, आवश्यक अशी जी कारणे आहेत, त्यांचा ऊहापोह 'कर्मप्रकरणात' केला गेला आहे.

* जैन दर्शनात[३०] 'सम्यग्दर्शनाचे' अनन्यसाधारण महत्त्व आहे. ह्या 'सम्यग्दर्शनाच्या' अभावात, 'मिथ्यादृष्टीचे सर्वभाव, अज्ञानमय, असून बंधाला' कारण मानले जातात. त्यांच्या 'श्रद्धानात, अनुभवात तत्त्वकर्तृत्वात, पुण्यात, अभिप्रायात, कर्मक्षयात', त्यामुळेच अंतर पडते. हा मुद्दा 'आस्रवात' विशेषच चिंतनीय ठरतो.

* तत्त्वार्थसूत्र ग्रंथातील (६।४ते ९) ह्या सूत्रांमधे वर्णित 'आस्रव' वर्णन, त्यात येणारी 'तरतमता, अधिकरण, क्रिया' इत्यादि वर्णनाच्या विशेष चिंतनाने, 'आस्रवाचा' मुद्दा अधिकच स्पष्ट होवू शकतो.

ह्या सर्व विविधांगी विषय वर्णनातून, सूक्ष्म अभ्यासातून, दृष्टीस आलेला 'पुरुषार्थ' मांडला गेला आहे.

**आस्रवातील पुरुषार्थ :**

१) ''मन-वचन-कायेच्या क्रियेला योग असे संबोधले जाते. त्यालाच आस्रव असे म्हणतात. कषायांनीयुक्त असे जे आस्रव त्याला सांपरायिक म्हणतात''.

'पुण्य-पापरूप' कर्मांच्या येण्याचे द्वार 'आस्रव' आहे. ह्या प्रक्रियेत 'कषाययुक्त आत्म्याचा योग' असेल तर, तो 'आस्रव' 'संसारवर्धक' आहे. कारण 'कषायरहित आस्रव' तर १३व्या गुणस्थानापर्यंत चालू असतो, पण तो 'बंधात कारण' नाही. म्हणजे एकतर 'कषायाने कर्म आत्म्यात थांबतात व योगाने आत येतात', 'योग' बंद वा चालू ठेवणे, हे कथांचित् 'पुरुषार्थाधीन' तर, कथांचित् 'कर्माधीन' आहे. पण 'कर्माला थांबू देणे वा नाही,' हा 'बंध' नक्कीच, 'पुरुषार्थाधीन' आहे. 'आस्रवाची' कारणे कळली की, 'विपरीत श्रद्धा वा तत्त्वज्ञानाचा अभाव' दूर करून, 'संयमाचे ग्रहण करणे, असाधनता दूर करून, राग-द्वेष, मोहांना विभाव मानून दूर करणे व मन-वचन-कायेचा योग्य उपयोगाने,सांपरायिक आस्रव रोकणे,' हाच 'पुरुषार्थ' आहे. ही 'आस्रवाची कारणे, आत्मोन्नतीतले' दोष आहेत. त्यांना दूर करणे म्हणजेच, क्रमश: 'गुणस्थानात' वर चढणे आहे, 'आत्मशुद्धी' आहे, 'आस्रवतत्त्वात' दडलेला 'पुरुषार्थ' आहे.

२) ''द्रव्यास्रवाला कारण भावास्रव असतात''.

हे भाव वा हे परिणाम, 'जीवाचे' असतात. वास्तविक 'राग-द्वेष-मोह', हे 'विभाव' आहेत. 'ज्ञान व राग-द्वेष' एक नाही. परंतु त्याला करणारा 'जीवच' आहे. म्हणूनच तो 'जीव', संयोग प्राप्त 'सुखास चांगले वा दु:खाला वाईट' मानतो. त्यात 'राग-द्वेषरूप' कषाय जोडले जातात. हे 'कषाय' कधी तीव्र, कधी मंद असतात. कधी ह्या 'कषायांच्या-प्रती' जागरूकताच नसते. कधी 'जाणता' तर, कधी 'अजानता' घडतात. मात्र ह्या निमित्ताने 'आस्रवात' तरतमता येते. ह्या जाणिवेने वा बोधाने, 'कषाय हा स्वभाव नाही वा ज्ञान व कषाय एक नाही,' हे पक्के श्रद्धान होते वा होण्यास मदत होते. 'हे कर्म असले तरी, तो करण्याचा अपराध माझा आहे', इतके मान्य करण्याचा मोठेपणा येणे, हा ही 'पुरुषार्थच' आहे. ह्या 'सम्यक् मान्यतेने', 'कषाय ही माझी चूक आहे, आणि ह्या मिथ्या मान्यतेने' हा संसार आहे तर, ही मान्यता दूर करणे शक्य आहे. हा दृढ विश्वास 'पुरुषार्थ' आहे. कारण 'समयसार' ग्रंथातही (गा.१९) आचार्यांनी म्हटले आहे की, ''कम्मे णोकम्मह्मि य अहमिदि अहकं च कम्मणोकम्मं । जा एसा खलु बुद्धि अप्पडिबुद्धो हवदि ताव''

३) 'वीर्य वा अधिकरण विशेषतेने आस्रवात तरतमता येते'.

♦ 'वीर्य' हा आत्म्याचा गुण आहे. त्याचा 'नाश वा त्यावर संपूर्ण आवरण', घालताच येत नाही. 'लौकिक वा पारलौकिक', कोणत्याही यशासाठी, 'वीर्य-सामर्थ्य-पुरुषार्थ' हवेच. 'जीवाच्याच' भाव-परिणामांने, 'जीवाच्याच अनंत शक्ती' झाकून टाकल्या. 'क्षयोपशाने' त्या शक्तींचा जो काही भाग व्यक्त आहे, त्याचाही दुरुपयोग अधिक होतो. 'मोक्षासाठी' 'वीर्याची-पुरुषार्थाची' श्रेष्ठता हवी, तशी 'कर्मबंधात'ही वीर्याची श्रेष्ठता-कनिष्ठता, महत्त्वाचा भाग आहे. क्षयोशमप्राप्त शक्तीच्या दुरुपयोगाने, 'सप्तम नरकाचा' बंध करायचा की, सदुपयोगाने

'सर्वार्थसिद्धीचा' बंध करून,'मोक्षाचे' तिकीट मिळवायचे, हा सर्वथा 'पुरुषार्थावर' आधारित भाग आहे.

आस्रवात 'अधिकरणानेही' तरतमता येते. ह्यात कर्म, कोठे केले जातात 'ते स्थळ, काळ वा ज्याने केले जातात ती सामग्री', ह्यांचा विचार केला जातो. 'घरात' घडलेले नकळत 'पापकर्म' वा 'तीर्थक्षेत्री' जाणूनबुजून केलेले 'पापकर्म,' ह्याने तरतमता घडते. 'जीवाधिकरणातील' १०८ भेद, आपल्या हातून घडणाऱ्या 'पापांचा लेखाजोखा' सांगतात. 'अजीवाधिकरणातील' भेद,आपल्या 'वर्तनात जागरूकता' आणतात. 'पाच इंद्रिये, चार कषाय, पाच व्रते, २५ क्रिया', ह्या 'सम्यक् प्रकारे जाणल्या तर, 'सम्यक् पुरुषार्थाचे' दिशादर्शक ठरू शकतात. अशा प्रकारे 'सांपरायिक आस्रवाचे' भेद, 'तरतमतेची' कारणे ही, 'आस्रवतत्त्वाबाबत' विपरीत मान्यता दूर करतात आणि हाच ह्यातील 'पुरुषार्थ' आहे.

**ब) संवरतत्त्व : स्वरूप**

'जैन दर्शनात' प्रतिपादित सात तत्त्वे ही 'प्रयोजनभूत' मानली जातात. ह्यापैकी मुख्य 'जीव-अजीव' तत्त्वे आहेत. त्यांच्या 'परस्पर संयोग, विपरीत मान्यता, सम्यक् ज्ञान', ह्या आधारावर पुढची तत्त्वे सांगितली जातात. ह्या सातपैकी 'आस्रव-बंधाचा' समावेश 'संसारपक्षात' केला जातो. ह्याउलट 'संवर-निर्जरेला' मोक्षाचे कारण मानले जाते. 'मिथ्यात्व, अविरति, प्रमाद, कषाय, योग' ह्यांना 'आस्रवाचे द्वार' वा 'बंधाची कारणे' म्हणतात. ह्याउलट 'समिति, गुप्ति, धर्म, अनुप्रेक्षा, चारित्र, परिषहजय,' ह्यांना 'संवराचे उपाय' म्हणतात. ह्या 'भावांमुळे कर्मयेणे थांबते तो भावसंवर असून, प्रत्यक्ष कर्मवर्गणांचे', येणे थांबणे, 'द्रव्यसंवर' होय.

**विषयवर्णन :**

मोक्षमार्गाची सरुवात 'संवराने' होते, त्यामुळे 'तत्त्वांमधे' त्याचे वेगळे स्थान आहे. 'संवराच्या उपायांचा' म्हणूनच आचार्य, विस्ताराने वर्णन करतात.

* आगमात संवराचे, लक्षण-भेद[३१], 'द्रव्य-भाव, संवराचा हेतू', अशा दृष्टीने वर्णन करतात. 'निश्चय-व्यवहार संवराचे समन्वय' ही सांगतात.

* आगमात संवराच्या उपायात[३२] व्रत[अ], समिति[ब], गुप्ति[क], धर्म[ड], अनुपेक्षा[इ], परिषहजय[ई], चारित्र[फ] ह्यांचा उल्लेख केलेला दिसतो.

**पुरुषार्थाला स्थान :**

१) ''आस्रवांचा निरोध म्हणजे संवर होय. आत्म्याचे जे परिणाम, कर्मयेण्याला अडवतात, तो 'भावसंवर' आहे''.

'योग व कषायाने,'-राग-द्वेष-मोहाने, 'आस्रव' होतो. त्याचा 'निरोध' म्हणजे 'संवर'

होय. म्हणजे 'राग-द्वेष-मोह उत्पन्नच होवू न देणे संवर' होय. थोडक्यात 'वीतरागता' हा 'संवर' झाला. क्षणभरासाठी का होईना, 'आत्मीय सुखाचे संवेदन, त्यातच लीनता, हा संवर' झाला. असे भाव वा परिणाम 'माझे' होतात का? ह्याच्या कडे 'लक्ष देणे वा जागरूकता आणणे वा तसा प्रयत्न करणे', हाच 'पुरुषार्थ' आहे. 'स्व' परिणामानेच 'आस्रव', व 'स्व' परिणामानेच 'संवर', ही दृढता येणेच 'पुरुषार्थ' होय.

२) ''व्रत इत्यादि संवराचे उपाय व्यवहाराने असून, निश्चयनयाने तर, शुद्धोपयोग वा आत्मलीनताच' संवाराचा उपाय आहे.''

अ) 'व्यवहारनयाने' कथित, 'संवराच्या उपायांना', 'संसारात' 'कष्टदायी' मानले जाते. अनादिकाळापासून संसारात भ्रमण करणाऱ्या 'जीवाला', संसारवर्धक क्रिया करणेच, सहजसोपे वाटत आले आहे. त्यामुळे 'आस्रवालाच' हितकर मानण्यात येत होते. त्यामुळेच 'आस्रवाला करून संवर होतो' अशीच मिथ्या मान्यता होती. ह्या 'संवर तत्त्वाच्या' यथार्थ ज्ञानाने 'आस्रवाला रोकून संवर होतो', ही खात्री होते.

ब) 'संवराच्या उपायातील व्रते इत्यादि, हे उत्तरोत्तर पुरुषार्थाच्या उत्कर्षाचे' द्योतक आहे'. कारण ही साक्षात्, 'आत्म्याच्या निर्मलीकरणाची' प्रक्रियाच आहे. 'व्रताने' पापांचा संवर होतो. 'व्रते', ही 'शरीर-शुद्धिसाठी' महत्त्वाची मानली जातात.

क) 'मन-वचन-कायेच्या' क्रियांचा, 'सम्यक्' निग्रहरूप 'पुरुषार्थ' गुप्तीने घडतो. मात्र हा अवघड 'पुरुषार्थ' करण्यात असमर्थ असणारे, 'यत्नाचारपूर्वक, प्रयत्नपूर्वक प्रवृत्ति' करतात.

ड) 'हिंसारहित प्रवृत्तिरूप जागरूक आचरणाचा सराव', हा समितिरूपाने 'पुरुषार्थ' घडतो. 'समितित' घडणाऱ्या प्रमादांचा परिहार, 'धर्मरूप पुरुषार्थाने' केला जातो.

इ) ♦ उत्तम क्षमादि 'दशधर्म' हे तर, साक्षात् उत्तरोत्तर कठिणतर, 'पुरुषार्थाचे' स्पष्टरूपच आहे. ह्या 'दशधर्मरूप पुरुषार्थाने' परिणामांची शुद्धी होते. कारण त्यात 'लौकिक प्रयोजन' नसते. 'तत्त्वज्ञानाच्या अभ्यासपूर्वक, आध्यात्मिक प्रयोजनाच्या उद्दिष्टाशिवाय', हा 'दशधर्मरूप पुरुषार्थ' घडणे शक्यच नाही. हा कठिण 'पुरुषार्थ' सहजी घडावा, 'कषायांची शमता' व्हावी, 'परिणामात वैराग्याची' दृढता यावी, यासाठी ह्या कार्यात 'अनुप्रेक्षा' सहायक ठरतात.

ई) 'सर्व आसक्ति, दृढमल संस्कार क्षीण होण्यात आणि तत्त्वश्रद्धान' अधिकाधिक दृढ होण्यासाठी, हा 'अनुप्रेक्षांचा' वारंवार चिंतनरूप 'पुरुषार्थ' फारच प्रभावशाली उपाय ठरतो.

फ) ह्या क्रमशः घडणाऱ्या 'पुरुषार्थाच्या उत्कर्षाने', थोडावेळ 'स्व' मधे स्थिति, झाली तरी, 'श्रावकदृष्टीने', हेच 'निश्चयचारित्र' वा 'उत्तम पुरुषार्थ' म्हणता येईल. कारण अत्यंत 'व्यस्त, त्रस्त' ह्या संसारात, समयमात्रासाठी जरी, 'चित्ताची निर्मलता' झाली तरी, तेच 'श्रावकांसाठी

चारित्र्य' ठरेल. हे 'स्व' भान व 'स्व जाण', हाच खरा 'संवररूप पुरुषार्थ' म्हणावा लागेल. कारण तो 'संवर आत्म दोषांना दूर करणारा व नवीन दोषांना उत्पन्न होवू न देण्याचा खरा प्रयास असेल'.

३) 'कषायाने आस्रव-बंध युगपत् होतो. 'संवर म्हणजे आस्रवांचा' निरोध आहे.

'संवर' म्हणजे, 'आत्म्यात नवीन दोष उत्पन्न होवू न देण्याचा मार्ग' आहे. 'आस्रवाची' जी कारणे आहेत, त्यांना दूर करण्याने 'संवर' होतो. 'मिथ्यात्व, अविरति, प्रमाद, कषाय, योग,' ह्या क्रमाने, ही कारणे आहेत. ह्या क्रमाने जसजसा ह्यांचा नाश होतो तसतसा, गुणस्थानात 'संवर' वाढत जातो. त्याने उत्तरोत्तर होणाऱ्या 'संवराचे' ज्ञान होते. १० व्या 'गुणस्थानापर्यंत,' प्रथम चार कारणांचा क्रमशः 'संवर' होतो, कारण 'योग' तर, १३ व्या गुणस्थानापर्यंत राहते. 'क्षपकश्रेणीवाला' जीव, क्षय करीत वर जातो तर, 'उपशमश्रेणीवाला' जीव, उपशम करीत वर जातो. त्यावर निर्जरा ठरते. हया यथार्थ ज्ञानाने, खऱ्या अर्थाने मोक्षमार्गाच्या 'पुरुषार्थाला' सुरवात होते. 'संवराच्या' उपायांपैकी एकाचेही पालनसुद्धा, ह्या मार्गावर येण्याची प्रथम पायरीच ठरेल.

**क) निर्जरातत्त्व-स्वरूपः**

जैन तत्त्वज्ञानात 'मोक्ष' पुरुषार्थाची प्रधानता दिसते. त्यानुसार 'षड्द्रव्ये' आणि'साततत्त्वे', ह्यांचे वर्णन आढळते. सर्व 'तत्त्वज्ञानाचा' मुख्य आधार 'जीव' आहे. त्याचे अंतिम उद्दिष्ट 'मोक्ष' आहे. जीव-अजीवांच्या 'संयोग-वियोगाच्या', अन्य अवस्था म्हणजे, ही अन्य 'तत्त्वे' आहेत. हा संबंध 'अनादिपासून' आहे. जीवाच्या 'कषाय व योग' प्रवृत्तीमुळे, पुण्य वा पापरूप 'आस्रव' होतो. त्याने आत्मा 'बद्ध' होतो. 'संयम पुरुषार्थाने, आस्रवांना रोकणे,' हा 'संवर' होतो. पूर्वार्जित कर्मसमूह 'तप, संवर,' यांच्या सहाय्याने क्षीण करणे ही, 'निर्जरा' होय. ज्याच्या फळस्वरूप सर्व कर्मे सर्वथा दूर होणे, ही 'मोक्षावस्था' प्राप्त होते. 'मोक्षमार्गात' म्हणूनच 'निर्जरेचे' स्थान, महत्त्वाचे आहे. ह्या 'तत्त्वाची नोंद स्वतंत्रपणे' घेवून, त्याच्या 'सूक्ष्म चिकित्सेचे श्रेय', हे 'जैनांचेच वैशिष्टय व वेगळेपण' आहे. सैद्धांतिक दृष्टीने 'कर्मसिद्धांत' हा, 'जैन तत्त्वज्ञानाच्या अग्रभागी' आहे. ही तत्त्वे, त्या 'कर्मसिद्धांताचा' संक्षिप्त आराखडाच आहेत.

अन्य दर्शनातही, उदा. गीतेत, (४/१९) 'ज्ञानाग्नीने कर्मे भस्मसात होणे याला क्षय म्हटले'. मात्र हे वर्णन खूपच 'त्रोटक वा अल्प' आहे. ह्या 'निर्जरा' तत्त्वाचे विस्तृत 'विवेचन' 'कर्मविषयक' ग्रंथांमधे प्रचुरतेने आढळते. हे वर्णन इतके 'तर्कशुद्ध, विज्ञाननिष्ठ' आहे की, हाच जैनांचा ' 'पुरुषार्थ' म्हणता येईल.

**विषयविस्तार :**

'कर्मसिद्धांतात' महत्त्वाच्या असणाऱ्या, ह्या विषयाचे वर्णन, खूपच सविस्तरपणे केलेले आहे. त्याचा संक्षिप्त आढावा येथे घेतला आहे.

* 'निर्जरा' हा जैन तत्त्वज्ञानातील, खास 'पारिभाषिक' शब्द आहे. त्याचे स्पष्टीकरण, 'निर' उपसर्गपूर्वक, 'जृ' ह्या क्रिया-पदापासून बनलेले, नाम असे केले आहे.

* ह्या 'निर्जरा तत्त्वाचे' वर्णन आगमात, लक्षण-भेद[३३], दृष्टीने वर्णने करून, 'सविपाक-अविपाक, भाव-द्रव्य, सकाम-अकाम,' असे भेद सांगितले आहेत.

* 'निर्जरेची' वैशिष्टये सांगतांना[३४], 'तपाची प्रधानता[अ], संवरासह निर्जरेचे महत्त्व[ब], निर्जरेचे अधिकारी, सम्यग्दर्शन व निर्जरा[क], गुणस्थान व निर्जरा[ड], सल्लेखना व निर्जरा[इ], समुद्घात व निर्जरा[इ], क्षपणाविधी[फ], त्याशिवाय कर्माच्या दहाअवस्थेत होणारी निर्जरा, व अशा विविध अंगांनी, विशद् वर्णन केले आहे.

* 'जैन' आगमात[३५] विविध व्यावहारिक उदाहरणे, दृष्टांत देवून 'निर्जरा' तत्त्वाचे महत्त्व पटवून दिले आहे.

* 'निर्जरेच्या' प्रक्रियेत, सर्वात महत्त्वाचे 'संवर' हे तत्त्व आहे. कारण 'कर्म आत येण्याचा मार्ग' बंद केल्याशिवाय, 'निर्जरा सुरू होवू शकत नाही. आगमात 'संवराच्या उपायात वर्णित, 'व्रत, समिति' इत्यादिंनाच, 'निर्जरेची साधने' म्हटले आहे. तरीही ह्या निर्जरेत, 'तपाचे' स्थान सर्वोच्च आहे. त्यामुळेच आगमात 'तपाचे', अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट होते. तत्त्वार्थसूत्रात (९।३) ''तपसा निर्जरा च'', अशा सूत्राने 'तप व निर्जरा' यातील संबंध अधोरेखित केला आहे. 'तप' हा मुद्दा प्रबंधात, 'पुरुषार्थाची साधने' ह्या प्रकरणात, विस्ताराने वर्णिला आहे. येथे तपासह होणाऱ्या 'निर्जरेचा' ऊहापोह केला आहे.

### १) गुणस्थान-निर्जरा :

'मोह व योग' निमित्ताने, 'जीवाच्या अंतरंग परिणामात' होणारे उतार-चढाव, 'गुणस्थानाचा' विषय आहे. 'संवराच्या' स्वरूपाचे विशेष ज्ञान, ह्या 'गुणस्थानांच्या' ज्ञानाने होते. आगमात 'गुणश्रेणी निर्जरा' हा शब्द दिसतो. कार्तिकेयानुप्रेक्षा' ह्या ग्रंथात 'निर्जरा अनुप्रेक्षेच्या' विचारात, 'गुणस्थानअपेक्षेने' निर्जरा विचार मांडला आहे. तत्त्वार्थ सूत्रात' 'चार ते तेराव्या गुणस्थाना पर्यंत, अविपाक निर्जरेचा', क्रम स्पष्ट केला आहे.

### २) सम्यग्दर्शन व निर्जरा :

(स.सा.१९६,१९३,२१८) आचार्य कुंदकुंदाच्या मते, 'ज्ञानी कर्मात राहूनही वा कर्म करूनही, लिप्त होत नाही', कारण वस्तूंविषयी 'रागभावाचा' त्याला अभाव असतो. त्यामुळे अशा जीवाद्वारा,

'इंद्रिय द्वारा' जे काही, उपभोग घेतले जातात, ते सर्व 'निर्जरेचे' निमित्त ठरतात. कर्माने उत्पन्न कोणतीही क्रिया, 'बंधाला कारण' होत नाही. इतकेच काय तर, तो जीव 'आत्म्यात' असो वा 'परद्रव्यात', 'सम्यक्‌भावाने' त्याची 'निर्जरा' होतच राहते. त्या जघन्य भूमिकेतही त्याची चेतना, 'ज्ञानचेतना' ठरते. त्याचे 'कुध्यानसुद्धा', नरकाचे कारण ठरत नाही. कारण तो कर्माप्रती फक्त 'ज्ञाता-द्रष्टा' भावरूपाने असतो. त्यामुळे सदैव 'निरास्रव व अबंध' राहतो. (पं.ध.उ.२३०, ८७८, २७५, द्र.सं.टी.४८।३, स.सा.३१८,१७०-१७१, १७७-१७८)

### ३) चेतना व निर्जरा :

'चेतनेच्या' तीन  प्रकारात, 'शुद्धात्म्याला विषय करणारी शुद्धचेतना', व अशुद्ध चेतना ही, 'कर्म व कर्मफलरूप असते.' 'ज्ञानचेतनायुक्त ज्ञानी', शुभाशुभ कर्मबंध व कर्मफलाचा, मात्र 'ज्ञाता' असते. अशा सम्यग्दृष्टीची 'ज्ञानचेतनाच' उपादेय ठरते. कारण ती 'चेतना, निजात्मा' शिवाय अन्य रूपाने प्रवर्तन करीत नाही. त्यामुळेच तो 'कर्मांचा कर्ता' होत नाही, मात्र ज्ञाता होतो. आणि अबंध राहतो. (पं.ध.उ.१९२-१९५, ८२२,१९८, ८५०, २२३, २६५)

### ४) सल्लेखना व निर्जरा :

सल्लेखनेत 'कषायांना व शरीराला' कृश केले जाते. 'कषायरहित होवून, आत्म्यात स्थिरता महत्त्वाची असते. बंधाला कारण असणाऱ्या, 'मिथ्यात्व' इत्यादि पाचही कारणांचा, तेथे त्याग असतो. योगाने, 'ध्यान, ज्ञान, तप, शुद्ध आचरणच' होत असते. म्हणूनच सल्लेखनेला 'मोक्षाचे द्वार' म्हणतात. 'निर्जरे शिवाय' मोक्ष शक्य नाही, आणि ही 'निर्जरा सल्लेखनेत' होते. (भ.आ.२०६, २५६-२५९; स.सि.७।२२।१)

### ५) परिषह व निर्जरा :

संवराच्या उपायांनीच 'निर्जरा' होते. त्या उपायांपैकी 'परिषहजय' हा एक उपाय आहे. 'उपसर्ग-परिषह' सहन करण्याने, 'कर्मक्षय' कसा होतो, ह्या विषयी का. अ. ग्रंथात (१०९-११०) स्पष्ट केले आहे. देवसेनेविरचित 'आराधनासार' ग्रंथातही (९५,९६) परिषह सहन केल्याने चिरबद्ध 'कर्मांची निर्जरा' सांगितली आहे. 'तपाइतकाच' हा ही, 'प्रभावी उपाय' मानला आहे. प्रतिकूलतेतच 'निर्जरा' अधिक होते. कारण 'भोगासक्ती, देहासक्ती, परिग्रहासक्ती, स्वजनासक्ती, प्रतिकूलताबाबत अनिष्टता,' ही कमी होते.

### ६) समुद्‌घात व निर्जरा :

हा जैनांचा एक 'पारिभाषिक' शब्द आहे. ''मूळ शरीराला न सोडता, आत्मप्रदेश शरीराबाहेर काढणे समुद्‌घात होय''. त्याचे 'सात भेद' सांगितले जातात. 'वेदना' इत्यादि 'समुद्‌धाताचा' काळ असंख्यात समय असून, 'केवली-समुद्‌घात' आठ समयात होतो. ह्यात

‘आयुकर्माची’ स्थिति, अन्य अघातिकर्मां इतकी करण्यास, ‘दंड-कपाट-प्रतर-लोकपूरण,’ ह्या क्रमाने, ‘आत्मप्रदेशांना लोकाकाशात पसरवले जाते’ आणि त्याचक्रमाने प्रदेश परत आत्म्यात घेतले जातात. त्याद्वारा ‘कर्मांची निर्जरा’ होते. (रा.वा.१।२०।१२।७७।१२,२६२१, ध.१।१,१,६०।३००।६)

### ७) अनुप्रेक्षा आणि निर्जरा :

जैन आगमात ‘वैराग्यवृद्धिसाठी १२ भावना’ ह्या महत्त्वाच्या मानल्या आहेत. ‘भगवती आराधनेत’, म्हणतात की, ‘संवरयुक्त होवून आस्रवांच्या निरोधासह, निर्जरेसाठी तपे केली जातात’. (१८३९, १८४१, १८४२) कारण मोक्ष प्राप्तिसाठी ‘संचित कर्मांची निर्जरा’ आवश्यक असते. ‘कार्तिकेयानुप्रेक्षा’ ग्रंथात (१०३ ते ११४), विस्तारपूर्वक वर्णन आले आहे. ‘अनुप्रेक्षांच्या’ सहाय्याने, ‘दशधर्मांचे’ पालन योग्य प्रकारे होण्यास, ‘परिषहांना’ जिंकण्यास मदत होते. त्यामुळे ‘समतावृद्धी होते आणि निर्जरा’ होते. (स.सि.९।७, भ.आ.१८७४; का.अ.११४)

### ८) गुणश्रेणी निर्जरा :

‘कर्मसिद्धांतात’ वर्णित, ‘कर्मांच्या दहा अवस्था’, ह्या महत्त्वाच्या मानल्या जातात. त्यात ‘संक्रमण’ ह्या अवस्थेत, ‘गुणश्रेणी’ चा निर्देश केला जातो. त्यात ‘उदयकाळापासून अंतमुहूर्त’ कालपर्यंत क्रमाने, असंख्यात गुणा, असंख्यातगुणा ‘द्रव्य निर्जरित’ केले जाते. (ध.१२।४,२७,१७५।८०।६) ह्याचे विवेचन ‘संक्रमण’ विभागात केले आहे.

### ९) कर्मबंध व निर्जरा :

‘जैन दर्शनाने’ आठ कर्मांचे वर्णन केले आहे. त्यापैकी ‘चार घातिकर्मे, तर चार अघातिकर्मे’ आहेत. ‘घातिकर्मांच्या’ क्षयाने ‘केवलज्ञान’ प्राप्त होते. ही प्रामुख्याने ‘आवरणीय’ स्वरूपाची कर्मे आहेत. ह्या ‘आवरणाचा क्षय’ करण्यासाठीच, ‘निर्जरातत्त्वाचा’ समावेश तत्त्वज्ञानात केला गेला. किंबहुना ‘कर्माचे आवरकत्व’ मानले म्हणून,‘निर्जरातत्त्वही सार्थ ठरते.’ ह्या कर्मांवर ‘पुरुषार्थाने,’ ‘निर्जरेने’ मात करता येते. हा ‘सूक्ष्म व सविस्तर’ विस्तार ‘कर्मप्रकरणात’ केला आहे.

### १०) निर्जरेतील विघ्न :

जैन शास्त्रात ‘निर्जरेला’ अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण ह्याचा संबंध ‘सत्तेतील कर्मांशी’ जोडला आहे. मात्र ‘सर्वप्रकारच्या तपाने निर्जरा होते’ असा गैरसमजही झालेला सर्वत्र दिसतो. वास्तविक पहाता हे विधान चूक आहे. आचार्यांनी विशेषप्रकाराने ‘निदान व बालतप’ ह्यांचा उल्लेख केला आहे. आगममान्य तीन शल्यांपैकी, ‘निदान’ हे एक शल्य आहे. (त.सू.६।२०) ‘ऐहिक सुखसमृद्धिच्या’ अपेक्षेने होणाऱ्या ह्या ‘तपाला, बंधाचेच कारण’ म्हटले आहे. त्याचबरोबर ‘सम्यग्ज्ञानाच्या अभावी होणारे, अविवेकी तप बालतप वा मिथ्यातपच’ म्हटले आहे. ह्या

अडथळ्यांकडे  विशेष लक्ष वेधले आहे.

ह्या कर्मनिर्जरेत 'क्षपणाविधि' ही महत्त्वाची प्रक्रिया आहे. 'आस्रवात' ज्याप्रमाणे 'तीव्र-मंद' इत्यादि भावांमुळे, वा 'अधिकरण-वीर्य-विशेषतेने' तरतमता येते, त्याचप्रमाणे ह्या सर्व विचारांनुसारच 'निर्जरेचाही विशिष्ट क्रम' सांगितला आहे. त्या प्रक्रियेत,'गुणस्थान, गुणश्रेणी, मूळ-उत्तर प्रकृति, कषायांची तरतरमता' इत्यादींचा विचार करून, 'निर्जरा व क्षयाचे' सुंदर वर्णन केले आहे.

'कर्मसिद्धांतात' हा क्रम महत्त्वाचा असल्याने, ह्या विषयाचा सूक्ष्म आढावा घेतला आहे. ह्या विषयाच्या सविस्तर 'चिंतन-मननातून', प्रकर्षाने प्रकाशित झालेला 'पुरुषार्थ' निदर्शनास आणला आहे.

**पुरुषार्थावर स्थित (आधारित) निर्जरा**

१) ''पूर्वबद्ध कर्मांचे एकदेश झडणे म्हणजे 'निर्जरा' असून, ती 'सविपाक-अविपाक' दोन भेदरूप आहे''.

कषाययुक्त होवून, जीव 'प्रतिक्षण कर्मे बांधत असतो आणि प्रतिक्षण पूर्वबद्ध कर्मे उदयाला' येवून निघून जात असतात. 'हे सर्वच गतीत, सर्वच जीवांना' होते, त्यात 'पुरुषार्थाची' आवश्यकता नसते. 'विशेष पुरुषार्थाने वेळेपूर्वी कर्मे उदयाला' आणली जातात व निर्जरित होतात, ती 'अविपाक' निर्जराच श्रेष्ठ मानली जाते, कारण ती 'पक्व-अपक्व' सर्वच कर्मांची होते, ही निर्जरा 'सम्यग्दृष्टींनाच' होते, विशिष्ट 'गुणस्थानांपासून' होते, म्हणून ती श्रेष्ठ आहे. 'सम्यग्दर्शन आत्म्याचा गुण' आहे, तरी पर्यायात त्याची व्यक्तता, 'पुरुषार्थाशिवाय' नाही. 'सम्यग्दर्शन' नाही तर 'संवर' नाही आणि संवराशिवाय, 'निर्जरा' नाही, पर्यायाने 'मोक्ष' ही नाही. 'सम्यग्दर्शनासह व्रतगुप्ति' इत्यादि 'संवराचे उपाय,' निर्जरेचे कारण ठरतात अन्यथा नाही. ह्या सर्व विधानांमधून 'पुरुषार्था'कडे असलेला रोख अधिकच स्पष्ट होतो.

२) ''तपसा निर्जरा च' म्हणजे, तपाने विशेषप्रकारे अविपाक निर्जरा होते.''

♦ जैनांनी 'संवरयुक्त तपाने निर्जरा' मानली आहे. ज्या प्रमाणात 'तपाची' आराधना होईल, त्या त्या प्रमाणात 'आध्यात्मिक विकास' होवू लागतो. ह्या विकासात, त्या त्या 'पायऱ्यांवर-गुणश्रेणीनुसार' असंख्यात गुणा निर्जरा होवू लागते. 'तपाने' निर्जरा सांगून, सामान्यातल्या सामान्य व्यक्तिलाही, 'यथाशक्ती संवर व निर्जरेला उद्युक्त' केले आहे. त्यामुळे 'नैतिक, आचार, शास्त्रातील, तपाचे स्थान', अधिकच प्रकर्षाने निदर्शनास आणले आहे. 'जैनांचे तप फक्त देहदंड,' वा 'जैनांचा धार्मिक आचार म्हणजे पलायनावाद,' ह्या चुकीच्या विधानांना, मान्यतांना, त्यामुळे नक्कीच दूर केले आहे. 'इच्छेचा निरोध म्हणजे तप'असल्याने, सर्वसामान्यांसाठी

ते अत्यंत कठीण आहे. 'प्रलोभने, आकर्षणे, चित्रविचित्रततांनी,' पूर्ण ह्या संसारात राहूनही, 'यथाशक्ती, द्रव्य-क्षेत्र-काल-भावनुरूप, मन:पूर्वक महत्प्रयासाने, विषयांचा त्याग करणे, तप करणे, हा नक्कीच, निवृत्तिवादातील सम्यक् प्रवृत्तींना दर्शवणारा पुरुषार्थच' आहे. 'निवृत्तीचे ध्येय' अग्रभागी ठेवूनही, व्यवहारातील ही 'प्रवृत्ति', दृढ मानसिक निश्चयाकडे जाण्याची 'सम्यक्-सकारत्मक' प्रेरणाच आहे. 'व्यवहार आणि निश्चयाचा', सुरेख मेळ यात घातला आहे. व्यवहार करताना 'इच्छा निरोधाचा पुरुषार्थ', कितीही कठीन असला तरी, 'आचार-विचारातून' प्रत्येक जैनी, तो किती सहजपणे साधतोय आणि हाच 'निर्जरेतील पुरुषार्थ' आहे.

३) ''निर्जरेसाठी, 'तलावाचे रूपक, संचित धनाचा दृष्टांत, नैसर्गिक व कृत्रिम उपायाने फळ पिकवणे, ओलेवस्त्र,' अशी अनेक उदाहरणे आगमात दिलेली दिसतात''.

ह्या उदाहरणांद्वारा सर्वसामान्यांना, 'निर्जरेसाठी उद्युक्तच' केले आहे. 'प्रवृत्ति' न सोडता, 'निवृत्ति' कडे जाण्याचा हा 'पुरुषार्थच' आहे. ह्या 'निर्जरा' तत्त्वाने, जैनांनी 'कर्मसिद्धांत' स्वीकारूनही, सर्वस्वी 'कर्मपरतंत्रता वा नियतिवादाला दूर करून, प्रयत्नशील पुरुषार्थाला अग्रभागी' ठेवले आहे.

४) ''मोक्षमार्गात 'बंध' व 'निर्जरा,' ही महत्त्वाची तत्त्वे आहेत.''

'निर्जरा' तत्त्वाला जाणूनच, 'मी बंधनात आहे' ह्यावर शिक्कामोर्तब होते. आपल्याच 'विपरीत भावभावना, परिणामांनी' हा दु:खदायी संसार आहे, हा विश्वासच निर्जरारूप 'पुरुषार्थाकडे' नेणारा ठरतो. दृढ निश्चयाचा हा,' सकारात्मक पुरुषार्थच' आहे.

५) ''संवरातील उपायपद्धतीने निर्जरा होते.''

♦ 'संवराच्या उपायातील' व्रत इत्यादिंचे, 'निर्जरेत' खासच महत्त्व आहे. किंबहुना हे 'व्रतादि वाढत्या क्रमाने होणाऱ्या 'पुरुषार्थाचे' सूचक आहेत.'व्रते' त्यामानाने ढोबळ असली तरी, प्राथमिक दशेत ती खूपच सहाय्यक ठरतात. 'व्रतांमुळे' नकळत, 'संयम व तपाचा' अभ्यासच होतो. 'गुप्ति-समिति,' साधूंसाठी असली तरी, 'स्थूलरूपाने' त्याचे पालन श्रावकही करू शकतात. 'दशधर्मांचे' दृढतेने पालन 'श्रावकदशेत' अशक्य आहे, तरी खऱ्या अर्थाने व्यवहारात त्याचे पालन करणे, हाच मोठा ' पुरुषार्थ' आहे. व्यवहारात आवश्यक तेथे, 'क्षमा, मार्दवता, आर्जवता,' ह्यांचे पालन म्हणजे, 'सुखी जीवनाची गुरुकिल्ली'च आहे. 'आठ मद, लालसा, तृष्णा, आसक्तीने' युक्त मनाला, 'शौच, संयम, तप, त्यागाकडे' वळवणे, हाच 'श्रावकांचा श्रेष्ठ 'पुरुषार्थ' असून, त्याने निर्जरा' नक्कीच आहे. 'स्वार्थी, व्याभिचारी' ह्या जगात 'स्थूलपणे जरी, आकिंचन्य, ब्रह्मचर्य' पाळले तरी 'पुरुषार्थाची पराकाष्ठाच' ठरेल.किबंहुना अनेक सामाजिक प्रश्नांची उत्तरेच, ह्या 'व्रत, समिति, गुप्ति, आणि दशधर्म पालनात' दडली आहे.

६) ‘‘अनुप्रेक्षा ह्या वैराग्य व संवेगवर्धक असतात’’

व्यवहारात ‘व्यस्त, त्रस्त, लिप्त,’ श्रावकांना, ‘अनुप्रेक्षा वा भावना,’ ह्या मन:शुद्धीसाठी नक्कीच ‘उपादेय’ आहेत.

७) ‘‘परिषहजयाने संवरपूर्वक निर्जरा होते’’

♦ आगमातील २२ परिषहांचे वर्णन ‘श्रावकांसाठी’ नाहीच, अशी , जनसामान्यात धारणा दिसते. ‘अनुकूलता, सुखासीनता,’ यांच्या आधीन जीव, आपल्या ‘सोईनुसार ह्याकडे दुर्लक्ष करतो. ह्या ‘परिह्षांपैकी’, एकेका ‘परिषहावरही’ विजय मिळवणे वा चिंतनही करणे, ‘श्रावकांसाठी’ कठीण आहे. ‘क्षुधा–तृष्णा, दंशमशक, तृणस्पर्श,’ सारखे ‘परिषह,’ प्रतिकूलतेत ‘समता’ ठेवण्याचा पाठ देतात. ‘लाभ–अलाभ, याचना’ सारखे परिषह, प्राप्त ‘अनुकूलता, प्रतिकूलतेत’, स्थिर कसे रहावे वा स्थितप्रज्ञता शिकवतात. ‘सत्कार–पुरस्कार’ ह्या ‘परिषहांना जिंकणे’, दिसते तितके सोपे नाही. ह्या प्रसिद्धीच्या हव्यासापोटी, सर्वत्र चालणारी ‘जीवघेणी स्पर्धा, हिंसा’ हे त्याचे प्रतिक आहे.‘क्षुधादि परिषह’ एक वेळ, प्रयत्नाने जिंकता येते. मात्र ‘सत्तेची हाव, पदलालसा, मान, सत्कार’, ह्या ‘परिषहांवर विजय’, हा श्रावक दशेत ‘पुरुषार्थाचा प्रकर्षच’ ठरेल. एक एक ‘परिषहजय,’ ह्यात सूक्ष्मता, कठिनता, ‘क्रमश: पुरुषार्थाचा उत्कर्ष’ आहे. ‘जैनांचे तप’ ह्या ‘परिषहजयाचा’ अभ्यासच आहे, अथवा ‘परिषहजय’ हे ‘तपाच्या उत्कर्षाचे’ बीज आहे. व्यवहार नयाने हा ‘परिषहजय श्रावकांचा उत्कृष्ट पुरुषार्थ, उत्तमनीतिमत्ता, जीवन जगण्याचा’ अभ्यासच आहे.

८) जैन आगमात वर्णित ‘समुद्घात’ विषयाची सिद्धी, वर्तमानात मानसशास्त्रात वर्णित, (astralbody)’ वा पतंजलींनी वर्णित ‘सूक्ष्म शरीराने’ होते. ह्या ‘समुद्घातात’ आत्मप्रदेश पसरवले गेल्याने ‘निर्जरा’ होते. ‘समुद्घात बुद्धिपूर्वक केले जावू शकते वा नाही’ हा अभ्यासाचा विषय आहे.

**ड) मोक्षतत्त्व–स्वरूप :**

‘भारतीय’ दर्शनांप्रमाणेच, जैन दर्शनही ‘चार पुरुषार्थांचा’ पुरस्कार करणारे आहे तरी देखील, ‘जैन दर्शनाचा विकास व विस्तार’ मात्र, ‘मोक्ष’ पुरुषार्थाला समोर ठेवून झाला, हे सत्य आहे. मुख्यत: ‘निवृत्तिवादी’ असल्याने, त्यांनी ‘मोक्ष’ पुरुषार्थावर भर देणे, हे योग्यच आहे. त्यामुळेच ह्या ‘मोक्ष’ पुरुषार्थावर स्थित, ‘मोक्ष’ ह्या ‘तत्त्वाचा’ विस्ताराने विचार केलेला दिसतो.

**कथनक्रम :**

* ‘मोक्ष’ तत्त्वाच्या प्रधानतेने ह्या मुद्दयाचा विचार, आचार्य विविध अंगाने करतात. त.सू.

कारांनी (१०।२)''बंध हेत्वभावनिर्जराभ्यां कृत्स्नकर्मविप्रमोक्षोमोक्ष:'' अशी व्याख्या केलेली दिसते. अन्यही लक्षण-व्याख्या आढळतात[३६]. त्याच्या, 'द्रव्य-भाव' ह्या भेदांचे वर्णन, लक्षणांसह आचार्य करतात.

* त्याचबरोबर आगमात[३७], 'मुक्त व जीवनमुक्त जीवाचे लक्षण[अ] सिद्धलोकाचे स्वरूप[आ], 'अर्हंत व सिद्ध' यांच्यातील भेद[इ], भावमोक्ष, सिद्धांची संख्या[ई],' इत्यादि वर्णन आढळते.

* सिद्धांच्या 'गुण व भावाचे' वर्णन दिसते[३८]. त्याच बरोबर, ''मुक्तियोग्य, द्रव्य-क्षेत्र-काल-भाव इत्यादि बरोबरच, गति, लिंग, तीर्थ, चारित्र,'' अशा विवक्षेसह वर्णन आढळते.

* मोक्षाच्या वर्णनात[३९], ''बंध-उदय कसा नष्ट होतो, कर्मांचा नाश शक्य कसा? मुक्तजीवांचा परस्परांमधे विरोध नसणे,'' इत्यादि अनेक शंकांचे समाधान, आचार्यांनी केलेले दिसते.

**मोक्ष तत्त्वातील 'पुरुषार्थ'**

♦ १) ''जैन दर्शनात 'आत्मा' कूटस्थ नित्य न मानता, 'परिणामी नित्य' मानला आहे. जैन दर्शनात, आत्म्याला 'निर्गुण' न मानता 'अनंतगुणयुक्त' मानले आहे''.

अ) जैनांनी मान्य 'परिणामी नित्यत्व' हे, 'उत्पाद-व्यय-ध्रौव्याचा' पुरस्कार करणारे आहे. 'जीव द्रव्याची', संसारातील 'उत्पाद-व्ययता' ही, विविध 'गति-जाति-भव' इत्यादि रूपाने दिसते तरी, त्याची 'ध्रौव्यता', पुनर्जन्मातून स्पष्ट होते'. 'मोक्षावस्थेत ध्रुवता' ही मुख्य असली तरी, तेथेही 'अगुरुलघु' गुणाने होणारी, 'उत्पाद-व्ययता' ही होतच असते. जीव कोणत्याही अवस्थेत असो, तो 'सुरक्षित' आहे, हा विश्वास 'पुरुषार्धवर्धक' आहे.

ब) 'कर्म व जीव' अनादि संबंध आहे', जर हे वरील विधान सत्य आहे तर, 'माझ्याचप्रमाणे मनुष्यभवात जन्म घेणाऱ्या जीवाने, कर्मांचा नाश कसा केला? ज्याअर्थी एक जीव हा 'अनादिसंबंध,' आपल्या 'पुरुषार्थाने' तोडू शकतो तर, मी ही नक्कीच करू शकतो', ही प्रेरणा नक्कीच बळ देणारी आहे.

क) जर संसारात दिसणाऱ्या, 'कर्मप्राप्त बाल-वृद्ध-तारुण्य' ह्या अवस्था, नाशवंत आहेत तर, ते 'कर्महीं विनाशशीलच' आहे., ही खात्री 'मोक्षपुरुषार्थकडे' नेणारी आहे.

ड) 'कर्म अनादि' असले तरी, ते 'संयोगरूपाने अनादि' आहेत. ते 'द्रव्य' नसल्याने, स्वयंकृत नसून, 'कृत्रिम' आहेत, 'जीवभाव निमित्ताने निर्मित' आहेत.(man made) जर ते 'कृत्रिम' आहे, तर ते 'नाश' करता येण्यायोग्यच आहे. त्याला जर बनवणारा 'मी' आहे तर, 'नष्ट वा दूर' करणाराही 'मीच' आहे. हाच 'विश्वास', वा ही 'सम्यक् जाण', ह्या 'मोक्ष' तत्त्वातून, सूचित खरा 'पुरुषार्थ' आहे.

२) 'जैन दर्शनात मोक्षाला अभावात्मक' न मानता, आत्मलाभरूप मानले आहे'.

जैन दर्शन कोणत्याही 'द्रव्याचा नाश' मानत नाही. त्या द्रव्यांच्या 'पर्यायांचा, उत्पाद-व्यय' मानला आहे. 'गुणरूपाने द्रव्याची ध्रौव्यता' अबाधित ठेवली आहे. 'मोक्ष' ही सुद्धा 'ज्ञानशुन्य अवस्था नसून, ज्ञानाची पूर्णावस्था' आहे. त्यामुळे 'आत्मा ज्ञानयुक्त आहे, आणि ज्ञानाची पूर्णता अवश्य करता येते वा होवू शकते,' हा विश्वास दृढ होतो. 'ज्ञान' फक्त जाणण्याचे काम करते, म्हणून 'ज्ञानाने जे जे जाणले जाते, ते ते सर्व ज्ञेय आहे व ते माझे नाही,' असे सूक्ष्म भेदज्ञान, ह्या 'तत्त्वाच्या' सम्यग्ज्ञानाने, होण्यास मदत होते.

३) 'जीव सतत मोक्षाला गेले तरी, संसार हा कधीही रिक्त होणार नाही',

'संसारातील निरूद्यमी, आळशी, पुरुषार्थहीन' जीव, संसाराच्या रिक्त होण्याच्या,' ह्या 'वृथा भीतीला ढाल' करून, 'मोक्ष' पुरुषार्थाकडे पाठ फिरवतात. आगमात ह्या प्रश्नाचे उत्तर (ध.१४।५,८,१२६,१२८।२३३,५,७, स्या. मं.२९।१६,१३) अत्यंत मार्मिकपणे, समर्थपणे दिले आहे. ते जाणले की, 'मोक्ष पुरुषार्थाची' प्रेरणा मिळू शकते.

४) 'मोक्ष ही कोणतीही जागा वा कोणतेही स्थान नसून, जीव पर्यायाची अवस्था आहे.'

'मोक्षाला' अवस्था म्हणजेच 'पर्याय' म्हटले आहे, म्हणजेच ज्याअर्थी आज 'मोक्ष' ही पर्याय नाही, म्हणजेच त्याअर्थी 'मी बंधनात आहे', ह्याची खात्री होते. म्हणजेच 'बंध' आहे तेथेच, 'मोक्ष' आहे. फक्त ही, 'पूर्णशुद्धदशा, अनंतगुणांची सामर्थ्यता, पर्यायात प्रगट करायची' आहे. मात्र जीव 'बंधाला' सुख मानतो म्हणून, 'मोक्षाला' जावून करायचे काय? हा ही प्रश्न पडतो. म्हणूनच 'कर्माच्या अभावातच सुख आहे हे सत्य' पचतच नाही, मात्र हीच 'सत्यता' आहे. 'बंध' हा जीवाचाच 'अपराध' आहे तर, 'मोक्ष' हे 'बक्षिस' आहे.

५) ही 'सात तत्त्वे वस्तुस्थिती' आहे. त्यापैकी 'अजीव तत्त्व जाणण्यायोग्य' आहे, 'आस्रव आणि बंध' तत्त्व सोडण्यायोग्य, 'संवर-निर्जरा एकदेशप्रगट' करण्यायोग्य, 'ज्ञाताद्रष्टा जीवतत्वच आश्रययोग्य' आहे, पूर्ण प्रगट करण्यायोग्य 'उपादेय तत्त्व मोक्षच' आहे. ह्या 'जीवाच्याच अवस्था' आहे. त्या बाहेरून आत आल्या नाहीत. 'अजीवाला' आपले मानण्याची चूक, त्याबद्दल 'ममत्व, आसक्ति, त्याबद्दल कर्तृत्व, भोक्तृत्व,' ह्या विपरीत कृतीने झालेला हा, 'बंधरूप' संसार आहे. आजही ह्या अवस्थांचे 'ज्ञान जीवालाच' आहे. ह्या प्रचंड 'ज्ञानशक्तीचा व्यर्थ दुरुपयोग' झाल्यानेच, 'उपादेय' लक्ष्य गाठता आले नाही. 'ज्ञानासारखे अविनाशी धन व अनंतवीर्यरूप अनंत शक्ती' असूनही, हा 'वनवास' वाट्याला आला, ही जाणिव हे, 'मोक्षतत्त्व' करवून देते आणि सुप्त 'पुरुषार्थाला' खडबडून जागे करते.

६) अंततः 'मोक्ष' पुरुषार्थाला, 'जाणणाऱ्यांना, मानणाऱ्यांनाच' हे 'तत्त्व' प्रेरणादायी आहे.

'मोक्ष' हे अंतिम ध्येय धरले, तरच ही 'तत्त्वे पुरुषार्थवर्धक' ठरतात. श्रावकांच्या दृष्टीने 'मी' सर्व विवेचन करणार असल्यामुळे, त्याच दृष्टीने 'तत्त्वांकडे' बघितले आहे. 'निश्चयनयाने' बघितले तर, आज 'मोक्षप्राप्ती' होत नाही. 'पुनर्जन्मावर' विश्वास ठेवूनच, पुढच्या भवामधे हे 'मोक्ष' लक्ष्य वा प्रयोजन आहे, जे मला गाठायचे आहे. ह्या प्रयोजनप्राप्तीचे मार्गदर्शन, हे 'तत्त्व' वा 'मोक्षगामी त्या व्यक्ती' करणार आहेत. त्यांनी दाखवलेल्या ह्या मार्गात, त्या 'उपदेशातून' स्पष्ट होते की, 'आत्मा अरूपी, अस्पर्शी, अविनाशी, ज्ञाता-द्रष्टा मात्र' आहे, जो काहीही 'ग्रहण वा त्याग' करू शकत नाही. आत्ता वर्तमानात, 'श्रावक मर्यादा' पाळतांना, ही उन्नती 'अलिप्त, तटस्थ,' राहूनच करायची आहे, जी 'तारेवरची कसरतच' म्हणावी लागेल. काहीही होवो, 'नेटाने, प्रयत्नपूर्वक, पुरुषार्थपूर्वक' ही साधना करीत, अशा एका उंचीवर नेवून, हा 'इहलोक सोडायचा' की, ज्या टोकाला धरून, पुढच्या भवात हा प्रयत्न 'अधिक सहज' होईल. हा मार्ग 'अधिक सुंदर होवून, सहजी लक्ष्यप्राप्ती' करता येईल. 'समयासार' ह्या ग्रंथातल्या काही गाथा, सतत ह्या तत्त्वाची आठवून करवून देणाऱ्या, मार्गदर्शक ठरतील असे वाटते.

''अहमेक्को खलु सुद्धो दंसणणाणमइओ सदाऽरूवी । ण वि अत्थि मज्झ किंचि वि अण्णं परमाणुमेत्तं पि'' ।।३८।।

''अहमेक्को खलु सुद्धो णिम्ममओ णाणदंसणसमग्गो । तम्हि ठिदो तच्चित्तो सव्वे एदे खयं णेमि।।७३।।

**इ) पाप-पुण्य-भूमिका :**

जैन दर्शनात, 'तत्त्वज्ञानाचा' मुख्य भाग असणाऱ्या, 'द्रव्ये व तत्त्वे' ह्या विषयाचे विस्तृत विवेचन आढळते. त्या सात तत्त्वांपैकी 'आस्रव' ह्या तत्त्वातच, ' पुण्य-पापाचा' समावेश केला जातो. 'पुण्यपापाचा संबंध' व्यवहारात, 'नीतिमत्तेशी' जोडलेला दिसतो. त्यामुळेच आगमातही 'नवपदार्थांच्या' अतंर्गत 'पुण्य-पापाचा' विषय वर्णिला जातो. सर्वसाधारणपणे व्यवहारात 'पुण्याचे' आकर्षण जास्तच दिसते. लौकिक दृष्टीने तर, 'पुण्याला' खूपच वरचा दर्जा दिला जातो. 'आध्यात्मिक दृष्टीने' बघता, पंचमकाळात 'मोक्ष' नसल्याने, 'शुभात प्रवृत्ति' ह्यावरच भर दिला जातो. ही 'शुभप्रवृत्ति वा आचरण' म्हणजेच 'पुण्य' होय. 'पापाचा त्याग' सर्वच दर्शनांनी सांगितला तरी, ह्या दोन्ही मुद्दयाचा विचार, 'जैनांनी' कसा केला ह्याकडे दृष्टी देवू यात.

**कथनपद्धती :**

* 'पुण्य' ह्या विषयाचा विस्तार आचार्य करतात. लक्षण-भेद[४०] कथन करतांना, ''द्रव्य-भाव पुण्य, पुण्यजीवाचे लक्षण, पाप-पुण्यात अंतरंगप्रधानता, पुण्यबंध योग्य परिणाम,'' अशी दृष्टी ठेवलेली दिसते.

* 'पुण्य-पापात' पारमार्थिक समानता सांगतांना आचार्यांनी[४१], 'दोन्ही ही मोह व अज्ञानाचे अपत्यच म्हटले आहे, दोन्हींना बंध व संसाराचे कारण म्हटले आहे, कथंचित् एकत्व सांगितले, ह्या पाप-पुण्याला दु:खरूप वा दु:खाचे कारण मानले आहे. ह्या दोन्ही विषयांना म्हटले आणि त्यात अभेदता,' कथन केली आहे.

* स्याद्वादविवक्षेने, 'इष्टता-अनिष्टता-समन्वय,' कथन केला आहे. 'पाप' ह्या विषयाचा विस्तार[४२] ''निरुक्ति अर्थ, अशुभपयोग, निंदित आचरण, बंधयोग्य परिमाण, त्याचे आधार, फळ, हेयता,'' अशा अंगाने केलेला दिसतो.

**पाप-पुण्यात गर्भित पुरुषार्थ :**

आगमात अत्यंत सूक्ष्मपणे वर्णित या विषयाकडे, तितक्या सूक्ष्मतेने बघितले जात नाही.

१) ''पाप-पुण्य दोन्ही बेड्या आहेत, ज्या संसारात जीवाला बांधणाऱ्या आहेत''. सामान्यत: पाप-पुण्य दोन्ही 'कर्मे' आहेत,''

'पुद्गल' दृष्टीने दोन्ही समान आहेत. दोन्ही 'आकुलता उत्पन्न' करणारे म्हणून वाईट आहे. दोन्हींची उत्पत्ती 'मोह, अज्ञानाने', होत असून, दोन्ही 'बंध वा संसाराला' कारण आहेत. त्यामुळेच 'दु:खरूप वा दु:खाचे कारण असल्याने हेय' आहेत. ह्या कथनावर, उपदेशावर, दृढ विश्वास ठेवून, 'सम्यक्' कार्य करण्याची प्रेरणा मिळते. ह्या वर्तमानात, 'निश्चयनयाने तर मोक्ष नाही,' 'श्रेणीवर' आरोहण नाही. त्यामुळेच 'व्यवहारनयानेच उपदेश' आवश्यक ठरणार आहे. 'निश्चयनयाच्या विषयावर, मोक्षावर, कर्मनाशावर, जिनउपदेशावर,' दृढ श्रद्धा ठेवून, सतत 'सम्यक् आचरण, शुभभाव, शुभप्रवृत्ति', ठेवणे हाच 'पुरुषार्थ' आहे. हा जन्म 'मुक्तिसाठी' नसला तरी, 'मुक्तिप्राप्तीची साधना करण्यास', आणि ते आवश्यक 'पाथेय', बरोबर नेण्याच्या 'पुरुषार्थासाठी' नक्कीच आहे. ही 'मान्यता दृढ झाली, अभिप्राय सम्यक्' झाला की, 'पुण्याने प्राप्त बाह्य सामग्री, भोग', इत्यादिंकडे असणारी 'धाव, अथवा व्यर्थ आसक्ति' कमी होण्याचा, 'पुरुषार्थ', नक्कीच घडू शकतो.

♦ २) आगमात सतत उपदेश 'मोक्ष' पुरुषार्थाचाच दिला जातो. त्यासाठी वेगवेगळे मार्गही सांगतात. तसे बघितले तर, 'तत्त्वांचा' विषयही व्यवहार अपेक्षेने आहे. श्रावक दृष्टीने बघितले तर, आत्ता फक्त 'बंध-आस्रवच' चालू आहे. परंतु 'शुद्धाची, मोक्षाची, इच्छा वा लक्ष्य वा उद्दिष्ट' आहे. म्हणून तर व्यवहारात, 'शुभ वा पुण्यच' उपादेय आहे. व्यवहारात तर, 'पंचपरमेष्ठी दर्शन, पूजन व्रते,' सर्वच 'पुण्याचाच' भाग आहे, 'व्यवहार मोक्षमार्ग' आहे, 'साधन' आहे. कारण सहाव्या गुणस्थानापर्यंत 'शुभकर्मधारा व ज्ञानधारा' युगपत् असतात. ह्या प्राथमिक दशेत, प्रयत्नपूर्वक 'शुभक्रियांचाच' आश्रय घेण्याचा आग्रह आचार्य करतात. पुढच्या गुणस्थानांपासून

'ज्ञानपरिणती वा ध्यान पुरुषार्थ असला तरी, त्या 'शुद्धानुभूतिपूर्वी, स्वच्छंद, आळशी, निरुद्यमी,' न होण्यास, हा शुभप्रवृत्तीचा 'पुरुषार्थ' सांगितला आहे. 'श्रावक' म्हणून प्राप्त मर्यादा पाळतांना, 'निष्क्रियता वा शुभ क्रिया निवृत्तीचा' स्पष्ट निषेध यातून दिसतो. 'सम्यक् निवृत्तिपर्यंत', 'सम्यक्प्रवृत्तीची' उपादेयता स्पष्ट केली आहे. संसारात जगतांना 'क्रिया न करता राहणे', हे केवळ अशक्यच आहे. अशावेळी 'त्या क्रिया', फक्त कर्तव्य म्हणून, 'शरीर व वचनाने' करावयाच्या आणि 'मनाने त्यात गुंतायचे नाही', हाच 'पुरुषार्थ' ह्यातून निदर्शनास येतो. कारण या संसारात सर्वात जास्त दगा देणारे, 'पुण्यच' आहे म्हणून, 'पुण्य करूनही त्याच्या फळात न अडकणे हा पुरुषार्थ' आहे. अन्यथा 'पुण्यप्राप्त' फळातील 'मोह, आसक्ति, वा दुरुपयोग' हे भवभ्रमणासच कारण आहेत. कारण 'सातव्या नरकात जाणाराच, सिद्धालयात जाण्याच्या शक्तीने युक्त' असतो, म्हणून 'कोठे जाणे', हे 'परिणतीच्या मर्यादेने वा पाप-पुण्याच्या निवडीने' ठरते.

३) 'वास्तविक पुण्यरूप धर्म हा, व्यवहार मोक्षमार्ग आहे, म्हणून धर्म आहे, उपादेय आहे, तो गृहस्थधर्माचा आवश्यक भाग आहे'.

'पाप-पुण्याचे' विवेचन ,'गौण-मुख्य' विवक्षेनेच शक्य आहे. व्यवहारानयाशिवाय, निश्चय सिद्ध होवू शकत नाही. 'श्रावकांना' सतत 'देवपूजा, स्वाध्याय, दान, व्रत,' ह्या क्रिया आवश्यकरूपाने सांगतात. कारण त्याने 'पापांचे संक्रमण पुण्यात' होते, 'कषाय क्षीण' होतात, 'पापाचा अनुभाग' कमी होतो, 'पापाचा संवर' होतो. 'श्रावकदशेत' इतकेही घडणे, हाच 'पुरुषार्थ' महान ठरेल. 'पुण्याला वा पुण्यबंधाला' चांगले न मानणे हे उचित आहे, पण 'हेय मानून सोडणे' योग्य नाही. १० व्या गुणस्थानाच्या पुढे तर, 'पुण्याचाच' उदय असतो, म्हणून 'पुण्याला' सोडण्याचा प्रयास करण्याची गरज नाही, ते 'स्वयं' सुटते. पुण्याला सोडण्यास वा पुण्य केल्यास, 'प्रतिक्रमण' करावे लागत नाही. पंचमकाळात 'पापाची बाहुलता' असतांना, जमेल तसे, जमेल तितके 'पुण्य करणे', हाच 'पुरुषार्थ' आहे. 'पुण्यानुबंधी पुण्य' मोक्षास कारण आहे. कोणत्याही प्रकारच्या, 'फलाशारहित पुण्य,' हे बाधक नाही. 'जैन मान्यतेनुसार' प्रतिसमय 'आयुकर्म' सोडून, 'सात कर्मांचा बंध' होतच राहतो. 'चार घातिकर्मे ही पापरूपच' असतात. त्यांचे 'फळही पापरूपच' असते. चार अघातिकर्मांमधे 'पाप-पुण्य' हे भेद दिसतात. ही कर्मे १४ व्या गुणस्थानपर्यंत असतात. सर्वच 'पापप्रकृतींचा' नाश तर, 'दहाव्या गुणस्थानापूर्वीच' होतो. ह्या नाशात 'व्रते, ध्यान, चारित्रपालन, तप,' इत्यादि सहाय्यक ठरतात. पुढे सतत 'पुण्याचाच उदय, असतो. त्या 'पुण्यअनुभागाचा' नाश तर, 'सम्यग्दृष्टीही' करीत नाही, कारण त्यासाठी 'संक्लेश परिणामांची' आवश्यकता पडते आणि त्या 'परिणामांनी तर पापबंध' होतो. ह्या 'सम्यग्ज्ञानाने' अशा 'संक्लेश परिणामांना' दूर करण्याची प्रेरणा मिळते. 'पुण्याच्या फळावरून'

दृष्टी दूर होते.

♦ ४) ह्या 'पुण्य-पापाच्या' सम्यक् अभिप्रायात चुक झाल्याने, व्यर्थ, 'अतिरिक्त एकांत निश्चयवादी' असे काही लोक, 'अशुभाचा त्याग' तर करतातच, परंतु 'पुण्यालाही' सोडण्याचा सल्ला देतात, आणि 'शुद्धोपयोगाचा' उपदेश देतात. श्रावक दशेत, 'पंचमकाळात, हीन संहननधारींमधे' शक्य नसलेला हा उपदेश, भ्रमित करतो. 'व्यवहार-निश्चय' दोन्हींपासून दूर झाल्याने, 'चारित्रभ्रष्टता' येते, कारण जैनांनी वर्णित, 'मोक्षमार्ग, रत्नत्रयाच्या' एकतारूप आहे. तो फक्त 'ज्ञान व श्रद्धेने' होणार नाही. 'चारित्र' जर आवश्यक आहे तर, 'शुभक्रियाच' व्हाव्यात, हाच 'पुरुषार्थ' आहे. 'पुरुषार्थ' एवढाच आहे की, शुभक्रियांना 'हेय वा उपादेय' न मानता, 'करण्यायोग्य' मानणे होय. पाप-पुण्याचे 'सम्यग्ज्ञान, यथार्थ अभिप्राय, एकांताचा आग्रह' दूर करणारे आहे. 'अनेकांतवादी जैनांसाठी', हाच खरा 'पुरुषार्थ' ठरेल.

५) व्यवहारदृष्टीने बघितले तर, 'पाप-पुण्याचा' निकष 'व्यक्तिगत' आहे, परंतु 'सामाजिक नैतिक', कसोटीतून हा विचार केला जातो. कोणत्याही धर्माने,'निंद्य, वाईट, अशुभ क्रिया वा पापकार्याचा' निषेधच केला आहे. परंतु 'पुण्याचाही निषेध' ते करीत नाहीत. 'निवृत्तिवादी, 'मोक्ष' पुरुषार्थवादी, जैन धर्माने 'पुण्यालाही बेडी, आणि हेय' म्हणण्याचा, 'पुरुषार्थ' केला आहे. 'अनेकांवादाने' चिंतन करून, 'स्याद्वादकथन' पद्धतीने, 'पुण्याच्या हेय-उपादेयतेचा,' जैनांचा 'विचार वा समन्वय,' वा 'व्यवहार-निश्चयाचा' मेळ, हाच 'पुरुषार्थ', श्रावकांना 'शुभोपयोगाकडे' प्रवृत्त करणारा 'पुरुषार्थ' आहे.

♦ ६) 'पुण्य-पापाचे' हे विवेचन, 'नियति-पुरुषार्थाच्या' समन्वयाने उत्तम उदा. म्हणावे लागेल. पुण्यप्राप्त 'भाग्य, संपदा, धन, ऐश्वर्य, समृद्धी, बुद्धी, शक्ती, उत्तमजन्म, कुल,' ह्या सर्वांमधे 'नियतीची' प्रधानता वा श्रेष्ठता मानावीच लागेल. ह्या 'प्राप्तभाग्याने मदोन्मत्त व्हावे, हुरळून जावे वा पापाने प्राप्त दुःखाने हतबल व्हावे', हा विवेक 'पुरुषार्थाधीन' आहे. 'पुण्यप्राप्त सामग्रीच्या' मदतीने, पुनः 'पुण्यप्राप्तीचा' प्रयत्न घडतांना दिसत नाही. व्यवहारात तर, 'पुण्यप्राप्तसामग्रीने पापार्जन' होतांनाच, अधिक दिसते. तेव्हा ह्या उत्कृष्टतेच्या प्राप्तिनंतर, 'ही प्राप्ती कशी झाली असेल? मी असे काय उत्कृष्ट काम केले असणार? आता ह्याने उत्कृष्ट धर्म कसा साधायचा?' ह्या सखोल चिंतनाची प्रेरणा मिळाली तर, हाच ह्यातील 'पुरुषार्थ' ठरेल.

७) आगमात 'भोगमूलक पुण्याच्या' निषेध आहे, 'योगमूलक' नाही. सम्यग्दर्शनसहित, सम्यग्ज्ञानसहित 'पुण्य मोक्षमार्गात इष्ट' मानला आहे. 'पुण्याच्या इच्छेने पुण्य, वा पापानुबंधी पुण्य', न करण्याची प्रेरणा ह्यातून मिळते. पुण्याची 'इच्छा वा कामना' बंधास कारण आहे. पुण्य ज्ञेयमात्र'आहे हे 'भान', हाच 'पुरुषार्थ' आहे. त्यासाठीच आगमात 'निदानांचे' उल्लेख आढळतात. हे निदान 'निष्काम कर्म' करण्याची प्रेरणाच देणारे आहे. ह्या 'राग-द्वेष-मोहाला-मिथ्यात्वाला,'

संसारात 'बंधाचे मुख्य कारण' म्हटले, त्याच कारणांना 'पुण्य-पापातही' सोडणे महत्त्वाचे आहे.

## ३) त्रैलोक्य विचार : प्रस्तावना :

भारतीय दर्शनांनी, 'मोक्ष, कर्म, पुनर्जन्म, जगत्,' अशा अनेक 'विषयांचा विचार वा अभ्यास', सर्वांनी आपआपल्या दृष्टीने केला वा मांडला आहे. आधुनिक विज्ञानही ह्या विषयाला दुर्लक्षित करू शकला नाही. प्रत्येकाच्या 'शोधपद्धती' भिन्न असल्याने, त्याबद्दलच्या मान्यताही भिन्न दिसतात. ह्या भिन्नतेतही, काही बाबतीत समानताही आढळते. 'वैदिक व जैन' भूगोलात बऱ्याच विवेचनात समानता आढळते. मात्र वर्तमान 'भूगोल व जैन भूगोल,' ह्यांचा मेळ बसत नाही.

जैन मान्यतेनुसार 'विश्व अनादि-अनंत-स्वयंकृत' आहे. त्याला कोणी बनवणारा नाही. त्या 'अनंत आकाशाद्रव्याच्या' मधोमध हा, 'अनादि-अकृत्रिम, षट्द्रव्यांनी युक्त, पुरुषाकार,' असा भाग म्हणजे 'लोकाकाश' आहे.

'त्रैलोक्यविचार' हा 'जैन तत्त्वज्ञानातला' महत्त्वाचा भाग आहे. 'ईश्वर' तत्त्व न स्वीकारण्यात 'त्रैलोक्याची अनादिता,' हे ही एक कारण आहे. 'कर्मबद्ध जीवाचा' प्रवास, 'ज्या ज्या मार्गाने वा ज्या ज्या ठिकाणी होतो', त्याचे 'सम्यक्ज्ञान' हे, 'सम्यक् पुरुषार्थाला' प्रेरक ठरणारे असल्यानेच, ह्या 'सदवस्तुमीमांसेत' त्याचा विचार आवश्यक ठरला आहे.

ह्या विस्तृत मुद्द्याच्या, विस्तृत विवेचनात न जाता, त्याचा ढोबळ आढावा मांडला आहे. ह्या विषयाचा विस्तार, 'जंबुद्वीप-प्रज्ञप्ति, त्रिलोकप्रज्ञप्ति' इत्यादि ग्रंथाचा विषय आहे. अर्थातच हा स्वतंत्र अभ्यासाचा भाग आहे तरी, त्याच्या सूक्ष्म अध्ययन-चिंतन-मननातून स्पष्ट झालेला 'पुरुषार्थ' मांडत आहे.

**विषयकथन :**

हा विस्तार आगमात करतांना आचार्यांनी, 'लक्षण[४३], आकार[४४], विस्तार[४५], वातवलय[४६], तीनलोक[४७], जंबुद्वीप[४८], मेरूपर्वत[४९], अन्यद्वीप[५०] व समुद्र', असा विस्तार केला आहे. त्यातील महत्त्वाच्या गोष्टी येथे अधोरेखित केल्या आहेत.

१) जीवाने केलेल्या 'पापपुण्याने फळरूप प्राप्त, सुख-दुःख हे, ज्या ठिकाणी आढळतात त्याला 'लोक' म्हणतात.'

२) हा 'लोकाकाश' पाय पसरून, कमरेवर हात ठेवून उभ्या असणाऱ्या 'पुरुषाप्रमाणे' आहे.

३) ह्या 'लोकाकाशाची' जाडी सर्वत्र 'सात राजू' असून, मध्यभागी तो एक राजू आहे. 'मध्यलोकापासून' वर वाढत जावून,'ब्रह्मस्वर्गापर्यंत' पाच राजू असून, पुढे कमी कमी होत, 'लोकाकाशाच्या अग्रभागी' एक राजूप्रमाण आहे. त्याचे घनफळ३४३ राजू आहे.

४) 'अधोलोकात' सात 'पृथ्वींमधे, 'नारकीयांचे आवास' आहेत. ह्या 'पृथ्वी' एकाखाली एक आहेत.

५) 'मध्यलोकाच्या' मध्यभागी, 'एक लाख योजन' प्रमाण 'मेरूपर्यंत' आहे. त्याला वेढून 'असंख्यात द्वीप व समुद्र' आहेत.

६) 'उर्ध्वलोकात' एकावरएक 'देवांचे विमान' आहेत. 'सौधर्म ते अच्युत' पर्यंत हे, विमान 'युगलरूप' आहेत. त्यावर 'तीन पटलात तीन', असे 'नव ग्रैवेयक' असून, त्यावर एकाच पटलात 'नऊअनुदिश' विमान आहेत. त्यावर 'पंच पंचोत्तर' विमाने असून, वर 'सिद्धशीला' आहे.

७) लोकाशाच्या चारही बाजूला, 'घनोदधि, घनवात आणि तनुवात,' अशी तीन वात वलये आहोत. शेवटचे 'तनुवात वलय आकाशाच्या' आधाराने स्थित आहे.

८) 'लोकाकाशाच्या' मध्यभागी, एक राजूप्रमाण 'त्रसनाडी' आहे. 'त्रसजीव ह्या त्रसनाडीच्या' बाहेर जावू शकत नाहीत. त्याबाहेर 'सर्वत्र स्थावर जीव' व्याप्त आहेत.

९) 'मेरूपर्वताला' वेढून प्रथम, एक लाख योजनप्रमाण 'जंबूद्वीप' आहे. त्यानंतर 'दुप्पट-दुप्पट विस्तार' असणारे, 'समुद्र व द्वीप' अशी रचना आहे. 'पुष्करवर द्वीपाच्या' मध्यातून जाणाऱ्या 'मानुषोत्तर पर्वतामुळे,' त्यापलीकडे मनुष्यलोक नाही. 'मनुष्यलोक' मात्र, 'अडीच द्वीपातच' मर्यादित आहे. त्यात असणाऱ्या 'क्षेत्र व पर्वतांपैकी' फक्त, १५ कर्मभूमीतून, 'मोक्ष पुरुषार्थाचा पुरुषार्थ' घडू शकतो.

**पुरुषार्थ प्रेरणा :**

१) 'त्रैलोक्यविचार' हा विषय म्हणजे 'वैश्विक सत्य' आहे. जैनांनी त्याला 'अनादि' मानले, हे 'जैनांचे खास वैशिष्टय' आहे. ह्या 'अनादि' मान्यतेने, सहा द्रव्यांची 'अनादिता' अनायासच सिद्ध होते. त्याने नकळतच 'पुरुषार्थाला' बळ मिळते.

♦ २) ह्या 'विश्वाचा' हा अफाट 'पसारा व गूढता,' सूक्ष्म चिंतनाला उद्युक्त करणारी आहे. 'ह्या विशाल जगताच्या, एकराजू मात्र मध्यलोकात, अडीच द्वीपप्रमाण मनुष्यलोकात, एका आर्यखंडातल्या, एका छोट्याशा देशातल्या, एका छोट्याशा शहरातले, आपले नगण्य अस्तित्व, अहंकार व अभिमानाची धुंदी,' कमी करण्यास सहाय्यक ठरते.

३) निसर्गाची 'अद्‌भुतता, स्वयंचलितता, जितकी आकर्षक' आहे, तितकीच ती 'भयावह' आहे. त्याला जाणले तर, आपल्याला 'पुण्याने' प्राप्त नाशवंत वस्तूंमुळे असणारे, व्यर्थ 'मद, उन्मत्तता,' नष्ट करण्याची प्रेरणा मिळते. कदाचित् 'नम्रता, विनयता' येण्यास मदत होते.

♦ ४) 'त्रैलोक्याचे' यथार्थ ज्ञान, 'व्यर्थ अभिमान, व्यर्थ दीनता' नष्ट करण्यास प्रेरणादायी ठरते.

त्याचप्रमाणे हे यथार्थ ज्ञान, ज्या ‘केवलज्ञानाने’ झाले, त्या ‘अनंतज्ञानाकडेही’ लक्ष वेधते. हा विश्वाचा पसारा कितीही, ‘अफाट, अचाट, अद्भुत, भयावह,’ असला तरी, त्याला जाणण्याची शक्ती ‘माझ्याच’ केवल ज्ञानात आहे. ‘स्व’ ज्ञानाच्या ‘अनंततेची जाण व हे सम्यक भान’, ह्या ‘अमूल्य, अनंत ज्ञानधनाच्या’, पूर्णतेच्या प्राप्तीच्या ‘पुरुषार्थाकडे’ नेणारे आहे. आपल्यालाच ‘अनंततेच्या दिव्यत्वाची’, ही प्रचितीच ‘पुरुषार्थ’ आहे.

## २) कर्मसिद्धांत : मुख्य व उपभेद आणि दशकरण वर्णन :

सैद्धांतिक दृष्टीने ‘कर्मसिद्धांत’ हा, ‘जैनतत्त्वज्ञानाच्या’ अग्रभागी आहे. ‘नवतत्त्वे’ म्हणजे त्या ‘कर्मसिद्धांताचा’ संक्षिप्त ‘आराखडा वा इतिहास’ आहे. जैन दर्शनाने ‘मोक्ष’ हे अंतिम लक्ष्य मानले. त्या ‘मोक्षाची’ सुरुवात ‘स्वरूप बोधाने’ होते तर, त्याची पूर्णता ‘स्वरूप उपलब्धीने’ होते. ह्या मार्गात ‘कर्मांचे, संस्कारांचे’ बंधन आहे. हे बंधन नक्कीच तोडता येते, परंतु त्यासाठी, ‘कर्मांचे संस्कार आत्म्याशी कसे जोडले जातात, त्याचा परिणाम कसा होतो?’ ह्याचे विस्तृत विवेचन, ‘करणानुयोगात’ खूपच सूक्ष्मतेने मांडले आहे. कर्मे बांधण्याची, ‘तीव्रता, मंदता, त्याचे प्रदेश, स्थिति, त्यांचा क्रमिक क्षय, त्यासाठीच्या उपायपद्धती, क्षपणाविधि, उत्कर्षण, संक्रमण’. ह्या सर्व मुद्‌द्यांचे समग्रविवेचन, ‘कर्मसिद्धांताच्या’ तिसऱ्या प्रकरणात, ‘प्रबंधात’ केले आहे. त्या ‘साधक-बाधक’ विचारातून, स्पष्ट झालेला ‘पुरुषार्थ’, त्या प्रकरणात स्पष्ट केला आहे.

## ३) आचारविवेचन : श्रावकाचार आणि प्रतिमावर्णन :

‘जैन दर्शन’ हे, सर्व विषयांचा विचार करणारे ‘दर्शन’ आहे. ह्या ‘जैन दर्शनाच्या अंतरंगात’ जाण्याचे अनेक मार्ग आहेत. त्या सर्वांपैकी, हा सुद्धा एक महत्त्वाचा ‘मार्ग वा विषय’ आहे. ‘आचाराचा’ भाग हा, ‘चारित्राशी’ जोडलेला आहे. ह्या ‘आचाराचे’ विस्तृत वर्णन हा ‘चरणानुयोगाचा’ विषय आहे.

‘प्रबंधाच्या’ विषयविस्तारात, ‘पुरुषार्थाच्या प्राप्तीचे (आराधनेचे) उपाय,’ ह्या प्रकरणात, ‘श्रावकव्रतांच्या’ अंतर्गत ह्या, विषयाचा विचार केला गेला आहे.

## ४) अनेकांतवाद

**भूमिका :** भारतीय परंपरेत,' प्रवृत्तिप्रधान व निवृत्तिप्रधान', अशा दोन 'स्पष्ट व भिन्न विचारधारा' आढळतात. जैन दर्शन हे 'निवृत्तिप्रधानता' व 'मोक्ष पुरुषार्थाचा' पुरस्कार करणारे आहे. प्रत्येक दर्शनाने,' विशिष्ट तत्त्व-प्रणाली स्वीकारली आहे. त्याचप्रमाणे 'जैनांनी' ही, काही 'विशिष्ट तत्त्वे' प्रतिपादित केली आहेत. ह्या दर्शनाची 'प्राचिनता', हे निर्विवाद सत्य आहे. 'जैन दर्शनाने' स्वीकारलेली, 'अहिंसा, अपरिग्रह, निर्जरा, जीव स्वतंत्रता, पुद्‌गल, धर्म-अधर्म द्रव्ये,' ही विशिष्ट तत्त्वे 'जैनांचे वेगळेपण' स्पष्ट करतात. ह्या वैशिष्ट्यांसह 'अनेकांतवादाचे' अमूल्य तत्त्व, ही 'जैनांनी' भारतीय परंपरेला दिलेली देणगीच आहे.

आध्यात्मप्रांतात 'अनेकांताला' विशेषच प्राधान्य आहे. जैन सिद्धांताचा 'अनेकांतवाद' हा 'निधयननाने बलवान' आहे. 'अनेकांतपूर्वक कथनच' सत्य आहे, कारण प्रत्येक 'वस्तू अनेक धर्मात्मक' असते. त्या 'अनंतधर्मांचा' विचार करणे, त्यांचे 'गौण-मुख्य' रूपाने चिंतन करणे, हा 'अनेकांतवाद' आहे. 'अनेकांतवादाने' चिंतित वस्तूंचे, 'विवक्षारूपाने' कथन करणे, ही तर 'जैनांची खास शैली' आहे. अशा ह्या 'सुंदर, प्रभावी, परिपूर्ण,' तत्त्वाची देणगी देवून, 'जैनांनी मानवजातीवर उपकारच' केले आहेत.

**विषयक्रम :**

'अनेकांतासारख्या' महत्त्वाच्या विषयाचे विस्तृत विवेचन आगमात आढळते. महावीरांनीतर, ह्या 'अनेकांतावर' विशेषच भर दिला. आचार्यांनी अनेकांताचे वर्णन, 'लक्षण[५१]-भेद, वैशिष्ट्य[५२], कारण-प्रयोजन[५३], विरुद्धधर्माचे अस्तित्व[५४], विरोधातला अविरोध[५५],' अशा विविध अंगाने, समग्रपणे केलेले आढळते. त्याची थोडक्यात रूपरेषा येथे दिली आहे.

१) 'एकाच वस्तूत असणाऱ्या, परस्पर विरुद्ध शक्तींचे प्रकाशित होणे, म्हणजे अनेकांत होय, ज्याचे सम्यक्-मिथ्या भेद आहेत'.

२) 'अनेकांत' म्हणजे संशयवाद वा कपट वा एकांतवाद नाही'.

३) 'अनंत धर्मात्मक वस्तूतील, सर्व धर्म वा स्वभाव वा गुणाचा विचार करून, मुख्य-गौण विवक्षेने कथन असल्याने, वस्तूची सिद्धी होते'.

४) 'अनेकांताने चिंतित वस्तूची सिद्धी, 'स्यात्' शब्दाने होते. त्याने विरोधास जागाच उरत नाही'.

५) 'अनेकांत हा अनेक नयांचा समूह आहे म्हणून, तोही अनेकांतात्मक आहे'.

६) 'वस्तूमध्ये अनेक धर्म युगपत् असतात. वस्तू सदैव प्रतिपक्षासह असते'.

७) 'इतरांच्या प्रश्नांच्या समाधानासाठी, व्यवहार व्यवस्थित चालण्यासाठी, सप्तभंगीच्या मदतीने,

अनेकांतवादाचे प्रतिपादन, हे महत्त्वाचे ठरते. असा अनेकांतवादी सम्यग्दृष्टी म्हणवला जातो'.

'अनेकांतासारख्या' महत्त्वाच्या विषयाचा ऊहापोह, 'अनेकांत-स्याद्वाद' असा एकत्रितपणे करूनच त्याची पूर्णता होते. ह्या विस्तृत विवेचनाचा, स्थूल आराखडा येथे मांडला आहे तरी, ह्या विषयाच्या समग्र अभ्यासाने, प्रतिबिंबित झालेला 'पुरुषार्थ' येथे स्पष्ट केला आहे.

**अनेकांतातील गर्भित पुरुषार्थ :**

१) 'वस्तूतील अनेक धर्मांचे कथन, विवक्षेनुसार करण्याचे श्रेय अनेकांतवादाला जाते कारण अनेकांत परस्परविरोधी धर्मांना प्रकाशित करणारे आहे'.

ह्या विधानाने हे नक्की होते की, वस्तूत 'एकाच वेळी अनेक धर्म' असतात, 'विधि-निषेध, नित्य-अनित्य,' इत्यादींनी ती वस्तू बनते. त्यामुळे 'श्रेष्ठ-कनिष्ठ, इष्ट-अनिष्ट,' हा भेद वस्तूत नाही. वस्तूंच्या विषयी असणारा हा भाव, ही 'व्यक्तिगत मान्यता वा अभिप्रायांवर' अवलंबून आहे. त्यामुळे व्यवहारात उगाचाच येणारी 'हीनता, दीनता, श्रेष्ठता, इष्टनिष्टता,' नष्ट होण्यास बळ मिळते.

२) 'अनेकांताचे मुख्य-गौण कथन, स्याद्वादाने केले जाते',

'अनेकांताची' विचार पद्धती व कथनपद्धती, 'सम्यक्' प्रकारे कळली की, 'संशयाला' जागा राहत नाही. 'सारासार विचार करण्याची क्षमता, पक्षपातरहितता, उत्कृष्ट व अचूक निर्णय क्षमता,' इत्यादि 'गुण' ह्या ज्ञानाने, नक्कीच वाढण्यास मदत होते. ह्या 'मुख्य-गौण विवक्षेने कोणत्याही पक्षाचा अभाव केला जात नाही वा सर्वथा 'एकालाच प्राधान्य' दिले जात नाही. प्रसंगानुरूप 'मुख्य-गौणाचा' स्वीकार, वस्तूच्या 'ध्रुवत्वाला' अधिकच पुष्ट करणारे आहे. वस्तूतील 'विविध गुणांची', सिद्धीही होते. हाच खऱ्या अर्थाने, 'जैनांचा सर्वधर्मसमभाव' म्हणता येईल.

३) 'द्रव्याचे सत् हे लक्षण, उत्पाद-व्यय-ध्रौव्यात्मक आहे'.

'अनेकांतवादाचा' सिद्धांत हा, 'द्रव्यांची' सिद्धी स्पष्ट करणारा आहे. 'स्व' चतुष्टयासह 'पर' चतुष्टयाचीही 'सत्' शक्ती पटते. त्यामुळेच 'लोकाकाश, द्रव्य, त्यांचे कार्य, उपकार, स्वरूप,' ह्या सगळ्यांच्याच 'अस्तित्वावर' आणि 'सत्यतेवर', शिक्कामोर्तबच, ह्या 'अनेकांताच्या सिद्धांताने' अनायासच होते. 'द्रव्याच्या आणि तत्त्वांच्या' खऱ्या स्वरूपाला जाणून, कोणत्या द्रव्याला 'हीन, वा व्यर्थ वा अनिष्ट' न समजल्याने, 'स्व' द्रव्यप्राप्तीच्या 'सम्यक् पुरुषार्थाची' वाटचाल सुरू होते.

४) 'द्रव्यातील सहा सामान्य गुणांपैकी 'वस्तुत्व गुणाने,' द्रव्यात 'अर्थक्रियाकारित्व' होते'.

वस्तू वा द्रव्याची 'स्व' शक्ती, त्याच्या 'क्रिया करण्यात समर्थ' आहेत. ह्या 'शक्तींची

जाण', ह्या अनेकांताने होते. 'व्यवहार वा संसार' अपेक्षेने, आज 'मुख्य विवक्षेने', कर्मांची श्रेष्ठता आहे. व्यवहारनयाने 'पराधीनता, हीनता, दीनता' दिसत असली तरी, 'निश्चयअपेक्षेने, मोक्षदृष्टीने,' गौणताच आहे. शिवाय ती ''प्रयोजनाभूत क्रिया वा ते स्व परिणमन वा ते अर्थक्रियाकारित्व करण्यासाठी, मला कोणाच्याही आश्रयाची गरज नाही, ते सामर्थ्य माझ्यात आहे, व ते प्रगट करण्यात पुरुषार्थाचीच श्रेष्ठता आहे'', हा दृढ विश्वास उत्पन्न होतो. त्यावरून 'वस्तुत्व' गुणाची सिद्धी 'अनेकांताने' व 'अनेकांताची' श्रेष्ठता, 'वस्तुत्व गुणाने'अधिकच प्रकाशित होते.

♦ ५) 'अनेकांतवादाच्या' सिद्धांताचे 'सम्यक्ज्ञान,' द्रव्यांकडे बघण्याची दृष्टी बदलण्यास उपयुक्त ठरते.'

'पुद्गलाचा' एक शुद्ध परमाणु हा, एका समयात १४ राजू गमन करतो. पुद्गलाचा 'दोन, तीन, संख्यात, असंख्यात , अनंत,' परमाणुंचा स्कंध बनला की, तो 'अशुद्ध' होतो, ज्याचे 'दृश्य रूप हा संसार' आहे. संसारात 'द्वंद्व' बरोबर चालतात, सततविरुद्ध धर्म बरोबर चालतात आणि 'द्वंद्व' ह्या शब्दच 'तुल्यबळता' सूचित करतो. वस्तूच्या 'सर्व धर्मांच्याकडे बघणारी' ही, 'अनेकांत दृष्टी, 'बंधावरची नजर मोक्षाकडे' नेण्यास मदत करते. 'ज्ञानाच्या अपूर्णतेकडून, केवलज्ञानाची पूर्णता' दर्शविते. 'आंशिक सुखाकडून पूर्ण सुखाकडे' जाण्याचा मार्ग प्रशस्त करते. थोडक्यात 'अनेकांत' हे, 'आत्मस्वातत्र्याचे' बळ देणारे आहे. त्या स्वातंत्र्याच्या अभिव्यक्तीच्या 'पुरुषार्थाची' प्रेरणा देणारे आहे.

६) 'निश्चयनयाच्या' विचारानंतर 'व्यवहारनयाने' सुद्धा, 'अनेकांतवाद' सर्वच समस्यांवरचे, 'रामबाण उपायच' आहे. 'सामंजस्य, एकता, प्रेम, प्रस्थापित करण्यास,' ह्या सारखी उत्कृष्ट 'उपाय पद्धती' असू शकत नाही. दुसऱ्यांच्या 'मनाची, विचारांची, अस्तित्वाची' दखल घेवून, त्यांचे महत्त्व 'अनेकांतवाद' स्पष्ट करते. सांसारिक भांडणात कारण ठरणाऱ्या, 'मी-माझे-मला' ह्या बेड्या तोडून, 'दृष्टीची व्यापकता' अनेकांताने येते. संसारात आवश्यक अशी,' ऐकण्याची क्षमता, व स्वीकारण्याची पात्रता' ह्या अनेकांतवादाने येते. आगमात कथित 'माध्यस्थभावो विपरीतवृत्तो' आणि 'मित्ति मे सव्व भूएसु' ह्या विधानांचे,' महत्त्व व सत्यता' अधिकच स्पष्ट होते.

♦ ७) वर्तमानात जगात सर्वत्र चिंतेचे विषय असणारे, 'आतंकवाद, चंगळवाद, ऐहिकवाद, पलायनवाद आणि भ्रष्टाचार, व्याभिचार, हिंसाचार पर्यावरण समस्या,' ह्या सर्वांवर 'अनेकांतवाद' हे प्रभावी, 'उत्तर वा उपाय' ठरू शकते.

'सत्यवादीपणा, न्यायीपणा, पक्षपातरहितपणा,' अशा 'नैतिक मूल्यांचा पाया अनेकांत' आहे. जैनांनी ''जातिवाद, वर्णभेदाला महत्त्व का दिले नाही? ईश्वरसत्ता न स्वीकारता, प्रत्येक

आत्म्यालाच ईश्वरत्व का बहाल केले? कर्म सिद्धांताला अग्रभागी का ठेवले? अहिंसेचे बिगुल का वाजवले? द्रव्य-क्षेत्र-काल-भावाला महत्त्व का दिले''? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे 'अनेकांतवादाच्या' सूक्ष्म अध्ययनाने सहजी मिळू शकते. शेवटी हे नक्की की, 'अनेकांताचे बीज पुरुषार्थ आहे तर, पुरुषार्थाचा आधार अनेकांत आहे'.

# ५) मन

**प्रस्तावना**

भारतीय परंपरेतील, सर्व दर्शनांनी सतत काही 'सत्यांचा' पाठपुरावा केला. त्यात 'मन' हा ही एक विषय आहे. 'मनाचे अस्तित्व व महत्त्व' सर्वांनीच स्वीकारलेले दिसते. 'योगशास्त्राचे प्रणेता पतंजलींनी', मनाला 'चित्त' म्हटले, तर, 'गीतेत' मनाला 'अंत:करण' नावाने संबोधले आहे. प्रत्येकाने आपआपल्या परीने, 'मनाला उलगडण्याचा' प्रयत्न केला. 'जैन दर्शनातही, मनाचा विचार' अनेक दृष्टीने, 'विविध विवक्षांनी' केला गेला आहे. जैन मतानुसार 'मन' हे, 'पुद्‌गल असून, ते स्कंधात्मक' आहे. ते एक सूक्ष्म 'अभ्यंतर इंद्रिय' असल्याने, त्याला 'अनिंद्रिय' म्हटले आहे. 'अष्टदलरूपी कमळाच्या' आकाराचे द्रव्यमन, पौद्‌गालिक असून, भावमन 'लब्धि व उपयोगात्मक' (ज्ञानात्मक) आहे. 'मनाने' सर्व इंद्रियविषयांना ग्रहण केले जावू शकते. 'मनाचा' विचार अनेक दृष्टीने सविस्तरपणे वर्णन केला गेला आहे.

आधुनिक 'मानसशास्त्र' हे खूपच व्यापक शास्त्र आहे. 'Psychology' ह्या शब्दाचा अर्थ 'आत्मज्ञान वा मनोविज्ञान' असा केला जातो. वर्तमानात ह्यालाच 'मनाचे शास्त्र' असे संबोधले जाते. ह्यात 'मानसिक वृत्तींचे अध्ययन' अनेक प्रकारांनी केले जाते. आधुनिक 'मनोविज्ञानात, प्रायोगिक मनोविज्ञान' वाढलेले दिसते. ह्यात,' बुंट, टिचनर, जेम्स, फ्राइड, देकार्त, ह्यूम,' अशा अनेक वैज्ञानिकांनी, महत्त्वाचे कार्य केलेले आज जगापुढे आहे. त्यात काहींनी 'मन व शरीरात' संबंध मानला व 'संवेदन, भावना, अंतर्निरीक्षणाचे' महत्त्व मानले. ह्यात 'अवचेतन' मनाचेही अत्यंत महत्त्व स्पष्ट केलेले दिसते. त्या 'अवचेतन मनाच्या शक्तींच्या' सहाय्याने, 'शरीर त्याचे कार्य, भाव आवेग,' इत्यादीवर 'नियंत्रण, संयम' आणण्याचे कौशल्य शिकवले जावू लागले. ह्यात 'संवेगांना' अधिक महत्त्व दिलेले दिसते.

अशा ह्या गहन विषयाचे गहरे चिंतन, जैनांनी विस्ताराने केले. त्या विषयाच्या चिंतनात्मक निष्कर्षातून स्पष्ट होणारा 'पुरुषार्थ' येथे मांडला आहे.

**विषयविस्तार :**

'जैन दर्शनात' कोणत्याही विषयाचे चिंतन हे, 'द्रव्य-भाव, व्यवहार-निश्चय,' अशा दृष्टीने सांगोपांग केले जाते. मनाचा विचार, 'ज्ञान, योग, संज्ञी, गुप्ति, वर्गणा, विनय, प्राण, संयम, पर्याप्ति, इंद्रियविषय, पुद्‌गलउपकार,' इत्यादि सर्व विषयांमधे केला गेला आहे. त्याचबरोबर 'कषाय, अध्यवसाय, लेश्या,' अशा अंगाने सुद्धा, मनाचा विचार करणे आवश्यक आहे.

* 'आगमात मनाचे वर्णन करतांना[५६], मनाला 'अनिंद्रिय' म्हटले आहे. नाना प्रकारच्या विकल्पांना 'मन' म्हटले आहे'.

* मनाच्या दोन भेदांपैकी[५७],'द्रव्यमन पुदगलविपाकी अंगोपांग नामकर्माच्या उदयाने मानले आहे'. तर भावमन, 'वीर्यांतराय व नोइंद्रियावरण' कर्माच्या क्षयोपशाने प्राप्त, 'आत्माची विशुद्धी' म्हटले आहे.

* मनाच्या वैशिष्टयात[५८], 'गुण-दोष विचार, त्याचे विषय, निमित्त हेतू, सिद्धी,' इत्यादि विस्तार केला आहे.

**१) ज्ञान व मन**[५९] : 'जैन दर्शनात' पाच ज्ञानांना 'सम्यक्' म्हटले आहे. त्यापैकी 'मतिज्ञान' होण्यात, 'इंद्रिय व अनिंद्रिय' निमित्त मानले आहेत. 'श्रुत' म्हणजे आगम असून, ह्याला 'मनाचा विषय' म्हटले आहे. 'द्रव्यश्रुताला' मनाचा विषय म्हटले आहे.'मन:पर्यय' ज्ञानामध्ये, 'दुसऱ्यांच्या मनातील सरळ व वक्र विचारांना व रूपी द्रव्याला' जाणले जाते. 'मनाच्या पर्यायांना' जाणणारेच 'मन:पर्यय' ज्ञान आहे.

**२) योग व मन**[६०] :- आचार्यांनी,'मन, वचन, कायेने युक्त जीवाच्या वीर्यपरिणामाला वा प्रदेश परिस्पंदनाला योग म्हटले आहे'. मनाच्या अपेक्षेने, योग 'शुभ-अशुभ' भेदरूप म्हटला आहे. 'मन-वचन-कायेच्या' भेदाने, 'दंड' तीन प्रकारचा सांगितला आहे. त्यातही 'राग-द्वेष, मोह,' ह्या भेदाने, 'मानसिक दंडही' तीन प्रकारचा वर्णिला आहे.

**३) संज्ञीत्व-मन**[६१]:- आगमानुसार, जो जीव ''कोणतेही कार्य करण्यापूर्वी, हेय-उपादेय, तत्त्व-अतत्त्व, इत्यादींचा विचार करतो, जे योग्य तेच शिकतो वा ग्रहण करतो, त्याला 'संज्ञी'' म्हटले आहे. 'नोइंद्रियावरण कर्माच्या क्षयोपशाने,' प्राप्त ज्ञानाला 'संज्ञा' म्हणतात व ते ज्ञान ज्याला आहे त्याला 'संज्ञी' म्हणतात. संज्ञी म्हणजे 'मनसहित' जीव होय.

**४) गुप्ति व मन**[६२]-आचार्य म्हणतात की, 'मन-वचन-काय, ह्या तीन योगांचा 'सम्यक्' प्रकारे निग्रह करणे, म्हणजे 'गुप्ति' होय. व्हहारनयाने ह्या 'तीन योगांच्या', अशुभ प्रवृत्तींना रोकणे, हीच 'गुप्ति' होय. 'रागद्वेषांपासून मनाला परावृत्त' करणे 'मनोगुप्ति' आहे. व्यवहारनयाने कलुषता, अशुभभावांचा परिहार 'गुप्ति' ठरते.

**५) वर्गणा व मन**[६३] :- वर्गांच्या समूहाला 'वर्गणा' म्हटले आहे. वर्गणांचे २३ भेद आहेत. त्यापैकी जीवाद्वारे फक्त, 'आहार, तैजस, भाषा, मनो, कार्मण,' ह्या वर्गणाच ग्रहण केल्या जातात.

**६) विनय व मन**[६४]:-मोक्षमार्गात 'विनयाचे' प्रधान स्थान आहे. 'व्यवहारनयाने रत्नत्रयाला धारण करणाऱ्याविषयी नम्रता धारण करणे विनय' आहे. त्यात 'मन-वचन-काय' हे तीन भेद असून, त्याचेही 'प्रत्यक्ष-परोक्ष' भेद आहेत. 'विकथा' इत्यादि ऐकणे वा ज्याने, 'सम्क्त्वाच्या क्रियांची' विराधना होईल, अशा 'परिणामांचा त्याग' करणे, 'धर्मात, ज्ञानात परिणाम होणे', हा 'मानसिक विनय' म्हणवला जातो.

**७) प्राण व मन**[६५]:- संसारात 'जीव' ज्या द्वारा जगतो त्याला 'प्राण' म्हणतात. त्यात 'पाच इंद्रिय, मन-वचन-काय-आयु व श्वासोच्छावास', हे दहा -'व्यवहार प्राण' आहेत.

**८) पर्याप्ति व मन**[६६]:- 'इंद्रिय इत्यादिरूप शक्तींच्या पूर्णतेला 'पर्याप्ति' म्णतात'. आगमात ह्या पर्याप्ति, 'आहार, शरीर, इंद्रिय, श्वासोच्छवास, भाषा, मन', अशा प्रकारे सहा भेदरूप सांगितल्या आहेत. 'द्रव्यमनाच्या' आलंबनाने प्राप्त अर्थाचे, 'स्मरण' करण्याची जी शक्ती, ती 'मनोपर्याप्ति' होय. 'मनोवर्गणारूप' पुदगलस्कंधांना, 'अंगोपांग नामकर्माच्या' उदयाने, 'द्रव्यमनरूप परिणमविण्याची' शक्ती प्राप्त होणे, आणि त्या शक्तीने 'नोइंद्रियावरण व वीर्यांतराय' कर्मांच्या क्षयोपशाने, 'गुणदोष विचार, भूतकाळाचे स्मरण,' इत्यादिरूप 'भावमनाची शक्ती' प्राप्त होणे, ह्याला 'मन:पर्याप्ति' म्हणतात.

**९) पुद्गलउपकार व मन**[६७]:- जैन तत्त्व-ज्ञानातील 'पुद्गल', हे महत्त्वाचे 'द्रव्य' व 'तत्त्व' आहे. 'पुद्गल' हे 'स्पर्श-रस-गंध-वर्ण युक्त' असून मूर्त आहे. प्रत्येक द्रव्य एकमेकांवर उपकार करतात. 'पुद्गलाचे' जीवावर जे उपकार आहेत, त्यात 'शरीर-वचन-मन व श्वासोच्छवास,' हे सांगितले आहेत.

**१०) संयम व मन**[६८]:- मोक्षमार्गात 'संयमाचे' महत्त्व आहे. त्यात 'सम्यक् प्रकारे नियंत्रण' हे महत्त्वाचे ठरते. हे व्यवहार संयम 'व्रत-समिति' इत्यादिरूप असून, निश्चय संयम 'विशुद्ध आत्मध्यान' म्हटले जाते. व्यवहार संयमात 'प्राणि व इंद्रिय संयमाचे' विधान आहे. त्यात 'पाच रस, पाच वर्ण, दोन गंध, आठ स्पर्श, सात स्वर,' हे सर्व 'मनाचे विषय' म्हटले आहेत आणि त्यांचा निरोध 'इंद्रियसंयम' होय.

**११) कषाय व मन**[६९]:- जैन दर्शनातील 'कषाय' हा एक 'पारिभाषिक' शब्द आहे. 'कर्मबंधात, आस्रवात' कषायांचे महत्त्व असल्याने, त्याला विशेषच महत्त्व दिले आहे. जीवाला संसारात अडकवून ठेवणारा, 'स्थितिबंध' आणि फळ भोगायला लावणारा 'अनुभागबंध' हा, 'कषायांच्या' निमित्ताने असल्याने, 'कषायांचा' सूक्ष्मविचार केला गेला आहे.

आगमात हे वर्णन, 'लक्षण, भेद, कषाय-अकषाय-नोकषाय,' अशा विस्ताराने केले आहे. त्याचा ढोबळ आढावा, काही मुद्दे देवून स्पष्ट केला आहे. (तक्ता क्र. १)

१. ''आत्म्याच्या स्वाभाविक रूपाला कलुषित करणारे, आत्मस्वरूपाची हिंसा करणारे परिणाम 'कषाय' म्हणवले जातात''.

२. ''कषायांचे मुख्य चार भेद असून, कषाय-नोकषाय ह्या भेदरूपानेही, अन्य प्रभेद वर्णिले आहेत''.

३. ''कषाय हे जीवाचे गुण नसून, विकार आहेत''.

४. ''कषायांच्या अनंतानुबंधी इत्यादि 'अवस्थांच्या शक्ती', विविध दृष्टांताने स्पष्ट केल्या जातात. ह्या प्रत्येक 'कषायांचा रंग, दशा, अवस्था, तीव्रता, मंदता,' ह्यांचे वर्णन सुंदर उदाहरणे, दृष्टांत' देवून सांगितले जातात. हे दृष्टांत त्या कषायांची स्थिति दर्शवितात''.

५. ''कषायांचा उदकाळ 'अंतर्मुहुर्त' सांगितला आहे. कषायांची तीव्रता-मंदता, 'लेश्येशी' संबंधित आहे. कषायांचा अंतर्भाव 'रागद्वेषात' केला जातो''.

६. ''गति अपेक्षेने, नरकगतीत क्रोध, देवगतीत लोभ, तिर्यंचगतीत माया व मनुष्यगतीत मान कषायांची प्रधानता सांगितली जाते''.

७. ''गुणस्थान अपेक्षेने, एक ते नवम गुणस्थानपर्यंत, 'क्रोध-मान-माया', दहाव्यागुणस्थानात 'लोभ', कषाय असतात. ११व्या पुढचे गुणस्थान 'कषायरहित' आहेत''.

## १२) लेश्या व मन[७०]

जैन दर्शनातील 'लेश्या' हाही एक 'पारिभाषिक' शब्द आहे. 'कषायांशी लेश्या' संबंधित असल्याने, त्याचे वर्णन विस्ताराने केले जाते. आगमातील हे वर्णन, 'लक्षण, भेद, स्वरूप, तरतमता, स्वामी,' इत्यादि अंगाने केले गेले आहे. त्याचा आढावा काही मुद्यांद्वारा घेतला आहे.

१. ''कषायानुरंजित आत्मपरिणाम म्हणजे 'लेश्या' होय. आत्मा व कर्मांचा संबंध ज्याने होतो, त्याला 'लेश्या' म्हणतात''.

२. ''लेश्येचे 'द्रव्य-भाव' असे भेद सांगितले जातात. 'द्रव्यलेश्या' ही शरीरनामकर्म उदयाने उत्पन्न हाते. 'भावलेश्या' म्हणजे कषायअनुरंजित मन-वचन-कायेची प्रवृत्ती होय''.

'भावलेश्येचे कृष्ण' इत्यादि सहा उपभेद सांगितले आहेत.

३. ''लेश्या ही,'योग व कषायांहून' भिन्न आहे. 'द्रव्यलेश्या' ही आयुकाळपर्यंत चालते. 'भावलेश्या' मात्र अंतर्मुहूर्तात बदलत असते''.

४. ''प्रतिक्षण कर्मांचा 'आस्रव' होतच असतो, व तो 'आस्रव तीन योगांमुळे' होतो. योगामुळे 'कर्म वर्गणा' आकर्षित होतात. त्यानुसार 'आत्मपरिणाम' बनतात, त्याला 'लेश्या' म्हणतात''. 'योग एक शरीर प्रवृत्ती' आहे.' योग व लेश्या', ह्यात गहन संबंध असला तरी, दोन्ही भिन्न आहेत. कारण 'योग' स्थूल असून, 'लेश्या' सूक्ष्म आहेत. 'लेश्या' 'आत्म्याचा विशिष्ट परिणाम' आहे तर, 'योग' वीर्यान्तरायच्या 'क्षय व क्षयोपशमजनित' आहे. 'लेश्येची' प्रशस्तता व अप्रशस्तता ही, 'मनाच्या परिणामांवर' अवलंबून असते. 'कषाय व योगाने', व्यक्तीचे 'आभामंडळ' बनते. त्याचा परिणाम 'व्यक्तीच्या विचार व चारित्रावर' होवू शकतो. 'भावांप्रमाणे' त्याचा 'रंग बदलतो. ते रंग 'मनुष्य स्वभावातील प्रवृत्तींचे' सूचक असतात. 'हे रंग म्हणजे, सूक्ष्म

शरीरापासून निघणारे भावात्मक किरण असतात,' ज्याने सूक्ष्म शरीराभोवती 'आभामंडळ' बनते त्यालाच 'लेश्या' म्हणतात. 'लेश्येचे' हे वर्णन 'गुणस्थान, मार्गणानुसार' केले गेले आहे. सहा 'भावलेश्यांचे' हे अत्यंत रंजक वर्णन, 'व्यक्तित्वाचा वा मनुष्यांच्या विविध स्वभावांचा' आरसाच म्हणता येईल.(ध.१ पृ.३८६, ३८७ ध. ७ पृ.१०४)

**१३) अध्यवसाय व मन :-** (स.सा. २७१, २६६) ग्रंथात, 'बुद्धी, मति, विज्ञान, चित्त, भाव परिणाम, अध्यवसाय,' ह्यांना समानार्थी म्हटले आहे. ''ज्ञेय पदार्थांचा विचार करतांना, जीव विकल्प करतो आणि 'शुद्धस्वरूपाला' विसरतो. त्या ज्ञेयांमधे 'स्वामीत्व' बुद्धी होते म्हणून, ती प्रवृत्ती 'मिथ्या वा अध्यवसाय वा अभिनिवेश' मानली जाते व बंधात निमित्त ठरते''.

**सारांश :-** 'कषाय, लेश्या व अध्यवसाय, चित्त,' हे एक दुसऱ्यांसह जोडलेले आहेत. 'कषायांच्या शक्ती' विविधरूपाने दिसतात म्हणून, 'कषाय म्हणजे आत्म्याच्या आवेगात्मक अनुभूतीच' आहेत. ह्या कषायांना 'अध्यवसाय वा लेश्या' म्हटले जावू शकते. 'कषायांच्या तीव्रता व मंदतेवर,' अध्यवसायाची 'शुद्धता-अशुद्धता' अवलंबून असते. मनोविज्ञानाने सांगितलेले 'अचेतन मन' संस्कारांनी भरलेले असते, त्यामुळे 'अध्यवसाय' प्रभावित होतात. त्याने 'मनही' प्रभावित होते. त्यामुळे 'अध्यवसायाच्या शुद्धतेवर,' जीवनाची यथार्थ शुद्धता ठरते. 'गुणस्थानाचा सिद्धांत,' ह्या सिद्धांतावरच आधारित आहे. ह्या 'विशुद्धतेवर, सातव्या नरकात सम्यक्त्वाची प्राप्ती, जाति स्मरण, अवधि ज्ञान, मन:पर्ययज्ञान, केवलज्ञान उपलब्धी,' अवलंबून असते. 'अध्यवसायांची प्रशस्तता व शुभलेश्याची प्रकर्षता' यांनी, 'क्षायोपशमिक व क्षायिक' व्यक्तित्वाचा विकास होतो.

**पुरुषार्थ प्रेरणा:**

१) जैन दर्शनात, 'मनोविज्ञान हे जैन कर्मसिद्धांताचे,' एक महत्वपूर्ण अंग म्हणता येईल.

'जैनांनी' केलेल्या सर्व विषयांच्या विवेचनात, 'मनाचा' विचारही केला आहे. अधिक सखोल चिंतन केले तर, मनाचा विषय, 'आस्रव व मोहनीय कर्मांशी' जोडला जातो. ह्या सर्व चिंतनात, 'राग-द्वेष, मोह' हे महत्त्वाचे ठरतात. 'कर्मांचे संस्कार आत्म्यासह कसे जुळतात? दूषित प्रवृत्तींचा मनावर काय परिणाम होतो'? ह्या गोष्टींकडे लक्ष जाते. सद्य परिस्थितीत जाणवणारे 'ताण-तणाव, मानसिक विकार,' ह्यांचे कारण, 'मन वा मोह' ठरतात. त्यावर उपाय म्हणून, 'जैनांनी सर्व विषयांच्या अनुषंगाने केलेल्या मनाच्या', विषयाचे सखोल अध्ययन, हे प्रभावी ठरू शकते.

२) ''योगद्वारे होणाऱ्या आस्रवात, 'तीव्र-मंद' इत्यादि भावांनी तरतमता येते''.

(त.सू.६/६,८) 'भाव-भावना ह्या मनाशी' निगडित असतात. 'द्रव्यलेश्या' पूर्ण आयुष्यभर

एकच असली तरी,'भावलेश्या' अंतर्मुहूतमात्र असतात. 'लेश्येचा हा बदल, मन-भाव-भावना' ठरवतात. 'योग-कषाय-लेश्या-अध्यवसाय,' ह्या सूक्ष्मसूक्ष्म अवस्था आहेत, ज्यावर 'आभा-मंडळ' अवलंबून असते. ''योगाने आस्रव-,कषायाने त्यात तरतमता-, त्यानुसार कार्मणशरीर, तसे संस्कार-, तसे अध्यवसाय-,तसे मन-,त्यानुसार भाव-,''तशा लेश्या,'' ह्या कड्या, वा श्रृंखला, एकात एक बद्ध आहेत. ह्या सर्व विषयांचे, नीट सखोल अध्ययन, अनेक 'गूढ सत्यांना' उजागर करणारे आहे. त्यासाठी आगमात दिलेले, 'तप-स्वाध्याय-ध्यान, व्रते अनुप्रेक्षाचिंतन, परिषहजय', हे 'मनाला जिंकण्याचे उपाय' आहेत. ह्या 'उपायांनी निग्रहित मन' हे, 'शरीर व आत्म्यावरील,' दोषांसाठी प्रभावी औषधीच ठरेल. ही उपाय पद्धती, 'व्यक्तित्वविकास व आध्यात्मिक उत्क्रांतीला' दिलेली प्रेरणाच आहे.

३) ''आगमात वर्णित कषायांच्या अवस्थांनुसार होणाऱ्या शक्तींची, मूल्यमापनाची उदाहरणे, दृष्टांत आणि मापदंड खूपच बोलके आहेत''.

त्याचे सूक्ष्म 'अध्ययन-चिंतन', आपल्या 'कषायांचा-स्वभावांचा' आरसाच ठरेल. हे मूल्यमापन, 'व्यवहारात व आध्यात्मात,' 'आपण कोठे आहोत आणि आपली पात्रता काय', ह्याची जाण करून देण्यास उपयुक्त ठरू शकते. ह्या जाणिवेने, थोडे जरी 'आत्मपरीक्षण' झाले तरी, तो 'श्रावकदृष्टीने' मोठा 'पुरुषार्थच' आहे कारण, 'आत्मा-मन-इंद्रियार्थ-ज्ञान' असा क्रम आहे.

४) ''मतिज्ञान होण्यात मन निमित्त आहे. द्रव्यश्रुताचा आधार मन आहे. मन:पर्यय ज्ञान मनाच्यापर्यायांना जाणते''.

♦ मतिज्ञानात 'मन' हे कारण आहे. श्रुत-अभ्यास 'मनाशिवाय' शक्य नाही. इंद्रियांनी जाणलेल्या विषयांना, 'सम्यक् अभिप्राय वा मान्यतेने,'' न जाणल्यास, ते 'ज्ञान मिथ्या' ठरते. कर्मप्राप्त ही 'मनाची शक्ती,' खऱ्या 'शास्त्रवाचनाकडे' लावणे, हा 'पुरुषार्थ' आहे. 'मन:पर्यय ज्ञान विशेष ऋद्धी, ध्यान व क्षयोपशमाने' प्राप्त होते. मात्र ह्या उत्कृष्ट ज्ञानानेही, जाणले मात्र 'रूपी द्रव्य व मनाच्या अवस्थांनाच' जाते. ह्याच 'ज्ञानात', 'इतिश्री' मानणारा, 'केवलज्ञानप्राप्तीचा' उद्यम करू शकत नाही. 'मन' खूपच शक्तिशाली, नक्कीच आहे, तरी त्याचे 'महत्त्व, स्थान, जागा, अस्तित्व आत्म्यामुळे' आहे. 'मन', ह्या 'पर्याय मर्यादेत बद्ध' आहे, मात्र 'आत्मा' अनादिनिधन आहे. व्यवहारात 'आत्म्याच्या अनंत शक्तींचे प्रगटीकरण मनानेच' होते. मनानेच 'आत्म्याला' जाणलेही जाते तरी, हे ''क्षयोपशमजन्य, पुद्गलनिर्मित, कर्मादयप्राप्त मन, व्यवहारात, इतके प्रबळ ठरते तर, त्यापेक्षा त्या मनाला , त्याच्या अवस्थांना, सर्व विश्वाला जाणणारा, मी किती शक्तिशाली'' आहे, हा विश्वास 'आध्यात्मिक उत्क्रांतीचा पुरुषार्थ' ठरवणारा व घडवणारा आहे.

५)'योग तीन प्रकारचा आहे, जो आस्रवच आहे.' (त.सू.घ.१,२)

'योगाने आस्रव' होतो व ते तीन प्रकारचे आहे. 'आस्रव थांबण्यासाठी' ह्या तीनवर निर्बंध आवश्यक आहे. 'शरीर-वचनावर' नियंत्रण तसे सोपे असले तरी, 'मनावर नियंत्रण' फारच कठीण आहे. 'संवराच्या उपायपद्धतींचा' अभ्यास हा, 'मन जिंकण्यासाठीचा पुरुषार्थच' आहे.

६) ''मनाची प्राप्ती व मनसहित जीव संज्ञी म्हणवला जातो''

मनाने 'गुणदोषांचा, योग्य-अयोग्य, हेय-उपादेय, कल्याण-अकल्याण,' ह्यांचे ज्ञान होते. त्यामुळेच 'संज्ञीत्व'ला मोक्षमार्गात वरचे स्थान दिले आहे. ह्या संज्ञीत्वाची, 'दुर्लभता व महत्व' जाणून, त्या प्राप्त योग्यतेचा वापर, 'सम्यक् पुरुषार्थात'' करणे, हा जीवधीन भाग आहे.

७) 'आस्रवांचे येणे थांबविण्यासाठी 'गुप्ति' हा उपाय आहे''

'गुप्तीच्या' तीन भेदांचे 'गोपन', हे 'संवरात' उपयुक्त ठरते. 'अनिंद्रिय मनाला' पकडणे सोपे नाही तर, त्यामुळेच त्या 'मनाला गुंतवणे' हाच उपाय शक्य आहे. सतत 'मनाला योग्य खाद्य' देणे आणि 'योग्य जागी गुंतवणे', हाच 'पुरुषार्थ' आहे कारण, त्यासाठी प्रचंड 'जागरूकता, सावधानता' आवश्यक आहे. पुनश्च एकदा ह्यातून, 'द्रव्य-क्षेत्र-काल भाव' त्याचे महत्त्व व त्यानुसार कर्मोदय, ह्याला पुष्टीच मिळते.

८) ''पुद्गलाच्या २३ वर्गणांपैकी जीव फक्त पाचवर्गणा ग्रहण करतो.''

ह्या पाच वर्गणांपैकी 'मनोवर्गणा' एक आहे. ह्यापासून 'द्रव्यमनाची' निर्मिती होते. 'भावमन ही आत्मविशुद्धी' आहे. 'भावनांचा जन्म' ह्यातून होतो, ज्या 'भवनाशिनी' मानल्या जातात. 'सुंदरभावनांसाठी सुंदरमन' हवे, त्यासाठी तशा 'सुंदरवर्गणा' हव्यात आणि त्या वर्गणांसाठी, पुन्हा तसे 'उदात्त विचार-परिणाम' हवेत. आणि त्यासाठी 'जागरूकतापूर्वक चिंतनाचा पुरुषार्थ' हवा.

♦ जैन दर्शनाप्रमाणे 'अस्तित्व' गुणाने, 'सर्व द्रव्य सदैव' असणारच. 'द्रव्यत्व' गुणाने 'परिणमन' चालू आहे. 'उत्पाद-व्यय फक्त पर्यायांचे' होते. ह्या नियमाप्रमाणे, जीवाने केलेल्या ह्या 'उदात्त भावना' ही, नष्ट होत नाहीत. त्या 'जितक्या तीव्रतेच्या असतील, तितक्याच शीघ्रतेने' त्या फळरूप होतील, हे नक्की ठरते. फक्त त्यासाठी 'मला काय हवे,' हा निर्णय पक्का, व दृढ हवा.उत्कृष्ट 'भावनांचे भावन' हाच 'पुरुषार्थ' आहे, श्रावकदृष्टीने जो जास्त महत्त्वाचा वाटतो.

९) ''दहा प्राणांनी जीव जगतो, त्यात तीन बलांपैकी, एक मनोबल प्राण आहे. त्याचबरोबर सहा पर्याप्तींमधे एक 'मनोपर्याप्ति' आहे.''

व्यवहाराने जीव 'प्राणधारी' असला तरी, निश्चयाने 'चैतन्यप्राणधारी' आहे. 'दशप्राणप्राप्ती वा सहापर्याप्तींची' पूर्णता 'पुण्याचा' भाग आहे ज्यात 'नियतीची' श्रेष्ठता ठरते. मात्र ह्या

'बलप्राण', 'पर्याप्ति' प्राप्तीचा उपयोग, 'आत्मोन्नतीसाठी' करणे हा, 'श्रावकांचा' श्रेष्ठ 'पुरुषार्थ' ठरेल. अन्यथा व्यवहारात 'बलांचा' दुरुपयोग, हाच जास्त होतो.

♦ १०)''पुद्गलांचे जीवावर जे अनेक उपकार आहेत, त्यात 'मन' हा ही एक उपकार आहे''.

व्यवहारात, 'मनाच्या चंचलतेने, अधीनता' जास्त दिसते. 'मनाच्या इशाऱ्यावर' कार्य होतांना दिसतात. ते 'मन' पुद्गल आहे, हे कळल्यावर, त्याच्यावर 'आधीन किती व्हावे वा त्यावर विजय कसा मिळवावा,' हा निर्णय 'पुरुषार्थाधीन आहे. 'मन' हा विषय, अभ्यास करण्यास गूढ आहे तसा, त्याचा थांगपत्ता लावणे वा त्याच्या 'अंतरंगात' जाणेही, तितकेच 'अवघड, गूढ, अगम्य' आहे. प्रत्येक विषयवर्णनात, 'मनांचा अंतर्भाव करूनच, त्याचे महत्त्व स्पष्ट केले आहे. कारण 'आकर्षण, इष्ट-अनिष्टता, प्रिय-अप्रियता,' हे सर्व 'मनाने' ठरते. 'व्रत-तप-ध्यान-संयम-गुप्ति वा अन्य कोणतेही विषय असो,' त्यात आवश्यक 'निग्रह, दृढता, धैर्य, धृती, ही 'मनानेच' येते. 'मोक्ष' पुरुषार्थाच्या उद्यमात आवश्यक, 'पर्याप्तींची पूर्णता, दशप्राणप्राप्ती, संज्ञीत्व, ज्ञान, विवेक, हेय-उपादेयता,' ह्या विषयांमधील 'मनाचे स्थान आणि महत्त्व' अनन्यसाधारण आहे म्हणूनच थोडक्यात, मनाच्या सहाय्यानेच, ''मनाला, मनाने, मनापासून जिंकण्याचा, निग्रहाचा, दमनाचा, संयमाचा हा 'पुरुषार्थ'' शक्य आहे. थोडक्यात 'पुरुषार्थाचे' मूळच 'मन' आहे, अशा मतावर शिक्कामोर्तब होते. 'प्रखर, प्रबळ, निग्रहित, मजबूत' मनाशिवाय, 'शरीराने वा वाणीने' पुरुषार्थ शक्य नाही.

आधुनिक 'मानस शास्त्रात' ही, 'मनाचा' विचार प्रकर्षाने दिसतो. ह्या 'मनाच्या शक्तींना' जाणल्यानेच आज, 'ध्यान, योग, अनेक हीलिंग पद्धती (उपचारपद्धती)' विकसित झालेल्या दिसतात. ह्यात 'मनाच्या उपचाराने, शरीराचा इलाज' केला जातो. शरीराच्या ऑराच्या (आभामंडळ) फोटोवरून, भविष्यात होणाऱ्या रोगांचा शोधही आता घेता येतो.

ह्या सर्व पद्धतींपेक्षा, 'स्वानुभूतीवर आधारित' हे, 'जैनदर्शन व त्याचे तत्त्वज्ञान' अधिक विज्ञाननिष्ठ वाटते हे नक्की आहे.

११) जैनांनी मनाचा विचार, 'कषाय, लेश्या, योग' इत्यादि अनेक विषयात केला. पाच ज्ञानापैकी 'मन:पर्यय ज्ञान तर, मनाच्याच पर्यायांना' जाणते. 'द्रव्य-भावमन' रूपाने मनाचा सूक्ष्म विचार केला, असे असतांना जैन 'मानसशास्त्रावरचा विकासमात्र' झाला नाही, वा त्यावर सुंदर ग्रंथनिर्मिती झाली नाही, त्याची खंत मात्र बाकी राहते.

# ६) १) साहित्य
# २) कला

**प्रस्तावना**

**अ) साहित्य :-** जैन दर्शनाने ज्याप्रमाणे , 'तत्त्व, द्रव्य, जगत्, कर्म, खगोल, भूगोल, आचार', इत्यादिंचा विचार केला, त्याचप्रमाणे 'कला, शिल्प, साहित्य', हे विषयही, 'जैनांच्या परिसस्पर्शापासून' वंचित राहीले नाहीत. भारतीय संस्कृतीच्या निर्माणात, 'वैदिक, जैन, बौद्ध', परंपरेचे महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. 'इतिहास, तत्त्वज्ञान, साहित्य, कला', ह्या चार स्तंभांवर, ही 'संस्कृतीही' बहरली, आणि 'जैनदर्शनही' विकसित झाले. किंबहुना ह्या विषयांमधे, त्यांनी आपला कसा वेगळाच ठसा उमटविला, त्याकडे लक्ष वेधणार आहे.

**विषयविस्तार :**

१) जैन दर्शनात 'साहित्याचे' वेगळेच महत्त्व व स्थान आहे. जैनाचार्यांनी जेवढ्या 'भारतीय भाषांमधे' आपल्या साहित्यरचना केल्यात, तेवढ्या अन्य कोणत्याही परंपरेने केल्या नाहीत. उपलब्ध 'जैन साहित्यात' सर्वांत प्राचीन, 'अर्धमागधी' भाषेचे साहित्य आहेत. अशी मान्यता दिसते. श्वेतांबर परंपरेत-मान्य ४५, वा ३२ आगम, ह्या भाषेत आहेत. मात्र अभ्यासकांनी, ह्या 'अर्धमागधीला प्राचीन दर्जा' न देता, 'आचारांग, सूत्रकृतांगांचा प्रथम श्रुतस्कंध, भगवतीची काही शतके आणि उत्तरअध्ययनातील काही अध्ययनांनाच', प्राचीन मानले आहे.

२) 'महावीरानंतर' सुमारे ३०० वर्षानंतर जैन संघात, 'दिगंबर, श्वेतांबर', दोन पंथ स्पष्ट होवू लागले. 'दिगंबरांनी' आपल्या लेखनासाठी वेगळ्या भाषेचा प्रयोग केला. इ.स प्रथम शतकात, 'आ. धरसेनांच्या' मार्गदर्शनात, आ. 'पुष्पदंत आणि आ.भूतबलींनी', 'षट्खंडागम' ह्या पूर्णतः 'तात्त्विक व सैद्धांतिक' ग्रंथाची रचना, 'शौरसेनी' भाषेत केली. 'भगवती आराधना, कषाय प्राभृत, त्रिलोकप्रज्ञप्ति, कार्तिकेयानुप्रेक्षा, कुंदकुंदांचे साहित्य', हे शौरसेनीतील प्रमुख ग्रंथ आहेत. षट्खंडागमावरच्या 'धवला' टीका रचल्यात आणि ११व्या शतकातील 'द्रव्यसंग्रह' रचला गेला.

३) 'चौथ्या शतकात श्वेतांबर' आचार्यांनी 'महाराष्ट्री' प्राकृतात, विपुल ग्रंथरचना केल्यात. 'आ. भद्रबाहुंनी' आगमांवर 'निर्युक्ति' लिहिल्यात तर, जिनदासगणींनी 'चूर्णी' लिहिल्यात. 'वसुदेवहिंडी, पउमचरित्र, हरिभद्रांचे योगबिंदु' इत्यादि, 'हेमचंद्रांचे योगशास्त्र', असे मौलिक ग्रंथ रचले गेलेत. १२व्या, १३व्या शतकापर्यंत ह्या भाषेत, अनेक 'काव्य, चरितग्रंथ, कथाकोष' रचलेत.

४) ह्या चौथ्या शतकात, 'दिगंबर आचार्यांनी' भाषिक दृष्टया क्रांतीच आणली. 'आ.उमास्वामींनी' संस्कृतात 'तत्त्वार्थसूत्र' ग्रंथाची रचना करून, वेगळेच वळण दिले. 'दार्शनिक युगातल्या' ह्या आवश्यक परिवर्तनाला साहित्यात आणून, त्यातून 'आगमांचा सार', आपल्या 'अद्वितीय बुद्धी,

प्रतिभा-सामर्थ्याने, सूत्रबद्ध करून,' नवा इतिहास रचला. त्यावर अनेक विस्तृत टीका ग्रंथ रचले गेलेत.

५) भारतीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात 'न्याययुग म्हणजेच तर्कयुगाचा' आरंभ झाला. 'वैदिक, बौद्ध, विद्वान', आपले मत, 'तार्किक पद्धतीने, खंडन-मंडन' शैलीत करू लागले. त्यामुळे जैन आचार्यही, आपल्या 'तार्किक प्रतिभेसह', ह्या क्षेत्रात उतरलेत. 'अनेकांतवाद, नयवाद, स्याद्वादाच्या' आधारावर, 'जैन तत्त्वज्ञानाचे' सर्व रंग अधिकच उजागर होवू लागलेत.'आ. पूज्यपाद, अकलंक, विद्यानंदी', अशा प्रखर दिगंबर आचार्यांनी प्रभावशाली शैलीत, धाराप्रवाही रूपात आपले ग्रंथ संस्कृतात रचलेत. १० ते १५ शतकापर्यंत, अनेक उत्तम 'खंडकाव्य, पुराणे, चंपूकाव्य, चरित' इत्यादि रचना झाल्यात. आ. हेमचंद्रांनी संस्कृतसह, 'प्राकृत व्याकरण, देशी' शब्दांचा कोश बनविला.

६) नवव्या, दहाव्या शतकात, 'दिगंबरीय आचार्यांच्या' लेखनप्रवृत्तीत, पुन्हा नवा बदल घडला. त्या काळात 'बोली भाषा' म्हणून प्रसिद्ध अशा, 'अपभ्रंश भाषेकडे', दिगंबर आचार्यांचे लक्ष आकृष्ट झाले. 'स्वयंभदेवांनी' अपभ्रंशात 'पउमचरित्र' रचले. त्यानंतर 'महापुराण, करकंडचरित्र, जसहचरित्र', अशा चरित रचना झाल्यात. दिगंबर आचार्यांचे 'प्रथमानुयोग, कथानुयोग', झालेत. 'सावयधम्मदोहा, पाहुडदोहा', असे दोहे रचले गेलेत. 'दिगंबर श्रावक' स्वाध्यायाच्या माध्यमाने धर्माकडे वळलेत.

७) १५व्या, १६व्या शतकात आजच्या बोलीभाषा वाढू लागल्यात. 'मराठी, हिंदी, गुजराथी, राजस्थानी', अशा सर्व भाषांचा जन्म अपभ्रंशातून झाला. १७व्या, १८व्या शतकातल्या 'जैन साहित्यिकांनी,' ह्या भाषेत रचना केल्यात.

८) षट्द्रव्यांपैकी 'जीव' द्रव्याचे सैद्धांतिक वर्णन ग्रंथातून आढळते. जीवाचे 'अनंतत्त्व, स्वतंत्र अस्तित्त्व', यांचे महत्त्व असल्याने, सविस्तर, सांगोपांग वर्णन आढळते. 'जैन आयुर्वेद' ग्रंथातील पाचव्या, सातव्या शतकातल्या, 'पूज्यपाद, समंतभद्र' ह्या आचार्यांद्वारा रचित, 'सिद्धांत रसायनकल्प, पुष्पायुर्वेद, निदानमुक्तावली, नाडीपरीक्षा', अशा ग्रंथांचा उल्लेख करता येईल. नीतिशास्त्र म्हणून 'चरणानुयागाचा' विकास झालेला दिसतो.

अशाप्रकारे सर्व भाषांमधून दर्शन,' सिद्धांत आचार, महाकाव्य, व्याकरण, न्याय, ध्यान, योग,' इत्यादि विषयांवर लिखाण करून, जैन परंपरेने 'भारतीय वाङ्मयाला' जेवढे समृद्ध केले, तेवढे अन्य कोणत्याही परंपरेने केले नाही.

**साहित्यिक पुरुषार्थ :**

१) इ.स. पूर्वी पासूनचा हा 'साहित्यिक इतिहास' अक्षरशः मंत्रमुग्ध करणारा आहे. त्या काळात

♦ आजच्या सारख्या ‘आधुनिक तंत्रज्ञानाच्या सुविधा वा साधने’, ह्यांची रेलचेल नव्हती. ‘कशीबशी प्राप्त ताडपत्री, यथातथा लेखणी, मिणमिणता दिवा’, ही कारणेही त्यांना, त्या ‘उत्कृष्ट पुरुषार्थापासून’ दूर करू शकली नाहीत, हाच श्रेष्ठ ‘पुरुषार्थ’ आहे.

२) त्या आचार्यांचे ‘भाषा प्रभुत्व, लिखाणशैली’, ही थक्क करणारी आहे. ‘धवला’ टीकांसारख्या हजारो गाथांने रचित शास्त्र बघून, श्रद्धेने नतमस्तक व्हावे वाटते. प्रचंड ग्रंथ रचनांसाठी त्यांनी वाहिलेले, ‘आयुष्य, त्याविषयीचे समर्पण, त्याग’, हा त्यांचा ‘पुरुषार्थ’, आम्हालाही ‘पुरुषार्थाची प्रेरणा’ देणारेच आहेत.

♦ ३) त्या आचार्यांचे हे, ‘साहित्यिक योगदान’ ही उत्कृष्ट निर्मितीच आहे. कोणतीही निर्मिती ही ‘पुरुषार्थनेच’ होते. ही उत्तम ग्रंथसंपदा, ‘श्रावक-साधू’ ह्यांच्या, ‘नैतिक, आध्यात्मिक, उन्नतीच्या तळमळी’ शिवाय बनणे शक्य नाही. त्यामागची ही प्रेरणाच, ह्या ‘पुरुषार्थाचा’ आधार आहे. ही जबाबदारी पार पाडतांना फक्त, ‘वैराग्यउन्मुखता उपयोगी नव्हती. मूळ सिद्धांताला धक्का न लावता, अत्यंत जागरूकपणे, काळानुसार, प्रदेशानुसार, भाषांचा’ आधार घेवून, केलेली ‘भाषिक परिवर्तने,’ हाच जैनांचा प्रचंड मोठा ‘साहित्यिक पुरुषार्थ’ आहे. व्यवहारनयाने ‘परहिंद च कादव्वं’ साधतांनाही, निश्चयनयाश्रित ‘आदहिंद व कादव्वं’ जराही मलीन होवू न देता, ‘समाजाप्रती, साधर्मीविषयीची बांधिलकीही’, समर्थपणे पूर्ण करण्याचा, सक्षम ‘पुरुषार्थ’ केला. ‘परिवर्तनांचा सहर्ष स्वीकार’ करून, कृतीने ‘प्रत्येक द्रव्य परिणमशील आहे’ ह्या तत्त्वाला सिद्ध केले.

४) सामान्य श्रावकांना समजेल अशा, ‘बोलीभाषेचा’ वापर हा तर, ‘पुरुषार्थ’ दाद देण्यासारखाच आहे. सामान्य लोकांना असणारी, ‘धर्मपालनाची, तत्त्वज्ञानाची भीती, त्यांच्या ज्ञानाचा क्षयोपशम’ हे लक्षात घेवून, त्यांची ‘धर्मरुचि कमी होवू नये’ म्हणून, ‘आख्याने, कथा, रूपके, काव्ये अलंकार, संवाद,’ अशा शैलीने सामान्यांना ‘धर्माकडे आकृष्ट’ केले. अंतरंगातील ‘वैराग्य’ अबाधित ठेवून, ‘सौंदयदृष्टीचा’ साहित्यात वापर करून, त्यात भरलेले रंग, हा ‘पुरुषार्थ’ नक्कीच नजरेत भरणारा आहे.

♦ ५) प्रत्येक रचनेतून, ‘केलेला उपदेश, कल्याणभावना, परहित दृष्टी, अनुकंपा, करुणा’, ओतप्रोत प्रवाहित होतांना दिसते. ‘महापुरुषांच्या जीवनचारित्रातून,’ अप्रत्यक्षपणे ‘पुरुषार्थाची प्रेरणा’ दिली. ‘साधूंना’ ही, साहित्य रचनेची प्रेरणा, ‘श्रावकांकडून’ मिळाली. आणि अफाट ‘शब्दसंग्रह, गाढभाषा ज्ञान, गहनतत्त्वज्ञान, उत्कृष्ट शैलीतून’, मूर्तिमंत असा हा, ‘साहित्यिक पुरुषार्थ’ अजरामर झाला. ‘समाज व धर्माच्या’ रथाच्या, ‘साधू व श्रावक’ ह्या दोन धुरा आहेत. ह्या दोन्हींच्या एकत्रित, ‘असामान्य, अद्वितीय, अजरामर, स्वैररचनारूप हा प्रवास, ‘पुरुषार्थाचा प्रकर्ष’ म्हणावा लागेल. ‘निवृत्तिवादी’ जैनांच्या ‘पुरुषार्थाने तत्त्वज्ञानाला’ तर शिखरावर पोहचवलेच

आणि 'सम्यक् प्रवृत्तीतून' 'साहित्यिक पुरुषार्थ' ही, जगासमोर जीवंत झाला.

**२) कला– प्रस्तावना :**

'जैन दर्शनाने' प्रत्येक विषयाचा विचार समग्रपणे केला. 'तत्त्वज्ञान असो वा आचार वा अन्य कोणता ही विषय असो', त्याच्या विवेचनाला सुरुवात केली की, त्याचा तळच गाठायचा, 'सर्वांगसुदंरतेने' तो विषय सूक्ष्मपणे मांडायचा, हे 'जैनांचे खास वैशिष्टय' आहे. ह्या वैशिष्ट्यपूर्ण विवेचनापासून, 'कलाविषयही' वंचित राहू शकला नाही. सर्वसाधारपणे 'जैन हे निषेधात्मक कथनांवर भर देतात', असा भ्रम समाजात दिसतो. 'सत्य' मात्र हे नाही. 'अनेकांतवादी', जैन दर्शनाने, जीवनाच्या सर्वच पक्षांचा विचार केला. एकीकडे 'आत्म्याला परमात्मा' बनण्याचे स्वातंत्र्य देवून, 'वैयक्तिक उत्कर्षाचा' चरमआदर्श ठेवला तर, दुसरीकडे 'व्रत, तप इत्यादिंबरोबरच कला, शिल्प' इत्यादिरूपाने 'प्रवृत्तिपक्षही' सांभाळला. गृहस्थांच्या 'प्रवृत्तिवादात उन्नतीसह, सामाजिक, धार्मिक', बांधिलकीलाही स्थान दिले. ह्या 'प्रवृत्तिरूप पुरुषार्थाचा' बिगुल 'ऋषभदेवांनीच' वाजविला. त्यांनी 'भोगभूमीच्या समाप्तिनंतर, कर्मभूमीचा प्रारंभ षटकर्मांच्या शिक्षणाने' केला. 'शिल्प' कला शिकवून, 'कला पुरुषार्थाचा' श्रीगणेश, 'ऋषभांनी' केला. कर्मभूमीतील 'सम्यक् कृतीरूप करणे', किती व कसे महत्त्वाचे आहे,' हे कृतीतून सांगितले. 'समाज, देश, धर्म, साधर्मीबंधूंविषयीची' बांधिलकी कशी पूर्ण करावी? हे 'स्व' पुरुषार्थाने सांगितले. जैन समाजावरील 'निवृत्तिवादी, अरसिकता, अतित्यागाचा', असणारा शिक्का त्याने पुसला गेला. अशा 'आदर्श गुरुच्या आदर्श, पुरुषार्थाला' डोळ्यासमोर ठेवून, त्यांच्या अनुयायांनी, त्यांच्या पदचिह्नांवर चालत, अशा 'उत्तम कलाकृती' निर्माण करून आदर्श ठेवला.

♦ आरंभी नमूद केल्याप्रमाणे, माझ्या प्रबंधाचा उद्देशच मूळात, 'तत्त्व व सर्व विषय', यातील 'पुरुषार्थ' नजरेत आणणे हा आहे. त्यात 'कला, शिल्प' हा तर, साक्षात् जिताजागता 'पुरुषार्थ' मला जणू, 'हा सूर्य आणि हा जयद्रथ' असाच वाटतो. ह्या 'जिवंत, अप्रतिम, पुरुषार्थाला' बघूनच 'तत्त्वांमधून', पुरुषार्थ शोधण्याची प्रेरणाच मला मिळाली. कारण उत्कृष्ट 'पुरुषार्थाशिवाय', त्या 'उत्कट प्रेरणेशिवाय,' हे दिव्य शिल्प बनू शकले नसते. 'सिद्धांत चक्रवर्ती नेमिचंद्रार्यांच्या' प्रेरणेनेच', चामुंडरायाने, 'बाहुबलींचे अद्वितीय, अप्रतिम, अजरामर' असे शिल्प घडविले. 'श्रावकांच्या प्रेरणेने, आचार्यांनी उत्कृष्ट साहित्यिक पुरुषार्थ' केला तर, अशा महान 'आचार्यांना तत्त्व, द्रव्य, सिद्धांतातून,' जे 'पुरुषार्थाचे' दर्शन घडले', त्याचे मूर्तरूप श्रावकांकडून, 'कलेच्या, व्यक्तरूपाने' साकारले गेले. 'कारण–कार्य संबंधंच' म्हणावा लागेल की, 'तत्त्वज्ञानाचा पायाच वा कारणच पुरुषार्थ' असल्यानेच, असे 'कार्य पुरुषार्थ' साकारले जावू शकले. ह्या प्रेरणेतूनच 'तत्त्वांमधून पुरुषार्थ' शोधून, समोर आणण्याचा प्रयत्न करण्याचे धाडस मी करू शकले.

**विषयविस्तार :**

जैनांच्या ह्या 'कला पुरुषार्थाचा' विकास,'वास्तुशास्त्र, मंदिरनिर्मिती, मूर्तिकला, चित्रकला,' अशा अंगाने झालेला दिसतो. भारतातल्या 'प्राचीन' कलाविष्कारात, 'जैनांचे हे योगदान' लक्षवेधक आहे. नमूद केल्याप्रमाणे त्याची मुहूर्तमेढ 'वृषभांनी' केली.

**१) वास्तुकला :-**

अ) आगमात 'षट्कर्मे, पुरुषांच्या ७२ कला, स्त्रियांच्या ६४ विद्या, विविध लिपी', असा उल्लेख आढळतो. जैन समाजात 'लेखन प्रणालीचा' प्रयोग फार प्राचीन आहे. सुरूवातीला 'मौखिकरूपाने' असणारी परंपरा, नंतर 'गणधरांनी ग्रंथबद्ध' केली. म्हणूनच 'जैन लिपि-कलेला' इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान आहे.

ब) जैन निर्मितींच्या आदर्शात, 'वास्तुकलाही' उल्लेखनीय आहे. 'वास्तुविषयक' परंपरेत 'जैनकला' ह्या, जैन धर्माच्या, 'त्रैलोक्यसंबंधी मान्यतांनी' प्रभावित दिसतात. प्राचीन साहित्यात वर्णित, 'लोकाकाश, द्वीप, समुद्र, भवनवासींचे भुवन, मेरूपर्वत, समवशरण चंपा, राजगृही' इत्यादि नगरे, हे 'वास्तुशास्त्राचे उत्कृष्ट नमुने' म्हणता येतील.'समवशरणातील सोपान, वीथि, वेदिका, गोपुरद्वार, मानस्तंभ, चैत्यवृक्ष, स्तूप, प्रासाद', इत्यादि वास्तुकलेचे उत्तम प्रतिक आहेत. नगरांमधील 'स्तूप, चैत्य, चैत्यवृक्ष' ही वर्णने, 'वास्तुकलेच्या प्रगल्भतेची' प्रतिके ओत.

क) 'उदयगिरि' पर्वतावरील 'हाथीगुंफा' येथील, कलिंगसम्राट 'खारखेलचा' चरित्र-शिलालेख प्राकृत भाषेत आहे. (इ.स.पू.२००) 'जैन इतिहास व संस्थानांच्या', अनेक महत्त्वपूर्ण गोष्टींच्या सिद्धीसाठी त्याचे महत्त्व आहे. त्या काळात, 'पर्वत-गुंफा' इत्यादि ठिकाणी 'जैनमूर्ती' बनवून, 'पूजा-प्रतिष्ठा' होत होत्या हा पुरावा त्यात मिळतो. 'उदयगिरि' येथील 'राणीगुंफा' येथील 'मूर्ती, मुनिनिवास, त्यावरील चित्र, कथा, प्राप्त शिलालेख, कलाकृती', इत्यादिंवरून, ई.स.पू. २ ते १० शतकापर्यंत तेथे असणारा जैन समाज, किती 'समृद्ध, सदृढ' होता हे स्पष्ट होते. 'राजगिरि' येथील जैन गुंफेत, 'अतिप्राचीन, ब्राह्मी लिपीचा' लेख आहे. 'जुनागढच्या' गुंफा (इ.स.पू.२ रे शतक), 'श्रवणबेळगोळ, उस्मानाबाद, तामिळनाडूतील सित्तन्नवासल, बादामी तालुक्यातील ऐहोळे, वेरूळ, अंकाई-लंकाई' आणि इतरही 'जैन गुंफा' वैशिष्टयपूर्ण असून, तेथील 'मूर्ती' लक्षणीय आहेत.

**२) जैनमंदिर :**

भारतीय 'वास्तुकलेचा' विकास प्रथम 'स्तूप, गुंफाचैत्य, विहारनंतर तेथे मंदिर', अशा क्रमाने असून, 'मंदिरनिर्माणातही' चरम उत्कर्ष दिसतो. त्यातील 'शिस्तबद्ध योजना आणि शिल्पचातुर्य' उल्लेखनीय असून, जैन प्राचीन शास्त्रात अशा 'प्रतिमा, आयतनांची' प्रचुरता

आढळते. सर्वांत प्राचीन 'जैनमंदिराचे अवशेष', बिहारमधील 'पाटणाजवळ' 'लोहनीपूर' येथे सापडले आहे. दक्षिण भारतातील, बादामीजवळील 'ऐहोळे' येथील 'मेघुटी' मंदिर (इ.स.६३४) आहे. धारवाडची दोन मंदिरे (१२वे शतक) आहेत. 'होयसळ' राजवटीतील, 'मूडबिद्री' चे मंदिर (१४वे शतक), हे त्याच्या 'स्तंभावरील शिल्पांनी' चिरस्मरणीय उरले आहे. 'झाशी' येथील 'देवगड' पर्वतावरील मंदिरांवर, 'नागर' शैलीचा प्रभाव दिसतो. 'खजुराहो'ची अप्रतिम मंदिरे, 'वास्तुकलेचे' सर्वोत्कृष्ट विकसित रूपच आहेत. मध्यप्रदेशातील 'मुक्तागिरि' येथील 'मंदिरे, पर्वत, धबधबे, नयनरम्य' असून, त्यावर 'मुघलशैली'चा प्रभाव दिसतो. 'राजस्थान, मारवाडमधे' तर, 'देवळांची नगरे'च आहेत. 'राणकपूर' येथील 'चतुर्मुखी मंदिर', वास्तुकलेचे अजोड उदाहरण आहे. 'आबु-दिलवाडीची' पाच मंदिरे, भारतीय 'वास्तुकलेचे' भूषण असून, भारताचे मस्तक 'गर्वाने उंच' करणारे आहेत. 'शत्रुंजय, गिरनार, सम्मेदशिखर' ही, 'तीर्थंकरांच्या इतिहासाशी' संलग्न क्षेत्रे आहेत. या व्यतिरिक्त नष्ट झालेल्या वा केलेल्या, परावर्तित केलेल्या, 'जैन मंदिरांची' संख्या शेकडोत मोजण्या इतपत आहेत.

### ३) जैन मूर्तिकला :

'जैन मूर्तिकलेचे' अनेक प्राचीनतम उल्लेख आढळतात. 'कलिंगसम्राट' खारखेलच्या (इ.स.पू.२००) शिलालेखातून, त्याकाळी होणाऱ्या, 'जिनमूर्तींची पूजा-प्रतिष्ठाचे' पुरावे सापडतात. 'मथुरा संग्रहालयात जैनमूर्तींच्या' अभ्यासाची प्रचुर सामग्री सापडते. 'कुषाणकालीन, गुप्तकालीन' मूर्ती सर्वांत प्राचीन आहेत. 'मोहन-जो-दडो व हडप्पा, येथील', सिंधू संस्कृतीच्या काळातील,'नग्नमूर्ती व जिनप्रतिमा' यातील साम्य, पुरातत्ववादी दाखवतात. विशालतेच्या दृष्टीने 'बावनगजायेथील (८४ फूट) मूर्ती व श्रवणबोळगोळची (५६ फूट ६ इंच) बाहुबली मूर्ती' प्रसिद्ध आहेत.

### ४) जैन चित्रकला :

जैन साहित्यात 'चित्रकलेचे' प्राचीनतम उल्लेख आढळतात. 'नायाधम्म' ह्या सहाव्या अंगग्रंथात, 'धारणीदेवीच्या, अनेक चित्रांनी अलंकृत शयनागाराचे सुंदरवर्णन' आहे. 'चित्रसभेचेही' सुंदर वर्णन आढळते. (ना.क.१९) सर्वात प्राचीन नमुने, तामीळनाडूजवळ 'तंजोर' येथील, 'सित्तन्नवासल' गुंफेत आहेत. (इ.स.६२५) १०,११ व्या शतकातील, 'तिरुमलाई' जैन मंदिरातील चित्रे वैविध्यपूर्ण, रेखीव, चित्ताकर्षकही आहेत. 'श्रवणबेळगोळ येथील जैनमठात' सुंदर भित्तिचित्र आहेत. १४,१५ व्या शतकात, चित्रकलेचा आधार 'ताडपत्री' बनला. सर्वांत प्राचीन ताडपत्रीय हस्तालिखिते, 'मूडबिद्रि' येथील 'षट्खंडागमाच्या' प्रती आहेत. गुजराथयेथील 'पाटनमधेही', जैन-शास्त्र भंडारात सचित्र ताडपत्रीय विपुल हस्तलिखिते आहेत.

**सारांश :** जैनांचा 'कला' प्रांतातला हा प्रवास, 'अद्‌भुत असून, अचंबित' करणारा आहे. प्रत्येक

♦ मनुष्यात 'जिज्ञासा, विवेक, सौंदर्योपासना' हे, विशेष गुण असतात. त्यातूनच 'कला' विकसित होतात. कलेची प्रेरणा 'जिज्ञासा' असली तरी, आणि कलेची निर्मिती 'सौंदर्योपासनेतून' होते तरी, फक्त 'कलेसाठी कला', हे जैन कलांचे ध्येय नाही हे स्पष्ट जाणवते. कलांमधून विविध, 'भाव-भावनांचे परिष्कार, उत्कर्षण, धर्म-नीतीचा उपदेश, आध्यात्मिक उन्नतीचा संदेश, जनकल्याणाची भावना', अशा रूपाने 'जीवन उत्कर्षाचे' ध्येय स्पष्ट दिसते. कलेतून व्यक्त होणारी, 'उत्कृष्ट स्थापत्यकृती, मूर्तीतली दिव्यता, चित्रांमधील आध्यात्मिक उत्कर्ष', हा धार्मिक प्रेरणेशिवाय शक्य नाही. 'जैन तत्त्वज्ञान व आचाराचा', मूर्तिमंत आदर्शच 'कला' आहे. भारतीय संस्कृतीतील 'कलासंवर्धनातील,' जैनांचा वाटा किती 'मोलाचा व महत्त्वाचा' आहे, हे स्पष्टच आहे. त्याचबरोबर 'जैनधर्माची प्राचीनताही' अनायासच सिद्ध होते. 'तीर्थंकरांकडून' प्राप्त हा धर्म, त्यांच्या अनुयायांनी, 'कला' इत्यादि माध्यमातून देशव्यापी बनवून, हा 'धर्म' टिकवला, हा 'पुरुषार्थ' नक्कीच दाद देण्यायोग्य आहे.

'आध्यात्मिक भूमिका, नैतिक विन्यास, ह्याअंतरंगगुणां' बरोबर, 'व्यावहारिक उपयोगिता व समतोल' साधला आहे, कारण 'आध्यात्मिक, नैतिक' स्तर उंच नेण्याच्या प्रयत्नासह, देशाच्या 'सौंदर्यात, इतिहासात, संस्कृतीत', अमूल्य ठेवा दिला आहे. दृष्टी मोक्षरूपी 'आत्मिक' उन्नतीवर ठेवूनही, व्यावहारिक जीवनही, 'सौंदर्यपूर्ण व रसपर्ण' जगण्याचा आदर्श जगापुढे ठेवला आहे. 'निवृत्तिसह उत्कृष्ट प्रवृत्तीचा', हा 'पुरुषार्थाचा' प्रकर्षच म्हणावा लागेल.

# प्रकरण –१

## संदर्भ–सूची

१) पं.का.९ ; त.सू.५।२९,३८ ;ध. १।१,१,१३६।गा.१९१।३८६
२) नि.सा. ९ ; त.सू.५।१–३,३९ ;ध.१।१, १।१७।६
३) गो.जी.५८८ ;त.सू.५।६,७; रा.वा. ५।२।१२।४४१।१, ५।६।६।४४५।२७, ५।१२।५–६।४५४।२६
प्र.सा. १०७; १२७; १४४–१४५;पं.का. ७,९७ ; बा.अ.११; व.सु.श्रा. २७,२९,३१,३३,३५,३६
४) प.प्र. १।५८।७,८; १।५७।१२
५) रा.वा. २।३४।२।१७; ५।२४।२५।२८; त.सू.५।३३–३६; ध–१४।५,६।४५०।६,७
६) प.प्र.१।५७; १।५७; १।५८।८ ; त.सू.५।४१ ; प्र.सा.१३९; ध ९।४, १,२।२७।६
७) रा.वा. १।३३।९५।६; १।२९।४।८९।४; त.सू.५।४२
८) आ.प.३; प.प्र.टी. १।५७
९) प.प्र. ५७; रा.वा. ५।२२।२१।४८१।१९; ध.४।१,५,४।३३७।८
१०) प्र.सा. १४७; द्र.सं.३ ;पंका. २७; स.सा.४९
११) त.सू. २।१०,७,११–१४; पं.का. ११७; का.अ. १२९–१३०, ध. १२।४,२,६,३।२९६।८; गो.जी.६२२–६२३
१२) पं.का.२७,३३,१०९; प्र.सा. २३,२६; त.सू. ५।७,१६, स.सि.५।१९।८, ध. १२। पृ.३३६, ३६७
१३) पं.सं.प्रा. १।४३, ४५, १७३–१७५, १७८, ८८; का.अ. १३४–१३५; त.सू.२।२४,१ भा.पा.७७,८३; स.सा. २७५;
ध.१। पृ. २५४,२५७।४, ६, ध. ७। पृ. ८७।३, ध. ५। पृ. १८४, २४२, २८६
१४) रा.वा. ५।१।२४,२६।४३४।१२; त.सू. ५।२३
१५) त.सू. ५।२५ ; आ.प. ४
१६) त.सू.५।२३,२४,१९,२०; नि.सा.३५; पं.ध.उ.९२५
१७) त.सू. ५।१,२,४,१७; गो.जी. ५६६; प्र.सा..१३३; पं.का.८५–८६
१८) गो.जी. ५८८; पं.का.१२४; त.सू. ५।१२–१३
१९) पं.का. ८४,८६; स.सि. ५।१७।६; १०।८।४
२०) त.सू. ५।४,७।१८; पं.का. ९०,९१
२१) त.सू. ५।९, १५, १८; ध. ४।१,३,२।२४।२; १५।३३।७
२२) ध. ४।१,५,१।३२२।६; ४।१,५,१।३१३।११; गो.क. ५८३; स.सि. ५।२२।२
२३) पं.का. २४; त.सू. ५।२२,४०; नि.सा.३६; स.सि. ५।२२।१,७; ५।४०।६
२४) पं.का.२५; त.सू. ४।१३,१४; नि.सा. ३१,३२
२५) स.सि. ३।२७।७,२,४,३
२६) त.सू.१।४ ; नि.सा.९; ध. १३।५,५,५०।२८५।११; स.सि. २।१।११; १।२।३
२७) स.सि.१।४।१,६; नि.सा.३८; द्र.सं. २८
२८) त.सू. ६।१–२,४–५; गो.क. ७८९; द्र.सं.३०,३१,२८
२९) त.सू. ६।६; ८।२; स.सा. ७३–७४; द्र.सं.ही. २८।९; ३४।१०,५५।१२;३८।७
३०) स.सा.१२९,२१९,२७५,३१४; मो.पा.१५; ध. १३।५, ५,५०।गा.२३।२८९
३१) त.सू.९।१; स.सा. १८७–१८९,१८६; बा.अ.३१–६२
३२) अ) पं.का.१४१; रा.वा.७।१।५३१।४; स.सि. ७।१।७
ब) स.सि. ९।५।९, ५,११,१०
क) स.सि.९।६।२
ड) प.प्र.१।११४; २।६७; २।३८
इ) रा.वा. ९।७, ७।६०२; त.सू.७।१२
ई) त.सू. ९।८; स.सि.९।८।१३
फ) चा.पा.८–९
३३) भ.आ.१८४७; स.सि. १।४।५; ८।२३।९; ६।२०।१०; द्र.सं.ही. ३६।१०
३४) अ) बा.अ. ६७; ध. १३।५,४,२४।५२।५
ब) त.सू.ब३; पं.का.१४५
ड) त.सू. १।४५; रा.वा. ९।१।१९।५८९।३०, ९।१।१८।५९०।७, ९।१।१०।५८४।६
इ) भ.आ.१९४२–१९४५; र.क.श्रा.१३०
ई) रा.वा. १।२०।१२।७७।१२; ध.१।१,१,६७।३००।६
फ) ध.६।१,९–८; १२।२४७।२, पृ. २५८।३; पृ. २४८।२६६, क्ष.सा.१।३९२–६००,
प) हे वर्णन 'कर्मसिद्धांत' प्रकरणात केले गेले आहे.
३५) आ.अ.३०।५,६; भ.आ.१८४८, १८४०, १८४२, १८४५, १८४७, १८५०, १८४६
३६) रा.वा. १।७।१४।४०।२४; १।४।१३।२६।९; द्र.स. ३७
३७) अ) पं.का.२८; स.सि.२।१०।७
आ) नि.सा.७२; भ.आ.२१३३
इ) ध.१।१,१,१।४६।२
ई) प.प्र.टी.२।४।१३; प्र.सा.१७
३८) प.प्र.टी. १।६१।८; द्र.सं.टी. १४।२; प्र.सा.६०; त.सू.१०।३–४
३९) त.सू.१०।९; शी.पा.२९; सू.पा. २३

४०) प्र.सा. १८१; पं.का.१३५; त.सू.६।२३; आ.मी.९२-९५
४१) पं.का.१३१; स.सा. १४४-१४७; ४५,१५०,१५४,२१०; का.अ. ४०९-४१२, ४२८, ४३४, ४३७
४२) प्र.सा. १२,१८१; पं.का. १३९-१४०; त.सू.६।३, २२; ७।९-१०
४३) रा.वा. ५।१२।१०-१३।४५५।२०
४४) ति.प.१।१३७-१३८
४५) ति.प.१।१४९-१६३
४६) ति.प. १।२६८-२६९
४७) ति.प. १।१३६; ध.४।१, ३,१।९।३
४८) त.सू. ३।९-२३
४९) ति.प. ४।१७८०-१७८२
५०) ति.प.४।२३९८-२३९९
५१) ध. १।१,१,११।१६७।२; १।६, ९-१४।३७, रा.वा. १।६, ८।३६।१,८; आ.मी.१०८,
५३) का. अ. ३११।३१२; गो.क. ८१५; ध.१।१, २७।२२२।२
५४) का.अ.पं.ध.पू. २६२-२६३; पं.का. ८; रा.वा. १।६।१३।३७।९
५५) पं.ध.पू. ३३२,३४२; ध.१।१,१,११।१६६।९, १६७।३
५६) गो.जी. ४४३; स.सि. १।१४।३; २।११।३,४,१
५७) स.सि. ५।१९।१
५८) ध. ६।१, १,१४।१५।१५; रा.वा. १।१९।५-७।६९।१२, ३५।२६०।५ ३-४६९।७, ६।४३८।३०
५९) त.सू. १।१४; २।२१
६०) पं.सं.प्रा.१।८८ ; त.सू.६।१
६१) त.सू.२।२४ ; प्र.सं.प्रा. १।१७४-१७५
६२) त.सू. ९।४; नि.सा. ६६-६८
६३) स.सा. आ. ५२; ध. १४।५,६ ९७।गा. ७-८।११७
७२६।५४५।११
६४) का.अ.४५७; ध. १३।५,४,२६।६३।४
६५) पं.सं.प्रा. १।४५,४६; ध. १।१,१,१३४।२५६।४
६६) पं.सं.प्रा. १।४३; का. अ. १३४-१३५; ध.१।१,१७०।३११।९
३४।२५७।४,६
६७) त.सू. ५।१९,२०,२३;
६८) प्र.सा. २४०; पं.सं.प्रा. १२७-१२८
६९) पं.सं.प्रा. १।१०९; १११-११४; २०८-२११; त.सू. ८।९; ध.६।१,९-१,२।२३।४१।३
५।१,७,४४।२२३।५
७०) पं.सं.प्रा. १।१४२-१५३, १८३-१८४; ध. १।१, १,४।१४९।६,८०

१।१।१३६।३८८।३,५,११

* 'साहित्य व कला' विषयीचे वर्णन,''हिरालाल जैन यांनी लिहलेल्या,''भारतीय संस्कृतीमे जैन  धर्म का योगदान'' ह्या पुस्तकाच्या आधारे केले आहे.

# प्रकरण (२)

# ''पुरुषार्थ ह्या मुद्दयाचे विविध दृष्टीने सविस्तर वर्णन''

## उपविभाग (१)

१) 'पुरुष' शब्दाची व्युत्पत्ति, अर्थ, स्वरूप, इत्यादि दृष्टीने, 'जैन व इतर दर्शनातील' उल्लेख.

२) 'वैदिक' परंपरेतील 'पुरुषार्थ' व त्यांचे 'अविष्कार' आणि 'जैन' परंपरेतील 'पुरुषार्थ' व त्यांचे 'अविष्कार', – ह्यांची 'जीवनोपयोगितेच्या' दृष्टीने 'समीक्षा' –

३) जैन दार्शानिक ग्रंथात 'पुरुषार्थ' शब्दाचा शोध. 'चारही पुरुषार्थांचे' उल्लेख, स्वतंत्र विचार–विस्तार आणि वेगळेपणा :

४) जैन दर्शनानुसार 'मनुष्यगतीचे' वैशिष्टय, स्वातंत्र्य, दुर्लभता, श्रेष्ठत्व व स्थान :

५) 'उपादान–निमित्त, पाच समवाय,' यांचा परस्पर समन्वय, संबंध, महत्त्व, गौणता :

## उपविभाग १
# १. जैन परंपरेत 'पुरुष' शब्दाचा शोध

**प्रस्तावना :**

'पुरुषार्थ' ह्या संकल्पनेचा शोध घेत असता, त्यातला 'पुरुष' शब्दाचा नेमका अर्थ कोणता? तो कोठून आला ? कसा रूढ झाला ? जैन परंपरेत तो कधी आणि कोणकोणत्या अर्थाने वापरला गेला ? ह्या सर्व प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. रूढ वैदिक परंपरेनुसार, 'धर्म, अर्थ, काम, मोक्ष', ह्या चार 'पुरुषार्थांचा' विचार केलेला दिसतो. जैन परंपरेत मात्र, 'पुरुषार्थसिद्ध्युपाय' ह्या ग्रंथात आ. अमृतचंद्रांनी 'पुरुषार्थ' शब्द वापरला. जैन परंपरेत सतत साधन म्हणून, 'धर्म' पुरुषार्थ आणि साध्य म्हणून 'मोक्ष'पुरुषार्थावरच भर दिलेला स्पष्टपणे प्रतीत होतो.'अर्थ'आणि 'काम' पुरुषार्थांच्या, विवेचनाला स्थान दिलेले आढळत नाही. आ. अमृतचंद्रांनी सुद्धा आपल्या ग्रंथात, ह्या दोन 'पुरुषार्थांचा' विचार केलेला दिसत नाही. थोडक्यात 'पुरुषार्थ' शब्द दोन्ही परंपरेत वापरला तरी,'पुरुष' शब्दाचा अर्थ नेमका काय? तो 'व्यक्तिवाचक'आहे वा 'आत्मवाचक' ह्या दृष्टीने शोध घेतला आहे.

जैन परंपरेत मुख्य 'दोन संप्रदाय' आहेत. त्यापैकी श्वेतांबर परंपरेतील काही 'अर्धमागधी' अंगग्रंथांचा आधार घेतला आहे. दिगंबरीय शौरसेनी 'षट्खंडागमापासून पंधराव्या शतकापर्यंतच्या महत्त्वपूर्ण सैद्धांतिक ग्रंथांचा', 'पुरुष' शब्दाचा शोध घेण्यास, आधार घेतला आहे.

वैदिक परंपरेतील महत्त्वाच्या ग्रंथ साहित्यातील, आवश्यक ते संदर्भ येथे उपयोजिले आहेत. ते सर्व संदर्भ मूळापासून अर्थसहित वाचले. त्यांची नीट चिकित्सा करून, विविध अर्थांची योग्य ती नोंद घेतली. त्यानंतर त्यातील 'विविध अर्थांची, प्रथम अर्थभेदानुसार व नंतर कालक्रमानुसार' व्यवस्थित मांडणी केली. त्यातील सर्व तत्त्वे लक्षात घेऊन, क्रमाक्रमाने वर्णन करून, अंतिम निरीक्षण' सादर केले आहे. .

**ऋग्वेदातील सहस्रशीर्ष 'पुरुष' आणि जैन दर्शनातील 'पुरुषाकार विश्व' :**

'पुरुष' शब्दाचा शोध घेत असताना असे लक्षात आले की, 'वैदिक वा जैन' दोन्हीही परंपरा, भारतीय संस्कृतीच्या वातावरणातच निर्माण झाल्याने, दोहोंमध्ये अनेक संकल्पनांबाबत सादृश्य निर्माण होणे अतिशय साहजिकच आहे.ऋग्वेदातल्या ऋषींनी 'सहस्रशीर्ष,सहस्राक्ष, सहस्रपाद' (ऋ. १०.९०.१ ते १५), अशा भव्य 'विश्वपुरुषाची' संकल्पना केली. तर जैन दार्शनिक मान्यतेनुसार, विश्वाला 'पुरुषाच्या (कोण्या एका व्यक्तीच्या) शारीरिक बाह्यकृतीचा आकार' प्रतिपादित केला आहे. 'जैन परंपरेत अद्‌भुतरम्यतेला' स्थान न देता, दार्शनिक मान्यतेला महत्त्व दिलेले दिसते.

'केवली समुद्घाताच्या वेळी, लोकपूरण समुद्घाताच्या प्रसंगी केवली', बाकीच्या 'कर्मांची स्थिति, आयुकर्माइतकी' करण्यास, 'आत्मप्रदेश संपूर्ण लोकाकाशात' पसरवतात.जैन दर्शनात 'आत्माचे प्रदेश आणि लोकाकाशाचे प्रदेश', समान म्हणजेच 'असंख्यात' मानले आहेत.त्याप्रंसगी त्या 'आत्मप्रदेशांचा आकार', लोकाकाशाच्या आकाराप्रमाणे म्हणजेच, 'पुरुषाकार' होतो, असे मानणे अत्यंत नैसर्गिक वाटते. किंबहुना म्हणूनच जैन शास्त्रात'पुरुष' शब्द हा स्वतंत्र,'जीव अथवा जीवाला,' ह्याच अर्थाने प्रयुक्त झालेला दिसतो. 'मनुष्यभवाचा मोक्षाशी' असणारा 'अविनाभावी' संबंध, 'वैदिक आणि जैन' दोन्ही परंपरांनी मान्य केल्यामुळे, जैनांची 'पुरुषाकार विश्वकल्पना' ह्यासाठी योग्य वाटते.

### १) वैदिक ग्रंथात'व्यक्तिवाचक' दृष्टीने 'पुरुष' शब्द

अ) 'अथर्ववेदात[१], मनुष्याच्या शरीररचनेसंबंधी प्रश्न विचारले आहेत'.

ब) 'तैत्तरीय उपनिषदात' पाच कोशांच्या संदर्भात म्हटले आहे की, ''स वा एष पुरुषोऽन्नरसमय:'' तो पुरुष अन्न तसेच रसमयच आहे.[२]

क) 'महाभारतात[३] कोणत्याही सामान्य व्यक्तीला (पुरुषाला) सदाचरणाने कोणते फायदे होतात', हे सांगतानाचे वर्णन आढळते.

ड) 'भगवद्गीतेच्या' दुसऱ्या अध्यायात आत्मविज्ञान सांगून, अर्जुनाला युद्धप्रवृत्त करताना श्रीकृष्ण म्हणतो की[४], ''वेदविनाशिनं नित्यं य एन मजमव्ययम् कथं स पुरुष: पार्थ कं घातयति हन्ति कं''

### २) जैन ग्रंथात 'व्यक्तिवाचक' दृष्टीने 'पुरुष' शब्द :

अ) चित्ताच्या संकल्पविकल्पात्मक भावना लक्षात घेवून, 'आचारांगात' म्हटले आहे की[५],
''अणेगत्ते खलु अयं पुरिसे ''

ब) 'सूत्रकृतांगातील' ''अह पुरिसे ---'' या उल्लेखातही तो स्पष्टपणे व्यक्तिवाचक दिसतो[६].'

क) धन कोणत्याही व्यक्तीला किती महत्त्वाचे असते हे सांगताना 'भगवती आराधनेत' म्हटले आहे की[७],

''अत्थमि हिदे पुरिसो उम्मतो विगयचेणो होदि । मरदि व हक्कारकिदो अत्थो जीवं खु पुरिसस्स।।''

स्वधन कुणाकडून हरण केले गेले तर, मनुष्य वेडापिसा होतो. त्याची चेतना नष्ट होते. हाहाकार करून तो मरतो. म्हणूनच म्हणतात की, ''धन मनुष्याचे प्राण आहे''

ड) 'कुंदकुदाचार्य समयसार' ग्रंथात, 'निश्चयनयानुसार आत्मवर्णनाला' प्राधान आहे. तेथे 'पुरिस' (पुरुष) हा शब्द मात्र अनेक वेळा, 'कोणीतीही सामान्य वक्ती' या अर्थाने योजलेला दिसतो.[८] जसे---

१) जह णाम को वि पुरिसो रायाणं जाणिदूण सद्दहदि

२) जह पुरिसेणाहारो गहिदो परिणमदि सो अणेय विहं

३) जह पुण सो च्चिय पुरिसो [८]

**३) वैदिक ग्रंथांत 'लिंगवाचक' दृष्टीने 'पुरुष' शब्द :**

अ) 'मनुस्मृतीने म्हटले आहे की[९], ब्रह्मदेवाने ठरवल्यानुसार पुरुषाचा देह पवित्र असून नाभीच्यावरचा देह आणि मुख, हे विशेषत: अत्यंत पवित्र होय'

ब) 'मनुस्मृतीनुसार[१०] पुरुषांनी स्त्रियांना रात्रंदिवस आपल्या आधीन ठेवावे'.

क) 'अंत:पुरातील स्त्रियांची देखरेख करण्यासाठी, ऐंशीपेक्षा जास्त वय असलेल्या पुरुषांची नियुक्ती करावी,' असा नियम 'कौटिलिय अर्थशास्त्रात' नोंदविलेला दिसतो[११] .

**४) जैन ग्रंथात 'वेदवाचक' दृष्टीने 'पुरुष' शब्द : (वेद म्हणजे पुरुषलिंगधारी व्यक्ती)**

'चारित्रमोहनीय कर्माच्या अपेक्षेने आणि वेद' अपेक्षेने, 'पुरुष लिंगवाचक' पुरुष शब्दाचा विपुल प्रमाणात उल्लेख, 'अर्धमागधी व शौरसेनी' आगमात आढळतो. षट्खंडागमात म्हटले आहे की, '' वेदाणुवदेण अत्थि इत्थिवेदा, पुरिसवेदा, णवुंसगवेदा, अवगदवेदा चेदि[१२]''

**५) 'प्रयत्नवाचक'अर्थाने 'पुरुषकार' शब्द – महाभारतात'प्रयत्नवाचक पुरुषकार' शब्द–**

महाभारतात प्राय: 'पुरुषकार' शब्द, 'पुरुषाने केलेले प्रयत्न', याच अर्थाने आलेला दिसतो[१३].

**६) जैन परंपरेत पराक्रमवाचक'पुरुष' शब्द जैन परंपरेत प्राय:**

'पुरुषकार' या शब्दाऐवजी 'पुरिसयार', 'पुरिसगार' या शब्दांचे उपयोजन दिसते. त्याचा अर्थ 'बल, वीर्य, पराक्रम,' असा असला तरी, तो केवळ 'पुरुष लिंगवाचक व्यक्तीशी' जोडलेला नसून, कोणत्याही जीवामध्ये सामान्यत: आढळणाऱ्या ,'पराक्रम वा शक्तीशी' जोडलेला दिसतो . कारण 'सैद्धांतिकदृष्ट्या 'वीर्य' हा, 'आत्माचा गुण' मानला आहे. अर्धमागधी अंग आगमात 'पुरिसकार- परक्कमे' या अर्थाने बऱ्याचवेळा 'पुरुष' शब्द उपयोजिला आहे. 'स्थानांगसूत्रात' म्हटले आहे की, '' एगे उठाण- कम्मं-बल, वीरिय, पुरिसकार- परक्कमे देवासुर- मणुयाणं तंसि तंसि समयंसि''[१४]

**७) वैदिक ग्रंथांत 'आत्मवाचक' दृष्टीने 'पुरुष' शब्द :**

लोकवेद म्हणून मान्य असलेल्या, 'अथर्ववेदात' म्हटले आहे की, '' ब्रह्माच्या ज्या पूरित शयन केल्याने त्याला 'पुरुष' म्हटले जाते, त्याला जो जाणतो, त्या पुरुषाचा संग, प्राण व नेत्र वृद्धवस्था पूर्वी सोडत नाही''[१५]

### अ) सांख्यदर्शनात 'आत्मवाचक' 'पुरुष' शब्द :

सांख्यांनी 'पुरुष' शब्द हा 'आत्मवाचक' म्हणून अधिक चांगला वर्णिला. 'प्रकृति- पुरुष' पूर्ण भिन्न आहे असे मत मांडून, 'पुरुषाचे बहुत्त्व' मानले. त्याला 'अकर्ता, कूटस्थ, अधिकारी, निर्गुण, निष्क्रिय, अचल, अविनाशी, चेतनयुक्त' मानला. सांख्य म्हणतात की[१६],

''मूलप्रकृतिअविकृतिर्महदाद्या: प्रकृतिविकृतय: सप्त । षोडकस्तु विकारो न प्रकृतिर्नविकृति: पुरुष:''

आणि १८ व्या सूत्रात म्हणतात की[१७], ''पुरुषबहुत्त्वं सिद्धं त्रैगुण्यविपर्ययच्चैव''

### ब) योगदर्शनात 'आत्मवाचक' 'पुरुष' शब्द :

योगदर्शनात (१-१६) ह्या सूत्रात,' चित्ताहून पुरुष वेगळा आहे, असा विवेक उत्पन्न होणे', ह्याला 'पुरुषख्याति' म्हणतात. तेथे 'पुरुष' शब्द 'आत्मवाचक' अर्थाने आहे. त्याच अध्यायात (१-२४) ईश्वराचे स्वरूप वर्णन करताना म्हणतात की,''क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्ट: पुरुषविशेष ईश्वर:।।'' योगदर्शनाने (३-३५) 'सत्त्व (अंत:करण) आणि पुरुष (द्रष्टाआत्मा)', परस्परांहून अत्यंत भिन्न मानला आहे. त्यातच( ३-४९) ही अन्यता रूप जाणीव, 'विवेकख्याति' म्हटली आहे. ह्याच 'पुरुष आणि सत्त्व' यांच्या शुद्धीने, 'कैवल्यसिद्धी' (३-५५) मानली आहे तर, (४-१८ आणि ४-३४) ह्या श्लोकांमध्ये म्हणतात की, '' सदाज्ञाताश्चित्तवृयस्तत्प्रभो: पुरुषस्यापरिणामित्वार्त्'' '' पुरुषार्थशून्यानां गुणानां प्रतिप्रसव: कैवल्या स्वरूपप्रतिठा वा चितिशक्तिरिति''

### क) महाभारतात ' आत्मावाचक ' 'पुरुष' शब्द :

महाभारतात 'पुरुष' म्हणजे 'आत्मा', ह्याचे वर्णन 'शरीरातील स्थान व आकाराबाबत' केले आहे. ''अंगुष्ठामात्र: पुरुषो महत्मा न दृश्येतेऽ सौ हृदये निविष्टे[१८]''

ह्या उलट 'मोक्षपाहुड' ( गा. ८४) आणि 'योगसार' (गा.९४) ह्या जैन ग्रंथांमधे, 'आत्मा हा स्वदेहपरिमाण' आहे, असे स्पष्ट उल्लेख येतात.

### ८) जैन ग्रंथात 'आत्मवाचक' दृष्टीने 'पुरुष' शब्द :

अ) अर्धमागधी आगमांमधे ' आत्मवाचक ' दृष्टीने 'पुरुष' शब्द आढळत नाही.

ब) 'षट्खंडागम' हा शौरसेनीय ग्रंथ, दिगंबरीयांचा सर्वप्रथम आगमग्रंथ म्हणून मान्यताप्राप्त आहे. त्या ग्रंथाच्या मूलगामी सूत्रांमधे 'आत्मा' ह्या अर्थाने, 'पुरिस' शब्दाचा प्रयोग आढळत नाही.

क) 'कुंदकुंदाच्या अष्टपाहुडात' 'पुरिस' शब्द उपयोजिला असला तरी, तो नि:संदिग्धपणे 'आत्मवाचक' नाही. तसेच 'निश्चयनयाने आत्मपर' वर्णन करणाऱ्या 'समयसार' ग्रंथात, आत्मावाचक म्हणून, 'अप्पा, अत्ता, आदा', अथवा 'जीव' या शब्दांचे प्रयोग आहेत. परंतु 'पुरिस' (पुरुष) याचा 'आत्मावाचक' प्रयोग आढळत नाही.

ड) संस्कृत सूत्रबद्ध, 'दार्शनिक परंपरेतील' उमास्वामीकृत 'तत्त्वार्थसूत्र' या ग्रंथात, केवळ 'तत्त्वाच्याच अनुषंगाने जीवाचे' वर्णन येते. 'पुरुष' शब्दच नव्हे तर, 'आत्मा शब्दाचा' सुद्धा उपयोग केलेला अढळत नाही.

इ) तत्त्वार्थसूत्रावरील पूज्यपादकृत 'सर्वार्थसिद्धि' टीकेत देखील, उमास्वामीचेच अनुकरण केले आहे.

ई) आर्ष प्राकृतात लिहलेल्या दिगंबरीय 'पंचसंग्रहात', 'पुरिस' शब्द प्रथमच 'आत्मावाचक' अर्थाने आलेला दिसतो. पंचसंग्रहाचा काळ अंदाजे सहावे शतक आहे.

सहाव्या शतकापर्यंत, भारतातील सर्व दार्शनिक विचार, संस्कृत सूत्रबद्ध झालेले होते. दार्शनिक विचारांच्या 'आदान- प्रदानाची' प्रक्रियाही सुरू झाली होती. रूढ वैदिक परंपरेत 'पुरुष'शब्द 'परमात्मा, परमेश्वर, जीवत्मा', अशा विविध अर्थाने उपयोजिला जात होता. 'पुरि शेते इति पुरुष': अशी 'पुरुष' शब्दाची व्युत्पत्ति तोपर्यंत, 'वैदिक परंपरेत' रूढ झाली होती. सहाव्या शतकात'पंचसंग्रहकारांनी' शौरसेनी भाषेत 'पुरिस' शब्दाची व्युत्पत्ति पुढीलप्रमाने दिली.

''पुरु गुण भोगे सेदे करेदि लोयम्हि पुरुगुणं कम्मं ।

पुरु उत्तमो य जम्हा तम्हा सो वण्णिओ पुरिसो ।।''

'जो उत्तम गुणात व उत्कृष्ट भोगात शयन करतो, लोकात उत्तम गुण व कर्म करतो, व जो स्वयं उत्तम आहे तो पुरुष' होय[१९]. परंतु'गुण', भोग आणि 'शयन' हे शब्द स्पष्टपणे सुचवतात की,ही सांख्यांच्या 'पुरुष' संकल्पनेची व्याख्या आहे. जैन दर्शनातील 'आत्मविषयक संकल्पनेशी' जुळणारी नाही.

उ) 'पुरुष' शब्दाच्या ह्याच, जैन दार्शनिक व्युत्पत्तीचा उल्लेख, ७ व्या शतकात 'धवलाकारांनी षट्खंडागमावरील टीकेत[२०],आणि १० व्या शतकातील 'गोम्मटसार जीवकांडात' नेमिचंद्राचार्यांनी केला[२१].परंतु ह्यापैकी कोणत्याही जैन आचार्यांनी, जैन तत्त्वज्ञानाच्या 'जीवविषयक' विवेचनात 'पुरुष' शब्द उपयोजिला नाही.

ऊ) ह्यानंतर सरळ १२ व्या शतकात 'अमृतचंद्राचार्यांनी', आत्म्याचे लक्षण देत असताना प्रथम 'पुरुष' शब्दाचा वापर करून म्हटले की,

''आस्ति पुरुषश्चिदात्मा विविर्जित; स्पर्शगंधरसवर्णै ।गुणपर्ययसमवेत: समाहित: समुदयव्यध्रौव्यै।।''[२२]

'पुरुष म्हणजे चेतनसहित, अस्तिरूप आहे. स्पर्श, रस,गंध, वर्णरहित, गुण आणि पर्यायसहित, उत्पाद, व्यय, धौव्य युक्त आहे'.

अशा प्रकारे अमृतचंद्रांनी 'पुरुष' शब्द ' आत्मवाचक' अर्थाने लक्षण, गुणांसह वर्णन केला. ह्याच ग्रंथात तिसऱ्या गाथेत, ग्रंथनिर्मितीच्या उद्देशाबाबत 'पुरुषार्थ' म्हणून वर्णन केला. आहे.

अकराव्या गाथेत 'पुरुषार्थसिद्धी' कशी होते, त्या अर्थाने योजिला आहे. पंधराव्या गाथेतही' 'पुरुषार्थसिद्धीच्या' उपायांचा वर्णनात आला आहे. (२२२, २२३), ह्या गाथांमध्येही 'पुरुष' शब्द 'आत्मवाचक' अर्थाने आलेला आहे. जसे -

१) 'परंपदं पुरुषम्'-आत्म्याला परमात्मपद प्राप्त करवतो.

२) 'परमपुरुषः परमपदे' - अत्यंत निर्मल, परम आत्मा लोकशिखरावर प्रकाशमान होतो.

थोडक्यात खऱ्या अर्थाने 'आचार्य अमृतचंद्रांनी', १२ व्या शतकात 'पुरुष' शब्द ' आत्मा' अर्थाने रूढ केला. कारण त्यांना 'पुरुष' आणि 'पुरुषार्थ' दोन्ही शब्द घ्यायचे होते. त्यांना 'पुरुषार्थ'म्हणजे 'आत्म्याचे प्रयोजन', हाच अर्थ रूढ करायचा होतो. तो 'व्यक्तीचा प्रयत्न'म्हणून सांगायचा नव्हता. इतरांचे लक्षही वेधून घ्यायचे होते आणि ठामपणे 'धर्म आणि मोक्ष' पुरुषार्थाचाच पुरस्कार करायचा होता. 'पुरुष' आणि 'पुरुषार्थ' या दोघांना वेगळे परिमाण देण्याचा प्रयत्न, जरी सफल झाला असला तरी, त्या दोन शब्दांवरील 'वैदिक' छाप पुसली गेली नाही आणि परिणामी उत्तरकाली 'जैन तात्त्विक' साहित्यातही 'पुरुष' शब्द रूळला नाही.

**९) वैदिक परंपरेतील 'आत्मावाचक' परंतु विविधार्थी 'पुरुष' शब्द :**

ऋग्वेद[२३], अर्थववेद[२४], शतपथ ब्राह्मण[२५], मुंडक उपनिषद[२६], महाभारत[२७], भगवद्गीता[२८], ह्या ग्रंथांमध्ये, 'आत्मवाचक' परंतु विविधार्थी, 'पुरुष' शब्दाचा प्रयोग दिसून येतो. 'विराट पुरुष, ब्रह्म, यज्ञ परमात्मा, परमेश्‍वर, महेश्‍वर, उत्तमपुरुष, प्रकृतिपुरुष,' अशा विविध अर्थवाचक रूपाने 'पुरुष' शब्द आढळतो. विशेषतः 'महाभारत आणि गीतेत[२९]', 'पुरुष' शब्द, 'विविध अध्यायात, विविध संदर्भात, विविध अर्थाने' योजलेला दिसतो. नेमका कोठे, कोणत्या अर्थाने 'पुरुष'शब्द वापरला आहे, हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे 'अर्थाबाबत संदिग्धता' निर्माण होते.

**उपसंहार आणि निरीक्षण :**

'पुरुष' शब्दाचा, 'कोणीही एक व्यक्ती' ह्या अर्थाने, 'लिंगवाचक' अर्थाने आणि 'प्रयत्नवाचक' अर्थाने, केलेले प्रयोग हे, 'वैदिक आणि जैन' परंपरेत सामान्यतः दिसून येतात.

'पुरुष' शब्द वैदिक परंपरेत, तत्त्वज्ञान विषयक विचार मांडत असताना, 'विराट विश्वपुरुष', 'ब्रह्म','ब्रह्मदेव','यज्ञ', 'परमात्मा','परमेश्वर', 'जीवात्मा''आत्मा', अशा विविधप्रकारे ग्रंथात निर्दिष्ट केलेला दिसतो.

'जैन परंपरेत तत्त्वगणणा' करीत असताना, 'जीव' शब्दाचाच प्रयोग आढळतो. बाराव्या शतकापर्यंत, कोणत्याही तात्त्विक ग्रंथात, 'जीव' शब्दाला समानार्थी म्हणून, 'पुरुष' शब्दाचा, प्रयोग केलेला दिसत नाही.

प्रथमपासूनच जैनांनी, 'प्रत्येक 'जीव' हा स्वतंत्र आहे' असे मानले, व ह्या अर्थानेच

'आत्मा'(आदा, अत्ता, अप्पा, आया) शब्दाचा प्रयोग केला. त्यानी 'विराट विश्व पुरुष', 'ब्रह्म', 'ब्रह्मदेव', 'परमात्मा' ,'परमेश्वर' अथवा 'सगुण ईश्वर, यापैकी कोणत्याही अर्थाने, 'पुरुष' शब्द योजला नाही, कारण ह्या सर्व संकल्पना जैनांच्या, 'सैद्धांतिक मान्यतेशी' जुळणाऱ्या नाहीत.

बाराव्या शतकातील 'अमृतचंद्राचार्यांना', वैदिक परंपरेतील 'पुरुष' शब्दाबाबतची अर्थाची मतभिन्नता खचितच माहित आहे. तसेच पूर्वीच्या 'जैनाचार्यांनी', विशेषत: 'कुंदकुंदांनी आत्मवाचक' अर्थाने 'पुरुष' हा शब्द, 'आत्मा' अर्थाने प्रयुक्त केलेला नाही, हेही विदित आहे. 'पुरुषार्थसिद्ध्युपाय' ह्या आपल्या ग्रंथात त्यांनी, 'पुरुष' व 'पुरुषार्थ' हे दोन्ही शब्द', 'विचारपूर्वक आणि प्रयोजनपूर्वक' वापरलेला दिसतात. जैनेतर दार्शनिकांचे, 'जैन दर्शनाकडे' लक्ष वेधून घेण्यासाठी, त्यांनी हा प्रयास केला असावा. शिवाय 'पुरि शेते इति पुरुष' ही, 'वैदिकांची रूढ व्युत्पत्ति', त्यांना तत्त्वदृष्ट्या 'प्रत्येक जीव स्वतंत्र आहे' ह्या संकल्पनेशी सुसंगत वाटली असावी. 'धर्म,अर्थ,काम,मोक्ष,' रूप 'पुरुषार्थाचा' निर्देश वैदिक परंपरेत अनेकदा येतो. त्यांना अभिप्रेत असणाऱ्या अर्थाने, 'पुरुषार्थ' (पुरिसत्थ, पुरिसट्ठ) ह्या शब्दाचा प्रयोग, जैन परंपरेने त्यांच्या 'सैद्धांतिक विवेचनात' कधीही केला नाही. अमृतचंद्राचार्यांनीही ' पुरुषार्थ' शब्द जरी प्रयुक्त केला असला तरी, साधनरूप 'धर्म' पुरुषार्थाने, साध्यभूत ' मोक्षपुरुषार्थाची' सिद्धी, हाच अर्थ त्यांना अभिप्रेत आहे.

♦ अमृतचंद्राचार्यांनी ग्रंथाच्या शीर्षकात, 'पुरुषार्थ' शब्द उपयोजित करण्याचे अजूनही एक प्रयोजन असावे असे वाटते. 'इ.स.पू. पहिल्या शतकापासून, इ.स.च्या ११ व्या शतकापर्यंतच्या' जैन साहित्यात, 'कर्मसिद्धांत' स्पष्ट करणाऱ्या ग्रंथांची संख्या अतिशय विपुल आहे. 'अमृतचंद्रांना' जाणीव झाली असावी की, 'ह्या वाढत्या कर्मसाहित्याचा प्रभाव कर्मपरवशतेकडे वळतो आहे की काय?'अशा परिस्थितीत 'कर्मपरवशतेला' दुय्यम स्थानावर आणून, 'पुरुषार्थ' प्रथम स्थानी स्थापना करावी, अशी निकड त्यांना वाटली असावी.

'पुरुषार्थ' ह्या संकल्पनेला, जी 'ऐहिक प्रवृत्तिपरता पार्श्वभूमीप्रमाणे' होती, ती त्यांनी 'सैद्धांतिक क्षेत्रात मोक्षासाठी' प्रयत्नशील रहाण्याच्या रूपाने पुन्हा नव्याने, आणण्याचा प्रयत्न केला.

# संदर्भ–सूची


१) अथर्ववेद : १०.२.१ ते पुढच्या १० ऋचांमधे अशाप्रकारे पुरुषांच्या, मनुष्यांच्या शरीररचनेबाबत आश्र्चर्ययुक्त कुतूहल व्यक्त केलेले दिसते.

२) तैत्तिरीय उपनिषद : ब्रह्मानंद वल्ली (२) प्रथम अनुवाक् :२.१.२.१. अन्नमय कोश.

३) महाभारत : १२.८१.४०

४) भगवद्गीता : २.२१

५) आचारांग : १.३.२.११४

६) सूत्रकृतांग : २.१.६ ते १०

७) भगवती आराधना : ८५.

८) समयसार : १७, १७९, १९५, २२४ ते २२६, २३७, २८८ इ.

९) मनुस्मृति : १.९२

१०) मनुस्मृति : ९.२

११) कौटिलीय अर्थशास्त्र : अध्याय २०

१२) षट्खंडागम :१.१.१ सू. १०१.३४०

१३) महाभारत : १३.६.१३, १६, २२

१४) स्थानांग : १.४४; ३.७०, ७१, ३६४, ४६५; ६.५
ज्ञाताधर्मकथा : १.१.२०४ ; १.८.७९; १.१.१८९ ; १.१.२६५

१५) अथर्ववेद : १०.१.२.३०

१६) सांख्यकारिका : ३

१७) सांख्यकारिका : १८

१८) महाभारत : ५.४५.२७

१९) पंचसंग्रह : १.१०६

२०) धवलाटीका : १.१.१.१७१

२१) गोम्मटसार जीवकांड : २७३

२२) पुरुषार्थसिद्धयुपाय : ९,३,११,२२२,२२३

२३) ऋग्वेद :१०.९० ऋचा १ ते १५

२४) अथर्ववेद : १०.१.२.२९,२८

२५) शतपथ ब्राम्हण : १.३.२.१

२६) मुंडक उपनिषद : १.२.१३ ; १.३.९ ; १.१.७; १.२.११

२७) महाभारत : १२.४७.३९,२५

२८) भगवद्गीता : १३.२२

२९) भगवद्गीता : १५.१८ ते १८

## २) ''वैदिक परंपरेतील पुरुषार्थ व त्यांचे अविष्कार,आणि जैन परंपरेतील पुरुषार्थ व त्यांचे अविष्कार –'' यांची जीवनोपयोगितेच्या दृष्टीने 'समीक्षा'–

**प्रस्तावना –**

भारतीय सर्व दर्शने एकरंग नसून, त्यात विविधता आढळते. सर्व दर्शनांचे, 'स्वतंत्र तत्त्वज्ञान, स्वतंत्र विचारपद्धती' आढळतात. मात्र काही वैशिष्ट्ये अशी आहेत की, ज्यावर सर्व दर्शनांनी विचार केलेला आढळतो. ह्या वैशिष्ट्यांपैकी 'पुरुषार्थ' ही एक संकल्पना आहे, ज्याचा विचार सर्व दर्शनांनी केलेला दिसतो.

भारतीय विचारवंतांच्या चिंतनाची देन असणाऱ्या ह्या, 'पुरुषार्थ' विषयावर कोणाचीही मक्तेदारी नाही वा तसा दावा कोणीही करू नये. फक्त ह्या विषयावर 'कोणी, कधी व कसे चिंतन केले', हा मुद्दा महत्त्वाचा आहे.

ह्या विवेचनविस्तारासाठी, 'लक्ष्मणशास्त्री जोशी' यांचा 'वैदिक संस्कृतीचा विकास', श्रीनिवास दीक्षितांचे 'भारतीय तत्त्वज्ञान', शंकर रामचंद्र राजवाडे यांचे 'षड्दर्शन समन्वय आणि पुरुषार्थ मीमांसा', पंडित रंगनाथ पाठकांचे 'षडदर्शनरहस्य', प्रेमवल्लभ त्रिपाठीचे 'पुरुषार्थ चतुष्टय', अशा ग्रंथांचा आधार घेतला गेला आहे. ह्या आधाराने विषयाचा सूक्ष्म अभ्यास करून, क्रमवार मांडणी करून एकत्रित, सारांश दिला आहे.

'जैन दृष्टीने' वर्णन करण्यास, 'अर्धमागधी अंगग्रंथ, आणि  शौरसेनी षट्खंडागमापासून पंधराव्या शतकापर्यंतचे सैद्धांतिक ग्रंथ,' ह्यांच्या आधारे विषय प्रस्तुति केली आहे. ह्या विषयावरील, 'महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद अधिवेशनातील शोधनिबंधाचाही' आधार घेतला आहे.

**वैदिक साहित्याचा विकासक्रम :**

भारतीय परंपरेत महत्त्वाची म्हणून, मान्यता प्राप्त दर्शने, दोन सदरात विभागली जातात. (१) आस्तिक, (२) नास्तिक. सर्वसाधारणपणे 'परमेश्वराचे अस्तित्व व वेदप्रामाण्य' मानणाऱ्या दर्शनांना, 'आस्तिक' म्हटले जाते. साहजिकच 'जैन, बौद्ध, चार्वाक, सांख्य' ही दर्शने, 'नास्तिक' ह्या सदरात समाविष्ट होतात. 'वैदिक परंपरेत' रूढ 'पुरुषार्थ' संकल्पना ही, 'धर्म–अर्थ–काम–मोक्ष', अशा चार रूपात दिसते. त्यात 'अर्थ व काम' हे साधनरूप तर, 'धर्म व मोक्ष' हे साध्यरूप, असा मूलभूत विचार दृष्टीस पडतो. अधिक अभ्यासाअंति मात्र, ही संकल्पना प्रथमपासून ह्या रूपात नसल्याचे स्पष्ट जाणवते. त्यादृष्टीने विकासक्रमाचे टप्पे नमूद केले आहे.

१) वेदांचे 'संहिता, ब्राह्मणके, आरण्यके, उपनिषद' असे भाग आहेत. 'ऋग्वेदातील' धर्मभावना 'देवतांपुढे नम्र' होवून, त्यांच्या कृपेने 'इष्टप्राप्ती' अशी दिसते. 'वैदिकधर्म समाजाभिमुख –

प्रवृत्तिप्रधान' असल्याने, 'आनंदी, उत्साही, कार्यक्षम, आयुष्य जगणे', हीच जीवनाची सार्थकता दिसते. सामाजिक जीवन 'आशावादी बनवून, ऐहिक वैभवाची आकांक्षा बाळगून', त्यालाच प्राधान्य देवून, १०० वर्षे जगण्यासाठी, 'अर्थ', आणि वंशवृद्धिसाठी 'काम' पुरुषार्थ, असे स्वरूप आढळते. मात्र वेदांमध्ये 'धर्म-अर्थ-काम', अशा शब्दांचा उल्लेख आढळत नाही. 'वैदिक ऋचांमधील' जीवनाभिमुखता, यातून 'त्रिवर्गाचा' जन्म झालेला दिसतो. स्पष्टपणे 'पुरुषार्थांचा' निर्देश आढळत नाही. नीतिशास्त्राच्या दृष्टीने 'त्रिवर्गांचे' महत्त्व दिसते. जीवनाचे 'उद्दिष्ट व साध्य' भिन्न असल्याने, 'त्रिवर्गांचा' पुढे विस्तार झालेला दिसतो. त्यातूनच 'स्वर्ग' ही कल्पना साकारली जावून, स्वर्ग प्राप्तिसाठी 'धर्म' पुरुषार्थाचा विचार पुढे आला. त्यातूनच 'यज्ञसंस्था' विकसित झाली आणि 'क्रियाकांडप्रधानता' स्पष्ट दिसू लागली.

२) वैदिकांनी 'ऋण व आश्रम' संकल्पना एकमेकांशी जोडून, 'अर्थ-काम-धर्म' पुरुषार्थांचा विचार केलेला आढळतो. वैदिक परंपरेत 'नित्य' कर्मांना अत्यंत महत्त्व दिले गेले आहे. 'नित्यक्रम' मधेच सोडल्यास, 'संकल्पहानी होवून, पुरुषार्थाला धक्का' बसतो, अशी मान्यता दिसते. त्रिवर्गाने 'देव-ऋषि-पितरांची' ऋणे फिटतात, नंतर 'मोक्षार्थाची पात्रता' मानली गेली आहे. 'ऋणत्रयाची' परतफेड, हाच 'मोक्ष' अशी धारणा दिसते. त्यासाठी प्रत्येक 'आश्रमाची व्यवस्था, वेळ, नियम, पद्धती ठरवून', कटाक्षाने पालनावर भर दिला गेला. त्याच्या आधारेच प्रथम 'त्रिवर्ग' व अंतत: 'मोक्ष' पुरुषार्थाचा विचार केला गेला. कोणत्याही आश्रमाला 'हीन वा कनिष्ठ' न मानता, प्रत्येक 'कर्तव्याची पूर्ती यथासांग' करण्याचा आग्रह धरलेला दिसतो. किंबहुना संपूर्ण 'पुरुषार्थांची' सिद्धीच, प्रथम 'दोन आश्रमात' मानली गेली. थोडक्यात 'ऋण-आश्रम' महत्त्वातून, 'पुरुषार्थां'चा विचार दिसतो.

३) यज्ञीय कर्मकांडांच्या विरोधात, 'उपनिषदे' तयार झालीत. अंतर्मुखता वाढून, मौलिक 'तत्त्वचिंतनास' प्रारंभ झाला. 'चारवेद, शिक्षा, कल्प, व्याकरण, छेदस्, निरुक्त' ह्या सर्वांना 'अपरा' विद्या सांगून, 'अक्षर-अविनाशी' तत्त्वविद्येला 'परा' विद्या म्हटले. हा काळ 'महावीरांचा काळ वा थोडा आधीचाही' म्हणता येईल. उपनिषदांना 'ज्ञानकांड' ही म्हटले जाते. 'कर्मकांडाचा उबक वा कंटाळा, आध्यात्मवादी श्रमणांचा प्रभाव, काळानुरूप परिवर्तनांना स्वीकारण्याची इच्छा', ह्यामुळे विचारपूर्वक हा बदल घडला असावा. त्यामुळे मानवी जीवनाचे प्रयोजन, 'ज्ञानाने' ठरवणे सुरू झाले. ह्या सर्व बदलांमधून 'मोक्ष' पुरुषार्थाचा विकास झाला. शेवटी 'त्रिवर्गांच्या' जागी, 'पुरुषार्थ' संकल्पना रूढ झाली.

४) 'भारतीय धर्मशास्त्राच्या' इतिहासाच्या प्रगतीचे नवे युग दिसू लागले. 'वैदिकांनी' समाजविषयक विचारसरणीला, ऐहिकदृष्टी दिल्याचे 'मनुस्मृतीत' आढळते. 'संस्कारित धर्मपरिवर्तनाचा क्रम' त्यात आढळतो. त्यामुळे 'पुरुषार्थांवर' भर दिलेला दिसतो.

५) ‘वैदिकांनी’ मानवी जीवनातील ‘जीवनमूल्यांचा’ अभ्यास करून, ‘धर्म-अर्थ-काम’ ह्या संकल्पना, प्रथम ‘त्रिवर्गरूपाने’ विकसित केल्यात, ‘मूर्त रूप दिले व ते प्रत्यक्षात आणले.’ ह्या ‘त्रिवर्गांच्या’ आराधनेचे प्रतिक म्हणून, उपलब्ध ग्रंथांकडे दिशानिर्देश करता येतो. त्यानुसार ‘शास्त्ररचना, आचारपद्धती, जीवनमूल्ये’ ठरविली गेलीत. त्या प्रवृत्तिवादाला ‘पूरक व पोषक’ अशा रूपाने, ‘राजनीति व राजशासन’ विषयाला, ‘अर्थ’ पुरुषार्थाला समर्पित असे, ‘कौटिल्याचे अर्थशास्त्र’ रचले गेले. ‘वंशवृद्धी व जीवन जगण्यासाठी’ आवश्यक, अशा ‘काम’ पुरुषार्थावर, वात्सायनांनी ‘कामसूत्राची’ निर्मिती केली. ह्या दोन्हींपेक्षा श्रेष्ठ अशा ‘धर्म’ पुरुषार्थासाठी, ‘मनुस्मृती’ ग्रंथ रचला गेला. महाभारतातील ‘शांतिपर्व, अनुशासनपर्व’, अशा महत्त्वाच्या पर्वांमधूनही ‘धर्म, नीति, अध्यात्म, दैव-पुरुषार्थ संवाद’, अशा गंभीर, विस्तृत विवेचनातून ‘धर्माचा’ विचार आढळतो. नीतिशास्त्रात ‘भर्तुहरी, कामंदकीय’ ह्यांचा आवर्जुन निर्देश करावा लागेल. अशाप्रकारे प्रत्येक ‘पुरुषार्थासाठी’ स्वतंत्र ग्रंथ रचना झाल्यात. ‘उपनिषद्’ रूपाने ‘मोक्ष’ पुरुषार्थालाही रूजू केले व ‘महाभारत, पुराणे, धर्मशास्त्रे’, इत्यादित ‘चार पुरुषार्थांचे’ महत्त्व दिसू लागले. ‘पुरुषार्थरूपाने’, सर्व मानवी ‘प्रवृत्तींची व इष्टांची संगतवार व्याख्या व व्यवस्था’ लावली गेली. ‘प्रवृत्तिवादाशी’ प्रामाणिक राहून, ‘ग्रंथरूपाने सामाजिक बांधिलकी’ पूर्ण करून, यथायोग्य क्रमाने ‘निवृत्तीचा विचार’ स्वीकारला, हे स्पष्ट होते. सर्व ‘पुरुषार्थांना समानरूपाने’ स्थान देवून, ‘जीवनोपयोगिताच्या’ दृष्टीने तशा ग्रंथरचना करून, समन्वय साधला.

**जैन परंपरेतील ‘पुरुषार्थ’ व त्यांचे अविष्कार जीवनोपयोगिता :**

जैनदर्शन हे ‘नास्तिक, निवृत्तिवादी, आणि मोक्ष’ पुरुषार्थाचा, पुरस्कार करणारे आहे. जैन आगमात, प्रथमपासूनच ‘चारही पुरुषार्थांचा’ विचार दिसतो. ‘कुंदकुंदांसारख्या’ आध्यात्मग्रंथाचे प्रणेता असणाऱ्या आचार्यांनाही, ‘अष्टपाहुडातील’ भाव व शील पाहुडात ‘चार पुरुषार्थांचा’ उल्लेख केलेला दिसतो. (भा.पा. १६४, शी.पा. २९) ‘भगवती आराधना’ ह्या प्राचीन ग्रंथातही पुरुषार्थांचे उल्लेख आहेत. अर्थात तेथे सर्वत्र ‘मोक्ष’ पुरुषार्थाची श्रेष्ठता प्रकर्षाने वर्णन करून, ‘अर्थ व काम’ पुरुषार्थांची हेयता स्पष्ट केली आहे.

ह्या विषयाच्या गहन अभ्यासानंतर, विशेषचिंतनानंतर, एक स्पष्ट दिसते की, प्रत्यक्ष ‘व्यवहारात तीन पुरुषार्थांची प्रकर्षाने आराधना’ होतांना दिसते. प्रत्यक्षात ‘उत्तम-समृद्ध’ आयुष्य जगणे, ‘उत्तम अर्थ पुरुषार्थ, धर्माचे’ यथायोग्य पालन होत असतांना, त्या ‘पुरुषार्थांचे’ दृश्यअविष्कार, ‘जीवनोपयोगी साहित्य रचना’, यात मात्र कमतरता, असा विरोधाभास प्रकर्षाने जाणवतो. ‘ही कमतरता का, कशी, कोठे राहिली’, ह्याचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला आहे.

१) ‘जैन परंपरेतील’ ह्या अवसर्पिणीचे, ‘ऋषभदेव’ हे प्रथम तीर्थंकर होवून गेलेत. त्यांचा काळ

म्हणजे जणू, भारतातील 'सांस्कृतिक युगाचा' आरंभ होय. समाजातील स्त्री पुरुषांना, जीवनपयोगी साधनांचे 'उत्पादन व संरक्षण' यांचा, 'कार्य प्रवण करणारा' उपदेश त्यांनी दिला. 'कला, विद्या, वृक्षसंरक्षण - संवर्धन, अन्नप्रक्रिया, व्यापार, वस्त्र, रोगचिकित्सा, ग्रामनिर्माण' अशा अनेक कला शिकवल्या. कारण ही 'कर्मभूमी' होती, म्हणून त्यांनी 'प्रवृत्तिगामी विचार लक्षात घेवून, सर्व व्यवस्था केली व 'चारही पुरुषार्थांचा' प्रकर्ष ठेवला'. त्यामुळे त्यांच्यामागे 'जीवनोपयोगिता लक्षात घेवून, साहित्याची निर्मिती होणे' खरे तर, तर्कसंगत होते. त्यापैकी 'तत्त्वज्ञान, कर्म, योग, ज्योतिष, खगोल-भूगोल, आचार, निमित्तशास्त्र, न्याय, पर्यावरण' ह्या विषयांमध्ये लक्षणीय कामगिरी त्यांनी केली.

अ) जैन परंपरेने इ.स.पू. पाचव्या शतकापासून, 'प्राकृत भाषेतून तत्त्वचिंतनाचे', अव्याहत कार्य, जवळजवळ १००० वर्षांपर्यंत केलेले दिसते. 'दार्शनिक परंपरेला' साजेल असा, संस्कृत सूत्रबद्ध ग्रंथ 'उमास्वामींनी' लिहून, 'तत्त्वचिंतनाच्या परिपाकातून, जैनधर्माचे तत्त्वज्ञान' प्रांतातील योगदान स्पष्ट केले.

आ) जैन दर्शनाचा 'आधार व कणा' असणाऱ्या 'कर्मसिद्धांतावर', शेकडो ग्रंथरचना झाल्यात. 'तत्त्वज्ञान व आचार' ह्यांच्यातील सांगड घालणारा तो दुवाच ठरला. सर्व भाषांमधून, 'सूक्ष्म, परिपक्व आणि क्लिष्ट' अशा रचना करून, स्वतंत्र 'ज्ञानशाखाच' उभारली. अशी स्वतंत्र 'कर्मरचना' वैदिक परंपरेत आढळत नाही.

इ) 'योगविषयात' पाच ते चौदा शतकांपर्यंत, 'प्राकृत-संस्कृत' भाषेत अनेक ग्रंथरचना झाल्यात.

ई) 'ज्योतिष व निमित्तशास्त्र' विषयांवर ही विपुलरचना झाल्यात. 'सूर्य प्रज्ञप्ति, ज्योतिषकरंडक, गणिविद्या', ही प्रकीर्णके इत्यादींचा उल्लेख त्यात करता येईल. निमित्तशास्त्रातील 'जयपाहुडनिमित्तशास्त्र, अंगविज्जा, रिठ्ठसमुच्चय', असे प्राचीन ग्रंथ उपलब्ध आहेत.

उ) न्यायशास्त्रदृष्टीने 'अकलंक, पूज्यपाद, सिद्धसेन दिवाकर' इत्यादि आचार्यांनी, 'अनेकांतवाद' सिद्धांताच्या आधारे, 'स्याद्वाद व सप्तभंगी' नयाची पद्धती, न्यायक्षेत्रात आणली.

ऊ) 'अहिंसा, अपरिग्रह, समिति, गुप्ति, अनेकांतवाद', ह्या तत्त्वांमधून, 'जैनधर्म व आचार' पर्यावरणरक्षणास किती अनुकूल आहे, हे सांगणारे अनेक ग्रंथ आहेत. २१ व्या शतकातील 'मानवजातीला अपरिहार्य जीवनोपयोगी' विज्ञानाला, २५०० वर्षापूर्वीच जैनांनी सांगितले.

ए) विविध 'जीवनोपयोगी विद्यांवर', जैन महाराष्ट्री प्राकृतात लिहणारे, जैन श्रावक 'ठक्कुर फेरु' हे १४ व्या शतकातील असून, विविध विषयांवर', सात लघुग्रंथ' त्यांनी लिहीलेत. 'शास्त्रीयसाहित्य' ह्या संज्ञेला सर्वार्थाने योग्य ठरणारे हे कार्य, 'अद्वितीय पुरुषार्थ' म्हणावा लागेल.

सर्व विवेचनातून 'धर्म व मोक्ष' पुरुषार्थांसाठीचा, 'साहित्य पुरुषार्थ' उच्चतम कोटीचा

झालेला प्रकर्षाने दिसतो. सर्व विवेचनातून 'धर्म, आचार, तत्त्वज्ञान, मोक्ष, सिद्धांताचे महत्त्व' प्रकर्षाने अधोरेखित झालेले दिसते.

सतत 'चार पुरुषार्थांना' मानणाऱ्या जैनांनी, खऱ्या अर्थाने रोजचे जीवन, 'सुरक्षित, सहज, सुखकर' करणारी, 'शास्त्रे, कला, शिक्षण,' औपचारिक पद्धतीने शिकवता येतील, असे विषय वा ग्रंथ का नाही रचलेत, ह्याचे चिंतन केले आहे. 'जीवनोपयोगिता' ह्या निकषाने, हे ग्रंथ मूल्यांकन केले आहे.

**१) जीवविषयकशास्त्रे :**

षड्द्रव्यांपैकी एक 'जीव' द्रव्याला, 'अर्धमागधी व शौरसेनी' प्राचीन सैद्धांतिक ग्रंथांमधून विशेष स्थान आहे. जीवाचे 'अनंतत्व व स्वतंत्र अस्तित्व', याला अत्यधिक महत्त्व दिलेले दिसते. हे वर्णन, 'हालचाल, दृश्यता, मन, लैंगिकता, जन्म, योनि, शरीर, गति, इंद्रिय, लिंग, लेश्या, कर्म, प्राण, पर्याप्ति', अशा दृष्टीने आढळते. विविध निकष लावून केलेले हे वर्गीकरण, 'एकत्रित व समग्रपणे करणारा', जैनांसारखा एकही ग्रंथ, 'वैदिक परंपरेत' उपलब्ध नाही. ह्या 'सुंदर, विस्तृत, सूक्ष्म चिकित्सेत', अनेक 'जीवविषयकशास्त्रे' विकसित होण्याच्या शक्यता दडलेल्या असतांना, असे शास्त्र का रचले गेले नाहीत वा 'जीवनोपयोगी शास्त्र स्वरूपात' का उपयोग झाला नाही, ही 'चिंतनाची व तितकीच खेदाची' बाब आहे.

**२) आयुर्वेद :**

जैन साहित्यात 'आयुर्वेद' शीर्षकाखाली ३० ग्रंथांची माहिती दिसते. इ.स. ५ ते ७ शतकातील, आ. 'पूज्यपाद', 'समंतभद्र' यांनी रचित, 'सिद्धांतरसायन कल्प, पुष्पायुर्वेद, निदानमुक्तावली, नाडीपरीक्षा', इत्यादि ग्रंथांचे उल्लेख आहेत. ह्या 'पूज्य आचार्यांच्या' अन्य ग्रंथरचना उपलब्ध आहेत, मात्र वरील ग्रंथांपैकी एकही ग्रंथ आज मात्र उपलब्ध वा प्रकाशित नाहीत. १५ व्या शतकापर्यंत, 'आयुर्वेदावर' रचना झाल्यात, पण त्याही उपलब्ध नाहीत. ही उदासीनता का आली ?

**३) अर्थशास्त्र :**

जैन साहित्यात 'श्रेष्ठी, सार्थवाह, इभ्य, वणिक, व्यापारी' इत्यादि शेकडो उदाहरणे आढळतात. आगमकाळापासून 'वैश्यवर्ग, जैनधर्माचे' अनुसरण करणारा होता. ह्या व्यापारातील 'यश, अनुभव, कौशल्य', ह्यावरील परिपूर्ण ग्रंथ श्रावकांकडून का लिहिला गेला नाही ? 'वाणिज्य' ह्या विषयावर 'समग्र लिखाण करण्याची क्षमता' असूनही, ह्या 'अर्थ' पुरुषार्थाला दृश्यरूप का दिले नाही ?

**४) नीतिशास्त्र :**

जैन दर्शनात, 'साधू व श्रावक दृष्टीने, व्रत-अतिचार रूपाने, आचारप्रधान' ग्रंथ दिसतात. मात्र सर्वसामान्यांना 'समजेल वा पचेल' असे, साधे 'नीतिशास्त्र' वा 'तत्त्व' सांगणारे ग्रंथ दिसत नाहीत.

**५) कामसूत्र :**

'मोक्ष' पुरुषार्थाला प्राधान्य देणाऱ्या जैनांनी, सतत 'ब्रह्मचर्य व इंद्रिय' संयमाला महत्त्व दिले. म्हणूनच ह्या विषयावर ग्रंथ लिहिण्याचा प्रयास झाला नाही. मात्र 'जैन शिल्पकलेतून' 'मिथुनाकृतींचा' समावेश, हा विरोधाभास स्पष्टतः जाणवतो.

**६) गणित :**

जैन आगमात, 'आर्यभट्टांपूर्वी' कितीतरी शतके आधी, 'कालगणना, द्वीप, पर्वत यांचे मोजमाप, कर्मसिद्धांताच्या अनुषंगाने वर्णित बीजगणित, संज्ञा, समीकरणे', ही गणिताची गंभीरता दर्शवितात. महावीराचार्यांचा 'गणितसारसंग्रह' हा, गणितातील अग्रगण्य ग्रंथ, 'भास्कराचार्यांपेक्षा' सरस व प्रगत असल्याचे, अभ्यासक सांगतात तरी, हे नाव सर्वसामान्यापर्यंत पोहचले नाही. 'कर्मसिद्धांतातून गणित विषयाची प्रगल्भता' स्पष्ट होवूनही, 'गणितावरचा' स्वतंत्र ग्रंथ रचला गेला नाही वा उपलब्ध नाही, पुनःप्रयासही झाला नाही. ही उपेक्षा का झाली ?

**७) परमाणुवाद :**

'परमाणुवादाचे' श्रेय, 'कणादांच्या वैशेषिक' सूत्राला दिले जाते. जैन दर्शनात 'भगवतिसूत्र, उत्तराध्ययन, प्रज्ञापना, पंचास्तिकाय, तत्त्वार्थसूत्र', इत्यादि ग्रंथामधून 'पुद्‌गलविचार' दिसतो. हे परमाणु विवेचन, 'विज्ञानाशी सुसंगत', खूपच वेगळे आहे. जैनशास्त्रात 'पृथ्वीकायिकांच्या' विचारात, अनेक 'खनिजे, धातुंचा' उल्लेख आहे. ह्यातून 'भौतिकविज्ञान, रसायनविज्ञान', विकसित होण्याच्या प्रचंड शक्यता असतांनाही तो मार्ग खुंटला. 'अणुला अनादिमानून, कोणालाही अधिष्ठता' मानले नाही. अगदी 'भौतिकविज्ञानाला' साजेल असे विधान असूनही, पुढे विकास न झाल्याने, 'परमाणुवादाचे श्रेय वैशेषिकांकडे' गेले.

**८) व्याकरण :**

प्राकृत वैयाकरणांच्या, ६ व्या शतकापासून पुढच्या काळातल्या रचना दिसतात. त्यात ६ व्या शतकातील 'वररुचि' व १२ व्या शतकातील 'हेमचंद्र' हे दोन आहेत. मात्र 'हेमचंद्र' वगळता, प्राकृत व्याकरणातील, 'जैन वैयाकरणांचा' स्वंत्रत ठसा, वैदिक परंपरेतील 'पाणिनी, पतंजली', त्यांच्यासारख्या जाणवत नाही.

**९)** ह्या व्यतिरिक्त जैनांची स्वतंत्र 'कायदेव्यवस्था' दिसत नाही. 'नाट्यशास्त्र, सट्टक, काव्य', अशी ग्रंथरचना आढळत नाही.

अधिक चिंतनातून दिसते की, 'अतिनिवृत्तिपरता' यामूळे 'प्रवृत्तीला' खीळ बसली. 'व्यवहार-निश्चयाचे' महत्त्व सांगणाऱ्या जैन दर्शनाने, व्यवहारात 'उपयुक्त' हा 'पुरुषार्थ' साधला नाही. 'धर्म व मोक्ष' परमाप्राप्तव्य असले तरी, कर्मभूमीत धर्मयुक्त 'अर्थ व काम' रूपाने 'प्रवृत्ति' आवश्यकच आहे तर, असे 'जीवनोपयोगी' ग्रंथ का रचले नाहीत. ह्याची 'कारणामीमांसा' ह्या वरील विवेचनाच्या आधारे केली आहे.

१. जैन परंपरेत 'साधू व श्रावक' असे दोन स्वतंत्र मार्ग आहेत. श्रावकांसाठी 'कार्यप्रवणता' व साधूंसाठी' निरासक्ति व निवृत्तिपरता', असा ऋषभदेवांचा उपदेश दिसतो. 'श्रावकांच्या' प्रेरणेने, 'साधूंव्दारा' ग्रंथरचना झाल्यात म्हणून, 'ऐहिक विषयांवरील ग्रंथनिर्मितीला' प्राधान्य दिले गेले नाही. साधूंच्या प्रेरणेने, गृहस्थांकडून 'कला' शिल्प इत्यादिंचे, दृश्य 'पुरुषार्थ' घडले मात्र, 'लेखनाचा पुरुषार्थ' न झाल्याने, 'अर्थ व काम' पुरुषार्थवरच्या रचना होवू शकल्या नाहीत.

२. 'आयुर्वेदविकसित' होवू शकणारी 'वनस्पतिविषयक', विपुल माहिती 'सिद्धांत ग्रंथात' असूनही, 'वर्गवारी, गुणधर्म, प्रयोगाने औषधनिर्मिती', अशी वाढ होवू शकली नाही. 'एकेंद्रिय हिंसा त्याग,' हा दृष्टीकोन असल्याने, 'नवे संशोधन थांबले आणि जुने दुर्लक्षिले गेले, संरक्षणही झाले नाही व ते लुप्त' झालेत. 'आहारदृष्टीनेच वनस्पति-चिकित्सा' अधिक झाल्याने, 'उपयोगी औषधे' बनण्याकडे दुर्लभ झाले. तसेच 'जीवद्रव्याचा' सूक्ष्मविचार उपलब्ध असूनही, 'अहिंसेच्या महत्त्वामुळे, प्राणिविज्ञान, शरीरविज्ञान' ह्या शाखा विकसित होवू शकल्या नाहीत.

३) 'वाणिज्यविषयक' ग्रंथनिर्मितीला आवश्यक, 'सर्व अनुकूलता, सुबत्तता, कौशल्य' असूनही, पुढच्या पिढीला मार्गदर्शन करणारा, अनुभवाधार ग्रंथ, झाला नाही. 'श्रावकांची उदासीनता, दूरदृष्टीचा अभाव, शिक्षणाचे महत्त्व न जाणणे, शिस्तबद्ध शिक्षणाकडे दुर्लक्ष, 'स्व' उन्नतीचा ध्यास, व्यासंगाची कमतरता', हीच कारणे निमित्त ठरलीत.

४) 'साधू वा श्रावकाचारातून' सद्वर्तनाला पोषक असे अनेक शास्त्रे आहेत. परंतु 'पारिभाषिक शब्द, व्रत-अतिचारांची कठीनता, जुन्या शब्दांची क्लिष्टता, काळानुरूप न झालेले भाषा बदल', ह्या कारणांमुळे ते दुर्लक्षिले गेले. सर्व सामान्यांना आकर्षित करणाऱ्या, 'अलंकार, दृष्टांत उदाहरणांनी युक्त, नीतिपर उपदेश शब्दबद्ध' झाला नाही. 'नवी पीढी जुने शास्त्र वाचेनाशी झाली' आणि 'सदाचार, नीति' दूर जावू लागली

५) जैनांनी अंतिम प्रयोजन 'मोक्ष' मानून, 'धर्माला' साधन मानले. 'आचारशास्त्रात' 'ब्रह्मचर्यपालन, इंद्रियसंयम', यांचेच महत्त्व प्रतिपादिले आहे. जैनांनी सर्व जीवांना 'चार संज्ञा' सांगितल्या. ह्या नैसर्गिक अंतः प्रवृत्तीला, जैनांनी स्थान दिले नाही. वैदिकांनी 'कामसूत्र' रचले तरी, 'वाच्यता, वचन, पठनावर' बंदीच दिसते. ह्या 'नैसर्गिक संज्ञेविषयी' असणारी, 'गूढता, गोपनियता', हीच आजच्या 'व्याभिचाराचे' कारण असावे असे वाटते.

६) आगमात ‘जातिस्मरण, बोधि, वैराग्य’, इत्यादी होण्यात, ‘नृत्य, नाटक’ ह्यांचे निमित्त झाल्याची अनेक उदाहरणे दिसतात. नाटकासारखे ‘प्रभावी, सशक्त, लोकानुरंजन, समाजप्रबोधनाचे’, साधन असतांनाही, त्याचा वापर केला गेला नाही. त्याला ‘विकथांचा’ दर्जा देवून, ‘अनाचारात’ ठेवले गेले. वास्तविक हा निषेध ‘साधूवर्गासाठी’ असला तरी, ‘श्रावकांसाठीही’ तो निषिद्ध ठरला. ह्या ‘‘mass media,’’तंत्रज्ञानाच्या जगतात, त्याची निकड असूनही, ‘अनुकूलता’ असतांनाही, जनसामान्यांपर्यंत पोहचण्याच्या ‘उर्मीचाच’ अभाव दिसतो.

७) ‘निरीक्षण’, तर्क, अंतःप्रेरणा,’ ह्यातून केलेले, ‘पुदगल, परमाणु,’ वर्णन आहे. अधिक ‘परीक्षण, निरीक्षण, प्रयोग’ झाले असले तर, ‘धर्म-अधर्म द्रव्यांच्या’ चिंतनातून ‘गुरुत्वाकर्षणाच्या’ सिद्धांतापर्यंत जैन गेले असते. ‘प्रमाण-नयाच्या’ आधाराने, उत्तम प्रकारे विकसित ‘अनेकांत’ , फक्त ‘तत्त्वज्ञान’ प्रांतात न राहता, ‘व्यावहारिक, भौतिक, विज्ञानदृष्टीने,’ विकसित झाला असता तर, ‘सापेक्षतावादापर्यंत’ पोहचण्याची क्षमता जैनांमधे होती. ह्याचा पुरावा म्हणून, Aidan Ranicin याने The Jain path (Ancient wisdom for an age of Anxiety ), ह्या पुस्तकात ‘आइनस्टाइनचे’ उद्गार आहे. ते म्हणतात की, I do not know it there is rebirth or not or life after death. But if it is true, then I would like to be born in India as a Jain.

अशा ‘जगद्विख्यात वैज्ञानिकाची’ ही ‘मानवंदना’, सार्थक झाली असती जर, मूलगामी ‘तत्त्वचिंतन धार्मिक क्षेत्रापर्यंत मर्यादित न राहता, जीवनोपयोगितेकडे’ वळवले गेले असते. त्यातून अनेक ‘वैज्ञानिक सिद्धांत, जैनसिद्धांताच्या’ आधारे निर्माण झाले असते.

८) जैनसमाजाची ‘अल्पसंख्याकता’ ह्या कारणाने, स्वतंत्र ‘आचारसंहिता’ असूनही, ‘स्वतंत्र कायदा’ विकसित झाला नाही.

९) जैनसमाजात ‘सर्वज्ञप्रणीत’ उपदेशावर शंका, हा दोष मानला आहे. त्यामुळे ‘नैसर्गिक जिज्ञासुवृत्ती’ विकसित झाली नाही. ‘व्यापार, उद्योग, अर्थार्जन, ऐहिक भोगांची प्रचुरता, व्यस्तता,’ ह्यात गुरफटलेल्या श्रावकांची ‘साहित्यउदासीनता, वा त्याचे दुय्यम स्थान,’ ह्यानेही हा मार्ग खुंटलेला जाणवतो.

**निष्कर्ष** :

भगवान ‘ऋषभदेवांनी’ देश-काल, परिस्थिती लक्षात घेवून, मानवाला ‘सुसंस्कृततेकडे नेणाऱ्या जीवनोपयोगी’ अशा अनेक ‘विद्या व कलांचे’ प्रचलन केले. त्यांच्या कर्तृत्वामागची ‘गृहस्थलक्षी प्रवृत्तिप्ररता’ विशेष लक्षणीय दिसते. त्यांच्या ‘त्रिवर्गात,’ भरताने ‘विद्या-कलांना, अध्ययन-अध्यापनाच्या’ चौकटीत बसवून, शिक्षण परंपरासाठी ‘ब्राह्मण वर्णाची’ स्थापना केली. महावीरांनी ‘निरीक्षण, तर्क, अध्यात्मिक अंतःप्रेरणा’, ह्या आधारे कालानुरूप परिवर्तने

केलीत. ‘साहित्यनिर्मितीचा पुरुषार्थ साधूंकडून झाल्याने, ‘प्रवृत्तिपरता व जीवनोपयोगिता’ कमी झाली. ‘द्रव्य-क्षेत्र-कालानुरूप’ होणारे परिवर्तन थांबले.

‘वैदिकांनी प्रवृतिपरता’ स्वीकारली, मानली, जीवनात उतरवली व ग्रंथरूपाने दृश्यरूपात सादर केली. ‘जीवनउद्दिष्ट व अंतिमलक्ष्य,’ ह्यातील अंतर स्पष्टतः वेगळे ठेवले. ‘चार पुरुषार्थांचा’ स्वीकार करून, यथायोग्य ‘विचार व सादरीकरण’ केले.

जैनांनी चारही ‘पुरुषार्थ’ मानले मात्र, ‘निवृत्ति’ प्रकर्षाने स्वीकारली. ‘साधू-श्रावक’ स्वतंत्र मार्ग असतांना, ‘श्रावकांकडून प्रवृत्तीत’ कसूर राहिली. व्यवहारनयाने ‘प्रवृत्ति’ महत्त्वाची असल्याने, ‘अर्थ-कामाचे’ पालन ‘धर्म’ चौकटीत केले. ह्या अविष्कारांचे दृश्यरूप, सादर करण्यात मात्र कमी पडले. ‘निवृत्ति’ ह्या अंतिम ध्येयाचा पगडा, व्यवहारातील ‘प्रवृत्तीच्या’ वरचढ, श्रेष्ठ ठरला. साधूंकडून ‘आदहिंद च कादव्वं’ उपदेशामुळे, ‘परहिंद च कादव्वं’ दुर्लक्षिले गेले. पंचमकाळात ‘तीर्थंकर परंपरा, गणधर, प्रगल्भ ऋद्धिधारी आचार्य,’ ह्यांचा अभाव म्हणूनही, ‘द्रव्य-क्षेत्र-काल-भावानुरूप’ होणाऱ्या बदलाला खीळ बसली असावी.

## ३) जैन दार्शनिक ग्रंथात 'पुरुषार्थ' शब्दचा शोध – चारही'पुरुषार्थांचे उल्लेख, स्वतंत्र विस्तार, विचार, वेगवेगळेपणा

**प्रस्तावना –**

भारतीय सर्वच दर्शनांनी, 'धर्म- अर्थ-काम-मोक्ष', ह्या पुरुषार्थांचे चिंतन केलेले आढळते. 'लौकिक असो वा पारलौकिक,' सर्वच क्षेत्रात,'पुरुषार्थाशिवाय' काही साध्य होवू शकत नाही, हे त्रिवार सत्य अहे.'पुरुष' हा'पुरुषार्थ' प्रधान म्हटला जातो. हा 'पुरुषार्थ' स्वार्थ व परार्थ, अशा दोन प्रकारचा मनला आहे. स्वत:च्या 'ऐहिक वा लौकिक', प्रयोजनाची सिद्धी, हा 'स्वार्थ पुरुषार्थ' आहे. त्यासाठी 'इंद्रिय, मन, बुद्धी,' इत्यादींच्या आश्रयाने 'कर्म'करणे आवश्यक ठरते. ह्याच अनुषंगाने, ' अर्थ व काम' पुरुषार्थाचा विचार,'साधन' रूपाने केलेला दिसून येतो. 'ऐहिक सिद्धिसाठीचा' हा प्रयास, अर्थातच 'संसारभ्रमणात निमित्त ठरतो. ह्या उलट 'धर्म' पुरुषार्थ व्यापक असून, दोन्ही 'पुरुषार्थ' साधणारा आहे. किंबहुना ' धर्माने' प्राप्त 'अर्थ,व'धर्मसहित काम' पुरुषार्थ, ऐहिक सुख तर देतातच, पण परंपरेने 'मोक्षालाही' नेणारे ठरतात. अंतिम 'मोक्ष' पुरुषार्थतर, साक्षात् 'कल्याणकारीच' आहे. 'धर्म' हा नीतिप्रधान असल्याने, 'आचारविचारांशी' संबंधित असून, तोच पुढे 'मोक्षाप्रत' नेतो. जैन दर्शन 'निवृत्तिप्रधान असल्यानेच, 'मोक्ष' पुरुषार्थाचे' महत्त्व अधिकच दृढतेने वर्णिले आहे.

**स्वरूप –**

भारतीय सर्वच दर्शनांनी 'पुरुषार्थांचा' विचार केला असून, त्याबाबतची भिन्न भिन्न मते आढळतात. जैन आगमातही त्याचे अनेक उल्लेख अढळतात.

१) अमृतचंद्राचार्यांनी ' आत्म्याचे प्रयोजन जाणून, त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न करण्याला, 'पुरुषार्थ' म्हटले आहे. त्यांनी पुढे म्हटले की, (पु.सि.उ.९, ११, १५)

''आस्ति पुरुषश्चिदात्मा विवर्जित: स्पर्शगंधरसवर्णे:। गुणपर्ययसमवेत: समाहित: समुदयव्ययध्रौव्यैः।।''

'' सर्व विवर्त्तोत्तीर्ण यदा य चैतन्यमचलमाप्नोति।भवति तदा कृतकृत्य: सम्यक्पुरुषार्थ-सिद्धिमापन्न:।।''

''विपरिताभिनिवेशं निरस्य सम्यग्व्ययस्य निजतत्त्वम्।यत्तस्मादविचलनं स एव पुरुषार्थ-सिद्ध्युपायोऽयम।।''

* अर्थात, तो पुरुष(आत्मा) 'चैतन्यमय असून, स्पर्श, रस, गंध, वर्णरहित, गुण-पर्यायसहित असून, उत्पाद-व्यय- ध्रौव्ययुक्त' अहे.

* जेव्हा 'अशुद्ध आत्मा सर्व विभावांना दूर करून, निष्कंपचैतन्य स्वरूपाला प्राप्त करतो, तेव्हाच तो आत्मा त्या सम्यक् प्रकाराने, पुरुषार्थाच्या प्रयोजनाच्या सिद्धीला प्राप्त करून कृतकृत्य होतो'.

* 'विपरीत श्रद्धानाला दूर करून, निजस्वरूपाला योग्यप्रकारे जाणून, जो त्या निजस्वरूपापसून च्युत होत नाही वा च्युत ना होणेच, त्या 'पुरुषार्थाच्या सिद्धीचा' उपाय आहे'. आ.अमृतचंद्रांनी ह्या 'पुरुषार्थसिद्ध्युपायं' ग्रंथात, 'व्यवहार-निश्चयनयाने' योग्य मार्गदर्शन करून, 'पुरुषार्थाच्या उपायांचा, साधनांचा,' सूक्ष्म आढावा घेतला आहे.

२) आ.शुभचंद्र ज्ञानार्णव ग्रंथात म्हणतात की, (३।४,५)

'' धर्मश्चार्थश्च  कामश्च मोक्षश्चेति महर्षिभिः। पुरुषार्थोऽयमुद्दिष्टश्चतुर्भेदः पुरातनैः''।

'' त्रिवर्गं तत्र सापायं जन्मजातङ्क दूषितम् । ज्ञात्वा तत्त्वविदः साक्षाद्यनन्ते मोक्षसाधने''।।

अर्थ - 'महर्षिंनी 'धर्म, अर्थ, काम व मोक्ष' हे चार प्रकारचे पुरुषार्थ सांगितले आहेत. त्या चारपैकी प्रथम 'तीन पुरुषार्थ नाशसहित व संसाररोगांनी दूषित आहेत,' हे जाणून 'ज्ञानी, अंतिम, परम मोक्षपुरुर्षाच्या' मागे लागतात.

३) 'मोक्ष' पुरुषार्थाची 'महानता व उपादेयता' सांगतांना आचार्य म्हणतात की,

''धम्महँ अत्थहँ कम्महँ वि एयहँ सयलहँ मोक्खु।उत्तमु पभणहिं णाणि जिय अण्णे जेण ण सोक्खु''।। (प. प्र.२/३)

अर्थ - 'धर्म-अर्थ-काम' ह्या सर्व पुरुषार्थांमधे, 'मोक्षालाच' ज्ञानी पुरुष 'उत्तम' म्हणतात, कारण अन्य तीन 'पुरुषार्थांमधे परमसुख' नाही.

४) 'अर्थ व काम' पुरुषार्थाची 'हेयता' आणि 'धर्म' पुरुषार्थाची कथचित् 'उपादेयतां' 'भगवती आराधना' ग्रंथात सांगितली आहे.

''असुहा अत्था कामा य हुंति देहो य सव्वमणुयाणं ।
एओ चेव सुंमो णवरि सव्वसोक्खयरो धम्मो ।।'' १८०७

''इहलोगियपरलोगियदोसे, पुरिसस्य आवहइ णिच्चं ।
अत्थो अणत्थमूलं महाभयं मुक्तिपडिपंथो ।।'' १८०८ ।।

''कुणिमकुडिभवा लहुगत्तकारया अप्पकालिया कामा ।
उवधो लोए दुक्खावह य ण य हुंति ते सुलहा'' ।। १८०९ ।।

अर्थ - 'अर्थ, काम,' सर्व मनुष्यांचे देह अशुभ आहेत. 'धर्मच' सुखाची खाण असून, शुभ आहे. अन्य सर्व अशुभ आहे.

*'अर्थ' सर्व अनर्थांचे मूळ आहे. 'अर्थ' प्राप्तीने व्यसनात लिप्त व्यक्ती, इह-पर लोकात दुःख भोगतो. महानभयांचे मूळ असणारे अर्थ, 'महाभय' रूप आहे.

* 'काम' अपवित्र शरीरसंयोगाने उत्पन्न होतो. त्याने आत्मात हीनता येते, (लघुता) त्याच्या

सेवनाने 'दुर्गतीत दुःख' प्राप्त होतात.

५)'अष्टपाहुड' ग्रंथात, 'भावपाहुडाच्या' समाप्तीत आ. कुंदकुंदांनी म्हटले आहे की,

''किं जंपियेण बहुणा अत्थो धम्मो य काममोक्खो य। अण्णे वि य वावारा भावम्मि परिट्ठिया सव्वे''।।१६४।।

'शीलपाहुडात' मोक्षप्राप्ती कोणाला होते वा होत नाही, हे वर्णन करतांना, (गा-२९)

''जे सोधंति चउत्थं पिच्छिजंता जणेहिं सव्वेहिं' ।।

ह्या श्लोकात 'चउत्थं' हा शब्द, चतुर्थ 'मोक्ष' पुरुषार्थ वाचक सांगितला आहे.

कुंदकुंदाच्या 'अध्यात्मप्रधान' ग्रंथातील, 'पुरुषार्थ' शब्दाचा हा उल्लेख, ह्या 'चार परुषार्थावर' अधिकच प्रकाश टाकणारा आहे. ह्या उल्लेखातून 'जैनांनी' सतत चार 'पुरुषार्थांचा' केलेला पाठपुरावा आणि सतत 'मोक्षाला' दिलेले महत्त्व, अधिकच स्पष्टतः उजागर झाले आहे.

**मोक्षमार्गाचा यथार्थ पुरुषार्थ :**

'आत्म्याचे हित मोक्षप्राप्तीत' असून, तो 'मोक्षमार्ग आचार्यांनी रत्नत्रयरूप' सांगितला आहे. (त.सू.१) आ. कुंदकुंदांच्या मतानुसार (प्र.सा.१२६) 'ज्याने निश्चयाने स्व-पर द्रव्याला सम्यक् रूपाने जाणले, विवेक प्राप्त केला, तोच मोहाचा क्षय' करू शकतो. कारण 'बंधमार्ग वा मोक्षमार्ग', दोन्हीत 'आत्मा' एकटाच आहे. हे 'सम्यग्ज्ञान एकत्वभावनेकडे' नेणारे ठरते. ही 'स्व' उन्मुखता 'विभावांना' दूर करते आणि 'विपरीत श्रद्धा' दूर करते. ही 'आत्मनिश्चलता, निष्प्रकंपता', हाच खरा 'पुरुषार्थ' म्हटला आहे.

**'पुरुषार्थाची' मुख्यता-गौणता :**

जैन दर्शनातील 'मोक्ष' पुरुषार्थाचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. त्या मोक्षप्राप्तीत 'सम्यग्दर्शनाचे, रत्नत्रयाचे,' महत्त्व अनन्यसाधारण आहे. अर्थात हा 'मोक्ष' पुरुषार्थ, 'पुरुषार्थाधीन' आहे हे ही सत्य आहे.

आचार्यांनी[१] 'पुरुषार्थ' विषयाचे कथन गौण-मुख्य विवक्षेने केले.

''जिनउपदेशांच्या पालनाने, मोह-राग-द्वेष दूर करून, प्रयत्नपूर्वक 'मोहाचा क्षय', हा पुरुषार्थाने' होतो''. नुसत्या सम्यग्ज्ञानाने मोक्ष नसून, 'पुरुषार्थांची' प्रधानता आहे. कारण 'भाग्याच्या आश्रयाने' न थांबता, सतत 'पुरुषार्थ' करणारा, अनादिकालीन बद्ध कर्मांना, काळापूर्वी नष्ट करू शकतो. आगमात वर्णित 'तप, उदीरणा, ध्यान', इत्यादींनी निर्जरा सांगितली आहे. 'निर्जरेत पुरुषार्थाची प्रधानता', ही त्यातून स्पष्ट होते.

अशाप्रकारे 'पुरुषार्थ' शब्दाचा आढावा घेतला गेला आहे. ह्या 'चार पुरुषार्थांचे' स्वतंत्र कथन, थोडक्यात विषयविस्ताराने केला असून, गहनचिंतन-मननातून स्पष्ट झालेला 'पुरुषार्थ'

निदर्शनास आणला आहे.

**१) 'धर्मपुरुषार्थ'– भूमिका :**

'निवृत्तिप्रधान' जैन दर्शनाने, 'मोक्ष' ह्या अंतिम 'पुरुषार्थाला' श्रेष्ठ म्हटले आहे. ह्या 'पुरुषार्थाची प्राप्ती, 'धर्म' पुरुषार्थाच्या सहाय्याने म्हटली आहे. त्यामुळे ह्या 'धर्म' पुरुषार्थाचा समग्रपणे विचार केलेला दिसतो. किंबहुना संपूर्ण आगम ग्रंथ हे, 'धर्म' पुरुषार्थाला वाहिलेले आहेत. 'धर्म' म्हणजे 'वस्तूचा स्वभाव' होय. 'निश्चयनयाने' तर, तो 'अतिंद्रिय आनंदच धर्म' आहे, वा 'तो आनंद ज्या अनुष्ठांनी प्राप्त होतो, त्याला धर्म' म्हटले आहे. अगदी ढोबळपणे हा 'धर्म', 'बाह्य व अंतरंग' अशा दोन रूपाने कथन केला जातो. 'पूजा, पाठ, दान, शील, व्रत' इत्यादि बाह्यधर्म असून, 'साम्यता व वीतरागभावाची साधना', अंतरंगधर्म वा निश्चयधर्म म्हटला आहे. बाह्य वा व्यवहारधर्मात, 'सम्यग्दर्शन,' असेलच असे नाही, त्यामुळेच 'औपचारिकता, कृत्रिमता,' आधिक असल्याने, 'पुण्याचाच' विचार प्रामुख्याने असतो. 'निश्चय वा अंतरंग धर्म' स्वाभाविक असून, 'सम्यग्दर्शनयुक्त' असते. 'साम्यतेची स्थिरता' त्यात अधिक असते. 'साम्यतेच्या प्राप्तिसाठी असणारा 'व्यवहार धर्म, निश्चयधर्मात सहाय्यक' मानला जातो.असा व्यवहार धर्म 'सागार–अनगार' रूप सांगितला आहे.

**विषय विस्तार :**

ह्या 'धर्म' पुरुषार्थाचा अधिक विस्तार आगमात केला आहे. ह्या विस्तृतविवेचनात,

१) धर्माचे लक्षण[२] – भेद सांगतांना, ''संसारापासून रक्षण करून स्वभावाला धारण करणारा, अहिंसा व दयारूप धर्म, रत्नत्रयधर्म, व्यवहार–निश्चयधर्म, शुद्धात्ममयपरिणती,'' अशा दृष्टीने विचार केला आहे. धर्माचे भेद, 'उत्तमक्षमादिरूप, मुनी–गृहस्थधर्म,' असा विचार केलेला दिसतो.

२) जैन दर्शनाने 'रत्नत्रयाच्या एकतेने' मोक्षमार्ग सांगितला आहे. त्यामुळेच प्रत्येक 'तत्त्व, द्रव्य' वा विषयकथनाला, 'सम्यग्दर्शनाच्या' कसोटीवर तपासून बघितले जाते. 'धर्म' ह्या विषयकथनातही, 'सम्यग्दर्शनाचे[३] स्थान व महत्त्व' स्पष्टपणे नमूद केले आहे. ''सम्यग्दर्शनाला धर्माचे 'मूळ' म्हटले आहे. सम्यक्त्वयुक्त धर्मानेच 'मोक्ष' मानला आहे. 'सम्यक्त्वरहित' क्रियांना धर्माचे स्थान दिले नाही, किंबहुना परमार्थातः त्याला 'अधर्म व पापरूप' सांगून, 'वृथा व अकिंचित्कर' म्हटले आहे''.

३) जैन दर्शनात, 'तत्त्व व द्रव्य,' कोणतेही कथन, 'निश्चय–व्यवहार' विवक्षेने केले जाते. 'धर्म' पुरुषार्थातही, 'निश्चयधर्माची' कथंचित् प्रधानता सांगितली आहे[४]. त्यात निश्चय धर्मालाच 'भूतार्थ' म्हटले आहे. 'शुद्धोपयोगात' धर्माचे सर्व लक्षण अंतर्भूत मानले आहे. 'निश्चयधर्मात

व्यवहारधर्म' असतोच. निश्चयरहित व्यवहार, 'व्यर्थ, वृथा' म्हटला आहे. त्याचे महात्म्य वर्णिले आहे.

४) 'निश्चयासह व्यवहाराचे' कथन करणे ही, 'जैन आगमांची' खास शैली आहे. त्यानुसार व्यवहारधर्माची[५] कथंचित् गौणता सांगतांना म्हणतात की, ''हा धर्म ज्ञानी, अज्ञानी दोन्हीसाठी संभव आहे. ह्यात 'परमार्थ' जाणला जात नाही म्हणून, व्यवहारातच रुचि ही, मिथ्यात्व म्हटली आहे. म्हणूनच परमार्थतः व्यवहार धर्म हा, दुःखरूप वा अपराध आहे, मोह व पापरूप असून अकिंचित्कर आहे, कथंचित् हेय आहे''.

५) व्यवहार धर्माची प्रधानता[६], 'निश्चयाने साधन म्हणून, कथंचित् इष्टता, महत्त्व, अशा दृष्टीने कथन केली आहे.'

६) 'अनेकांतवादाचा' आश्रय घेणारे 'जैन दर्शन,' एकांत, कथन करीत नाही. म्हणून शेवटी 'निश्चय-व्यवहार' धर्माचा समन्वय साधतात. त्या कथनात[७], ''निश्चयधर्माच्या प्रधानतेचे कारण, व्यवहारधर्माच्या निषेधाचे कारण, प्रयोजन, त्याच्या त्यागाचा उपाय व क्रम, व्यवहाराला उपादेय म्हणण्याचा हेतू, श्रावकदृष्टीने व्यवहाराची मुख्यता, चारित्र दृष्टीने विवक्षा, व्यवहार-निश्चयधर्माची परस्पर सापेक्षता वर्णिली आहे.'' 'व्यवहार- निश्चय' धर्माची 'गौणता-मुख्यता' सांगितल्यावर त्यांचा बंध-मोक्ष,' कारणपणा सांगतांना[८], ''निश्चयधर्म साक्षात् मोक्षाचे कारण, फक्त व्यवहार मोक्षाचे कारण नाही. व्यवहारधर्म संसाराचे कारण, बंधाचे कारण, पुण्यबंधास कारण, सम्यग्दर्शनयुक्त व्यवहारधर्माने विशिष्ट पुण्याची प्राप्ती, त्याने निर्जरा व परंपरेने मोक्षप्राप्ती, तात्पर्य,'' असा विस्तारपूर्वक विषय मांडला आहे.

७) दशधर्माचा[९], 'निर्देश, लक्षण, उत्तम, विशेषण, स्वामी, हेतू,' असा विषयविस्तार केला आहे.

**उपसंहार -**

१) ऐहिक, पारलौकिक सर्वच सिद्धिंसाठी, 'पुरुषार्थाची' श्रेष्ठता, सर्वच दर्शनांनी मान्य केलेली दिसते.

२) सर्व प्रकारच्या प्रयोजनसिद्धिसाठी, 'धर्माची' आवश्यकता मानली आहे. धर्मयुक्त 'अर्थ व काम' फलदायी मानले तरी, 'मोक्ष' हाच साक्षात् कल्याणकारी 'पुरुषार्थ' म्हटला आहे.

३) 'पुरुषार्थ' शब्दाचा उल्लेख, 'पुरुषार्थ-सिद्ध्युपाय, ज्ञानार्णव, भगवती आराधना, अष्टपाहुड,' ह्या ग्रंथामधे केलेला आढळतो.

४) 'आ. कुंदकुंदानी,' सम्यग्ज्ञानाच्या महत्त्वाला सांगूनही, 'पुरुषार्थानेच अविपाक निर्जरा, उदीरणा सांगून,' त्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

५) ‘धर्म’ पुरुषार्थाचे वर्णन, ‘व्याख्या, लक्षण, भेद, व्यवहार-निश्चय’ अशा अंगाने केले आहे. मात्र त्याला ‘धर्म पुरुषार्थ’ अशा नावाने संबोधले गेले नाही.

६) ‘पूजा, दान, व्रत,’ इत्यादिला ‘बाह्यधर्माचा’ दर्जा देवून, ‘साम्यता व वीतरागता’ ह्यांनाच ‘अंतरंगधर्म’ म्हटले आहे.

७) मोक्षमार्गातील ‘सम्यग्दर्शनाचे’ अनन्यसाधारण महत्त्व असल्याने, ‘सम्यक्त्वयुक्त धर्मच’ मोक्षाचे कारण म्हटले आहे.

८) ‘मोक्षमार्गात निश्चयधर्मच’ श्रेष्ठ असल्याने, ‘भावलिंगाला’ महत्त्व दिले आहे. ‘अंतरंग शुद्धता वा मनशुद्धीनेच सर्व शुद्धी मानली आहे. भावशुद्धीने संपूर्ण दोषांचा नाश व कर्मक्षय’ म्हटला आहे.

९) ‘मात्र द्रव्यलिंगाने मुक्तीचा’ कडाडून विरोध केला आहे. ‘अज्ञानालाच बंधाचे’ कारण सांगून, ‘व्यर्थ क्रियाकांडापासून’ सावध केले आहे.

१०) ‘व्यवहारधर्म हा निश्चयधर्माचे साधन’ आहे. ‘अशुभापेक्षा शुभात प्रवृत्ती, आणि त्याने पुण्यप्राप्ती’ म्हणूनच, कथंचित् ‘उपादेय’ म्हटली आहे.

११) ‘व्यवहारधर्मात’, निम्न, अवस्थेत ‘शुभोपयोगरूप’, ‘पूजन, स्तवन, आलंबन’ श्रेष्ठ आहे. मात्र त्यातच अडकण्याचा धोकाही, स्पष्ट केला आहे.

१२) वास्तविक ‘व्यवहार- निश्चयात, साधन-साध्य’ भाव आहे. श्रद्धेत ‘शुद्धाचीच अनुभूती वा दृढश्रद्धान’, आणि ‘चारित्रात शुभाचाच आश्रय’, असा समन्वय साधला आहे.

१३) संसारात असूनही, ‘शुभप्रवृत्तीच्या’ आश्रयाने, ‘सतत माध्यस्थभाव, आत्म्यचेचिंतन, कषायांची मंदता, सतत जागरूकता’, असा उपायमार्ग सांगितला आहे.

१४) व्यवहार-निश्चयाची ‘सम्यक्’ सांगड घालून, ‘सम्यक् धर्म पालन’ असा गृहस्थांचा प्रवास कथन करून, ‘धर्म’ पुरुषार्थाची उपादेयता अधिकच प्रकाशित केली आहे.

**‘धर्म’-साक्षात् ‘पुरुषार्थ’ :**

संपूर्ण आगमशास्त्रात, वर्णित ‘तप, व्रत, संयम’, सर्वच ‘धर्म’ पुरुषार्थाला वर्णन करतात. उद्दिष्ट ‘मोक्षाचे’ तरी, प्रवास ‘धर्ममार्गाने’ सांगितला असल्याने, ह्या विस्तृत विषयाचे स्थूल वर्णन येथे केले आहे. ह्या विषयाच्या सखोल अभ्यासातून, स्पष्ट झालेला ‘पुरुषार्थ’ निदर्शनास आणला आहे.

१) जैन दर्शनातील विविध ग्रंथामधून, ‘पुरुषार्थाचे’ स्पष्ट उल्लेख आहेत. त्यातील ‘धर्म’ ‘पुरुषार्थाचा साधन’ म्हणून स्वीकार, हाच ‘पुरुषार्थाचा द्योतक’ आहे. ‘साधनाचा आश्रय’ घ्यावा लागतो, म्हणजेच, तो ‘करणे’ ह्यावर कृतीवर आधारित आहे. हे ‘करणे’ सम्यक् प्रकारे घडणे, हा

'पुरुषार्थ' आहे. 'सम्यग्श्रद्धा वा सम्यग्ज्ञानाने' मुमुक्षुत्वाची पात्रता आली तरी, 'सम्यग्चरित्राशिवाय' पूर्णता शक्य नाही. आगमात वर्णित 'धर्म' क्रिया ह्या, त्या 'चरित्राचा भाग' आहे.

२) 'कुंदकुंदासारख्या' आचार्यांनी परखडपणे, 'फक्त द्रव्यलिंगाने मुक्तीचा' विरोध केला. इतकेच नाही तर, 'पंचपरमेष्ठीच्या आलंबनालाही', निश्चयमार्गात महत्त्व दिले नाही. उगाचच 'नियतिवादाला महत्त्व न देता, सतत पुरुषार्थावरच' भर दिला. सतत 'सम्यक्श्रद्धान व ज्ञानासह, जागरूक पुरुषार्थाचा' उपदेश देवून, 'पुरुषार्थाचे' स्थान अधिकच स्पष्ट केलेले दिसते.

३) 'व्यवहारनयाने' संसारात, आवश्यक 'नीति, मूल्य, सदाचार', हे सर्व 'धर्म' पुरुषार्थातच अंतर्भूत आहेत. 'व्यवहारनयाने' हे वर्तन, कर्तव्यच आहे वा जीवन 'सुसह्य, सहज बनवण्याचा उपायच' आहे. हे आचरण 'प्रयत्नपूर्वकच' घडते, ह्यातूनच 'पुरुषार्थ' सूचित होतो.

४) निश्चयधर्मात 'सम्यग्दर्शनाचे' महत्त्व आहे. 'भावशुद्धी' ही महत्त्वाची म्हटली जाते. 'भावशुद्धीचे' मोजमाप बाहेरून केले जाणे शक्य नाही. त्यासाठी 'सतत जागरूकता, भावांचे मूल्यमापन, आपल्याच विचारांची कलुषता, अशुभता बघणे, मान्य करणे, सुधारणे', हाच श्रावक अवस्थेतील कठीण 'पुरुषार्थ' आहे. पंचमकाळासारख्या 'दुखमा' काळात, प्रतिकूलतांच्या प्रचुरतेत, हा 'व्यवहारधर्म' सुद्धा पाळणे, 'अंतरंग शुद्धता' ठेवणे, हा श्रावकदशेतला श्रेष्ठ 'पुरुषार्थ, सम्यक्चारित्रासमान' ठरेल.

५) संसारदशेतल्या सम्यक्, 'प्रखर पुरुषार्थाने', गुणस्थानात 'उर्ध्वारोहन' होते. सहाव्या गुणस्थानपर्यंत 'करणेरूप पुरुषार्थाची' प्रकर्षता असते. वरच्या गुणस्थानात 'ध्यान पुरुषार्थाने', सहजी 'होणेरूप पुरुषार्थ' घडतो. त्या 'सम्यक् चारित्राने कर्मनाश' होतो, म्हणून हा व्यवहारातला 'पुरुषार्थ', व्यर्थ नक्कीच नाही.

**२) अर्थपुरुषार्थ–प्रस्तावना :**

'सर्वच दर्शनांनी, सर्वच पुरुषार्थांचा' सूक्ष्म विचार केला आहे. जैन दर्शनाने 'मोक्ष' 'पुरुषार्थाला' मुख्यरूपाने सांगून, त्यानुसार इतर 'पुरुषार्थांचा' विचार केला. ह्या 'मोक्षरूपी' साध्यासाठी, 'धर्मरूपी' साधनाचा 'सविस्तर, सूक्ष्म' विस्तार, प्रत्यक्षच आहे. त्यामानाने 'अर्थ व काम' ह्या पुरुषार्थांचे विशेष कथन आढळत नाही. ह्या दोन 'पुरुषार्थांना' महत्त्वच दिले नाही वा जाणून–बुजून विचार केला गेला नाही, हा चिंतनाचा भाग आहे. 'अर्थ' पुरुषार्थावर स्वतंत्र ग्रंथ रचना आढळत नाही. ह्या 'पुरुषार्थाचा' आढावा, 'अनित्य भावनेत, केलेल्या, 'धन वा लक्ष्मी' वर्णन, ह्या विषयातून बघावा लागतो. त्यानुसार 'कार्तिकेयानुप्रेक्षा' ह्या ग्रंथातील, अनित्यभावनेतील 'धन वा लक्ष्मीचं' वर्णन, त्याचे स्थान, महत्त्व, उपयोग', इत्यादि अंगाने केले आहे. त्यातून ह्या 'अर्थ' पुरुषार्थाला समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. विषयाला स्थूलपणे सांगून, अभ्यासातून निदर्शनास आलेला 'पुरुषार्थ' स्पष्ट केला आहे.

**विषयवर्णन :**

'कार्तिकेयानुप्रेक्षा' ह्या, १२ भावनांना समर्पित ग्रंथात, अत्यंत सुंदर, सहज भाषेत वर्णन केले आहे. त्यातील 'अनित्य भावनेतील' (४ ते २२) गाथांमधून, विषय येथे कथन केला आहे.

१) जैनदृष्टीने निश्चयनयाने, 'द्रव्य नष्ट वा उत्पन्न हात नाही', मात्र 'पर्याय' बदलतात. व्यवहारनयाने दृश्य 'संसार, धन, यौवन, ऐश्वर्य' सर्वच नाशवंत आहे'. जन्म-मरण, यौवन-म्हातारपण, लक्ष्मी-विनाश', हे द्वंद बरोबर चालतात. सुंदर उपमांद्वारे विषय स्पष्ट केला आहे.

२) 'लक्ष्मीची चंचलता' सर्वश्रुत आहे. ती 'चक्रवर्ती असो वा कुलीन, पंडित, पूज्य, धर्मात्मा सज्जन' कोणा बरोबरही अनुरक्त होत नाही.

३) लक्ष्मीची चंचलता सांगून, त्याच्या 'भोग वा दान', ह्या दोनच अवस्था योग्य मानल्या आहेत.

४) लक्ष्मीचा 'भोग न घेणारा वा दान न देणारा', मात्र 'लक्ष्मीचा संचय' करणारा, ह्यांचे जीवन व्यर्थ म्हटले आहे.

५)जमिनीत ठेवल्या जाणाऱ्या धनाला जणू,-'दगडाप्रमाणे मानून, परधन' म्हटले आहे.

६) धनाप्रती 'अतिआसक्ति, कष्टाने-धनार्जन, धनाचावापर' न करता, क्लेश सहन करणे, इत्यादिंमुळे ते धन अनायासच, 'चोर, राजा, कुटूंबियांचे' काम साधणारे ठरते.

७) अत्यंत कुशलतापूर्वक, 'धनवृद्धी करणे, रात्रंदिवस चिंता करणे, वेळेवर जेवण-झोप न घेणे', अशा व्यक्ती धनाची दास्यताच करतो.

८) ह्यासाठीच 'वृद्धिंगत धन, सतत धर्म कार्यात लावण्यातच, लक्ष्मीची सफलता ठरते. लक्ष्मीची अनित्यता सतत स्मरणात ठेवून, निस्वार्थ-निरपेक्ष भावनेने देणे', ह्यातच जीवनाची सफलता सांगितली आहे.

**अन्य आधार:**

'कार्तिकेयानुप्रेक्षा' ग्रंथाप्रमाणेच, 'बा.अ. ग्रंथातही' आचार्यांनी[१०] 'शरीराची नाशवंतता' सांगून, धन इत्यादि पर द्रव्याची, अनित्यता सांगितली आहे'. 'भगवती आराधनेत'[११] 'सर्व अर्थ विष समान सांगून, ज्ञानी त्यात रत होत नाहीत' असा खुलासा केला आहे. 'सर्वार्थ सिद्धीनुसार'[१२] शरीर, धन, ऐश्वर्य पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे आहे. 'द्र.स.टीकेत'[१३], धन इत्यादींची अनित्यता दर्शवून, ममत्व त्यागाचा उपदेश दिला आहे. 'पु.सि.उ.[१४]' ह्या ग्रंथात आजच्या काळाच्या अपेक्षेने, 'धन-धान्य इत्यादिंना बाह्यप्राण' म्हटले आहे. 'त.सू.[१५] त वर्णित' काही सूत्रांमधून, 'अर्थ पुरुषार्थाने' काय व्यर्ज करावे, ह्याचा उल्लेख आहे. त्यातून 'अर्थपुरुषार्थाचा' संदर्भ घेता येवू शकतो. 'तत्त्वार्थसूत्राच्या' सातव्या अध्यातील[१६] आस्रवर्णनातील, 'मनुष्य व नरकगतीच्या'

आस्रवांच्या कारणांमधून, ‘अर्थाच्या विसर्जनाची’ जणू कला शिकवली आहे.

‘तत्त्वार्थसूत्रातील’ ह्या वर्णनाच्या सूक्ष्म चिंतनातून जाणवते की, ‘अल्पपरिग्रहाने’ मनुष्यगतीची प्राप्ती, व ‘बहुपरिग्रहाने’ नरकाची प्राप्ती होते. ‘सातव्या अध्यायातच’ (७।३८,३९) दानाचे वर्णन आढळते. ‘नरकाची भीती, मनुष्यगतीचे प्रलोभन दाखवून, धर्माच्या अनुशासनासह ‘धनसंचय’ योग्य आहे’, असा भाव सूचित होतो. ‘पुरुषार्थाने व पुण्योदयने जर’, धर्ममार्गाने अर्जित धनाची विपुलता झाली तर, ‘स्व:पर’ कल्याणाचा मार्गही ‘दान’ विषयातून सांगितला आहे.

अशाप्रकारे ‘अर्थ’ पुरुषार्थाचे वर्णन, अशा वेगवेगळ्या दृष्टीने आढळते. त्या सूक्ष्म अभ्यासातून ‘पुरुषार्थाला’ निदर्शनास आणले आहे.

**पुरुषार्थ चिंतन:**

१) ‘पुरुषार्थाचा’ पुरस्कार करणाऱ्या जैन दर्शनाने, ‘अर्थ’ पुरुषार्थावर स्वतंत्र चिंतन केले नाही. ‘१२ भावनांच्या अनुषंगाने’ त्याचे वर्णन आढळते. ‘जैन तीर्थंकर, शलाका पुरुष’ हे क्षत्रिय, राजे होते. ‘अत्यंत सघनता’ ही, जन्मजातच होती. ‘जे आहे’ त्याबद्दल अधिक चिंतनाची, निकड भासली नसावी वा ‘त्यागाची वस्तू’ म्हणून स्थान दिले गेल्याने, त्याचे अधिक चिंतन गरजेचे वाटले नसावे.

२) ‘व्यवहारात साधनरूप’ असणाऱ्या ‘अर्थाला’, ११ वे प्राण म्हटले गेले. कदाचित् त्याकाळी ही, ‘पैसा हेच दैवत’ वाटण्यायोग्य परिस्थिती असावी. मनुष्य स्वभावातील ‘धनाचे आकर्षण’, ही स्वाभाविक उर्मी, आचार्यांनी हेरली, म्हणूनच ‘त्यागाचाच अधिक उपदेश’ दिला गेला. किंबहुना म्हणूनच सतत त्याची ‘अनित्यता, क्षणभंगुरताच’ दर्शविली गेली. ‘अचौर्यव्रताच्या’ व्याख्येत, चोरीची व्याख्या सांगून, त्याचे ‘अतिचार सांगून, ‘अतिहव्यासापोटी होणाऱ्या निंद्यकर्मांपासून, बचावाचा उपायच’ सुचविला. ‘धनार्जनासह विसर्जन’ महत्त्वाचे,हे स्पष्ट केले. सर्वज्ञांनी केवलज्ञानात ह्या, ‘अर्थदोषांना’ प्रकर्षाने बघितले असल्याने, ‘संभाव्य सर्व धोक्यांकडेच’ अधिक लक्ष वेधलेले दिसते. त्या ‘अतिचारांचे टाळणे, आस्रवकारानांना टाळणे’, हाच त्यातून प्रदर्शित होणारा, ‘पुरुषार्थ’ म्हणावा लागेल.

♦ ३) सर्व तीर्थंकरांनी संसारदशेत उत्कृष्ट ‘अर्थपुरुषार्थ’ केला. संसारदशा सोडतांनाही सहज सर्वस्व ‘दान’ केले. ‘अतिसुबत्तता, ही स्वतंत्रता’ नक्कीच आणते. मात्र ही स्वतंत्रता, ‘उन्मत्तता, व्याभिचार, व अन्य पापांकडेही’ वळवू शकते. ह्यसाठीच धनाचा, ‘समाज कल्याणसाठी’ सुदपयोग व्हावा, ह्या भावनेतून ‘दान, त्याग, संयम’ ह्या, तत्त्वांचा जन्म झाला. किंबहुना सर्व ‘तीर्थंकरांनी’ ते कृतीतून स्पष्टही केले. नकळत ह्या तत्त्वांमधूनही ‘अर्थ’ पुरुषार्थाचाच विचार केला आहे. धर्ममार्गाने ‘अर्थार्जन, संवर्धन, उपयोग, भोग-उपभोग’ करून, दानातून ‘अर्थाचा

सम्यक्' विनियोग कसा करावा, हे कृतीतून सांगून, 'अर्थ' पुरुषार्थाचा आदर्शच ठेवला.

४) व्यवहारातून, 'व्यापार कौशल्य, बुद्धिमत्ता, उद्योगप्रियता, सुबत्तता', ही जणू 'अनुवांशिक गुणांप्रमाणे' जैनांना लाभलेली दिसते. त्याचबरोबर 'दान, त्याग, संयमाचे' बाळकडूही लाभले. ह्यातून आलेली 'दानशूरता, सधनता', असणारा जैन समाज, 'राष्ट्र व देशहिताच्या' कल्याणातील, 'पुरुषार्थात' सदैव अग्रेसर आहे, ह्यात शंकाच नाही. धर्म-अर्थाचा 'पुरुषार्थ', प्रत्येक जैनी सहजी करतांना दिसतो. 'कला, शिल्प, मंदिरे, भव्य कलाकृती, मोठमोठ्या संस्थांकडून समाजाची मदत', ही त्यांच्या 'अर्थ' पुरुषार्थाची दृश्यरूपेच म्हटली तरी, चुक ठरणार नाही.

५) प्रत्येक जैनीच्या अंतरंगात, 'मोक्ष' ह्या अंतिम प्रयोजनाचे बीज, जन्माबरोबरच रोवले जाते. त्यासाठी सतत 'धर्म' पुरुषार्थाचा उपदेशही दिसतो व तसे आचरण ही घडतांना आढळते. 'अधिक सुबत्ता विपरीतता' आणू शकते ह्या भीतीनेच, 'अर्थ' पुरुषार्थाचे 'नकारात्मक वर्णन' आढळते. मात्र एक चांगली गोष्ट म्हणजे, नकळत त्यातून, 'पाप-पुण्याची जाण, स्वर्ग-नरकाची भीती, त्याग-संयमाचे धडे, मोह-आसक्तीचा त्याग', अशा 'पुरुषार्थाचे' बीजच रोवले जाणे, ही सुद्धा 'अर्थ पुरुषार्थाची' सिद्धीच नव्हे काय?

♦ ६) 'दृढ श्रद्धायुक्त मन, सर्वज्ञांची वाणी', निरर्थक मानण्यास तयार होत नाही, परंतु 'विचारवंत, चिकित्सक मन आणि अनेकांत दृष्टी' सतत सांगते की, जन्मजात 'बुद्धी, चातुर्य, कौशल्य, व्यापारी वृत्ती, उत्कृष्ट अर्थपुरुषार्थ, 'करणाऱ्या जैनांनी, ह्या 'अनुभवांचे संकलन' पुढच्या पिढीसाठी का केले नाही? जर अशी ग्रंथरचना श्रावकांकडून झाली असती तर, 'कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या' तोडीची, वा त्यापेक्षा श्रेष्ठही ठरली असती. आणि आजच्या 'व्यवस्थापनांच्या विद्यार्थ्यांना', कदाचित् अभ्यासक्रमात समाविष्ट करून, शिकवली गेली असती तर, अधिकच भूषणावह बाब ठरली असती अशी खात्री वाटते.

### ३) काम पुरुषार्थ :

'चार पुरुषार्थांना' स्वीकारणाऱ्या जैन दर्शनाने, 'अर्थ' पुरुषार्थाप्रमाणेच, 'काम' पुरुषार्थाचा स्वतंत्र विचार केलेला आढळत नाही. 'ब्रह्मचर्य व्रताच्या अनुषंगाने, पाचपाप वर्णन दृष्टीने, सप्त व्यसन कथनात, अशुविभावना वर्णनात', अशा विविध विषयांमधून 'काम' पुरुषार्थाचा विचार समोर आलेला दिसतो.

**कथनक्रम :**

आगमात ह्या 'दुर्लक्षित पुरुषार्थाचे' वर्णन, 'काम' तत्त्वाचे लक्षण[१७] रूपाने सांगितले आहे. त्यात 'काम' शब्दाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. आचार्यांनी[१८] 'काम-भोग' यातील भेद स्पष्ट केला आहे'. भ.आ. नुसार[१९] कामाचे 'दहा विकार' वर्णिले आहेत. ज्ञानार्णवकार शुभचंद्रांनी[२०]

'आत्म्यालाच कामसंज्ञा' धारण करणारा म्हटले आहे. 'भगवती आराधना' ग्रंथात, 'कामजन्य दोष, कामाचे वेग, त्याचे वेग, त्याचे फळ, त्याने होणारे अनर्थ, स्व-परघात, परस्त्रीसेवनरूप काम, स्त्रीकथारूपाने काम वर्णन, त्यातून स्त्री गुणदोषवर्णन', असे कथन केले आहे. अशुचि भावना वर्णनातही वर्णन केले आहे.

'ब्रह्मचर्य व्रताच्या' अनुषंगानेही आचार्यांनी, 'काम' वर्णन केले आहे. पाचव्रतांमधे -

* 'ब्रह्मचर्याला', अत्यंत वरचा दर्जा दिला आहे. ह्या वर्णनात ब्रह्मचर्याचे लक्षण-भेद[२१],

* विशेषता[२२]-दहा प्रकारचे ब्रह्मचर्य, महाव्रत, अणुव्रत रूपाने कथन, प्रतिमा अपेक्षेने लक्षण, शीलअपेक्षेने लक्षण सांगितले आहे.

* वैशिष्टय वर्णन करतांना[२३], ह्या व्रताच्या पाच भावना, अतिचार, शीलाचे दहा दोष, सांगितले आहे.

* 'अब्रह्माचा निषेध करून', ब्रह्मचर्याची प्रधानता वर्णन करतांना[२४], 'वेश्यागमनाचा निषेध, परस्त्रीनिषेध, दुराचारी स्त्री निषेध, अब्रह्मातील दोष, शीलाची प्रधानता', ब्रह्मचर्य महिमा वर्णिला आहे.

* श्वेतांतबर परंपरेतील 'उत्तरअध्ययन', ह्या मूलसूत्र ग्रंथातील बऱ्याच गाथा, 'काम' पुरुषार्थाला वर्णन करतात. ह्यातील 'पाचव्या अध्यायात अकाममरणाच्या' कारणांमधे, 'कामभोग' वर्णन आले आहे.

''काम गिद्धे जहा बाले, भिसं कूराइं कुव्वई ।।४।।

'' जे गिद्धे काम-भोगेसु, एगे कुडाय गच्छाई ।।५.५।।

'' काम-भोगाणुराएणं, केसं संपडिवज्जई ।।५-७।।

याशिवाय आठव्या अध्यायातही 'कामवर्णन' आढळते (गा.४,६,१४)

'नमिप्रव्रज्या' ह्या नवम अध्यायातही, 'नमि-इंद्र' संवादातून, 'कामाचे दोषवर्णिले' आहेत.

''सल्लं कामा विसं कामा, कामा आसीविसोवमा। कामेय पत्थेमाणा, अकामा जंति दुग्गई ।।५३।।

चित्र-संभूति संभाषातून, 'कामभोगांचे दोष, फळ इत्यादि सांगून, धर्म सेवनाचा सल्ला देतांना, तेराव्या अध्यायात कामभोगवर्णन केले आहे'. (गा.१५,१७,२८,३४,३५) 'इक्षुकार' ह्या चौदाव्या अध्यायात, 'पुत्रांनी दिलेला उपदेश, अत्यंत रंजक भाषेत' वर्णन करतांना, 'कामाचा' धिक्कार केला आहे.

''संसारमोक्खस्स विपक्खभूया, खाणी अणत्थाण उ कामभोग ।।१३।।

अशा सुंदर उपमा, रूपकांमधून, अनेक गाथांमधून आचार्यांनी उद्‌बोधित केलेले दिसते.

**पुरुषार्थाचिंतन:**

१) 'जैन दर्शनात' सर्व संसारी जीवांना, 'चार संज्ञा' सांगितल्या त्यात, 'मैथुन' ही संज्ञा आहे. 'मानव' ह्या विशेष पुण्याने प्राप्त 'विवेकाने', ह्या संज्ञेचे, 'सम्यक् आचरणरूप पालन' ही, मनुष्यांची नैतिक जबाबदारी ठरते. मात्र ह्या 'संज्ञांच्या पूर्तिसाठी', प्रत्यक्षात विपरीत 'पुरुषार्थच' घडतांना दिसतो. त्याचेच दृश्यरूप 'व्याभिचार, एडस्, स्वैराचार', ही प्रत्यक्ष उदाहरणे आहेत. ह्याचसाठी 'ब्रह्मचर्याच्या' पालनावर अधिक प्रकाश टाकला गेला असावा.

२) सद्य समाजात प्रचंड प्रमाणात दिसणारी, 'भोगविलासिता, अश्लीलता', ह्याबद्दल न बोलणे योग्य ठरेल. 'चारित्राला' महत्त्व न दिल्याने हा 'नैतिक ऱ्हास आहे'. जैन दर्शनाने 'चारित्राला' अनन्यसाधरण महत्त्व दिले. त्या आधारे 'लौकिक सदाचार, नीतिमत्ता, मूल्यांना' सांगितले. त्यातून 'ऐहिक-पारलौकिक' उन्नतीचा क्रम कथन केला. सतत 'सात व्यसने, अतिचार' इत्यादिंपासून सावध करून, सतत 'भावनांच्या भावनेवर' महत्त्व दिले. 'कामदोषांना सांगून, सामाजिक बंधने व मर्यादांचे' पालन करत, धर्म-संमत 'काम' पुरुषार्थाला विरोध केला नाही. 'श्रावक-साधू' स्वतंत्र मार्ग वर्णन करून, 'श्रावकांच्या मर्यादा' जाणून, 'यथाशक्ती व्रत' पालनांची मुभा देवून, 'सम्यक्' पुरुषार्थाला चालना दिली.

३) अनादिकाळापासून 'जीव कर्मबंधनामुळे' भ्रमण करीत आहे. 'चार संज्ञाचे संस्कार व अभ्यास, अनादिपासूनच' चालू आहे. आजपर्यंत 'धर्म व मोक्षाचाच' पुरुषार्थ घडला नाही. 'चार संज्ञा' व 'अर्थ-काम' ह्यांच्या, विपरीत 'पुरुषार्थाचेच' स्वाद जीव चाखत असल्याने, पुन्हा नव्याने त्याची काय ओळख करून द्यावी, ह्या विचाराने, हा विषय, दुर्लक्षिला गेला असावा.

♦ ४) 'ब्रह्मचर्य' व्रतातील 'अतिचार व भावना' बारकाईने अभ्यासल्या तर, विषय अधिक स्पष्ट होवू शकतो. 'विभत्स सौंदर्य प्रतियोगिता, दूरदर्शनावरून होणारा अश्लीलतेचा मारा, उन्मुक्त आचरणाने मोडकळीला आलेली विवाहसंस्था, लैंगिकरोगांचा प्रहार', ह्या सर्व समस्यांचे उत्तर केवलींनी, 'अतिचार त्याग व भावना रूपाने', कथन करून ठेवले आहे. जेव्हा ह्यावर सूक्ष्म चिंतन केले, तेव्हा 'तीर्थंकरांच्या' जन्मापूर्वी होणाऱ्या, मातेच्या 'गर्भशोधनाच्या' कृतीकडे लक्ष गेले. त्या कुक्षीत, 'नरश्रेष्ठाचा जीव' येणार म्हणून, त्याची 'शोधन क्रिया' महत्त्वाची ठरते. आज सर्रास होणारी, 'भ्रूणहत्या, अवैध गर्भपात', अशा ह्या कुक्षीत कसे येणार तीर्थंकर? कदाचित म्हणूनच 'पंचमकाळ, क्षेत्र, द्रव्य, भाव', ह्यांच्या मर्यादा ठेवून, 'तीर्थंकर परंपरा व मोक्ष' दोघांचा निषेध केला. 'द्रव्य-क्षेत्र-काल-भावाचे' महत्त्व, अधिकच ह्यातून उजागर होवू शकते. ही 'अंतर्मुखता' हाच तर ह्यातून सूचित होणारा 'पुरुषार्थ' तर नाही ना?

♦ ५) 'साधक-बाधक चिंतन, विधि-निषेधाचा' स्वीकार, ह्या पद्धतीने 'विषयाचे मूल्यांकन' करण्याचे ठरविले आहे. म्हणूनच दुसरीही बाजू जी दिसते, ती ही सांगितली आहे. 'जैन दर्शनाने' मानलेल्या 'चार संज्ञा', मोक्षाला जीव जात नाही तो पर्यंत आहेत. संसार अपेक्षेने, त्या 'नैसर्गिक उर्मी' आहेत. गरजा आहेत, जीवसृष्टी निर्मितीत 'काम' संज्ञाचे महत्त्व आहे. दुर्भाग्यवश लौकिक जगतातही, ह्या नितांत सुंदर भावनेकडे, 'विकृतनजरेनेच' बघितले जाते. 'सम्यक्चर्चेपेक्षा मौन, गोपनीयताच' पाळली जाते. मनुष्यस्वभावाची 'विकृतता, पाशवीवृत्ती, हाव',ह्या वृत्तींकडे बघूनही, हा विषय सदैव पडद्याआड राहिला असावा. ह्या पार्श्वभूमीवर, 'जैन ब्रह्मचर्य व्रतवर्णन, उपाय, अतिचार, फळ, महत्त्व, पापाचे भय', हेच उपयुक्त आहे असे म्हणावे लागेल. अन्यथा 'शिल्पकलांमधून डोकावणारा' हा 'काम' पुरुषार्थ, काळ प्रवाहात 'साहित्यरूपाने' नक्कीच आला असता. 'उन्मत्त, वाहावलेल्या' ह्या नवपिढीने मात्र, त्याला 'कसे घेतले असते', ह्या भीतिपोटी ही खीळ बसली असावी असे वाटते. कदाचित् हाच, 'सम्यग्ज्ञानाची आस असणाऱ्या आणि अनेकांताची जाण,' असणाऱ्या जैनांचा 'काम पुरुषार्थातील' पुरुषार्थ असावा.

**४) मोक्षपुरुषार्थ :**

'निवृत्तिवादी जैन' दर्शनाने, 'मोक्षाचाच' पुरस्कार केला. त्यानुसार सर्व 'तत्त्वज्ञानाची' उभारणी झाली. प्रबंधाच्या 'प्रथम' प्रकरणातील, 'तत्त्व' ह्या विभागात, 'मोक्ष' ह्या तत्त्वाचे चिंतन सविस्तरपणे केले आहे. विषयाचा आढावा स्थूलपणे घेतला असला तरी, सूक्ष्म विचार चिंतनातून 'पुरुषार्थाला' प्रकाशित केले आहे. पुनरावृत्ती टाळण्यास येथे पुनः विषयवर्णन टाळले आहे.

**सारांश :**

१)'वैदिक व जैन' दोन्ही परंपरा 'पुरुषार्थांचे' वर्णन करतात. दोन्ही परंपरा 'मोक्ष' पुरुषार्थाला महत्त्व देतात. वैदिक परंपरा 'प्रवृत्तिवादी' असल्याने, 'पुरुषार्थाला जीवनाचा कणा' मानतात. 'लौकिक जीवन सुखमय, उन्नत' करण्यासाठी 'पुरुषार्थ', साधन रूपाने स्वीकारतात. 'निवृत्तिवादी जैन दर्शनाने', निवृत्तीला समोर ठेवून, 'पुरुषार्थाचे' वर्णन केले आहे. 'मोक्ष' पुरुषार्थाचे वर्णन केले आहे. 'मोक्ष' पुरुषार्थाला महत्त्व देवून, त्या 'मोक्षप्राप्तीत' कोणत्याही शक्तीच्या मदतीचा अस्वीकार, हाच त्यांचा मोठा 'पुरुषार्थ' ठरतो. सूक्ष्मचिंतनाने अधिकच स्पष्टता येते की, ''स्व स्वरूपाच्या सिद्धीच्या प्रयोजनासाठीचा प्रयत्न, 'स्व' नेच करणे, हाच खरा, पुरुषार्थ ठरू शकतो. अन्यथा इतरांच्या मदतीने 'मोक्ष' प्राप्ती, हा 'पुरुषार्थ' कसा म्हणता येईल?'' म्हणनूच 'कर्मसिद्धांताला' अंत्यत 'समग्रपणे, सूक्ष्मतेने' कथन करूनही, 'पुरुषार्थाचे स्थान' अबाधित ठेवले, त्यावरची दृष्टी ढळू दिली नाही, हाच खरा पुरुषार्थ' आहे.

२) जैनांनी सदैव ‘जीव-कर्म’ ह्यात, ‘निमित्त-नैमित्तिक’ संबंधच मानला. ‘धन-संपदा-ऐश्वर्य-अनुकूलता-यश, ‘इत्यादि प्राप्त होणे, ‘पुण्याचा’ भाग मानला गेला. ह्या कारणानेच ‘पुरुषार्थाने अर्थार्जन’ करून, ‘अर्थाचा’ पुरुषार्थ कृतीने सिद्ध केला. कदाचित ह्या कारणानेच ‘अर्थ’ पुरुषार्थ ‘ग्रंथबद्ध’ झाला नसावा.

३) जैनांनी श्रावकांचा प्रवत्तिमार्ग स्वतंत्रपणे कथन केला. त्या ‘मर्यादित, स्थूल, आंशिक’ रूपानेही, ‘धर्म’ चौकटीत राहून ‘अर्थ व काम’ पुरुषार्थाच्या समन्वय साधला. ‘अंतिम प्राप्ती वा उपदेश’ सतत ‘मोक्षाचा’ आणि कृती सतत ‘धर्मपूर्वक प्रवृत्तीची’, अशी ‘व्यवहार-निश्चयाची’ सांगड घातली. संसार दशेत, ‘अर्थाचे महत्त्व, निकड, गरज, स्थान’, अजिबात दुय्यम न मानता, ‘धर्म’ सह ‘अर्थ’ पुरुषार्थाचा ‘उद्दम, उत्कर्ष, उपयोग, दान, त्याग, संयम’, अशा सम्यक्‌मार्गाने दाखवला.

४) ‘अनेकांताचे’ अनन्यसाधारण महत्त्व मानणाऱ्या जैनदर्शनातील, ‘तत्त्वे, द्रव्ये, पुरुषार्थ’ ह्याकडे ‘अनेकांतानेच’ बघितले आहे. त्यानुसारच निदर्शनास आलेला ‘पुरुषार्थ’ वा जाणवणाऱ्या ‘उणीवा वा कमतरता’ स्पष्ट केल्या आहेत. ‘वीतरागींच्या केवलज्ञाना-बाबत वा सर्वज्ञत्वाबाबत, कथित उपदेशाबाबत’ जराही शंका नाही तरी, ‘परिणामी नित्यता’ जैनांनी स्वीकारली असल्याने, काळानुरूप परिवर्तन स्वीकारून, काळचीच गरज म्हणून, नवीन रूपात सादरीकरणाने, ‘जैन दर्शनाची’ मुळे अधिकच दृढ होतील, असे मात्र नक्की वाटते.

### ४) जैन दर्शनानुसार 'मनुष्यगतीचे' वैशिष्ट्य, दुर्लभता, महत्त्व, श्रेष्ठत्व, स्थान

'जैन दर्शनात' चार गतीचे वर्णन केले आहे. ह्याचारपैकी 'मनुष्यगतीला' श्रेष्ठ मानले गेले आहे. 'पंचेद्रियत्व, संज्ञीत्व आणि विवेक', ह्या तीन विशेष 'उपलब्धींमुळे' अत्यंत श्रेष्ठत्व दिले गेले. 'मोक्ष' ह्या अंतिम 'पुरुषार्थाच्या', 'पुरुषार्थाचा', विशेष अधिकार, ह्या 'मनुष्यगतीला' दिल्यानेही, ह्याचे 'महत्त्व' वाढून, तत्त्वज्ञानातील 'स्थान' उंचावले आहे. जैन दर्शनानुसार 'जंबुद्वीपासह अडीच द्वीपांपुरता म्हणजेच, ४५ लाख योजन' हा, मनुष्यलोक आहे. त्याबाहेर 'मनुष्य' नसल्याचे सांगितले आहे. 'मोक्ष' पुरुषार्थाची पात्रता लाभल्याने, 'मनुष्यगतीचे' वर्णन हे अनिवार्यच आहे. ह्यात विषयवर्णनाचा आढावा स्थूलपणे कथन करून, त्यातून 'पुरुषार्थप्रेरक' संभावनांकडे लक्ष वेधले आहे.

**विषयविस्तार :**

'मनुष्यगतीचे अनन्यसाधारण' महत्त्व मोक्षमार्गात असल्याने, सविस्तर वर्णन आगमात आढळते.

* हा विस्तार करतांना लक्षण – भेद[२५] कथन केले आहेत.

* ह्या गतीची वैशिष्ट्ये सांगतांना[२६], 'पुरुषाचे स्वरूप, मनुष्यगतीच्या श्रेष्ठतेचे कारण व प्रयोजन' वर्णन केले आहे.

* मोक्षमार्गाची सुरुवात 'सम्यग्दर्शनाशिवाय' होत नाही. 'भावशुद्धी व चारित्राशिवाय' गुणस्थानात उर्ध्वारोहन नाही. ह्या कारणाने 'प्रत्येक विषयाची चिकित्सा', ह्या दोन कसोटीवर केलेली दिसते[२७]. त्यानुसार 'सम्यक्त्वाचे स्वामी, गुणस्थानाचे स्वामी, भोगभूमी' इत्यादि अपेक्षेने 'गुणस्थान वर्णन' केले आहे.

* लोकाकाशात मनुष्याचे स्थान सांगतांना[२८], 'मनुष्यलोकाचे स्वरूप, विस्तार, मर्यादा', क्षेत्रांची नावे सांगितली आहेत.

* त.सू.(६/१७,१८) नुसार 'मनुष्यायुच्या आस्रवांच्या' कारणांचे वर्णन केले आहे. 'राजवार्तिककरांनी' (६/१७/१/५२६/१५) (६/२०/१/५२७/१५) अधिकच विस्ताराने ह्या कारणांचा ऊहापोह केला आहे.

* मुक्तिपंथाचा पुरस्कार करतांना, जैनदर्शनाने 'मोक्षाला' सर्वोच्च दर्जा दिला. 'आर्यखंड कर्मभूमी, पंचोद्रियत्व, संज्ञीत्व, पर्याप्तकावस्था', अशा अनेक अटीही दिल्यात. 'कट्टर निर्गंथतेला' उपोदय मानणाऱ्या, 'दिंगबर' पंथाने, 'पुरुषत्व' ही खास पात्रता सांगून, 'स्त्री मुक्तीचा' कडाडून विरोध केला. त्याचीही कारणमीमांसा सविस्तरणपणे आगमात देवून, 'मनुष्यगतीचे' महत्त्व अधिकच प्रकर्षाने अधोरेखित केले आहे. श्वेतांबर परंपरेतील 'उत्तरअध्ययन' ह्या मूलसूत्रात, मनुष्यगतीचे दुर्लभत्व' सुंदर उपमा देवून, अत्यंत मार्मिकपणे वार्णिले आहे. दहाव्या अध्यायातील,

‘‘समयं गोमयं या पमायए’’, हे शब्द, ही दुर्लभता अधिकच प्रकर्षाने स्पष्ट करतात.

**पुरुषार्थ प्रेरणा :**

१) चारगतीत ‘मनुष्यगतीची’ श्रेष्ठता ‘मोक्ष’ दृष्टीने सांगितली आहे. ‘भोगभूमी’ ही पूर्वपुण्याचे फळरूप आहे. त्यात ‘नियतीची’ प्रधानता स्पष्ट आहे. ‘चतुर्थ गुणस्थानावर’ चढण्याच्या ‘पुरुषार्थाचा’ अभाव तेथे आहे. अप्रत्यक्षरित्या ह्याविधानातून, ‘पुरुषार्थाचे’ मोक्षमार्गातले स्थान, अधिकच दृढतेने उजागर झाले आहे. हा अधिकार देवून, ‘मनुष्यगतीचे श्रेष्ठत्वही’ सिद्ध झाले आहे. अशा महत्त्वाच्या गतीत जन्म घेण्याचे सौभाग्य, हा ‘पूर्व पुण्याचा’ भाग आहे, मात्र ह्या प्राप्त लाभात, पुनश्च तसा उत्कृष्ट ‘पुरुषार्थ’ करणे, हाच ह्यातला ‘पुरुषार्थ’ आहे.

२) जैन आगमात ढोबळपणे, ‘कर्मभूमी + आर्यखंड + मनुष्यत्व + पुरुषार्थ = मुक्ती’, असा ‘मोक्ष’ पुरुषार्थाचा प्रवास सांगितला आहे. ह्या ‘मनुष्यायुच्या आस्रवांची’ कारणे चिंतनीय आहेत. ‘स्वभाव तत्परता, शुभसमाचार देण्याची आवड, लोकयात्रानुग्रह’, इत्यादी कारणांचे सूक्ष्मचिंतन, ‘सम्यक् पुरुषार्थाला प्रेरणा देणारेच आहे. जीवन जगण्याची कला शिकवून ‘पुरुषार्थ’ सूचविला आहे. अत्यंत पुण्याने प्राप्त, ‘इंद्रियांची पूर्णता, सुदृढता, सुबत्तता’, ह्याकडे नजर दिल्यास, ‘प्राप्तनिधीचे’ महत्त्व प्रकर्षाने जाणवते. ही जाणीव, ‘पुरुषार्थाचा’ शुभारंभ करण्यास समर्थ कारण ठरू शकते.

♦ ३) दिगंबर परंपरेने ‘स्त्रीमुक्तीचा’ निषेध केला आहे. धर्मात स्थान देवून ‘व्रत, संयम, तप, प्रतिमा, दिक्षेचा’ अधिकार दिला. एक स्त्री ह्या दृष्टीने, हे विधान खूपच, मनाला दुखावणारे आहे. मात्र त्याच्या ‘कारणमीमांसेचे सूक्ष्म चिंतन, मनन, निर्गंथमार्ग व प्रभूंवर दृढ श्रद्धा, अनेकांतदृष्टी’, हे ‘सम्यक् मार्गदर्शन’ करतात. ‘स्त्रीशरीरचना, लज्जा, दुर्बलता, प्रतिकारशक्तीची कमतरता, जीवनिर्मितीचे कार्य, प्रत्यक्ष दिसणारी मायाचारी, असूया, मत्सर, चंचलवृत्ती’, ह्या ‘दोष व कमतरतां’ कडे दुर्लक्ष करता येत नाही. खऱ्या अर्थाने ‘परीक्षा प्रधानी,’ बनून केलेल्या चिंतनातून, ‘जे प्राप्त आहे’ त्याच्या सहाय्याने, कसा ‘पुरुषार्थ’ करावा, ह्याचे मार्गदर्शनच मिळते. पंचम गुणस्थानापर्यंतचा ‘पुरुषार्थ’ करण्याचा अधिकार देवून, आगामी भवातून ‘मोक्षाची’ खात्रीच दिली आहे.

♦ ४) ‘उत्तरअध्ययनातील’ मनुष्यगतीच्या दुर्लभतेचे सुंदरवर्णन, अंतर्बाह्य जागृक करणारे आहे. ‘‘समयं गोमयं मा पमायए’’ ह्या शब्दांमधून ‘अप्रमादी’ राहण्याचा वांरवार सल्ला, ‘गौतमगणधरांनाही’ द्यावा लागला तर, सर्व सामन्यांची काय कथा ? ह्या शब्दांमधून प्रभूंची, ‘प्राणिमात्रांविषयीची करुणा’, स्पष्ट होते. ‘मनुष्यगती’ हे असे ‘हुकमीपान’ आहे, ज्याच्या यथायोग्य वापराने, ‘हवी ती गति’ मिळवता येवू शकते. ह्या ‘प्राप्तगतीच्या आश्रयाने, कोणती गति निवडावी’, हे स्वातंत्र्य जीवाला आहे, हाच ‘पुरुषार्थ’ आहे. जैन परंपरेत ‘मनुष्यत्व, शास्त्रश्रवण, शुद्धधर्मावर श्रद्धा व

त्या धर्मात पराक्रम', हे उत्तरोत्तर दुर्लभ अंग मानले जातात. जैन आगमात वर्णित, 'पंचपरावर्तनांचे गहरे, सूक्ष्म, चिंतन, जीवाचा 'भ्रमणपट' दर्शवतात. त्यासूक्ष्मअभ्यासाने स्वतःकडे बघितल्यास, 'आपल्याच परिणामांनी, प्रमाद-अप्रमादाने', काय मिळवले हे कळते आणि ह्या अशा भ्रमणानंतर, 'अतिप्रगत, सर्वोच्च, पूज्य मनुष्यगतीची प्राप्ती, किती दुर्लभ व महत्त्वाची', हे स्पष्ट होते. ह्या 'श्रेष्ठतम उपलब्धिनंतर,' प्राप्त नसणाऱ्या, 'कनिष्ठ उपलब्धींचा ध्यास, आस, मोह, ममता', करावी वा नाही, ही विवेकजागृती, श्रावकांसाठी आवश्यक असा 'पुरुषार्थ' ठरेल.

## उपविभाग – १

### ५)'उपादान–निमित्त,'पाच समवाय–'यांचा परस्पर संबंध, मुख्यता, गौणता, समन्वय

कोणतेही कार्य होण्यात अनेक 'कारणे' आवश्यक असतात. ही अनेक कारणे, त्या 'कार्यसिद्धीत' सहज एकत्रित होतात. कारणांच्या ह्या समूहाला 'समवाय' म्हटले जाते. कोणत्याही कार्याच्या उत्पत्तिमध्ये, ह्या पाच कारणांचा 'समवाय', हा महत्त्वाचा ठरतो. ती कारणे, 'स्वभाव, निमित्त, नियति (काल), पुरुषार्थ, भवितव्य', (होनहार) अशी सांगितली जातात.

ह्या सर्व कारणांच्या 'समवायाने वा एकत्रित येण्याने' कार्यसिद्धी मानणे, हाच 'अनेकांत' आहे, वा 'सम्यग्दर्शन' आहे. ह्या समवायांपैकी 'पुरुषार्थाचा' सविस्तर विचार, ह्याच विभागात प्रारंभी केलेलाच आहे. अन्य समवायांचे नीट, 'चिंतन, सूक्ष्म अध्ययन, विविध विवक्षा' लक्षात घेवून, विषयविस्ताराचा सारांश देवून, मुख्य बिंदूवर लक्ष केंद्रित केले आहे.

**१) स्वभाव :**

वस्तूच्या 'स्वयंसिद्ध, तर्कागोचर, नित्यशुद्ध' अंशाला 'स्वभाव' म्हणतात. स्वभावाला, 'वस्तुभूत व अपेक्षित' ह्या दोन प्रकारात ठेवले जाते. त्यापैकी वस्तुभूत स्वभाव, 'सामान्य–विशेषरूप' सांगितला आहे. 'द्रव्यातील जे सहभावी गुण' आहेत, त्यांना 'सामान्य स्वभाव', आणि 'क्रमभावी पर्यायांना विशेषस्वभाव' म्हटले आहे. आपेक्षिक स्वभाव, 'आस्तित्व, नास्तित्व', इत्यादिविरोधी धर्मांच्या रूपाने अनंत आहेत. स्याद्वादाने ह्याची सिद्धी होते.

**कथनक्रम :**

जैन दर्शनात 'स्व' चतुष्ट्य, 'स्व' भाव, ह्यांचे विशेष महत्त्व असल्याने, ह्यांचे विवेचन महत्त्वाचे ठरते.

* आचार्यांनी लक्षण–भेदानुसार[३१] कथन करतांना, 'निरुक्ति अर्थ, अंतरंग भाव, गुण–पर्यायरूप, भेद, प्रत्येक द्रव्याचा स्वभाव, कल्पित–वस्तुभूत स्वभाव' असे वर्णन केले आहे.

* विशेषता वर्णन करताना[३२], 'परनिरपेक्षता, स्वभावात तर्काला स्थान नसणे, गुणाला स्वभाव म्हणता आले तरी, स्वभावाला गुण म्हणता येवू शकत नाही', असे कथन केले आहे.

* वस्तूचा–द्रव्याचा स्वत:चा भाव 'स्वभाव' आहे, त्यानुसार कार्य घडते, 'द्रव्य' ह्या स्वाभावाचे, उल्लंघन करीत नाही. ह्याला 'त्रिकाली उपादान' ही म्हणतात.

**२) नियति :**

'जे कार्य वा पर्याय, ज्या निमित्ताने, ज्या द्रव्यात, ज्या क्षेत्र व काळात, ज्या प्रकाराने व्हायचे असते, ते कार्य त्यानिमित्ताने, त्या द्रव्य–क्षेत्र–कालात त्याचप्रकारे होते, अशा चतुष्टयाने युक्त नियत कार्यव्यवस्थेला 'नियति' म्हणतात'. नियत 'कर्मोदयरूप निमित्त' अपेक्षेने ह्यालाच

'दैव', नियत काळ अपेक्षेने 'काललब्धि', नियतभाव अपेक्षेने 'भवितव्य' म्हटले जाते.

'वस्तुस्वभाव, निमित्त (दैव), पुरुषार्थ, काललब्धि, भवितव्य', ह्या पाच समवायांनी युक्त, ही व्यवस्थाच 'सम्यक्' आहे.

**कथनक्रम** – 'नियतिवादाचे कथन' करतांना[३३], 'मिथ्या व सम्यक् नियतिवादाचे वर्णन केले आहे. नियतीची सिद्धीही, उदाहरणांसह' कथन केली आहे. सन्मतिसूत्रात आ. सिद्धसेन दिवाकरांनी म्हटले की,[३४] ''कालो सहाय णियइ पूव्वकयं पुरिस कारणेगंता । मिच्छंतं ते चेव उ समासओ होंति सम्मत्तं ।।''

**अ) काललब्धि** – 'नियतकाळात कार्यसिद्धी होणे ह्यालाच 'काललब्धि' म्हणतात'. नियतितच ह्याचा अंतर्भाव केला जातो, तरी 'काललब्धीचा' स्वतंत्र विचार केला आहे. आगमात[३५] ह्याचे वर्णन 'सामान्य-विशेषरूपाने' केले जाते.

* धवलाकारांनी[३६] 'एका काललब्धीतच सर्व लब्धींचा अंतर्भाव मानला आहे'

* आचार्यांनी[३७] काललब्धीची, 'कथंचित् प्रधानता मोक्षप्राप्ती, सम्यक्त्वप्राप्ती, सर्व पर्यायात', सांगितली आहे.

* कथंचित प्रधानता सांगतांना, 'काललब्धि शिवाय काही होत नाही, ती अनिवार्य आहे, मिळणे दुर्लभ आहे', असे म्हटलेले दिसते. 'मुख्य-गौण' विवक्षा लक्षात घेवून, 'गौणताही' वर्णिली आहे'.

**ब) दैव** : विषयात 'योग्यता व पूर्वकर्माचे' महत्त्व दिसते. 'पूर्वभवात ज्या पुण्य-पापाचा संचय केला, ते कर्मोदयरूपाने प्राप्त होणे 'दैव' ठरते'. 'दैवालाच' अनेक पर्यायवाचक नांवे आढळतात.

* ह्या 'दैवाचे' वर्णन, 'मिथ्या व सम्यक् विवक्षेने[३८] केले जाते. त्यात कर्मोदयाच्या प्रधानतेची उदाहरणे देवून, दैवाचा पुरस्कारही केला जातो. त्या अपेक्षेनेच 'पुरुषार्थाचा' धिक्कार करून, दैवाची अनिवार्यता कथन केली जाते'.

**३) भवितव्यता** :

'नियत भाव अपेक्षेने 'भवितव्यता' म्हटले जाते. जे होणे योग्य ते, 'भवितव्य' असून, त्याचा भाव, हा 'भवितव्यता' म्हणवला जातो'. आचार्य[३९] कथंचित् 'भवितव्याची प्रधानता' सांगतात. त्या अपेक्षेने 'भवितव्य हे अनिवार्य वा अलंघ्य' म्हटले आहे.

**समन्वय** – 'अनेकांतवादाला' अनन्यसाधारण महत्त्व देणारे जैन धर्म, कोणत्याच विषयाचे 'एकांत कथन' करीत नाही. सर्व विवक्षा 'कथंचित्' शब्दाने कथन करतात. 'नियति' ह्या समवायातच 'काल, दैव, भवितव्याचा' अंतर्भाव होतो. 'गौण-मुख्य' विवक्षेने सर्व विषयांचे कथन करून, 'नियति-पुरुषार्थाचे' समन्वय साधलेले दिसते. 'अनेकांतवादाने' पाच समवायांचा

स्वीकार हेच, 'जैनांचे खास वैशिष्ट्य' ठरते.

ह्या विषयवर्णनात आचार्यांनी[४०] विविध विवक्षांचा विचार केलेला दिसतो.

१) 'दैव व पुरुषार्थ दोन्हींच्या एकत्रिकरणानेच कार्य सिद्ध होते'.

२) 'अबुद्धिपूर्वक कार्यात दैव, बुद्धिपूर्वक कार्यात पुरुषार्थाची प्रधानता दिसते'.

३) 'रागदशेत पुरुषार्थाचा उपदेश दिला जातो'.

४) 'नियति सिद्धांतात स्वच्छंदताचाराला थारा नाही'.

५) 'पाच समवायांसह कार्यव्यवस्था सिद्ध होते'.

६) 'नियति-पुरुषार्थ इत्यादि सहवर्ती आहेत'.

७) 'काललब्धि बहिरंग कारण असून, पुरुषार्थ अंतरंग कारण आहे'.

८) 'एका पुरुषार्थात अन्य कारण समाविष्ट आहेत'.

९) 'समवाय निर्देशांचे प्रयोजन'

ह्या सर्व दृष्टीने सूक्ष्म मीमांसा करून, समन्वय साधला गेला आहे.

**४) निमित्त :**

**प्रस्तावना –** 'कार्य होण्यात जे नियामक हेतू असतात त्यांना 'कारण' म्हणतात'. हे कारण 'बहिरंग व अंतरंग' असून, त्यालाच क्रमाने 'निमित्त-उपादान' म्हटले जाते. ह्या विषयात 'निमित्तासह उपादानाचे' वर्णन हे क्रमप्राप्तच ठरते.

जैन दर्शनाने सहा 'द्रव्यांचे' महत्व सांगतांना, प्रत्येक द्रव्याची 'स्वतंत्रता' मानली आहे. त्यामुळेच द्रव्याच्या 'स्व' द्रव्य-क्षेत्र-काल-भावात, 'पर' द्रव्याचा हस्तक्षेप स्वीकारला नाही. हे 'स्व' द्रव्यच 'उपादान' म्हटले जाते. हे द्रव्य आपल्या, 'सामान्य-विशेष गुण व त्रिकाली पर्यायांनी' युक्तच आहे तरी, कार्य होण्यात वरील दोन्ही हेतू आवश्यक मानले आहे. द्रव्यातला 'शाश्वत' व 'क्षणिक' अशा दोन अंशापैकी, 'गुण शाश्वत' असून, 'स्वभावाला' सोडत नाही म्हणून ते 'शाश्वत उपादान' ठरतात. 'उपादान' म्हणजे वस्तूची शक्ती असे म्हटले तरी, वावगे ठरणार नाही.

ह्याचबरोबर 'बाह्य निमित्तांचेही' वर्णन आगमात दिसते. 'साधारण-असाधारण; उदासीन-प्रेरक ', इत्यादि भेदाने 'निमित्त' अनेक प्रकारचे ठरते. 'शुद्ध द्रव्यांच्या एक समयवर्ती शुद्ध पर्यायात' तर, फक्त 'कालद्रव्यच' साधारण निमित्त होते. 'अशुद्ध व संयोगी' द्रव्याच्या, जेवढ्या 'चेतन-अचेतन' पर्याय दिसतात त्यात, अन्यही 'असाधारण, प्रेरक', सर्व निमित्तांचा सहभाग मानला जातो. तरीही अंतत: 'उपादानाची' श्रेष्ठताच, 'निश्चय अपेक्षेने' सर्वतोपरी ठरते. पूर्वबद्ध

'कर्मनिमित्ताने परिणाम, परिणामाने नवीन बंध', ही अनादि शृंखला, सम्यक् 'पुरुषार्थानेच' तोडता येते.

'उपादान-निमित्त' हा जैन दर्शनाच्या 'तत्त्वज्ञानातील', अत्यंत 'महत्त्वाचा व अविभाज्य' घटक आहे. 'ज्याच्याशिवाय कार्य होत नाही, परंतु जे कार्य करीत नाही, ते निमित्त' आहे. उपादान 'त्रिकाली व क्षणिक' दोन प्रकारे सांगितले जाते. 'त्रिकाली उपादान' हे कार्याचे नियामक नसून, 'क्षणिक उपादानच' आहे. 'उपादान' ही निजशक्ती आहे जी, 'द्रव्य व पर्याय' दोन प्रकारांची आहे. कोणत्या 'द्रव्यात' हे विशिष्ट कार्य होईल, हे 'द्रव्यशक्ती' सांगते. ते विशिष्ट कार्य, विशिष्ट समयात होईल, हे सांगणारी 'पर्याय शक्ती' असते. अशा 'निमित्त-उपादानाचे' एकत्रित कथन, 'निमित्तसापेक्ष विशिष्ट पर्यायशक्तीने युक्त द्रव्यशक्ती' असे केले जाते.

ह्या महत्त्वपूर्ण विषयाचे कथन आगमात विस्ताराने आढळते. हे विवेचन 'मुख्य-गौण, व्यवहार-निश्चय, स्याव्दावादावर' आधारित आहे. ह्या 'गूढ गंभीर, सूक्ष्मविषयाच्या अभ्यासातून', सर्व मुद्यांचा नीट अर्थ लावून, विषय ढोबळपणे सांगून, अंतत: 'पाचही समवायातून', दृष्टीक्षेपात आलेले मुद्दे मांडले आहे.

**विषयविस्तार –** ह्या विस्तृत कथनाचा विस्तारही आगमात बराच केला आहे.

* प्रथमत: आचार्यांनी कारणांचेच लक्षण – भेद वर्णिले आहे.[४१] 'ह्यात उपादान कारण कार्याचा निर्देश, अभेदता, कारण कार्यविवक्षा, भेदाभेद, अशा दृष्टीने केला आहे. निमित्त कारण कार्याचा निर्देशही, विविध विवक्षासमोर' ठेवून, केला आहे.

* 'कारण-कार्याची' नियमावली देतांना,[४२] 'कारण सदृशता, असदृशता, अनेक कारणे, व्याप्ती; उत्पादन व निवृत्तीचे नियम', असे वर्णन केलेले दिसते.

* 'उपादानाची मुख्यता-गौणता' ही[४३], 'कथंचित् स्वतंत्रता, कथंचित् प्रधानता; कथंचित् परतंत्रता; निरपेक्षता; परिणमन स्वभाव, परिणमनातील स्वतंत्रता, त्यात उपादानाची प्रधानता, बलवानता', अशा विवक्षेने समग्रपणे वर्णिली आहे.

* निमित्ताची 'मुख्यता-गौणता' कथंचित् विवक्षेने सांगतांना[४४], 'उदाहरणे, द्रव्य-क्षेत्रादि, निमित्त-नैमित्तिक संबंध, कथंचित् गौणता उदाहरणांसह, कथंचित् प्रधानता', असा क्रम दिसतो.

* 'कारण-कार्य' समन्वय[४५], 'एकांताचा विरोध; उदाहरणे; व्यवहार-निश्चयदृष्टी; उपादान - निमित्ताच्या स्वतंत्रता-परतंत्रताचे प्रयोजन', अशा प्रकारे साधला आहे.

**पाच समवायांचा समन्वय – पुरुषार्थाची संधी :**

१) 'अनेकांताच्या भक्कम पायावर स्थित जैनधर्म, कोणत्याही विषयाचा विचार वा स्वीकार एकांताने करीत नाही. कोणत्याही द्रव्याला, मिथ्या वा अभावात्मक मानत नाही.'

जैन दर्शनानुसार ''एक द्रव्य दुसऱ्यात काही करत नाही. दुसऱ्याला आपल्यासमान बनवू शकत नाही. स्वभावाला दुसऱ्याची अपेक्षा नाही. परिणमन द्रव्याचा स्वभाव असून, 'उपादान' त्या 'स्व' परिणमनात स्वतंत्र आहे. निमित्त असो वा नसो, परिणमन तर स्वत:च होते.''

'द्रव्यस्वभावाविषयीची' ही विधाने आगमात वारंवार दिसतात. प्रबंधातील 'द्रव्य' विभागात त्याचा सविस्तर ऊहापोह मांडला आहे. द्रव्याची, 'स्वतंत्रता, शक्ती, सामर्थ्य', हे उपादानाचे महत्त्व सांगतात. कारण ती 'निजशक्ती' आहे व 'पुरुषार्थ' हा स्वभाव आहे.

२) 'प्रत्येक कार्यासाठी अंतरंग व बाह्य निमित्ताची आवश्यकता असते.'

अंतरंग कारण तर 'उपादान' आहे. 'उपादान' तयार असेल तर, बाह्य 'निमित्तही' अवश्य मिळतातच. कारण 'नियति वा दैव', हे पूर्वजन्मीच्या 'पुरुषार्थाचे' दृश्यरूप आहे. त्याचे फळ म्हणजे 'गति, आयु, शरीर, योनी' इत्यादी आहे. त्यात फेरफार करता येत नाही. ह्या प्राप्त 'नियतिरूप निमित्ताने, प्राप्त परिस्थितीत, सम्यक् पुरुषार्थ', कसा केला जातो हे महत्त्वाचे ठरते, म्हणजे अनायासच वर्तमान 'पुरुषार्थाची' श्रेष्ठता सिद्ध होते.

♦ ३) 'पाचही समवायात चार कारणे अबुद्धिपूर्वक असून, 'पुरुषार्थ' बुद्धिपूर्वक असतो.'

आचार्यांचे हे विधानच 'पुरुषार्था'चे महत्त्व सिद्ध करणारे आहे. 'दैव-नियति' कर्माधीन आहे, 'बद्ध पुद्गल कर्म' पर्याय आहे, त्याचे फळही 'पुद्गलावरच' दिसते. 'आत्मा व त्याचे गुण' अबाधित आहेत.'वीर्य गुणाची शक्ती' सदैव व्यक्त असतेच व त्याचीच 'पुरुषार्थ' ही पर्याय आहे. जर 'वीर्य गुण' नष्ट होत नाही तर, त्याची पर्याय 'पुरुषार्थही' सदैव आहेच, फक्त वर्तमानात तो 'पुरुषार्थ' कसा, कोणता करावयाचा, ही स्वतंत्रता जीवाला आहे. 'व्यक्तिस्वातंत्र्य व स्वावलंबनेतेचा' पुरस्कार करणाऱ्या जैन धर्माचा हाच 'पुरुषार्थ' आहे, अनायासच 'पुरुषार्थाची' सिद्धी त्यातून झाली आहे.

४) 'कार्य घडण्यात योग्य द्रव्यच कारण आहे, सर्व नाही.'

कोणतेही कार्य 'स्व' पुरुषार्थाने घडते. त्यावेळी अन्य द्रव्यांची उपस्थिती 'साधनरूपाने' असते. साध्य मात्र सदैव, 'स्व' पुरुषार्थानेच करायचे असते वा होते. 'स्व' सामर्थ्याची 'जाण व हे भान', सम्यक् 'पुरुषार्थाकडे' नेणारे आहे. 'निमित्ताच्या' मागे जाण्याचा, वा ते मिळवण्याचा, प्रयत्न करण्याची गरज नसते. ह्या सम्यग्ज्ञानाने, 'निमित्ताने परद्रव्यात कार्य होते ही, चुकीची मान्यता दूर होते. 'निमित्त' असले तरी, 'कार्यामध्ये मदत, प्रभाव, फेरफार' ते करीत नाही, फक्त 'निमित्ताची उपस्थिती' असते म्हणून, 'कार्य त्याने केले' हा भ्रम उत्पन्न होतो. 'उपादानशक्ती' अव्यक्त असल्याने, ती दिसत नाही. 'निमित्तांचा' सम्यक् स्वीकार, 'निमित्ताधीन दृष्टीचा त्याग, मिथ्या अभिप्रायाचा त्याग', हाच खरा 'पुरुषार्थ', जो 'समवायातून' प्रकाशित होतो.

५) ‘नियति’ शब्दाचा अर्थ ‘नियतता’ आहे.

द्रव्यात ‘पर्याय ह्या एकसमयवर्ती, असून, त्या क्रमपूर्वक’ होतात. ‘एका द्रव्यात, अनेक पर्यायांच्या संभावना’ असतात. त्या समयी, जीव कसे ‘द्रव्य-क्षेत्र इत्यादि निवडतो, ‘आवड, रुचि, प्रयास कसा व कोणत्या दिशेने करतो’, ती ‘पर्याय’ उत्पन्न होते. हा निवडीचा ‘पुरुषार्थ’ जीवाचा आहे. नियतीत ‘पुरुषार्था’ला स्थान देवून, ‘पुरुषार्थात’ अशा प्रकारे ‘नियतीचा’ स्वीकार, हाच ‘अनेकांत’ आहे. निश्चयात फक्त ‘उपादानाचे’ श्रेष्ठत्व आहे. ‘निमित्ताला’ तेथे स्थान नाही. ‘व्यवहार वा निश्चय’ काहीही साध्य, वा उद्दिष्ट साधण्यास ‘प्रयत्न हा आवश्यकच’ आहे, जो साक्षात् ‘पुरुषार्थ’ आहे.

♦ ६) ‘काललब्धीचे’ महत्त्व आगमात दिसून येते, तरी ती कथंचित ‘कर्माधीन’ आहे.

प्रतिक्षण ‘कर्मात उदय, क्षयोपशम’ हे चालूच असते. जीव-कर्म, ‘निमित्त नैमित्तिक’ संबंध आहे. ‘कर्म व जीव ह्यांची विचित्रता परस्परसापेक्ष’ आहे. ‘परिणाम सदैव’ समान नसतात. ‘उपादानाकडे’ दुर्लक्ष वा त्याचा आधार नसतांना, ‘कर्माची’ बलवत्तरता दिसते. व्यवहारनयाने ‘कर्म प्रबळ’ ठरतात, कारण ‘स्व’ चे भान नाही, वा ‘स्व’ भावाची जाण नाही. ‘जीवशक्तींची’ समानता दिसत नाही म्हणून, ‘पुरुषार्थातही तरतमता’ आढळते. व्यवहारनयाने म्हणूनच ‘नियतीची वा निमित्तांची’ श्रेष्ठता दिसते. त्यालाच श्रेष्ठ मानून ‘नियतिवादाला’ पुष्टी मिळते. निश्चयात मात्र ‘पुरुषार्थाचीच’ श्रेष्ठता आहे. वरच्या गुणस्थानांमध्ये ‘वीतरागतारूप उपादाना’चा आश्रय घेतल्याने, ‘योग आहे, आस्रव आहे, पण ‘बंध’ नाही, संसारात आहे पण ‘संसार’ नाही’. तेथे ‘कर्मांची, निमित्तांची, नियतीची हेयता’ स्पष्टच आहे.

‘कर्मसिद्धांतात’ निमित्तांच्या अपेक्षेने कथन केले जाते. ‘निमित्तांचे ज्ञान’ करविणे हे, ‘आगमांचे कर्तव्य’ आहे, त्यात ‘गुरफटणे वा त्यालाच श्रेष्ठ’ मानणे हा, ‘जीवाचा अपराध’ आहे. वास्तविक ‘तत्त्वदृष्ट्या’ विचार केला तर, ‘कषाय-कर्म’ ह्यांच्यात ‘निमित्त-नैमित्तिक’ भाव आहे. ‘जीव’ तर त्या बद्ध अवस्थेतही भिन्नच आहे, ‘स्व’ चतुष्ट्यात आहे. हाच ‘उपादान-निमित्त’ वा ‘नियति-पुरुषार्थातला’ गाभा आहे, मर्म आहे. हे न जाणल्याने ‘परालाच स्व’ मानण्याने, हे बंधन आहे.

♦ ७) व्यवहारात ‘व्यवहारनय’ अपेक्षेनेच वर्णन केले जाते.

‘व्यवहारनय अभूतार्थ’ असून, ‘उपचारमात्र’ असतो. ‘नियति’ ही त्या भवापुरती मर्यादित आहे तर, ‘निमित्त’ त्या पर्यायापुरते आहे. स्वभाव ‘सदैव’ आहे, ‘काललब्धि’ ही पर्यायासह आहे. ‘पुरुषार्थ’ मात्र सदैव आहे. ‘दैव वा नियति’ दिसत नाही वा काय आहे हे माहीत नाही. दृश्य फक्त, इष्टप्राप्तीप्रति होणारा ‘पुरुषार्थच’ आहे. संसारात ‘ऐहिक, भौतिक’ प्राप्तव्यासाठीचा अखंड ‘पुरुषार्थ’ चालूच आहे. त्यात कमतरता ही जीवघेणी ठरू शकते, तर ‘मोक्ष’ प्राप्तीच्या

‘पुरुषार्थातच’ पळवाटा का शोधल्या जातात ? पंचमकाळात ‘मोक्ष’ नाही म्हणून स्वच्छंदी बनून, स्वैराचारी बनणे योग्य आहे का ? ‘नियति वा काळाचा’ हवाला देवून, ‘चतुर्थ काळ येईल तेव्हा बघू’, अशी कारणे ‘नियतिवादाला’ दृढ करतात. ‘भोगभूमी येईल तेव्हा कल्पवृक्षांपासून सर्व इच्छित पूर्ण होतील’ असे मानून, कोणी जगतांनाचा ‘पुरुषार्थ’ सोडला तर, ‘उपाशी मरण’ नक्की आहे. त्याचप्रमाणे ‘चतुर्थ काळांची’ वाट पाहून, ‘उन्मत्त होण्यापेक्षा’, प्राप्त ‘नियतीचा’ स्वीकार करून, सम्यक् ‘पुरुषार्थ’ करणेच श्रेष्ठ आहे.

८) ‘आगमानुसार कार्याच्या एक समयपूर्वी समर्थउपादान असते ज्याने कार्य होते. त्यात स्वभावउपादान असतेच. समर्थ उपादान प्रत्येक क्षणाचा भिन्न असतो.’

‘प्रत्येक पर्याय’ जीवाच्याच ‘उपादान – पुरुषार्थाने’ होते. ‘स्वभाव सन्मुखतेने’, ही व्यक्तता होते. ही ‘अंतरिक योग्यता’ स्वीकारावीच लागते. प्रत्येक योग्यतेला आकार, ‘पुरुषार्थाने’ येतो. ह्या ‘सम्यक् पुरुषार्थाच्या’ वेळी, ‘अनुकूल बाह्य सामग्री, निमित्त’ सहजपणे मिळतात. त्यांची ‘वाट बघण्याची वा मागण्याची’ गरज नसते. हे ‘सम्यग्ज्ञान, उपादान–निमित्ताचे यथार्थज्ञान, काललब्धि, भवितव्यता, कर्म, नियति’, कशाचीही वाट न बघता, ‘स्व’ उपादानावर विश्वास ठेवून ‘पुरुषार्थाची’ प्रेरणा देणारे आहे. आकूलता कमी करून, व्यर्थ अभिमान, ‘मी’ पणा दूर करणारे आहे.

९) ‘व्यवहारात जे कम्मे सूरा ते धम्मे सूरा’ असे म्हटले जाते. ‘धर्म–अर्थ–काम–मोक्ष’ ह्या सर्वांसह ‘पुरुषार्थ’ शब्द जोडून, ‘व्यवहार वा निश्चय पुरुषार्थाधीन’ आहे हे, अधिकच प्रकर्षाने अधोरेखित केले आहे.’

♦ १०) जैन दर्शनानुसार, प्रत्येक द्रव्य, आपल्या ‘नियत पर्यायरूपाने’ परिणमन करत असतांना त्या द्रव्याच्या ‘बलवीर्याचा’ व्यापार नियमाने असतो, त्याला ‘जीव’ अपेक्षेने ‘पुरुषार्थ’ म्हणतात. ‘नियतीने पुरुषार्थाचा’ निषेध न करता, त्याला सन्मानाची जागा दिली आणि ‘पुरुषार्थाने नियतीचा’ अव्हेर केला नाही. शुद्ध आत्म्याच्या आश्रयाने, ‘रत्नत्रयाची’ परिणती हा मोक्षमार्ग आहे. ‘पुरुषार्थ व नियति’ यात संघर्ष नाही. ‘क्रमनियमित, क्रमवर्ती’ पर्यायांच्या सिद्धांताचा स्वीकार, हाच ‘रागादि भावांच्या अभावरूप, संसारनाशाचा पुरुषार्थ’ आहे. कारण आगमाने, ‘स्व शुभभावाची, पुण्याची पराधीनताही, आध्यात्मात’ मान्य केली नाही. वस्तूंचे परिणमन ‘क्रमनियमित’, मानून, त्यांचा ‘कर्ता न बनणे’, हाच ‘पुरुषार्थ’ आहे. कारण जैनांनी ‘वस्तुस्वतंत्रतेचाही’ जयघोष केला आहे. ‘अज्ञानाने स्वीकारलेली पराधीनता’ दूर करून, ‘स्वाधीन स्वभाव व स्व–परिणामातील स्वातंत्र्याची’ जाणीव, हाच ‘पुरुषार्थ’ आहे. ‘परद्रव्याने, जीवाला, ‘बद्ध वा विकारी’ केले नसून, जीवच ‘स्वभावच्युत, अज्ञानी, मोही, बद्ध’ झाला आहे. ‘रागद्वेषरूप बंधाची’ ही परंपरा, खंडित करणे’ हाच ‘पुरुषार्थ’ आहे. कारण ‘परिणतीच्या

शुद्धतेसाठी उपयोगाची शुद्धता, हाच पुरुषार्थ' आहे. शिवाय 'स्वातंत्र्याचा रस्ता स्वावलंबनाचा' आहे. अंतरंगातून 'शुद्धआत्माच्या, स्वातंत्र्य व अस्तित्वाचा' स्वीकार, हा 'आकुलता कमी करणारा, मनःशांती देणारा, वर्तमानात भोगालिप्त न होता, अनासक्ती आणणारा, 'स्व' विस्मरण न होवू देणारा, इच्छांचा निरोध करणारा' आहे. अशाप्रकारे जैन दर्शनात, 'अनेकांताच्या' सहाय्याने, 'अटळ नियतिवाद व स्वच्छंदतावाद' आणि 'पुरुषार्थ', ह्यांचा समतोल साधला आहे. सर्व 'समवायांची सापेक्ष' स्वीकृती, 'सम्यक् अनेकांत' आहे. 'नियति, दैव,कर्म', ह्यांचा हवाला देवून येणारी, 'हतबलता, उदासीनता, परावलंबनता, हटवादीपणा, पलायनवाद', ह्यांना 'पुरुषार्थ' ह्या उपायाने दूर केले आहे. त्याचबरोबर 'पुरुषार्थाने केले' हा अहंकारही दूर केला आहे. 'पाच समवायांचा' मेळ घालून, 'दोन्ही संभावनांवर' अंकुश लावले आहे. 'अनेकांत दृष्टी, स्याद्वादाने कथन, व्यवहार-निश्चयाची विवक्षा, मुख्य-गौण-भेदाची' मदत घेवून, 'प्रत्येकतत्त्वाचे समायोजन' करणे, ही जैनांची 'वैशिष्ट्यपूर्ण शैली' आहे. ह्या 'सापेक्षकथनाने' इतका 'विस्तृत सूक्ष्म, क्लिष्ट' विषयही, 'सम्यक् समन्वयाने' प्रदर्शित केला आहे.

ह्या समग्र अध्याययाने, निदर्शनास आलेला 'पुरुषार्थ' स्पष्ट केला आहे. ह्या 'पाच समवायांच्या सम्यक् स्वीकृतीने', व्यवहारात 'उत्तम पुरुषार्थ सतत करणे', हाच 'श्रावकांसाठीचा प्रशस्त मार्ग' म्हणावा लागेल.

# उपविभाग १ (३ ते ५)

## संदर्भ-सूची

१) प्र.सा. ८८, प.प्र. २७, ३२; ज्ञा. ३५/२७, पं.ध.उ. ३७९, ८१७
२) र.क.श्रा. २३; बो.पा. २५; का.अ. ४७८, प्र.सा. ७; भा.पा. ८३,८५, मो.पा. ५०
३) द.पा. २, बा.अ. ५७, ६८; ध. ९/४, १, १/९/३, मो.पा. ९९
४) प्र.सा. १८१, २०५; लि.पा. २, भा.पा. ८९, स.सा. १५६
५) स.सा. ४१३, पु.सि.तु. २२०, प्र.सा. ८५
६) प्र.सा. २६०; द्र.सं.टी. ३५/९; प.प्र.टी. २/५५/४
७) प.प्र. २/६७, १६४, २/३१/३, २/११४-४/१५, मो.पा. ३१-३२, का.अ. ४०९;
८) स.सा. १५३, १५९, २७५, पं.का. १३५, १६५, १६६, भा.पा. ८१, ८४; प.प्र. २/३८
९) का.अ. ३०४, ४७८; बा.अ. ६८
१०) बा.अ. ६-७,
११) भ.आ. १७१५, १७४८, १८०७-१८०८
१२) स.सि. ९/७
१३) द्र.सं.टी. ३५/१०२
१४) पु.सि.उ. १०३ - ''अर्था नाम य एते प्राणा एते बहिश्वरा : पुंसाम् ।''
१५) त.सू. ७/१५, २७, ''अदत्तादानं स्तेयम्''
''स्तेनप्रयोगतदाहृतादानविरुद्धराज्यातिक्रमहीनाधिकमानोन्मानप्रतिरूपकव्यवहारा:''
१६) त.सू. ७/१५/१७, भ.आ. ८५२-८५५, ८६७ 'चोरीच्या' वर्णनातील 'अर्थ' उल्लेख
१७) ज्ञा. २१/१६/१५
१८) मू.आ. ११३८
१९) भ.आ.गा. ८७६ ते १११०
२०) ज्ञा. २१/१६, २१/९-१७
२१) भ.आ. ८७२, बा.अ. ८०, का.अ. ४०३
२२) का.अ. ४०३, ३३७-३३८, र.क.श्रा. ५९, १४३, शी.पा. ४०;
२३) त.सू. ७/७, २८; चा.पा. ३५, रा.वा. ९/६/२७/५९९/३०
२४) पु.सि.उ. १०८, शी.पा. १९, भ.आ. ९१६, ९८८, ११०९
२५) पं.सं.प्रा. १/६२, ध. १/१, १, २४ / गा.१३०/२०३, त.सू. ३/३६, का.अ. २९९
२६) का.अ. २९९
२७) ध. १/१, १/सू. १६२-१६५ / ४०३-४०५, ध. १ पृ. ३२९-३३२
२८) ध १/१, १, १६३/४०३/११, ४०४/१, ति.प. ४/२९२३, २३९८, २७१८
२९) शी.पा. २९, सू.पा. २२-२४; यो.सा. ८/४५-४८, ४४, ४९
३०) उत्त.अ. ३/१, ७, ११ ते २०; ७/१६ ते २१; १०/१ ते ३७
३१) का.अ. ३१२, ४७८; आ.प. ४, ६, ध ७/२,४, ४/२३ ८/७
३२) स.सा.आ. ११९; ध-१/१, १, २२/१९९/२; ५/१, ६, ७८/५६/७
३३) गो.क. ८८२, का.अ. ३२१-३२३, त.सू. १/२७-२९, पं.का. ४३
३४) त.सू. ३/५३
३५) रा.वा. २/३/२/२०४/१९
३६) ध ६/१, ९-८, ३/२०४/१, २
३७) मो.पा. २४; का.अ. १८८, २१९, २४४, ४०८, ध. ९/४, १, ४४/१२०/१०
३८) आ.मी. ८८-८९; गो.क. ८९१;
३९) जैनतत्त्वमीमांसा पृ. ६; पं.वि. ३/८, ५३
४०) आ.मी. ८९-९१, द्र.सं.टी. २१/३; ३६/४
४१) रा.वा. २/८/१/११८/१२, १४
अ) रा.वा. १/३३/१/९५/४-६, आ.मी. ५८; ९-१४; २४-३६; ३७-४५; ५७-६२
ब) रा.वा. १/२०/३-४/७०/३३; आ.मी. ४२
४२) ध. १/१, १, ४१/२७०/५, १०/४, २, ४, १७५/४३२/२
ध १२/४, २, ७, १७७/८१/३, ८, २/२७०/१०, ८,११/२८९/११, १३/२८९/८
४३) यो.सा.अ. ९/४६; त.सू. १०/८; प्र.सा. १५, ९५, १६९
४४) त.सू. ५/१७-२२; स.सा. १२१-१२३, १६९, २६५, ३१२-३१३; आ.मी. २४, पं.का. ८८-८९
४५) स.सा. २७८-२७९; २८३-२८५; यो.सा.अ. ३/११-१२; ५/२३-२७; ३/१३

# प्रकरण २

# उपविभाग २

## ‘‘ पुरुषार्थाच्या प्राप्तीचे (आराधनेचे) उपाय : कार्यपद्धती :

१) श्रावक व श्रावकव्रते आणि अकरा प्रतिमा : पुरुषार्थदृष्टीने समीक्षा :

२) विविध भावनांचे ‘पुरुषार्थ’ दृष्टीने चिंतन :

अ. बाराभावना

ब. सोळा भावना

क. मैत्री भावना

ड. व्रत भावना

३) ‘पुरुषार्थाच्या’ आराधनेची सार्थकता–मुकुटमणी : सल्लेखना :

### १) श्रावक व श्रावकव्रते आणि अकरा प्रतिमा – 'पुरुषार्थदृष्टीने समीक्षा' :

**प्रस्तावना –** जैन आगमातील 'पुरुषार्थ' वर्णन, त्याचे 'सविस्तर व स्वतंत्र' चिंतन केले. 'मोक्ष' पुरुषार्थाचे महत्त्व अबाधित ठेवून, अन्य 'पुरुषार्थाचे' वर्णन आगमात आढळते. जैन दर्शनाने 'मोक्ष' पुरुषार्थात, 'मनुष्य जन्माची श्रेष्ठता आणि दुर्लभता' प्रकर्षाने नमूद केली आहे. त्यामुळे साहजिकच 'पुरुषार्थाचा' अधिकार 'मनुष्याला' प्राप्त झाला आहे. हा 'मोक्षमार्ग' स्वतंत्रपणे दोनरूपात वर्णिला गेला आहे. 'साधूंसाठीचा' हा मार्ग पूर्ण त्यागरूप ,'महाव्रतरूप' असून, 'श्रावकांसाठी' तो स्थूलरूपाने,' अणुव्रत' म्हणून वर्णिला आहे. 'साधूधर्माचे' वर्णन हा प्रबंधाचा विषय नाही. 'श्रावकांच्या' व्रतांचे वर्णन अनेक ग्रंथामधून केले गेले आहे. 'चरणानुयोगाची' स्वतंत्र शाखाच, ह्या वर्णनाला समर्पित आहे.

जैन परंपरेतील 'श्वेतांबर –दिगंबर' ह्या दोन मुख्य शाखा म्हणता येतील. प्रबंधात मुख्य आधार हा,'दिगंबर परंपरेतील' आगमांचा घेणार हे, पूर्वी नमूद केलेच आहे. 'श्वेतांबर परंपरेतील', अगदीच आवश्यक ठिकाणी, काही उल्लेख केले आहे. 'श्वेतांबर ११ अंगग्रंथापैकी' 'उपासकदशा' हा अंगग्रंथ, 'श्रावकाचारावर' आधारित आहे. त्यातील 'सहावे व सातवे अध्ययन', ह्यातील 'नियतिवाद' मानणाऱ्या, 'सद्दालपुत्र कुंभार' व 'कुंडकौलिक', ह्या दोघांना 'पुरुषार्थाचे' महत्त्व पटवून दिले आहे. ह्या कथांमधून स्पष्टत: 'पुरुषार्थवादाचा' पुरस्कार केला गेला आहे.

दिगंबरांनी 'श्रावकाचारावर' विस्तृत लिखाण केले. अत्यंत 'शिस्तबद्ध, क्रमबद्धतेने', 'अणुव्रत, शिक्षाव्रत, गुणव्रत', त्यांच्या भावना, अतिचार' ह्यांचे, सूक्ष्म विवेचन केले आहे. ती विस्तृत ग्रंथ संपदा, 'चरणानुयोगाचा' भाग आहे. त्यामुळे 'श्रावकाचारावर' ग्रंथ लिहणे, हे प्रयोजन नाही. त्या 'व्रत-भावना-अतिचार' इत्यादि वर्णनात न जाता, आजपर्यंत कोणी नजरेत न आणलेला,' पुरुषार्थ' फक्त निदर्शनास आणण्याचे काम केले आहे. 'श्रावकाचाराचे' पाच खंड, त्यांचे 'वाचन, चिंतन, प्रस्तावनेचे मनन, इत्यादीच्या सखोल अभ्यासानंतर, त्यातून प्रतिबिंबित 'पुरुषार्थ' मांडत आहे.

आगमात विस्तृतपणे वर्णित ह्या विषयांचा, स्थूल आढावा देवून, 'पुरुषार्थ' प्रकर्षाने अधोरेखित केले आहे.

**विषयविस्तार स्वरूप :-**

जैन दर्शनाने 'मोक्षाचा' अधिकार 'मनुष्यगतीला' दिला. त्यामुळे त्याचे ' श्रेष्ठत्व' ही, सर्वच मानतात. जैनांनी त्यातही 'श्रावक - साधू' दोन मार्ग सांगून,' श्रावक' दृष्टीने विचार मांडला. * आचार्यांनी, 'विवेकवान, विरक्तचित्त अणुव्रती गृहास्थाला 'श्रावक' म्हटले'. त्याचे ' 'पाक्षिक, नैष्ठिक, साधक' असे तीन भेद दिसतात. गृहस्थ दशेत सुद्धा, 'विवेक पूर्वक जीवन

व्यतीत' करण्यासाठी, अनेक क्रियांचा निर्देश केला गेला आहे.

* 'विषयकथन' करतांना, 'लक्षण-भेद[१]' अपेक्षेने वर्णन केले आहे. त्यात ''पाक्षिक इत्यादि तीन भेद, नैष्ठीक श्रावकाचे ११ भेद, ११ व्या प्रतिमेचेही पुन: दोन भेद सांगितले.'' ह्या तीन भेदांचेही लक्षण इत्यादि वर्णिले आहे.

* 'श्रावकांच्या' निर्देशात[२],'' गृहस्थ धर्माची प्रधानता, पात्रता, विवेकीची अहिंसा, भवभ्रमणाची सीमा, श्रावकाला मोक्षाचा निषेध,'' असा विस्तार आढळतो.

* 'पाक्षिक व नैष्ठिक' श्रावकांचे महत्त्व सांगताना[३],'' नैष्ठिक श्रावकातील सम्यग्दर्शनाचे स्थान, ११ प्रतिमातील उत्तम, मध्यम इत्यादी भेद, व्रतांची तरतमता, पाक्षिक श्रावक सर्वथा अव्रती नाही, त्याची दिनचर्या, पाच व्रतांचे एकदेशपालन, दोन्ही भेदांमधील अंतर ,'' वर्णिले आहे.

* 'श्रावकांच्या' मूळ व उत्तर गुणांचा ऊहापोह केला आहे[४]. 'मूलगुणांची आवश्यकता, समन्वय, श्रावकदर्जा', असा विचार केला आहे.

* 'श्रावकांच्या' उत्तरगुणांमध्ये आचार्यांच्या विविध विवक्षा आढळतात[५]. 'श्रावकांचे कर्तव्य ''कोणी दोन, चार, पाच, सहा, ५३, इत्यादि प्रकारे सांगितले. अन्य कर्तव्यांमधे[६] सल्लेखनापूर्वक मरण, वैयावृत्य, विनय, दशधर्म, सम्यग्दर्शन, १२ भावना, यात्रा, मंदिर निर्माण, इत्यादींचे वर्णन करून, त्यांचे महत्त्व सांगितले आहे.'' त्याचबरोबर निषिद्ध क्रियांचेही आवर्जून उल्लेख केले आहे[७].

**पुरुषार्थ प्रेरणा :-**

♦ १) जैन परंपरेत सदैव चार 'पुरुषार्थांचा' स्वीकार केलेला दिसतो. 'मोक्ष' प्रधानता मानल्याने, 'मनुष्यगतीचे' स्थान अधिकच श्रेष्ठ ठरले गेले. अशा ह्या 'मनुष्यगतीची' प्राप्ती होणे हे, 'पूर्वपुण्याचे' फळ आहे. आजचे 'पुण्य' हे, कालचे 'पुरुषार्थ' होते. त्यातून नकळत 'पुरुषार्थाची प्रेरणा' दिली की, ह्या भवात पुन्हा असा 'पुरुषार्थ' व्हावा, ज्याने पुन्हा अशी गति मिळू शकेल. हा 'भव वा गति' प्राप्ती हाच 'पुरुषार्थ' आहे, जो 'सम्यक् पुरुषार्थाला' चालना देणारा आहे.

२) जैन दर्शनाने सदैव 'निवृत्तीचा' पुरस्कार केला. 'आत्मकल्याण, कर्मनाश, स्वरूपप्राप्ती', ह्यालाच महत्त्व दिले. 'वृषभदेवांनी' षट्कर्मे शिकवून, 'प्रवृत्तीला प्रेरणा' दिली. ह्या प्रवृत्तीने 'त्रिवर्गांची पुष्टी' होते. व्यवहारात 'प्रवृत्ति, त्रिवर्गांचे पालन' हा, 'पुरुषार्थ' सहजी घडतच राहतो, 'निवृत्तिमात्र' प्रखर 'पुरुषार्थनेच' शक्य आहे. 'ऋषभदेवांनी सम्यक्' प्रकारे त्रिवर्ग सेवनासह,' पुरुषार्थपूर्वक निवृत्तीचा' पायंडाच घातला.

३) जैनांनी 'रत्नत्रयाच्या' एकतारूप 'मोक्षमार्ग' सांगितला. तीर्थंकरांनी 'स्व' उदहरणांनी तो

प्रत्यक्ष दाखवला. 'चारही पुरुषार्थांचे' आदर्श त्यांनी ठेवलेत. मात्र, त्या 'मोक्षाला' जाण्याचे, 'विवेकाचे, निवडीचे, प्रयत्नाचे', स्वातंत्र्य 'जीवाला' दिले. ही 'स्वतंत्रताच पुरुषार्थाचे' घोतक आहे. 'ते करणे' जीवाधीन ठेवून, ' पुरुषार्थाची' पुष्टीच केली आहे.

४) जैन आगमातील, 'श्रावकांची कर्तव्ये, उत्तर व मूलगुण' ह्या सर्वपालनात,'यथाशक्ती' शब्दावर जोर दिला. ह्या शब्दानेच 'पुरुषार्थ' सूचित केला. ही 'कर्तव्ये, मूळ-उत्तर गुण', ही क्रमशः वाढत्या 'पुरुषार्थाचा' निर्देश करतात.

५) श्रावकांच्या 'तीन भेदांचे' वर्णन आगमात दिसते. ह्या तीन भेदांमधून 'श्रावकाकडून' घडणाऱ्या 'पुरुषार्थाकडेच' दिशानिर्देश केला आहे. हे भेद, वाढत्या 'पुरुषार्थाचे' प्रतिक आहेत.

**श्रावकाचार :-**

**प्रस्तावना –** जैन धर्म 'निवृत्तिप्रधान' आहे. 'आध्यात्मिक उन्नति व आत्मकल्याण,' हेच जीवनाचे साध्य मानून, 'आचार व तत्त्वज्ञानाचा' विकास झाला आहे. 'स्थूलाकडून-सूक्ष्माकडे' प्रवास ही तर, जैनांची विशेषताच म्हणावी लागेल, प्रथमावस्थेत, 'क्षमतानुरूप पूर्ण त्याग वा पूर्ण भोग' कशाचाही, आग्रह केलेला दिसत नाही. प्रत्येक तत्त्वांचा विचार, 'द्रव्य-क्षेत्र-काल, भाव, मर्यादेनुसार,' आणि 'व्यक्तिगतशक्तीच्या' अनुषंगाने झाला आहे. म्हणूनच 'प्रत्येक तत्त्व वा आचार' यांचे कथन, 'द्रव्य-भाव, व्यवहार- निश्चय, मुख्य-गौण, सूक्ष्म-स्थूल', अशा दृष्टीने केलेले आढळते. परंपरेनुसार अंतिमतः 'तत्त्व वा आचाराची,' मुख्यता, सूक्ष्मता, निश्चयदृष्टीनेच स्वीकारली आहे. 'कर्मस्वातंत्र' दिल्याने मार्ग निवडण्याचा मात्र, पूर्ण अधिकार जीवाला दिलेला आहे. त्यामुळे स्वतंत्रपणे 'साधू - श्रावक' मार्ग सांगून,' निवडीचा अधिकार' अबाधित ठेवला. प्रबंधात 'श्रावकदृष्टीने' विचार करणार असल्याने, 'श्रावकाचाराचा' विषय स्थूलपणे कथन करून, श्रावकदृष्टीने आवश्यक 'पुरुषार्थ' विशेषरूपाने, निदर्शनास आणला आहे. 'दिगंबर परंपरेतील' मुख्य ग्रंथांचा आधार घेवून, नीट चिकित्सा करून, विषयप्रस्तुति केली आहे. 'दिगंबरांनी' हा क्रम,''अष्टमुलगुणपालन, सप्तव्यसन-त्याग, षट्आवश्यकांचे पालन, स्थूल अणुव्रत इत्यादि पालन, अकरा प्रतिमा ग्रहण'', अशा 'शिस्तबद्ध, क्रमबद्ध' पद्धतीने मांडला आहे. त्याच आधारे वर्णन केले आहे.

**अ) अष्टमूलगुणपालन, सप्तव्यसन त्याग :-**

जैनांनी स्पष्टपणे 'साधू - श्रावक' आचार, भिन्नपणे सांगितला. श्रावकांना 'स्थूलव्रतपालनाचा' निर्देश केला गेला. 'अहिंसा परमो धर्म', हे जैनांचे 'ब्रीदवाक्य' आहे. 'अहिंसाव्रतरक्षण' ह्या विषयासाठी, सर्व व्रतांची गूंफण केलेली दिसते. 'अहिंसा' हा 'आत्मधर्म' असल्याने, 'हिंसेच्या त्यागाच्या' उपायात प्रथमतः, 'तीनमकार' व पंचउदंबरफळांचा त्याग' आवश्यक सांगून,

त्यांनाच 'अष्टमूलगुणांचा' दर्जा दिला गेला आहे.

* र. क. श्रा. मध्ये 'तीन मकारांसह पाच अणुव्रतांना' मूलगुणात ठेवले आहे'.(श्लो. ६६)

* 'सा. ध. ग्रंथात, (२/१८), 'तीन मकार, रात्री भोजन व पाच उदंबर त्याग, देववंदना, जीवदया, पाणी गाळून पिणे', ह्यांना 'मूलगुण' म्हटले आहे'.

* 'ह्या अष्टमूलगुणांपैकी,' एकाच्याही अभावात, 'श्रावक' दर्जा आचार्यांनी दिला नाही. 'ह्या 'आठ' विषयांनाच साधारण 'मूलगुण' म्हटले गेले आहे'.

* 'अष्टमूलगुणांच्या' पालनाबरोबर 'सप्तव्यसनांचा' त्याग, हे 'श्रावकाचे' आद्य कर्तव्यच म्हटले आहे. 'जुगार, मद्य, मांस, वेश्यागमन, शिकार, चोरी, परस्त्रीगमन,' ह्यांना 'व्यसन ' म्हटले आहे. 'विशेषप्रकारे जे, आत्म्यात विशेष स्थान करून राहतात, त्यांना 'व्यसन' म्हटले आहे'.

*** तीनमकार, पाचउदंबर त्याग :-**

'अष्टमूलगुणांचे' पालन करणारा, 'श्रावक' होण्यास पात्र मानला आहे. त्यानुसार आगमात वर्णन आढळते.

* 'पु. सि. उ. ह्या ग्रंथात[८] अमृतचंद्रांनी', अत्यंत सुंदर शब्दांत वर्णन केले आहे. सुंदर व्याख्येतून वर्णन करून, 'मद्याचे' दोष कथन केले आहे. ह्यातच पुढे 'मांस' वर्णनातून त्याचे 'स्वरूप, दोष, पाप' वर्णन करून, 'हिंसेचे स्वरूप' स्पष्ट केले आहे.

* 'मधु' सेवनाबाबतही आचार्यांनी, 'कडक शब्दात निर्देश करून, निषेध केला आहे'. स्पष्टपणे 'मधु, मद्य, लोणी, मांस, यांना महाविकृति' म्हटले आहे.

* 'पंचउदंबर' फळांच्या सेवनाने होणारी, 'त्रस हिंसा' निदर्शनास आणून, 'अहिंसाव्रत' पालनासाठी, ह्या 'दुःखदायक, दुस्तर, पापस्थानांचा' त्याग आवश्यक सांगितला आहे. 'पंच उदंबरांचा त्याग' असणाऱ्यांनाच, उपदेशाला पात्र मानले आहे.

*** सप्तव्यसने :-**

'सप्तव्यसनांचा' त्याग श्रावकांसाठी आवश्यक मानला आहे. ह्या सात व्यसनांपैकी, 'मांस व मद्यांचा' विचार 'अष्टमूलगुणांमधेच' केला आहे. 'चोरी' ह्या व्यसनाचा विचार, 'अणुव्रतात' केला जाणार आहे. अन्य 'व्यसनांबाबत' उल्लेख केला आहे.

* 'जुगार वा द्युत' सर्वथा व्यर्ज्य सांगून[९] 'त्याचे अतिचार कथन करून, त्याचा निषेध केला व त्याची कारणे सांगितली आहेत'.

* 'वेश्यागमन व परस्त्रीसेवन'[१०] ह्यांचे वर्णन 'ब्रह्मचर्यव्रताच्या' अंतर्गत केले गेले आहे. 'ब्रह्मचर्याचे मोक्षमार्गातील महत्त्व अधोरेखित  करून, ह्या व्यभिचाराचा निषेध केला आहे'.

* 'शिकार करणे'[११] ह्या व्यसनाचा अंतर्भाव, 'अनर्थ दंड रूपातही केला आहे . 'प्रमादाची अधिकता' ह्या कारणाने,'तीव्र अनुभागबंधात' ते निमित्त मानले गेले आहे. त्याच्या 'अतिचार' वर्णनांसह, दोषांचे स्वरूप कथन करून, प्राप्त फळांचा निर्देश करून,' सावध केले आहे'.

**गर्भित पुरुषार्थ :-**

जैन आगमात वर्णित ह्या, 'अष्टमूलगुण व सप्तव्यसन' वर्णनाचे, चिंतन-मनन, योग्य 'पुरुषार्था'कडे नेणारे आहे. 'स्थूलाकडून-सूक्ष्माकडे' प्रवास ही जैनांची विशेषता आहे. 'व्रत' वर्णनातही हा क्रम ठेवला आहे. मार्ग दाखवून, निवडण्याचा ' अधिकार' व 'स्वातंत्र्य' देणे हाच 'पुरुषार्थ' आहे. 'पुरुष' शब्दाची व्युत्पत्ति '' पुरुगुण भोगे--(गो. जी. कां.२७४) अशी केली आहे. 'पुरु' म्हणजे 'उत्तम वा श्रेष्ठ वा वृषभांचे वंशज' असा अर्थ केला आहे. 'पुरुष' जर 'श्रेष्ठत्वाचे द्योतक' असतांना,' व्यसनसेवन' इत्यादि निद्यकर्म करणे, कसे योग्य आहे? ह्या विधानातून 'पुरुषाने' सदैव, 'उत्तम कर्म' वा 'पुरुषार्थच' करावा, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे.

♦ २) प्रत्येक आचार, व्रत पालनात 'यथाशक्ती' व 'द्रव्य-क्षेत्र-काल-भाव' ह्यांचा सामावेश करून, 'श्रावकांना' दिलासा दिला आहे. इतरांचे बघून वा 'ईर्ष्या, मत्सरापोटी वा चढाओढीपायी, व्यर्थ त्याग वा संयमाचा' विरोध केला आहे. 'स्वभाव, रुचि, आवड, सामर्थ्य', बघूनच 'व्रतांचा जागरूकपणे स्वीकार,' हाच खरा 'पुरुषार्थ' आहे. 'अष्टमूलगुणांच्या पालनातून व व्यसनत्यागातून,' छोटे छोटे 'नियम, संयम, त्यागाचा' अभ्यास, हा श्रावकदृष्टीने खरा 'पुरुषार्थ'ठरेल.

३) 'भोगभूमीत भोगांची' प्रचुरता असून, जीव ते भोग भोगतो व 'देवगतीत' जन्म घेतो. नारकी ' निर्णय' घेवू शकत नाही, 'तपस्या' करू शकत नाही. 'तिर्यच' 'साधू' बनू शकत नाही, देव 'संयम' धारण करू शकत नाही. एक 'मनुष्यगतीतच' हा अधिकार प्राप्त आहे. ह्या 'उत्तमपर्यायात, उत्तमकार्य, संयम, साधना', होणे महत्त्वाचे आहे. ह्या पर्यायाचे महत्वच 'संयमाने' आहे, आणि 'पराधीनतेच्या त्यागाचाच क्रम म्हणजे संयम' आहे. 'मोक्षमार्ग वा संसारमार्ग', दोन्ही पूर्णत: स्वतंत्र आहे. बुद्धिपूर्वक 'इष्टानिष्टता, हेयउपादेयता, विवेकपूर्वक' निवड, हाच ह्या 'मनुष्यगतीतला', श्रावकांचा 'योग्य पुरुषार्थ' आहे. श्रावकदशेत, व्यवहारात 'बुद्धिपूर्वक इष्टानिष्टता' घडून, 'परिणाम कलुषित' होतात. 'परिणामशुद्धी' ही 'श्रावकदशेत' खरी कसोटी आहे. ही शुद्धी 'भोजनशुद्धीशी' जोडली गेली आहे. म्हणूनच 'पंच उदंबर त्यागरूपाने भक्ष्याभक्ष्य विवेक', हाही श्रावकांचा 'पुरुषार्थच' आहे.

♦ ४) 'पंचमकाळात' मोक्षप्राप्ती नसली तरी, 'व्रत, मूलगुण पालनातून, हा संयम, त्यागाचा सराव अभ्यास', संस्काररूप धारण करणारा आहे. हे संस्कारच 'मोक्ष' पुरुषार्थात 'बीजरूप' ठरू शकते. हा जन्मभर होणारा अभ्यास, सराव, 'मोक्ष' पुरुषार्थाची ज्योत तेवत ठेवून, संसारात नष्ट होवू देत नाही.'धर्म' पुरुषार्थाचे सतत सेवन, हाच 'पुरुषार्थ' सम्यक् ठरतो.

५) 'सात व्यसनांचा क्रम', एकावर एक अवलंबून आहे. 'प्रथम व्यसन, पुढच्या व्यसनाचे' कारणच आहे. 'व्यसनाधीन व्यक्तींकडून, त्यांचा त्याग, प्रचंड मानसिक धैर्य, धृति, पुरुषार्थाशिवाय' शक्यच नाही. कारण 'व्यसनांना वाईट मानणे' हे आधी महत्त्वाचे आहे. आजच्या २१ व्या शताब्दीत तर, ही 'व्यसने' फॅशन आहे, आधुनिकतेचे प्रमाण आहे. अशा परिस्थितीत त्यावर 'नियंत्रण हा पुरुषार्थ' आहे.

६) वर्तमानात दिसणारा 'नैतिकतेचा ऱ्हास', हा व्यसनांशी जोडता येतो. 'चार संज्ञामधे 'मैथुन' संज्ञा' ही प्रकर्षाने असल्याने, 'स्व नियंत्रण, वासनांवर विजय, चांगल्यावाईटाची जाण व भान', ह्या 'पुरुषार्थाशिवाय', ह्या 'व्यसनातून' बाहेर पडणे अशक्यच आहे. ह्या प्रखर वासनेत, 'धर्म, नीती, उपदेश, भय, ग्लानी', सर्व तुच्छ ठरतात. दृढ मानसिक 'संकल्प व निर्धार' हाच 'पुरुषार्थ' आहे.

७) 'मनोरंजनाच्या नावाखाली वा शारीरिक बळ' सिद्ध करण्यासाठी, 'शिकार करणे, शर्यती लावणे', इत्यादी क्रिया समाजात घडतांना दिसतात. इतर प्राण्यांच्या अस्तित्वाबाबतची, 'अजागरूकता, मदोन्मत्तपणा, पैशाची गुर्मी, इतरांबाबत तुच्छभाव', ह्या कारणांने ही 'जीवहिंसा' सहजपणे घडतांना दिसते. कारण 'अहिंसेचे पालन' 'जागरूकतेशिवाय, पुरुषार्थाशिवाय, आत्मौपम्यबुद्धिशिवाय', शक्य नाही. 'रक्षणाचा भाव' हाच 'पुरुषार्थ' आहे.

**ब) षट्आवश्यकांचे पालन :-**

**प्रस्तावना –** जैन दर्शनात 'तत्त्वज्ञानाइतकेच महत्त्व, 'आचाराला' दिले गेले आहे. आचार वर्णन करतांना, 'साधू-श्रावक' भेदाने, विस्तार केला गेला आहे. अतिशय 'शिस्तबद्ध, क्रमबद्ध', वर्णन, ह्या, 'शैलीने' हा विषय आगमात विस्तृतपणे, निटनेटकेपणाने सांगितला आहे, 'दिगंबर' संप्रदायानुसार, 'श्रावकाचाराचा' हा क्रम अधिकच निटनेटका सांगितला आहे. 'अष्टमूलगुणपालन, सप्तव्यसनत्यागानंतर, षट्आवश्यकांचे पालन', हे ' श्रावकांसाठी' महत्वाचे मानले आहे. 'साधू-श्रावकांसाठी उपयोग रक्षणासाठी, व्रतपालनासाठी', ही आवश्यके वेगवेगळी सांगितली आहेत.

* ''कषाय वा राग -द्वेषांच्या वशीभूत नसणारा 'अवश' म्हणवला जातो, आणि त्या 'अवश' व्यक्तीचे जे आचरण, ते 'आवश्यक' म्हटले गेले आहे''. (नि. सा. १४२, मू. आ. ५१५) कुंदकुंदानी (नि.सा. १४७) आत्मस्वरूपातील स्थिरतेने 'आवश्यकताची पूर्ती' सांगितली. 'इंद्रियांच्या वशीभूत नसणाऱ्या, संयमीच्या क्रियांना आवश्यकाचा दर्जा दिला आहे.'

* आगमात 'षडावश्यकांचा' उल्लेख विविध दृष्टीने केला गेला आहे. त्याप्रमाणे 'दोन, चार, पाच, सहा, ५३ अशा क्रियांना आवश्यक' रूपाने कथन केले आहे तरी, वर्तमानात दिगंबरपरंपरेत,

'देवपूजा, गुरुपास्ति, स्वाध्याय, संयम, तप, दान' ह्यांना, 'आवश्यक क्रियांचा' दर्जा दिला जावून, स्वीकारलेले दिसते. ह्या 'षट्आवश्यकांच्या' विस्तृत, सूक्ष्म, विषयविस्ताराच्या, गंभीर चिंतनातून, 'पुरुषार्थ' स्पष्ट केला आहे. विषयविस्तार स्थूलपणे कथन केला आहे.

**विषयविस्तार :-**

* **देवपूजा :-** 'दिगंबर परंपरेनुसार' गृहस्थांसाठी,'जिनपूजा' हे, आवश्यक कर्म मानले आहे. 'भावप्रधान पूजेने,' असंख्यात 'गुणश्रेणी निर्जरा मानली गेली आहे. ही 'अष्टद्रव्ययुक्त पूजा, भक्तिपूर्वक', विविध भेदरूपाने वर्णिली आहे.

* 'पूजेचे' लक्षण-भेद वर्णन करतांना[१२], 'निक्षेपविवक्षा, इज्जा इत्यादि अपेक्षा, द्रव्य- भाव असा विस्तार केला आहे. निश्चयपूजेचे स्वरूपही' कथन केले आहे.

* पूजेचे महत्त्व[१३], 'नित्य कर्तव्य, अंतरंगभावांची प्रधानता, पूजेचे फळ', अशा रूपाने वर्णन केले आहे.

* मूर्तिपूजेचाही विस्तार विस्तृतपणे केला आहे[१४]. ''देव, शास्त्र पूजेत, समानता सांगून साधू, प्रतिमाही पूज्यमानली आहे. अष्टद्रव्याच्या पूजेचे फळ, विधि विस्ताराने वर्णिली आहे''.

* पूजाविधी सांगतांना[१५], ''ह्याचे पाच अंग, दिवसातून तीनवेळा करण्याचा निर्देश, रात्री पूजेचा निषेध, द्रव्य-भाव पूजा, स्नानाचे महत्त्व,'' वर्णन केले आहे.

* **गुरुपास्ति - स्वरूप :-**

जैन दर्शनात 'पंचपरमेष्ठींना' आराध्यदेव मानले आहे. 'वर्तमानकाळात,ह्या पंचमकाळात, भरत-ऐरावत क्षेत्रात', 'अरिहंत' परमेष्ठी नसल्याने, 'आचार्यांना' उच्चतम मानल्याने, विनयाला महत्त्व दिले आहे. 'रत्नत्रययुक्त साधूंचे' पूजन आवश्यक मानले आहे. 'विनय' तपातील 'उपचार विनयांच्या' भेदामध्ये, 'गुरुपूजेचे' वर्णन आले आहे. त्याचप्रमाणे 'नवधा भक्तीमधेही', गुरुपूजेचे वर्णन आढळते.

* 'आचार्यांनी[१६] ह्या प्रकरणात खऱ्या गुरुंची ओळख करून दिली आहे.'

* 'विनयाच्या योग्य-अयोग्य अवस्था सांगून[१७], आवश्यकता स्पष्ट केली आहे.'

* 'यथायोग्य साधूंना वंदनापात्र मानून, ज्ञानवृद्धांना अधिक पूज्य मानले[१८] आहे.'

* 'कुगुरु वंदना-पूजनाचा निषेध करून, कारणेही स्पष्ट केली आहे[१९].'

* 'साधूंना नमस्कार करण्याची कारणे नमूद केली आहेत[२०].'

* **स्वाध्याय :-**

मोक्षामार्गात 'तपाला' अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. 'तपात स्वाध्यायाचा' समावेश,

'अंतरंगतपात' केला अहे. प्रबंधातील 'पुरुषार्थाच्या प्राप्तीची साधने' ह्या प्रकरणात, 'तपामधे' स्वाध्यायाचे वर्णन केले आहे. श्रावकांना 'स्वाध्याय' हे, आवश्यक रूपाने करण्यास सांगितले आहे. ह्या विशेष अधिकाराने, 'तपांची', पर्यायाने 'निर्जरेची' संधी 'श्रावकांना' दिली आहे, हाच जैनांनी केलेला 'पुरुषार्थच' आहे.

*** संयम :-**

जैन दर्शनातील 'संयम, तप, अहिंसेचे' महत्त्व सर्वश्रुतच आहे. साधूंचा हा मार्ग 'सकलसंयमाचे' दृश्य रूपच आहे. संसारात 'आरंभपरिग्रहांनी युक्त' श्रावकांना, 'संयमाचे' यथाशक्ती पालन करण्याचा उपदेश दिला आहे. 'आवश्यकांमधे' ह्याचा समावेश हेच, 'सम्यक् पुरुषार्थाचे' द्योतक आहे.

संयमाचे वर्णन खूपच सूक्ष्मपणे आगमात केले आहे. त्या विस्तृत विवेचनाच्या, अभ्यास - मननातून, स्पष्ट होणारा 'पुरुषार्थ' अधोरेखित केला आहे. विषयविस्तार स्थूलपणे कथन करून, पुनरावृत्ती टाळली आहे.

* आचार्यांनी 'सम्यक् प्रकारे, व्रत-समिति-गुप्ति रूप प्रवर्तना करणे याला संयम म्हटले आहे'.

* ह्याचे वर्णन लक्षण-भेद रूपाने सांगताना[२१], ''व्रत इत्यादी अपेक्षेने, निश्चयसंयमापेक्षेने, मार्गणारूपाने, सकल-देश, अपहृत-उपेक्षा, वीतराग-सराग, प्राणी-इंद्रिय, संयम,'' असा विस्तार केला आहे.

* 'संयमाविषयीच्या' शंकांचे समाधान करतांना[२२], ''संयम-विरतीतील अंतर, संयमगुप्ति व समितीत भेद, चारित्र-संयमात अंतर, इद्रियसंयमात जिह्वा व उपस्थाची प्रधानता, इंद्रिय व मनोजयाचा उपाय, कषाय निग्रहाचा उपाय, संयमासाठीच्या भावना, काळ, सीमा,'' असे विस्तृत वर्णन केले आहे.

*** तप :-**

मोक्षमार्गात 'संवर व निर्जरा' ही महत्वाची म्हटली आहे. निर्जरेसाठी 'तपाचे' विशेष महत्त्व सांगितले गेले आहे. 'अनादि बद्ध कर्मसंस्कार' नष्ट करण्यात 'तप' समर्थ असल्याने, 'तपाचे' स्थान, जैन दर्शनात अधिक प्रकर्षाने उजागर केलेले दिसते. प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणातील, 'पुरुषार्थाच्या प्राप्तीची साधने,' ह्या उपविभागात 'तपाचे' सविस्तर वर्णन केले गेले आहे.

**दान :-**

'अहिंसा' व 'तप' हे जसे 'जैन परंपरेचे वैशिष्ट्य' आहे, त्याचप्रमाणे 'दाना' चेही विशेष महत्त्व आहे. सैद्धांतिक दृष्टीने अनेक पातळीवर, 'दानाचा' विचार केलेला, जैनपरंपरेत विशेषत्वाने आढळतो. कोणताही मुद्दा विचारार्थ घेतल्यावर, त्याची 'विशिष्ट पद्धतीने चिकित्सा' करणे

जैनांचे खास वैशिष्ट्यच आहे. प्रथम 'व्यावहारिकदृष्टीने' प्रकार-उपप्रकार सांगायचे, नंतर 'द्रव्य-क्षेत्र-काल-भाव', निक्षेपांची मदत घ्यायची, 'सहाद्रव्ये - साततत्वे, कर्मसिद्धांत' इत्यादींच्या सैद्धांतिक चिकित्सेत', त्याचे स्थान नक्की करायचे, नंतर 'निश्चयनयाने' शुद्ध 'आध्यात्मिक पातळीवरून' निरपेक्ष समीक्षा करायची, ही शैली दिसते. अशाच प्रकारे 'दान' संकल्पनेचा विचारही केला आहे.

**विषयविस्तार :-**

'शुद्धधर्माचे पालन गृहस्थधर्मात' होवू न शकल्याने, 'दानाचे' विशेषच महत्त्व 'श्रावक' दृष्टीने सांगितले आहे.

* आचार्यांनी लक्षण भेद कथन करून[२३], 'आहारदान इत्यादि, दयादत्ति इत्यादि, सात्त्विक-राजसादि,' असे स्वरूप कथन केले आहे.

* श्रावकांसाठी 'दान' धर्माची प्रधानता[२४] 'सांगतांना, सत्पात्रदान, त्याचे महत्त्व, धन्यता, सार्थकता', वर्णन केले आहे.

* 'दानाचे' महत्त्व व फळ वर्णन करतांना[२५], 'आहार-औषधी,-ज्ञान,-अभय, दानाचे महत्व प्रकर्षाने वर्णिले आहे'. अशा 'दानाने' मिळणाऱ्या 'फळांकडे' विशेष लक्ष वेधले आहे.

* 'दानाचे' विशेष स्वरूप कथन करतांना[२६], ''विधि, द्रव्य, दातृ, पात्र इत्यादि दृष्टीने महत्व स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर दानासाठी धनाची इच्छा करणे, वा ग्रहण करणे, संग्रह करणे, इत्यादि गोष्टींचा कटाक्षाने निषेध दर्शविला आहे. त्यासाठी संपत्तीचे वर्गीकरण कसे करावे? ह्याचे मार्गदर्शनही केले आहे''.

* 'दानाचे सैद्धांतिक' स्थान ह्या दृष्टीने 'दानाचा' विचार केला गेला आहे.

१) **'जीवाच्या लक्षणात स्थान[२७]'** : ह्या दृष्टीने विचार करता, 'उमास्वामींनी' म्हटले आहे की, 'द्रव्याचे 'सत्' लक्षण असून, 'जीव अनंतानंत असून, परस्परांवर उपकार' करतात. जैनाचे बोधवाक्य असणाऱ्या, 'परस्परोपग्रहो जीवानाम्,' ह्या वाक्यात, 'परस्पर सहकार्य, मदतीची अपेक्षा', व्यक्त करून, 'दानाचे' स्थान दर्शविले आहे.

२) **'आत्म्याचा मूळ स्वभाव'**[२८] : ही दृष्टी ठेवून, चिंतन केले असता दिसते की, 'वीर्य' हा 'आत्म्याचा स्वभाव' आहे. अंतराय कर्माच्या आवरणाने, व्यवहारात, 'दान' इत्यादित तरतमता आढळते. मात्र ह्या 'घातिकर्माच्या' क्षयानंतर, त्यांचे पूर्णत्व प्रगटते. त्यात 'दान' हा मुख्यभाव आहे. सैद्धांतिक दृष्टीने 'दान' हा, 'आत्म्याचा स्वभावाशी' जुळलेला भाव आहे. त्यानंतर 'क्षायिक दानादिंची' प्राप्ती होते. ह्या लाभानंतरही केवली 'द्रव्यरूपात' दान देत नाहीत तर, 'अक्षय दातृत्व' वृत्तीने, 'सद्विचार, आचार, प्रवृत्तींचा' उपदेश, 'दान' करतात.

**३) 'सम्यक्त्वाचे आठ अंग'**[२९] : ही विवक्षा ठेवून, 'दान' वर्णन केले आहे. 'सम्यक्‌दर्शन' ही जैन 'आचारविचारांची' आधार-शिला आहे. ह्यांचे 'आठ अंग' आगमात वर्णिले आहेत. त्यापैकी 'वात्सल्य व प्रभावना' ह्या दोन्ही अंगांमधे, 'दानाचा' आवर्जून उल्लेख केला जातो. 'सम्यक्त्वाशी' जोडले गेल्यानेच 'दान' हे, जैनांच्या 'धार्मिक प्रवृत्तींचे' गमक मानले गेले आहे.

**४) 'श्रावकाचारात दानाचे स्थान'**[३०] : बघता, 'श्रावकांच्या दैनंदिन' जीवनात पालन करावयाच्या, 'कर्तव्यात, व्रतात, प्रतिमेत' ह्याचा समावेश केला आहे. 'अतिथि-संविभाग' ह्या व्रतातून, त्याचा विचार प्रकर्षाने मांडला आहे.

**५) 'उपदेशरूपाने दानाचे स्थान,'**[३१] ह्या दृष्टीने साधूआचारात, 'ज्ञानदानाची' श्रेष्ठता कथन केली आहे. 'दशविध' धर्मात 'त्याग' ह्या विषयात,'धर्मोपदेश' हा त्याग म्हटले आहे. 'धर्मोपदेशाने कर्मनिर्जरा' सांगून, ह्या 'ज्ञानदानाने निर्जरा' सूचित केली आहे.

**६) जैन दर्शनात, 'दर्शन, ज्ञान, चरित्र, तप',** : हे रूढ 'सैद्धांतिक चतुष्टय' मानले जातात[३२]. त्याचबरोबर 'द्रव्य-क्षेत्र-काल-भाव' हे सुद्धा, कोणत्याही विषयवर्णनामागचे 'वैचारिक चतुष्ट्य' आहेत. व्यावहारीक जीवनात 'दान-शील-तप-भाव' अशी चतुष्ट्यी प्राचीन असली तरी, आताच्या काळातही आवश्यकच आहे.

**७) 'अभयदान प्रधान दान मानले आहे.**[३३]**'** : चार संज्ञांपैकी 'भय' ही मूळ अंत: प्रवृत्ती आहे. 'मरणाचे भय' सर्वतोपरी असल्याने, 'अभयदान' श्रेष्ठ ठरते. 'अभयदानाचा' संबंध 'अहिंसा' ह्या मूळ संकल्पनेशी असल्यानेही, त्याचे स्थान विशेषच आहे. 'आत्मसाधनेसाठी स्वत:चा जीव सुरक्षित ठेवणे', ह्याला 'स्वदया' म्हटले आहे. 'स्व' व 'पर' दया रूपाने, 'अभयदानाच्या' दृष्टीने, 'निश्चय- व्यवहाराची सांगड' घातली आहे.

**८) 'दानाने पुण्यप्राप्ती होते'**[३४] : भारतीय परंपरेतील ही, एक 'रूढ संकल्पना' आहे. जैन दर्शनात, 'दानाने पुण्यास्रव' हा उल्लेख आगमात आढळतो.

**९) 'कर्मसिद्धांतात दानाचे स्थान'**[३५] : ह्या दृष्टीने कथन करतांना, 'सैद्धांतिकदृष्ट्या' कर्मांचे आठ प्रकार सांगतात. त्यापैकी 'अंतराय व वेदनीय' ह्या कर्मांशी, दानाचा संबंध जोडता येतो. 'वेदनीयकर्माच्या' सातावेदनीयच्या आस्रवात, 'दानाचा' आवर्जून उल्लेख केलेला आहे. 'अंतराय' कर्माच्या 'दानांतरायाच्या' आस्रवात, 'दुसऱ्यांच्या दानात विघ्न आणणे' हे, कारण मानले आहे. 'तीर्थंकर प्रकृतीच्या बंधाच्या' १६ भावनांमध्ये, यथाशक्ती 'दानाचा' आग्रह केला आहे.

जैनांनी 'दानाला' फक्त, 'नीति वा आचरणाचा भाग वा सदगुण दर्जा' न देता, कर्मप्रकृतींमधे समावेश करून,'सिद्धांतात स्थान दिले आहे. जैन सिद्धांत व आचारातील 'दानाचे' अनन्यसाधारण स्थान, हे अशा विविध विवक्षांनी अधोरेखित केले आहे. 'सम्यक्त्व' ह्या आधारावर ते स्थित आहे. 'तत्त्वज्ञान व आचाराचा' कणा असणाऱ्या, 'कर्मसिद्धांताशी' ते जुळलेले आहे.

'आध्यात्म्याच्या अत्युच्च' अशा १३ व्या गुणस्थानातही 'दानाचे' श्रेष्ठत्व प्रकाशित केले आहे.

*** षट्‌आवश्यकांचे पालन-साक्षात् पुरुषार्थ :-**

१) श्रावकांना 'षट्‌आवश्यके' ही महत्वाची सांगितली आहेत. 'आवश्यक' ह्या शब्दातून 'आग्रह, नित्यता, गरज,' हे सूचित होतात. ''गरजेची नित्य आग्रहपूर्वक पूर्तता'' हाच 'पुरुषार्थ सूचक' आहे.

२) 'श्रावकदशेत' नित्य घडणारे प्रचंड, 'आरंभ-परिग्रह, कषायांची प्रचुरता, संकल्प-विकल्पता, विषयांप्रती आकर्षण, चंचलचित्तवृत्ती,' ह्यांना 'रोकणे, अडवणे, थांबवणे,' ह्यासाठी, हे 'आवश्यक-पालन' पुरुषार्थाची परीक्षा घेणारेच आहे. किंबहुना उत्तरोत्तर वाढणारा 'पुरुषार्थच' आहे.

३) 'देवपूजा-गुरुपूजा' ह्यातून, 'नम्रता, विनय' ह्यांचा उत्कर्षच होतो. किंबहुना 'त्यागाचा' पाठ शिकवणारे ते 'पुरुषार्थच' आहे. 'समर्पणभाव' हा त्यातून प्रगट होणारा 'पुरुषार्थ' आहे. ह्या समर्पणातूनच 'देशनारूप लब्धि' प्राप्त होते, जी आत्मोन्नतीत साधन ठरते.

४) 'स्वाध्याय' हा साक्षात्, 'भाव वा परिणामशुद्धीचा, मन:शांतिसाठीचा', दिव्य 'पुरुषार्थच' आहे.

♦ ५) 'सुखासीनता, भोगलोलुपता, परिग्रहाकर्षणाने' युक्त, श्रावकांचा 'संयम' हा खरा 'पुरुषार्थ' होय. सर्व 'अनुकूलता, प्रचुरता, असतांनही, बाह्य वस्तूंचा त्याग', हा 'पुरुषार्थाचा प्रकर्षच' ठरेल. कारण 'स्वाधीन, सहजप्राप्त भोगांचा त्याग', प्रचंड 'मनोनिग्रहाशिवाय' शक्य नाही. इंद्रियसंयमात 'जिह्वा व उपस्थ' ह्यांच्या संयमावर अधिक भर दिला आहे कारण ही इंद्रिये सर्व 'अनर्थांचे, पापांचे, दोषांचे' कारण आहे. विद्वानांनी म्हटलेच आहे. की, 'जीभ जितकी अधिक फिरते, तितके संसार भ्रमण वाढते.' 'कलह, गैरसमज, भांडण, द्वेष' सर्वांचे कारण 'जीभ' आहे. म्हणूनच जैनांनी 'अनशन, मौन, आहारशुद्धी, भक्ष्याभक्ष्यविवेक' ह्यावर अधिक भर दिला. अशा ह्या दोन इंद्रियांचा 'संयम', विशिष्ट काळापुरता जरी झाला तरी, श्रावकांसाठी ते 'पुरुषार्थच' आहे.

६) 'तप' हे तर 'पुरुषार्थाचे प्रथम साधनच' असल्याने, त्यातील 'पुरुषार्थ' तर स्पष्टत: प्रकाशितच आहे. विशेष ऊहापोह 'तप', प्रकरणात केलाच आहे.

♦ ७) दानात 'देणे' महत्त्वाचे आहे. काळानुरूप 'दान' संकल्पनेतही बदल दिसतात. समाजात 'रक्तदान, नेत्रदान, देहदान' असे विविध रूप दिसतात. 'सरोगेशन' रूपाने तर, 'दान' उच्चकोटीला पोहचलेले दिसते. 'जागतिकीकरणाच्या प्रवाहात, साधनांची प्रचुरता असतांना, राग-द्वेष-कषायांवर-लोभावर मात करून, उदात्त भावनेने' 'काही देणे,' वा सामाजिक बांधिलकीतून 'काही देणे' हा, श्रावक धर्मातल्या 'पुरुषार्थातला' शिखरच म्हणावे लागेल.

**क) अणुव्रतपालन – स्वरूप :–**

जैन परंपरा, 'श्रमण परंपरा' असून, प्राचीनतम आहे. जैन दर्शनातील 'निवृत्तिप्रधानता' श्रेष्ठ असल्याने, 'व्रतांचे' महत्त्व व वेगळे स्थान आहे. आगमकाळापासून जैन परंपरेत, 'महाव्रते, अणुव्रते, गुणव्रते, शिक्षाव्रते, तप' इत्यादींचे स्थान सुरक्षित आहे. त्याशिवायही 'उपवास, पूजा अन्यव्रतनिर्देश', इत्यादि उल्लेखही आढळतात. जैन व्रतांमधे 'विरति, विरमण, संयम, मर्यादा' ह्यांची प्रधानता स्पष्टतः दिसते. जैन परंपरेत व्रत, प्रासंगिक नसून, 'आजन्म, नित्यआचारासाठी' उपयोजिलेले दिसतात. ह्या 'व्रतपालानाने,' यथाशक्ती 'आध्यात्मिक प्रगति', ही अपेक्षित आहे.

'व्रतांचे स्वरूप, भेद, विशेषतांसह, अणुव्रतांचे' विस्तृत वर्णन आगमात आहे. त्या अभ्यास व चिंतनातून, स्पष्ट होणारा 'पुरुषार्थ' प्रकर्षाने कथन केला आहे. विषयाचा विस्तार टाळून,ढोबळ आढावा धेतला आहे.

* 'व्रतांचा विस्तार करतांना आचार्यांनी लक्षण-भेद[३६] कथन केले आहेत'.

* 'व्रतांचे महत्त्व नमूद करतांना[३७], व्रतात सम्यग्दर्शनाचे स्थान, विधि, गुरुंची उपस्थिती, व्रतभंगाचा निषेध, प्रायश्चितांचे वर्णन, अन्य व्रतांचा उल्लेख केला आहे'.

* 'व्रतांच्या कठोर पालनासाठी[३८] पाच पाच भावना व अतिचार सांगितले आहेत. श्रावकांना कथचित पालनाचा आदेश दिला आहे'.

* 'अणुव्रतांचे लक्षण-भेद सांगून[३९], रात्रिभोजनत्यागाला सहाव्या अणुव्रताचा दर्जा दिला आहे. स्थावरघाताचा विरोध केला आहे'.

*** अहिंसाणुव्रत –**

जैन परंपरेचे बोधवाक्य 'अहिंसापरमोधर्म' आहे. 'अहिंसा' जैनांचा प्राण आहे. 'अहिंसा' हे 'वैश्विक सत्य' आहे, मात्र व्यवहारात त्याचे क्षेत्र फारच मर्यादित दिसते. जैन दर्शनाने 'अहिंसेचा' अत्यंत 'व्यापक, समग्र, परिपूर्ण, सूक्ष्म' विचार करून, 'व्रते, तत्त्वे,' सर्वत्रच त्याला अग्रभागी ठेवले.

'अहिंसेच्या रक्षणासाठीच' व्रतांचा विस्तार झाला. 'अहिंसेचा' विचार, 'व्यवहार – निश्चय, द्रव्य-भाव, स्थूल-सूक्ष्म, अंतरंग-बहिरंग', अशा खास शैलीने करून, भारतीय परंपरेला, जैनांनी खास देणगीच दिली आहे. ह्या महत्त्वपूर्ण विषयाचा विस्तारही, आगमात विस्तृतपणे केला आहे. त्या सर्व वर्णनात न जाता, चिंतन-मननातून प्रकाशित 'पुरुषार्थ,' अधोरोखित केला आहे.

* 'आचार्यांनी अहिंसेच्या विस्तारात, 'लक्षण-भेद[४०] कथन करून, पाच भावना, पाच अतिचार सांगितले आहेत'.

* 'निश्चय अहिंसेची' कथंचित्, प्रधानता सांगतांना[४१], 'अप्रमादभावालाच अहिंसा' म्हटले आहे. 'स्व-रक्षणार्थ' महत्व सांगितले आहे'.

* 'अहिंसा व्रताची कथंचित् प्रधानता[४२], माहात्म्य सांगून, प्रधानता वर्णिली आहे'.

* 'निश्चय-व्यवहार अहिंसेचा समन्वय अतंत: साधला आहे.[४३]'

* 'पुरुषार्थसिद्ध्युपाय' ग्रंथातील 'हिंसा विचार' आणि अहिंसेचे सूक्ष्म वर्णन[४४], अत्यंत चिंतनीय असून, 'अहिंसेचे' महत्त्व अधिकच उजागर करणारे आहेत.

*** सत्याणुव्रत –**

'अहिंसेच्या रक्षणार्थ' अन्यव्रतांचा, 'विचार व विस्तार' आगमात केला गेला आहे. आध्यात्ममार्गात 'स्व-पर' अहिंसेच्या प्रधानतेने, 'हित-मित प्रिय' वचनांना 'सत्य' म्हटले आहे.

* 'सत्याणुव्रताचा' विस्तार लक्षण-भेद[४५] रूपाने केला आहे.

* सत्यव्रताच्याही 'भावना व अतिचार' वर्णन केले आहे.[४६]

* 'सत्यासत्याचा विवेक' सांगतांना,[४७] 'प्रसंगानुरूप कटूता', हितकारिता, महत्त्वाची मानली आहे. 'कटू, व्यर्थ, असत्य', संभाषणाचा विरोध दर्शवून, 'महत्ता' स्पष्ट केली आहे.

*** अचौर्याणुव्रत –(अस्तेय)**

अहिंसेच्या रक्षणासाठी, 'अस्तेय' व्रताचे वर्णन दिसते.

* 'आचार्यांनी ह्या व्रताचे लक्षण नमूद करून[४८], 'अतिचार व भावना सांगितल्या आहेत'.

* 'अस्तेय व्रताच्या' दृढतेसाठी[४९], 'अन्यायपूर्वक ग्रहणाचा निषेध केला आहे. चोरीची निंदा करून, व्रताचे माहात्म्य स्पष्ट केले आहे'.

* 'ह्या व्रतपालनात उद्भवणाऱ्या शंकाचे समाधान करतांना[५०], कर्मपुद्गलांचे ग्रहण ही चोरी नाही, पुण्योपार्जन प्रशस्त चोरी होय, इत्यादि स्पष्टीकरण केले आहे'.

*** ब्रह्मचर्याणुव्रत :**

अध्यात्ममार्गात 'ब्रह्मचर्याचे' विशेष महत्त्व मानले जाते. 'अहिंसाव्रत रक्षणासाठी' तर, 'ब्रह्मचर्याचे' महत्त्व अधिकच प्रकर्षाने व्यक्त केले आहे. त्यामुळेच 'अणुव्रतातही' त्याचा अंतर्भाव केला आहे.

* आचार्यांनी विषयाचा विस्तार लक्षण रूपाने सांगतांना[५१], व्यवहार-निश्चय विवक्षा समोर ठेवलेली दिसते. त्यात 'दश, नव'' इत्यादि प्रकारच्याब्रह्मचर्यांचा उल्लेख प्रकर्षाने केला आहे.

* 'ब्रह्मर्याणुव्रताचे' वर्णन आचार्य विशेष रूपाने करतात.[५२] 'त्यात पाच भावना आणि पाच अतिचार सांगून, 'स्वदार संतोषव्रताची' अपेक्षा दिसते. त्याच बरोबर परस्त्रीत्याग, वेश्यात्याग' इत्यादि वर्णन आढळते.

* ब्रह्मचर्याची प्रधानता[५३], 'वेश्यागमनाचा निषेध, परस्त्री, दुराचारीस्त्री, निषेध करून सांगितला आहे. शीलप्रधानता वर्णन करून, अब्रह्म सेवनातले दोष वर्णन केले आहे. ब्रह्मचर्याचे माहात्म्य कथन केले आहे'.

*** अपरिग्रहाणुव्रत :**

ह्या व्रताचा 'अत्यंतविस्ताराने, सूक्ष्म विचार' जैन आगमात दिसतो. अन्य दर्शनाने इतक्या समग्रपणे, ह्या व्रताचे चिंतनही केले नाही वा त्याला व्रताचा दर्जा दिलेला दिसत नाही. ह्याच्या विषयविस्ताराचा ऊहापोह करता, स्थूलपणे आढावा घेतला आहे.

* आगमात परिग्रहाचे लक्षण सांगून[५४], अत्यंत निंदा केलेली दिसते.

* 'अपरिग्रहाणुव्रताचे लक्षण सांगून[५५], त्याच्या पाचभावना व पाच अतिचार कथन केले गेले आहे. परिग्रहत्यागाचा महिमा स्पष्ट केला गेला आहे'.

* 'अंतरंग परिग्रहाची प्रधानता सांगतांना[५६] त्याच्या त्यागालाच 'व्रत' म्हटले आहे'.

* 'बाह्य परिग्रहाची कथंचित् मुख्यता-गौणता कथन करतांना[५७], उपचार म्हणून रागादिचे कारण म्हणून, बांधाचे कारण म्हणून, वर्णन केले आहे'.

* 'बाह्य-अभ्यंतर परिग्रहातील समन्वय[५८], अविनाभावीपना, इच्छेचासद्भाव; दु:ख व इच्छेचे कारण, आकिंचन भाव; अभ्यंतर त्यागाचे माहात्म्य, प्रयोजन, असा, विस्तार करून, साधलेला दिसतो'.

*** अणुव्रतांमधील 'पुरुषार्थ' :**

१) ''अहिंसा' हा जैनांचा प्राण आहे.''

'अहिंसेचे' दृश्यरूप, खूपच स्थूल आहे, अहिंसा तत्वाची 'सूक्ष्मता व गहनता, व्यापकता' ही तंतोतंत पाळणे व्यवहारात शक्यही नाही. 'अहिंसा' हा 'आत्म्याचा स्वभाव' आहे. अप्रमादावस्थेलाच 'अहिंसा' म्हटले आहे. कारण 'भावपरिणामानेच बंध व भावपरिणामानेच मोक्ष' हा मानला गेला आहे.'परिणती' महत्त्वाची मानली आहे. 'पुरुषार्थाशिवाय' अप्रमादावस्था प्राप्त होवूच शकत नाही. पुरुषार्थसिद्ध्युपाय ग्रंथातील 'अहिंसा' ऊहापोह खूपच मार्मिक आहे. 'व्यवहारात 'व्यर्थ, अनावश्यक कारणांनी कशी हिंसा होते'? हे दर्शविणारा तो आरसाच आहे. त्या कारणांचे 'चिंतन व विवेकपूर्वक आचरणच अहिंसा' होय.

♦ २)''संकल्पपूर्वक त्याग म्हणजे 'व्रत' म्हटले आहे''

'संकल्प' शब्दातून 'अनुशासन, शिस्त, दृढता' सूचित होते. 'प्रतिज्ञापूर्वक नियम घेणे, व्रतबद्ध होणे' , हे अनुशासन ' ज्ञानपूर्वक व जागरूकतेने' होते. 'संकल्प व अनुशासन' ह्यांचे पालन, 'पुरुषार्थाशिवाय' अशक्य आहे. 'व्रत वा संयमात' प्रचंड मानसिक धैर्याची, आवश्यकताच 'पुरुषार्थाचे' द्योतक आहे.

३) प्राणिमात्रांवर 'दया वा अनुकंपा,' ही प्रखर जाणिवेनेच शक्य आहे. 'स्व' अस्तित्वाची 'जाण व भान', त्याबद्दल जागरूकता ही, 'स्वदया' आहे. 'स्व' दयेतूनच 'पर' दयेचा जन्म होवू शकतो. 'रक्षणाचा भावच' मूळी 'पुरुषार्थ' आहे. हिंसेसाठी 'पुरुषार्थाची' गरज नाही, मात्र अहिंसेसाठी 'प्रखर पुरुषार्थ' आवश्यक आहे. 'कर्माचा विपाक' हे दैव आहे, मात्र 'संयम' हा पुरुषार्थ आहे.

♦ ४) 'अंतरंग अहिंसा सर्वश्रेष्ठ मानली आहे'.

'समाज, धर्म प्रतिष्ठा, नाव-लौकिकाच्या' भीतीने, एकवेळ बाह्य हिंसा, जी दृश्य आहे, ती रोकली जावू शकते. 'भावहिंसा' मात्र 'अंतरंग भाव, विचार, परिणतीवर' अवलंबून आहे. त्या 'भावकलुषतेला, विचार प्रदुषणाला, दुष्ट परिणतीला' रोकणे, हा खरा 'पुरुषार्थ' वा खरी 'अहिंसा' म्हणता येईल. 'मनोनिग्रह, विचारांप्रती सजगता, आत्मौपम्यबुद्धी, 'सोऽहम्'चा निदिध्यास', हीच खरी 'अहिंसा', जी साक्षात् 'पुरुषार्थ' आहे. 'जीवाचा नाश वा घात, आयुकर्माच्या घातावर अवलंबून आहे', असा विचार करून होणाऱ्या 'हिंसेला, स्वैराचाराला, नियतिवादाला, उन्मत्ततेला दूर करण्यासाठीच', आगमातील 'जदंचरे, जदं चिठ्ठे, जदं भासे' हे शब्द, साक्षात् 'पुरुषार्थास प्रेरक' आहेत.

५) 'आगमानुसार, 'उपयोग वा लेश्या वा भाव' हे अंतमुहूर्तमात्र राहतात. ते सदैव बदलत राहतात'',

मानवी 'मनाची चंचलता' ही सर्वश्रुतच आहे. मन 'वाईटाकडे, प्रलोभनांकडे' लवकर आकर्षित होते. अंतरंगातील 'देवत्व वा दानवत्व', बाह्य वातावरणानुरूप प्रगटतात. त्यासाठी आगमात वर्णित 'भावना व अतिचार' हे उपाय आहेत. 'व्रतांचे कठोरपणे पालन, सतत भावनांचे चिंतन, कटाक्षाने अतिचारांचा त्याग', हा श्रावकदशेत घडणारा 'उच्चतम पुरुषार्थच' आहे ह्याची खात्री होते.

६) 'पंचमकाळात मोक्ष नाही वा सहाव्या गुणस्थानावर आरोहण नाही.

ह्या 'सत्यतेने' पंचमकाळात,'व्याभिचार, स्वैराचार, हिसाचार फैलावला' तरी, त्यावर उपाय म्हणूनच 'अणुव्रत ग्रहणाची' मुभा देवून, लगाम लावून, 'मोक्षमार्गावर आरूढ' होण्याची संधी दिली, हाच 'पुरुषार्थाचा आरंभ' होय. 'यत्नाचारपूर्वक आचार, स्वदयारूप अहिंसा, व्रतपालन-संयमधारणाचा' अधिकार देवून, 'पुरुषार्थाला' प्रेरणा दिली. 'चार संज्ञांच्या पूर्तीत, व्यस्त-त्रस्त' ह्या श्रावकदशेत, ''सिद्धांतविरुद्ध कथन, आगमविरुद्ध कथन, हृदय वा मन दुखावणे, निज-परिणामांना कलुषित करणे'', ह्या महान हिंसेपासून 'स्व' भाव व परिणामांना दूर ठेवणे, हीच 'अहिंसा व पुरुषार्थ' अशी खात्री पटते.

७) सत्याचा निकष 'अहिंसेचा कसोटीवर केला जातो. लोकव्यवहारात 'परिस्थितिनुरूप सत्य' बदलते. 'द्रव्य-क्षेत्र-काल-भाव', हीच कसोटी योग्य ठरते. त्याचा 'विवेक, भान, ज्ञान, योग्य-अयोग्याचे समन्वय, योग्य निवड' हा 'पुरुषार्थ' ठरेल. सत्याचे 'अतिचार' समाजव्यवस्था शिकवणारे आहेत. 'पाच भावनारूपाने नीति, सामाजिक बांधिलकी' पाळणे, हा 'पुरुषार्थ' सूचित होतो.

८)'न दिलेली वस्तू घेणे चोरी होय'. अशी व्याख्या आगमात दिसते. मात्र इतरांच्या 'कामाचे श्रेय घेणे, हक्क वा अधिकार लाटणे, आपल्याच मताचा आग्रह', ही सुद्धा चोरीच ठरू शकते. 'भावहिंसेसही' कारण ठरू शकते. 'चोरी' फक्त वस्तूंपुरती मर्यादित नसून, त्यामागची 'लालसा, इच्छा, हाव' ही, महत्त्वाची असल्याने, त्यावर नियंत्रण 'पुरुषार्थ' आहे. हे शब्दच 'पुरुषार्थवाचक' आहेत. 'वीर्य' हा आत्म्याचा गुण आहे. वर्तमानात त्याच्या क्षयोपशमाने 'दानादि' शक्ती प्राप्त आहेत. 'माझ्यातल्या अनंत सामर्थ्याचे उद्‌भावन, माझ्याच संक्लेशाने, मोहाने, कषायाने, मी होवू न देणे', हीच 'वीर्यचोरी', मी अनादिपासून करीत आहे. ह्यासाठी सतत 'व्रतभावनांचे भावन व अतिचार त्यागाचा' 'पुरुषार्थच' उपाय आहे.

♦ ९)'सर्व संसारी जीवनांना चार संज्ञा असतात''.

ह्या 'संज्ञाच्या पूर्तीचा पुरुषार्थ' म्हणून संसार आहे. 'मैथुन'ही संज्ञा, 'गरज, भूक, निकड' आहे.तीन 'वेदांचा' उदय 'नवव्या गुणस्थानापर्यंत' आहे. प्रतिक्षण भाव बदलतात.'वासना' मनात उत्पन्न होवून इंद्रियाद्वारे प्रगटतात. 'भाव' लपविता आले तरी, 'विकार' लपविता येत नाही वा तो प्रगटच होवू न देणे, हा प्रखर साक्षात् 'पुरुषार्थ' दिगंबर मुनी सदैव करतात. ते 'दृढ आचरण, विकारग्रस्त श्रावकांना, 'स्व-दार संतोष' व्रत पालन' करण्यास बळ देतात. 'जागतिकीकरणाच्या मुक्त प्रवाहात, दूरदर्शन, मोबाईल, नेट, कॉम्प्युटर' इत्यादींच्या भ्रष्ट वातावरणात, 'हेय-उपादेय, पाप-पुण्य, नीति-अनीति' चे भान ठेवणे, 'मोह-वासना जिंकणे', हा २१व्या शतकातला, मानवजातीसाठीचाच 'परम-पुरुषार्थ' म्हणावा लागेल.

♦ १०) 'संसारी जीवांना असणाऱ्या संज्ञांपैकी 'परिग्रह' ही संज्ञा आहे'.

आगमानुसार 'मूर्छा वा ममत्वभाव' हा परिग्रह आहे. 'काळाचा विचार करता, वस्तूंचा संग्रह गरज ठरू' शकते. 'प्रचंड महागाई, आर्थिक अस्थिरता, वाढणाऱ्या व बदलणाऱ्या गरजा', ह्या बघता, 'भविष्याच्या सुरक्षिततेसाठी संग्रह' हा, करणे आवश्यक ठरतो. अर्थात त्या वस्तूंविषयीचा 'मोह, आसक्ति' सोडणे, हा 'पुरुषार्थाधीन' भाग आहे. 'संसार, वस्तू, घर', इत्यादि 'स्त्रियांचे' जिह्वाळ्याचे विषय असून, त्याविषयीची 'आसक्ति' ही सर्वश्रुतच आहे. 'भाव-भावना रूपाने', संसारात लिप्त स्त्रियांसाठी, त्यांचा 'मोह व ममत्व' त्यागणे, हा 'श्राविका' म्हणून खरा 'पुरुषार्थ वा व्रत' ठरेल. 'परिग्रहाचे मापदंड' व्यक्तिनुसार भिन्न आहे. म्हणूनच मात्र

'आसक्ति त्याग', वा 'मी-माझे-मला' ह्या भावाचा त्याग 'पुरुषार्थ' आहे. जैन दर्शनात 'अंतरंगविश्वाची' प्रधानता आहे. त्यात 'आरोपी वा न्यायाधीश' दोन्ही 'जीवच' आहे. कठोरतेने 'आत्मपरीक्षण, अंतर्जागरण, मोठ्या मनाने दोषांची स्वीकृती', ह्या 'प्रखर पुरुषार्थावरच' पुढचा मार्ग निर्धारित आहे.

**ड) गुणव्रतपालन- स्वरूपनिर्देश -**

जैन दर्शनात 'श्रावकांच्या बाराव्रतात' मुख्यत: अणुव्रतांचे कथन असून, त्यांच्या वृद्धिसाठी 'गुणव्रतांचा' निर्देश केलेला दिसतो.

* 'गुणांना वाढविण्यात कारण म्हणून ह्या व्रतांना 'गुणव्रत' म्हटले जाते.' (र.क.श्रा.६७)

* 'हे व्रत 'अणुव्रतांचे उपकार' करणारे म्हणून, 'गुणव्रत' म्हणवले जातात.' (सा.ध.५।१) ह्यात प्रामुख्याने 'दिग्व्रत, देशव्रत, अनर्थ दंडव्रत' ह्यांचा समावेश केला गेला आहे (भ.आ.२०७५) तीनही व्रतांचे वर्णन एकत्रितपणे केले आहे. 'चरणानुयोगाच्या' आधारे विषयाचा अभ्यास करून, नीट विचारपूर्वक चिंतन-मननातून, 'पुरुषार्था'वर प्रकाश टाकला आहे.

**विषयविस्तार - दिग्व्रत- देशव्रत-अनर्थदंडत्यागव्रत -**

ह्या व्रतांचा विस्तार आगमात केला आहे. त्यात,

* 'आचार्यांनी दिग्व्रताचे लक्षण सांगून, पाच अतिचार सांगून, महत्त्व व प्रयोजन वर्णिले आहे.[५९]'

* 'देशव्रताचा विचार व विस्तार आगमात[६०], लक्षण-अतिचार-प्रयोजन-महत्त्व अशा दृष्टीने केलेला दिसतो'.

* 'अनर्थदंडाव्रताचे स्वरूप कथन करतांना आचार्यांनी, लक्षण-भेद[६१] सांगितले आहेत. अनर्थदंडाचे भेद[६२], 'पापोपदेश, हिंसादान, अपध्यान, दु:श्रुति, प्रमादचार्या सांगून, त्या प्रत्येकाचे स्वरूप विस्ताराने कथन केलेले दिसते. 'पापोपदेशाचे' चार प्रकार वर्णन करून,'दु:श्रुतीचेही' चार प्रकार वर्णिले आहेत'.

* पाच प्रकारच्या अनर्थदंडाच्या वर्णनानंतर[६३], 'अतिचार सांगून, महत्त्व व प्रयोजन' कथन केले आहे.

**पुरुषार्थाची प्रेरणा :**

१) कोणत्याही विषयाचे 'मुद्देसूद, यथासांग' वर्णन, ही 'जैनांची विशेष शैली' आहे. 'स्वानुभूती, अंत:प्रेरणा', ह्यातून प्रत्यक्ष जाणलेल्या ज्ञानाचे, ते कथन म्हणूनच,'शाश्वत, सत्य, प्रामाणिक' ठरते. प्रत्येक व्रत, 'वाढत्या क्रमाने' होणाऱ्या 'पुरुषार्थाचा' पुरावाच आहे. 'केवलज्ञानाच्या

सत्य, सूक्ष्म दृष्टीतून, स्पष्ट झालेले, अतिचार, भावनावर्णन क्षुल्लक व व्यर्थ वाटणाऱ्या गोष्टींचे स्पष्टीकरण', ह्यातून 'पुरुषार्थाचा' मार्ग अधिकच प्रशस्त झाला आहे.

♦ २) जैनांची 'व्यवहार-निश्चय' विवक्षेने वर्णनाची 'खास पद्धती', विषयाला अधिकच स्पष्ट करणारी ठरते. व्यवहारात इतरांना 'सल्ला देणे, शिकवणे, पर्यटन करणे, गवतावरून चालणे, पूजेसाठी फळ-फूलांचा वापर करणे, क्रिडा इत्यादिसाठी शस्त्रक्रिया शिकणे', इत्यादि गोष्टी, सहजी घडतात वा केल्या जातात. 'निश्चयात' मात्र, ह्यांना 'निषिद्ध' मानले जाते. 'व्यर्थ-निष्कारण' होणारी 'वृक्षतोड, जंगलतोड', इत्यादीने होणारी 'निसर्गाची हानी', त्यावर उपाय म्हणून 'केवलज्ञानींनी एकेंद्रिय हिंसा त्यागातून' दाखवलेला मार्ग, किती उपयुक्त आहे ह्याची प्रचिति येते. जैनांनी 'पर्यावरणात' दिलेले हे योगदान, 'उत्कृष्ट पुरुषार्थाचा' नमुनाच आहे.

३) सर्वत्र वाढलेला 'आतंकवाद, दहशातवाद', ह्याची सूचना 'हिंसादान व पापोपदेशातून,' केवलींनी २५०० वर्षापूर्वीच दिलेली दिसते. 'अविवेकी, अज्ञानी' व्यक्तीच्या हातात 'शस्त्र' हे, किती घातक ठरते हे, सर्वांना ज्ञातच आहे. 'पाच प्रकारच्या अनर्थदंडांचा' त्याग, हे 'आतंकवाद, ग्लोबल वार्मिंग, पाणी टंचाई, वीज टंचाई, पर्यावरणाचा ह्रास, वाढता व्याभिचार', ह्या सर्व समस्यांवरचे, 'प्रभावी उपाय' ठरू शकतील. एक-एक 'अतिचारांचा त्याग, भावनांचे चिंतन, व्रतांचे पालन' हे,'सामाजिक, जागतिक कल्याणसह, 'स्व' उत्कर्षाचा उपायच' आहे. उत्तरोत्तर वाढणारा 'पुरुषार्थ' आहे. उपकरणांचा 'अतिवापर, अतिपरावलंबनता', ह्यामुळे येणारी 'कलुषता, चंचलता, विकृतता', ह्या व्रतपालनाने दूर होवू शकते.

४) 'दिग्व्रत-देशव्रतांचे', श्रावकांसाठी पालन कठिण असले तरी, आवश्यक आहे. ह्या अभ्यासाने, ह्या व्रतपालनाच्या 'पुरुषार्थाने' अंतरंगविकास नक्कीच होतो. शेवटी ही व्रते ' मोक्षमार्गावर' दृढतेने आरूढ होण्यासाठीचा अभ्यासच आहे. 'अंतरंग मोह, आसक्तीवर' विजय मिळवण्याचा 'पुरुषार्थ' आहे.

## इ) शिक्षाव्रतांचे पालन - स्वरूप -

जैन आगमात 'अहिंसा' ह्या व्रतरक्षणासाठी, 'शील' वर्णन केले आहे. ही 'तीन गुणव्रते आणि चार शिक्षा व्रते', ह्यांना 'शीलसप्तक' म्हटले जाते. 'मोक्षमार्गावर' अग्रेसर होण्याचे, 'शिक्षणच' ह्या व्रतांमधून दिले जाते. ह्याचमुळे त्याचे महत्त्व विशेषरूपाने कथन केले जाते. ह्या 'शीलव्रतांमधे' एकत्रितपणे, 'दिग्व्रत-देशव्रत-अनर्थदंड-त्यागव्रत, सामायिक, प्रौषधोपवास, उपभोगपरिभोगपरिमाण, अतिथिसंविभाग', ह्या व्रतांच्या उल्लेख केला जातो.

१) * ह्या शिक्षाव्रतांमधे 'सामायिकाचे' फारच महत्त्वाचे स्थान आहे. विषमतांमधे 'राग-द्वेष न करता, साक्षी भावाने ज्ञाता द्रष्टा बनणे, समता धारण करणे सामायिक' म्हटली जाते. 'आवश्यक-

व्रते-चारित्र-प्रतिमा', सर्वत्रच 'सामायिकाचे' महत्त्व दिसते. श्रावकांसाठी ही 'सामायिक' विशिष्ट काळमर्यादेत सांगितली जाते.

* ह्या महत्त्वाच्या विषयाचा विस्तार करतांना, आचार्यांनी लक्षण[६४] वर्णन केले आहे. 'त्यात समता, राग-द्वेष-त्याग, आत्मस्थिरता, सावद्ययोगत्याग, संयमतपासह एकता, नित्य-नैमित्तिक कर्म, द्रव्य-क्षेत्र इत्यादि रूपाने' विस्तार केला गेला आहे.

* 'सामायिकची' विधि[६५], 'काल, आसन, मुद्रा, ध्येय, स्थिरता रूपाने वर्णिली आहे'. 'सामायिक व्रताचे' लक्षण सांगून[६६], 'अशा गृहस्थाला साधू समान मानले आहे. व्रताचे प्रयोजन व माहात्म्य वर्णन करून, अतिचारांचा विचार मांडला आहे'.

२) 'प्रौषधोपवासा'चा शिक्षाव्रतात समावेश केला आहे. 'पर्व दिवसांमधे चारही प्रकारच्या आहारांचा त्याग करून, धर्मध्यान करणे 'प्रौषधोपवास' होय'.

* ह्या व्रताचे वर्णन करतांना, उपवासाचे लक्षण-भेद[६७] 'निश्चय-व्यवहाराने कथन केले आहे. 'प्रौषधोपवासाचे' लक्षण व स्वरूप कथन केले गेले आहे'.

* ह्या 'व्रताचे वैशिष्टय' सांगतांना[६८], 'पाच अतिचार सांगितले. शक्तिनुसार करण्याचा उपदेश दिला आहे. व्रतभंगाचा निषेध करून, फलेच्छाचाही निषध केला आहे. उपवासाची सीमा[६९], फळ, महिमा, कारण, प्रयोजन व कर्तव्यांचे' वर्णन कले आहे.

३) 'भोगोपभोग परिमाण' व्रतात, ''परिग्रहांच्या परिमाणाची मर्यादा सांगितल जाते. ह्याचे स्वरूप वर्णन करून[७०], भेद, विधि, अतिचार, दोष, महत्त्व वर्णन केले आहे''.

४)'अतिथिसंविभाग व्रताचे' महत्त्व 'दान' दृष्टीने अधिक केलेले आढळते. ''पात्र-अपात्र-सुपात्राचा विचार, ह्या विषयात केलेला आढळतो. ह्याचे स्वरूप वर्णनासह अतिचारांचे वर्णन केलेले आहे[७१]''.

आगमात, ह्या 'शिक्षाव्रतांचे' असणारे, सविस्तर वर्णन टाळून, सूक्ष्म अभ्यासातून, दृष्टीक्षेपात आलेला, 'पुरुषार्थ' प्रकर्षाने प्रकाशित केला आहे.

**पुरुषार्थाची संधी :**

♦ १) 'मुनिधर्माची वा महाव्रताची' पूर्वतयारी म्हणून, 'शिक्षाव्रतांकडे' बघितले जाते. तो मार्ग, 'सूक्ष्म व पूर्ण अहिंसा, समता, त्यागाचा' आहे. त्या 'पूर्णत्वाकडे जाण्यासाठी, छोट्या छोट्या नियम-संयमाचा अभ्यास, सराव' आवश्यक आहे. संसारात व्यस्त-त्रस्त जीवाला, 'स्व' चा विचार करण्यास वा 'स्व' कडे जाण्यास, 'स्व'ला भेटण्यास वेळ नाही म्हणून, 'सामायिक' हा उपाय सुचवला. त्या मर्यादित काळापुरते, 'समयात म्हणजेच 'समतेत, आत्म्यात' एकरूपता होणे, 'समत्व राखणे, भाव-भावना-परिणामांना जाणणे', ही श्रावकांना मिळालेली 'पुरुषार्थाची

संधीच' आहे. संसारात 'भटकण्यास वा भ्रमणास,' प्रचंड 'पुरुषार्थ'ची आवश्यकता असते. मात्र 'मोक्षाला' जाण्यास, फक्त स्थिर बसण्याचा 'पुरुषार्थ', उपयोगाला 'योग्य जागी', लावण्याचा 'पुरुषार्थ' आवश्यक आहे. 'परिणामांना, अंतरंग मलीनतेला दूर करणे' आवश्यक आहे आणि हा पुरुषार्थ 'सामायिकाने' साध्य होतो. कारण 'परिणामांमध्ये विकृतींचा अभाव हीच भाव सामायिक' आहे. म्हणून 'ज्या परिणतीने साम्यभाव होतील तीच सामायिक' होय.

२) खरा मार्ग पूर्ण 'त्याग-निवृत्तीचा' असला तरी, गृहस्थांच्या मर्यादा आहेत. 'द्रव्य-क्षेत्र-काळ-भाव-शक्तींच्या' मर्यादेतही, 'अधिक पाप व विकल्प', ह्यात लिप्त होवून, संसारात भ्रमण वाढू नये, ह्या भावनेचेच 'स्थूलरूपाने' संयमाचा अधिकार दिला गेला. सर्वज्ञांची, 'अज्ञानी श्रावकांप्रती' असणारी, ही 'करुणा, अनुकंपा',आहे. म्हणूनच श्रावकांना हा 'स्थूलव्रतग्रहणाचा' अधिकार मिळाला, पर्यायाने 'पुरुषार्थाची संधी' मिळाली. विशिष्ट दिवशी, विशिष्ट मर्यादेतही, 'प्रौषधरूपाने' घडणारा 'आरंभ-परिग्रहाचा' पूर्ण त्याग, हा 'श्रावकदशेतला' उत्कृष्ट 'पुरुषार्थच' ठरतो. आपल्याच 'क्षमतांना, मोहांना, ममत्वाला पारखण्याची, परीक्षा घेण्याची, मुरड घालण्याची, संधी म्हणजे, प्रौषधोपवास' अशी खात्री पटते.

♦ ३) 'अर्थ' पुरुषार्थातली, जैनांची उत्कृष्टता साक्षात्च दिसते. त्या 'उत्तम संपदाने' जगातल्या 'उत्तमातल्या उत्तम भोगवस्तू, साधने' विकत घेण्याची कुवत आहे व 'साक्षात् भोगही घेण्याची शक्तीही' आहे. त्या चारही बाजूंनी वेढलेल्या, 'आकर्षक, मनमोहक, सुंदर भोगांचा, भोग घेण्याच्या मर्यादा करणे, परिमाण ठरवणे, इच्छांना आवर घालणे, त्यांच्या प्रती असणाऱ्या राग इत्यादींना दूर करणे,' ही परीक्षाच ठरेल. ह्या कसोटीत खरे उतरने, 'श्रावकांचा श्रेष्ट पुरुषार्थच' ठरेल.

४) भारतीय परंपरा 'अतिथि-देवो-भव' मानणारी आहे. त्याच परंपरेचा भाग असणारे जैनही, 'दानाला' अत्युच्च दर्जा देतात. 'मोक्षाचे, निवृत्तीचे प्रचंड' महत्त्व असल्यानेच, मोक्षमार्गावर आरूढ, 'साधूंना शुद्ध, सात्त्विक अन्नदान' हे श्रेष्ठ मानले आहे. 'दानरूपाने लोभकषायाला, मोहाला' जिंकण्याचा उपायच, केवलींनी दिला आहे. 'श्रद्धा, भक्तीने, आनंदाने देणे' हे महत्त्वाचे मानले आहे. 'ग्रहणाची सवय' असणाऱ्या श्रावकांना, 'देण्याचा' हा उद्दम, साक्षात् 'पुरुषार्थाची' संधीच आहे. जैनांनी 'भव' सुधारण्यास 'भाव' सुधारणे महत्त्वाचे मानले. त्यासाठीचाच हा 'पुरुषार्थ' आहे.

### ई) श्रावकांच्या अकरा प्रतिमा –

जैन परंपरेत 'मोक्षमार्गांचे वर्णन मुख्यरूपाने असून, त्याचे 'साधु-श्रावक' दोन स्वतंत्र मार्ग सांगितले. आगमात 'विवेकवान, विरक्तचित 'अणुव्रती' गृहस्थाला 'श्रावक' म्हटले जाते'. त्यांच्या 'पाक्षिक-नैष्ठिक-साधक', ह्या तीन भेदांपैकी, व्रतांना धारण करणारा 'नैष्ठिक श्रावक'

म्हटला जातो. त्यात 'वैराग्याच्या प्रकर्षतेने' उत्तरोत्तर ११ श्रेणी सांगितल्या आहेत. त्यांनाच 'प्रतिमा' म्हटले जाते. 'यथाशक्ती खालूनवर', असा विकास घडत जातो. अंतिम श्रेणी 'साधूंपेक्षा किंचित न्यून' मानली जाते. गृहस्थदशेत 'त्यागाची, संयमाची' पराकाष्ठा म्हणून, 'प्रतिमांचा' निर्देश करावा लागेल.

ह्या प्रतिमांच्या ११ भेदांचे कथन आगमात दिसते. 'सम्यग्दर्शना' शिवाय ह्या प्रतिमा होवू शकत नाही. आगमात ह्या अकरा प्रतिमांपैकी, प्रथम सहा प्रतिमा 'जघन्य', सात, आठ, नवमी प्रतिमा 'मध्यम', दहा व अकरावी प्रतिमा 'उत्तम' मानल्या आहेत.

**१) दर्शनप्रतिमा :** ह्या प्रथम प्रतिमेत 'यमरूपाने', १२ व्रतांचे पालन होत नाही, मात्र 'सम्यग्दर्शन' अत्यंत दृढ होते.

आगमात ह्या प्रतिमेचे लक्षण[७२], 'भक्ती, संवेग' इत्यादिरूपाने सांगितले आहे. ह्या प्रतिमेच्या 'गुण व व्रतांचा' उल्लेख [७३], 'रात्री भोजन त्याग, सातव्यसन त्याग, अष्टमूलगुणधारी, हिंसा त्याग, तृष्णा त्याग, स्थूलअणुव्रतधारी', असा करून अतिचारही कथन केले आहेत.

**२,३,४) 'व्रत-सामायिक-प्रौषधोपवास',:** ह्या प्रतिमांचे वर्णन 'व्रत' विभागात आलेच आहे. प्रतिमांमधे 'शल्य व अतिचार' त्याग महत्त्वाचा असतो. 'सम्यग्दर्शनयुक्त', मूलगुणांचे निरतिचार पालन, हे महत्त्वाचे मानले जाते. व्रतांमधे 'बंधनात' शिथिलता असली तरी, 'प्रतिमांमधे' कटाक्षाने पालनावर भर असतो. 'नियमित' हे करणे गरजेचे असते.

**५) सचित्त त्याग :** जैन धर्माने 'आहारमीमांसा', अत्यंत सूक्ष्मपणे केलेली आहे. 'आहारशुद्धीवर परिणामशुद्धी' अवलंबून असल्याने, 'सचित्त-अचित्ताचा' अधिकच प्रकर्षाने विचार केलेला दिसतो.

आगमात[७४] सचित्ताचे लक्षण, '' सह चित्तेन इति सचित्तं चेतनावद् द्रव्यम्'' असे केले जाते. त्याचबरोबर ह्या प्रतिमेचे लक्षणही कथन केले आहे. ह्या प्रतिमेनंतर 'सचित्त पदार्थ वा सचित्त जलाचा' निषेध केला आहे. पदार्थ अचित्त करण्याच्या बऱ्याच विधि (मू.आ.८२४) कथन केल्या आहेत.

**६) रात्रिभोजन त्याग :** वर्तमानात 'रात्री भोजन त्यागी', ह्या निकषावर 'जैनांची ओळख' केली जाते. रात्री भोजनात 'त्रसहिंसेचा' दोष मानला गेला आहे. ह्याला 'अणुव्रतातही' समाविष्ट केलेले दिसते. मुख्यत: 'अहिंसा पालन' ह्या दृष्टीने, 'रात्रिभोजन' त्यागाला महत्त्व दिले गेले आहे. आचार्यांनी ह्या प्रतिमेचे स्वरूप[७५] स्पष्ट केले आहे. ह्या प्रतिमेत 'चारही आहारांचा निरपवाद त्याग' महत्त्वाचा मानला आहे.

**७) ब्रह्मचर्यपालन :** 'व्रतवर्णनात' ह्या विषयाचा सविस्तर ऊहापोह केला गेला आहे. ह्या

प्रतिमेचे लक्षणात[७६], ९ प्रकारच्या मैथुनाचा सर्वथा त्याग, विकथांचा पूर्ण त्याग, आवश्यक मानला आहे.

**८) आरंभत्याग :** ह्या प्रतिमेच्या वर्णनात धवलाकार म्हणतात[७७], ''प्राण्यांच्या प्राणांचा वियोग करणे 'आरंभ' होय. हिंसेचे कारण असणाऱ्या, 'शेती, व्यापार' इत्यादि आरंभापासून 'विरक्ति', असे ह्या प्रतिमेचे स्वरूप सांगतात. ह्या प्रतिमेनंतर 'सचित्त द्रव्य वा पाणी' इत्यादिला स्पर्श करू शकत नाही''.

**९) परिग्रहत्याग :** 'अणुव्रतांच्या' विभागात ह्या व्रताचे वर्णन केले गेले आहे. ह्या प्रतिमेचे लक्षण सांगून[७८], ह्यात 'सर्व-त्याग' करण्याचा उपदेश दिला आहे. मुख्यत: 'अंतरंग परिग्रह त्यागाचा' आग्रह, ह्यात केला गेला आहे.

**१०) अनुमति त्याग:** 'कोणतेही कार्य स्वयं न करता, दुसऱ्यास करण्याचा सल्ला देणे वा त्यामुळे प्रसन्न होणे ही 'अनुमति' आहे.' ह्या प्रतिमेचे स्वरूप (र.क.१४६) श्रावकाचारात कथन केले आहे.

**११) उद्दिष्टत्याग :** साधूंना दिल्या जाणाऱ्या आहारातील 'औद्देशिक' हा दोष आहे. ह्या प्रतिमेत आहारात, 'समभाव, चित्ताची स्थिरता' महत्त्वाची असते. 'नवधाभक्ती व शुद्ध आहारात, मन-वचन-काय, कृत-कारित-रूपाने, अनुमोदना न दिलेल्या, आहार ग्रहण करण्याचा त्याग', आवश्यक मानला आहे.

ह्या प्रतिमेचे 'क्षुल्लक व ऐलक' हे भेद सांगितले आहेत.

**श्रावकाचाराचे एकत्रित निरीक्षण :**

१) 'निवृत्तिप्रधान' जैनांनी 'मोक्षालाच' अंतिम साध्य मानले आहे. त्यासाठी 'मनुष्यगति, कर्मभूमी, संज्ञी, पर्याप्तक, पंचेंद्रिय', अशा अनेक अटीही घातल्या आहेत. मोक्षात 'निर्जरेचे' व निर्जरेत 'चारित्राचे' महत्त्व, त्यामुळेच विशेषच ठरते. जैनांनी 'गृहस्थांना व तिर्यंचांना पंचमगुणस्थापर्यंतच्या, 'पुरुषार्थाचा' मार्ग खुला ठेवला आहे. तिर्यंचांनाही 'अणुव्रत ग्रहणाचा, गुणस्थान चढण्याचा अधिकार व स्वातंत्र्य देवून, व्यक्तिस्वातंत्र्य, स्वावलंबन, प्रत्येक आत्म्याची समानता', ह्यावर शिक्कामोर्तब केले आहे. हा जैनांचा 'पुरुषार्थ' नक्कीच 'वेगळा श्रेष्ठ' आहे.

♦ २) 'मोक्षमार्गावर' अग्रेसर होण्याचा अधिकार, साधूंचा असला तरी, ह्या 'श्रावकाचार' पालनाने श्रावकांनाही, 'सम्यक् पुरुषार्थाची' संधी दिली आहे. 'कषायांची शमता, पाप निर्जरा, अहंकाराचा त्याग, संयमाचा अभ्यास', हा'पुरुषार्थ' करण्याचा अधिकार दिला आहे. जैनत्वाचा हा प्रवास, ''सामान्यातून-असामान्याकडे, श्रावकत्वाकडून-श्रमणत्वाकडे, हेयाकडून-उपादेयाकडे, शुभाकडून-शुद्धाकडे'' जाण्याचा आहे. 'जन' सामान्याकडून 'जिन' बनण्याच्या, 'पुरुषार्थाचे' प्रथम 'पाऊल वा उपाय', हे श्रावकाचाराचे पालन आहे. खऱ्या अर्थाने 'पुरुषार्थाच्या प्राप्तीचे

उपायच' आहेत.

३) दिगंबर परंपरेतील, 'अष्टमूलगुणपालन ते ११ प्रतिमा ग्रहणापर्यंतचा,'' हा श्रावकत्वाचा प्रवास, अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने, 'स्थूलाकडून-सूक्ष्माकडे, सौम्यतेकडून-कठोरतेकडे, व्यवहाराकडून-निश्चयाकडे, बाह्यातून-अंतरंगाकडे, भोगातून-संयमाकडे', उत्तरोत्तर उत्कर्षाकडे जाणाऱ्या 'पुरुषार्थाचे' साक्षात्‌रूपच आहे. छोट्या छोट्या त्यागातून, सुरुवात करून, 'पुरुषार्थाचे बीज' रोवले आहे. संसारात 'हवे असणे'ची हाव इतकी अफाट असतांना, प्रयत्नपूर्वक जागरूकपणे, 'सोडण्याचा अभ्यास वा इच्छा, प्रयास' होणेही, श्रावकदशेतला 'पुरुषार्थच' आहे.

४) 'श्रावकाचाराच्या' ह्या अभ्यासात, 'द्रव्य-क्षेत्र-काल-भाव व यथाशक्ती' ह्या विधानाचे महत्त्व आहे. शरीर व मनरूपी 'द्रव्याची', सुखासीनता व अनुकूलतांची सवय तोडून, जाणिवपूर्वक 'कष्ट वा त्यागाचे' बीज रोवले जाते. त्या 'बीजाचे' संवर्धन, 'योग्य क्षेत्र-काल-भाव' रूपाने करण्याचा 'पुरुषार्थ' करावा लागतो. 'पूजा, स्वाध्याय, तप, दान, व्यसनांचा त्याग, नियमांचे पालन', हा अभ्यास वाढवण्याचा 'पुरुषार्थ' सजगतेने साधावा लागतो. सुरुवातीला 'कठीण, वाटणारा, वरवर होणारा' हा प्रयत्न, नकळत, तशा 'भावभावनांना' जन्म देणारा ठरतो. सुरुवातीला 'अस्थिर' असणारा हा 'विश्वास', दृढ होवून, खऱ्या 'सम्यग्दर्शनाच्या' प्राप्तीचा 'उपाय' सिद्ध होतो.

♦ ५) संसारात प्रत्येक शोधाचा जन्म, 'गरजेतून' झालेला दिसतो. 'अंतरंगात जन्म घेतलेली ही खरी तळमळ, वा गरज', 'मोक्षाची वाट शोधण्यासाठी' अग्रेसर होते. त्या 'खऱ्या सुखाची' ओढ जितकी प्रखर होते, तसतसा हा 'श्रावकाचार पालनाचा' मार्ग सुसह्य होतो. त्या प्रत्येक उपायाचा 'पुरुषार्थ मन:पूर्वक करण्याचा, 'पुरुषार्थ' सहजी घडतो. 'मूलगुणपालनाच्या, व्यसन त्यागाच्या, आवश्यकांच्या पालनाच्या', ह्या बेड्या सहर्ष स्वीकारण्याचा 'पुरुषार्थ' घडणे, हा श्रावकदशेतला श्रेष्ठ 'पुरुषार्थ' सिद्ध होतो.

६) ह्या पूर्वतयारीने दृढ झालेले मन, 'अणुव्रताचा' स्वीकार करते. ह्या अणुव्रतपालनाने 'स्व' कल्याणासह, 'पर्यावरण, नीति, सदाचार, ऊर्जा बचत', इत्यादि सामाजिक बांधिलकी सहजी साध्य होतात. 'अहिंसा ते अपरिग्रह' व्रत ग्रहणाचा हा क्रम, 'पुरुषार्थाच्या उत्कर्षाचा' आलेखच आहे. 'नैतिक ऱ्हास, व्याभिचार, लैंगिकपतनावर', जैनांचे 'स्वदारासंतोषव्रत', योग्य उपायपद्धतीच ठरेल. ''सत्य, अचौर्य व अपरिग्रह' ह्या व्रतविचारातून, अतिचारातून, 'अर्थ' पुरुषार्थाची, सम्यक् दिशा सूचित केली आहे.''

७) 'गुणव्रते व शिक्षाव्रते' नावातूनच 'पुरुषार्थ' सुचवतात. Fast money, Fast Food, Face book, ह्यांच्या मागे धावणाऱ्या समाजाला, ह्या व्रतांमधून 'सम्यक् दिशा, ज्ञान, आचरण', ह्यांची शिकवणच दिली आहे.

८) श्रावकांच्या ११ प्रतिमा ह्या, सतत घडणाऱ्या अभ्यासाचे, 'पुरुषार्थाचे' दृश्यरूपच होय. प्रत्येक प्रतिमा, 'आध्यात्ममार्गातल्या' उत्कर्षाचा 'पुरुषार्थ' आहे. पूर्व प्रतिमा ही, उत्तर प्रतिमेचा 'पुरुषार्थ' आहे. श्रावकजीवनातला खरा मोक्षमार्ग, 'प्रतिमापालन' म्हणता येईल. शेवटच्या प्रतिमेपर्यंतची प्रगती ही, श्रावकांच्या'शक्तीची' खरी अभिव्यक्ती म्हणावी लागेल. हीच अभिव्यक्ती, 'सल्लेखना' रूपी शिखराकडे नेणारा ' पुरुषार्थ' ठरणार आहे. कारण साधनांच्या निर्मलतेने 'साधनेची' निर्मलता ठरत नाही तर, 'साधनेच्या निर्मलतेने,' उत्तम साध्य प्राप्त होते.

## २) विविध भावनांचे पुरुषार्थदृष्टीने चिंतन –

**प्रस्तावना –**

* जैन दर्शनाने 'मोक्ष' पुरुषार्थाला सर्वोच्च स्थानी ठेवले आहे. ह्या 'मोक्ष' प्राप्तीच्या पुरुषार्थासाठी, तत्त्वज्ञानाचा विकास केला गेला. 'विविध उपाय, पद्धती, साधने', सुचविली गेलीत. ह्या कथनात 'द्रव्य–भाव'ही विवक्षा महत्त्वाची आहे. किंबहुना हा 'मोक्षमार्ग' जैनांनी, 'भावाश्रित' मानला आहे. आगमात 'भावो खलु परिणामो' असे म्हटले गेले आहे. (ध. १।१,१,७।१०३।१५९)

* 'द्रव्याच्या परिणमनाला, पदार्थाच्या परिणामाला, चेतनेच्या परिणामाला, चित्ताच्या विकाराला, 'भाव' म्हटले आहे'. निश्चयाने 'द्रव्याच्या निजसारभूत' शक्तीला, 'भाव' म्हटले आहे. 'शुद्ध चैतन्य, आत्मरुचि, आत्मभूत लक्षण', गुण इत्यादिंना 'भाव' म्हटले गेले आहे. ह्या 'भाव' द्वारा, 'भावना' ह्या जन्म घेतात. ह्या 'भावनाच' जीवाच्या, 'पुण्य–पाप, राग–वैराग्य, संसार–मोक्ष', इत्यादित कारण मानल्या गेल्या आहेत. सदैव उत्तम भावना चिंतनाची आवश्यकता असते

* आगमात अशा महत्त्वाच्या 'भावनांचा', विस्ताराने ऊहापोह केला गेला आहे. त्या सर्व 'भावनांचा' अभ्यास करून, नीट एकत्रितपणे त्याचा स्थूल आढावा घेतला आहे. 'पुरुषार्थाच्या' दृष्टीने त्या भावनांचे चिंतन प्रकर्षाने केले आहे.

* भगवती आराधनेत[१] 'तप, श्रुत, सत्त्व, एकत्व, धृतिबल' ह्या, 'उत्तम भावना' म्हटल्या आहेत. त्याचबरोबर 'कंदर्पी, कैल्विणी, अभियोगिकी, आसुरी, संमोही', ह्या भावनांना 'कुत्सित भावना' म्हटले आहे.

* आगमात 'मैत्री इत्यादि भावना, रत्नत्रयाच्या भावना, वैराग्यभावना, व्रतभावना, परमात्म भावना, षोडशकारण भावना, बारा भावना', अशा विविध भावनांचे वर्णन केले गेले आहे.

* मोक्षमार्गात 'वैराग्याचे' स्थान, प्रकर्षाने असल्याने, 'वैराग्यवृद्धिसाठी', आचार्यांनी 'बारा भावना' ह्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या आहे. किंबहुना म्हणूनच ह्या 'बाराभावनांना' विशेष स्थान दिलेले दिसते. 'का.अ आणि 'बारसअणुप्रेक्षा' ग्रंथांच्या आधारे, विषयाचा आढावा' घेतला आहे. त्यातून प्रकाशित होणारा 'पुरुषार्थ', प्रकर्षाने अधोरेखित केला आहे.

### अ) बाराभावना – अनुप्रेक्षा :–

जैनागमात वैराग्यवृद्धिसाठी ह्या 'भावना' प्रसिद्ध आहे. ह्यांनाच 'अनुप्रेक्षा' वा 'वैराग्यभावना' ही, म्हणतात. 'अनु' म्हणजे वारंवार, 'प्र' म्हणजे प्रकर्षाने, 'ईक्ष' म्हणजे बघणे, ह्या व्युत्पत्तिनुसार, एखाद्या विषयाचे वारंवार केलेले, सूक्ष्मातिसूक्ष्म चिंतन म्हणजे 'अनुप्रेक्षा' होय'.

* ह्या महत्त्वाच्या विषयाचे कथन लक्षण–भेद[२] रूपाने केले आहे

* आचार्यांनी[३] ह्या, 'अनित्य, अशरण, संसार, एकत्व, अन्यत्व, अशुचि, आस्रव, संवर,

निर्जरा, लोक, बोधिदुर्लभ, धर्मस्वाख्यातत्त्व', ह्या १२ भावनांचे, 'निश्चय-व्यवहार' रूपाने सविस्तर वर्णन केले आहे.

* 'अनुप्रेक्षांचा' निर्देश करतांना, 'आवश्यकता, अंतर, सार्थकता, सम्यक्त्वाचे महत्त्व, शुभभाव, संवराचे कारण, माहात्म्य फळ, प्रयोजन', असा विस्तार केला आहे.

**साक्षात् पुरुषार्थ :-**

१) 'कुंदकुंदाचे बारस अणुवेक्खा, कार्तिकेयानुप्रेक्षा, भगवती आराधना', ह्या ग्रंथातले 'भावना' वर्णन, अत्यंत सोप्या, सुंदर, भाषेत आहे. श्रावकांसाठी ह्या 'भावनांचे चिंतन', हा पुरुषार्थाचा 'उत्तमउपायं'च जणू, आचार्यांनी दिला आहे. ह्या 'व्यस्त-त्रस्त जीवनात', थोडा वेळ त्या भावनांचे चिंतन, हे सर्व 'शारीरिक-मानसिक' रोगांवर प्रभावी उपचार पद्धतीच म्हटले तरी, वावगे होणार नाही.

२) जीवाचे भाव वा परिणाम वा भावनाच ,'बंध वा मोक्षरूप' आहेत. त्या 'परिणामांना योग्य दिशा देण्याचा उपाय', ह्या 'भावना' आहेत. 'संवेग व वैराग्य' वृद्धिसाठी अत्यंत पोषक ह्या भावना, श्रावकांसाठी ध्यानरूप 'पुरुषार्थच' आहे.

♦ ३) 'डोळ्यांना जे दिसते ते सर्व मूर्त व नाशवंत व अनित्य आहे.'

संपूर्ण जीवन, 'प्रियजन, कुटूंब, धन, घर, दार, पुत्र' इत्यादिंसाठी व्यतित केल्यावर, त्या 'आपल्या' विश्वाला, 'अनित्य' दृष्टीने, नाशवंत म्हणून बघणे, हे श्रावक दशेत 'दिव्य पुरुषार्थच' ठरेल. ज्या 'सुंदर शरीराचा, रेखीव इंद्रियांचा, लावण्याचा', अभिमान आहे, त्यालाही नाशवंत म्हणून 'पर' रूपात बघणे, बोलण्याइतके सोपे वा सहज नाही. ज्या 'परिजन, पुत्र' इत्यादिंसाठी, दिवसरात्र पापांचा संग्रह केला, 'ते कोणीही मृत्यूपासून वाचवणारे नाहीत, कोणीही पापांचा वाटेकरी नाही,' अशी 'अशरण व एकत्व भावना', अंतर्बाह्य ढवळणारी आहे. 'मृत्यूची खात्री, सत्यता,' ही स्वीकारणेच 'पुरुषार्थ' आहे. ह्या 'अनित्य, अशरण, एकत्व' भावनांच्या चिंतनातून, 'वाल्याचा वाल्मिकी' झाला वा 'अनाथी मुनी' (उत्त.अ.२०) घडले असावे.

४) 'सर्वात प्रिय, जवळचे हवेहवेसे वाटणारे शरीर, सौंदर्य', ह्याविषयीची 'ममता, मोह,' दूर करणारी 'अशुचि व अन्यत्व' भावना, 'शरीराचे खरे विभत्स रूप' स्पष्ट करणाऱ्या आहेत. ह्या भावनांच्या निरंतर चिंतन-पुरुषार्थाने, 'भावशुद्धी, कषायमंदता, संवेगवृद्धी' नक्कीच घडू शकते. 'अन्यत्व' भावना, खऱ्या 'भेदज्ञानाचे स्वरूप' दर्शवणारी आहे.

५) 'आस्रव-निर्जरा-संवर' ह्या भावना, साक्षात् मोक्षमार्गाचा 'पुरुषार्थ' आहे. 'आस्रव' भावना, 'कर्मास्रवाचे सम्यक् ज्ञान' करवतात. 'संवर-निर्जरा' भावनांच्या यथार्थ चिंतनाने, साक्षात् 'संवर-निर्जरेच्या पुरुषार्थाकडे' वाटचाल सुरू होते. आपल्या 'प्रत्येक परिणाम आणि भावांप्रती'

अधिकच सजगता येते. हे 'निदिध्यासन' हाच, भावनांच्या चिंतनातील 'पुरुषार्थच' म्हणावा लागेल.

६) 'धर्मभावना' साक्षात् 'धर्म पुरुषार्थाला' प्रेरणा देणारीच आहे. ह्या 'भावनेतून' अधिकच 'जागृकता, विवेक, हेय-उपादेयता' वाढल्याने, 'डोळस व सम्यक्', धर्म पालनाच्या 'पुरुषार्थाची' वाटचालच सुरू होते.

७) 'लोक' भावनेतून 'त्रैलोक्याच्या अफाट-अचाट स्वरूपाचे, पुन:पुन: चिंतन', हे खऱ्या वैराग्यरूपी 'पुरुषार्थाची' नांदीच ठरू शकतात. चित्रपटाप्रमाणे आपल्याच 'पुण्य-पापांची दृश्ये, फळरूपाने अधिकच उजागर होतात'. खऱ्या अर्थाने 'बोधिदुर्लभतेचे' भान होवू लागते. ही 'बोधिदुर्लभता नियति-पुरुषार्थाची', सम्यक् चित्रण करणारी ठरते. 'जन्म-योनि, शरीर, भव, गतिरूपाने नियतीची श्रेष्ठता' दिसते. 'भावना चिंतन, सत्संगति, ममत्वत्याग, संयम, तप, धर्म प्राप्ती', ह्या 'पुरुषार्थाने' त्यावर मात करता येते. 'ही खात्री, हा विश्वास, ही 'स्व' प्राप्तीची ओढ,' हीच ह्या भावनांमधून, 'श्रावकांना' दिलेली 'पुरुषार्थाची प्रेरणाच' आहे ही खात्री झाली.

**ब) षोडशकारणभावना :-**

**प्रस्तावना :** जैन तत्त्वज्ञानाचा आधार 'कर्मसिद्धांत' आहे. ह्या कर्मविवेचनाचा सूक्ष्म, सविस्तर विस्तार 'करणानुयोगाचा' विषय आहे. प्रत्येक 'कर्माच्या आस्रवांच्या कारणांचा,' सविस्तर ऊहापोह त्यात दिसतो. 'नामकर्मातील' सर्वांत पुण्यप्रकृति ही, 'तीर्थंकर' मानली जाते. त्या 'प्रकृतीच्या आस्रव-बंधात' निमित्त, १६ भावनांचे आगमात खूपच महत्त्व दिसते. त.सू. ग्रंथात (६।२४) ह्याचा विस्तार दिसतो. ह्या महत्त्वपूर्ण भावनांमधे, प्रथम 'दर्शनविशुद्धी' ही भावना श्रेष्ठ मानली आहे. ह्या १६ भावनांपैकी, एखाद्या भावनेनेसुद्धा 'तीर्थंकर प्रकृतीचा बंध' संभवतो.

**१) दर्शनविशुद्धी :**

'आत्मस्वरूप संवेदनेत'ही एकमात्र भावना कारण मानली आहे. ही 'भावना' नसेल तर, अन्य १५ भावना निरर्थक मानल्या आहेत. 'सम्यग्दर्शनाची अत्यंत निर्मलता व दृढताच' 'दर्शनविशुद्धी' होय.

ह्या भावनेचे लक्षण[४], 'शुद्ध सम्यग्दर्शन, तत्त्वार्थश्रद्धान, साष्टांग सम्यग्दर्शन, निर्दोष सम्यग्दर्शन, अविचलता', अशा विवक्षेने कथन केले आहे. '२५ दोष, तीन मूढतारंहित सम्यग्दर्शनाच्या अपेक्षेने,' ही भावना कथन केली आहे. त्याचमुळे ह्या भावनेची प्रधानता वर्णिली आहे. त्याचप्रमाणे अन्य १६ भावनांचे चिंतन, आगमात केले गेले आहे. त्यांची थोडक्यात ओळख करून दिली आहे.

**२) विनयसंपन्नता** :- रत्नत्रय व रत्नत्रयधारी ह्यांच्या प्रती आदरभाव ठेवणे.

**३) शीलव्रतेष्वनतिचार** :- व्रत व शीलाचे निरतिचार पालन करणे.

**४) अभीक्ष्णज्ञानोपयोग** :- द्रव्य व भाव श्रुतात ज्ञानात सदैव तत्पर राहणे.

**५) संवेग** :- संसार दु:खाने नित्य भयभीत होणे.

**६ ते ७) शक्तितस्त्याग/शक्तितस्तप** :- सामर्थ्यानुसार दानदेणे, तप इत्यादि करणे.

**८) साधूसमाधी** :- तपस्वींचे दु:ख, विघ्न दूर करून, संयमाचे रक्षण करणे.

**९) वैय्यावृत्य** :- संयमी - रुग्ण साधूंची सेवा करणे.

**१० ते १४)अरिहंत, आचार्य, बहुश्रुत, प्रवचन भक्ती** :- विशुद्धभावाने अनुराग, भक्ती करणे

**१५) आवश्यक परिहाणि** :- षट्आवश्यकांचे निरतिचार, नित्य, यथासमय पालन करणे.

**१६) प्रवचनवत्सलत्व** :- साधर्मीबंधूविषयी प्रेमभाव ठेवणे.

अशाप्रकारे आगमनात वर्णित ह्या 'षोडशभावना' स्थूलरूप कथन करून, एकत्रित'पुरुषार्थ मांडला आहे.

**क) मैत्रीभावना :-**

श्रावकांसाठी 'बाराभावनांसह' ह्या, 'मैत्री भावनेचे' विशेष महत्त्व सांगितले आहे

* त.सू.ग्रंथात (७।११) प्राणिमात्रांबाबत ही भावना, ह्या सूत्रातून व्यक्त केली आहे.

''मैत्री-प्रमोद-कारुण्य-माध्यस्थानिच सत्त्वगुणाधिक-क्लिश्यमाना विनयेषु''

* ह्या 'भावनेबाबत' म्हटले आहे की, 'दुसऱ्यांना दु:ख होवू नये, ही अभिलाषा ठेवणे 'मैत्री' होय'. 'मुख प्रसन्नतेतून अंतरंग भक्ती, अनुराग व्यक्त करणे 'प्रमोद' आहे'. 'दीन-दु:खी जीवांवर दयाभाव ठेवणे, ह्याला 'कारुण्य' म्हटले आहे'. 'राग-व्देषपूर्वक पक्षपात न करणे, 'माध्यस्थ' भाव होय'.

**ड) व्रतभावना :-**

श्रावकाबारातल्या १२ व्रत विभागात, प्रत्येक व्रताच्या 'भावना' नमूद केल्या आहेत.

**इ) रत्नत्रयभावना :-**

* मोक्षमार्गात 'रत्नत्रयाची प्रधानता' असल्याने, त्याच्या 'भावना' विशेषरूपाने कथन केल्या गेल्या आहेत.

* 'निंदा-गर्हा-आलोचना करणे, प्रशम-संवेग इत्यादि गुणवृद्धीचा विचार करणे, देव-शास्त्र-गुरुंवर श्रद्धा, हितअहित विवेक, २५ दोषांचा त्याग ह्या सम्यग्दर्शनाच्या[५] भावना होय'.

* 'शास्त्रांचे वाचन, चिंतन, मनन, उपदेश करणे, सम्यग्ज्ञानाच्या भावना आहोत[६]'

* 'समिति, गुप्ति, परिग्रह इत्यादिंचे पालन करणे चारित्राच्या भावना आहेत[७]'

**ई) वैराग्यभावना[८] :**

मोक्षमार्गात ‘वैराग्याचे’ महत्त्व सांगितले जाते. ‘शरीर, संसार, भोगांप्रती जो विरक्तभाव त्याला वैराग्य म्हणतात.’ त्या ‘वैराग्यवृद्धीला’ पोषक अशा भावना, (त.सू.कारांनी ७।१२) सांगितल्या आहेत.

‘‘जगत्कायस्वभावौ वा संवेगवैराग्यार्थम्’’ ‘संवेग व वैराग्यासाठी, जगत व काय स्वरूपाचे चिंतन आवश्यक म्हटले जाते. बारा भावानांमधून ही, ह्यांचे चिंतन प्रकर्षाने केले जाते’.

**७) पापभावना :-**

आगमात ‘व्रत, रत्नत्रय’, इत्यादिभावनांसह, पाच ‘पापांच्याही’ भावना कथन केल्या आहेत. उमास्वामींनी (त.सू.७।९-१०) म्हटले आहे की, ‘‘हिंसादिष्विहामुत्रापायावद्यदर्शनम्’’।।, ‘‘दु:खमेव वा’’।।

ह्या कथनातून, ‘पापामुळे इह-परलोकी मिळणाऱ्या फळांचे’ वर्णन करून,‘पांपाना साक्षात् ‘दु:खस्वरूपच’ म्हटले आहे.

**पुरुषार्थप्रेरणा :-**

१) जैनदर्शनात ‘पंचपरमेष्ठींना आराध्य दैवत मानले आहे. त्यात ‘अरिहंतांचे’ प्रथम स्थान आहे. जैन दर्शनात ‘तीर्थंकरांना’ अत्यंत पूज्य मानले जाते. ह्या ‘तीर्थंकर’ प्रकृतीच्या बंधात, १६ भावना आवश्यक मानल्या जातात. प्रथम ‘दर्शनविशुद्धी’ ही ‘सम्यग्दर्शनाशी’ निगडित, सर्वांत महत्त्वपूर्ण भावना आहे. त्यात ‘२५ दोष, आठ मद, तीन मूढता, सहा अनायतनांना’ दूर करणे आवश्यक आहे. ‘सम्यग्दर्शन’ आत्म्याचा स्वभाव असला तरी, ह्या दोषांना दूर करण्यास, प्रखर ‘पुरुषार्थाची’ गरज नक्कीच आहे.

२) प्रत्येक भावना ही, बुद्धिपूर्वक केलेल्या ‘पुरुषार्थाचे’ दृश्यरूप आहे. ‘पुरुषार्थाशिवाय ह्या भावना निर्माण होवू शकत नाही वा त्यांचे चिंतनही अशक्यच आहे. एक-एक भावना ‘उत्कट व उत्कृष्ट’ पुरुषार्थाचे द्योतकच आहे.

♦ ३) ‘मैत्री भावना’ ह्या व्यवहारातली, ‘नीति वा सदाचार वा जगण्याची पद्धतीच’ म्हणता येईल. प्राणिमात्रांबाबत ‘मैत्रीभाव’, हा प्रेमाचा भाग आहे. ‘गुणिजनांचा’ आदर-मान-सन्मान ‘विनयाशिवाय’ शक्य नाही. प्रत्येक जीवांप्रती ‘आत्मौपम्य’ बुद्धिशिवाय ‘कारुण्य’ उत्पन्न होवू शकत नाही. ‘व्यर्थ भांडण वा पक्षपातापेक्षा’, जाणिवपूर्वक ‘माध्यस्थ’ भाव ठेवणे, हे क्रमाने ‘पुरुषार्थाचे वृद्धिंगत’ रूपच आहे.

४) मोक्षमार्गात ‘रत्नत्रयाचे’ महत्त्व प्रकर्षाने वर्णिले असल्याने, ह्या निजगुणांची प्राप्तिसुद्धा वा व्यक्तता, ‘पुरुषार्थानेच’ शक्य आहे. ‘ह्या भावना’ प्रत्यक्ष ‘पुरुषार्थाचे’ रूपच आहे.

५) 'वैराग्यभावना साक्षात् वैराग्यवर्धक' असल्याने, त्यातील 'पुरुषार्थ' स्पष्टच आहे.

६) पापभावना सांगून, 'पापांचे फळ वा दु:खमय' सांगून, जीवाला सावध केले आहे. ही 'जाणिव वा हे ज्ञान, सतत पापांपासून बचावाचा' इशारा देतात. ही 'जागरूकता, हे भानच' ह्यातला 'पुरुषार्थ' आहे. ह्या सर्व भावना, 'स्थूलाकडून-सूक्ष्मतेकडे' नेणाऱ्या, 'पुरुषार्थाच्या प्रतिकरूपच' आहते. सतत ह्या 'भावनांचे चिंतन' म्हणजे, सतत शुभात राहण्याचा 'पुरुषार्थच' आहे. सतत 'अशुभ विचारांना' जाणिवपूर्वक दूर करण्याचा, 'पुरुषार्थ' आहे.

♦ ७) 'भाव' शब्द'हृदयाकडे' संकेत करणारा आहे. तीच 'परिणामविशुद्धी वा हृदय शुद्धी' होय. तत्त्वदृष्टीने'भावना व अनुप्रेक्षात' अतंर आहे.'अनुप्रेक्षा' ही 'ज्ञानाची पर्याय व चित्ताचे कार्य' आहे. ह्यात 'व्दैत' असते, 'स्व व विषय' भिन्न असतात. 'अनित्य' इत्यादि अनुप्रेक्षा आहेत, भावना नाही. 'वैराग्यवर्धक आहे पण वैराग्य'नाही. त्याने 'तीर्थकरत्वाचा बंध होत नाही.'भावना स्वसंदेनरूप, अंतरंगात' प्रतीत होतात. 'मैत्री इत्यादि' भावना आहेत. 'वैराग्यभाव' उदित झाल्यावर 'अनुप्रेक्षा' चिंतन सुटते, पण 'हृदयबंध' सुटत नाही. 'भावना सहजी होते म्हणून भवनाशिनी ठरते.' त्या 'गुणप्राप्तीची अभिलाषा, तळमळ' उत्पन्न होते. १६ भावनांतून व्यक्त त्या गुणांना, प्राप्त करण्याची 'अभिलाषा वा जिज्ञासा वा दोष, निंदा, गर्हा, इत्यादीने 'तीर्थंकरत्वाची' प्राप्ती होते. 'व्रतभावना, मैत्री भावना' इत्यादित, 'अभिलाषा' प्रधानता आहे. 'अनुप्रेक्षेत चिंतनाची' प्रधानता आहे. 'हार्दिक अभिलाषा शून्य' भावना, फक्त 'शब्दच्छल' आहे. 'संवेग व वैराग्याशिवाय', अनित्यादि चिंतनही 'शब्दच्छलच' आहे. सुरुवात 'प्रवृत्तीतून कृत्रिमतेने', नंतर 'स्वभावात, हृदयात, प्रवेश, सहजता, स्वभावात रमण, हेच चरित्र होय.' अनुप्रेक्षा ते भावना हा, 'पुरुषार्थाचा वर्धितक्रम' आहे.

## ३) ''पुरुषार्थाच्या आराधनेची सार्थकता – मुकुटमणी – फळ – संल्लेखना''

**प्रस्तावना :**

जैन दर्शनाने 'आचार, तत्त्वज्ञान, अनेकांत', अशा विविध विषयांचा विचार केला. त्यातही 'अनेकांत, कर्मसिद्धांत' हे विषय, 'जैनांचे वेगळेपण सिद्ध' करणारे आहेत. त्याचबरोबर 'सल्लेखना,' हा ही विषय, जैनांचे वेगळेपण सिद्ध करणारा आहे. कोणत्याही विषयाचे 'आद्योपान्त वर्णन' ही तर, 'जैनांची विशेषताच' आहे. जैन परंपरेत 'मृत्यूविचारा'ला, सदैव प्रधानता दिलेली दिसते. त्यात 'सकाममरण–अकामरण वा बालरमण–पंडितमरण', हे दोन स्थूलरूपाने प्रकार दिसतात. सूक्ष्मतेने १७ प्रकारच्या मरणांचा उल्लेख केलेला दिसतो. प्रत्येक तत्त्वांमधून 'जीवन जगण्याची कला' शिकवून, 'मृत्यूचा महोत्सव' साजरा करण्याचीही विधि शिकविली आहे. मात्र 'आचाराची अनिवार्यता' म्हणून, 'सल्लेखनाचा' निर्देश केला नाही. ह्यात 'ऐच्छिकता, वैकल्पिकता' ठेवली. आगमात, उपदेश 'समाधिमरणाचा' अवश्य दिलेला दिसतो. मात्र त्याचा 'आग्रह' ठेवला नाही. जैनांनी सतत 'द्रव्य–क्षेत्र–काल–भाव आणि यथाशक्ती', ह्या विवक्षा ठेवल्यात. 'सल्लेखना' विषयातही, ह्या विवक्षा आहेत, म्हणूनच ते त्या जीवावर निर्भर ठेवले आहे. 'सल्लेखना' विषयातील ही 'ऐच्छिकताच पुरुषार्थाचे द्योतक आहे'. किंबहुना ह्या ऐच्छिकतेमुळेच, 'साधू वा श्रावकांच्या' संपूर्ण जीवनाच्या, 'पुरुषार्थाचा' तो 'परिपाक' ठरला आहे. जैन परंपरेत श्रावकांनाही 'सल्लेखनेचा' अधिकार देवून, धार्मिक क्रांतीच केली आहे. कारण 'श्रावक' दशेतील, विधिवत् उत्कृष्ट 'सल्लेखनामरण' म्हणजे, आयुष्यभर केलेल्या अभ्यासाची सार्थकताच आहे.

आगमात 'सल्लेखनेचे' स्थान व महत्त्व, म्हणूनच फार उच्चतम आहे. 'भगवती आराधना' ह्या ग्रंथात, 'सल्लेखनेची' इतकी विस्तृतचर्चा आहे की, तो ग्रंथ ह्या विषयाचा, 'आकरग्रंथ' वा 'सारग्रंथ' च बनला आहे.

ह्या विस्तृत विषयाचा स्थूलरूप आढावा देवून, त्यातील 'पुरुषार्थ' विशेष रूपाने स्पष्ट केला आहे.

**कथनक्रम :–**

आगमात आचार्यांनी ह्या विषयाचे विस्तृत वर्णन केले आहे.

* 'सल्लेखनाचे' सामान्य लक्षण[८] दिले आहे. त्याचबरोबर 'बाह्य–अभ्यंतर' सल्लेखनेचा निर्देश केला आहे.

* 'सल्लेखनेची' वैशिष्ट्ये[९] सांगतांना, ''शरीराला कृश करण्याचे उपाय, अभ्यंतर सल्लेखनेची प्रधानता, आवश्यकता, अतिचार, महत्त्व, फळ सल्लेखनेनंतर भवभ्रमणाची मर्यादा, त्याचे स्वामी, असा सविस्तर विचार केलेला दिसतो. आचार्यांनी विशेषरूपाने, 'सल्लेखना म्हणजे

आत्महत्या नाही' हे नमूद केले आहे. 'सल्लेखनेसाठी' कोणावरही बळजबरी करता येत नाही वा करू नये'', असे प्रकर्षाने सांगितले आहे.

* आचार्यांनी ''सल्लेखनेसाठी योग्य काळ, क्षेत्र, वर्णन केले आहे[१०] त्यात 'निर्यापकाची' उपलब्धि अपेक्षित आहे. योग्य कारण नसतांना, 'सल्लेखना' घेण्याचा निषेध केला आहे. जीवनाच्या अंतसमयी सल्लेखना धारणाचा निर्देश करून, महत्त्व स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर फक्त अंत समयी 'सल्लेखना' घेणे अत्यंत कठिन असल्याने, संपूर्ण जीवनभर त्याचा 'अभ्यास व भावना' करण्याचा उपदेश दिला आहे''.

* आचार्यांनी ह्या 'सल्लेखनामरणाचे' भेद[११] सांगितले आहेत. ''त्यात भक्त-प्रत्याख्यान, इंगिनी व प्रायोपगमन मरण, ह्यांचा निर्देश केला आहे. त्यांचे लक्षण, द्रव्यादि, फळ, विधि, स्वामी,'' ह्यांचा विचार केला आहे.

* 'सविचार भक्त प्रत्याख्यानाच्या ४० अधिकारांचे अत्यंत सविस्तर वर्णन 'भगवती आराधनेत' केले आहे. योग्य निर्यापकाचे स्थान व महत्त्व स्पष्ट केले आहे'.

**पुरुषार्थाचा प्रकर्ष :**

१) केवलींनी 'अंत:प्रेरणा, निरीक्षण, केवलज्ञानाने', सर्व 'द्रव्य,-गुण-पर्यायांना' जाणून, त्या आत्मानुभूतीला 'उपदेश, तत्त्वरूपाने' सांगितले आहे. 'मोक्ष' हे अंतिम ध्येय्य असले तरी हा 'मार्ग', जीवाची 'श्रद्धा, परिणती, शक्तिनुसार' कथन केला.'श्रावकदशेत' शक्तीची हीनता असली तरी,'व्रत' इत्यादिरूपाने 'त्याग-संयमाचा' मार्ग खुला ठेवला. छोटया-छोटया नियमांद्वारे, 'पुरुषार्थाची' प्रेरणा दिली. आयुष्यभर ह्या अभ्यासाने, 'स्व' शक्तीचे परीक्षण करून, 'सल्लेखनारूपाने' पुरुषार्थाचा प्रकर्ष साधण्याची संधी दिली.

२) पूर्वजन्मीचा 'पुरुषार्थ', वर्तमानाची 'नियति' म्हटली जाते. 'जन्म, गति, जाति', ह्या 'कर्माधीनतेच्या' वशिभूत होवून, 'कर्मनियतता' स्वीकारावी वा नाही, हा भाग 'जीवाधीन' आहे. जैनदर्शनाने ह्या 'नियतीला' सम्यक् प्रकारे स्वीकारून,'धर्मपुरुषार्थाला' सतत मुख्य स्थान दिले. वर्तमानात 'पुरुषार्थाची श्रेष्ठता स्वीकारून, जीवन जगण्याची कला तर शिकविलीच, त्याचबरोबर 'मृत्यूमहोत्सवाचा' जयघोष केला. वर्तमानाच्या 'पुरुषार्थावर', भविष्याची 'नियति' अवलंबून असल्याने, 'मृत्यू कसा, कोठे हे ठराविण्याचे स्वातंत्र्य देवून, 'पुरुषार्थाचा प्रकर्ष' साधला.

♦ ३) जैनांनी प्रत्येक जीवाला, 'चार 'संज्ञा' मानल्या. त्यापैकी 'भय' संज्ञा आहे. प्रत्येक जीवाला 'मरण्याचे' सर्वाधिक भय असते. 'शरीर व मनाची दुर्बलता, आणि क्षीणता', मरणसमयी अधिकच 'मोही' बनवून 'भयग्रस्त' करते. अशा 'मोह, कषाय, आसक्तींना' दूर करून, 'स्व'

इच्छेने मरणाचा स्वीकार करणे, ‘जाणिवपूर्वक, जागरूकतेने’, येणाऱ्या ‘मरणाला तटस्थपणे’ बघणे, ह्यासारखा ‘उत्कट व श्रेष्ठ ‘पुरुषार्थ’ असू शकत नाही.

४) सर्व जीवांना, मानल्या गेलेल्या ‘चार संज्ञांपैकी’, ‘आहार’ ही महत्त्वाची, व प्रिय संज्ञा आहे. ‘रसना’ इंद्रियावर विजय मिळवणे, प्रचंड ‘मानसिक धैर्याचे’, काम आहे. अंतसमयी ‘रसनाच’ सर्वाधिक सतावते. त्या आहाराचा यथाक्रम ‘स्व’ खुशीने त्याग, हा श्रावकांचा श्रेष्ठ ‘पराक्रमच’ ठरेल.

♦ ५) ‘सल्लेखनेच्या’ आवश्यक कार्यात क्रमशः, ‘पदत्याग, क्षमायाचना, उत्साह, प्रायश्चित्त, समता, ध्यान, भावचिंतन, मौन, आहार त्याग’, असा क्रम कथन केला गेला आहे.

संसारात असतांना, ‘पद, प्रतिष्ठा, मान, सन्मान, अहंकार’ कटाक्षाने जपले जातात. हे सर्व सांभाळतांना, ‘कषायांमुळे’ अनेक चुका घडतात. त्या सर्व मोठ्या मनाने स्वीकारून, ‘निंदा, गर्हा, क्षमायाचना करणे’, खऱ्या ‘शौर्याचे’ प्रतिकच आहे.‘श्रावकांचा’ हा ‘प्रतिकूलतेतला संसाराचा प्रवास’, जितका खडतर आहे, त्याइतकाच वा त्याहीपेक्षा कठिण, ह्या सल्लेखनातल्या ‘आवश्यक क्रिया’ आहेत. शालेय जीवनात, वर्षभर अभ्यासानंतर, अंतिम परीक्षेत, सर्व ‘ज्ञान, बुद्धी, स्मरणशक्तीची’ खरी परीक्षा होते. श्रावकदशेतही आयुष्यभर ‘धर्मयुक्त अर्थ-काम’ पुरुषार्थाची साधना करून, अंतसमयी ‘विवेक, जागरूकता, स्थिरता, समता, त्यागरूप’, ‘पुरुषार्थाची खरी परीक्षा वा त्याचे फळ म्हणजे सल्लेखना होय’.

## प्रकरण २
## उपविभाग २ (१ ची संदर्भ-सूची)

१) सा.ध. १।१५-१६,२०; बा.अ.६९; वसु.श्रा. ३०१
२) सा.ध.१।११; वसु.श्रा.५३९; मो.पा.१२
३) वसु.श्रा. ५, सा.ध. ३।५,४; ६।१-४४
४) र.क.श्रा. ६६; पु.सि.उ.६१
५) सा.ध.७।५१; र.सा.११,१५३
६) त.सू.७।२२; वसु.श्रा.३१९; मा.ध.७।५५.५९
७) पु.सि.उ.७७; वसु.श्रा.३१२; सा.ध.४।१६
८) पु.सि.उ.६२-६४; ७१ ते ७४
९) सा.ध.३।१९; २।१७; पु.सि.उ.१४६
१०) वसु.श्रा. ८८ ९३; ११३-१२४; सा.ध.३।१०
११) सा.ध.२।२२
१२) सा.ध.१।१८; २।२५-२९, वसु.श्रा.३८१ ते ४५८
१३) वसु.श्रा.४७८; भा.पा.१४३; ध.९।४, १,१।८।७
१४) सा.ध.२।४४; ध २२; बो.पा.१७; व.सु.श्रा. ३९८ ते ४९२
१५) र.क.श्रा. ११९; सा.ध.२।२५; वसु.श्रा.३८५
१६) सू.पा. १२-१३
१७) मू.आ.५९७-५९९; भ.आ.७५६-७५७
१८) द.पा.२३,२४; बो.पा.११; सू.पा.१२
१९) द.पा.१३, मो.पा.९२; शी.पा.१४
२०) ध. ९।४, १,१।११।१   २।४१।१
२१) प्र.सा.२४०; चा.पा.२८,२१; पं.सं.प्रा. १।१२८; का.अ.३९९
२२)ज्ञ.१४।५,६,९६।१२।१ ; चा.पा.२९; गो.क.६१८-६१९
२३) त.सू.७।३८; र.क.श्रा.११७; वसु.श्रा.२३४-२३८
२४) का.अ.१२ ते २० ; र.सा.११,१६,२१,२२
२५) र.क.श्रा. ११४-११६; पु.सि.क.१७४; का.अ.३६३-३६४, त.सू.७।३९
२६) पु.सि.उ. १७०; का.अ.२०; सा.ध. ५।५३;२।६४;९।४६-५९; १।११-२२
२७) त.सू.५।२१,२९
२८) त.सू. २।४
२९) का.अ.४२५; र.क.श्रा.३१
३०) का.अ.३६०-३६१; रा.वा.७।२१, २२।५४८।१०
३१) ३ त.अ.२९-२४; मू.आ. ५०९-५१०
३२) सा.ध.७।५१; ज्ञा.८।५४
३३) प.प्र.२।१०, १२७,२४३; ज्ञा.८।५४
३४) र.क.श्रा. ११५-११६; का.अ.१४-२०; वसु.श्रा. २४६-२४७
३५) त.सू. ६।१३,२६
३६) त.सू.७।१,२; र.क.श्रा.५१
३७) सा.ध.७।५२; २।७९
३८) त.सू.७।९-१२,२४; सा.ध.४।५
३९) त.सू. ७।२; र.क.श्रा.५२,७२; सा.ध. ४।६,११
४०) र.क.श्रा.५३; त.सू.७।२५,४; वसु.श्रा.२०९
४१) पु.सि.उ.५१; स.सा.२५३
४२) पु.सि.उ.४२,४८
४३) सा.ध.४।२२-२३; प.प्र.टी. २।१२५
४४) पु.सि.उ.४३-९०
४५) बा.अ.७४; का.अ.३३३-३३४; ३९८; र.क.श्रा.५५
४६) त.सू.७।५,२६; भा.पा.३
४७) भ.आ.८१७-८४६; पु.सि.उ.१००

४८) त.सू.७।६,१५,२७; र.क.श्रा.५७
४९) भ.आ.८४८-८५०
५०) रा.वा.७।१५।८।५४२।१; ७।१५।१-३।५४२।१५; ७।१५।७।५४३
५१) धा.अ.८०; का.अ.४०३
५२) र.क.श्रा.५९; वसु.श्रा.२१२; त.सू. ७।७,२८
५३)भ.आ. ९९८, ११०९;१०९१ ते १११०; शी.पा.१९
५४) त.सू.७।१७; सू.पा.१९;,२९ मो.पा.७९; पु.सि.उ. ११९
५५) र.क.श्रा. ६१; त.सू. ७।
५६) भा.पा.३,५,४८-५४,८९; का.अ. ३८७
५७) प्र.सा.२१९-२२१; स.सा.२६५; ध.९।४, १,६७।३२३।६
५८) भ.आ.१९०८-१९११; ११११-१११५;
५९) र.क.श्रा.६८-७३; का.अ.३४२; त.सू.७।३०
६०) र.क.श्रा. ९२-९५; का.अ. ३६७-३६८, त.सू. ७।३१; पु.सि.उ.१४०
६१) र.क.श्रा. ७४-७६; का.अ.३४३-३४८; पु.सि.उ.१४१-१४६
६२) र.क.श्रा. ७७-८०
६३) त.सू.७।३२; रा.वा. ७।३२, ६-७।५५६।२९
६४) रा.वा.९।१६।१।६१६।२५; नि.सा.१२५,१४७
६५) का.अ. ३५२-३७२; र.क.श्रा.१०३,१०४,१३९
६६) र.क.श्रा.९७-९८-१०२; पु.सि.उ. १५०; त.सू. ७।३३
६७) र.क.श्रा.१०९; १६-१८ का.अ.३५८-३५९,४३९; पु.सि.उ.१५२-१५६
६८) त.सू.७।३४; र.क.श्रा.१०९-११०
६९) पु.सि.उ.१५१-१६०
७०) र.क.श्रा. ४४,८२-९०; पु.सि.उ.१५८-१६६; त.सू. ७।३५
७१) त.सू.७।३९; का.अ.३६१
७२) चा.सा.३।५
७३) र.क.श्रा.१३७; का.अ.२०५; ३२८-३२९
७४) र.क.श्रा.१४१; का.अ.३७९-३८०
७५) र.क.श्रा. १४२; सा.ध. २।७६; ७।१२
७६) र.क.श्रा. १४३
७७) का.अ.३८५; ध. १३।५,४,२२।४६।१२
७८) र.क. श्रा. १४५; का.अ.३८९

## प्रकरण २

## उपविभाग २ (२ आणि ३ संदर्भ-सूची)

१) भ.आ.१८१-२०६
२) त.सू.९।७; बा.अ.२; ध. ९।४,१,५५।२६३।१
३) भ.आ.१७१० ते १८६८
का.अ. संपूर्ण ग्रंथ ह्या ग्रंथांच्या अभ्यास मननातून
बा.अ. संपूर्ण ग्रंथ विषय प्रस्तुति केली आहे.
४) ध. ८।३, ४१, ७९/९ ; ध. ८ पृ. ८०,८६,८७,८८
५) का.अ. ३१५; ज्ञा.६।७
६) त.सू. ९।२५
७) म.पु.२१।९८
८) स.सि. ७।२२।१
९) रा.वा.७।२२।६-७।५५०; त.सू. ७।३१
१०) त.सू. ७।२२

११) भगवती आराधना ग्रंथात 'सल्लेखना' विषयाचे विशेष चिंतन आहे. त्याचा आधार घेतला आहे.

# प्रकरण २

# उपविभाग ३

# ‘‘पुरुषार्थाच्या आराधनेची (प्राप्तीची) साधने:’’

१) रत्नत्रय : ‘पुरुषार्थाचा’ आरंभ

२) ‘पुरुषार्थाचे’ प्रथम साधन ‘तप’

३) ‘पुरुषार्थाचा’ क्रमिक विकास ‘गुणस्थान’

४) ‘पुरुषार्थाचा’ परमोत्कर्ष ‘ध्यान’

# १) रत्नत्रय – 'पुरुषार्थाचा' आरंभ

**प्रस्तावना :–**

भारतीय सर्व परंपरा,' पुरुषार्थाचा' पुरस्कार करणाऱ्या आहेत. सर्वच परंपरांनी, जीवाच्या 'परमप्राप्तव्याचा' विचार केला. सर्व भारतीय परंपरांच्या चिंतनाचा केद्रबिंदू सदैव, ' जन्म-मरण श्रृंखलातून सुटका करून घेणे,' हाच दिसतो. काही परंपरा वगळता, सर्वांनीच 'आत्म्याचे' अस्तित्व स्वीकारून, ह्या 'बेडीतून' सुटण्याचा, आपाअपला 'दृष्टिकोन व उपाय' सांगितला.

* जैन परंपरेची 'मोक्षाभिमुखता' ही स्पष्टच दिसते. प्रत्येक जीवांमधील 'परमार्थशक्तीच्या' ह्या प्रगटीकरणात, कोणाचेही सहाय्य स्वीकारले नसल्याने, जैनांनी प्रकर्षाने, ह्या 'अभिव्यक्तीचा उपाय' कथन केलेला दिसतो. किंबहुना ह्या 'उपायांसाठी वा साधनांसाठीच', तत्त्वज्ञानाचा विस्तार केला गेला. जैन प्रत्येक 'तीर्थंकर, आचार्यांनी', ह्या 'श्रृंखलेला' तोडण्याचा आदर्श तर ठेवलाच, परंतु त्याच्या 'साधनरूपात' रत्नत्रयाला अग्रभागी ठेवले आणि 'सम्यग्दर्शनाला' सर्वोच्च मानाचे स्थान बहाल केले गेले.

* 'मोक्ष' पुरुषार्थाच्या प्राप्तीत, साधनरूप 'धर्म ' पुरुषार्थावर, संपूर्ण आगम रचले गेलेत. त्या प्रत्येक 'तत्त्व, द्रव्य, आचार, तप, व्रत, ज्ञान, चारित्राची,' परीक्षा,' सम्यग्दर्शनाच्या' कसोटीवर केली गेली. ह्या अनन्यसाधारण महत्त्वामुळेच,' सम्यग्दर्शनाचा, रत्नत्रयाचा' विस्तृत ऊहापोह, आगमांमध्ये आढळतो. ह्या विस्तृत ऊहापोहाचा, अत्यंत बारकाईने अभ्यास करून, 'पुरुषार्थाला' प्रकाशित केले आहे. किंबहुना 'पुरुषार्थाचा आरंभच', ह्या विषयचिंतनातून झाला आहे.

* जैन दर्शनाने हा 'मोक्षमार्ग' रत्नत्रयात्मक सांगितला. जैनदर्शनात 'दर्शन-ज्ञान' ह्यांना आत्म्याचे 'गुण' म्हटले आहे. 'गुण हे द्रव्याच्या सर्व भागांमधे व सर्व अवस्थांमधे, सदैव' असतातच. मात्र 'मोक्षाचा' विषय असल्याने 'सम्यग्दर्शनानंतरच', 'संशय-विपर्यय-अनध्यवसायरहित, सम्यग्ज्ञानालाच', मोक्षमार्गात श्रेयस्कर मानले गेले. अर्थात् 'सम्यग्दर्शनाच्या' उत्पत्तीबरोबरच, 'सम्यग्ज्ञानाचा' अविर्भाव मानला आहे. 'सम्यग्दर्शनाशिवाय' आचरण वा चारित्र 'सम्यक्' होवू शकत नाही म्हणून, 'ज्ञानाचे' उच्चतम स्थान आगमात दिसते. ह्या 'सम्यग्ज्ञानाचे' अत्यंत सूक्ष्म वर्णन आचार्यांनी केलेले आढळते.

* सर्व आगमांचे विषय, 'धर्म' पुरुषार्थापासून सुरू होऊन, 'मोक्ष' पुरुषार्थावर येवून संपतात. 'कारण-कार्य' संबधाने, 'सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानाची', 'युगपत्' उत्पत्ती मानली गेली. मोक्षाचा मार्ग 'पुरुषार्थाचा' मार्ग आहे. 'निर्जरा' शिवाय 'मोक्ष' नाही, आणि 'चरित्राशिवाय' निर्जरा नाही. मात्र 'सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानासह, सम्यग्चारित्राची युगपत', उत्पत्ती जैनांनी मानली नाही. चारित्राची उत्पत्ती,' प्रयत्नपूर्वकच' मानली आहे. हाच रत्नत्रयाला 'पुरुषार्थाचा' आरंभबिंदू आहे. 'पुरुषार्थाशिवाय' चारित्र व 'चारित्राशिवाय' मोक्षमार्गातला उत्कर्ष, अशक्यच आहे. ह्या

'अविनाभावी संबंधामुळेच', रत्नत्रयात 'पुरुषार्थाचा आरंभ' दिसला, तोच येथे निदर्शनास आणला आहे.

* आगमातील ह्या 'रत्नत्रय' विषयाचा नीट अभ्यास करून, स्थूलपणे विषयवर्णन करून, चिंतन - मननातून, त्यात गर्भित 'पुरुषार्थ' नजरेत आणला आहे.

**विषयविस्तार :-**

**अ) सम्यग्दर्शन :-**

जैन तत्त्वज्ञानात 'सम्यग्दर्शनाचे' अनन्यसाधारण स्थान असल्याने, त्याचे विस्तृत वर्णन आगमात दिसते. 'दूरभिनिवेश रहित श्रद्धान वा स्वात्मप्रत्यक्षपूर्वक स्व-पर भेदाचा, वा कर्तव्य-अकर्तव्याचा विवेक, ह्याला 'सम्यग्दर्शन' म्हटले आहे'. 'स्वात्मसंवेदनाची' प्रधानता असल्याने, त्याशिवाय तत्त्वश्रद्धान 'सम्यक्' मानले नाही. ह्या विषयाचा विचार करतांना, आचार्यांनी खूपच विस्तार केलेला दिसतो.

* 'सम्यग्दर्शनाच्या' वर्णनात, लक्षण - भेदाचे[१] कथन करून, ''आज्ञा इत्यादि १० भेदांचे लक्षण, वैशिष्ट्य, 'सम्यक् व दर्शन' शब्दांचे महत्त्व व अर्थ, त्यांच्यातील 'समन्वय' स्पष्ट केला आहे''.

* 'सम्यग्दर्शनाचे' आठ अंग सांगून,''त्यांची प्रधानता स्पष्ट केली आहे[२].

* 'सम्यग्दर्शनाच्या' अनेक गुणांचे वर्णन करून, अतिचार, २५ दोष,'' ह्यांचा निर्देश केला गेला आहे.

* 'सम्यग्दर्शनाची' प्रत्यक्षता व परोक्षता[३], ''मुख्यगौण विवेक्षेने, कथंचित् शब्दाने स्पष्ट केली आहे''.

* 'सम्यग्दर्शन - ज्ञान - चारित्रातील भेद[४], अंतर, भेदाभेद, कथन केले आहे'.

* मोक्षमार्गात 'सम्यग्दर्शनाची' प्रधानता सांगतांना[५],'' त्याचे कारण सांगून, त्यालाच सार - सुखनिधान व मोक्षाची प्रथम पायरी मानले आहे. त्यामुळेच त्यानंतर भवभ्रमणाची 'सीमा', प्रकर्षाने दर्शविली आहे.''

* निश्चय - व्यवहार 'सम्यक्त्वाचे' लक्षण[६] सांगताना,''व्यवहार सम्यवत्वाचे लक्षण, देव - शास्त्र-गुरुवर श्रद्धा, आप्त-आगम-तत्त्व श्रद्धा; तत्त्वार्थ श्रद्धान, विपरीत-अभिनिवेशरहित श्रद्धान, तत्त्वात हेय-उपादेयता, तत्त्वरुचि,'' अशा विवक्षेने कथन केले आहे.

* निश्चय सम्यग्दर्शनाचे लक्षण,[७]'' पदार्थांचे शुद्धात्म्याने भिन्न दर्शन, शुद्धत्म्याची रुचि, अतिंद्रिय सुखाची रुचि; शुद्धात्म्याची उपलब्धि'' अशा दृष्टीने सांगितले आहे.

* लक्षणातील, ''अर्थ' व 'तत्त्व' शब्द घेण्याची कारणे सांगितली आहे.[८] 'व्यवहार' लक्षणांचा समन्वय व 'निश्चय' लक्षणाचा समन्वय, त्यांचा परस्पर 'समन्वय' साधला आहे''.

* निश्चय-व्यवहार 'सम्यग्दर्शनाची' कथंचित् मुख्यता व गौणता सांगताना,[९] ''स्वभाव भानाशिवाय सम्यक्त्व नाही, आत्मानुभवीलाच आठ अंगांचा लाभ, त्यातही निश्चय अंगांची प्रधानता, श्रद्धा इत्यादि आत्म्याचेच परिणाम, निश्चय सम्यक्त्वाची महिमा, निश्चय-व्यवहार समन्वय,'' असा विस्तार केला गेला आहे.

* सराग-वीतराग ' सम्यग्दर्शनाचा' निर्देश करतांना[१०], ''भेद-लक्षण, स्वामी; कथंचित् एकत्व, प्रयोजन'' वर्णन केले आहे.

* 'सम्यग्दर्शनाच्या' उत्पत्तीत निमित्तांचे कथन करतांना'', ''अंतरंग-बहिरंग निमित्त, निसर्ग-अधिगम, उपशम इत्यादींचे वर्णन केले आहे.'' प्रत्येक गतीतील 'सम्यग्दर्शनाच्या कारणांचा-निमित्तांचा' ऊहापोह केला आहे. आगमात 'उपशम, क्षयोपशम, क्षायिक', ह्या तीन भेदांचेही सविस्तर वर्णन केले गेले आहे. अशा सविस्तर विवेचनाच्या चिंतनमनातून, स्पष्ट होणारा 'पुरुषार्थ,' प्रकर्षाने उजागर केला गेला आहे.

**२) सम्यग्ज्ञान :**

'ज्ञान' हा जीवचा विशेषगुण आहे, ज्याने 'स्व-पर' दोन्ही जाणले जातात. 'ज्ञान' वास्तविक 'सम्यक् वा मिथ्या' नसते. मात्र 'सम्यक्त्व व मिथ्यात्वाच्या सहचर्याने' ते, 'सम्यक् वा मिथ्या' ठरते. 'सम्यग्ज्ञानच' श्रेयोमार्गाच्या सिद्धीत समर्थ असल्याने, त्याचेच महत्त्व मानले आहे. जीवाचा 'स्व' प्रतिभास,' निश्चय सम्यग्ज्ञान' आहे. त्याला प्रगट करण्यात निमित्तभूत आगमज्ञान,'व्यवहार सम्यग्ज्ञान' आहे.

* आगमात ज्ञानाचे वर्णन,'भेद -लक्षणांनी [१२] केले आहे.'

* ज्ञानाचा निर्देश करतांना [१३],'' इंद्रियांपासून निरपेक्षता, स्व-पर प्रकाशकपना, अशा ज्ञानाची प्रमाणता,'' सांगितली आहे.

* ज्ञानाच्या पाच भेदांच्या वर्णनात[१४],'' त्यांना पर्याय म्हटले आहे. त्या ज्ञान अंशाचा ऊहापोह करून, प्रयोजन, स्वामी, युगपत् किती ज्ञान संभावतात, भेदज्ञान, अभेद ज्ञान,'' असा विस्तार केला आहे.

* 'सम्यक् व मिथ्याज्ञानाच्या विस्तार[१५] ,'' भेद-लक्षण, यथार्थ, अधिगम, अपेक्षा, भेद-ज्ञान अपेक्षा, स्वसंवेदअपेक्षा,'' अशा विविक्षांनी केला आहे.

* सम्यक् - मिथ्याज्ञानाचा निर्देश[१६],''आठ अंग,भावना, नियम, सम्यग्दर्शनाचे महत्त्व, व्याप्ती, सम्यग्ज्ञानालाच 'ज्ञान' म्हणणे,'' अशा दृष्टीने केला आहे. त्याचबरोबर विविध शंकांचे समाधान करून, प्रयोजन सांगितले आहे.

* निश्चिय व्यवहार सम्यग्ज्ञानालाच विस्तार[१७]," निश्चय सम्यग्ज्ञानाचे महात्म्य, भेदज्ञानच सम्यग्ज्ञान, आत्मज्ञानाचे महत्त्व, व्यवहार ज्ञानाचे साधन, उपचार, प्रयोजन, समन्वय" अशा प्रकारे केला गेला आहे.

**३) सम्यग्चारित्र** :

'चारित्राला' मोक्षमार्गाचे, प्रधान अंग मानले गेले आहे. अभिप्रायानुसार चारित्राला 'सम्यक् वा मिथ्या' म्हटले आहे. 'ज्ञाताद्रष्टा, मात्र साक्षीभाव वा साम्यतेला', 'वीतरागता' म्हटले आहे. सर्व भेदांचा समावेश ह्यातच केला आहे.

'पुरुषार्थाची सुरुवात 'चारित्राने' होत असल्याने, अत्यंत सूक्ष्म वर्णन केले गेले आहे.

* ह्या कथनक्रमात 'लक्षण - भेद सांगून[१८]' "चारित्राच्या भावना, चारित्रजीवाचा स्वभाव, स्व-पर चारित्र, सम्यक्-मिथ्या चारित्र, निश्चय-व्यवहार चारित्र, लक्षण," कथन केले आहे.

* निश्चय चारित्राचे लक्षण सांगतांना[१९], "बाह्याभ्यन्तर क्रियांपासून निवृत्तिरूपचारित्र, ज्ञान व दर्शनाची एकतारूप चारित्र, साम्यता व ज्ञाता-द्रष्ट्याभावरूप चारित्र, स्वरूपरमणता म्हणजे चारित्र, स्वात्मस्थिरता म्हणजे चारित्र," असा निर्देश केला आहे.

* व्यवहारचारित्राची मीमांसा[२०], "लक्षण, सराग-वितरागचारित्र, त्यांचे लक्षण, स्वरूपाचरण-संयमाचरण चारित्र, अधिगत-अनधिगत चारित्र, क्षायिक इत्यादि चारित्र, सामायिक इत्यादि पाच प्रकारचे चारित्र, चारित्र म्हणजेच धर्म, साक्षात् मोक्षाचे कारण, अन्य आराधनांचा अंतर्भाव, चारित्रसहित दर्शन-ज्ञानतपाची सार्थकता, फळ[२१]," अशा दृष्टीने कथन केली आहे.

* चारित्रात 'सम्यक्त्वाचे' स्थान प्रकर्षाने कथन केले आहे[२२]. "त्यात 'सम्यक्' पदाचे महत्त्व, सम्यक्ज्ञानपूर्वकचारित्र, मोक्ष व आत्मप्राप्तीत महत्त्व," असा विस्तार केला आहे.

* 'निश्चयचारित्राची' प्रधानता निर्विवादपणे सांगून[२३], "शुद्धोपयोगालाच 'चारित्र' म्हटले आहे. तेच 'उपादेय' म्हटले आहे. व्यवहारचारित्राची गौणता असल्याने, त्याला कथंचित्, वृथा, अपराध, बंधाचे कारण, हेय, विरुद्ध, अनिष्टफलदायी" म्हटले गेले आहे.

* 'व्यवहारचारित्राची' गौणता सांगून, कथंचित् प्रधानता सांगितली आहे.[२४] "निश्चयाचे साधन, मोक्षाची परंपरा, गुणश्रेणी निर्जरा, इष्टता," वर्णिली आहे.

* 'निश्चय-व्यवहार चारित्राचा' समन्वय[२५], "कारण, प्रयोजन, निषेध, उपादेयता, अविनाभावी संबंध, बंधांची कारणे, उपाय, क्रम," अशा प्रकारे केला गेला आहे.

'रत्नत्रयाची' एकता मोक्षमार्ग आहे. त्याचमुळे आगमात, अत्यंत विस्ताराने विषयवर्णन आढळते. ह्या सूक्ष्म अभ्यासातून, केलेल्या गहन चिंतन प्रक्रियेतून, समोर आलेला 'पुरुषार्थ' विशेषरूपाने, 'प्रकाशित' केला आहे.

**'रत्नत्रय'-पुरुषार्थाचा आरंभ :**

१) 'जैन दर्शनात 'रत्नत्रयाची' एकता महत्त्वाची मानली 'सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्ग'ह्या उद्घोतातूनच, 'पुरुषार्थाचा शुभारंभ' केला आहे'.

आगमात वार्णित, जीवाच्या पाच 'असाधारण' भावांपैकी, चार 'कर्मश्रित' आहे. 'पारिणामिक' भाव हा स्वभाव आहे, 'द्रव्यरूप आहे, म्हणून हे कोणी नष्ट करू शकत नाही' शुद्ध 'परिणामिक' भाव हे, शुद्ध 'जीवत्वरूप' आहे. शुद्ध द्रव्याच्या 'शक्ती अपेक्षेने, शुद्ध पारिणामिक' भाव, 'मोक्ष', रूपाने, हे जीवात विद्यमान आहेच, फक्त 'पर्यायात' त्याची व्यक्तता नाही. ही व्यक्तता आणण्याचे सामर्थ्य 'स्व' मधेच आहे, हा 'सम्यक् विश्वास, सम्यक् श्रद्धा' 'पुरुषार्थ प्रेरक आहे.'

२) 'ज्ञान व अप्रतिहत दर्शन हा, जीवस्वभाव वा गुण आहेत.'

'गुण व द्रव्य' ह्यात अभेदता आहे. 'सम्यगदर्शन' हा आत्म्याचा स्वभाव आहे. 'श्रद्धा' गुणाची ती 'पर्याय' आहे. त्या शक्तीची 'लब्धि' जीवात आहेच. ह्या 'शक्तीच्या अस्तित्वाची खात्री' व्यवहारात, 'प्रशम, संवेग, निर्वेद, आस्तिक्य, अनुकंपा', ह्या चिह्नांवरून होवू शकते. ' देव-शास्त्र-गुरुंची दृढ श्रद्धा, दया, व्रतपालन, भावनाचिंतन', इत्यादि बाह्य रुचिवरून, त्या 'अस्तित्वाचे भान' होवू शकते. ह्या बाह्य आधारांचे आलंबन घेणे वा न घेणे, हा 'पुरुषार्थ' ठरेल. सम्यग्दर्शन हा 'गुण' असल्याने, तो बाहेरून आत टाकला जावू शकत नाही. फक्त ह्या 'पर्यायाच्या' प्रगटीकरणातले,' 'मिथ्यात्वाचे आवरण वा विघ्न', दूर करण्याच्या 'पुरुषार्थाची' गरज आहे. ह्या 'पुरुषार्थाचा आरंभ' हा, 'व्यवहार सम्यग्दर्शनाच्या' माध्यमातून घडू शकतो. ही 'अंतरंग दृढता, विश्वास, विवेक, जागरूकतारूप पुरुषार्थाने', काललब्धिलाही आणण्याचे सामर्थ्य जीवात आहे. 'काललब्धि' निमित्त आहे, त्याने 'सम्यग्दर्शन' होत नाही, पण योग्य काळ आला तर, त्या 'गुणाची पर्यायात' व्यक्तता जरूर होते. हा 'पुरुषार्थाचा श्रीगणेश', ती 'काललब्धि' आणण्याचा, 'पुरुषार्थ' करू शकतो. 'उपादान-निमित्त', 'निमित्त-नैमित्तिक संबंध', वा 'नियति-पुरुषार्थाचा', 'सम्यक् समन्वय' ह्यातून अधिकच स्पष्ट होतो.

♦ ३) 'सम्यग्दर्शनातील' प्रशमादि गुणांना वाढवणे, हा 'प्रथम पुरुषार्थ' ठरेल. दूरांदूरभव्यांमध्ये 'मोक्षाची' योग्यता असली तरी, त्याच्या 'व्यक्ततेचा' कायम अभावच असतो तरी, उन्मत्त होवून, नरकादि यातना भोगण्यापेक्षा, 'व्रत, तप, कषायमंदतारूप पुरुषार्थाने', स्वर्ग वा भोगभूमीचा मार्ग खूला आहे. 'नियति' काय आहे वा काय देणार ? ह्यापेक्षा 'पुरुषार्थाची निवड' कशी आहे ही श्रेष्ठ गोष्ट आहे. 'भव्यत्व वा अभव्यत्व' केवलींच्या ज्ञानाचा विषय आहे. त्याचा शोधघेण्यापेक्षा, 'मी आत्मा आहे, ज्ञान-दर्शन-आनंदमय, अविनाशी द्रव्य आहे,' हा 'सम्यक् अभिप्राय, 'पुरुषार्थाचा आरंभच' आहे.

४) 'ज्ञान' आत्म्याचा 'गुण' आहे. जो कधीही नष्ट होवू शकत नाही. कर्माचे आवरण असले तरी, 'ज्ञान' प्रगट असतेच. ''मी ज्ञाता-द्रष्टा आहे हा, 'अंतर्नाद', त्या आवरणाला छेदण्यास समर्थ आहे,'' हे सम्यक्ज्ञानच 'पुरुषार्थ' आहे. ह्या 'सम्यक्' अभिप्रायाने, 'हेय-उपदेयता, योग्य-अयोग्य', ह्याचा विवेक, यथार्थ निर्णय घेण्याची पात्रता, हा 'सम्यग्ज्ञानाने घडणारा 'पुरुषार्थ' आहे. 'मान्यता, श्रद्धा, अभिप्राय' 'सम्यक्' झाला की, 'ज्ञानातले 'संशय' इत्यादि गळून पडतात व ज्ञान 'सम्यक्' होते. ज्ञानाला 'स्व-पर' प्रकाशक म्हटले जाते. आतापर्यंत 'परालाच' जाणण्याचा 'पुरुषार्थ' केला. परंतु 'स्व'-जाणण्यास, 'स्वज्ञानाशिवाय' कोणाचीही गरज नाही, हेच 'सम्यक्ज्ञान' 'पुरुषार्थास प्रेरणा' देणारे आहे. हे 'सम्यग्ज्ञान', जैनांनी मानलेल्या, 'स्वावलंबनता व व्यक्तिस्वातंत्र्याला' पुष्टी देणारे आहे. आपल्या आत स्थित त्या 'केवलज्ञानाची महत्ता, विशालता, श्रेष्ठता' कळली की, 'क्षायोपशजन्य' ज्ञानाचा 'व्यर्थ अहंकार, अभिमानाची, पुटे' गळून पडतात. त्या 'पूर्णज्ञानाच्या प्राप्तीचा ध्यास' पुढच्या 'पुरुषार्थाचा आरंभ' ठरतो.

♦ ५) जैन दर्शनाने 'सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानाची, 'उत्पत्ती युगपत् मानली, मात्र चारित्राची प्राप्ती 'युगपत्' होत नाही. सम्यग्दर्शनप्राप्तीनंतर 'चतुर्थ गुणस्थानाची' प्राप्ती होते. मात्र, 'त्याग' होत नाही. 'गुणश्रेणी निर्जरेचा' प्रारंभ होतो तरी, पूर्णता होत नाही. 'अणुव्रत' ग्रहणाने पंचम तर, 'महाव्रत' ग्रहणाने सहावे गुणस्थान प्राप्त होते. मात्र 'मोक्षमार्गास' आवश्यक 'निर्जरेची' सुरुवात आठव्या गुणस्थानापासून होते. 'पुरुषार्थाची परीक्षा' सुरू होते. 'व्रत, तप, संयम' ग्रहण करणे, ह्यातून चारित्ररूपी 'पुरुषार्थाचा आरंभ' होतो. ''प्रखर मानसिक दृढता, धैर्य, उत्कृष्ट शारीरिक क्षमता, पूर्णत्वाच्या प्राप्तीचा प्रखर ध्यास, प्रतिकूलतांशी लढण्याची तयारी,'' ह्या 'पुरुषार्थाशिवाय' चारित्रपालन केवळ अशक्यच आहे. आत्म्याच्या 'वीर्य' शक्तीची, ती खरी परीक्षाच म्हणता येईल. जैनांनी सतत उल्लेख केलेल्या, 'यथाशक्ती' शब्दाचा खरा अर्थ, ह्या चिंतनातून अधिकच स्पष्ट होतो. आत्मा 'अनंतवीर्याचा' धनी आहे. त्या 'अनंतशक्तीला प्रगट करण्याची योग्यता' यथाशक्ती ठरेल. त्या 'शक्तीला' आपणच पाडलेल्या, 'मर्यादा' तोडण्याचा 'पुरुषार्थ' म्हणजे 'चारित्र' अशी खात्री वाटते. 'द्रव्य-क्षेत्र-काल-भाव' हे निमित्त आहेत, त्या पर्यायांपुरते आहे. पण 'शक्ती' ही उपादान आहे व ती सदैव आहे. ह्या चिंतनातून 'निमित्त-उपादान,' 'नियति-पुरुषार्थ,' नव्यानेच, नव्यारूपात समोर आले, हाच 'चारित्रातला पुरुषार्थ' ही खात्री झाली.

## २) 'पुरुषार्थाचे' प्रथम साधन–तप :

**प्रस्तावना :**

भारतीय संस्कृती 'तपोप्रधान' आहे. प्राचीन काळापासून ऋषिमुनींनी, ह्या 'तपाचे' पालन केले. त्या 'तपाचे फळ' म्हणून, आजही देशात, चिंतनासाठी 'अक्षुण्ण भांडार' उपलब्ध आहे. भारतीय सर्व दर्शनांमधे, 'मोक्षप्राप्ति'साठी 'तपाला' अनिवार्य 'साधन'रूपात मानले आहे. म्हणूनच समस्त 'मोक्षवादी दार्शनिक परंपरेत', 'तपाचे' महत्त्व आणि गंभीर विवेचन, उपलब्ध आहे जैन दर्शनात 'तप–निर्जरा–मोक्ष', ह्यांच्यात 'अविनाभावी संबंधच' सांगितला आहे. त्यामुळेच जैनदर्शनात 'तपाचे', जितके 'सूक्ष्म व गंभीर' विवेचन उपलब्ध आहे, तितके अन्यत्र दुर्लभच आहे.

* श्वेतांबर आगम ग्रंथात (द.वै.१/१) 'अहिंसा, संयम, तपरूपी' धर्मालाच उत्कृष्ट मंगल म्हटले आहे की,

''धम्मो मंगलं उक्किट्ठं अहिंसा संजमो तवो । देवा वि तं नमंसंति जस्स धम्मे मनो रया।।''

* वास्तविक जैन धर्माचा मूळ आधार 'कर्मसिद्धांत' असून, 'जीव–अजीव' ह्यांच्या परस्पर संबंधाने 'कर्मास्रव' मानला आहे. त्यामुळेच 'आस्रव–बंधाचे' चक्र संसारवर्धक असून, 'संवर–निर्जरा', मुक्तीत सहाय्यक असल्याने, त्यावर गहरे चिंतन केले गेले. 'जैनदर्शनात' मोक्ष हे अंतिम साध्य असल्याने, तत्त्वज्ञानाचा विकास 'मोक्ष' पुरुषार्थासाठी झालेला दिसतो. त्यातही 'निर्जरा' तत्त्वाचे गहन चिंतन करून, त्याला 'मोक्षाचे साधन' मानने हे जैनांचे, खास 'वैशिष्ट्य व वेगळेपण' आहे. 'मोक्षप्राप्तीच्या साधनेत निर्जरा व निर्जरेच्या साधनेत तप, अग्रस्थानी असल्याने', त्याचे महत्त्व, विशेषच विस्तार व विश्लेषणात्मक पद्धतीने केले आहे.

* उमास्वामींनी ''तपसा निर्जराच'' (त.सू. ९/३) सूत्राने, 'तपाचे' महत्त्व अधोरेखित केले आहे.

* 'सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यग्चारित्र, सम्यग्तप', हे जैन साधना पद्धतीचे, विशेष 'आधारस्तंभ' मानले गेले आहेत.

'शिवकोटयाचार्यांनी' रत्नत्रयासह 'सम्यक् तपाचा' अंतर्भाव, 'आराधनेत' केला. (भ.आ. १/१,६,१०)

''सिद्धे जयप्पासिद्धे चउविहआरहणा फलं पत्ते। वंदित्ता अरहंते वोच्छ आराहणं कमसो ।।''

पुढे आचार्य म्हणतात की, ''संयमाची आराधना करणाऱ्या व्यक्तींनी, तपांची आराधना नियमाने करावी, त्यागरूप चारित्रात कपट इत्यादि त्याग करून, जो उद्योग व उपयोग आहे' त्यालाच 'तप' म्हणतात''.

''संयममाराहंतेण तओ आराहिओ हवे णियमा । आराहंतेण तवं चरित्तं होइ भयणिज्जं ।।''

''चरणम्मि तम्मि जो उज्जमो आउंजणा य जो होई । सोचेव जिणेहिं तवो भणिदो असढं चरंतस्स।।''

* जैन परंपरेत 'तपाचे' मुख्य कार्य 'कर्मक्षय' सांगितले आहे. त्यावर विशेषच चिंतन आचार्यांनी केलेले दिसते. आचार्य वट्टकेर मूलाचार ह्या ग्रंथात म्हणतात की, (७४८-७४९)

''जह धादू धम्मंतो सुज्झादि सो अग्गिंणा दु संतत्तो ।

तवसा तहा विसुज्झादि जीवो कम्मेहिं कणयं व ।।

णाणवरमारुदजुदो सीलवरसमाधि संजमुज्जालिदो ।

दहइ तवो भवबीयं तणकट्ठादी जहा अग्गी ।।''

* श्वेतांबर परंपरेतील मूलसूत्र उत्तरअध्ययनात 'तपाचे' श्रेष्टत्व स्पष्ट केले आहे.

''चत्तारि परमंगाणि दुल्लहाणिह जंतुणो । माणुसत्तं सुई सद्धा संजमम्मि य वीरियं'' ।।३-१।।

''चउरंग दुल्लहं नच्चा संजमं पडिवाज्जिया । तवसा धुयकम्मंसे सिद्धे हवइ सासए'' ।।३-२०।।

''नाणेण जाणई भावे दंसणेण य सद्दहे । चरित्तेण न गिण्हाइ तवेण परिसुज्झई ।।

खवेत्ता पुव्वकम्माइं संजमेण तवेण य । सव्व दुक्खप्पहीणठ्ठा पक्कमंति महेसिणो ।।''२८/३५-३६।।

* तपाच्या स्वरूपाबाबत आ. कुंदकुंद (बा. अ. ७७) म्हणतात की, '' पंचेंद्रियांच्या विषयात व चार कषायांचा विनिग्रह करून, ध्यान व स्वाध्यायाद्वारा आत्मचिंतन करणे 'तप' होय''.

''विसय कसाय विणिग्गहभावं काऊणं झाणसज्झाए।जो भावइ अप्पाणं तस्स तवं होदि णियमेण।।''

* अशा प्रकारे आगमांमधे 'तपाचे' महत्त्व विशेषच स्पष्ट केलेले दिसते. 'तपाच्या' भेदांचे व लक्षणांचे विस्तृत विवेचनातून, हा विषय खूपच समग्रपणे कथन केला आहे. त्या विस्ताराचा स्थूल आढावा देवून, 'पुरुषार्थाचे' स्थान अधोरेखित केले आहे.

**विषयविस्तार :–**

व्यवहारात 'तपाबद्दल' भीती दिसून येते. मात्र 'स्व' इच्छेने, अंतरंग, साम्यतेच्या प्राप्तिसाठी केले जाणारे 'तप', नक्कीच दुःखदायक सिद्ध होत नाही. 'तपाच्या' ह्या स्वरूपाचे विविधांगी कथन आचार्यांनी केले आहे.

* ह्या विस्तारात[२६], ''तपाचे निश्चय लक्षण, इच्छेचा निरोध, चारित्रात उद्यम, आत्मप्रतपन असे केले आहे. व्यवहार लक्षण सांगून, श्रावक अपेक्षेने तपाचे लक्षण दिले आहे. श्रावकांचे लहान लहान नियम, पर्वदिवसांमधे यथाशक्ती त्याग इत्यादींना 'तपाचा' दर्जा दिला आहे.''

* 'तपाचे' भेद कथन करतांना[२७],''सामान्य भेद, बाह्यतपाचे भेद, अंतरंग तपाचे भेद, त्यांचे लक्षण, बालतपाचे लक्षण,'' कथन केले आहे.

* 'तपाचे' महत्त्व कथन करतांना[२८], ''त्याला संयमाचे अंग, ''तप मतिज्ञानपूर्वक होते, मनुष्यगतीतच संभावना, श्रावकांना मुनियोग्यतपाचा निषेध, शक्तिनुसार तप; फलेच्छाचा अभाव,

पंचमकाळाचा प्रभाव, तपाच्या भावना,'' असा विस्तार केला गेला आहे.

* बाह्यअभ्यंतर 'तपाचा' समन्वय करतांना[२९], ''सम्यक्त्वयुक्त तपालाच 'तप' मानले संयमाशिवाय 'तप' निरर्थक मानले, अंतरंग तपाची प्रधानता सांगून, बाह्य 'तपाला' पुण्यबंधाचे कारण सांगितले. त्याच्या कारणांची मीमांसा केली आहे.''

* 'तपाचे' कारण व प्रयोजन सांगतांना[३०], ''तप करण्याचा उपदेश दिला आहे. त्याचे कारण देवून, तपाने बलवृद्धी, निर्जरा, संवर, कसा होतो व ते आनंदाचे कारण कसे ठरते याचे वर्णन केले आहे. 'तपाचा' महिमा प्रकर्षाने वर्णन केला आहे.'' 'तपाने देव इत्यादि पद प्राप्त होतात तर, निर्जरा कशी होते ? असाताचा आस्रव का होत नाही? इंद्रियदमन कसे होते?,' इत्यादि शंकांना समर्पक उत्तरे देवून समाधान केले आहे[३१].

* ह्यावर्णनासह प्रत्येक 'व्रताचा स्वतंत्र विचार व विस्तार केला आहे'.

**१) अनशन :-**

जैन दर्शनात 'तपाचे' महत्त्व असल्याने, 'अनशनाला' व्यवहारात खूपच स्थान मिळालेले दिसते. चेतनवृत्तींना 'भोजन' इत्यादींच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी, 'क्षुधा' इत्यादितही समतापूर्वक, आत्मबलवृद्धिसाठी केलेले 'अनशन' श्रेयस्कर मानले गेले आहे. अनशनतपात 'त्यागाची' श्रेष्ठता महत्त्वाची आहे. ह्या व्रताचे[३२],' 'लक्षण-भेद सांगून, अतिचार-कारण-प्रयोजन कथन करून, शक्तिनुसार' करण्याचा उपदेश दिला आहे.

**२) उनोदरी :-**

ह्या तपालाच 'अवमौदर्य' ही म्हटले जाते. आचार्यांनी[३३] त्याचे ''लक्षण कथन करून, अतिचार सांगितले आहेत. ह्या तपासाठी कोण योग्य आहे ? हे स्पष्ट करून, प्रयोजन स्पष्ट केले आहे.''

**३) वृत्तिपरिसंख्यान :-**

'वृत्ति' म्हणजे 'वर्तन वा समवाय' ह्या 'तपात' विशिष्ट 'क्षेत्र, घर, व्यक्ती, भोजन, भाजन,' इत्यादिबाबत विविध नियम घेतले जातात. धवलाकारांनी[३४] ह्यांनाच 'वृत्ती' म्हटले आहे. त्यांचे 'परिसंख्यान' म्हणजे 'ग्रहण' होय. ह्या 'तपाचे' प्रयोजन, अतिचार, कथन करून, ह्या 'तपात' नित्यता आवश्यक नसल्याचे नमूद केले आहे.

**४) रसपरित्याग :-**

ह्या 'तपात' गरिष्ठ रसांचा त्याग आवश्यक मानला जातो. 'मन-वचन-कायेने, संकल्पपूर्वक', त्यागाचे महत्त्व सांगितले आहे. आगमात[३५] नमूद केलेल्या पाच, सहा वा यथाशक्ती रसत्याग महत्त्वाचा म्हटला आहे. ह्या 'तपाचे' प्रयोजन सांगून, अतिचार सांगितले आहेत.

**५) विविक्तशय्यासन :-**

'चित्ताची' व्यग्रता दूर करणे 'विविक्तशय्यासनतप' आहे[३६]. 'एकांत स्थान, शून्यागार स्थानात निवास, हा सांगितला आहे. ह्या 'तपाचे' प्रयोजन विशेषतेने कथन केले आहे'.

**६) कायक्लेश :-**

शरीराला मुद्दाम, कठीण तपस्येसाठी प्रवृत्त करणे 'कायक्लेश' होय, 'सम्यग्दर्शनपूर्वक' केलेल्या ह्या तपाने, अंतरंग सामर्थ्य वाढते व निर्जरा होते.

* ह्या 'तपोवर्णनात' आचार्यांनी[३७], ''लक्षण सांगतांना, 'शरीराला सुख मिळो' अशा भावनेचा त्याग 'कायक्लेश' म्हटले आहे. त्याच्या भेदांचे वर्णन करून, अतिचार सांगितले आहेत. श्रावकांना हे 'तप' करण्याचा उपदेश देवून, प्रयोजन कथन केले आहे.

* ह्या 'बाह्यतपांचा' ऊहापोह केल्यावर, आचार्यांनी 'अंतरंग तपाचे' सविस्तर वर्णन केलेले दिसते.

**७) प्रायाश्चित्त :-**

प्रतिसमय लागणाऱ्या अंतर्बाह्य 'दोषांच्या निवृत्तीसाठी', अंतर्शोधनासाठी' दंड इत्यादि ग्रहण करणे ह्याला 'प्रायश्चित्त म्हटले आहे.

* ह्या तपोवर्णनात आचार्यांनी[३८], ''लक्षण सांगतांना निश्चय-व्यवहार अपेक्षेने सांगितले, प्रायश्चित्तांचे भेद व प्रभेदाचे वर्णन केले आहे.''

* 'प्रायश्चितांचा' निर्देश करतांना[३९], ''त्याची व्याप्ती, अतिचार, प्रायश्चित्ताचा आग्रह, गुरुसमोर कबूली, प्रायश्चित्त शास्त्रानुरूप प्रायश्चित्त देण्याचा आग्रह, शक्तीच्या अपेक्षेने देणे, आलोचनाचे महत्त्व, प्रायश्चित्त योग्य द्रव्य-क्षेत्र इत्यादि, त्याचे प्रयोजन व माहात्म्य'' असा विस्तार केला आहे.

**८) विनय :-**

मोक्षमार्गात 'विनयाचे' महत्त्व सांगितले जाते. 'स्व' रत्नत्रयरूप गुणांचा विनय करणे निश्चयाने 'विनयतप' आहे. रत्नत्रयधारी साधू इत्यादींचा 'विनय' हा 'व्यवहार वा उपचार' म्हटला जातो. अर्थात दोन्ही 'विनय' प्रयोजनीय मानले आहे. 'विनयतपाचा' सूक्ष्मविचार आचार्यांनी केला आहे.

* ह्या विषयाचा विस्तार करतांना[४०],''लक्षण-भेद-प्रभेद कथन करून, मोक्षविनय, उपचारविनय, सामान्य विनय, ज्ञान-दर्शन इत्यादि विनय, काय इत्यादि विनय,'' असे वर्णन केलेले दिसते.

* सामान्य विनयात[४१], ''ज्ञानाच्या आठ अंगांचा विनय, आचार व विनयातले अंतर, माहात्म्य, स्थान, प्रयोजन'' वर्णिले आहे.

* उपचार विनयात[४२], ''योग्य-अयोग्यता, आवश्यकता, पात्र, पूज्यता, वंदता इत्यादींचा ऊहापोह केला आहे.

**९) वैयावृत्य :**

जैन दार्शनिक आणि आचारग्रंथात 'वैयावृत्ताचे' असाधारण महत्त्व वर्णिले आहे. 'विनय' मानसिक धर्म असून, 'वैयावृत्य' शारीरिक धर्म सांगितला आहे. 'योग्य व्यक्तीची योग्य प्रकारे सेवा-आदर-सत्कार, ह्याला 'वैयावृत्य' तप म्हणतात'. आपल्या सामर्थ्यानुसार सेवा करणे, जणू 'सर्वज्ञांची' आज्ञा पालनच म्हटले आहे. (मू.आ.३८९-३९१, भ.आ.३०८) व्रतांमधे वर्णित 'अतिथि संविभागव्रत' 'मैत्री' इत्यादि भावना, सम्यग्दर्शनातील 'वात्सल्यभाव' इत्यादि, 'वैयावृत्त्याचे बीज वा प्रतिकच' म्हणता येईल.

* 'सल्लेखनेतही' वैयावृत्याचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान सांगितले आहे. (भ.आ.६६१-६७०)

* तीर्थंकर प्रकृतीच्या बंधात, १६ भावनेतही 'वैयावृत्याचे' अनन्यसाधारण महत्त्व सांगितले आहे.

* दशधर्मातही 'तप' धर्मात, हे 'तप' अंतर्भूत आहे. (त.सू.९/६१३). 'दान' ह्या आवश्यकातूनही 'वैयावृत्याकडे' दिशानिर्देश केला आहे. (त.सू.७/३३). जैनांचे घोषवाक्य 'परस्परोग्रहो जीवानाम्', ह्यातूनही 'वैयावृत्ताचे' महत्त्व स्पष्टच केले आहे. (त.सू.५-१,२,२१) ह्याशिवाय आचार्यांनी[४३], ' लक्षण, भेद, योग्य कार्य, प्रयोजन, फळ, दोष, प्रधानता,' सांगून, गृहस्थांसाठी मुख्यरूपाने सांगितली आहे.

**१०) व्युत्सर्ग :-**

''बाह्यरूपात' क्षेत्र-वास्तू इत्यादींचे व 'अंतरंगरूपाने' कषाय वा नित्य-अनियत काळासाठी शरीराचा त्याग करणे. 'व्युत्सर्ग' तप होय. 'अहंकार व ममकाररूप' संकल्पाचा त्याग 'व्युत्सर्ग तप' म्हणवला जातो''. आचार्यांनी[४५] ह्याचे ''लक्षण व भेद-प्रभेद वर्णिले आहे. बाह्य-अभ्यंतर व्युत्सर्गांचेही लक्षण देवून, प्रयोजन सांगितले आहे. ह्या 'तपाचे' अतिचार सांगून, व्युत्सर्ग व प्रायश्चित, व्युत्सर्ग-त्यागातील अंतर स्पष्ट केले आहे''.

**११) स्वाध्याय :**

जैन दर्शनात 'स्वाध्यायाला' महत्त्वाचे स्थान दिलेले दिसते. खरे देव-शास्त्र-गुरुंचे 'सम्यग्दर्शनात' स्थान असल्याने, त्या शास्त्रवाचनरूप 'स्वाध्यायाला' श्रेष्ठ दर्जा दिला गेला आहे. 'षट्आवश्यकांमधेही' ह्याचा समावेश करून, 'स्वाध्यायाला' नित्यकरण्याचा, आग्रह केलेला दिसतो. 'सत्' शास्त्रांचे 'वाचन, मनन, उपदेशरूप' ह्या, 'स्वाध्याय तपाला' सर्वोत्तम तप म्हटले गेले आहे.

* ह्या तपाच्या वर्णनात[४५], ''निश्चय-व्यवहार स्वाध्यायाचे लक्षण-भेद कथन केले आहे. स्वाध्यायातही 'सम्यक्त्वाची' प्रधानता प्रकर्षाने कथन केली आहे. 'स्तुति' इत्यादिंनाही 'स्वाध्यायाचा' दर्जा देवून,'चार अनुयोगांच्या स्वाध्यायाचा' क्रम वर्णिला आहे. 'स्वाध्याय' सर्वोत्तम तप आहे असे सांगून, त्याचे 'लौकिक-अलौकिक' फळ सांगितले आहे. प्रकर्षाने, 'स्वाध्यायाने गुणश्रेणी निर्जरा व संवर होते,' असे अधोरेखित केले आहे. स्वाध्यायाचे 'प्रयोजन व महत्त्व' सांगून, स्वाध्यायाची 'विधि, योग्य द्रव्य-क्षेत्र, काळ, अयोग्य काळात केल्याने होणारी हानी', विशेषरूपाने कथन केली आहे''.

अशाप्रकारे 'तपांचा' विस्तृत' ऊहापोह आगमांमधे केला गेला आहे. ह्या बाह्य-अभ्यंतर 'तपाचा' सूक्ष्म अभ्यास करून, चिंतनमननातून प्रकाशित 'पुरुषार्थ' निदर्शनास आणला आहे. अंतरंग 'तपातील' अंतिम 'ध्यान' हे तप, स्वतंत्रपणे ह्याच प्रकरणात वर्णिले आहे.

**तपातील 'पुरुषार्थ' वा 'पुरुषार्थावर'-स्थित 'तप' :-**

१) 'जैन दर्शनात 'आहार-भय-मैथुन-परिग्रह', ह्या चार संज्ञा मानल्या आहेत.'

व्यवहारात ह्याच 'अन्न-वस्त्र-निवारा' रूप आवश्यक गरजा म्हटल्या जातात. ह्या चार संज्ञांच्या पूर्तिसाठी, 'जीवाचा प्रयत्न, होणाऱ्या शुभाशुभक्रिया, ह्यांचे फळ म्हणजे हा संसार आहे. 'अनशन, उनोदरी, वृत्तिपरिसंख्यान, रसपरित्याग,' हे चारही 'तप' रसनेंद्रियाशी निगडीत आहेत. 'रसना व वासना,' ह्या दोन प्रखर अशा 'नैसर्गिक उर्मी' असल्याने,'रसनेंद्रियावर' विजय हा मिळवणे, प्रखर 'पुरुषार्थ' आहे. 'मनोनिग्रह, इंद्रियाचे दमन व संयमन, इच्छा-आसक्तींचा त्याग',म्हणजे ह्या गृहस्थावस्थेतील 'दिव्यपुरुषार्थच' आहे. ह्या 'पुरुषार्थाने, प्राप्त, ''कर्मनाश, ध्यानसिद्धी, कामनांचा त्यागदोषांचे शमन, संतोषवृद्धी, तेजोवृद्धी, निद्राविजय,'' इत्यादि फळांची प्राप्ती ही, श्रावकांच्या उत्तरोत्तर घडलेल्या दृढ 'पुरुषार्थाचे' प्रतिकच आहे.

♦ २) 'प्रत्येक तप यथाशक्ती, नित्य, करावे असा उपदेश केलेला दिसतो.'

'चार संज्ञापैकी' प्रथम व मुख्य 'आहार' संज्ञेचा विचार ह्या, प्रथम चार 'बाह्य तपातून' केला गेला आहे. जैनांनी 'आहारशुद्धीवर परिणामशुद्धी' अवलंबून असल्याचे सांगितले आहे. शिवाय 'आहाराशी अहिंसा' जोडली गेली आहे. त्यादृष्टीनेही 'आहारचिकित्सा' प्रकर्षाने 'तप'रूपात केली गेली आहे. 'जिह्वा इंद्रियाच्याविजयाने, सर्वच इंद्रियांचा सहज निरोध' मानल्यानेही, ह्या 'तपांचे' महत्त्व दृढ झाले आहे. 'संयमवृद्धी कषायांची क्षमता, कर्मविनाश, ध्यानप्राप्ती, आवश्यकांची पूर्ती, जितेंद्रियत्व', ह्या सर्व विषयांशी, 'आहार' जोडले गेल्यानेही, ह्या 'तपांचे' स्थान विशेषच अधोरेखित झाले आहे. ह्या 'तपांची' श्रेष्ठता वा महत्त्व नक्कीच आहे मात्र, वर्तमानात ह्याची विपरीतताच दिसून येते. सर्व धार्मिकताच 'आहाराशी' जोडून, 'अन्य' तपांकडे दुर्लक्ष झालेले दिसते. 'आहाराचीच' चर्चा अधिक केलेली दिसते. हे 'बाह्य' तप असून, विशिष्ट

काळापुरते मर्यादित आहे, ह्या स्वरूपाकडे दुर्लक्ष झालेले स्पष्ट दिसते.

'कर्मसिद्धांतात निर्जरेचे व निर्जरेत' चारित्राचे' अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'चारित्रात व्रत, तप, संयम, त्याग', ह्यांचा विचार केला गेला आहे. ह्यामध्ये प्रारंभिक दशेत, 'उपवास, इत्यादि खूपच महत्त्वाचे ठरते. अधिक दृढता, वा उत्कर्षात 'अन्नत्यागाचे' महत्त्व नक्कीच आहे. मात्र पुढच्या उच्चतम दशेत, 'अन्नचिकित्सा' महत्त्वाची नाही, त्याच्याशी प्रत्यक्ष 'निर्जरेचा' संबंध नाही. कारण ते 'बाह्यतप आहे. 'अनशनादि तप' प्रथमावस्थेत, 'त्यागाचा' अभ्यासरूप वा परीक्षा वा प्रयत्न, आहे. वरच्या श्रेष्ठ दशेत पोहचण्यासाठीचा तो 'पुरुषार्थ', ही प्रथम पायरी आहे.

३) 'विविक्तशय्यासन व कायक्लेश' ह्या 'तपांचा' संबंध शरीराशी जोडलेला दिसतो. मनुष्य हा 'समाजप्रिय, उत्सवप्रिय व सन्मानाप्रिय', प्राणी मानला जातो. 'पद-मान-प्रतिष्ठासाठी' होणारा झगडा, हा समाजाचा एक भाग आहे. 'सुखासीनता आणि अनुकूलता', ही अत्यंत प्रिय असल्याने, मुद्दाम 'प्रतिकूलता'स्वीकारणे, हा खरा 'पुरुषार्थ' आहे. वास्तविक हे 'तप' साधूंसाठी प्रकर्षाने सांगितले जातात तरी, गृहस्थांना 'अभ्यासरूपाने' ते करण्याचा आदेशही दिला जातो. 'लोकेषणा' ही मुख्य गरज असतांना, जाणूनबुजून 'एकांतवास', ही खरी परीक्षा ठरू शकते. 'स्व' चे 'भान, ज्ञान, जाण' होण्यास मात्र, हे 'तप' नक्कीच मदत करणारे आहेत. सर्वत्र दिवसेंदिवसं वाढणारी, 'व्यग्रता, भांडणे, चिंता,' ह्या समस्यांवर हे 'तप', उपाय ठरू शकतात. ह्या 'तपांच्या द्वारा अंतरंग क्षमता, सामर्थ्यांना जाणण्याची, वाढवण्याची संधी, अंतरंगबल वृद्धीच्या पुरुषार्थाची संधी' ह्या तपरूपाने, जैनांनी दिली आहे. म्हणूनच बाह्यतपही 'पुरुषार्थाचे द्योतकच' मानले गेले आहेत.

४) 'अंतरंगतप' हे उत्तरोत्तर वाढत्या क्रमाने होणाऱ्या 'पुरुषार्थाचे' दृश्यरूपच आहे. आपल्या 'चुकांना स्वीकारणे, कबूल करणे व त्यासाठी दिलेली शिक्षा स्वीकारणे,' हे सर्व प्रमादावस्थेतील श्रावकांसाठी, साक्षात् 'पुरुषार्थच' आहे. हा 'विवेक, ही प्रज्ञा', 'पुरुषार्थचे' प्रतिक आहे.

♦ ५) 'विनयाचे' महत्त्व लौकिक जीवनातही सांगितले गेले आहे. अहंकार त्यागाशिवाय 'विनयाचा पुरुषार्थ' घडू शकत नाही. 'विनयासाठी' ऋतुजा, नम्रता, आदरभावरूप 'पुरुषार्थ' आवश्यकच आहे. ह्या विनयातून, समर्पणातून 'वैयावृत्य' प्रगटते. 'वैयावृत्य' हा प्रगट 'विनय' म्हणता येईल. व्यवहारात, 'आई-वडिल, गुरु, वृद्ध, मुनी' इत्यादींचा 'विनय, आदर, सेवा, सन्मान', हा 'श्रावकांच्या' जीवनातील नित्य 'पुरुषार्थच' आहे. कदाचित् 'तपातील विनय-वैयावृत्याच्या' ह्या महत्त्वामुळेच, 'वृद्धाश्रमात' जैन व वृद्धांचा समावेश दिसत नाही हा, कौतुकास्पद 'पुरुषार्थच' म्हणावा लागेल. ख्रिश्चन, शीख इत्यादी धर्मांप्रमाणे, 'सेवेला' केंद्रस्थानीय महत्त्व जैनांनी दिले नसले तरी, 'पाणपोई बांधणे, गोरक्षा, अंधशाळा, हॉस्पिटल, शाळा बांधणे'

इत्यादीरूपात, समाज व राष्ट्रहिताचा 'पुरुषार्थ' नक्कीच साधलेला दिसतो. ह्या 'वैयावृत्य' वैशिष्ट्यातून, 'अर्थ' पुरुषार्थाला वेगळी दिशा दिलेली स्पष्ट होते. पारमार्थिक क्षेत्रात 'विनयाचे' महत्त्व आहे, कारण ह्या तपाने ,'स्वतःचे दोष व दुसऱ्यांचे गुण' दिसतात, व 'दोषांची ग्लानी' जीव करू लागतो, व 'उपगूहन-उपबृंहन', ही अंगे दिसू लागतात. हा 'पुरुषार्थ' घडल्यानेच, तत्त्व दृष्टीने सर्वांना समान लेखणेरूप 'निर्विचिकित्सा' अंगप्राप्त होते. खऱ्या अर्थाने 'गुणिजनांप्रती प्रेम वाटून, सेवा, वैयावृत्त' घडलेल्याने, 'वात्सल्य' अंगाचा विकास होतो. आणि हळूहळू'स्थितिकरणा'कडे 'पुरुषार्थ' सुरू होतो. हे सम्यग्दर्शनाचे चार अंग, 'विनयाचे रूपांतरणच' आहे. 'अभिमानाच्या अभावाने प्रगटणारी नम्रताच विनय' आहे. सम्यक् तत्त्वदृष्टी प्राप्त होवून, परिणाम विशद्धीहोते. ह्या प्रतीतिरूप 'पुरुषार्थाने' एक एक लब्धि प्राप्त होत जातात.''हीच दर्शन क्षेत्रातील दर्शनविशुद्धी, ज्ञानक्षेत्रातला हाच अभिक्षणज्ञानोपयोग, चरित्रातील हाच निरतिचार शीलव्रत, तप, त्यागातला शक्तितस्त्याग इत्यादि असून, चार आराधना आहे.'' ह्या 'विनयानेच', मोक्षमार्गाचे व्दार खुलतात.'विशुद्धी, देशना' ह्या 'लब्धि' विकासित होतात. 'स्व परीक्षा' करण्याचा ' पुरुषार्थ' सुरू होतो. 'विनय तप म्हणजे, पुरुषार्था चे साक्षात् दृश्य रूपच आहे.'

६) जैन दर्शनात 'स्वाध्याय' हे फार महत्त्वाचे अंग मानले गेले आहे. 'दिंगबर संप्रदायात' त्याला 'आवश्यकांमधे' समाविष्ट करून, नित्य 'धर्म पुरुषार्थाची' संधीच दिली आहे. जैन दर्शनात, 'शिक्षणाचे महत्त्व, ऋषभदेवांच्या काळापासून' स्पष्टपणे दिसते. जैनांचा 'साहित्यिक पुरुषार्थ' तर प्रबंधात प्रारंभी प्रकर्षाने वर्णिला आहे. 'स्वाध्यायाचा' समावेश, ह्या जैनांच्या 'पुरुषार्थाने', श्रावकांना सतत 'सम्यक् पुरुषार्थाला प्रेरणाच' मिळाली आहे.

७) 'कायक्लेश' ह्या बाह्यतपाच्या अभ्यासाची पूर्णता, 'व्युत्सर्ग' ह्या अंतरंग तपाने केली आहे. प्रकर्षाने साधूंसाठी असलेले हे 'तप', श्रावकांसाठीही यथाशक्ती, 'व्रत, पर्व दिवसात, आवश्यकांच्या पालनात,' करण्याचा उपदेश दिलेला दिसतो. 'प्रयत्नपूर्वक, जाणिवपूर्वक अंतरंग कषायांना, अहंकाराला स्वीकारणे व त्याचा मर्यादित काळापर्यंत का होईना त्याग करणेरूप हे 'तप', म्हणजे 'पुरुषार्थाचा कळस' आहे. 'पुरुषार्थाच्याही' वरच्या ह्या अवस्थेचा, अहंकार न करणे, हाच ह्या तपातील 'पुरुषार्थ' आहे. 'पुरुषार्थाच्या' ह्या परिसस्पर्शाने, 'मदोन्मत्त, अहंकारी' जीव, 'सौम्य, नम्र, विनयी, ज्ञानी रूपाने' परिणमित होतो. आणि ''पुरुषार्थाच्या प्रथम साधनरूपी तपाकडून-पुरुषार्थाचा परमोत्कर्ष'' असणाऱ्या 'ध्यानाकडे' ही वाटचाल सुरू होते.

♦ ८)'निर्जरा अपेक्षेने तप हे पुरुषार्थाचे साधन म्हणून त्याचे महत्त्व वा स्थान' :-

'कर्मसिद्धांतात' सर्वात महत्त्वाचे म्हणजे, 'जीव आणि कर्म' यांचा पारस्पारिक बंधाचा, अनादिसंतान क्रम आहे. ह्यात 'नियंताची' अपेक्षा नाही. जर हे त्या 'दोघांच्या 'स्व' शक्तीने' होते तर, ह्या अनादि प्रवाहाला कसे थांबवता येते, हा प्रश्न आहे. अनादि पासून'उदयाने बंध व

बंधाने उदय', हे चक्र चालू आहे. 'ज्ञाता-दृष्टा भावरूप शुद्ध परिणामाचा' व 'तपाचा' आश्रय घेतला तर, सुटणे शक्य आहे. ह्यातच मोक्षाचा यथार्थ 'पुरुषार्थ' निहित आहे.'संवर व निर्जरा' ह्यातले एक जरी नसेल तर, 'कर्ममुक्त' हाणे शक्य नाही. 'संवर' शिवाय सत्तेत अतंर पडणार नाही. आणि 'निर्जरेच्या' अभावात 'सत्ता' तशीच राहील,'उपशम भावाने' प्राप्त, 'विवेकाने कर्म शक्ती' क्षीण होतात. कर्माचा नाश करण्यास, 'संवर-निर्जरा' दोन्ही 'पुरुषार्थाची' आवश्यकता असते. सत्तेत असणाऱ्या 'अनंतानंत निषेकांच्या' नाशासाठी, प्रतिसमय अनंत 'निषेकांची गुणित क्रमाणे निर्जरा' हवी. कर्मांच्या 'सत्ता सद्भावात', कोणताही जीव, पूर्ण जीवनपर्यंत 'शुद्ध परिणामात' स्थित राहणे शक्य नाही. कारण प्रतिसमय उदय असतो. त्यासाठी 'अल्पमात्र काळातच, गणनातीत समयांवर स्थित, निषेकांची युगपत् निर्जरा होईल, असा जो उपाय त्याला, तप म्हणतात.' ह्यातही शुद्धपरिणामांने 'संवर', आणि 'तपाने निर्जरा' होते. 'अंतरंगतप, समता' ही श्रेष्ठ आहे. ही समता, 'पीडा, प्रतिकूलता' आल्यावर असणे, हे महत्त्वाचे आहे. 'उपयोगाचे' अटकणे 'तप' नाही. परमाणु मात्र ही 'भावबंध' असेल तर, 'मुक्ती' नाही. 'अंतरंग क्षमता, सामर्थ्यवृद्धी' आवश्यक आहे, 'ज्ञाता-द्रष्टा' राहणे आवश्यक आहे, व हाच 'पुरुषार्थ' आहे. अनेक वर्षाच्या 'तपसाधनेतून', कर्माच्या 'सत्तेचे उन्मूलन होते. कारण प्रतिसमय 'अनंतनिषेक समाप्त' होतात. अर्थात ह्या साठी 'वरचे निषेक जेव्हा काळापूर्वी, फळ देण्यास उद्युक्त होवून, उदयात येतात म्हणजेच अपकर्षण' होते. अर्थात 'व्याघातरूपच अपकर्षण' आवश्यक असते जे,'तपाने' होते. 'तपरहीत समतेने' होणारे 'अपकर्षण' हे अव्याघातरूप' असते, 'उपशमरूप' असते. म्हणून 'समतासह तपही' आवश्यकच आहे. 'तपासह विवेक' महत्त्वाचा आहे. ह्यात ना 'स्वच्छंदता, ना शक्ती लपवणे, ना अनुकरण, ना कर्कशता', असा समन्वय आवश्यक आहे. मोक्षमार्ग हा 'विवेकाचा' आहे. म्हणूनच  च 'विवेकपूर्वक रत्नत्रय' आवश्यक आहे.

# ३) 'पुरुषार्थाचा' क्रमिक विकास 'गुणस्थान' :-

**प्रस्तावना :-**

जैन दर्शनात 'मोक्ष' पुरुषार्थाच्या अनुषंगाने, 'तत्त्वांची मांडणी' केलेली दिसते. त्या वर्णनात 'द्रव्य-भाव, व्यवहार-निश्चय, मुख्य-गौण' अशी विविक्षा दिसते. जैन दर्शनात 'भाव' वा 'परिणाम', ह्यांना खूपच महत्त्व दिले गेले आहे. 'मोह व योग' ह्या कारणांमुळे, जीवांच्या 'अंतरंग' परिणामांमधे, प्रतिक्षण तरतमता येते. जीवाचे अनंत 'परिणाम' आहेत मात्र, उत्कृष्टतेच्या निकषानुसार, 'जघन्य ते उत्कृष्ट' असा क्रम, 'गुणस्थानातून' सांगितला जातो. अंतरंग 'पुरुषार्थाच्या' सहाय्याने 'परिणांमामध्ये विशुद्धी' येते आणि क्रमशः विकास होत, अंततः कर्मांचा 'क्षय' शक्य होतो. हा 'पुरुषार्थाचा विकास' गुणस्थानांद्वारा दर्शविला आहे. प्रत्येक 'तत्त्व, जीव' इत्यादींचा विचार, 'गुणस्थान' ह्या श्रेणीवर केला गेला असल्याने, आगमात ह्या विषयाचे, 'अत्यंत सूक्ष्म व सविस्तर' वर्णन केले गेले आहे. त्या विषयाला मांडणे सुद्धा, एक ग्रंथनिर्मितीच ठरेल. हा विषयविस्तार टाळून, विविध 'विषय व गुणस्थान' असा विचार केला आहे. 'करणानुयोगाचा' विषयच 'गुणस्थान, बंध-उदय-कर्म' इत्यादि असल्याने, ह्या पुनरावृत्तीचा प्रयास न करता, वेगळे चिंतन करून, फक्त 'विकसित पुरुषार्थच' निदर्शनास आणला आहे.

**विषयविस्तार :-**

अत्यंत महत्त्वाच्या अशा ह्या विषयाला संपूर्ण 'करणानुयोग' समर्पित आहे.

* ह्या विषयवर्णनात[४६], ''गुणस्थानाचे सामान्य लक्षण-भेद, कारण, प्रधानता सांगून, प्रयोजन कथन केले आहे.

* ह्या 'गुणस्थानांचा, विचार, विविध विविक्षा ठेवून केला आहे. तो विचार येथे मांडला गेला आहे. 'कर्म -गुणस्थान, मार्गणा' ह्यांच्या ज्ञानाने' संयोगातील अन्य द्रव्यांचे, निमित्तांचे, विभिन्न पर्यायांचे ज्ञान होते. 'जीव-कर्म' त्यांची भिन्नता, त्यामुळे स्पष्ट होण्यास मदत होते. स्वतंत्रपणे गुणस्थानांचा विषय मांडला आहे.

### १) मिथ्यात्व गुणस्थान :-

अनादिकाळापासून सर्व जीव 'मिथ्यात्व' गुणस्थानात असतात. जिनेंद्रकथित 'प्रयोजनभूत तत्त्वांबद्दल' विपरीत मान्यता, म्हणजे 'अतत्त्वश्रद्धान' असते. 'आत्मतत्त्वाचे' श्रद्धान नसते आणि 'परद्रव्यांमध्ये एकत्व, ममत्व, कर्तृत्व व भोक्तृत्वबुद्धी' असते.

* ह्या 'गुणस्थानाचे', लक्षण-भेद[४७] आचार्यांनी कथन केले आहे.

* ह्या 'गुणस्थानाचा' निर्देश करतांना[४८], ''विषयांमधेरुचि, परद्रव्यात-रत, सम्यकत्वाचा अभाव, ह्या गुणस्थानातून आरोहण, गमन-आगमन'' इत्यादि विचार मांडला आहे.

* ह्या 'गुणस्थानात' मृत्यू झाल्यास, 'जीव चारही गतीत' उत्पन्न होवू शकतो. फक्त, 'गैवेयकांच्या' वर उत्पन्न होत नाही.

* ह्या 'गुणस्थानात' उपशम, क्षायोपशमिक सम्यक्त्वी, च्युत होवून येवू शकतो. 'क्षायिक सम्यक्त्वी' मात्र येवू शकत नाही.

* ह्या 'गुणस्थानात' औदयिक भाव, १४ जीवसमास, सहा पर्याप्ति व १० प्राण असतात. त्याचप्रमाणे 'चार संज्ञा, चार गति, पाच जाति, षट्काय, तीन वेद, २५ कषाय, तीन अज्ञान, असंयम, सहा लेश्या, भव्य-अभव्य जीव, संज्ञी-असंज्ञी जीव, आहारक, अनाहरक' जीव असतात. 'ध्यान' अपेक्षेने चार आर्त व चार रौद्र ध्यान, 'आस्रवांची' पाचही कारणे असून, ह्या 'गुणस्थानात' सदैव जीव असतातच

* 'दशकारण' अपेक्षेने, ह्या 'गुणस्थानात', ''११७ प्रकृतींचा बंध, १६ प्रकृतींची बंधव्युच्छित्ति, १४८ प्रकृतींची सत्ता, ११७ प्रकृतींचा उदय, पाच प्रकृतींची उदयव्युच्छित्ति असते''.

**२) सासादनगुणस्थान :-**

'प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या' काळात, सहा आवली बाकी असतांना, जीव,'सम्यक्त्वापासून' च्युत होतो. त्यावेळी हे 'गुणस्थान' प्राप्त होते. 'आसादन' म्हणजे विराधना, अशा 'आसादनाने' युक्त ते 'सासादन' म्हटले जाते.

* ह्या 'गुणस्थानाची' वैशिष्ट्ये आचार्यांनी[४१] विशेषरूपाने कथन केली आहेत, 'अनंतानानुबंधी कषायांच्या उदयाने' हे 'गुणस्थान' होते. 'मिथ्यात्वाचा उदय, उपशम, क्षय', नसल्याने, त्याला कथंचित् 'पारिणामिक भाव' म्हटले गेले आहे. ह्या 'गुणस्थानाला सासादनसम्यग्दृष्टी', म्हणण्याची कारणे स्पष्ट केली आहेत.

* ह्या 'गुणस्थानात', 'तीर्थंकर प्रकृती व आहारकद्विक', ह्यांची सत्ता असणारा जीव येवू शकत नाही.

* मरण अपेक्षेने, ह्या 'गुणस्थानातून', 'एकेंद्रिय ते संज्ञी पंचेद्रिय' पर्यंत, जीव उत्पन्न होवू शकतो.

* ह्या 'गुणस्थानात' सात 'जीवसमास', २५ कषाय, तीन अज्ञान, सहा लेश्या, असंयम, भव्यत्व, आहारक-अनाहारक जीव, चार आर्त व रौद्र ध्यान, असतात.

* ह्या 'गुणस्थानात' जीव 'चतुर्थ, पंचम व सहाव्या' गुणस्थानातून येतो.

* ह्या 'गुणस्थानात' १०१ प्रकृतींचा बंध, २५ प्रकृतींची बंध-व्युच्छित्ति, उदय १११ प्रकृतींचा, ९ प्रकृतींची उदयव्युच्छित्ति व सत्त्व १४५ प्रकृतींचे असते.

### ३) मिश्र गुणस्थान :–

'सम्यक्त्वापासून' च्युत होतांना वा 'मिथ्यात्वातून' चढतांना क्षणभरासाठी, ह्या अवस्थेचे वेदन होवू शकते. ह्यात 'सम्यक् व मिथ्यात्व', असे 'मिश्रित श्रद्धान व ज्ञान' असते.

* आचार्यांनी ह्या 'गुणस्थानाचे' लक्षण[५०] कथन केले आहे.

* ह्या 'गुणस्थानातील' काही वैशिष्ट्ये[५१] आचार्य सांगतात.

* ह्या 'गुणस्थानातील' जीव फक्त, 'प्रथम वा चतुर्थ', दोनच गुणस्थानात जावू शकतो.

* ह्या 'गुणस्थानातील' जीव, 'संयमाला धारण' करू शकत नाही.

* ह्या 'गुणस्थानात' मरण होवू शकत नाही आणि 'आयुचा बंध' होवू शकत नाही.

* ह्या 'गुणस्थानातील' ज्ञान, 'अज्ञान मिश्रित' असते.

* ह्या 'गुणस्थानात', ७४ प्रकृतींचा बंध, १०० प्रकृतींचा उदय, एका प्रकृतीची उदयव्युच्छित्ति असून, बंधव्युच्छित्ति होत नाही.

### ४) अविरत गुणस्थान :–

जीवाला सर्वप्रथम 'सम्यक्त्वाची प्राप्ती' झाल्यावर, जीव 'प्रथम गुणस्थानातून ह्या गुणस्थानात येतो. ह्या 'गुणस्थानात' सम्यक्त्व असले तरी, कोणतीही 'विरति वा व्रत'नसते. म्हणून 'अविरत सम्यग्दृष्टी' म्हटले जाते.

* ह्या 'गुणस्थानाचे' लक्षण आचार्य देतात[५२].

* ह्या 'गुणस्थानाचे' वैशिष्टय आचार्य सांगतात.

* 'औपशमिक, क्षायोपशमिक, क्षायिक,' ह्यापैकी एक सम्यक्त्व, ह्या 'गुणस्थानात' असते. 'व्रतरूपाने' काहीही स्वीकारले न जाता, मात्र 'अष्टमूलगुण' इत्यादि 'कुलक्रिया' असतात.

* आपल्या दोषांची 'निंदा, गर्हा,' ही केली जाते. 'व्रतरहित दार्शनिक' असा तो जीव असतो.

* ह्या 'गुणस्थानात' सदैव जीव असणारच, हा नियम आहे. 'जीवरहित' असा एकही समय, ह्या 'गुणस्थानात' होवू शकत नाही.

* ह्या 'गुणस्थानात' क्षायिक वा क्षायोपशमिक सम्यग्दर्शन प्राप्त करता येवू शकते. ह्या 'गुणस्थानाचा' जघन्यकाळ अंतमुर्हूत व उत्कृष्ट साधिक ३३ सागर मानला गेला आहे.

* ह्या 'गुणस्थानातून' जीव, 'सात,पाच,तीन,दोन,एक' गुणस्थानात जावू शकतो. ''सहा, पाच,तीन, एक' ह्या गुणस्थानातून, 'जीव' ह्या 'गुणस्थानात' येतो.

* उपशम श्रेणिवाला जीव,' पाच, सहा, सातव्या गुणस्थानात, मरण आले असता, ह्या 'गुणस्थानात' येतात. 'संज्ञी, पंचेद्रिय, पर्याप्तक तिर्यंच, मनुष्य देव वा नारकी, प्रथम गुणस्थानातून,

ह्या गुणस्थानात' येवू शकतात.

* ह्या 'गुणस्थानात' ७७ प्रकृतींचा बंध, १० प्रकृतींची बंध व्युच्छित्ति, १०४ प्रकृतींचा उदय, १७ प्रकृतींचा उदयव्युच्छित्ति, सत्त्व १४८ प्रकृतींचे असते.

**५) देशविरत गुणस्थान :-**

'पूर्ण संयम धारण करण्यापूर्वीच्या, अभ्यासदशेत, काही संयम व काही असंयम परिणाम युक्त श्रावकांना, 'संयतासंयत' वा 'देशविरत' म्हटले जाते'.

* आचार्यांनी ह्या 'गुणस्थानाचे' लक्षण सांगितले आहे.

* ह्या 'गुणस्थानाच्या' विशेषतेबाबत, आचार्यांनी[५३] वर्णन केले आहे.

* अंतरंगात सम्यग्दर्शनसहित, 'अनंतानुबंधी व अप्रत्याख्यान' कषायांचा अभाव असतो. बाह्यतः 'व्रते' धारण केलेली असतात. ह्या 'गुणस्थानात' वाढत्या 'वीतरागतेनुसार' परिणामांचे विविध भेद आढळतात. त्यालाच श्रावकाचारात 'प्रतिमा' म्हटले जाते.

* हे 'गुणस्थान', 'कर्म भूमीज मनुष्य व तिर्यंच, संज्ञी, पंचेद्रिय' यांनाच होवू शकते. ज्याने 'देवायुचा' बंध केला आहे., त्यांना सोडून, इतर 'तीन आयूचा बंध' केलेल्यांना हे 'गुणस्थान' होत नाही. 'श्रावकाचार' पाळणारा, पाच वा सात भवांमधे, 'सिद्धपदाची' प्राप्ती करू शकतो.

* ह्या 'गुणस्थानात' ६७ प्रकृतींचा बंध, चार प्रकृतींची बंधव्युच्छित्ति, ८७ प्रकृतींचा उदय व ८ ची उदयव्युच्छित्ति असून, १४७ प्रकृतींचे सत्त्व असते.

* ह्या 'गुणस्थानातून' सातव्या, चौथ्या, तिसऱ्या, दुसऱ्या व पहिल्या, गुणस्थानात गमन होवू शकते. 'प्रथम-चतुर्थ व सहाव्या' गुणस्थानातून, जीव ह्यामध्ये येवू शकतो.

**६) प्रमत्तसंयत :-**

'बाह्य व अंतरंग' आस्रवांपासून विरत महाव्रती श्रमण, 'संयत' म्हणवले जातात. शुभोपयोगाच्या निमित्ताने 'प्रमत्त' म्हटले जाते.

* आचार्यांनी ह्या 'गुणस्थानाचे' लक्षण कथन केले आहे.

* ह्या गुणस्थानातील वैशिष्ट्ये कथन केली आहेत[५४]

* हे 'गुणस्थान' पर्याप्तक, कर्मभूमीज, आर्यखंडातील, संज्ञी, मनुष्यांना, जीवांनाच होते. 'नरक, तिर्यंच, देव गतीत वा द्रव्यस्त्रीलाही', हे 'गुणस्थान' संभवत नाही. ह्या 'गुणस्थानात' संयम अपेक्षेने 'क्षायोपशमिक भाव' असते. 'सम्यक्त्वाच्या' अपेक्षेने 'क्षायिक, क्षायोपशामिक, उपशम' असू शकते.

* 'प्रमादवश' ह्या गुणस्थानात 'आर्तध्यान' होवू शकते, पण 'रौद्रध्यान' होत नाही. ह्या गुणस्थानात 'पुलाक, बकुश, कुशील' हे तीन, निग्रंथी असू शकतात.

* ह्या गुणस्थानातून, 'सात, पाच, चार, तीन, दोन, एक ' ह्या गुणस्थानात गमन होवू शकते. मात्र, ह्या गुणस्थानात जीव '७ व्या गुणस्थानातून येतो. ह्या 'गुणस्थानात' ६३ प्रकृतींचा बंध, सहा प्रकृतींची बंधव्युच्छित्ति, ८१ प्रकृतींचा उदय, ५ प्रकृतींची उदयव्युच्छित्ति व १४६ प्रकृतींचे सत्त्व असते.

**७) अप्रमत्त गुणस्थान :-**

ज्यांच्या संयमात 'प्रमाद' नसतात, त्यांना 'अप्रमत्तसंयत' म्हटले जाते.

* ह्या 'गुणस्थानाच्या लक्षण व भेदाचे वर्णन केले आहे.

* ह्या 'गुणस्थानातील' महत्त्वाच्या गोष्टींचा ऊहापोह आगमात आढळतो[५५].

* ह्या 'गुणस्थानात' मरण झाल्यास, जीव 'चतुर्थ गुणस्थान' जातो.

* आत्मास्थिरतेपूर्वक, 'अंनतानुबंधी, अप्रत्याख्यान, प्रत्याख्यान' ह्या, 'कषायांचा अभाव' झाला असता, हे 'गुणस्थान' होते. ह्या 'गुणस्थानाचा' जघन्य काळ 'एक समय' असून, उत्कृष्ट शुद्धोपयोगाचा काळ 'अंतमुर्हूत मात्र' आहे. त्यामुळे '७ व्या गुणस्थानातून, सहाव्या गुणस्थानात' सतत जाणे-येणे होत रहाते. सहाव्या पुढची 'गुणस्थाने' मात्र, मनुष्यगतीतील 'पुरुषपर्यायतच' होतात. ह्या 'गुणस्थानात' जीव, 'आठ, सहा, पाच, चार व एक' मधूनही येवू शकतो.

* ह्या 'गुणस्थानात' ५९ प्रकृतींचा बंध, एकच प्रकृतीची बंधव्युच्छित्ति, ७६ प्रकृतींचा उदय, चार प्रकृतींची उदयव्युच्छित्ति, सत्त्व १४६ प्रकृतींचे असते.

**८) अपूर्वकरण गुणस्थान :-**

जीवाच्या परिणामात क्रमपूर्वक होणाऱ्या, 'विशुद्धीच्या वृद्धी स्थानांना 'गुणस्थान' म्हणतात. त्यात हे आठव्या क्रमांकाचे 'गुणस्थान' आहे.

* ह्या 'गुणस्थानाचे' लक्षण सांगितले आहे.[५६]

* ह्या 'गुणस्थानाची' वैशिष्ट्ये सांगतांना, त्याचा काळ 'अंतमुर्हूतमात्र' सांगितला. ह्या 'गुणस्थानात' प्रतिसमय, होणाऱ्या 'परिणामांची संख्या व त्यातील वृद्धिक्रम, 'संदृष्टी व यंत्रे' द्वारा सांगितल्या आहेत.

* ह्या 'गुणस्थानात' प्रथम समयापासून, ''गुणश्रेणी, गुणसंक्रमण, स्थितिखंडन, अनुभागखंडन,'' ह्या चार आवश्यक गोष्टी घडतात.

* ह्या 'गुणस्थानात', क्षायिक व औपशमिक भाव असतात. ह्या 'गुणस्थानात' एकाही कर्माचा 'क्षय वा उपशम' होत नाही.

* ह्या 'गुणस्थानात' दोन श्रेणी मांडल्या जातात. 'उपशमश्रेणींमध्ये, चारित्र मोहनीय कर्माच्या २१ प्रकृतींचा उपशम होतो व ११ वे गुणस्थान प्राप्त होते.

* क्षपक श्रेणीमध्ये', मोहनीयच्या २१ प्रकृतींचा क्षय होतो व १२ वे गुणस्थान प्राप्त होते 'क्षपक श्रेणीत मरण येत नाही'. ह्या 'गुणस्थानाच्या' प्रथम भागात 'मरण' येत नाही.

* ह्या 'गुणस्थानामध्ये' , ५८ प्रकृतींची बंध, ३६ प्रकृतींची बंधव्युच्छित्ति, ७२ प्रकृतींचा उदय, ६ प्रकृतींची उदयव्युच्छित्ति, १३८ प्रकृतींचे सत्त्व असते.

**९) अनिवृत्तिकरण गुणस्थान :-**

जीवांच्या परिणाम 'विशुद्धीत तरमरता' असते. ह्या 'विशुद्धीने' जेव्हा साधक, 'निर्विकल्प समाधीत' प्रवेश करण्यास उद्युक्त होतो, तेव्हा त्याला 'अनिवृत्तिकरण गुणस्थान' म्हटले जाते.

* ह्या 'गुणस्थानाच्या' लक्षणांचा उल्लेख केला आहे.[५७] ह्या 'गुणस्थानातील' जीवांचे प्रतिसमय एकच परिणाम असतात. ''समान समयवर्ती जीवांच्या परिणामांची भेदरहित वृत्ति 'निवृत्ति' म्हणवली जाते. म्हणजे ज्या 'परिणामांची निवृत्ती' होत नाही, ती 'अनिवृत्ति' होय. सांपराय म्हणजे 'कषाय' आणि 'बादर' म्हणजे 'स्थूल, होय. स्थूल कषायांना 'बादरसांपराय' म्हणतात. अनिवृत्तिरूप बादर सांपरायला 'अनिवृत्तिबादरसांपराय' म्हणतात''.

* ह्या 'गुणस्थानात' सम्यक्त्व व चारित्र दोन्ही अपेक्षेने, 'औपशमिक व क्षायिक' दोन्ही भाव संभवतात.

* ह्या 'गुणस्थानाचा' काळ 'अंतमुर्हूतमात्र' आहे. ह्या 'गुणस्थानातील', परिणाम विशुद्धीचा वृद्धिक्रम सांगितला आहे.

* ह्या गुणस्थानात 'स्थितिकांडकघात, अनुभागकांडकघात, बंधापसरण, गुणश्रेणी निर्जरा,' ह्या चार आवश्यक गोष्टी घडतात.

* ह्या गुणस्थानात, '२२ प्रकृतींचा बंध, पाच प्रकृतींची बंधव्युच्छित्ति, ६६ प्रकृतींचा उदय, सहा प्रकृतींची उदयव्युच्छित्ति, सुरवातीपासून ते अंतपर्यत क्रमाने कमी होत १३८ ते १०३ प्रकृतींचे सत्त्व असते.'

* ह्या 'गुणस्थानातून' १० व्या गुणस्थानामधे जातो व 'आठव्या गुणस्थानातून ह्यात येतो. 'उपशमश्रेणी' असणारा जीव, १० व्या 'गुणस्थानात' जातो व मरण आल्यास 'चतुर्थ गुणस्थानात' जातो. 'उपशमश्रेणीवाला' जीव आठव्या गुणस्थानातून ह्यात येतो.

**१०) सुक्ष्मसांपराय गुणस्थान**[५८] **:**

'कषायांच्या अत्यंत सूक्ष्मतेनुसार' ह्या गुणस्थानाला 'सूक्ष्मसांपराय' म्हटले जाते.

* ह्या 'गुणस्थानाचे' लक्षण सांगितले आहे.

* ह्या 'गुणस्थानात' 'द्वितीयोपशम सम्यग्दृष्टी उपशमक, क्षायिक सम्यग्दृष्टी उपशमक, क्षायिक सम्यग्दृष्टी क्षपक', असे तीन प्रकारचे साधू असतात.

* ह्या 'गुणस्थानाच्या' अंतिम समयात, 'ज्ञानावरण, दर्शनावरण, अंतराय,' ह्या तीन घाति-कर्मांच्या 'स्थितिबंध अंतमुहूर्तमात्र' होतो. मोहनीय कर्माचा बंध नसतोच.

* 'क्षपकश्रेणीवाला' जीव, ह्या 'गुणस्थानाच्या' अंतिम समयात, 'चारित्रमोहनीय' कर्माचा क्षय करून, १२ व्या 'गुणस्थानात' जातो. दर्शनमोहनीयचा क्षय पूर्वीच झालेला असतो.

* ह्या 'गुणस्थानातून' जीव १२ व्या 'गुणस्थानात' जातो व ह्या 'गुणस्थानात' ९ व्या गुणस्थानातून येतो. 'उपशमश्रेणीवाला' जीव ११ व्या गुणस्थानात जातो, ११ व्या गुणस्थानातून खाली पडतांना, पुन्हा ह्यात येतो. मरण आल्यास 'चतुर्थ गुणस्थानात' जातो.

* ह्या 'गुणस्थानात' १७ प्रकृतींचा बंध, १६ प्रकृतींची बंधव्युच्छित्ति, ६० प्रकृतींचा उदय व एका प्रकृतीची उदयव्युच्छित्ति, १०२ प्रकृतींचे सत्त्व असते.

**११) उपशांतमोह**[५९] :

ज्या जीवाचे संपूर्ण 'मोहनीयकर्म', सर्वथा उपशांत' झाले आहे. अशा त्या अत्यंत निर्मल परिणामवाल्या जीवाचे 'गुणस्थान उपशांतमोह' म्हटले जाते.

* ह्या गुणस्थानात 'औपशामिक भाव' असतो.

* ह्या 'गुणस्थानातून' जीव 'आयु क्षय वा कालक्षय' (कषाय उदीरणा) ह्या दोन कारणामुळे खाली उतरतो. कारण ह्याचा काळ 'अंतमुहूर्त मात्र' असल्याने, 'मोहनीय कर्माचा' (चारित्र), उदय नक्की होतोच, त्यामुळे 'संक्लेश भाव' उत्पन्न होतात.

* ह्या 'गुणस्थानातून' जीव '१०,९,८,७,६ गुणस्थानापर्यंत येवू शकतो. 'संक्लेश' परिणामांने तो, खालच्या 'गुणस्थानांना' प्राप्त होतो. अशा जीवांची संख्या, 'संख्यात' सांगितली आहे. ह्या जीवाचे, 'वेदक सम्यक्त्वाला' प्राप्त झाल्याशिवाय, पुन्हा 'उपशम श्रेणी' चढण्याचा अभाव सांगितला आहे. ह्या 'गुणस्थानात' मरण आल्यास जीव चतुर्थ गुणस्थानात जातो.

* ह्या 'गुणस्थानात' एका प्रकृतीचा बंध, ५९ प्रकृतींचा उदय, दोन प्रकृतींची उदयव्युच्छित्ति असून, बंधव्युच्छित्ति नसते.

**१२) क्षीणमोह गुणस्थान**[६०]:

ज्या जीवांच्या 'संपूर्ण मोहनीय कर्मांचा' क्षय झाला, त्यांना 'क्षीण कषाय' म्हणतात, परंतु वीतरागता असल्याने 'क्षीण कषाय वीतराग' म्हटले जाते. 'ज्ञानावरण-दर्शनावरण' ह्यांचे आवरण असल्याने 'छद्म' असतात, असे जीव 'क्षीणकषाय - वीतराग-छदमस्थ' म्हणवले जातात.

* ह्या गुणस्थानात 'सम्यक्त्व व चारित्र', दोन्ही विवक्षाने, 'क्षायिक भाव' असतो. ह्या गुणस्थानात 'स्थिति व अनुभाग' घात असला तरी, 'शुभप्रकृतींच्या' अनुभागाचा घात होत नाही.

* ह्या 'गुणस्थानात' जीवांचे शरीर, निगोद राशींनी' रहित होते. ध्यानप्रभावाने निगोदजीवांच्या 'उत्पत्ती व स्थितीच्या' कारणांचा निरोध होतो. ह्या 'अप्रमत्तभावा' मुळे ही हिंसा, अहिंसा ठरते.

* ह्या 'गुणस्थानात' मात्र 'सातावेदनीयचा' बंध होतो. 'ज्ञानावरण, दर्शनावरण, अंतरायाचे,' स्थितिसत्त्व अंतर्मुहूर्त केले जाते. ह्या 'गुणस्थानाचे' स्वामी मात्र, 'संज्ञी, पंचेद्रिय, पर्याप्तक, पुरुषवेदीच' असतात.

* ह्या 'गुणस्थानाच्या' प्रारंभी काहीकाळ, 'पृथक्त्ववितर्कवीचार' शुक्लध्यानच, राहते. त्यानंतर अंतसमयपर्यंत दुसरे 'एकत्ववितर्कअवीचार शुक्लध्यानच' असते.अंतसमयी 'शेष घातिकर्माचा क्षय' होवून, 'केवलज्ञान' उत्पन्न होते आणि 'भावमन' नष्ट होते.

* ह्या 'गुणस्थानात' एका प्रकृतीचा बंध, ५७ प्रकृतींचा उदय, १६ प्रकृतींची बंधव्युच्छित्ति,, १०१ प्रकृतींचे सत्त्व असून, बंध व्युच्छित्ति नसते.

### १३) सयोगकेवली गुणस्थान[६१] :

'संपूर्ण ज्ञानावरणीय नाशाने', अत्यंत 'स्वाभाविक अनंतज्ञानाची' प्राप्ती होते. हे 'केवली' तीनही योगांनी युक्त असल्याने 'सयोगी' म्हणवले जातात.

* ह्या 'गुणस्थानात' मात्र, 'क्षायिक' भाव असतो. 'शुभ प्रकृतींच्या' अनुभागाचा घात, 'विशुद्धी, केवली समुद्घात, योग निराधाने' होत नाही.

* ह्या 'केवलज्ञान' प्राप्तिनंतर, तीर्थंकरांचे 'परमऔदारिक शरीर', पृथ्वीपासून 'पाच हजार धनुष्य प्रमाण वर' जाते.

* ह्या 'गुणस्थानात होणारा 'ईर्यापथ आस्रव, सत्त्वरूप वा बंधरूप वा उदीरणारूप' नसतो.

* ह्या 'गुणस्थानात' मात्र, 'नोकर्माहार' होतो, 'कवलाहार' होत नाही.

* 'द्रव्येंद्रिय अपेक्षेने पंचोद्रियत्व' असले तरी, ते 'उपचार मात्र' कथन आहे, कारण ते फक्त 'जातिनामकर्म 'अपेक्षेने पंचोद्रियत्व असते. 'द्रव्यमन' असले तरी, 'भावमनाचा' सद्भाव नसतो. 'लेश्या सद्भाव' ही उपचाराने म्हटला जातो. त्याचप्रमाणे 'संयम, ध्यान, उपयोग, ह्या सर्वांचे कथन 'उपचारमात्र' असते.

* केवलींची दिव्यध्वनी, 'अक्षररहित वा अक्षरसहित' असते. जीव योग्यतानुरूप 'तत्त्व' प्राप्त करतात. हे '१८ दोषांनी रहित, ४६ गुणांनी युक्त, अनंत चतुष्टयधारी' असतात. ह्या 'गुणस्थानात' मात्र एका प्रकृतीचा बंध, एका प्रकृतीचीच बंध व्युच्छित्ति, ४२ प्रकृतींचा उदय, ३० प्रकृतींची उदयव्युच्छित्ति, ८५ प्रकृतींचे सत्त्व असते.

* केवलींच्या आयुष्याचा, एक 'अंतमुहूर्त' शेष असेपर्यंत, हे 'गुणस्थान' राहते. पाच लघुस्वर, 'अ, इ, उ,ऋ ऌ' यांच्या उच्चारास जेवढा वेळ लागेल, तेवढा 'लघु-अंतमुहूर्तकाळ', १४ व्या 'गुणस्थानाचा असतो.

## १४) अयोगी गुणस्थान[६२] :

'सर्व प्रकारच्या आस्रवांनीरहित, अनुपम अनंत गुणांनी युक्त, कर्मरज व योगरहित, केवलज्ञानविभूषित असणाऱ्यांना 'अयोगी' म्हणतात'.

* ह्या 'गुणस्थानवर्तींची' अवगाहना, 'साडेतीन हात ते ५२५ धनुष्य' असू शकते.

* ह्या 'गुणस्थानात', अघाति कर्मांपैकी '८५ प्रकृतींची' सत्ता असते.

* ह्या 'गुणस्थानात', प्रथम ते अंतिम समयापर्यंत, 'चतुर्थ शुक्लध्यान' असते. शेवटी संपूर्ण 'योग-श्वासोच्छवास' नष्ट झाल्याने, 'प्रदेशपरिस्पंदन क्रियांपासून' निवृत्ति होते. 'लघुस्वर' उच्चारण्यास लागणाऱ्या वेळात, 'कर्मांच्या क्षय' होतो. 'शरीराचे परमाणु' विखरून जातात. एका समयात जीव ,'लोकाकाशाच्या अंती' जावून, विराजमान होतो.

* ह्या गुणस्थानात', बंध, बंधव्युच्छित्ति नाही. १२ प्रकृतींचाच उदय व उदयव्युच्छित्ति असून, सत्त्व ८५ प्रकृतींचे असते. ह्या 'गुणस्थान' विषयाचा ऊहापोह, ''पं.सं.प्रा., धवलाटीका, गो.जी.,ल.सा.,क्ष.सा.'', ह्या ग्रंथांच्या आधाराने केला आहे. ह्या ग्रंथांमधे हे वर्णन, 'लक्षण, स्वामी, बंध, व्युच्छित्ति, उदय, अनुदय, भाव, ध्यान, योग, कषाय, कर्म, सत्, संख्या' इत्यादि प्ररूपणांद्वारा, विस्तारपूर्वक केले गेले आहे. त्या अंत्यत विस्तृत विस्तारभयाने, ते सर्व वर्णन, मात्र ओळखरूपाने, स्थूलपणे', कथनाचा प्रयत्न केला आहे. 'गुणस्थान' विषयाचा सूक्ष्म अभ्यास व चिंतनातून, प्रकाशित 'पुरुषार्थाचा विकास,' निदर्शनास आणला आहे.

## पुरुषार्थाचा विकास क्रम :

१) ह्या अनादि संसारात भ्रमण करणाऱ्या जीवाला, 'स्व' ओळख करून देण्यासाठी, 'गुणस्थान, जीवसमास, पर्याप्ति, प्राण, संज्ञा, उपयोग, मार्गणा, अशा २० प्ररूपणा' कथन केल्या जातात. ह्यातील कथन 'परद्रव्यांच्या' अपेक्षेने केले जाते, त्याचबरोबर 'जीव अवस्थांचे' वर्णनही केले जाते. ह्या उपदेशाने 'परद्रव्य, निमित्त, विभिन्न पर्यायांचे यथार्थ' ज्ञान होते. 'धर्म वा मोक्ष' प्रगटीकरणाचे कार्य पर्यायतच होते. त्यामुळे 'पर्यायांवर दृढ श्रद्धा, सम्यक्‌उपदेश, संयोगाचे यथार्थ ज्ञान', जीवाच्या 'पुरुषार्थाच्या विकासात' महत्त्वाचे घटक ठरतात. 'गुणस्थानांद्वारे' ह्या सर्व विषयांचे होणारे सम्यग्ज्ञान, पुढच्या 'सम्यग्चरित्रांचा प्रारंभच' आहे.

२) 'गुणस्थान' जीवाला 'स्व' ची ओळख करवून देण्याचे कार्य करतात. वास्तविक जीवाच्या प्रत्येक समयाच्या 'ज्ञानाची पर्याय', त्याच्याच 'द्रव्य-क्षेत्र इत्यादित व सर्व प्रदेशांमध्ये' होते. अनादिपासूनची 'पराकडे' दृष्टी असल्याने,'ज्ञेयातून ज्ञान' होते, अशीच मान्यता होती,'श्रद्धा सम्यक्' झाल्यानंतरही, 'देव-शास्त्र-गुरुत , वा उपदेशात, उपयोग परद्रव्याकडे लावण्यात, शिकणे-शिकविणे', इत्यादितच 'कर्तृत्व व कर्तव्य' बुद्धीत, अडकून पडण्याचा धोकाच जास्त असतो. 'गुणस्थानांच्या' सम्यक् ज्ञानाने, 'स्व-प्राप्तीत, वा ज्ञानात, वा श्रद्धेत,' कोणत्याही

'परद्रव्य-इंद्रिय वा कर्मांची' गरज नाही, हे स्पष्ट होते आणि, 'आत्मोन्नतीचा खरा पुरुषार्थ' सुरू होतो.

♦ ३) 'गुणस्थान' म्हणजे जीवांच्या, 'पर्यायांची-अवस्थांची' स्थानेच आहेत. हे पर्यायांचे भेदही मात्र, 'श्रद्धा व चारित्र' गुणांच्या पर्यायानुसारच आहेत. ह्या 'गुणस्थानांपैकी एक, चार, पाच, सहा, सात, तेरा,' ह्या गुणस्थानांमध्ये जीव असतातच. त्यापैकी 'चार, पाच, सहा, सात' ही मोक्षमार्गाची गुणस्थाने आहेत. १३ वे गुणस्थान 'अरिहंत' अवस्थेतील आहे. ह्या 'गुणस्थानांचा, सर्वज्ञांचा, मोक्षमार्गाचा, धर्म प्रगट करणाऱ्या जीवांचा,' एक समयमात्रदेखील लोप होत नाही. हे कथन, 'जीवद्रव्याचा अविनाशीपणा, मोक्षतत्त्वाची खात्री, अरिहंताचे अस्तित्व' ह्यावर शिक्कामोर्तबच करणारे सिद्ध होते. ही 'खात्री, विश्वास' उत्पन्न करून, 'आत्मसन्मुखतेकडील 'पुरुषार्थाची' सुरवातच ठरते.

४) ''गुणस्थान चर्चा, व्यवहार-निश्चयातील संतुलन राखणारी, त्यांचे मर्म सांगून सम्यक् समन्वय, साधणारी, निमित्त-उपादान वा नियति-पुरुषार्थाबाबतच्या, मिथ्या मान्यतांना दूर करणारी आहे.''

अनादिकाळापासून 'मिथ्यात्व' गुणस्थानात असणारा जीव, 'सम्यक् अभिप्रायाने', यथार्थ ज्ञानाने, अंतरंग विशुद्धीने, 'पुरुषार्थाचा क्रमिक विकास' करू शकतो. 'गुणस्थानांच्या' ज्ञानाने, पुनश्च एकदा 'मनुष्यगतीची, पर्याप्तक, संज्ञीत्व, पंचोद्रियत्व', ह्या सर्वप्राप्तींची 'श्रेष्ठता', अधिकच दृढ होते. योग्य 'तत्त्वनिर्णय व उपयोगाने कषायांची मंदता, व्रतग्रहण, सदाचार, स्वज्ञानाची रुचि, आत्मचिंतनाने', पंचलब्धींची प्राप्ती होते. 'आत्मतत्त्वाचे महात्म्य व उपयोगाची स्वसन्मुखता' सम्यग्दर्शनाच्या प्राप्तीचे कारण ठरतात. संसार वृद्धीसाठी होणारा, 'मिथ्यापुरुषार्थ' आता, मोक्षप्राप्तीच्या दिशेने होणारा, 'सम्यकपुरुषार्थ' ठरतो. आत्म्याची सम्यक्रुचि 'केले पाहिजे वा करेने,' ह्या विकल्पातून सोडवणारी ठरते, आणि आतली 'स्व' कडचीवाटचाल सुरू होते.

५) जैन दर्शन 'द्रव्य-भावरूपाने' कथन करणारे, 'अनेकांतवादी' दर्शन आहे. त्यामुळेच प्रत्येक 'गुणस्थानाचा', बाह्य वेष आवश्यक मानला. ही 'स्वरूप प्राप्तीची ओढ', उदासीनता वाढवून, सहजपणे 'व्रत ग्रहणाकडे' वळवणारी ठरते. 'बुद्धिपूर्वक अणुव्रते' वा 'शक्तिनुसार मुनीदीक्षा,' ग्रहण करणे आवश्यकच असते.'प्रमाद, शुभोपयोग, धर्मध्यान' असले तरी, 'स्व' अस्तित्वाचे 'सम्यक्भान व जाण' असल्याने सतत जागृक राहण्याचा 'पुरुषार्थ' घडू लागतो.

♦ ६) आध्यात्माचा अभ्यास 'विवेक जागृत ठेवून करण्याचा', उपदेश आचार्य देतात. ह्या गुणस्थानात, 'चतुर्थ व पंचम' गुणस्थान श्रावकांचे सांगितले आहेत. ह्या अभ्यासाने, प्रत्येक जीवांचे, 'गुणस्थानातील आचारविचार' स्पष्ट होतात. 'अंतरंगातील परिणाम-भाव विशुद्धीने', वरची 'गुणस्थाने' होतात, तसतसे 'आचरणही' बदलत जाते. ह्या आचरणावरून 'स्व' परिणामांची परीक्षा करण्यास मदत होवू शकते. आपल्या 'स्थानाचे, भावांचे' यथार्थ ज्ञान होवू शकते. ही 'जागृकता', पुढच्या गुणस्थानासाठीचा 'पुरुषार्थ' ठरू शकते.

७) 'मोक्षमार्गाची सुरुवात, मोक्षमार्ग व मोक्ष' हे सर्व 'अंतरंगातच, आत्मस्थिरतेद्वारा' होते. शरीराश्रित क्रिया ह्या, 'परद्रव्यांच्या' क्रिया आहेत. त्यामुळे 'मी व्रत-तप-संयम करते', ह्या 'अहंकार व कर्तृत्व बुद्धीला' दूर करण्यास प्रेरणा मिळते. कारण प्रथम सहा गुणस्थाने 'करणेयोग्य' आहेत, पुढचे 'होणे योग्य' आहेत तर, ११ च्या पुढची गुणस्थाने 'असणेयोग्य' आहेत. आपल्या 'त्रिकाली शुद्ध, ध्रुव आत्म्यात एकत्व, त्याचेच ध्यान, त्यातच स्थिरता, लीनता', ह्या 'पुरुषार्थाने', व्यर्थ 'स्वच्छंदता, अहंकार' दूर होतात आणि सहजी 'बाह्य आचरण' घडत जाते, कारण 'बाह्य विशिष्ट आचरणांशिवाय गुणस्थान' असू शकत नाही. प्रथम सहा गुणस्थानांपर्यंत होणारा 'बुद्धिपूर्वक' हा प्रयास, जागरूक 'पुरुषार्थाचा' सूचकच म्हणावा लागेल.

८) अंतरंगातील 'वीतरागता वा गुणस्थान', बाह्यतः जाणली जावू शकत नाही. 'परिणाम' प्रतिक्षण बदलत राहातात. एकमात्र निश्चित आहे की, ही 'वीतरागता वा सर्वज्ञता' जीव द्रव्यात विद्यमान आहेच. तो 'स्वभाव आहे, स्वयंसिद्ध आहे, परिपूर्ण आहे. असहाय आहे, अमर्यादित व असीम, आहे'. फक्त त्या स्वभावाला 'पाहण्याची जाणण्याची व प्रगट करण्याची' आवश्यकता आहे. सुरुवातीला 'प्रयत्नपूर्वक, बुद्धिपूवर्क, अनुशासनपूर्वक, व्रतादिंचे पालनाने, ध्यानाने, श्रद्धा व विश्वासानेच,' मार्गाची सुरुवात हे महत्त्वाचे ठरते. पुढे हीच 'स्वयमेव स्थिरता, एकाग्रता', पुरुषार्थाचा विकास घडविणार ह्यात शंका नाही.

♦ ९) आगमात हे वर्णन, ''मोहनीय कर्म अपेक्षेने, योग, विरताविरत, ज्ञान-अज्ञान, अल्पज्ञ-सर्वज्ञ, श्रावक-मुनी, प्रमत्त-अप्रमत्त, श्रेणी,-उपयोग, राग-वीतराग, सुख-दुःख, बहिरात्मा अंतरात्मा-परमात्मा, अशुभ-शुभ-शुद्धोपयोग, धार्मिक-अधार्मिक, चारित्र, ध्यान'', इत्यादि विवक्षांनी इतक्या समग्रपणे केले आहे की, 'गुणस्थानांचे' वर्णन हाच 'जैनांचा, वैशिष्ट्यपूर्ण-वेगळा पुरुषार्थच' ठरला आहे. अशा ह्या 'गुणस्थानांचे' सम्यगज्ञान, जीवाच्या 'पुरुषार्थाचा क्रमिक विकास', ठरणारच ह्यात शंकाच नाही.

ह्या 'गुणस्थानातील', व्युच्छित्तींचे वर्णन, 'संवर-निर्जरा' स्पष्ट करणारे आहे. 'निमित्तांचे सम्यग्ज्ञान, उपादानावर दृढ श्रद्धान व त्याचेच आलंबन, सम्यक् नियतीचा स्वीकार', करून, 'पुरुषार्थाचा' विकास प्रकर्षाने अधोरेखित झाला आहे. किंबहुना 'गुणस्थानांचे' हे वर्णन 'नियति-पुरुषार्थ, उपादन-निमित्त'ह्या विषयांना नवी दृष्टी देणारे, व 'सम्यक् समन्वय' साधणारे आहे.

## ४) 'पुरुषार्थाचा' परमोत्कर्ष 'ध्यान' :-

**प्रस्तावना :**

भारतीय परंपरा, 'आध्यात्मिक' परंपरा असून, आत्मकल्याणाला' महत्त्व देणारी आहे. ह्या कल्याणाचा मार्गही, सर्वच, परंपरांनी सांगितला आहे. त्यासाठी 'भक्ती मंत्र, जप, तप, यज्ञ-याग,' अशी विविध साधने सांगितली आहेत. ह्या साधनांमधे 'ध्यान', ह्या साधनाचा स्वीकार सर्वच परंपरांनी केला आहे. आपाआपल्या वैचारिक मंथनातून, त्याचे स्वरूपही कथन केले गेले. 'पतंजलीचे योगसूत्र, भगवद्गीता, गौतमबुद्धांची विपश्यना', अन्यही अनेक 'ध्यान' पद्धती आढळतात. जैनांनी ही 'मोक्ष पुरुषार्थाच्या' साधनांमधे, 'ध्यानाला' स्थान दिलेले दिसते. मात्र 'आर्त-रौद्र' ध्यानांचा 'विचार, व विश्लेषण', हे जैनांशिवाय इतर दर्शनात केलेले आढळत नाही. जैनांनी 'ध्यान' ह्या विषयाचे, 'सूक्ष्म व सविस्तर वर्णन तर केलेच, पण त्यासह त्यांचे 'स्वामी, स्थान, महत्त्व, फळ' इत्यादींचे, 'गुणस्थानानुसार' वर्णनही केले. कोणत्याही विषयाचा विचार, 'स्थूलाकडून-सूक्ष्माकडे, व्यवहारातून-निश्चयाकडे', परिपूर्ण पद्धतीने, करण्याची पद्धती, इतरत्र आढळत नाही. 'ध्यान' विषयाच्या समग्र वर्णनाच्या, सूक्ष्म अभ्यास व चिंतनातून, 'पुरुषार्थ' निदर्शनास आणले आहे.

* ध्यानाचे लक्षण उमा स्वामींनी (त.सू.९/२७) केलेले दिसते.

''उत्तमसंहननस्यैकाग्रचिन्तानिरोधो ध्यानमाऽन्तमुर्हूर्तात''

* सर्वार्थसिद्धिनुसार (९/२०/८), ''चित्तविक्षेपत्यागो ध्यानम्'' असे स्वरूप सांगितले आहे.

* द्रव्यसंग्रहातील 'ध्यानाचे' स्वरूप,'निश्चयनयविवक्षेने' केलेले आहे.

''मा मुज्जह मा रज्जह मा दूसह इट्ठणिट्ठअट्ठेसु।थिरमिच्छहि जइ चित्तं विचित्तझाणप्पसिद्धीए'' ।।४८।।

''मा चिट्ठह मा जंपह मा चिंतह किंवि जेण होइ थिरो । अप्पा अप्पाम्मि रओ इणमेव परं हवे ज्झाणं ।।५६।।

अशाप्रकारे 'एकाग्रचिन्तानिरोध विवक्षेने, निश्चय व्यवहार अपेक्षेने, 'ध्यानाचे स्वरूप सांगितले आहे. ह्या अत्यंत महत्त्वाच्या विषयाचा ऊहापोह, अत्यंत विस्ताराने केला गेला आहे.

**विषयविस्तार :**

आगमात 'एकाग्रतेला' 'ध्यान' म्हटले आहे. 'ध्यान' ऐहिक फळासाठीही केले जाते. परंतु जैन दर्शनाने त्या ध्यांनाना, 'अप्रशस्त' म्हटले आहे. 'मोक्षप्राप्तिसाठी' केलेला ध्यानांना 'प्रशस्त' म्हटले आहे. 'ध्यान' अधिकारात ' ध्यान, ध्याता, ध्येय, ध्यानफळ', ह्या चार गोष्टींचा विचार केलेला दिसतो.

* आचार्यांनी 'ध्यानाचे', सामान्य 'लक्षण-भेद' कथन केले आहे. ह्या भेदांमध्ये 'प्रशस्त-अप्रशस्त, आर्त-रौद्र इत्यादि, शुद्ध ध्यान', 'अशा प्रकारे वर्णन केले आहे[६३]. 'ध्यानाचे'

वैशिष्ट्य सांगतांना[६४], ''ध्यान व योगांचे अंग निर्देश केला आहे. ध्यानाचा 'काळ, स्थिति, सांगून, ध्यान व ज्ञानातील कथंचित् भेदाभेदता' स्पष्ट केली आहे. ध्यानाने 'कार्यसिद्धी' सांगितली आहे. 'पारमार्थिक ध्यानाचे' महत्त्व सांगून, ध्यानात सर्व प्रकारच्या धर्मांचा समावेश मानला आहे.'' असा विस्तार केला आहे.

* 'ध्यानाची' विधि व सामग्री सांगतांना[६५], ''द्रव्य-क्षेत्र इत्यादि व त्यातील उत्कृष्टता, सांगून, ध्यानाची कोणतीही निश्चित वेळ नसल्याचे नमूद केले आहे. उपयोगाच्या स्थिरतेनुसार स्थान सांगितले, ध्यानाची सामान्य विधि सांगून'' विषय विस्तार केला आहे.

* 'ध्यानाच्या' तन्मयतेबाबत आचार्य म्हणतात की[६६], ''ध्याता ध्यानभावासह तन्मय होतो. ज्या प्रकारे परिणमन केले जाते. त्यावेळी तसाच आत्मा बनतो. आत्मा ध्येयासह समरस होतो. अरिहंताचे ध्यान करणारा स्वयं अरिंहत होतो.''

* जैन दर्शनाने 'ध्यानाचे' चार प्रकार सांगितले. 'आर्त-रौद्र-धर्म-शुक्ल' ह्या भेदांचेही सविस्तर वर्णन केले आहे. त्या विषयांचा स्थूल आढावा देवून, एकत्रितपणे 'पुरुषार्थ' निदर्शनास आणला आहे.

**१) आर्तध्यान :**

'ध्यान' हा शब्द, पारमार्थिक 'योग व समाधि', अर्थात प्रयुक्त केला जातो. परंतु कोणत्याही 'शुभाशुभ परिणामांची एकाग्रता' ध्यानच आहे. जीवाच्या 'पारमार्थिक अधःपतनाला' कारण व 'व्यवहाराने अधोगतीला', कारण असणाऱ्या ध्यानाला 'आर्त' म्हटले जाते. हा 'आर्त' शब्द 'ऋत' म्हणजे दुःख व 'अर्ति' म्हणजे पीडा देणे, ह्या पासून बनला आहे.

* आगमात ह्या 'ध्यानाचे' लक्षण-भेद देवून[६७], भेदांचेही लक्षण, स्वरूप स्पष्ट केले आहे. 'इष्टवियोग, अनिष्ट संयोग, वेदनाजनित, निदान', हे भेद आहेत आर्तध्यानाचा निर्देश[६८], 'भाव, लेश्या, फळ, अंतर, त्याचे स्वामी, व बाह्य चिहन,' सांगून केला गेला आहे.

**२) रौद्रध्यान :**

हिंसा इत्यादि पाप कार्य करून, त्याबद्दल 'अभिमान बाळगणे, गर्व करणे', अशा 'भावाला रौद्रध्यान' म्हटले जाते. हे 'ध्यान' म्हणूनच, खूपच अनिष्टकारी मानले गेले आहे.

* आचार्यांनी सामान्य लक्षण-भेद सांगून[६९], 'रौद्र' म्हणजे क्रूर वा जो जीवाला रडविणारा भाव आहे तो, 'रौद्ररूप' मानला आहे. ह्या ध्यानाचे,' हिंसानंद, मृषानंद, स्तेयानंद, परिग्रहानंद, असे भेद सांगितले आहे. ह्या भेद-प्रभेदांचे लक्षण सांगून, 'रौद्रध्यानाचे' बाह्य चिहन सांगितले. ह्या 'ध्यानात' असणारे, 'भाव-लेश्या, गुणस्थान' सांगून, फळाचे' वर्णन केले आहे.

### ३) धर्मस्थान :-

मनाची एकाग्रता 'ध्यान' होय. प्रतिक्षण 'मन' कोणत्यातरी विषयावर स्थिर होते, परंतु हे 'राग-द्वेषमूलक' ध्यान अनिष्ट मानले आहेत. ''साम्यतेचा अभ्यास करण्यासाठी, ज्याचे ध्यान केले जाते, त्याला 'धर्मध्यान' म्हणतात''. धर्मध्यानही 'बाह्य व आध्यात्मिक' दोन प्रकारे सांगितले आहे. 'मानसिक चिंतनरूप ध्यानाला 'आध्यात्मिक' म्हटले आहे'. ह्या 'ध्यानाचे' आज्ञा, अपाय इत्यादि भेद आहेत. ह्या सर्वांचा अंतर्भाव 'व्यवहार-निश्चयात' केला जातो. 'आज्ञा, अपाय, विपाक', हे तीन परावलंबी ध्यान असल्याने, 'व्यवहार' म्हटले जातात. संस्थान विषयाचे,'पिंडस्थ, पदस्थ, रूपस्थ, रूपातीत', हे चार भेद आहेत.

* आगमात 'धर्मध्यानाचे' सामान्य लक्षण[७०], ''धर्मानियुक्त ध्यान, शास्त्र, स्वाध्याय, तत्त्वचिंतन, रत्नत्रय, संयमात चित्ताची स्थिरता, परमेष्ठी भक्ती' इत्यादी विवक्षांनी केले गेले आहे. 'धर्मध्यानाचे' चिन्ह व योग्य सामग्रीही नमूद केली आहे.

* 'धर्मध्यानाचे' चार भेद असून,'आध्यात्मिक' धर्मध्यानाचे 'दहाभेद' आहेत. त्याच बरोबर 'मुख्य उपचार, उत्कृष्ट-मध्यम-जघन्य, व्यवहार-निश्चय', असेही भेद कथन केले आहे. सर्व भेदांचा विस्तार, लक्षण इत्यादि देवून केला आहे.

* 'संस्थान विचय' धर्मध्यानाच्या भेदांपैकी, 'पदस्थ,पिंडस्थ,रूपस्थ ' हे ध्यान, 'धर्मध्यानात' गर्भित असून, 'रूपातीत ध्यान निर्विकल्प असल्याने, 'शुक्लध्यानरूप' मानले जाते.''

* 'धर्मध्यानाच्या' निर्देशात[७१], 'विषय परिवर्तन, भाव, लेश्या, स्वामी, गुणस्थान' इत्यादींचा विचार केला आहे.

* 'धर्मध्यान व अनुप्रेक्षा' यातील अंतर स्पष्ट केले आहे[७२]. 'धर्मध्यान' आधेय असून, 'अनुप्रेक्षा' त्याचा आधार आहे. दोन्ही 'ज्ञानप्रवृत्तीचे विकल्प' मानले आहेत. 'अनित्य' इत्यादि विषयात, वारंवार 'चिंतनधारा जाणे, ज्ञानरूप होणे', ही 'भावना असून, जेव्हा त्यात 'एकाग्रचिंता निरोध' होवून, चिंतनधारा केंद्रित होते, ते 'ध्यान' होय. 'अनुप्रेक्षांच्या' अंतर्भाव 'अपायविचय' धर्मध्यानात केला जातो. 'जपजाप' इत्यादींना 'ध्यानाचा' दर्जा दिला नाही.

* 'धर्मध्यानाचे' फळ 'पुण्य व मोक्ष' सांगून, त्यांचा समन्वय साधला आहे[७३]. 'धर्मध्यानाने' अतिशय पुण्याची प्राप्ती होते. ह्या ध्यानाने 'संवर-निर्जरा' होत असल्याने, कर्मांचा 'क्षय' होतो. त्यामुळे हे परंपरेने 'मोक्षाचे' कारण मानले जाते. मात्र चरमशरीर असणाऱ्यांना 'मोक्षप्रदायक' आहे.

* पंचमकाळातही 'धर्मध्यानाची' सार्थकता वर्णन केली आहे[७४]. ह्या काळात 'मोक्ष' नाही तरी, 'ध्यानाचा' सर्वथा अभाव नाही. ह्या काळातही 'धर्मध्यान' अवश्य होवू शकते व कथंचित्

'आध्यात्मध्यान' ही होवू शकते.

* 'निश्चय-व्यवहार' धर्मध्यान वर्णनात[७५], 'निश्चय धर्मध्यानाचे लक्षण, त्याची सार्थकता, सांगितली आहे. व्यवहार धर्मध्यानाचेही लक्षण सांगून, कथंचित्. 'अज्ञान' म्हटले आहे. मात्र, त्याला 'निश्चयध्यानाचे साधन' माणून, दोन्ही ध्यानातील साध्य-साधक रूप समन्वय साधला आहे''.

**४) शुक्लध्यान :-**

'ध्यान' करणाऱ्या साधूला जेव्हा, 'बुद्धिपूर्वक राग' समाप्त होतो, त्यानंतर 'निर्विकल्प समाधि' प्रगट होते, त्याला 'शुक्लध्यान वा रूपातीत' ध्यान म्हणतात. ह्यातही 'उत्तरोत्तर वृद्धिंगत होणाऱ्या चारश्रेणी आहेत. प्रथम श्रेणीत, 'अबुद्धिपूर्वकच, ज्ञानात ज्ञेय पदार्थांची व योगप्रवृत्तींची संक्रांति होते'. पुढच्या श्रेणीत संक्रांति नसते, निष्कंपावस्था असते.

* आचार्यांनी ह्या 'ध्यानाचे' लक्षण सांगितले आहे[७६]. ''निष्क्रिय, इंद्रियातीत, अंतर्मुख, शुचिगुणयुक्त, निर्मल, विकल्पमुक्त, अविचल, स्वसंवदेन'', अशा लक्षणांनी हे 'शुक्लध्यान' युक्त असते.

* ह्या शुक्लध्यानाचे[७७], 'पृथक्त्ववितर्कवीचार, एकत्ववितर्कअवीचार, सूक्ष्मक्रियाप्रतिपाती, समुच्छिन्नक्रियानिवृत्ति' असे भेद आहेत. ह्यातही 'बाह्य व आध्यात्मिक' शुक्लध्यान सांगितले आहे. ह्या सर्व भेदांचे सविस्तर वर्णन केले गेले आहे.

* ह्या 'शुक्लध्यानाच्या' निर्देशात[७८], ''श्वासोच्छवासाचा निरोध, पृथक्त्ववितर्क ध्यानातील प्रतिपानीपना, एकत्ववितर्क ध्यानातील प्रतिपाताचा विधि-निषेध, चारही ध्यानातील अंतर, भाव, लेश्या,'' इत्यादींचा ऊहापोह केला आहे.

''शुक्लध्यानाचे' स्वामी व त्याचे फळ सांगितले आहे[७९].'' स्त्रीयांना शुक्लध्यान होण्याचा निषेध केला गेला आहे. 'पृथक्त्ववितर्क' ह्या ध्यानाने 'संवर-निर्जरा व अमरसुखाची' प्राप्ती होते. तीन 'घातिकर्मांचा नाश' करणे, हे 'एकत्ववितर्क' ध्यानाचे फळ आहे.''

अशाप्रकारे 'चार प्रकारचे ध्यान, त्यांचे भेद, प्रभेद यांचा, लक्षण इत्यादि देवून', अत्यंत, सविस्तर वर्णन केले गेले आहे. ते विस्तृतविवेचन अत्यंत स्थूलपणे सांगून, 'पुरुषार्थ' प्रकर्षाने अधोरेखित केला आहे.

**पुरुषार्थाचा परमोत्कर्ष :-**

१) वस्तुतः श्रमण परंपरा, 'ध्यान-योग-साधना' ह्यांच्या आधारावर स्थित आहे. ह्याचा पुरावा म्हणून, 'ध्यानमग्न, प्रशांतमुद्रा, नासाग्रदृष्टी, वीतरागभावाने ओतप्रोत, तीर्थंकरांच्या ध्यानस्थ मुद्रांकडे', दिशानिर्देश करता येईल. मात्र काही शताब्दिंपासून, ह्या निवृत्तिप्रधान 'योग, ध्यान,

तपप्रधान' जैनधर्मातही वाढलेली 'क्रियाकांडाची प्रधानता', खेदजनक म्हणता येईल. ह्या मूळ 'ध्यान पद्धतीवर, काळानुरूप चिंतन, प्रयोग न झाल्याने', ह्याचे श्रेय इतर परंपरांकडे गेलेले स्पष्टच आहे.

♦ २) जैन परंपरेनुसार 'ध्यानाचा अर्थ चिंतनाचे सातत्य' असा आहे. 'चिंतनाची निरंतरता वा एकाच पदार्थावर' त्याचे टिकून राहणे, 'ध्यान' म्हटले जाते. 'ध्यान' हा 'प्रायोगिक' विषय आहे, जो व्यक्ति, आपल्या 'क्षमता, प्रवृत्ति, देश-काल-भाव' इत्यादिनुसार करू शकतो वा विकसित करू शकतो. ह्या 'ध्यानाचे' लक्ष्य मात्र, 'आध्यत्मिक विकासाद्वारे मोक्ष प्राप्ती' हाच आहे. हे उद्दिष्टच 'पुरुषार्थ' सूचक आहे.

३) प्रतिक्षण 'चिंतन, हे एका विषयावरून दुसऱ्यावर परावर्तित होतच असते. 'अशुभावरून शुभावर' चिंतन सतत होतच राहते. प्रत्येक कार्यातील 'सजगता, सावधानता, जागरूकता', 'ध्यानच' आहे. ह्या नित्य होणाऱ्या 'ध्यानात' प्रयास, प्रयत्न असतो, हे 'बुद्धिपूर्वक' घडते, ह्यावेळी 'उपयोग' योग्य अशा विषयावर लावणे, हा 'पुरुषार्थ' ठरेल.

४) मोक्षप्राप्तीसाठी 'संवर व निर्जरा' ही उपादेय मानली जाते. ह्यामधे 'तप' साधनेचे अत्यंत महत्त्व आहे. त्यात तपाच्या 'बाह्य व अंतरंग' दोन्ही रूपांचे विधान आहे. ह्या सर्वांसाठी 'ध्यानतप' सर्वोत्कृष्ट म्हटले जाते. तपविवेचनात 'ध्यानाला' शेवटी ठेवले. कारण, 'ध्यानाने' सर्व तपांची परिपूर्णता होते. 'ध्यानाशिवाय तप साधना', अपूर्णच म्हणावी लागेल. आचार्यांनी तर, तपाच्या कोटीतले 'धर्म व शुक्ल-ध्यानच' म्हटले आहे. अन्य तपांना 'ध्यानाचे साधन' म्हटले आहे. त्यामुळे 'तप' हे 'पुरुषार्थाचे' प्रथम साधन आणि 'ध्यान' म्हणजे 'पुरुषार्थाचा' उत्कर्ष, हे अधिकच स्पष्ट होते.

५) 'मोक्षप्राप्तीच्या' ह्या साधनांमध्ये, रत्नत्रयापासून सुरुवात होते. ह्याची पूर्णता 'चारित्राच्या' उत्कृष्टतेने होते. 'चारित्राच्या' ह्या उत्कर्षात क्रमाने, 'आवश्यके, व्रते, तप' इत्यादि पालनाने, मार्गक्रमण सुरू होते. विविध 'तपपालनाने', शरीर, मनाची तयारी होते. त्यानंतरच पुढच्या 'ध्यान'रूपी पुरुषार्थाचा उत्कर्ष' होवू शकतो. 'ध्यान साधनेत', मनाच्या चंचलतेचा निरोध खूपच आवश्यक असतो, कारण त्याशिवाय 'ध्यान' शक्य नाही. ही तयारी 'तपांद्वारा' होते. रत्नत्रयापासून सुरू झालेला हा 'पुरुषार्थाचा' प्रवास, 'ध्यानरूपी' ध्येयावर पूर्ण होतो.

♦ ६) मोक्षमार्गात 'ज्ञान, ध्यान, तपाचे' महत्त्व, निर्विवादपणे स्पष्ट आहे. 'ज्ञानासाठी' ज्ञानावरणीय कर्माचा क्षयोपशम, 'तपासाठी' शारीरिक बळ तर, 'ध्यानासाठी' मानसिक, शारीरिक सामर्थ्याची आवश्यकता असते. 'ज्ञान' हे व्यग्र असते तर, 'ध्यान हे एकाग्र असते, एकमुखी, स्थिर, चिंतारहीत', असते. 'ध्यानाचे' हे स्वरूपच, ध्यानातील 'पुरुषार्थ' अधोरेखित करणारे आहे.

७) संसारदशेतही 'लौकिक, अर्थिक, ऐहिक', सर्वच गरजांच्या 'पूर्तीत, उत्कर्षात, यशात, एकाग्रता, ध्यान', आवश्यकच आहे. फक्त त्या ध्यानाची, 'दशा व दिशा' विपरीत असल्याने, ते 'आर्त-रौद्र' ठरते. संसारदशेतील 'मोहदशा, आसक्ति, ममत्वाने', सततच 'आर्तध्यान' घडते. 'हिंसावृत्ती, त्यातील आनंद, व्यर्थ परिग्रहसंचय, असत्याचा प्रयोग, दुसऱ्यांचे श्रेय लाटणे', इत्यादिरूप 'रौद्रध्यान' ही अहोरात्र होतच असते. 'प्रतिष्ठा, मान, लोकेषणा,' ह्या भोवती फिरणात्या ह्या व्यग्र मनाला,'प्रयत्नपूर्वक धर्मध्यानात' लावणे, हा कठीण 'पुरुषार्थ' म्हणावा लागेल.

♦ ८) प्रतिक्षण कर्मांचा 'उदय' होत राहतो. प्रतिक्षण 'परिणाम' हे बदलत राहतात. सांसारिक व्यग्रतांमुळे 'अशुभध्यानच' अधिक घडते. अशावेळी प्रतिक्षण 'परिणामांचे परीक्षण, निरीक्षण,' हा श्रावकदशेतला मोठा 'पुरुषार्थ' होय. आध्यात्मिक उत्कर्षासाठी, 'ध्यान' एक दिव्य रसायनच आहे. कारण 'कर्मांची प्रबळता, नियतीची कठोरता, जीवाची दैवाधीनता,' ही प्रखर आहे. मात्र ह्याहीपेक्षा 'स्व द्रव्यावर, शक्तींवर, सामर्थ्यावर, उपादानावर, स्वभावावरचा, दृढ विश्वासच पुरुषार्थ' आहे. कर्मप्रबळतेला बदलण्याचे सामर्थ्य 'पुरुषार्थात' आहे, आणि 'ध्यान' हे 'पुरुषार्थाचा उत्कर्ष आहे. द्रव्याचे परिणमन, 'स्व' द्रव्य-क्षेत्र इत्यादितच होते. जीव 'ज्याचे ध्यान करणार तसा होणार' हा तर सिद्धांतच आहे. प्रश्न फक्त 'काय व्हायचे' ह्या निर्णयाचा आहे. कारण समयसारातही कुंदकुंद म्हणतात की, '(१८६)

''सुद्धं तु वियाणंतो सुद्धं चेवप्पयं लहदि जीवो । जाणंतो दु असुद्धं असुद्धमेवप्पयं लहदि ।।''

♦ ९) जैन दर्शनात आचारमार्गात दोन स्वतंत्र भाग दिसतात. साधूंचा मार्ग तर, 'पुरुषार्थाचे' दृश्य रूपच आहे.श्रावकांना 'छोटे छोटे नियम, व्रत, सामायिक, प्रतिक्रमण' इत्यादि रूपाने, 'पुरुषार्थाची' संधी दिली. 'ध्यानरूपाने' तर, मोक्षाचा मार्ग, श्रावकांनाही खुला असल्याची खात्री दिली. व्रत, तपामधे 'कृती' प्रमुख ठरते, जी 'दुःखदायी, कष्टदायी व अवघड' वाटते. त्यामानाने 'ध्यानात कृती' नसल्याने, श्रावकदृष्टीने थोडे सोपे ठरू शकते. अर्थात 'चंचल मनाला जिंकण्याचे', दिव्य कर्म तेथे आहेच आणि हाच 'पुरुषार्थ' आहे. कारण 'ध्यान, मनाने' होते. 'चित्ताचा निरोध ध्यान' आहे म्हणून, 'गुणस्थानांमधे' जीव जसजसा 'स्व' सन्मुख होवून, 'मनाचा निग्रह' करू लागतो, तसतसा'ध्यानाचा दर्जा' उत्तम होवू लागतो. 'अंतर्मुखता, आत्मस्थिरता, 'स्व' चे आलंबन', ह्या 'पुरुषार्थाच्या उत्कर्षाने', गुणस्थानात उर्ध्वगमन होते. पंचमकाळात मोक्षप्रदायी 'शुक्लध्यान' नसले तरी, 'धर्मध्यान' आहे जो परंपरेने मोक्षप्रद नेणारा आहे. कारण 'मोक्ष' शरीराने होत नाही, 'शरीराने, मनाच्या सहाय्याने,' ध्यानरूपी साधना होते. मोक्षमार्ग 'मनाने' होतो, म्हणूनच 'भावश्रुताने' मोक्ष होतो. 'क्रिया बरोबर करणे वा सांगणे', ह्याने मोक्ष नाही तर, 'परिणाम बरोबर झाली की, मोक्ष होतो'. ह्या परिणामांना बरोबर करण्याचे' काम ह्या, 'ध्यानरूपी पुरुषार्थाने होते.

# उपविभाग ३

## (१ ते ४ संदर्भ-सूची)

१) स.सि.१/७/४, १/१/३, रा. वा. ३/३६/२ २०१/१२, १३, चा. पा. १८
घ. १/१, १,१४४/ गा.२१२/३९५, ध १/१,१३३/३८४/४
२) रा. वा. ६/२४/१/५२९/६, र. क.श्रा. २१, त.सू. ७/२३
३) पं. का. ता. वृ. १६०/१२, पं.ध.उ. ३८८, ३७५-४००
४) पं.ध.उ. ३८६-४१३, ८५२,८७५,९००-९१८
५) मो.पा.३९, ८८, बो.पा. २१, भा.पा. १४४, र.सा. ४७,९०५४,१८५
६) मो.पा. ३८, ९०, नि.सा.५, त.सू. १/२, ३, पं.का. १०७
७) स.सा.आ. ३१४-३१५, द्र.सं.टी. ४१/२, ४५/१०, २२/१, ४०/१०
८) स.सि.१/२/७, प.प्र.टी. २/१७/८, ध. १/१, १,४/१५१/२
९) का.अ. ४२४, स.सा.-१३, प.प्र.टी. २/१३/२
१०) रा.वा. १/२/२९-३१/२२/६,११, द्र.सं.टी. ४१/२,१२,९
११) स.सि.१/१/१, ध. ६/१, ९-८, ४/२१४/५, ६/१, ९, ३०/४३०/९
१२) स. सि. १/१/१, ध. १/१,१,४/१४२/३
१३) स.सि. १/१०/४, क.पा. १/१-१/५४/३
१४) त.सू. १/३०, चा.पा. ३८, प्र.सा.१६०, स.सा. १८१-१८३, ३२३
१५) त.सू. १/९, ३१, गो.जी. ३००-३०१, स.सा. १५५, मो.पा.४१
१६) पु.सि.उ. २१,३२,३६, त.सू.९/२५, १/९, ३१, स.सा. १७-१८, ३१८, द.पा.४
१७) प्र.सा. ८०,८८,१२६,१५४,२३२, मो-पा.-१००, प.प्र.२/८४, १९१
१८) त.सू. ९/१८, द्र. सं.४५, पं. का.१५६-१५६, मो.पा. १००
१९) चा.पा.३, मो.पा.३७,८३, द्र.सं.४०,४६
२०) स.सा.३८६, पु.सि.उ. ३९, त.सू. ९/१८, चा.पा.५
२१) प्र.सा.७, चा.पा.८-९, शी.पा.५, भ.आ.८,१२
२२) स.सा.१८,३४, २७३, मो.पा. ८,१००, चा.पा. ८,३,१०, ध. १/१,४/१४४/४
२३) प.प्र.टी. २/६७, ३/३६, प्र.सा. ७९, नि.सा. १४४, भा.पा.९०
२४) प्र.सा.२०२, मो.पा.२५,६०,प.प्र.टी.२/५२/१,२, ध.६/१, ९-१/३३/४६५/८
२५) र.क.श्रा. ४७-४९, स.सा. २६४, २७०, प्र.सा. २१४, २४०, चा.पा. ९
२६) रा.वा.९/१९/१८/२१/६१९/३१, का.अ.४००, ध.१३/५, ४, २६/५४/१२
२७) मू. आ.३४५, त.सू.९/१९,२०, स.सा. १५२
२८) सा.ध. ७/५०, भ.आ. १४४८, १४-८४, तपोवर्णन, ध. ९/४, १,५/५३/३
२९) मो.पा. ५९,९९, नि.सा. १२४, प.प्र. १९१, ध. १३/५,४,२६/५५/३
३०) मो.पा. ६०,६२, त.सू.९/३, रा.वा.९/१९/२०-२१/६१९/३१
३१) रा.वा.९/३/४-५/५१३ ६/११/१६-२०/५२१/१९
३२) का.अ.४४०-४४१, रा.वा. ९/१९, १२/१८/१७,१८,२०,१६
३३) मू. आ.३५०,३५१, ध-१३/५,४,२६/५६/१, १२
३४) स.सि.९/१९/८, का.अ. ४४५, ध, १३/५, ४,२६/५७/४,६
३५) मू.आ. ३५२, का.अ. ४४६, भ.आ.वि. ४८९/१० (सर्व तपांचे अविचार)
३६) स.सि.९/१९/९, १०, का. अ. ४४७-४४९, भ.आ.२३३-२३८
३७) मू. आ.३५६, का.अ.४५०, ध.१३/५, ४,२६/५७, ५८/४, ६,५,१०
३८) रा.वा.९/२२/१/७,१०,२०, नि.सा.११४-११९ अ.आ.४०६-४१०,५२४-६२१
३९) त.सू.९/२२
४०) का. अ. ४५७-४५८, त.सू.१/२३, भ.आ. ११९-१२६
४१) भा.पा. १०२, ध. ८/३, ४१/८०/८
४२) ढ.पा.-२,१२,१३,२३,२४, सू.पा. १२, भ.आ.१२७, प्र.सा. २६६
४३) र. क.श्रा. ११२, त.सू.५/२४, भ.आ.३०७ ते ३३६, प्र.सा.२५३-२५४
४४) त.सू.९/२६, मू.आ.४०६, ध.८/३,४१/८५/२, १३/५,४,२६/६१/२
४५) त.सू. ९/२५, भ.आ. १०३-११०,२०४६-२०४८, प्र.सा.८६,

२३२-२३७, द.पा.१७, सू.पा.३

४६) पं.सं.प्रा.१/३,४,५, १५-१८, गो.जी. ३/२२, ९-१०/३०

४७) रा.वा. ९/१/१/५८८/८

४८) पं.सं.प्रा. १/६,८,१७०, गो.जी.१८/४२, १७/४१, स.सा. १२९, २१९, २७५

४९) पं.सं. प्रा.१/९, १६८, गो.जी. ६५४, २०/४६

५०) पं.सं.प्रा.१/१०, १६९, गो.जी.६५५, २/४६, २२/४७, २३/४८

५१) पं.सं.प्रा. ११, गो.जी. २९/५८, ध. १/१, १,१२/गा.१११/१७३, १७१/१

५२) पं.सं.प्रा.१।१३४,१३५; गो.जी., ४७६,४६९; ध. १।१,१,१७३।१०; १७४।७,८

५३,५४) पं.सं.प्रा. १।१४; गो.जी. ३२।१६९, ३३।६२,४, ४५।८; ध.१।१,१,१५।११३।१७८, १४।१७५।१०, १७६।१,७

५५) प.सं.प्रा. १।१७-१९; गो.जी.५१-५४; ध. १।१,१,१७।११६-११८, १६।१८०।१,४३

५६) पं.सं.प्रा.१।२०,२१,३८-४०; गो.जी.५६-५७; ध.१।१,१,१७।१८३।११

५७) पं.सं.प्रा. १।२२-२३; गो.जी. ५८-५९; ध.१।१।१,१८।१८७।३

५८) पं.सं.प्रा. १।२४; गो.जी.६१; ध.१।१,११९।१२२।१८९

५९) पं.सं.प्रा.१।२५-२६; गो.जी. ६२; ध. १।१,१,२१।१२३।१९०

६०,६१) पं.सं.प्रा. १।२७-३०; गो.जी. ६३-६५; २४३,२२८; ध. १।१,१,२१।१२४- १२६।१९२, पु. १ पृ.१९१, पु.२ पृ.२२३,

६२) पं.कां. १४६; ज्ञा.३।२७-२८, २५।१७, ३।२९-३९; त.सू. ९।२८

६३) ज्ञा. ४।५, २२१९; ३८।९५-११२; ४०।२-६; त.सू. ९।२६ ; द्र.स. ४७

६४) ज्ञा. ३०।५, १३, ३१।३७,६९; ३३।२-३, ४०/१७-२०; ध. १३/५,४,२६/१९/२८,२९,६७,६८

६५,६६) प्र.सा. ८९; ज्ञा.३९/४१-४३, २१/९-१७, २५/२३-३३; त.सू. ९/३०-३२

६७) ज्ञा. २५/३६-४६; त.सू.-९/३५

६८) ज्ञा. २६/२,३,-३४, ५-१५, ३६-३९; त.सू.-९/३५

६९) ज्ञा. ३/२९, ४१/१५-१, ३१/१ ; भ.आ.१६९३ ते १८९९ गाथांमधून ध्यानवर्णन केले आहे. त्यातच १२ भावनाचिंतन इत्यादि विषय आहेत.

७०) ज्ञा. ६/४, ४/१८,३०, २५/२८, ४१/१४; ध. १३/५, ४, २६/५३ ते ५५/७६; त.सू. ९/३६

७१) ज्ञा.२५/१६; ध. १३/५,४, २६/१२, ७४,७५,८०/१, ८,१३/६४

७२) ज्ञा. २२/१२, ३/३२, ४१/१६, ४२/३; त.सू. ९/२९; ध. १३८/५, ४, २६/५६/७७

७३) प-प्र.टी. १/९७/४; मो.पा.-७६;ज्ञा. ४/३७;

७४) मो.पा.८४; द्र.सं.५५-५६; प्र.सा-१९३-१९४; ज्ञा. २८/१९,३३/२-४

७५) ज्ञा. ४२/४; द्र.सं. ५६; ध. १३/१५, ४,२५/२२,७७/९/२७

७६) त.सू. ९/३६-४४; ज्ञा. ४२/९-११

७७) प.प्र.२/१६२ ; ध.१३/५,४,२६/७८/१०

७८) त.सू. ३७-४०; ज्ञा. ४२/२२,१०; सू.पा. २६; ध.१३ पृ. ७४,७५,७८

# प्रकरण २

# उपविभाग ४

# 'पुरुषार्थाची' प्रेरणास्थाने वा आदर्श :

१) 'तीर्थंकर': आदिनाथ, शांतिनाथ, नेमिनाथ, पार्श्वनाथ, महावीर, ह्यांच्या कार्यक्षेत्रांची 'पुरुषार्थ' दृष्टीने समीक्षा, आणि आगमात उद्धृत अन्य उदाहरणे :

२) श्रुत आराधना

३) गुरु उपदेश

४) धर्म संगति

## ‘तीर्थंकर’: आदिनाथ, शांतिनाथ, नेमिनाथ, पार्श्वनाथ, महावीर, ह्यांच्या कार्यक्षेत्रांची ‘पुरुषार्थ’ दृष्टीने समीक्षा, आणि आगमात उद्‌धृत अन्य उदाहरणे :

### १) तीर्थंकर :

जैन दर्शन ‘निवृत्तिवादी’ दर्शन असून, ‘मोक्षपुरुषार्थाचा’ पुरस्कार करणारे आहे. जैन दर्शन हे ‘नास्तिक’, ‘निरीश्वरवादी’, दर्शन आहे. भारतीय सर्व परंपरांनी, अंतिम लक्ष्य ‘मोक्ष’ मानले, मात्र ह्या प्राप्तीत, ‘विशिष्ट सत्तेचा’ स्वीकार केला गेला. ‘जीवांना’ त्या शक्तीचा ‘अंश’ मानून, त्या अंशाचे मूळ स्वरूपात गमन, ह्याला ‘मोक्ष’ मानले. ह्या गमन प्रक्रियेत, त्या विशिष्ट शक्तीची ‘कृपा, आशीर्वाद, भक्ती’ ही श्रेष्ठ मानली गेली. जैन दर्शनाने, प्रत्येक ‘आत्मा, स्वतंत्र’, परमात्मशक्तीने’ युक्त मानला.

‘स्वावलंबन व व्यक्तिस्वतंत्रता’, ह्यांचे महत्त्व मानणाऱ्या जैन दर्शनाने, त्या ‘परमात्म प्राप्तीच्या’ उद्दमात, कोणाचाही हस्तक्षेप स्वीकारला नाही. जैनांनी ‘उत्सर्पिणी-अवसर्पिणी’ काळ मानले. त्यातील ‘चतुर्थ काळात’ ६३ शलाका पुरुषांची उत्पत्ती सांगितली. ह्यात ‘२४ तीर्थंकर’ हे मुख्य असून, त्यांना ‘धर्माचे प्रवर्तक’ मानले. जैनांनी, ‘विश्व व जैन धर्म’, ह्यांना ‘अनादि’ मानले. ह्या ‘अनादि’ धर्माची पुन: स्थापना, त्या त्या काळातील ‘प्रथम तीर्थंकर’ करतात. अन्य तीर्थंकर, त्याची ‘प्रवर्तना’ करतात. ‘द्रव्य-क्षेत्र-काळ-भावानुरूप’ परिवर्तने केली तरी, मूळ ‘तत्त्व, द्रव्य, आचार, कर्मसिंद्धांत’, इत्यादि कथनात बदल घडत नाहीत. हे सर्व ‘तीर्थंकर’ मनुष्यगतीत जन्म घेवून, सामान्य ‘लोकव्यवहार, कर्तव्यपालन’ करतात. योग्य काळी, त्या ‘मोक्षप्राप्तीचा उद्दम’ करून, ‘परमप्राप्तव्य’ प्राप्त करतात. हा ‘सामान्यातून असामान्यतेकडचा’ प्रवास, ‘प्रथमानुयोगातून’ कथन केला गेला आहे. जैन दर्शन हा ‘गुणपूजक’ आहे. ‘व्यक्तिपूजेला’ जैन दर्शनात स्थान दिले नाही. म्हणूनच ‘आराध्य’ देवतारूपातही, ‘पंचपरमेष्ठी, चा समावेश केला गेला आहे. ह्या ‘अरिहंत’ पदधारींमध्ये ‘तीर्थंकर हे’, हे विशेष ‘पुण्यपात्र’ असतात. अशा काही ‘तीर्थंकरांच्या’, ह्या ‘पुरुषार्थप्रेरक’ कार्यक्षेत्राचा आढावा, ह्या विभागात घेतला आहे. ‘प्रथमानुयोगातून ह्या महान पुरुषांच्या ‘जीवनचारित्र्याचे’’, संपूर्ण विस्तृत विवेचन आहे, जे ‘पुरुषार्थाला प्रेरणा’ देणारे आहे. ह्या ‘साक्षात् पुरुषार्थाच्या’ आदर्शांचा ऊहापोह, स्थूलपणे केला आहे.

आगमानुसार, ‘संसारसागराला स्वयं पार करून, इतरांनाही पार करवणाऱ्या महापुरुषांना, ‘तीर्थंकर’ म्हटले जाते.’ प्रत्येक ‘उत्सर्पिणी, अवसर्पिणी’ काळात हे, २४ तीर्थंकर होतात. त्यांच्या ‘गर्भ, जन्म, तप, केवलज्ञान व मोक्ष’, ह्या पाच महत्त्वाच्या प्रसंगी, विशेष उत्सव साजरे होतात. त्यांना ‘पंचकल्याणक’ म्हटले जाते. आठ कर्मांपैकी, ‘नाम’ कर्मातील, ही ‘तीर्थंकर’

प्रकृती, सर्वात ‘पुण्य’ प्रकृति म्हटली आहे. ह्या ‘पुण्यपदप्राप्तिसाठी’, फक्त ‘मनुष्यभव’ च पात्र मानला आहे. ह्या विषयाचा विस्तार स्थूलपणे दिला आहे.

**कथनक्रम :** आचार्यांनी ‘तीर्थंकरांचे’ लक्षण सांगितले आहे[१]’. काही वैशिष्ट्यांचा ऊहापोह करतांना, ‘‘तीर्थंकर स्तनपान करीत नाहीत, गृहस्थावस्थेत अवधिज्ञान, पाच कल्याणक, शरीराच्या विविध विशेषता, उपसर्ग इत्यादि, कथंचित् तृतीय काळात उत्पत्ति, आठव्या वर्षी देशव्रतधारी’’, इत्यादि गोष्टींचा ऊहापोह केला गेला आहे.

● ‘तीर्थंकरविषयी’ अन्य निर्देशात[२], ‘‘तीर्थंकर प्रकृतीचे लक्षण, बंध होण्यात तीन वेदांची संभावना, मुक्तिबाबत नियम, महत्त्व, प्रतिष्ठापनासंबंधी नियम, निरंतरबंधी प्रकृति, स्वामी, गुणस्थान, गतिगमन’’, इत्यादि विषयांचा सूक्ष्म आढावा घेतला आहे.

● ह्या अवसर्पिणीतल्या २४ ‘तीर्थंकरांपैकी’, ‘आदिनाथ, शांतिनाथ, पार्श्वनाथ, नेमिनाथ, महावीर’, ह्या तीर्थंकराचा ‘आदर्श’ म्हणून, ह्या प्रकरणात विचार केला आहे.

● ह्या वर्णनासाठी, ‘आ, जिनसेनकृत-महापुराण’, लेखक ‘हिरालाल जैन’, ह्या ग्रंथांचा आधार घेतला गेला आहे.

**अ) आदिनाथ तीर्थंकर :** ‘जैन दर्शनाप्रमाणे’ हा लोकाकाश, १४ राजूप्रमाण आहे. ह्या ‘लोकाकाशाच्या’ मध्यभागी, एक राजू प्रमाण ‘मध्यलोक’ आहे. त्यातील अडीच ( २$\frac{१}{२}$ )द्वीपात, १५ कर्मभूमी असून, त्यातील ‘भरत-ऐरावत’ ह्या क्षेत्रांमध्ये, ‘काळपरिवर्तन’ होते. त्यातील ‘चतुर्थकाळात’ २४ तीर्थंकरांचा जन्म होतो. ह्या ‘अवसर्पिणीच्या’ चतुर्थकाळात, जंबूद्वीपातील ‘भरतक्षेत्रात’, तिसऱ्या भोगभूमीच्या काळातच, ‘चौदा कूलकर’ होवून गेलेत. अंतिम कूलकर ‘नाभिराजा व मरुदेवींच्या’ घरी ऋषभनाथांचा जन्म झाला. जन्मत: ‘तीन ज्ञानांचे’ ते धारक होते. ‘क्षायिकसम्यग्दृष्टी’ होते. त्यांचे आयुष्य ८४ लाख पूर्वांचे होते. त्यांना दोन पत्नी, १०० पुत्र, दोन पुत्री होत्या. त्यांना ‘युगप्रवर्तक’ म्हटले जाते. त्यांच्या विविध नावांचा उल्लेख आगमात आढळतो त्यात ‘वृष’ म्हणजे उत्तमधर्म, ‘प्रजापति म्हणजे’ आषाढ कृष्ण प्रतिपदेला, कृतयुगाची स्थापना करणारे, ‘आदिनाथ’ म्हणजे, कर्म युगाला प्रारंभ करणारे, ‘इक्ष्वाकुनंदन’ म्हणजे इक्ष्वकुळात जन्म घेतलेले, असे उल्लेख आढळतात.

**पुरुषार्थप्रेरक कार्यक्षेत्र :-**

१) हे युगकर्ता, आदिपुरुष, तीर्थंकर होते. ‘भोगभूमीची’ समाप्ति व ‘कर्मभूमीचा’ प्रारंभ असल्याने, ‘कृषी’ कला शिकवली. ‘शेती, घरबांधणी, अग्निनिर्मिती, शेतीअवजार इत्यादींचे ज्ञान, पशुधनाचे महत्त्व,’ इत्यादींचे ज्ञान दिले.

२) ‘ज्ञान’ हा आत्म्याचा ‘गुण’ असून, ‘ज्ञानलालसा व जिज्ञासा’ हा, मनुष्यस्वभाव आहे.

विद्याराधनारूप ‘मसि’ विद्या शिकवून, ‘शिक्षणाचा’ श्रीगणेश केला. ‘श्रुतदेवतेला’ स्मरण करून, ‘अक्षर व अंक’, गणित, व्याकरण इत्यादिंचे ज्ञान, आपल्या ‘दोन्ही पुत्रींना प्रथम’ देवून, ‘स्त्री शिक्षणाची’ मुहूर्तमेढ केली. ‘स्त्री शिक्षण, हक्क व अधिकार’ ह्यांचा पाया रचला.

३) क्षत्रिय राजे असणाऱ्या ‘ऋषभांनी’, राज्यव्यवस्थेसाठी आवश्यक, क्षात्रतेजाचे महत्त्व, ‘असि’ विद्येद्वारा दिले. ‘न्याय, दंड, कायदा, युद्धज्ञान’ इत्यादींचे यथावत् ज्ञान दिले. ‘सत्ताधारी सर्वश्रेष्ठ पुरुषरूपाने’ ते स्वत;समोर आले आणि ‘सांस्कृतिक’ जीवनाचा पाया घालण्याचा प्रयास केला. ‘क्षात्रतेजपूर्ण’ समाज, ‘धर्म, संस्कृती, परंपरा’ जपून, शस्त्रसज्जता व नित्यजागरूकतेने, ‘मुक्ती व स्वतंत्रता’ मिळवू शकतो हे, जनमनावर बिंबवण्याचेकार्य केले. व्यर्थ स्वार्थ इत्यादिसाठी, ‘अन्याय वा हिंसा’ त्याज्य मानली, मात्र ‘देशहित, स्वरक्षणासाठी, विवेकपूर्वक युद्धाला’ विरोध केला नाही. ‘क्षात्रधर्म’ हा ‘आत्मधर्म’ असून, ‘जिंकण्याची, जनकल्याणाची, अन्यायावर मात करण्याची’, तेजस्विता हा तर, ‘क्षात्रतेजाचा’ आदर्शच ठेवला. ‘तत्त्वज्ञान वा शस्त्रे’, ही पंगु असतात म्हणूनच, ‘पुरुषार्थी’ मनुष्यांना ती ‘जगवावी’ लागतात.

४) आर्थिक ‘सुबत्तता, ही स्वतंत्रता’ आणते. धनसंपन्नताच ‘शस्त्र व शास्त्राला’ समर्थ बनवू शकते. ‘विपन्नता व दारिद्र्य’, ह्यांना देशाचे ‘शत्रू व आपत्ती’ मानले. ह्यामुळेच ‘वाणिज्य’ विद्या नुसती शिकविली नाही तर, आदर्शही ठेवला. ‘जतन, संवर्धन, संरक्षण, संस्कृती’ इत्यादीसाठी ‘धनाची’ गरज अनिवार्य मानली.

५) ह्या सर्व विद्यांबरोबर, ‘शिल्प-कला’ शिकविली. त्याचमुळे ‘साहित्य, कला, शिल्प, मंदिरे, उद्योग’, इत्यादित जैनांचा ‘पुरुषार्थ’ उच्चप्रतीचा ठरला. मानवी जीवन सर्व दृष्टीने संपन्न व्हावे, ह्यासाठी ‘सत्ता, संपत्ती, साहित्य’ ह्यांचा उपयोग, ‘जनकल्याण, चांगुलपणा, शुभप्रवृत्ती, प्रेरणा, संयम, दान, दुसऱ्यांचे जीवन मांगल्यपूर्ण बनवणे’, ह्यासाठी करण्याचा उपदेशही दिला व स्वत:कृती करून, पायंडाही घातला.

६) जनसामान्यांना ह्या सहा ‘कला-विद्या’ शिकवून, ‘कर्मभूमीचा शुभारंभ’ केला. धर्मपालनासह जीवनयापनाची ‘सम्यक् कला’ शिकविली. स्वत: विवाह करून, विवाहसंस्थारूपाने, ‘नीतिमत्ता व चारित्रपालनाचा’ पाया रोवला. संसारदशेतील आवश्यक सर्व ‘कर्तव्यांना यथावत्’ पूर्ण करून, राजा म्हणून ‘राज्याची व्यवस्था’ चोख बजावून, ‘धर्मपालनपूर्वक’ समाजव्यवस्था लावून, ‘योग्यसमयी दीक्षा’ धारण करून, ‘त्यागाचे’ महत्त्व स्पष्ट केले. दिक्षाग्रहणपूर्वी ‘दानाचा’ आदर्श ठेवला. दिक्षाग्रहणानंतर समाजाला ‘आहारविधि’ शिकवून, ‘आहारदानाचे’ महत्त्व पटवून दिले, ‘त्याग व व्रताचा’ प्रशस्त मार्ग दाखवला. ‘अतिथी देवो भव’ ची संस्कृती निर्माण केली. स्व कृती वा पुरुषार्थातून ‘आदहिदं च कादव्वं’ ह्या श्रेष्ठ उद्दिष्टाबरोबरच, ‘परहिदं च कादव्वं चा’ पाठ पढविला. ‘सामान्य ते असामान्य’, ह्या प्रवासाचा प्रशस्त मार्ग दाखवला.

७) ‘केवलज्ञानानंतर’ आपल्या संघात ‘स्त्रियांना’ स्थान देवून, ‘आर्यिका दीक्षा’ देवून, स्त्रियांना ‘धर्माचा व मुक्तीचा’ मार्ग खुला केला. ‘जीव’ द्रव्याबाबत अत्यंत सूक्ष्म विवेचन केले. ‘विश्वव्यवस्था व रचना’, मानवजातीला सुख, समृद्धी देणारा ‘आचारधर्म’, ‘विज्ञाननिष्ठ तत्त्ववर्णन’, इत्यादि उपदेशातून ‘मोक्षमार्ग’ सांगितला. ‘शरीर-मन-इंद्रिय-बुद्धी’ इत्यादींचा, ‘नियामक व श्रेष्ठ’ म्हणून, ‘चैतन्ययुक्त आत्म्याचे’, महत्त्व प्रकर्षाने सांगितले. अशाप्रकारे खऱ्या अर्थाने ‘चारही पुरुषार्थांचा’ आदर्शच ठेवला, म्हणूनच खऱ्या ‘ज्ञान-विज्ञानाचे’ जनकत्व ‘ऋषभांकडे’ जाते.

८) ‘अष्टमूलगुणपालन, सप्तव्यसन त्याग, षट्आवश्यके, व्रते’ इत्यादिंचे वर्णन करून, ‘साधू व श्रावक’, यांच्यासाठी स्वतंत्र मार्ग प्रस्थापित केला. फक्त ‘परमात्मतत्त्वाच्या’ आग्रहात्मक प्रतिपादातून, ‘मानवी समाजाची धारणा’ होत नाही तर, ह्यासाठी लौकिक जीवनही ‘सुख-समृद्ध’ असणे आवश्यक मानले. त्यासाठी प्रथम ‘तीन पुरुषार्थांद्वारा’, जीवनाला सुंदर आकार देवून, ‘व्यसनमुक्ती, हिंसात्याग, प्रमादत्याग, योग ऋजूता, सहकार्य, प्रेमभाव’ इत्यादिला प्रेरणा दिली.

९) ‘आत्मद्रव्य’ हे ‘अनंत ज्ञान-दर्शन-सुख-वीर्य’ युक्त ‘चैतन्यमयी’ असून, कर्मप्राप्त दुःख दूर करण्याचा ‘पुरुषार्थ’ करून, ‘श्रेष्ठता, भव्यता, मुक्तता’, प्राप्त करू शकतो, ह्या उपदेशाने ‘स्वावलंबनाचा आणि स्वातंत्र्याचा’ पुरस्कार केला. सर्व ‘आत्मा चैतन्यमय असून, ईश्वरशक्तीने युक्त आहे,’ अशा उपदेशाने, खऱ्या अर्थाने ‘सर्वधर्मसमभाव, वसुधैवकुटूंबम, मनुष्यजातिरेकेव’ ह्याचा जयघोष केला. ‘जातिभेद, उच्चनिचता, विषमता’ ह्यांचा कडाडून निषेध केला. ‘कर्मानुसार’ वर्णस्थापना केली. ‘स्वभाव व शक्ती’ विविधता जाणून, ‘योग्यतानुरूप धर्माचरणाचा’ मार्ग दाखविला. ‘मानव उद्धार, आत्मकल्याण, परहितभान’, ही त्रिसूत्री समर्थपणे पेलली.

♦ १०) ‘लौकिक जीवन’ उद्धारासाठी, ‘जीवदया, पर्यावरणरक्षण, रात्रिभोजनत्याग, शुद्ध सात्त्विक आहार, सेवा-वैयावृत्य, आदर-सत्कार’, इत्यादिंचा धर्मातच अंतर्भाव केला. ‘मित्ति मे सव्व भूएसु, जिओ और जीने दो, परस्परोग्रहो जीवानाम्’, अशा घोषवाक्यातून, ‘नीतिमत्ता, मैत्री, अहिंसा, सहचर्य, प्रेमभाव’ इत्यादिंचा संदेशच दिला. ‘अहिंसा परमोधर्म’ ह्या ब्रीदवाक्यातून, सर्व ‘प्राणिमात्रांच्या अस्तित्वाचा’ स्वीकार करून, समन्वय साधला. ‘कर्मकर्तृत्त्व व जीवाची अनंत उर्जा’, ह्या ‘सम्यक्ज्ञानातून, जनजागरण व जीव उत्थानाचा पुरुषार्थ’ तर, उच्चतमच म्हणावा लागेल.

११) आत्मसामर्थ्याने ‘अणु-परमाणुंच्या’, अंतरंग सामर्थ्याला जाणले. ‘ज्ञान-विज्ञानाचा’ सुरेख संगम साधला. ‘विज्ञान परपदार्थाचा’ शोध घेण्यात सक्षम असले तरी, ‘ऋषभ संस्कृती’ अंतरंगातील ‘परमात्याचा’ शोध घेणारी आहे. ‘संसार-भोगाकडे’ ‘नेणाऱ्या विज्ञानापेक्षा, ‘मुक्ती,

निर्मोहता'कडे नेणारे ज्ञान, खचितच श्रेष्ठ आहे. 'नेतृत्व, ज्ञातृत्व, भंजकत्व' हे जिनमार्गाचे स्तवनच होय. 'ज्ञान व कर्मधारा' एकत्रित वाहतात पण, एकरूप होत नाही. 'ज्ञानाचे कार्य' मात्र जाणण्याचे असून, समरस होण्याचे नाही म्हणूनच, 'साम्यता, तटस्थता, ज्ञाताद्रष्टा' हा उपाय सांगितला.

१२) 'अनेकांतवादाच्या' कथनरूपाने तर, 'तत्त्वज्ञानाच्या मंदिरावर' जणू कळसच चढविला. 'विवक्षा, मुख्य-गौणता, स्यात्, कथंचित्' अशा विचाररूपाने, 'सुखी जीवनाची गुरुकिल्लीच' जीवाला दिली.

१३) 'चतुर्विध' संघाची स्थापना करून, 'संघात्मक' विचार दिला. 'एकता व क्षात्रतेज' दाखवण्यासाठी, 'संघशक्ती'चे व्यासपीठे दिले.

१४) नव्या पिढीला 'जिद्द, पुरुषार्थ' शिकविला. कार्य पूर्ततेसाठी, 'नित्यता, समर्पण, व्यापकता, विशालता, घर, समाज, देश, धर्माप्रती बांधिलकी' सांगून, 'पुरुषार्थाला प्रेरणा दिली. ध्येय निश्चित करून, त्याचा ध्यास वा 'प्रयत्न वा पुरुषार्थ', स्व कृतीतून दर्शवून 'पुरुषार्थाचा, आदर्शच' ठेवला.

१५) 'धर्मोपदेशांचा' नवा क्रम सुरू केला. 'आत्मस्वातंत्रता, आत्मविचार, स्वावलंबन, आत्मविश्वास, पुरुषार्थाचा' पुरस्कार करून, सामान्यांनाही धर्मात स्थान देवून, 'मोक्षाला जाण्याचा मार्ग खुला' केला. 'गणधर परंपरेचा' प्रारंभ करून, 'गुरु-शिष्य परंपरेची' मुहूर्तमेढ केली. 'श्रुतपरंपरा' सुरू करून, ज्ञानाचे महत्त्व दृढ केले.

१६) 'आधी केले मग सांगितले', ह्या तत्त्वानुसार प्रत्येक गोष्ट कृतीने सिद्ध केली. 'निश्चय-व्यवहाराची' उत्तम सांगड घालून, 'पुरुषार्थाचा' पुरस्कार केला. दिक्षापूर्वी 'धर्मयुक्त अर्थ-आणि काम', पुरुषार्थांचा उत्कर्ष गाठला. नंतर सर्वसंग त्यागाने 'मोक्ष' पुरुषार्थाचा प्रकर्षाने उद्यम करून, आदर्श स्थापन केला.

**ब) शांतिनाथ :-**

'जैनदर्शनाने' वर्णित अवसर्पिणी काळाच्या, चतुर्थ काळातील, हे १६ वे तीर्थंकर होय. रूढ जैन परंपरेत ह्या तीर्थंकरांना, विशेषच महत्त्व दिलेले दिसते. ह्या 'तीर्थंकरांना' शांतीचे प्रतिक मानले जाते. त्यामुळे दिगंबर समाजात 'शांतिपाठ, शांतिविधान, शांतिधारा', ह्यांचे खूपच प्रचलन आढळते.

'तीर्थंकर' होण्यापूर्वीच्या १२ भावांमध्ये, 'देव, विद्याधर, राजा, बलभद्र, चक्रवर्ती, तीर्थंकर पुत्र', इत्यादि पर्याय त्यांनी धारण केल्या होत्या. ह्या चतुर्थकाळात 'भरत क्षेत्रात हस्तिनापूर' मधे, 'विश्वसेन राजा व ऐरादेवी' राणीच्या घरी, ह्यांचा जन्म, 'जेष्ठ कृष्ण चतुर्दशीला' झाला. ते

‘कामदेव, चक्रवर्ती व तीर्थंकर’, अशा तीन पदांचे अधिकारी होते. धर्मनाथानंतर ‘पाऊण पल्य कमी तीन सागर’, प्रमाण काळ धर्माचा विच्छेद झाला होता. शांतिनाथांपासून ही ‘धर्मपरंपरा’ सुरू झाली.

**वैशिष्ट्ये :**

१) ‘तीर्थंकर’ होण्यापूर्वी, दोन वेळा ‘तीर्थंकर पूत्र’ म्हणून जन्म घेतला.

२) पूर्वभवात ‘महावीरांसह’, मामा-भाचा हा संबंध होता.

३) पूर्वभवात ‘इंद्र, कामदेव, चक्रवर्ती’, अशा उच्च गतीत सुख भोग घेतल्यानंतर, हे ‘तीर्थंकर’ झालेत.

४) ‘धर्मनाथानंतर’ व्युच्छिन्न झालेली धर्मपरंपरा, ‘शांतिनाथांपासून’ सुरू झाली. त्यानंतर ही ‘धर्मपरंपरा’ अक्षुण्ण राहिली, जी आज ‘पंचम काळातही’ चालू आहे. ह्या दृष्टीने ह्या ‘धर्मशासनाचे आद्यगुरुच’ त्यांना म्हटले जाते. त्याचमुळे त्यांना अनन्यसाधारण महत्त्व दिलेले दिसते.

५) ‘तीर्थंकर’ कधीही म्लेंच्छ खंडात जात नाही, मात्र ‘चक्रवर्ती’ असल्यामुळे, षट्खंड-विजयासाठी, ते म्लेंच्छ खंडात गेलेत. ‘विजयार्ध’ पर्वतावर, दोनवेळा ‘चक्रवर्तीचे’ नाव रोवण्याचा मान त्यांना मिळाला. ह्यांचे चारही कल्याणक ‘हस्तिनापूरला’ झाले.

६) ‘तीर्थंकर’ होण्यापूर्वीच्या १२ भवांपासून, ‘पुण्य व पुरुषार्थाचा’ प्रकर्ष व उत्कर्ष असा केला की, उत्तमोत्तम भवांची प्राप्ती त्यांना झाली. ‘मोक्ष’ प्राप्तिपर्यंत ‘शुभभाव, क्रिया, आचरण, व्रताने, उत्तमोत्तम गतिप्राप्तीचा पुरुषार्थ’ किती महत्त्वाचा हे, त्यांनी जीवनवृत्तांतातून स्पष्ट केले.

७) त्यांच्या ‘जीवनवृत्तांताचा’ अभ्यास केला असता, त्याकाळच्या समाजातील ‘प्रथा, परंपरा व रूढींचे’ दर्शन होते.

**क) नेमिनाथ :-**

ह्या ‘अवसर्पिणीच्या’, चतुर्थकाळातील, २४ तीर्थंकरांपैकी, हे २२ वे तीर्थंकर होय. इतिहासात ह्यांचे एक वेगळेच महत्त्व व स्थान आहे. ‘नमिनाथांनंतर’ ८४३८० वर्षांनी, ‘हरिवंशात’ ह्यांचा जन्म झाला. शूरसेनांचे पौत्र ‘अंधकवृष्णी’, हे शौरिपूरचे यदूवंशी राजे होते. त्यांना १० पूत्र व २ पुत्री होत्या. सर्वात मोठे ‘समुद्रविजय’ हे नेमिनाथांचे पिता होते. सर्वात लहान पुत्र ‘वसुकुमार’, कृष्णाचे पिता होते. ‘श्रावण शुक्ल षष्ठीला’, त्यांचा जन्म झाला. १००० वर्षाचे त्यांचे आयुष्य होते. नीलकमळाप्रमाणे शरीर होते. उग्रसेन कन्या ‘राजमतीसह’ विवाहप्रसंगी, पाहुणचारासाठी ‘बंदिस्त प्राण्यांचे आर्त रूदन’, ह्यांच्या ‘वैराग्यात’ निमित्त ठरले. ‘गिरनारपर्वतावर’ ५६ दिवस केलेल्या तपानंतर, ‘केवलज्ञानाची’ प्राप्ती झाली. ६९९ वर्षे १० महिने व चार दिवस त्यांनी, ‘श्रमण परंपरेचे’ प्रवर्तन केले.

**वैशिष्ट्य :**

१) ऐतिहासिकदृष्ट्या, 'नेमिनाथ व श्रीकृष्ण' हे चुलत बंधू होते, ही गोष्ट महत्त्वाची ठरते. त्यावरून 'महाभारताचा' काळ निश्चित होतो. त्या काळात 'राज्यासाठी, राज्यघराण्यातील भांडणे, युद्ध, षड्यंत्रे' होत होती हे स्पष्ट होते.

२) गृहस्थावस्थेत असतांना त्यांनी, 'यादवकुळातील' समाजाला अनेक प्रकारे संबोधित केले. 'यादवांना व्यसनाधीनतेतून' मुक्त करण्याचा प्रयत्न केला. दीक्षा ग्रहणानंतर 'वैराग्य, तपाने,' केवलज्ञान प्राप्तिनंतर, विहार करत 'निर्व्यसनी' समाजाची पुन:स्थापना केली.

३) त्या काळातही समाजात 'व्यसनांचा' अतिरेक होता, 'युवावर्ग भ्रष्ट' होता. त्या उच्चकुलीन भरकटलेल्या युवावर्गांना, 'व्यसनमुक्तीचा' मार्ग दाखवून, 'दया, करुणा उपदेशाने', योग्य मार्गावर आणून, 'स्थितिकरण' अंगाचा आदर्श ठेवला.

४) प्राणिमात्रांवर 'करुणा, दया' इत्यादीने, 'अहिंसेचा' पुरस्कार केला. 'आहारात-आचारात अहिंसा' आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. 'सतत धर्मप्रभावना, स्थितिकरण, ऐहिक-आत्मिक सुखप्राप्तिसाठी सतत प्रबोधनाचे', यशस्वी कार्य केले. अत्यंत कठोरपणे, आग्रहाने ' अहिंसायुक्त आहाराचा', उपदेश हा खासच 'पुरुषार्थ' म्हणावा लागेल.

५) आत्मकल्याणासह 'जनहित, जनप्रबोधनाचे' कार्य दृढतेने करून, समाजाला आलेली मरगळ दूर केली.

**ड) पार्श्वनाथ :-**

'अवसर्पिणीकाळातील' ह्या चतुर्थकाळातील, हे २३ वे तीर्थंकर होय. जैन साहित्यात सर्वाधिक 'स्तोत्र, स्तुति, स्तवन, मूर्ती', पार्श्वनाथांच्या दिसतात. आगमात 'चिंतामणी, कलिकुंड, विघ्नहर' अशा नावांचा उल्लेख आढळतो. 'नेमिनाथानंतर' ८३७५० वर्षांनी, इक्ष्वाकुवंशी 'अश्वसेन राजा व वामादेवी राणीच्या घरी, त्यांचा जन्म झाला. आयुष्य शंभर वर्षांचे असून, हरित वर्ण, २३ व्या वर्षी गृहत्याग, 'शिखरजीपर्वतावर' तपाचरण करून, '७० वर्षे उपदेश व प्रचार' केला. ह्यांनी 'चातुर्याम धर्माची' स्थापना केली.

**कार्यक्षेत्र :**

१) 'पार्श्वनाथांच्या' काळात 'यज्ञ संस्कृती व पुरोहित वर्ग' ह्यांचा बोलबाला होता. 'मिथ्या व पाखंडी', साधूवर्गांमुळे अमांगल्य पसरले होते. अधर्माला धर्म समजून, 'पशुहत्या, पशुबळी', अशा 'हिंसात्मक क्रियाकांडाला' महत्त्व दिले जात होते. त्या 'हिंसात्मक क्रियाकांडविरुद्ध' त्यांनी बंड पुकारले.

२) यज्ञात होणाऱ्या' पशुबळीने,' कृषिव्यवस्था धोक्यात आली होती. त्याविरुद्ध जोरदार

चळवळ करून, 'खऱ्या धर्माचा प्रचार' केला. 'जातपात, उच्चनिचता', इत्यादींना विरोध करीत, अलौकिक नेतृत्व केले.

३) 'पुरोहित वर्गांनी' उपजीविकेसाठी, 'राजांना' आपल्याकडे वळवून, 'कर्मकांडांचे' महत्त्व वाढविले. 'पार्श्वनाथांनी' त्या राजांना, खऱ्या 'मानवहिताच्या धर्माची दीक्षा' दिली. 'अहिंसेच्या' मार्गाने राज्यक्रांती घडवून, 'जैन धर्माचा' मार्ग प्रशस्त केला.

४) लोकजीवनात 'अहिंसा, दया, सहकार्याची गंगा' पुन्हा प्रवाहित केली. 'सम्यक् श्रद्धेची' बीजे रोवण्यास, 'अहिंसा' विचार दृढमूल करण्यास, भारतभर विहार केला.

५) देशांतर्गत पडलेल्या 'फूटीमुळे, द्वेषामुळे', कोलमडलेली राज्यव्यवस्था, पुन्हा मार्गावर आणण्यास, 'अहिंसा, सत्य, अचौर्य, अनेकांत', इत्यादि तत्त्वांची पुन: स्थापना केली.

६) भवाभवांपासून चालत आलेले 'कमठचे' वैर, त्यावर 'पार्श्वनाथांनी' प्रत्येक वेळी केलेली 'क्षमा', ह्याकृतीने 'उत्तमक्षमाधर्माचा' सर्वश्रेष्ठ आदर्श प्रस्तापित केला.

७) 'आयुष्यमर्यादा वा लांबी' ही महत्त्वाची नसून, 'सामाजिक, राजकीय, धार्मिक, आध्यात्मिक', क्षेत्रांमध्ये अमूल्य योगदान देवून, कर्तव्ये यथासांग पूर्ण करण्याचा नवा आदर्श ठेवला. 'लौकिक वा आध्यात्मिक' क्षेत्रांमध्ये, आदर्श ठेवतांना, 'कष्ट वा उपसर्ग वा परिषह, वा प्रतिकूलता' ह्यावर 'सम्यक्' प्रकारे मात करण्याचा, 'सम्यक्पुरुषार्थाचा' उत्कृष्ट आदर्शच ठेवला.

**इ) महावीर :–**

'भारताच्या' ह्या पवित्र पावन भूमीत, अनेक महापुरुष, श्रेष्ठ रत्नांचा जन्म झाला, आणि ही पुण्यभूमी अधिकच धन्य झाली. ह्या 'महान वीर पुरषांनी' भारताचे नाव, जगात अमर केले. त्या पुण्यवंत भाग्यवंत महापुरुषांमध्ये, 'महावीरांचे' नाव आदराने घेतले जाते. अनेकभवांपूर्वी हे 'वृषभांचे' नातू मरीचि होते. 'ऋषभांचे' अनुकरण करीत दीक्षा घेतली. मात्र भूक इत्यादि, 'परिषह' सहन न झाल्याने, मार्गभ्रष्ट झाले. 'कुमार्गावर' जावून, 'तापसवेश' धारण करून, '३६३ अन्य पाखंडी' मतांची स्थापना केली व 'अनंतभव संसार दु:खे भोगत, भवभ्रमण' केले. अनेक पर्यायांमध्ये जन्म घेतला. त्या अनेक पर्यायांनंतर 'सिंह' पर्यायात, 'मुनिवरांच्या' उपदेशाने परिणामशुद्धी होवून, 'सम्यग्दर्शनाची' प्राप्ती झाली. त्यानंतर 'समाधिमरणपूर्वक' देव, चक्रवर्ती पर्यायधारणानंतर, 'तीर्थंकर पद' प्राप्त झाले. 'पार्श्वनाथांच्या' २५० वर्षानंतर, ह्यांचा जन्म इ.स.पू. ५९९ 'चैत्र शुक्ल त्रयोदशीला' झाला.

**परिस्थिती :–**'महावीरांच्या' काळी समाजात भयावह परिस्थिती होती. समाजात 'पराकोटीचे दारिद्र्य, रक्तरंजित विषण्णता' होती. राज्यव्यवस्थेच्या दृष्टीने 'सुवर्णयुग' असला तरी, सामन्यांसाठीचा तो 'मरणकाळ' होता. प्रजा घाणीच्या बैलाप्रमाणे पिळली जात होती. 'अज्ञानता,

अंधश्रद्धा, भोळेपणा' ह्यामुळे, 'वैचारिक, बौद्धिक गुलामगिरी होती. 'पुरोहितांचे वर्चस्व, यज्ञयागाचे प्रचंड' महत्त्व यामुळे, हिंसात्मक 'यज्ञयागाचा' बोलबोला होता. 'धर्म' हे, विलासी 'पुरोहित' वर्गाला, 'वैभव व सत्ता' मिळवून देणारे, साधन होते. 'अधार्मिक' कृत्यांना ऊत आला होता. 'शुद्रांना' अमानुष वागणूक दिली जात होती. 'गुलामगिरी' प्रकर्षाने वाढली होती. 'स्त्रियांवर' अत्याचार होत होते. 'मिथ्यात्वाचा' उद्रेक होता. 'धर्माची तेजस्विता', रूढीच्या अंधकारात विलीन झाली होती आणि 'दानवी प्रवृत्ति व सामाजिक विकृती' वाढली होती.

**कार्यक्षेत्र :-**

१) ह्या अशा भयानक परिस्थितीत 'महावीरांचा' जन्म झाला. 'महावीर' हे एक 'दिव्य, प्रभावी, क्रांतिकारी,' व्यक्तिमत्त्व होते. 'पार्श्वनाथांच्या' निर्वाणानंतर, 'यज्ञयागांना, हिंसाचाराला' पुन्हा ऊत आला होता. 'महावीरांपुढे' खूप मोठे आव्हान होते. त्याचवेळी ब्राह्मण परंपरेतील विद्वान पंडित, 'इंद्रभूतींना' प्रथम गणधर म्हणून संघात मान देवून, 'वैदिकांच्या अभेद्यकिल्याला' सुरुंग लावला.

२) 'वृषभांकडून' आलेले परंपरागत 'तत्त्वज्ञान', पुन्हा नव्याने, 'सुस्पष्ट, तर्कशुद्ध' पद्धतीने ठामपणे मांडले व प्रभाव वाढत गेला.

३) 'पार्श्वनाथांच्या' चातुर्याम धर्मात, 'अपरिग्रहाचा' आग्रहाने अंतर्भाव केला. 'अनेकांतासारख्या' अमूल्य तत्त्वाचे, 'मूल्य व महत्त्व', पुन्हा प्रकर्षाने स्पष्ट केले. खंडनमंडनातील वैचारिक विरोधांना 'अनेकांताचे व्यासपीठ' दिले.

४) 'गृहस्थावस्थेत' असतांना, त्या धर्माचा पालन करीत, 'बाल्य व कुमारावस्थेतील' सर्व कर्तव्ये यथासांग पूर्ण करून, मोक्षमार्गावरही 'स्व' पुरुषार्थाने आत्मोन्नती केली. 'एकांत निवृत्तिवादाचा' विरोध करीत, 'जनमंगल, जनजागरण', रूपाने 'सम्यक्‌प्रवृत्तिवादाचा' पुरस्कार केला. 'अज्ञानरूपी' अंधकाराने व्याप्त जनसामान्यांना, खऱ्या धर्माचा उपदेश दिला.

५) 'महावीरांनी' कोणत्याही नव्या धर्माचा, 'प्रचार वा स्थापना' केली नाही वा तसा दावाही केला नाही. परंपरागत 'धर्माला द्रव्य-क्षेत्र-काल-भावानुरूप' सुधारणा करून, नव्यारूपात सादर केले. 'धर्माचे प्रवर्तन, उद्‌घाटन' करून, 'आस्था व विश्वासाची' पुन:स्थापना केली.

♦ ६) आपल्या 'धार्मिक वा आध्यात्मिक' क्षेत्रात कोणत्याही, 'देव-देवी-दैवी' शक्तीचा आधार घेतला नाही. कर्मावर मात करून, 'पुरुषार्थाने' दिव्यत्वाचा मार्ग प्राप्त केला. 'पुरुषार्थप्रधान कर्मदृष्टी' दिली. त्यांचा 'कर्मवाद हा भाग्यवाद' नसून, 'भाग्याचा निर्माता' आहे. कोणत्याही दैवी शक्तीच्या नावाने, 'परावलंबनत्व' न देता, पुरुषार्थाने 'स्व' निर्माणाचे स्वातंत्र्य दिले. 'कर्मसिद्धांत' मानवाची विवशता नसून, 'पुरुषार्थाला प्रेरणा देणारी नियति आहे', ज्याच्या

आधारे, ‘अंधाराकडून-प्रकाशाकडे, अनाचाराकडून-सदाचाराकडे, नैतिक उत्थानाकडे जाण्याचा मार्ग प्रशस्त केला.

७) लोककल्याणाच्या प्रखर तळमळीने, ‘दीक्षा, तप, त्यागाने कर्मनाश करून’, ‘जिनत्व’ प्राप्त केले. त्या उत्कृष्ट ‘आत्मानुभूतीतून’ जाणलेले सत्य , उपदेशरूपाने कथन केले.

८) सर्वसामान्यांना ‘धर्माशी’ जोडून, ‘आत्मकल्याणाच्या’ मार्गावर आणण्यासाठी ‘बोलीभाषेतून उपदेश’, हा त्यांचा ‘पुरुषार्थ’, ही खरीच क्रांती ठरली.

९) ‘यज्ञ व पशुहिंसेचा’ कडाडून विरोध करून, ‘अहिंसापरमोधर्म व जिओ और जीने दो’ हा नारा लावला. ‘मैत्रीत भेदभाव, उच्चनीचता’ नसते. ह्याच कारणाने मात्र, ‘करुणा ही अहिंसा’ नसून, ‘मैत्रिभाव ही अहिंसा’ हे सांगितले.

१०) ‘अनेकांताचे बीज तत्त्वदृष्टीत’ होते. ‘सत्या’सह आग्रह नसावा. सर्वमतांबाबत ‘यथायोग्य आदर, उदारमत’ असावे, हा आग्रह ठेवला. त्यामुळेच अनेक ‘ब्राह्मण विद्वानांनी जैन परंपरा’ स्वीकारून, जी ‘साहित्य समृद्धता’ आणली, जो ‘समन्वय’ साधला, त्याने जैनधर्म सदैव प्रकाशितच राहिला.

♦ ११) ‘आत्मकल्याणाचा’ हक्क व अधिकार सर्वांना देवून, ‘जात-पात, लिंग, वर्णभेद’, इत्यादींचा कडाडून विरोध केला. ‘परमात्मा’ प्रत्येक जीवात आहे व त्याचा शोध, ज्याचा त्यानेच घ्यायचा असतो. ‘पुरुषार्थाला’ खच्ची करणाऱ्या ‘परावलंबनतेचा’विरोध करून, निष्क्रिय समाजाला, ‘उत्तुंग व जाज्वल्य व्यक्तिस्वातंत्र्याचा’ पाठ दिला. जैन धर्माची ‘आस्तिकता’ त्यातून सिद्ध केली.

१२) ‘गुलामगिरीची प्रथा, गुलामांचा व्यापार, स्त्री दासी म्हणून विक्री’, ह्या दुष्प्रथांचा विरोध केला.‘चंदनबालेला’ मुक्त करून, खऱ्या अर्थाने ‘लोकशाहीचा’ बिगुल वाजविला. ‘स्त्रियांना सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक’, क्षेत्रात दर्जा व स्थान देवून, ‘शीलव्रताची’ प्रतिष्ठा केली.

१३) भग्नावस्थेत पोहचलेल्या ‘चतुर्विध संघाची’ पुन:स्थापना केली. जातीने ‘उच्च-नीचता’ न मानता, ‘तप, त्याग, संयमाची’ श्रेष्ठता मानली. ‘पर्यावरण, अणु-परमाणु, एकेंद्रियजीव हिंसा त्याग, अपरिग्रह, अनेकांत, आत्मवाद’, इत्यादींचा ‘प्रचार व प्रसार’ हा, त्यांचा खरा ‘पुरुषार्थ’ होय. ‘ज्ञानधारा व कर्मधारा’, यांच्यातील समन्वय साधून, ‘समतावाद, कर्मवाद, स्याद्वाद’, सारखे अद्वितीय तत्त्व देवून, ‘पुरुषार्थाचा’ आदर्श ठेवला.

**ई) आगमात उद्धृत अन्य उदाहरणे व पुरुषार्थ प्रेरणा :**

**ओळख :** आगमात ६३ शलाकापुरुषांचे वर्णन येते.

- ‘शलाका’ म्हणजे तेजस्वी अंश, असणारे ‘पुरुष’ होय. ह्यामध्ये २४ तीर्थंकर, ९ बलभद्र, ९

नारायण, ९ प्रतिनारायण, १२ चक्रवर्ती असतात.

● हा काळ हुंडाअवसर्पिणीचा असल्याने, ह्या काळात ५८ शलाका पुरुष होते. ह्यामध्ये तीर्थंकरांचे माता-पिता, ११ रुद्र, ९ नारद, २४ कामदेव, १४ कुलकर, ह्यांच्यासह १६९ 'दिव्यपुरुष' म्हटले जातात.

● ह्या 'शलाका पुरुषांपैकी', प्रतिनारायण सोडून, अन्य १६० दिव्य पुरुष, त्या अथवा पुढच्या १-२ भवांमध्ये मोक्ष प्राप्त करतात.

● हे 'शलाका' पुरुष कधीही परस्परांना भेटत नाही.हे सर्व दिव्य पुरुष, 'वज्रवृषभनाराच संहननधारी, कंचनवर्ण, उत्तमशरीर, सुलक्षणांनी युक्त, समचतुरस्त्ररूप शरीराने युक्त असतात'. ह्यांना दाढी-मिशा नसतात.

● ह्या विभागात 'कर्माधीनता व पुरुषार्थप्रधानता', ह्या निकषावर, ह्या 'शलाका पुरुषांमधील, तसेच अन्य महत्त्वपूर्ण व्यक्तींचे' वर्णन केले आहे. अन्य विस्ताराचा स्थूल आढावा घेवून, मात्र 'पुरुषार्थाने कर्मावर' मात करणारी उदाहरणे, प्रदर्शित केली आहे. ह्या सर्व वर्णनासाठी 'आदिपुरुण, महापुराण, उत्तरपुराण' इत्यादि ग्रथांचा अभ्यास करून, 'पुरुषार्थांचे आदर्श' असणाऱ्यांना अधोरेखित केले आहे.

**१) चक्रवर्ती :** 'शलाका' पुरुषांपैकी, चक्रवती १२ असतात, हे सर्व सहा खंडांचे 'अधिपती' असून, ३२००० मुकूटबद्ध राजांचे 'स्वामी' असतात. ह्यांना '१४ रत्न व नवनिधी' प्राप्त होतात. ह्यापैकी विशेषरूपाने 'भरतांचा' येथे विचार केला आहे.

**अ) भरत-बाहुबली** : हे दोन्ही'ऋषभनाथांचे' पुत्र होते. त्यापैकी 'भरत' हे प्रथम चक्रवर्ती होते. दोन्ही 'क्षायिक सम्यग्दृष्टी' असून, 'चरमशरीरी' होते. 'बाहुबलींनी' भरताचे मांडलिकत्व नाकारल्याने, दोघांमध्ये युद्ध झाले. त्यावेळी 'भरतांची' कर्मवशता स्पष्ट होती. मात्र 'बाहुबलींनी' युद्धानंतर प्राप्त वैराग्याने, त्यानंतर लगेच दीक्षा घेवून, 'पुरूषार्थाचा आदर्श' ठेवला. अर्थात् 'भरत'सुद्धा संसारातही, 'कमलाप्रमाणे अलिप्त' असल्याने, योग्यवेळी 'वैराग्याच्या उत्कर्षाने' दीक्षा घेताच, त्यांनाही 'अंतर्मुहूर्तात केवलज्ञानाची' प्राप्ती झाली. जन्मभर केलेल्या 'पुरुषार्थाचा' तो प्रकर्षच म्हणावा लागेल.

आ) 'भरत नंतरचे सगर, मधवा, सनतकुमार, शांतिनाथ, कुंथुनाथ, अरहनाथ, पदम, हरिषेण, जयसेन' ह्यांनी 'पुरुषार्थाचा आदर्श' ठेवून, 'अहमिंद्रपद, वा मोक्षाची' प्राप्ती केली. 'सुभौम-ब्रह्मदत्त', ह्यांनी पुण्यप्राप्त ह्या 'चक्रवर्तीपदाचा', दुरुपयोग करून, 'कर्मोदयवश, लोभ, मिथ्यात्वाने', नरकाची प्राप्ती केली.

**२) बलभद्र :-** ६३ शलाका पुरुषांपैकी, ९ बलभद्र असतात. हे 'अतुल पराक्रमी,रूपसंपन्न,

मातृभक्त, स्वर्ग वा मोक्षाला' जातात. म्हणूनच 'पुरुषार्थाचे, चारित्राचे' आदर्श मानले जातात.

**३) नारायण :–** ६३ शलाका पुरुषात हे 'नऊ' असतात. सर्व 'नारायण' 'बलभद्रांचे' भाऊ असतात. 'तीन खंडांचे अधिपती, निदानसहित पापसंचय, मोहवश चारही 'पुरुषार्थांचे' कुमार्गाने सेवन, भोगी, अत्याधिक विषयासक्ती, असंयमी, बहुआरंभ-परिग्रहाने, कर्माधीनता स्वीकारून, नरकगतीचा बंध करतात'.

**४) प्रतिनारायण :–** ६३ शलाका पुरुषात, ९ प्रतिनारायण असतात. ह्यांना नियमाने 'नारायणांकडूनच' मरण येते व नरंकगतीत जातात. ह्यापैकी 'लक्ष्मण' हे नारायण, 'रावण' हे प्रति नारायण, पुढच्या चतुर्थकाळात क्रमाने, 'घातकीखंड' व 'भरतक्षेत्रात', तीर्थंकर पद प्राप्त करणार आहेत. मात्र ह्या भवात 'कर्मवशतेने' नरकांचे दु:ख ते भोगत आहेत.

**५) मरीचि-महावीर :–** 'मरीचि' हे वृषभांचे नातू, 'भरतपुत्र' होते. 'वृषभांसह' त्यांनीही जिनदीक्षा स्वीकारली. प्रभूंनी केवलज्ञानाने जाणून, 'मरीचि' हे २४ वे तीर्थंकर होण्याची भविष्यवाणी केली. ती ऐकून 'उन्मत्त होवून, दीक्षा त्याग करून, मार्गभ्रष्ट होवून, ३६३ अन्य मतांची' स्थापना केली. 'मिथ्यात्वाच्या तीव्रउदयाने', अनंतभव 'निचगोत्र व नरक, तिर्यंच गतीत,' अनंत दु:ख भोगले. हेच 'मरीचि' सिंहांच्या पर्यायात, 'मुनिउपदेशाने', सम्यग्दर्शनाच्या प्राप्तीने, उच्च गतीत गमन करून, 'महावीर' झालेत. अत्यंत 'मर्यादित' आयु असूनही, 'चारही पुरुषार्थांचा' आदर्श ठेवला. एकाच जीवाची 'कर्माधीनता व सम्यक् उत्कृष्ट पुरुषार्थ', कसे भ्रमण करवितो वा कसे उत्थान करवितो ?, 'अधो व उर्ध्वगतीला' कसे नेतो ?, ह्याचे साक्षात् उदाहरणाच आहे. 'नियति-पुरुषार्थाचे' 'कर्मनियतता व कर्मस्वातंत्र्याचे', ह्यापेक्षा उत्कृष्ट उदाहरण असू शकत नाही.

**६) कमठ-पार्श्वनाथ :–**'कमठ व पार्श्वनाथ' ह्या दोघांचे नाते व वैर ९ भवांपासून चालू होते. प्रत्येक भवात क्रोधाधीनतेने, 'कमठाने पार्श्वनाथांचा' घात केला व 'निंद्यतर कर्मे' करत, नीच गतीत दु:ख भोगले. ह्याउलट त्या प्रत्येक भवात, 'पार्श्वनाथांच्या' जीवाने, 'कमठाला' क्षमा केली व 'व्रत, तप, संयमाच्या पुरुषार्थाने', अधिकाधिक श्रेष्ठता प्राप्त केली. 'तीर्थंकर' बनूनही, आलेला उपसर्ग, 'क्षमा, समता, शांतीने' सहन करून, 'कर्मनिर्जरा' केली. एकाची तीव्र 'कर्मपरवशता', तर दुसऱ्याचा 'उत्कृष्ट पुरुषार्थ', ह्याचे जीवंत प्रतिकच आहे.

**७) राम-लक्ष्मण :–** राम हे 'बलभद्र' होते. लौकिक जीवनातही, 'धर्म-अर्थ-काम पुरुषार्थांच्या' उत्कृष्टतेने 'पुरुषोत्तम' ठरले. 'राज्यत्याग, वनवास, मातृप्रेम, पितृभक्ती, आदर, संयम, एकनिष्ठता, धर्मनिष्ठता, विवेक, सहनशीलतेचे मूतिमंत प्रतिक', म्हणून 'रामाचा' उल्लेख केला जातो. 'पुरुषार्थाने मोह, कर्म त्यागाने, उच्च पंचमगती' प्राप्त केली. 'लक्ष्मण' हे नारायण होते. 'अत्यंत शीघ्रकोपी, मोही, असंयमी, कर्मपरवशता व पुरुषार्थाचा अभाव', त्यामुळे नरकात दु:ख भोगत

आहेत.

**८) रावण-राम :-** 'रावण' हे प्रतिनारायण होते. 'प्रचंड पराक्रमी, जिनभक्त, अनेक शक्तींचे धारक, कट्टरतेने नियमांचे पालन करणारा, सम्यग्दृष्टी असूनही, 'सीतेवरील' राग-मोह जिंकता आला नाही. ह्या 'कर्मबाहुल्याने' व कर्मपरवशतेने', सर्व शक्ती क्षीण झाल्या व नरकप्राप्ती झाली. 'राम व सीता' भवभवांचा 'शुद्ध स्नेह, कर्तव्यांचे उत्कृष्ट पालन, संयमी,' 'चारही पुरुषार्थांचा आदर्श' प्रस्थापित केला.

**९) नेमिनाथ-रथनेमी :-** ह्या 'चतुर्थकाळातले' २२ वे तीर्थंकर होते. आयुष्याच्या अत्यंत उत्कटक्षणी, 'वैराग्य, करुणा, दया भावना', प्रकर्षाने 'प्रखर पुरुषार्थाने', क्षणात सर्व भोग नाकारले. 'सर्व संगत्याग, दीक्षा, ध्यान, तपाने कर्मनिर्जरा केली.' 'नेमिनाथांपूर्वीच' दीक्षा घेवून 'व्रत, तपात, उद्युक्त,' त्यांचे बंधू 'रथनेमी' मात्र, ओलेत्या 'राजीमतीच्या' सौंदर्याने, 'मदनबाणाने पीडित' झाले. मोहोदयाने 'क्षणिक इंद्रिय सुखासाठी, चारित्रापासून च्युत झालेत'.

**१०) राजीमती व चंदना :-** राजिमती ही 'नेमिनाथांची' वाग्दत्त वधू, राजकन्या, अत्यंत सुंदर, सर्व सुखे पायाशी लोळण घेत असतांना, 'नेमिनाथांनी' त्याग केल्याक्षणी, दीक्षा घेतली. मोहग्रस्त, कामांध 'रथनेमींची', योग्य व कडक शब्दात, कान उघाडणी करून, धर्मात पुन: स्थिर करून, 'पुरुषार्थ व स्थितिकरण अंगाचा' आदर्श ठेवला. 'राजकन्या, सौदर्यवती,' साक्षात् 'महावीरांची' मावशी असूनही, 'चंदनबालेला कर्मोदयवशाने', अनेक दु:खे भोगावी लागली तरी, 'धर्माचा' हात सोडला नाही. 'महावीरांच्या' संघात 'आर्यिका' पदाचा मान मिळाला. 'धर्म पुरुषार्थाचा' प्रकर्ष साधून, आत्मोद्धार केला.

**११) सीता-कुंती :-** ह्या दोन्ही, 'राजकन्या, राणी, संयमी, धर्मात्मा' असूनही, 'कर्मोदयाने' 'राज्यत्याग, वनवास, पतिकडून त्याग, अग्निपरीक्षा,' अशा दिव्य कर्मांना सामोरे जावे लागले. आगमात म्हटले जाते की, 'सीताकइतके दु:ख आजपर्यंत कोणत्याही स्त्रीने भोगले नाही'. मात्र 'धर्मपुरुषार्थाचे' दृढतेने पालन करून, दीक्षा धारण केली. 'कुंतीही' राजकन्या, राणी, आयुष्यभर 'दु:ख' वाट्याला आले. कुंतीनेतर, दु:ख मागून घेवून, 'पुरुषार्थाची परीक्षाच' घेतली.

**१२) कर्ण-अर्जुन :-** हे दोन्ही 'एकाच आईचे पुत्र, पराक्रमी, ज्ञानी' होते. 'कर्णाइतका' दानशूर दुसरा अन्य कोणी नव्हता. 'कर्मवशतेने' त्याने अधर्माची साथ दिली. 'अर्जुनाने' मात्र कर्तव्याला प्राधान्य देवून, 'अर्थ-काम-धर्म पुरुषार्थाचा' आदर्श ठेवला. 'धर्म, सत्य, अधिकार, अधर्माचा नाश', करण्यासाठी युद्ध केले. राज्यप्राप्तिनंतर 'भोग न घेता', वैराग्याने दीक्षा घेवून, प्रचंड उपसर्ग सहन करीत, 'मोक्ष' पुरुषार्थाचाही आदर्श ठेवला.

त्याचबरोबर 'सम्यग्दर्शनाच्या आठ अंगांच्या वर्णनात येणारे आणि व्रत वर्णनातील 'अंजनचोर, यशपालचांडाळ, वारिषेण, जयकुमार राजकुमार, दृढसर्पचोर,' अशी अनेक उदाहरणे, एकाच

जीवाच्या 'कर्मवशता व पुरुषार्थाचे' आदर्शच आहेत. वर्तमानातही समाजातील अनेक उदाहरणे देता होतील. 'महात्मा गांधी', मदर तेरेसा, अण्णा हजारे, डॉ. अभय बंग, बाबा आमटे', अशी कितीतरी उदाहरणे 'पुरुषार्थांचे आदर्श' म्हणून दिशानिर्देश करता येतील.

अशाप्रकारे आगमातील महत्त्वाच्या 'व्यक्तिरेखा', ज्या 'पुरुषार्थाचे' आदर्श होत्या, त्यांचे वर्णन केले आहे. अन्यही अनेक उदाहरणे आहेत ज्यांचा आढावा घेता येईल. ह्या सर्व विवेचनातून प्रकाशित 'पुरुषार्थ' एकत्रितपणे मांडला आहे.

**पुरुषार्थ प्रेरणा :-**

♦ १) जैन सर्व 'तीर्थंकर' राजे होते. 'क्षात्रधर्माचे' महत्त्व 'सम्यक् कृतीने' दाखविले. लौकिक क्षेत्रातही 'जिंकणे', हेच ध्येय ठेवले. सतत अन्यायाचा विरोध केला. प्रसंगानुरूप युद्धही केले. व्यवहारात 'अहिंसेचा अवास्तव व फाजील टेंभा' मिरविला नाही. 'व्यवहार-निश्चयाची' गल्लत न करता, 'सम्यक् समन्वय' साधला. अंतिम ध्येय 'आत्मकल्याण' असले तरी, वैराग्यापूर्वी, व्यवहारात असेपर्यंत, प्रत्येक 'कर्तव्य व पुरुषार्थ' चोख बजाविले. खऱ्या अर्थाने 'निवृत्ति व प्रवृत्ति, समाजाभिमुखता' म्हणजे काय, हे उदाहरणांनी स्पष्ट केले. 'ज्ञान व कर्मधारेसह', निर्लिप्तता साधण्याची कला शिकविली.

२) 'वृषभांनी' जनसामान्यांना आवश्यक 'षट्कर्मे' शिकवून, 'जीवन जगण्याची कला' शिकविली. 'संघ-शक्ती, शस्त्रसज्जता, संपन्नता' ह्या त्रिसूत्रीने, पूर्ण 'विचारधारा' बदलली. 'अर्थ पुरुषार्थाचे' प्रतिपादन करून, 'संपन्नतेसाठी संपत्तीला प्राणवायू' म्हटले. प्रकर्षाने 'पैसा कमविणे, संपन्नता वाढविणे, समाज, देशाच्या स्थितिसाठी' आवश्यक मानले. 'अर्थाला धर्माचे' अनुष्ठान देवून, नैतिकतेसह 'दान, त्याग, प्रभावना, कला-शिल्प', अशा 'विधायक मार्गाने विनियोग' शिकविला.

३) 'वृषभांनी' पुत्र-पुत्रींना, सर्व-कला विद्या शिकवून, 'शिक्षणाचे' महत्त्व दृढ केले. कोणत्याही 'शिक्षणाला' मिथ्या मानले नाही. प्रत्येक 'तीर्थंकरांच्या' काळात समस्या होत्याच. 'अराजकता, द्वेष, कलह, भांडणे, हेवे-दावे, हिंसाचाराचा' प्रकर्ष होता. 'नेमिनाथांच्या' वेळची, 'राज्यघराण्यातील भांडणे, कारस्थाने, कपटनीति, व्यसनाधीनता', ह्यांची प्रचुरता होती. मात्र सर्व 'तीर्थंकरांनी' समर्थपणे आव्हाने पेलली आणि 'स्थितिकरण, वात्सल्य, प्रभावना, उपगूहन', अशा अंगांचे प्रतिपादन केले.

४) 'पार्श्वनाथ व महावीरांच्या' काळात, 'यज्ञ, अधर्म, जातपात, हिंसाचार, वेदप्रचार', जोरात होते. 'महावीरांसमोर' बौद्धांचेही आव्हान होते. जैन साधू जीवनाला मरगळ आली होती. अशा विपरीततेत 'इंद्रभूतींचे' गणधर बनणे, 'वैदिकांना' धक्कादायक होते. प्रभावीपणे 'अहिंसा, अनेकांत, अपरिग्रहाचा' पुरस्कार केला. 'दया व सहकार्याची गंगा' प्रवाहित केली. 'बोली भाषेत प्रचार करून, जनसामान्यांच्या हृदयात पोहचले'. 'स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून, खऱ्या अर्थाने लोकशाहीची'

सुरुवात केली.

♦ ५) प्रत्येक 'तीर्थंकरांनी', सतत विहार करून, 'मानवी जीवनाशी जवळीक' साधली. एकत्रितपणाने मिळून, 'मानव उद्धार व आत्महिताबरोबरच परहिताचा' पाठ दिला. 'चारही पुरुषार्थांचा' उत्कर्ष साधून, 'प्रवृत्तिकडून-निवृत्तिकडे', यशस्वी मार्गक्रमण केले. 'ज्ञान, चारित्र, श्रद्धा, अहिंसा, अनेकांत, अपरिग्रह, आहारशुद्धी, पर्यावरणभान, परमाणुवाद, धर्म-अधर्म द्रव्य', अशा 'विज्ञाननिष्ठ' धर्माचा जयजयकार केला. 'गुणस्थान, मार्गणा, जीव' वर्णनाने 'करणानुयोगाला' उच्च पातळीवर नेले. अत्यंत 'सूक्ष्म, विज्ञाननिष्ठ, तर्कशुद्ध कर्मसिद्धांताचे विवेचन, हा तर खरा पुरुषार्थ वा मोठा उपकारच' म्हणावा लागेल. प्रत्येक 'द्रव्याची परिणमनशीलता' सांगून, 'परिवर्तन वा बदल म्हणजेच प्रगती', असे समीकरणच जणू दिले.

६) 'धर्म' अनुष्ठानासह, 'अर्थ व काम' पुरुषार्थाचा उत्कर्ष साधणे, 'अहिंसेने नवनिर्मिती, जीवन जगण्याची कला, शिकविली. प्रत्येकाला 'झेपेल, पचेल, जमेल, रुचेल' तसा, 'धर्म' करण्याचा अधिकार देवून, 'श्रावकांना पुरुषार्थाची' प्रेरणा दिली.' 'सल्लेखना' व्रतातूनतर, साक्षात् 'मृत्यूचा महोत्सव' साजरा करण्याची कला दिली.

## २) श्रुतआराधना – प्रस्तावना :–

'जैन' दर्शनात 'खरे देव–शास्त्र–गुरुंचे', स्थान सर्वतोपरी मानले जाते. 'व्यवहार सम्यग्दर्शनात, बाह्य आलंबनासाठी, 'षट्आवश्यकांमधे', देव– शास्त्र– गुरु ह्यांना स्थान दिले गेले आहे. त्यात 'शास्त्र' म्हणून 'श्रुत वा आगम' ह्यांचा विचार केला जातो. 'केवलींचा' उपदेश, 'शास्त्रांमध्ये' बद्ध असल्याने, ते पूजनीय ठरतात. हे श्रुत, 'द्रव्य–भावरूप' मानले गेले आहे. आचार्य परंपराने आलेल्या मूळ सिद्धांताला 'आगम' म्हटले जाते. 'जैनागम' यद्यपि मूळतः खूपच विस्तृत असले तरी, कालदोषाने त्याचा अधिकांश भाग नष्ट झाला आहे. 'आगमांची' सार्थकता त्याच्या शब्द रचनेने नसून, त्याच्या 'भाव' प्रतिपादनाने ठरते. शब्दरचनेला 'उपचाराने आगम' म्हटले जाते. ह्या 'भावाला' योग्य प्रकारे ग्रहण करण्यासाठी, 'शब्दार्थ, नयार्थ, मतार्थ, आगमार्थ, भावार्थ', अशा पाच प्रकारची विधि सांगितली जाते. शब्द जरी, 'क्षेत्र–कालादिनुसार' बदलतात. परंतु 'भाव' तोच असतो, म्हणून शब्द बदलले तरी, 'आगम अनादि' म्हटले जाते. 'आगमांना' प्रमाण म्हणून स्वीकारले, कारण 'पक्षपातरहित वीतरागींद्वारा' प्रतिपादित असल्याने, त्यात विरोध आढळत नाही. शब्द रचना अपेक्षेने 'आगम पौरुषेय' असले तरी, भावअपेक्षेने ते 'अपौरुषेय' आहेत. 'आगमाची' अधिकतर रचना, सूत्रात असते. कारण 'सूत्रांद्वारा', थोड्या शब्दात अधिक अर्थ करणे शक्य होते. 'आगमांवर अनेक टीका' लिहिल्या गेल्या आहेत.

जैन तत्त्वज्ञानातील 'आगम' हा महत्त्वपूर्ण भाग आहे. ह्याचे विवेचन विस्तारपूर्वक केले आहे. त्याचा सूक्ष्म आढावा घेतला आहे. 'चारही अनुयोगांचा' स्वतंत्र विचार मांडून, 'पुरुषार्थाला' मिळणाऱ्या 'प्रेरणा वा आदर्शाचा' ऊहापोह केला आहे.

**विषय विस्तार** :– आगमात ह्या 'आगम' विषयाचा विस्तार करतांना[४], ''त्याचे सामान्य लक्षण, आगमाभासाचे लक्षण, नोआगम लक्षण, आगम प्रमाणाचे लक्षण'', वर्णन केले आहे.

- आगमाचा ऊहापोह करतांना[५], ''आगमाची अनादिता, गणधर इत्यादिंपासून आलेले, आगमज्ञानाचे अतिचार, श्रुताचे अतिचार, द्रव्यश्रुताचे अपुनरुक्त अक्षर, श्रुताचा फारच कमी भाग शब्दबद्ध झाला, खूप कथन नष्ट झाले, विस्ताराचे कारण, विच्छेदाची भविष्यवाणी'', असा विस्तार आढळतो.
- 'द्रव्य व भाव आगमांचा निर्देश व समन्वय आचार्यांनी केला आहे.'[६]

''ह्या वर्णनात 'भावश्रुतालाच' ज्ञान म्हटले, 'भावाचे' ग्रहणच आगम आहे, 'द्रव्यश्रुताला' ज्ञान म्हणण्याचे कारण, 'द्रव्यश्रुत' जानण्याचे प्रयोजन, आगमांना 'श्रुतज्ञान' म्हणणे हा उपचार आहे'', अशा प्रकारे कथन केले आहे.

- 'आगमाच्या' अर्थ करणाऱ्या 'पाच विधींचे' सविस्तर वर्णन केले आहे.[७]
- 'आगमाच्या' प्रामाणिकतेबाबत निर्देश केला आहे[८]. ''उदाहरण देवून, अर्हंतवाणी असल्याने,

गणधर-आचार्य द्वारा कथित असल्याने, प्रत्यक्षज्ञानी द्वारा प्रणीत असल्याने, समन्वयात्मक असल्याने, पूर्वापार अविरोधीपणा, युक्तीने अबाधित'', इत्यादिंवरून प्रमाणिकता सिद्ध केली आहे.

● हे 'आगम' चार भागांमध्ये विभक्त आहेत. त्यांना 'अनुयोग' म्हणतात. 'प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग, द्रव्यानुयोग', असे चार अनुयोग आहेत. ह्या चार 'अनुयोगात' क्रमाने, 'कथा-पुराण' कर्मसिद्धांत-लोकविभाग, आचारविचार, चेतनअचेतन द्रव्यांचे स्वरूप व तत्त्वनिर्देश केला गेला आहे. ह्या व्यतिरिक्त 'वस्तूंचे कथन करण्यात, ज्या अधिकारांची आवश्यकता असते. त्यांना 'अनुयोगद्वार' म्हणतात'. ह्या चार प्रकारच्या 'आगमांचा' स्थूल आढावा देवून, विषय ओळख करून दिली आहे. ह्या सर्व विस्ताराचा सूक्ष्म अभ्यास करून, 'पुरुषार्थ' प्रकाशित केला आहे.

**कथनक्रम :** ह्या 'आगमांचे' विभाजन चार भागात केले गेले आहे.[९] त्या प्रत्येक 'अनुयोगाचे' लक्षण, सांगितले आहे.

● ह्या चारही 'अनुयोगांच्या' कथन पद्धतीत अंतर आहे, ते वर्णन केले आहे.[१०]

● 'चारही अनुयोगांचे' प्रयोजन कथन करून[११], 'चारही अनुयोगांची' कथंचित् गौणता व मुख्यता वर्णन करून, समन्वय साधला आहे.

**पुरुषार्थ प्रेरणा :-**

♦ १) 'जिनागमाचा सार' अनुयोगात विभाजित आहे. प्रत्येक 'अनुयोगाचे' तात्पर्य 'वीतरागता' आहे. कोणत्याही 'अनुयोगाचा निषेध' हा, 'जिनवाणीचा' निषेध ठरेल. प्रत्येकाच्या 'कथन पद्धतीत व विषयात' अंतर आहे. त्या 'अर्थ व प्रयोजनाला' समजणे व कथनविवक्षा समजणे, अत्यंत आवश्यक आहे. 'द्रव्य श्रुतापेक्षा भावश्रुतालाच' श्रेष्ठ मानले आहे. 'जैनत्वाचा' प्रवास 'भावानुसार' सुरू होतो व त्याची पूर्णताही 'भावानुरूपच' होते. 'भावश्रुताची' अनादिता, नित्यता, उपयुक्तता सांगून, 'पुरुषार्थाचा' उद्घोष करून, प्रेरणाच दिली आहे.

२) 'चार अनुयोगात' बद्ध आगम, क्रमश: 'पुरुषार्थाला' प्रेरणा देणारे आहे. जीवांना धर्माची रुचि निर्माण व्हावी म्हणून, गोष्टीरूपाने 'चक्रवर्ती, तीर्थंकर' इत्यादींचे चारित्र, उपदेश केले जातात, त्याला 'प्रथमानुयोग' म्हणतात. प्रत्येक जीवाला 'पुण्याचे', त्याच्या फळांचे, भोगांचे 'आकर्षण' असते म्हणून, ह्या कथांमधून, त्या 'भोगांच्या प्रलोभनातून, मोक्षाचा' उपदेश दिला जातो. 'प्रथमानुयोग' नेहमी 'भूतकाळाबद्दल' बोलतो, तो नेहमी 'साक्ष' देतो, ह्या 'कथांमधून' योग्य संस्कार' घडवितो. म्हणून 'कषायी' झाले असता, 'प्रथमानुयोगाच्या अभ्यासाचा' उपदेश केला जातो. ह्या 'भूत-भविष्याच्या' गोष्टी अवास्तव वाटतात, परंतु आजच्या काळातही

'तंत्रज्ञानाने' काहीही घडू शकते तर, तेव्हा 'मंत्र प्रभावाने' घडत असेल हे पटते. ह्या 'रसपूर्ण' वर्णनाने, 'भोगलालसेने' जीव 'तत्त्वाकडे' वळतो. ह्या 'वाचन-मनन अभ्यासाने,' हळूहळू 'तत्त्वाभ्यासाची' गोडी वाढते. त्या 'चक्रवर्ती, तीर्थंकरांचे चारित्र, तप, व्रत,' वर्णन, नकळत त्यांचा प्रभाव सोडतात आणि 'चारित्र धारणाचा' विचार वा तसा 'पुरुषार्थ' घडू लागतो.

३) 'प्रथमानुयोगाच्या' अभ्यासाने उद्युक्त झालेले मन, 'चारित्राकडे' वळू लागते. ह्या प्राथमिक दशेत, 'चारित्रात' स्थिरता नसते. हा स्थिरतेचा उपाय 'चरणानुयोग' सुचवितो. चरणानुयोग 'परीक्षा' घेणारा, 'हवे-नको' ची भाषा बोलणारा, 'करा-करू नका' ह्याचा आग्रह धरणारा असतो. म्हणून 'प्रमाद बहुलता' असतांना, 'चरणानुयोगाचा' अभ्यासाचा उपदेश दिला जातो. ह्यात प्रथम 'सम्यग्दर्शनाचेच स्वरूप व महत्त्व' व सम्यग्दर्शनयुक्त 'तप व व्रताचा' आग्रह केला जातो. तत्त्वज्ञानाने 'अतरंग शांती' वाढावी म्हणून 'सदाचारयुक्त' जीवनाची, अत्यंत आवश्यकता 'मोक्षमार्गात' सांगितली जाते. 'धार्मिक' अभ्यास म्हणजे 'धर्मांधता' नव्हे. 'लौकिक सज्जनता व नीतिमत्ताशिवाय' शास्त्राभ्यास करूनही, 'स्वच्छंदताच' पोसली जाते म्हणून, सतत 'चरणानुयोगाचे' पालन करण्यावर भर देतो. 'प्रलोभनांद्वारे व्रत, तपाकडे' वळवले जाते. प्रत्येकाच्या 'शक्तिनुसार, आवड, रुचिनुसार', धर्ममार्ग सांगून, निवडण्याचा मार्ग खुला ठेवला जातो. हळूहळू 'अशुभांपासून निवृत्ति व शुभांकडे प्रवृत्ति,' करण्याकडे वळविले जाते. बाह्य आचरणरूप 'पुरुषार्थाची प्रेरणाच' दिली जाते. 'अंतरंग वीतरागता व त्याला अनुरूप बाह्य आचरणांचा सुमेळ' घातला जातो.

♦ ४) 'करण' म्हणजे गणिताचे सूत्र होय.'करण' म्हणजे 'परिणाम' होय 'करणानुयोग विभाव व विभावाचे फळ' दाखविणारा आहे. 'कारण जसे, तसे कार्य घडते,' ह्याचीच गोष्ट 'करणानुयोग' करतो. हा जीवाच्या प्रत्येक 'परिणामानुसार,' त्याच्या 'गति, मार्गणा, गुणस्थान, कर्मविपाक,' इत्यादिरूपाने निकाल ऐकवणारा आहे. 'सर्वज्ञ' म्हणूनच, 'बुद्धी जड झाली असता', भव्य जीवांना, 'करणाणुयोगाच्या' अभ्यासाचा उपदेश देतात. ह्यातील बीजगणिते 'सम्यग्दर्शनास' कारण ठरतात. उपयोगाच्या 'सूक्ष्म, एकाग्रतेने,' हे 'सम्यग्दर्शन' प्राप्त होते. 'करणानुयोगातील' सूक्ष्म ज्ञानाने, ''आत्मगुण विकासित होवून, सत्याचे ज्ञान होते., अज्ञान दूर होते, कषाय मंद होतात, बुद्धी प्रखर होते, उच्चशुभभावाने 'सतिशय पुण्य बंध' होतो, कर्मा बाबतची मिथ्या भ्रांति दूर होते, भीति नष्ट होते, तत्त्वज्ञानाची खास दृष्टी तयार होते परिणाम शांत होतात, मरण भय दूर होते, जीवन- मरण व भव सुधारतात''. कारण म्हटलेच आहे की, 'रुचि अनुयायी वीर्य', जशी 'रुचि' असेल तसा 'पुरुषार्थ' घडतो. 'चरणानुयोगानुसार' तप, व्रतात मन रमू लागले की, 'करणानुयोग'जादुचा पेटारा उघडतो. 'बाईस्कोपातून' सिनेमा दाखववा तसा, 'करणानुयोग, त्रैलोक्यरचना, द्वीप-समुद्र, स्वर्ग-नरकांचा', अप्रतिम फेरफटका करवून आणतो. ह्या प्रवासात,

'कोण कोठे जाणार, कर्म व कर्माचे फळ दाखवून, एखाद्या 'न्यायाधीशाप्रमाणे, तटस्थपणे निकाल' ऐकवतो. ह्या 'करणानुयोगाच्या' सत्याला जाणून, 'बुद्धीला' चालना तर मिळतेच, 'ज्ञानही' होते, 'ध्यानात' मदत होते, हे 'मर्म वा गुपित' जाणण्यास, जीव प्रेरित होतो व 'शुद्धस्वरूपाला' जाणण्याचा 'पुरुषार्थ' सुरू होतो.

५) 'करणानुयोग, निमित्ताच्या' अपेक्षेने कथन करून, त्याची ओळख करून देतो. 'द्रव्यानुयोग', हा 'स्वभाव वा स्वभावाचे फळ' दर्शवतो. 'उपादानविवक्षेने' कथन करतो. द्रव्यानुयोग 'आहे' चे, 'वर्तमानाचे' कथन करतो. 'द्रव्यानुयोग' शिकवितो, म्हणूनच 'शंकाकूल मन' झाले असता, 'द्रव्यानुयोगाचा' अभ्यास करण्याचा उपदेश दिला जातो. 'द्रव्यानुयोग' वस्तूव्यवस्थेचे ज्ञान करवून, 'भेदज्ञानाचा' मार्ग दाखवतो. म्हणूनच त्याला 'परमागम वा आध्यात्मशास्त्रही' म्हटले जाते. 'आत्मानुभूती' प्राप्त करण्यासाठी, 'आत्म्याचे वर्णन, इतर द्रव्यांपासून भिन्नता, भेदज्ञान, आत्मशक्तींचे' वर्णन ह्यात केले जाते. 'तत्त्व, हेय-उपादेय, ज्ञेयाची', खरी ओळख करवून, 'ज्ञानवैराग्याची' महती सांगतो. जे 'आहे' त्याचे कथन करणारा, 'सर्व शंका दूर करणारा, अंतरंग जिज्ञासा, उत्कंठा' वाढविणारा, 'द्रव्यनुयोग' होय. ह्यात 'बाह्योपचार, शुभाशुभ आलंबन' चालत नाही, फक्त 'शुद्धाचा ध्यास, तळमळ' आणि त्या 'स्व' चेचे 'चिंतन, लीनता, स्थिरता' हवी असते. ह्या 'परिणामांच्या शुद्धींचा अवघड व नितांत आवश्यक, असा 'जागरूक पुरुषार्थ' सुरू होतो. 'अंतर्मूखता' हाच 'पुरुषार्थ' ठरतो. विभावात 'दुःख व अशांति' आहे व स्वभावात 'शांति व सुख' आहे हे दृढ होते. त्यामुळे 'परिणामांमध्ये धर्माप्रती' उत्साह वाढू लागतो. कारण 'धर्माचा प्रारंभ व पूर्णता आत्मानुभूतीनेच' होते.

अशा प्रकारे चारही अनुयोग, 'स्थूलाकडून-सूक्ष्माकडे, व्यवहाराकडून-निश्चयाकडे, अपूर्णाकडून-पूर्णत्वाकडे, अशुभ-शुभ-शुद्धाकडे', जाण्यास आवश्यक अशा 'पुरुषार्थाची' प्रेरणा देतात. साक्षात् 'पुरुषार्थपूर्वक' स्वर्ग-मोक्षाला गेलेल्या तीर्थंकरादिंचे वर्णन असल्याने, अप्रत्यक्षरित्या 'पुरुषार्थवर्धक' ठरतात. 'अनुयोग' 'कथनाची विविक्षा, आणि क्रम', हा मात्र कटाक्षाने लक्षात घेणे, त्यासाठी आवश्यकच ठरते.

## ३) गुरुउपदेश :

**प्रस्तावना :**

जैनधर्मात 'मोक्षाचे' निरूपण हे महत्त्वाचे अंग आहे. मोक्षाचा मार्ग सांगाताना,'रत्नत्रयाची एकतारूप' सांगितला आहे. त्यातही' सम्यग्दर्शनाचे' महत्त्व सर्वतोपरी वर्णिले आहे. ह्या 'सम्यग्दर्शनातील', व्यवहार सम्यग्दर्शनाच्या प्राप्तीत,'गुरुंचे' विशेष स्थान सांगितले जाते. अर्थात 'गुरुचे' स्थान 'लौकिक, परलौकिक, आध्यात्मिक', सर्वच अपेक्षेने आहे. अर्थात 'गुरुंमुळे' ज्ञान, तत्त्वओळख, शास्त्रगहनता समजते. जैनांनी 'देव-गुरु' इत्यादींना, एकत्रितपणे 'पंचपरमेष्ठीरूपाने' सांगितले आहे.

**भूमिका :** व्यवहारात, लौकिक दृष्टीने, 'गुरुंचे महत्त्व निर्विवाद असेल तरी, निश्चयाने, चिंतन केले असता, विचारधारा दुसऱ्याच दिशेकडे धावू लागली. इतर दर्शनांमधे,'भक्ती, गुरुकृपा, गुरुशरणता', ही प्रकर्षाने जाणवते. गीतेतील ''मामेक-शरणंव्रज, मदनुग्रह, मयाध्यक्षेण, मामश्रितम्, मामुपासते' अशा शब्दांची रेलचेल , ह्या गोष्टीचा पुरावाच आहे. अन्य दर्शनातील, 'ईश्वराचे स्थान व महत्त्व', ह्यामुळे ही'कृपा वा शरणभाव' स्पष्टच आहे. किंबहुना 'गुरुकृपा , ईश्वरकृपा, ही संसारासागर तारून नेणारी, आहे, असाच भाव प्रकर्षाने दिसतो. समाजात इतर धर्मपांर्थयां सह वावरतांना,'गुरुंच्या आध्यात्मिक प्रभावाखाली ओढावलेपणा, गुरुनिष्ठा, सर्वार्पणभाव, भारवलेपणा, वाहावलेपणा', हा प्रकार्षाने जाणवतो. ह्या प्रभावाने, संपूर्ण 'आयुष्य, धन, संपत्ती,' अर्पण केलेली उदाहरणे आढळतात, सद्य परिस्थितीतर तर, 'गल्लोगल्ली चाललेली बुबाबाजी, दूरदर्शनावरचे आध्यात्मिक अतिक्रमण, क्लास, शिबिरे, ध्यानसंस्थां, ह्यांची चलती दिसते. डोक्यावर हात ठेवून, 'साक्षात्कार' करवून देण्याचे, दावे केले जातात. ही इतकी'परावलंबनता, विवशता, शरणता', बघून, जैन धर्मातील'गुरुंचे' खरे स्थान कोणते? ह्या चिंतनाला सुरवात झाली. आगमात'प्रत्येकबुद्ध, बोधितबुद्ध स्वयंसंबुद्ध' अशी वर्णन आढळतात.'प्रथमानुयोगानुसार' तीर्थकरांना गुरु नसतात. ते कोणाकडे 'शिकण्यास' जात नाहीत,'दीक्षा घेंतानाही मात्र,' नमःसिद्धेभ्यः' असे उच्चारण करतात 'हे असे स्वरूप असतांना, 'गुरुचे स्थान, महत्त्व का व किती,आणि कशाला'?, हा प्रश्न पडतो. ह्या प्रश्नांची मीमांसा, 'तत्त्वदृष्टीने' केली आहे. अर्थात् हे 'स्व' चिंतन-मनन आहे. ह्याचा ऊहापोह करण्यापूर्वी परंपरागत पद्धतीने, जैन दर्शनातील 'गुरुंचे' स्थान निदर्शनास आणले आहे.

**स्वरूप** : 'जैन' दर्शन व्यक्तिपूजक नसल्याने, आराध्य देवतारूपात 'पंचपरमेष्ठींना' स्वीकारलेले दिसते. ही 'गुणवाचक' पदे असल्याने, ह्या 'पदांनुसार' असणाऱ्या सर्वांचा, त्यात समावेश होतो. लौकिक दृष्टीने 'शिक्षक, माता-पिता', ह्यांना 'गुरुंचा' दर्जा दिला जातो. 'गुरु' नावातच 'मोठेपणा' असल्याने, तशाच 'पात्रतेला' गुरुदर्जा दिला गेला आहे. मुख्यत: 'पंचपरमेष्ठी' आणि

व्यवहाराने 'सम्यग्दृष्टी श्रावकही', गुरु म्हणवले जातात. 'आगमात दीक्षा, शिक्षा, ज्ञान, परम' अशा रूपात 'गुरुंचा' उल्लेख आढळतो.

'आगमानुसार' परंपरागत परमेष्ठींचे वर्णन करून, नंतर 'स्व' चिंतनातून जाणवलेले मुद्दे मांडले आहे.

**विषयविस्तार** : 'जैन' दर्शनानुसार व्यक्ती, आपल्या कर्मांचा नाश करून, 'परमात्मा' बनू शकते. त्या 'परमात्म पदाच्या' दोन अवस्था, सांगितल्या जातात. ह्या अवस्था 'शरीर सहित व शरीररहित' म्हटल्या आहेत. 'प्रथमावस्था' ही तीर्थंकर व सामान्य, अशा दोन रूपाने कथन केली आहे.

**१) अरिहंत :-** आगमात ह्या पदाचे वर्णन[१२], ''पूज्यता अपेक्षेने, कर्मांचे हनन करण्याच्या विवक्षेने, भेदरूपाने कथन केले आहे. ह्यात अरिहंतांच्या १८ दोषांचा अभाव, ४६ गुणांची प्राप्ती, अनंतचतुष्ट्य, ३४ अतिशय, अष्टप्रतिहार्य इत्यादींचे सविस्तर वर्णन केले आहे. अरिहंतांचे अष्टमंगल द्रव्य, शरीर, केस, मृतशरीरासंबंधी धारणा, विहार, दिव्यध्वनी, १००८ नावे, १००८ लक्षण, महिमा, विभूति'', इत्यादींचे विस्तृत विवेचन केले गेले आहे.

**२) सिद्ध :-** 'पंचपरमेष्ठींमध्ये' अरिहंतानंतर 'सिद्धांना' नमस्कार केला आहे. 'सर्व कर्ममलाने मुक्त, सिद्धशिलेवर विराजमान, अनंतगुणांचे, ते धारक' असतात.

- 'सिद्ध' जीवांचे वर्णन आचार्यांनी[१३], 'लक्षण, सिद्धजीव, सिद्धगतीचे लक्षण, स्वरूप,' अशा रूपात केले आहे.

- 'सिद्धजीवांचा' निर्देश[१४], ''अर्हन्त व सिद्ध कथंचित् भेदाभेद, भावमोक्षाची श्रेष्ठता, अपुनरागमन, मोक्षाला जाणे व निगोदातून जीव निघणे, प्रयोजन, गुण, द्रव्य-क्षेत्र इत्यादी, उर्ध्वगमन अन्य शंकांचे निरसन'', अशा विस्ताराने केला आहे.

**३) आचार्य :-** 'परमेष्ठी पदातील' हे तृतीय पद होय. साधूंना 'दीक्षा व शिक्षा' देण्याचे, 'दोष निवारण्याचे',मुख्य कार्य दिसते. अन्य अनेक 'गुण विशिष्ट', संघनायक साधूंना 'आचार्य' म्हणतात. 'वीतरागतेमुळे' त्यांना 'पंचपरमेष्ठीत' स्थान आहे. गृहस्थांना 'धर्म-कर्माचे विधि-विधान' करवणारे 'गृहस्थाचार्य', पूजाप्रतिष्ठा करविणारे 'प्रतिष्ठाचार्य', सल्लेखनांत क्षपक साधूची चर्या करविणार, 'निर्यापकाचार्य', ह्यांचाही उल्लेख आढळतो. ह्यामध्ये साधूरूपधारी 'आचार्यच' पूज्य मानले जातात.

- आगमात आचार्यांचे कथन[१५], ''लक्षण, ३६ गुण, भेद, इत्यादी दृष्टीने केले आहे.''

**४) उपाध्याय :-** 'पंचपरमेष्ठीत' चतुर्थ स्थानावर 'पूज्य' म्हणून स्थान आहे. हे 'रत्नत्रयाने युक्त, ११ अंग, १४ पूर्वधारी, व त्याचा उपदेश देणारे' असतात. ह्यांचे '२५ गुण' सांगितले

जातात. हे स्वयं 'अध्ययन' करतात व शिष्यांना 'अध्ययन' करवितात. बाकी सर्व व्रतादि मुनिंसमान असतात.

**५) साधू :–** 'परमेष्ठीपदातील' हे अंतिमपद होय. 'पाच महाव्रत, पाच समिती', इत्यादि २० मूलगुणांचे, 'सकल चारित्राचे पालन' करणारे निग्रंथमुनि 'साधू' होय. ह्यात 'आत्मशुद्धीची' प्रधानता असते. ह्यात 'पुलाक' इत्यादि भेद आहेत. हे अंतिम तीन पद, 'साधूपणाच्या' विविक्षेने समान असून , संघकृत उपाधिमुळे भेद आहेत.

- ह्या विषय वर्णनात, लक्षण, गुण, भेद वर्णिले आहे[१७].

- व्यवहार साधूंचे वर्णन[१८], ''लक्षण, मूळ व उत्तर गुण, कर्तव्य, शरीर संस्काराचा निषेध निषिद्ध कार्य'', अशा प्रकारे केले आहे.

- निश्चय साधूंचा निर्देश[१९], ''लक्षण, ओळख, सम्यक्त्वाची प्रधानता, समन्वय, अयथार्थ साधूंची ओळख'' अशा विस्ताराने केला आहे. 'पुलाक' इत्यादि साधूंचाही निर्देश केला आहे.

- आचार्य-उपाध्याय-साधूंमधील वर्णन[२०], 'चारित्रअपेक्षेने एकता, तिन्ही एकाच आत्म्याच्या पर्याय, कथंचित् भेद', इत्यादि दृष्टीने केले आहे.

- गुरुंचा निर्देश करतांना[२१], ''अरिहंतांना परम गुरु म्हटले आहे. आचार्य-उपाध्याय साधूंनाही गुरुंचा दर्जा दिला आहे. त्यासाठी 'संयत' असण्याची अट ठेवली आहे. निश्चयाने आत्म्यालाच गुरु मानले आहे. 'व्यवहारनयाने' उपकार करणाऱ्या सर्वांना, कथंचित् गुरुचा दर्जा दिला आहे. ह्यात प्रामुख्याने 'गुरु-शिष्य' संबंध वर्णिला आहे. 'दीक्षागुरु' इत्यादींचे वर्णन केले आहे.''

- अशाप्रकारे आगमात परंपरागत पद्धतीने गुरुंचा निर्देश केला गेला आहे. ह्या सर्व विषयाच्या अभ्यास-मननातून, जे वेगळेपण जाणवले, तत्त्वदृष्टीने जो भेद लक्षात येतो, तो प्रकर्षाने कथन केला आहे. ह्या 'स्व' चिंतनातून प्रकर्षाने जाणवलेले 'मर्म' स्पष्ट केले आहे.

**पुरुषार्थदृष्टीने मीमांसा :–**

१) 'एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यात काही करू शकत नाही'. 'कुंदकुंदाच्या' मतानुसार व्यवहारनयाने, 'अशुभाचा त्याग व शुभात प्रवृत्ति' असेपर्यंत, 'परमेष्ठींचे' आलंबन योग्य आहे. निश्चयनयाने तर, 'अरिहंत' सुद्धा परद्रव्यच मानले आहे. (स.सा. ३७२) 'समयसाराच्या' ह्या गाथेत तर, 'अन्य द्रव्यात, अन्य द्रव्याकडून, गुणांची उत्पत्तीही' निषिद्ध मानली आहे. जैन दर्शनाने, 'एकत्व व अन्यत्व' भावनांचा पुरस्कार केला असतांना, 'गुरुकृपा' कशी मानणार ?

२) जैन दर्शन मुळातच, 'स्वावलंबनता, व्यक्तिस्वतंत्रता, पुरुषार्थाचा', जयघोष करणारा आहे. 'ईश्वरतत्त्वालाही' न स्वीकारणाऱ्या, 'जैन दर्शनात' गुरु शरणता, उद्‌भवतच नाही. 'स्व' 'द्रव्य-क्षेत्र-काल-भावाच्या', मुख्यतेने कथन करणाऱ्या जैन दर्शनाने, 'स्व' कृतीवर भर दिला.

♦ ३) 'गुणस्थानांच्या' चिंतनात, सहाव्या गुणस्थानापर्यंत, 'गुरु-उपाध्याय-आचार्य' ह्यांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता दिसते. पुढच्या 'गुणस्थानांचा' प्रवास हा, 'अत्यंत कठीण, महत्त्वाचा, खडतर' व सर्वस्वी 'पुरुषार्थावर' आधारित आहेत. त्या 'गुणस्थानांच्या' उत्कर्षात, 'गुरुकृपा' आवश्यक नाही. 'गुणस्थानातून' तर, प्रकर्षाने 'पुरुषार्थाचा उत्कर्षच' स्पष्ट होतो. 'गुरुकृपा, गुरुस्पर्श, गुरुंचा वरदहस्त, अनुकंपा, उपकार', ह्यांचा स्पष्ट विरोध दिसतो. 'गुणस्थानांची' रचनाच मुळी, 'गुरुस्थानाची मर्यादा' दाखवणारी आहे.

४) 'श्वेतांबर संप्रदायील' मूलसूत्र असलेल्या, 'उत्तरअध्ययनाच्या' दहाव्या अध्यायात (३१), वर्णन आहे की,

''न हु जिणे अज्ज दइस्सई, बहुमए दइस्सइ मग्गदेसिए । संपई नेआउए पहे, समयं गोयम! मा पमायए।।''

अर्थात्, ह्या वर्तमानात 'जिन' दिसत नाहीत, पण मुक्ती देणारा 'जिनमार्ग' दिसतो. तो न्यायमार्ग प्राप्त असतांना, हे गौतमा, समयाचाही ही प्रमाद करू नये. गौतमासारख्या, सर्वात मुख्य, प्रिय शिष्यालाही, महावीर 'मी नेतो, वा मला शरण ये, वा मोक्ष देतो' असे 'वचन' देत नाही. उलट 'कडक व कठोर' शब्दात जाणीव देवून, 'मोहनिद्रेतून' जागे करतात. महावीर म्हणतात की, गुरुंप्रती असणारा शुद्ध स्नेहसुद्धा संसारात बंधकच आहे. त्याला तोडण्याचा उपदेश दिला आहे.

''वोच्छिंद सिणेहमप्पणो कुमुयं सारइयं च पाणियं । से सव्वसिणेहवज्जिए समयं गोयम!मा पमायए ।।२८।।''

♦ ५) 'जैन' दर्शनात, 'साधू-आचार्यांना' सतत विहाराचाच उपदेश दिला आहे. कोठेही 'पीठ वा संस्था वा स्थान', स्थापन करण्याची परवानगी नाही. वर्षाकाळात जो मर्यादित वास होतो, त्याकाळापुरते 'साधूंकडे, गुरुंकडे जाणे, शिकणे, प्रवचन, उपदेश ऐकणे' इत्यादि दिसते. मात्र ते 'तात्कालिक' असते. त्या काळातील, त्या दिव्य सान्निध्याने, 'मन, भावना, विचारांचे परिमार्जन, प्रक्षालन, प्रतिक्रमण' होवून, श्रावक जणू 'अंतर्बाह्य शुद्ध' होतो. त्यानंतर मात्र कोणाच्याही 'मागे जाणे, वाहावणे' हे दिसत नाही. विशिष्ट साधूंप्रती विशेष 'स्नेह, भक्ती, श्रद्धा' असली तरी, सर्वस्व अर्पण करून, 'भारावलेपणा वा शरणता' मात्र नक्कीच आढळत नाही. त्या चातुर्मास काळात 'धर्माचे' एक वातावरण असल्याने, 'अभ्यास, स्वाध्याय, धर्मक्रिया, तत्त्ववाचनाला', खतपाणीच मिळते. ह्या काळात 'गुरुंनी' सुरू केलेले अध्ययन मात्र, विशेष स्वाध्यायी, 'साधर्मींसह चर्चा, अध्ययन, अध्यापन, स्वाध्याय, परीक्षा, चिंतन, मनन', ह्याद्वारा विशेष प्रयत्नाने विकसित केलेले स्पष्ट दिसते. ह्या विकासात, 'स्वयंस्फूर्तता, पुरुषार्थ, विशेषस्वाध्याय, रुचि', ही प्रकर्षाने दिसते मात्र, 'गुरुंचा' वरदहस्त दिसत नाही. ह्या चातुर्मासात मिळणारी प्रेरणा, एवढीच काय ती 'गुरुकृपा' असते. 'आध्यात्मिक विकास, उन्नति,स्वीकृती, कार्य, उद्दम, आवड, रुचि, गती, निकडीवर', अवलंबून असल्याने, त्याचे सामाजिक स्वरूपही तसेच दिसते.

त्या काळात प्रत्येक व्यक्ती, 'आपल्या भक्ती, आवड, शक्ती, गरजानुरूप' चर्चा, प्रवचन, क्रियाकांडांचा आधार घेतो. 'गुरु' मार्गदर्शनाने, आर्शीवादाने, अज्ञानाची पूटे दूर करून, खरे स्वरूप जाणले जाते. 'स्वाध्यायाची' ऊर्जा मात्र, नंतर 'स्व' प्रयत्न, 'पुरुषार्थानेच' राखली जाते व ती 'वृद्धिंगत करून, जीवंत' ठेवली जाते. हा 'स्वाध्यायच' पुढे 'पुरुषार्थ' ठरतो. हे 'वाचन, चारित्रपरिचय, ग्रंथस्वरूप, समाजरचनेचे', आजचे स्वरूप बघून, 'गुरु धर्मारंभ, मोक्षारंभ, ज्ञानारंभ', इत्यादिसाठी महत्त्वाचे आहेत हे नक्की तरी,पुढचा प्रवास 'पुरुषार्थानेच होतो',हाच सूर निघतो.

६) 'दिगंबर जैन' संप्रदायात षट्आवश्यकांमध्ये, 'देवपूजा, गुरुपास्ति, स्वाध्याय, संयम, तप, दान', ह्यांचा उल्लेख केला आहे. सुरुवातीला 'खऱ्या देव-शास्त्र गुरुंचे स्वरूप, आगम-अनुयोगांची ओळख, तप-दान-त्यागाचा मार्ग', ह्यांची ओळख 'गुरुच' करवून देणार. नंतर 'स्वाध्याया'च्या सातत्याने, सहजी 'संयम, तपाचा', मार्ग सुकर होत जातो. 'सम्यक् श्रद्धानाने, ज्ञानमार्गावर', अतूट विश्वास ठेवूनच, पुढचा 'सम्यक् चारित्राचा' प्रवास सुरू होतो. ह्या 'चारित्राचा स्वीकार 'कसा, किती, कधी', करायचा हा अधिकार, जीवाच्या 'विचार, विश्वास, सामर्थ्यावर', अवलंबून असणारा 'पुरुषार्थच' आहे. जैनांनी ही जी, 'खरे देव-शास्त्र', गुरुंची' मर्यादा ठेवली, ही मर्यादाच 'पुरुषार्थ वर्धक वा पुरुषार्थ प्रेरक' ठरली. जैनांनी 'स्वालंबन व व्यक्तिस्वातंत्र्याच्या', खांद्यावर तत्त्वांची बैठक रचली, त्यामुळे 'परावलंबनतेला' थाराच दिला नाही. त्यामुळेच 'बुवा, बाया, अम्मा, भक्तांचे जत्थे, लोंढे', असे दृश्य जैनधर्मात दिसत नाहीत.

७) आगमाने 'दीक्षा, शिक्षा, ज्ञान' गुरु स्वीकारलेत मात्र, 'मोक्षगुरुंचा' उल्लेख केला नाही. ह्यातच मला 'पुरुषार्थ' दडलेला जाणवतो. मुख्यत: आधी तर, 'गुरु' निवडण्याचे स्वातंत्र्य दिले. 'समाजव्यवस्था, संघव्यवस्थेसाठी' आचार्य नेमलेत, उपाध्याय, साधूही दिसतात. मात्र श्रावकांनी कोणाला 'गुरुदर्जा' द्यावा, ह्याचा आग्रह धरला नाही. जैनदर्शनाने कोणावरही 'तत्त्व वा तप वा त्याग' काहीच लादले नाही. ह्यातूनच 'पुरुषार्थाकडे' असणारा रोख स्पष्ट होतो. 'गुरु वा आचार्यसुद्धा' नाव प्रसिद्धीसाठी, शिष्य परिवारामागे धावलेले आढळत नाही. कारण जैनांचे तत्त्वच, 'आदहिंद च कादव्वं, जं सक्कइ तं परहिदं च कादव्वं' हे आहे. आत्महित हेच प्रमुख कर्तव्य आहे लोकसंग्रहाला विरोध केला.

♦ ८) आगमात 'गुरुविनय, गुरुउपासना, गुरुपास्ति', ह्यांचे महत्त्व नक्कीच नाकारले नाही मात्र, 'शरणागतीही' पत्करली नाही. 'सम्यग्दर्शनाचे' जैन धर्मातील स्थान निर्विवाद आहे. त्यात 'वात्सल्यअंगाचा' स्वीकार केला आहे. अंतरंगतपात 'तीर्थंकर' प्रकृतीच्याबंधात, 'दानरूपानेही वैयावृत्याचा' पुरस्कार केला. 'नवधा भक्तीने गुरुपासना' सांगितली. मात्र त्या सर्व 'वैयावृत्यात' इत्यादित, उगाचच गळे काढून 'गुरुवर्णन' केले नाही. त्यात 'सेवा' ह्या, नैतिक 'मूल्याला वा

कर्तव्याला' अग्रस्थानी ठेवले. 'वैयावृत्याने अहंकाराचा' नाश मानला. 'विनयतपाला' पुष्टी देण्यास 'वैयावृत्याचे' महत्त्व सांगितले. त्याने 'मन व आत्म्याचे' प्रक्षालन मानले, त्या होणाऱ्या 'भावभावनाशुद्धीने', 'तीर्थंकरांसारख्या पुण्यप्रकृतीचा बंध मानला. 'देव-शास्त्र-गुरु, तत्त्व, द्रव्य', सर्वांना अत्याधिक महत्त्व दिले. मात्र शिष्यांची आध्यात्मिक उन्नति 'गुरुस्वाधीन' न मानता, 'पुरुषार्थाधीन' मानली. 'अशुभाचा त्याग-,शुभात प्रवृत्ति, व शुद्धावर दृष्टी', ठेवण्याच्या, ह्या 'प्रयत्नात, अभ्यासात, गुरु मार्गदर्शन' आवश्यक मानले. मात्र विशिष्ट 'गुणस्थानात' पोहचल्यावर, 'शुभाचा, आलंबनांचा, व्यवहाराचा' त्याग, आणि निश्चयाचा आधार',उपादेय मानला. 'प्रवृत्तिकडून निवत्तिकडे, पर कडून स्व कडे, आलंबनाकडून - निरालंबनाकडे', जाण्याचा जैनांचा हा क्रमच 'पुरुषार्थप्रेरक' आहे. त्यासाठीच 'गुरु' चा स्वीकारही त्याच अंगाने केलेला स्पष्ट होतो.

### ४) धर्मसंगति :

भारतीय सर्व परंपरामध्ये, धर्मदृष्टीने 'संगतीला' खूपच महत्त्व दिले गेले आहे. 'संगतीचा' मनावर खूपच परिणाम होतो. त्यामुळेच धार्मिक क्षेत्रात, 'दुर्जन, स्त्रिया, आर्यिका', ह्यांच्या 'संगतीचा' निषेध केलेला आढळतो. सर्वत्र 'गुणिजनांशी संगति' ही सांगीतली जाते. लौकिक व्यवहारातही संगतीचे परिणाम स्पष्टपणे दिसतो.

- भ.आ नुसार[२२] ''जो जारिसीय मेत्ती करेइ सो होइ तारिसोचेव''

असे म्हटले जाते. आचार्यांनी अनेक उदाहरणे देवून, 'संगतीचे' महत्त्व स्पष्ट केले आहे.

- प्र.सा. नुसार[२३], 'कषायांचे शमन करणारे, तपवान, ज्ञानी जीवांनी लौकीक जनांचा संसर्ग न त्यागला तर, ते असंयमी ठरतात'. कारण अशा संगतीने, 'व्यग्रता, चंचलता, कुटिलता' वाढते. श्रावकांच्या घरी उगाचच बसणे, स्त्री सहवास, इत्यादिने, 'ब्रह्मचर्यात दोष' लागतो. तरुणांच्या संगतीने मनातील चांगले विचारही मलीन होतात. 'विषयांची अभिलाषा वाढते, भोगारतता वाढते'.

- ह्यासाठी आगमात[२४] 'सत्संगतीचे' माहात्म्य प्रकर्षाने वर्णिले आहे. त्यामुळे 'भावना, मन' शुद्ध होते, मोह शांत होतात, 'वैराग्यात' वृद्धी होते, 'शील गुणांची' प्राप्ती होते, विवेक, चारित्र, प्राप्ती होते' त्यासाठीच 'गुणाधिकांचा' संग करण्यास सांगतात. मैत्री कोणाशी करावी त्याची चर्चा केली आहे.

**पुरुषार्थदृष्टीने मीमांसा** :

आगमामध्ये साधूंसाठी, 'दुर्जन, तरुण, स्त्री, साध्वी 'इत्यादींच्या 'संगतींचा' निषेध केला आहे. लौकिक अपेक्षेने सुद्धा वाईट संगति टाळण्याचा उपदेश दिला जातो. ह्या 'सत्संगति वा धर्मसंगतीने', कशी पुरुषार्थ प्रेरणा मिळते, ह्यावरील चिंतन-मननाने प्राप्त विचारधारा, मी मांडत आहे.

१) महावीरांनी 'चतुर्विध संघाची पुन:स्थापना' केली. ह्या 'संघभावनेतूनच' खऱ्या अर्थाने 'समाजिकरणाची' सुरूवात झाली, 'संघशक्तीची' भावना वाढीला लागली.

२) अरिहंतांची दिव्यध्वनी 'समवशरणात' होते. त्यातील बारा सभां (कोठे) मधे 'भव्यजीव' विराजमान असतात. किंबहुना त्यांच्यासाठीच हा उपदेश दिला जातो. त्यातूनच 'समाजधारणा, समाजव्यवस्था, समाजाप्रती बांधिलकी, संगतीचे महत्त्व' दृढ होवून, 'प्रवचनाचे महत्त्वही' वाढले.

३) 'कर्मभूमीत मनुष्यांना' राहण्यासाठी समाजाची आवश्यकता असते. 'कुटूंब, समाज, देश', ह्यांच्या कल्याणासाठी, 'संधिकरणाची' आवश्यकता वाढू लागली. 'सामाजिक मनाची उत्पत्ती' ह्यातून झाली.

४) श्रावक शब्दात 'श्रु' शब्द म्हणजेच ऐकणारा होय. 'जिन प्रवचनांना, वाणीला, उपदेशाला श्रद्धापूर्वक', ऐकणारा तो 'श्रावक' होय. महावीरांच्या दाखवलेल्या मार्गावर आरूढ होणाऱ्या दोन पद्धती आहेत. साधूंचा मार्ग, 'त्यागमय, एकांतप्रवृत्ती, एकांतवास, विविक्तशय्यासनाचा' आहे. तो मार्ग 'संगतीचा नसून विसंगतीचा' आहे. श्रावकांचा मार्ग,' स्थूल त्यागरूप प्रवृत्तिधर्माशी' जोडलेला आहे. समाजात राहूनच, 'सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, नैतिक, धार्मिक, आध्यात्मिक', उत्कर्ष साधायचा हा मार्ग आहे. ह्या क्षेत्रातली प्रगती एकट्याने होतच नाही. त्यात 'संगति' महत्त्वाची असते. त्यातूनच 'देव-घेव, आदान-प्रदान, विवाह, भंडारा, गौतमप्रासादी, संम्मेलने, उत्सव-पर्वांचा', जन्म झाला.

५) ''दया-दान-वैयावृत्य, पूजा, व्रतविधान, पंचकल्याणक महोत्सव, महामस्तकाभिषेक, उद्यापने, पर्युषणपर्व, वात्सल्यभाव, प्रभावना,'' हे सर्व त्या 'धर्म संगतीची' दृश्यरूपेच आहेत. श्रावकांना वेगळा 'आत्मकल्याणासाठी,' बोधासाठी, उपदेश आवश्यक आहे, पण तो प्रत्येकाला वेगळावेगळा दिला जात नाही. तो एकत्रितपणेच दिला वा घेतला जातो. त्यासाठीख 'मंदिर, उपाश्रय, देरासर, चर्च' ह्यांची समाजात निर्मिती झालेली दिसते.

♦ ६) समाजातही एकत्रितपणे केलेले धर्म उत्सव दिसतात. 'मुसलमानांचा' एकत्रितपणे केलेला नमाज वा 'ख्रिश्चनांची प्रार्थना', 'वैदिकांची काकड आरती', 'जैनांचे पर्युषणपर्व, महावीर जयंति, मिरवणूका', हे सर्व त्या 'धर्मसंगतीचे' प्रतिक वा द्योतकच आहेत. दैनंदिन कर्तव्यात, एकट्याने केलेली 'पूजा, पाठ स्वाध्याय, सामायिक, ध्यान', हे ठिक असले तरी, विशिष्ट प्रसंगी 'एकत्रित प्रयत्न हा आवश्यकच' आहे. त्याने 'धर्मप्रचार, धर्मभावना, धर्मजागरण, आपलेपणा, प्रेम, आत्मियता', उत्पन्न होते. 'समाज सशक्त बनतोच,' पण 'व्यक्तिगत विकास ही होवून, भावशुद्धी' होते. धर्माप्रती 'आदरभाव, अभिमान' जागृत होतो. त्यासाठीच ''पर्युषणात एकत्रितपणे केलेले प्रतिक्रमण, क्षमापना, तसेच सार्वजनिक गणेशोत्सव, सामुहिक प्रार्थना, जप-अनुष्ठान, ध्यानसाधना'' ह्यांची निर्मिती झाली. त्या एकत्रित ऊर्जा निर्मितीने, 'आत्मप्रसन्नता, शुद्धी, पवित्रता' वाढते.

७) भारतासारख्या 'आध्यात्मिक, संस्कारशील' देशात म्हणूनच, 'एकत्रित कुटूंब, एकत्रित विद्याध्ययन, एकत्रित जेवण' ह्यांचे महत्त्व आहे. ह्यासाठीच पूर्वी मोठमोठे राजे, राजकुमारही 'ज्ञानार्जनासाठी गरुकुलात' राहायचे. त्यातूनच 'एकत्र शिक्षण पद्धती' विकसित झाली. त्याने 'लहान-मोठा, श्रीमंत-गरीब', ही दरी कमी होवून, 'दृष्टी व विचार विशाल' होतात, 'चुका कळतात, आपले स्थान कळते. एकत्रित अभ्यासाने, त्याची गोडी वा आवड वाढते, प्रोत्साहन मिळते.' म्हणूनच 'व्रत, उपवासही' एकत्रित केल्याने,'आधार-बळ-प्रोत्साहन मिळून, पुरुषार्थास प्रेरणा' मिळते. ही 'संगति सुप्त पुरुषार्थशक्ती', जागृत करण्यास सहाय्यक ठरते.

८) धार्मिक दृष्टीनेही, ‘प्रभावना, वात्सल्यभाव, वैयावृत्य, तीर्थयात्रा’, ह्यांचे महत्त्व दिसते. ‘शोभायात्रा, जुलूस, वाद्ये, सामुहिक व्रत, मंदिर बांधणे’, हे प्रभावनेच अंगच आहे. शिवाय ‘आत्मोन्नती, धर्मआस्था, दान’, इत्यादीने शुभाश्रवाचा ‘पुरुषार्थ’ घडतो. श्रावकांनी ‘साधूंची सेवा करणे, ज्ञानदान, औषधदान, अन्नदान’, इत्यादीने साधूसत्संग घडतो. त्याचे ऋणरूपाने साधू ‘धर्मोपदेशना देवून, धर्माची प्रेरणा’ देतात.

ह्या सर्व चिंतनातूनच ‘धर्मसंगति ही पुरुषार्थात आदर्श’ वाटते. श्रावकांनाही ‘छोट्या छोट्या पुरु षार्थाने प्रेरणा’ मिळते व ‘मोक्षपुरुषार्थाकडे’ वाटचाल अधिकच सुसह्य होते ह्यात शंकाच नाही.

## प्रकरण २

## उपविभाग ४

## (१ ते ४ संदर्भ-सूचि)

१) ध. १ । १, १,१ । गा. ४४ । ५८; म.पु. १४ । १६५; ह.पु. ४३ । ७८; बो.पा. ३२

२) स.सि.'।११।७; ध. ६ । १, ९-१।३०।६७।१; १३।५, १०१।३६६।७; ८।३, ३८।७५।१ ४०।७८।७ ३८।७४।४-८ म.पु. १२।९६-९७, १६३; गो.क. ९३

३) नि.प. ४।५१०-५११; १४७३-१६१९; ह.पु. ५४।५९-६०; ध.-१।१, १,१।४३।५८

४) नि.सा.८; र.क.श्रा.९; ध.१३।१,२,,२१९।११।१२;१।१,१,१,।२०१७; रा.वा.९११२।७।५४४। १।२०।१५।७८।१८८

५) रा.वा.६।१३।२।५२३।१९, गो.जी ३३४; स.त.१६; ध.१३।५,५।१४।१८-२०।२६६।४ ३।१।२,१०२।३६३१३

६) ध. १३।५, ४, २६।६४।१२ २१।२१०।९

७) द्र.सं.टी.२।९;२२।६६: ध. १।१,१,३०।२२९।९; १।१,१,१०।१६; ३।१०

८) ध.१।१,१,१,७५।३१४।५; रा.वा.८।१६।५६२; ध.पु.४,६,७,१३, इत्यादीत हे वर्णन आहे.

९) द्र.सं.टी. ४१; ४२।८,९,१०,११: र.क.श्रा.४३-४५; ध.२।१,१,२।१,१,२।४

१०) द्र.सं. टी.१३।५; मी.मा.प्र. ८।७।९,१४; ८।८।२,१४; ८।१४।७

११) मो.मा.प्र. ८ वा अधिकार

१२) मू. आ.५०५-५६२; बो.पा २९,३०; ध.१।१,१,१।४४।६,९,२३-२५; नि.सा,६,७१; द्र.सं.टी.५०।१,९;३५।५; म.पु.३३।१८६; १५।३७-४४; १।९; २५।१००-२१७

१३) पं.का. २८; नि.सा.७२, प.प्र.१।१६-२५; भ. आ.२१३३

१४) प्र.सा. १७; प.प्र.टी.२।४।१३; १।६१।१;१।३०।९; द्र.सं.टी. १४।६,५१

१५) भ. आ.४१९,४१७-४१८; मू.आ.५०९-५१०; नि.सा. ७३ र.क.श्रा. ५

१६) नि.सा.७४; मू.आ.५११, ध.१।१,१,१।३२।५०,१

१७) मू.आ.५१२; प्र.सा-२४५; त. सू. ९।४६; द्र.स.५४

१८) प्र.सा.२०८-२०९;भ. आ ४२१; मू. आ.८३६-९१६; भा-पा.६९; लि.पा-३-२०

१९) प्र.सा. २४१,९१,२१,२६४; नि.सा ७५; मो.पा-१२२; सू.पा.१५

२०) मो.पा.१०४; पं.ध.उ. ६३९-६४४; ७०९-७१३;

२१) पं.ध.उ. ६२ ते ६५८; प्र.स.२१०,२५६;

२२) भ. आ. ३४३.३४८;१०७२-१०८४,

२३) प्र.सा. २६८; र.सा.४२; पं.ध.उ.६५५

२४) प्र.सा. २७०, भ. आ.३५०-२५३

# प्रकरण ३

# ''जैन तत्त्वज्ञानात कर्मसिद्धांताचे स्थान''

## उपविभाग १

## प्रस्तावना : 'जैन तत्त्वज्ञानात कर्मसिद्धांताला अग्रस्थान' मिळण्याची कारणे : मीमांसा

## उपविभाग २

## 'अष्टकर्मांची पुरुषार्थ दृष्टीने समीक्षा'

१) कर्माचे स्वरूप, लक्षण, भेद, इत्यादिरूप सामान्य वर्णन

२) 'कर्मसिद्धांतातील', महत्त्वाच्या, मूळ, संकल्पनांचा आढावा

३ ) 'अष्टकर्म' : मूळ व उत्तर प्रकृतिः लक्षण-भेद, आस्रवांची कारणे

४) 'स्थितिबंध' : स्वरूप-भेद-वैशिष्ट्ये इत्यादि विवेचन

५) 'अनुभागबंध' : स्वरूप-लक्षण-भेद इत्यादि विवेचन

६) 'प्रदेशबंध' : लक्षण-भेद-वैशिष्ट्ये इत्यादि विवेचन

## उपविभाग ३

## 'दशकरण : कर्मांच्या दहा अवस्थांची पुरुषार्थदृष्टीने समीक्षा'

## प्रकरण ३

## उपविभाग १

## ''जैन तत्त्वज्ञानात कर्मसिद्धांताला अग्रस्थान मिळण्याची कारणे : मीमांसा''

**प्रस्तावना :-**

सर्व भारतीय दर्शनांमधे, (चार्वाकसोडून) 'आध्यात्मिक प्रगतीला वा श्रेष्ठतेला,' महत्त्व दिले गेले आहे. 'पुनर्जन्म, प्रणिगत विचित्रता, मोक्ष वा अंतिम सत्य', सर्वांनीच ह्या प्रश्नांचा सतत पाठपुरावा केलेला आढळतो. 'श्रेयोमार्गाला' महत्त्व देणाऱ्या, सर्व दर्शनांनी सतत, ह्या विषयांशी संबंधित, यथार्थ कारणांचा शोध घेतला. सर्वांनीच आपआपल्या दृष्टीने, त्याची कारणे देण्याचा प्रयत्न केला. ह्या सर्व चिंतनातून, सर्वांनी 'कर्म', ह्या कारणाचा स्वीकार केलेला आढळतो. सृष्टीतील विविध घटनांच्या मूळाशी, त्यांच्या विचित्रतेच्या मूळाशी, 'कर्म', असल्याची मान्यता दिसून येते. भारतीय दर्शन जगतात, 'माया आणि कर्म', हे दोन अत्यंत गहन प्रत्यय मानलेले, स्पष्टपणे निदर्शनास येतात. भारतीय विचारधारा, 'कर्मवादाचे' प्रबल समर्थन करताना दिसते. 'पुनर्जन्माचा' आधारही, 'कर्म' हेच मानलेले दिसतात. भारतीयांचा, 'भाग्यवादही मूळतः कर्मवादावर' आधारित असलेला, स्पष्टपणे निदर्शनास येतो.

'कर्म' हे 'पुरुषाधीन, आत्मस्वाधीन', आहे म्हणूनच, 'मोक्षाची' शक्यता अधिकच प्रकर्षाने सिद्ध होते. 'भोग हे कर्माधीन' असून, 'कर्म हे पुरुषाधीन' असल्यानेच, 'आत्मस्वातंत्र्य' महत्त्वाचे ठरते. किंबहुना ह्या विधानानेच 'पुरुषार्थाचे' अस्तित्व सिद्ध होते. 'स्वकृतकर्म', हे महत्त्वाचे असल्यानेच, 'काय करावे, ह्या 'पुरुषार्थाकडे, अधिकच लक्ष वेधले गेले. आगमातील अनेक गाथा, ह्या गोष्टीला अधिकच पुष्ट करणाऱ्या ठरतात.

''अप्पा चेव दमेयव्वो अप्पा हु खलु दुद्दमो । अप्पा दंतो सुही होई, अस्सिं लोए परत्थ य'' ।।
''वरं मे अप्पा दंतो संजमेण तवेण । माहं परेहिं दम्मंतो, बंधणेहि वहेहिं य ।। उत्त. अ. १/१५, १६, ९/३५
''अप्पा नई वेयरणी, अप्पा मे कूडसामली । अप्पा कामदुहा घेणू, अप्पा मे नंदणंवणं'' ।।
उत्त. अ. २०/३६
''अप्पा कत्ता विकत्ता य, दुहाण य सुहाण य । अप्पा मित्तममित्तं च दुप्पाट्ठियसुप्पट्ठिओ ।।
उत्त. अ. २०/३७

### विवेचनातील मुद्दे :

(१) सर्व 'आचारदर्शनामधे, जनसामान्यांच्या 'नैतिक स्थिरतेसाठी', 'कर्मसिद्धांताची' स्थापना केलेली दिसते. कर्मसिद्धांतात 'नियतता आणि स्वतंत्रता', ह्या दोन गोष्टी, अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. 'कर्मसिद्धांताच्या' विकासात, तीन गोष्टी, प्रामुख्याने विचारात घेतल्या जातात.

१) प्रत्येक क्रिया, त्याच्या परिणामाशी जोडलेली आहे. (स.सा.७०,१७९,१८०)

२) ज्याने पूर्ववर्ती क्रिया केली आहे, तोच त्या परिणामांची अनुभूती करतो.'जो कर्ता तोच भोक्ता', हीच 'कर्मसिद्धांताची' सत्यता आहे. जी ह्या, 'उत्त.अध्ययनातील' श्लोकाने अधिकच स्पष्ट होते.

''न तस्स दुक्खं विभयंति नाईओ, न मित्तवग्गा न सुया न बंधवा ।
एक्को सयं पच्चणुहोइ दुक्खं, कत्तारमेवा अणुजाइ कम्मं'' ।। उत्त अ. १३/२३

३) 'कर्मबंध, त्याचा उदय व विपाक-फळ', ही परंपरा अनादिकाळापासून चालू आहे. (स.सा.१९४,१९८,२००; त.सू. ८/२१/२३)

(२) सर्व भारतीय दर्शनांच्या चिंतनाचा विषय, 'कर्मसिद्धांत' असला तरी, त्याच्या 'सांगोपांग, सूक्ष्म, तत्त्वनिष्ठ, विज्ञाननिष्ठ चिंतन व विवेचनाचे श्रेय' मात्र, नक्कीच जैन दर्शनालाच जाते. 'जैन' दर्शन एकांगी दृष्टिकोन स्वीकारत नाही. जैनमतानुसार संसाराचा अर्थ, 'जड व चेतनचे, पारस्परिक बंधन आहे. ह्या 'बंधनाचा' विचार करतांना, 'कर्म म्हणजे काय, त्यागाचे महत्त्व, आशयाचे माहात्म्य, आत्म्याचे हित-अहित', इत्यादि प्रश्नांच्या उत्तरांसह, अन्यही अनेक प्रश्नांची उत्तरे, 'अनुभव सिद्ध आभ्यंतर विज्ञानाने' दिली आहेत. 'कर्मबंध प्रक्रिया, दशकरणे', इत्यादि ऊहापोहातील 'सूक्ष्मता आणि गहनता' तर, काय वर्णावी? ह्या विशद, विविधांगी विवेचनाने, 'पाच समवायांच्या समन्वयाने, गणितीय पद्धतीने, ह्या 'कर्मसिद्धांताच्या आत, असा काही गूढ प्रवेश जैनांनी' प्राप्त केला की तो, 'जैन तत्त्वज्ञानाच्या', शिरपेचात मानाचा तुरा ठरला. (धवला, पं.सं.प्रा. इ.)

(३) 'दार्शनिक परंपरांमधे', 'कर्मवाद', विशेषरूपाने विकसित झालेला दिसतो. त्यामुळेच 'सांख्य, पतंजली, गीता, मीमांसा, वेद, उपनिषदे', ह्या सर्व परंपरांमधे 'कर्मबाबत' विवेचन आढळते. 'गीतेत' विशेषरूपाने, 'संचित-प्रारब्ध-क्रियमान, कर्म-अकर्म-विकर्म, नित्य-नैमित्तिक-काम्य, विहित-निहित, स्वधर्म', अशा विविध रूपाने, 'कर्मकथन' केलेले दिसते. (गीता : २/४२; ३१ ४/१६,१३, ५/८,९,१४, ९ ते ३५; १८/५,१७,४८,६१)

(४) जैन दर्शनात हा 'कर्मवाद', सिद्धांतरूपातही विकसित केला गेला. दिगंबर परंपरेतील जैन महर्षिंनी, आचार्यांनी, 'गणितीय' आधार देण्याचा, अप्रतिम प्रयास केला. अर्थातच हे 'गहन, गंभीर, क्लिष्ट' विवेचन समजण्यासाठी, त्यावर अनेक टीका ही रचल्या गेल्यात. 'वीरसेनाचार्यांच्या धवला, जयधवला' टीका, (इ.स. ८वे शतक) ह्या ३२ भागात विभाजित आहेत. ह्या टीका, 'इ.स. प्रथमशताब्दीपूर्व' रचित, 'षट्खंडागम व कषायप्राभृत', ह्या ग्रंथांवर रचल्या गेल्या आहेत. ह्या 'गणितीय कर्मवादात' प्रवेश करण्यासाठी, अनेक 'ग्रंथरचना' झाल्यात. त्यानंतरही आचार्यांनी, सतत ह्या विषयावर लिखाण केले, ज्यायोगे हा 'गहनतम विषय', सामान्यांना समजणे शक्य झाले.

(५) जैन दर्शनाने, 'अंतिम साध्य वा उद्दिष्ट' सदैव, 'मोक्ष' पुरुषार्थच मानले त्यामुळे सततच, त्याचा विशेष पुरस्कार केला गेला. ह्या 'मोक्ष' प्राप्तीत, जैनांनी सदैव 'व्यक्तिस्वातंत्र्यावर' भर दिला. जैनांनी 'सहा द्रव्ये व सात तत्त्वांना', प्रयोजनभूत मानले. ह्या 'तत्त्ववर्णनात', काही महत्त्वाच्या, 'अकाट्य नियमांचा' विचार केला गेला.

अ) प्रत्येक 'द्रव्य' स्वतंत्र असून, 'अनादि-अनंत' आहेत. कोणत्याही 'द्रव्याचा' परस्परात प्रवेश वा हस्तक्षेप नाही. द्रव्य संख्या 'न्यूनाधिक' होत नाही. त्याची 'नित्यता व अनादिता', ही जैनांनी अबाधित ठेवली. (त.सू. ५/४,२९,३०,३१,३८)

ब) प्रत्येक 'द्रव्य व तत्त्व', त्याच्या त्याच्या 'विशेष गुणांनी' परिपूर्ण मानला. जैन दर्शनाने, 'कालव्यतिरिक्त', अन्य पाच द्रव्यांना, 'अस्तिकाय' मानले. (त.सू. ५/१, द्र.सं. २४)

♦ क) जैन दर्शनाने 'ईश्वरसत्ता', स्वीकारली नाही. त्याऐवजी 'अत्यंत समग्र, संपूर्ण, सूक्ष्म', अशा 'कर्मसिद्धांताला' प्रतिपादित केले, आणि त्याचाच आश्रय घेतला. किंबहुना सर्व 'तत्त्व, द्रव्यांचा' विचार व विस्तारच, ह्या 'कर्मसिद्धांताच्या' अनुषंगाने झाला. जैन दर्शनाने, सहा द्रव्यात, 'पुद्गलाला' स्थान देवून, त्याला 'स्वतंत्र व तुल्यबल, अनादि-अनंत, शक्तिशाली' तत्त्व मानले. कोणत्याही तत्त्वाला 'मिथ्या वा माया वा भ्रम' न मानता, पुद्गलाचेही 'स्वतंत्र, तर्कशुद्ध, विज्ञाननिष्ठ' विवेचन केले (त.सू. ५/५, १९ ते २८) ह्या 'पुदगलाच्या २३ वर्गणा' मानल्या गेल्यात, त्यात 'कार्मण वर्गणा' ही एक असून, जी 'कर्मरूप' बनते (ध. १४/५, ९७/७-८,११७) ह्या वर्गणा 'पुद्गलापरमाणुंचे स्कंधरूप' असून, 'प्रदेशप्रचयरूप' म्हणजे 'कायवान' असतात. म्हणजे 'कर्म' ही, मात्र संकल्पना नसून, त्याला 'शारीरिकरूप' (Physical body) आहे, (त.सू.२/३७-४२) 'शरीर आहे, जड आहे, मूर्त आहे, अस्तित्व आहे, बंध आहे', म्हणूनच नाश शक्य आहे. ह्या 'तत्त्वविचाराचा' अत्यंत फायदा, जैनांना 'कर्मविश्लेषणासाठी' झाला. ह्या 'कर्मसिद्धांतात' म्हणूनच 'बंधाचे' प्रचंड महत्व आहे, म्हणूनच 'मोक्षाचे' प्राधान्य आहे. किंबहुना 'मोक्ष' हे लक्ष्य, विशेष प्रकाशित (focus) होण्यासाठीच, 'बंधस्वरूपाचा' विस्तार झाला आणि सविस्तर 'कर्मचिकित्सेचा' प्रयास घडला. (त.सू. ८/२) कर्माला 'शरीररूप, जड' मानले, म्हणूनच त्याच्या नाशाचा विचार शक्य झाला. कारण ज्याचा घात करायचा, त्याचे 'रूप वा अस्तित्व', असणे महत्वाचे ठरते.'आत्म्यापासून' झटकण्याचे सामर्थ्य, अर्थातच 'आत्म्याचेच' असल्याने, 'पुरुषार्थाचे, वा कर्मसिद्धांतातील स्वतंत्रतेचे', महत्त्व अनायासच अधिकच प्रकर्षाने उजागर झाले.

ड) कर्माला 'मूर्त, कायवान', मानल्याने, अनेक प्रश्न सहजी सुटलेत.

''कर्म पुद्गलजन्य, मूर्त, भौतिक आहे. शरीरही मूर्त आहे म्हणूनच, त्याचा प्रभाव शरीरावर प्रत्यक्षात दिसू शकतो. मूर्त असल्यानेच, त्याच्याशी संबंधित, सुख-दुःखाचे' वेदन होते.'' (त.सू.

५/५; २/३६) अनादिकाळापासून 'जीव व कर्म संबंधाने, आत्मा कथंचित् मूर्त' आहे. निश्चयरूपाने जरी, 'ज्ञान व आत्मा, अमूर्त असले तरी,' जसे 'मद्य' इत्यादि गुंगी आणणाऱ्या पदार्थांचे, शरीरावर प्रभाव दिसतात, तसेच 'कर्मांचाही आत्म्यावर प्रभाव' दिसून येतो. (स.सा. ३९-४३) 'आत्मा व कर्म संबंध, नीर-क्षीरवत्' आहे तरी सुद्धा, संसारातील ह्या 'अशुद्धावस्थेत' मात्र, 'आत्मा विकारी बनतो, आणि शरीरयुक्त मूर्त आत्मा, मूर्त कर्माला आकर्षित करतो व बद्ध होतो.' (स.सा.४,५७) 'कर्म व आत्मा, हा संबंध, प्रवाह अपेक्षेने अनादि' आहे, मात्र हा प्रवाह थांबवण्याचे सामर्थ्य, जीवातच आहे. ह्या आधारावरच, 'आत्मस्वतंत्रता वा पुरुषार्थाचे,' महत्त्व दृढ केले गेले आहे.(स.सा.५)

६) ह्या सहा द्रव्यांमध्ये, 'जीव व पुद्गल'ही दोनच द्रव्ये 'क्रियावान' आहेत. 'बंधाची योग्यता,' पुद्गलच्या 'स्निग्ध-रूक्ष' ह्या गुणांमध्ये आहे.जैनांनी, 'रागाला स्निग्ध व द्वेषाला रूक्ष' म्हणले आहे. ह्या नियमांमुळेच 'बंध-मोक्षाचा' निर्णय, हा 'व्यक्तिगत आणि स्वतंत्र आणि जीवाधीन' ठरतो.(त.सू. ५,७,३३) अशा प्रकारे अत्यंत, 'महत्त्वाच्या, शक्तिशाली, नियत', कर्मसिद्धांतातही 'पुरुषार्थ वा कर्मस्वतंत्रता', प्रकर्षाने प्रकाशित झाली आहे.

♦ थोडक्यात सर्व दर्शनांनी, 'आत्मा वा चैतन्याच्या', शुद्धतेला प्रभावित करणारी एक सत्ता, स्वीकारलेली स्पष्टपणे आढळते. जैन दर्शन त्याला 'कर्म' म्हणतात. वेदांतात ती 'माया व अविद्या'आहे. सांख्यामध्ये ती 'प्रकृति' आहे. न्यायदर्शनाने त्याला 'अदृष्ट व संस्कार' मानले. मीमांसाने 'अपूर्व' तर, शैवांनी 'पाश' म्हणून निर्दिष्ट केले. ह्या प्रत्येक शब्दांमधून वेगवेगळ्या अर्थांची अभिव्यक्ती होते तरी, 'बंध वा दुःखाचे' कारण 'कर्म' आहे, ह्यात मात्र एकमत आढळते. ह्यापैकी 'जैन, बौद्ध, सांख्य', ही दर्शने वगळता, सर्वांनीच 'ईश्वरतत्त्वाला' स्वीकारले. जैनांनी 'ईश्वरत्त्वाचा' स्वीकार न करता, 'कर्मालाच' अग्रस्थानी ठेवले. जैन तत्वज्ञानात 'कर्मसिद्धांताला' अग्रस्थानी का ठेवले? त्याची कारणमीमांसा येथे केली आहे. काही 'प्रमुख व विशिष्ट' मुद्दे, स्पष्ट केले गेले आहेत. (तक्ता क्र. २)

### १) गति-परमेष्ठीवर्णन-सर्वज्ञता :-

'जैन दर्शनाने' चार 'गति' मानल्या आहेत. जीवाच्या 'पुण्य-पापानुसार', त्याला 'गति' प्राप्त होते. ह्यापैकी, 'पूर्वभवातील, पुण्यकर्मबलाने, भोगप्रधान, विशिष्ट दैवी सुखांनीयुक्त, विशेष शारीरिक बळ, सामर्थ्य, अनुकूलता, आयु, प्राप्त', अशी देवगति मानली आहे. मात्र ह्या 'उत्कृष्ट भोग वा उत्कृष्ट आयुष्य', जगणाऱ्या जीवांनाही, 'जन्म मरणाचा' फेरा सुटत नाही, म्हणून अशा 'देवगतीच्या' जीवांनाही, 'ईश्वराचा' दर्जा दिला गेला नाही. 'अनुदिशांमधील देव, लोकांतिक देव, सर्वार्थसिद्धीचे देव', एकभवावतारी असले तरी, त्यांनाही 'पूज्य' मानले गेले नाही. (त.सू. ८/११, ४/४, २० ते २४,२६)

सर्वगतीत 'मनुष्यगति' श्रेष्ठ मानली गेली आहे. ह्या 'मनुष्य-गतीत' जन्म घेणारा, कोणी एक जीव, आपल्या 'संयम, व्रत, तप, आत्मश्रद्धान, सम्यग्ज्ञान व चारित्राने, आरंभ परिग्रहांचा त्याग करून' क्रमशः वाढत्या, 'शुद्धिबलाने, आध्यात्मिक' प्रगती करतो, आणि 'कर्मांचा नाश' करतो. अशा जीवांना, विशिष्ट गुणस्थानात, 'अनंतचतुष्टयांची, केवलज्ञानाची, सर्वज्ञत्वाची', प्राप्ती होते, त्यांना प्रथम 'अरिहंत' परमेष्ठीपद बहाल केले. उर्वरित 'कर्मांच्या क्षयानंतर, कर्मरहित, शुद्ध', त्या आत्म्याला, 'सिद्ध परमेष्ठी' म्हटले गेले. 'सर्वज्ञांचा उपदेश' सर्वश्रेष्ठ मानला, भव्यजीवांना ते 'उद्धाराचा' मार्ग सांगतात, परंतु त्यांना 'ईश्वरत्व' बहाल करून, 'कर्ता, धर्ता, हंता' मानले गेले नाही. (पं.सं.प्रा १/२७-३०, आ.प. ९९-१००, ध. ९/४, १,४४/११३/७, अष्ट.पा. २८-४१,२५)

### (२) सृष्टीची अनादिता :

'जैन दर्शनाने', विश्वाला (सृष्टीला) 'अनादि अनंत' मानले आहे. ह्या 'विश्वाला' (लोकाला) बनविणारा, कोणीही 'रचयिता' मानला नाही. हा लोक, 'सहा द्रव्यांचा समूहरूप', मानला आहे. ते द्रव्यही 'अनादिअनंतच' आहे. त्यापैकी एक 'जीव' द्रव्य आहे. ह्या 'अनादिअनंत' मान्यतेने, अनेक 'प्रश्न, शंका व विरोधाला', अनायासच टाळले गेले आहे. ह्या 'अनादिता' कारणाने, 'ईश्वरतत्त्व' स्वीकारले गेले नाही.(रा.वा. ५/१२/१०-१३/४५५/२०, ध. ४/१/३, जंबुव्दीप प्रज्ञप्ति व त्रिलोकप्रज्ञप्ति ग्रंथ).

### (३) स्वयंचलित कालचक्र :

'जैन दर्शनाने', विश्वाला, 'अनादि-अनंत' मानले आहे. 'विश्व वा हा लोक षड्द्रव्यांचा' समूह आहे. त्यात 'कालद्रव्य' हे, 'परिणमनात वा वर्तनेत' निमित्त मानले आहे. विश्वाप्रमाणेच जैनांनी, 'स्वयंचलित कालचक्र' मानले आहे. (स.सि. ५/२२/२, प्र.का. २४; ध.पु. ४; त.सू. ५/२२, ४०; ३/२७; रा.वा. ३/२७/५/१९१/३) ह्या कालचक्राच्या 'आवर्तनाचा काळ, २० कोडाकोडी सागरोपम' मानला आहे. ह्यामधे 'उत्कर्षाचे व अवनतीचे असे सहा, सहा' काळ मानले आहेत, जे अव्याहतपणे चालू आहे. ह्यात कोणाचीही 'मदत वा सहाय्य' स्वीकारले नसून, त्यात 'नियंता', मानला गेला नाही. त्या सहा काळांपैकी, प्रथम तीन काळ 'भोगभूमीच असल्याने भोगप्रदानता' स्पष्टच आहे. नंतरचे तीन काळ 'कर्मभूमी' आहे. मात्र त्यातही 'मोक्षाला जाण्याची पात्रता' , फक्त 'चतुर्थ काळापुरतीच', मर्यादित ठेवली आहे. अन्य दोन काळांपैकी 'पंचम काळातच धर्मप्रभाव' आहे. म्हणून 'पुरुषार्थास वाव' आहे. 'मोक्ष नसला तरी, धर्माचा अधिकार देवून, पुरुषार्थाचा उद्घोषच' केला आहे. अंततः 'धर्म नाश असल्याने, सम्यक् पुरूषार्थाचा' प्रश्नच नाही. सर्व काही इतके 'शिस्तबद्ध आणि सुनियोजित आहे की, परावलंबनतेला जागाच' ठेवली नाही. ह्याचा अधिक ऊहापोह, प्रबंधातील, प्रथम प्रकरण 'जैन दर्शनातील महत्त्वाचे मुद्दे', ह्यात केला गेला आहे.

### (४) मोक्षदाता :

सर्व भारतीय दर्शनांनी, 'परमप्राप्तव्य, कैवल्य, वा निर्वाण वा मोक्ष', हे अंतिम, 'लक्ष्य वा उद्दिष्ट' मानले. सर्व दर्शनांनी, जीवाची 'बद्धता' मानली, आणि त्यातून सुटण्याची 'इच्छा वा तळमळ', ही महत्त्वाची मानली. प्रत्येकाने त्यासाठी आपापला मार्ग सांगितला वा 'सहाय्यक वा मदतीचे' वर्णन केले. जैन दर्शनाने, हा 'मोक्षमार्ग' स्पष्टपणे, ''सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्ग:''।। (त.सू. १/१) असा कथन केला. 'तीर्थंकरांना' ह्या मार्गाचा 'प्रवर्तक' मानले, 'मार्गदर्शक वा पथप्रदर्शकच' मानले. मात्र ह्या 'मोक्षप्राप्तीत', त्यांचा 'आशीर्वाद, वा कृपा, वा प्रेरणा', आवश्यक मानली नाही. (स.सा.३३२ ते ३४४, ४१३, ४१५, द्र.व्यं. ३७/१)

### (५) शिस्तबद्ध कर्मव्यवस्था :-

जैन 'कर्मवादात', एकाच समयात, 'जीव व पुद्‌गलात' होणारी, 'अंतरक्रिया' ही महत्त्वाची मानली आहे. 'जैनमतानुसार' हा लोक, 'पुद्‌गलवर्गणांनी' ठसाठस भरलेला आहे. जीवाच्या 'मन-वचन-कायरूप' शक्तींमुळे, आत्म्यात विशेष 'परिस्पंदन' होते. त्यामुळे ह्या वर्गणातील, 'कर्मरूप योग्यतेच्या', वर्गणा आत्म्यात प्रविष्ठ होतात. ह्या येण्याची 'कारणे व ही बंध प्रक्रिया', स्वयंचलित आहे. (त.सू. ८/१,२; ६/१ ते ६) ह्या प्रक्रियेत, जीवाचे 'भाव-परिणाम' हे, निमित्त ठरतात. ह्याचे सांगोपांग वर्णन, 'करणानुयोगाचा' विषय आहे. 'कर्मसत्ता, उदय व विपाक', बलवान असला तरी, 'मोक्ष' प्रगटीकरणाचे सामर्थ्य, 'जीवातच' मानले गेले आहे. 'कर्मबंध ते उदय' ह्या कालावधीतील, 'सत्ता' ही अत्यंत महत्त्वाची मानली आहे. ह्या 'सत्तेत हवी तशी स्थित्यंतरे', करण्याचे सामर्थ्य 'जीवातच' आहे. ह्या परिवर्तनाचा आढावा, 'दशकरणाद्वारे' कर्मकांड ग्रंथांमधे केला गेला आहे. हे परिवर्तनाचे, 'स्वातंत्र्य-सामर्थ्य' हे जीवाधीन आहे. हा 'सम्यक् पुरुषार्थच', कर्मसिद्धांतातले 'वैशिष्ट्य व वेगळेपण' आहे. किंबहुना ह्या, 'सम्यक् पुरुषार्थानेच संवररूप निर्जरा करण्यासाठीच कर्मसिद्धांताला', अग्रस्थान बहाल केले गेले आहे. (त.सू. ९/१,४५)

### (६) अशरणभावना :-

'जैन दर्शनाने', प्रत्येक 'द्रव्याला', त्याचा 'गुण-पर्यायांना', स्वतंत्र मानले आहे. प्रत्येक 'द्रव्य नित्य-परिणमनशील' मानले आहे. हे 'परिणमन, त्याच्या द्रव्यत्व व अगुरुलघुगुणाची' शक्ती आहे. (त.सू. ५/२९, ३०,३८) त्या 'पर्यायांना करण्याचे वा बदलण्याचे', सामर्थ्य अन्य द्रव्यांना दिले नाही. त्यामुळेच 'अनन्यशरणता' ही, जैनांनी स्वीकारली नाही. किंबहुना 'वैराग्यवर्धक' बारा भावनांमधे तर, प्रकर्षाने 'अशरणभावना, एकत्वभावना, अन्यत्वभावनांचा' पुरस्कार केला आहे. भावनांना 'भवनाशिनी' चा दर्जा देवून, अप्रत्यक्षपणे 'स्वप्रयत्न, पुरुषार्थ, व्यक्तिस्वतंत्रता, स्वपरिणामांने स्वमुक्ती', ह्यांचा उद्‌घोषच केला आहे. (का. अ.गा.२३/३१)

**(७) उद्धारकर्ता – अवतारवाद :–**

भारतीय परंपरेत स्पष्टपणे, (१) आस्तिक (२) नास्तिक, ही दर्शने दिसतात. 'आस्तिक दर्शनाने', ईश्वराला सृष्टीचा 'कर्ता-धर्ता-हंता नियंता-उद्धारकर्ता' मानलेले दिसते. त्या परंपरांमधे, 'ईश्वराची अवतार' संकल्पना, ही स्पष्टपणे दिसून येते. गीतेतील (४/७,८) हे श्लोक 'अवतारवादाची पुष्टी' करणारे आहेत. त्या श्लोकानुसार ...

१) धर्माला ग्लानी येवून, अधर्माचे प्रबल्य वाढते तेव्हा,

२) साधूंच्या रक्षणार्थ,

३) दुष्टांचा नाश करण्यासाठी,

४) धर्माच्या पुन:स्थापनेसाठी, 'ईश्वराचा अवतारवाद' स्वीकारला गेला आहे.

जैन दर्शन हे 'नास्तिक' दर्शन म्हटले जाते. जैनांनी कोणत्याही कारणांसाठी, 'ईश्वरसत्ता वा अवतारवाद', ह्यांचा पुरस्कार केला नाही. प्रत्येक 'कालचक्रातील चतुर्थ भागात, २४ तीर्थंकर' जन्म घेतात.'तीर्थंकर' त्या अनादि धर्माचे, मात्र 'प्रवर्तक' असून, मूळ 'तत्त्वात' जराही फेरबदल न करता, 'द्रव्य-क्षेत्र-काल-भावानुरूप' थोडेफार बदल करतात. हे आपल्या 'केवलज्ञानात', सर्व यथावत् जाणून, उपदेश देवून, मार्गदर्शन करतात.' (त.सू. १/२९) कोणाचेही 'भले करणे वा उद्धार करणे', ही भावना नसल्यानेच, 'अवतारवादाला' स्थान दिले गेले नाही.

**(८) परमेश्वराचा अंश :–**

'जैन दर्शनाने 'सहा 'द्रव्ये' मानलीत. त्यात 'जीव', हे द्रव्य आहे. जे संख्या अपेक्षेने 'अनंतानंत' आहेत. विश्वाप्रमाणे, द्रव्यही 'अनादि-अनंत' आहेत. प्रत्येक 'जीव' स्वतंत्र आहे, आणि त्याच्या 'सामान्य व विशेष गुणांनी' युक्त आहे. ह्या प्रत्येक जीवाच्या, 'पर्यायही' भिन्नभिन्न आहेत. प्रत्येक द्रव्य, 'स्वचतुष्टयांनी' युक्त आहे व त्याच्या मर्यादेत आहेत. प्रत्येक जीवात 'ईश्वर वा परमात्मा', बनण्याची शक्ती विद्यमान आहे. त्या 'शक्तीची अभिव्यक्ती', हाच 'मोक्ष' आहे. ही अभिवक्ती 'पुरुषार्थाधीन' आहे. जीवाला कोणाचाही 'अंश' मानले नाही वा 'शरणता' स्वीकारली नाही. 'जैन दर्शनाप्रमाणे', प्रत्येक द्रव्य, 'परस्परांवर उपकार' करतात. (त.सू.५/१७ ते २२) मात्र त्यांना 'प्रेरक निमित्त' मानले नाही. सर्वच दृष्टीने 'द्रव्याची स्वतंत्रता', ही जैनांनी अबाधित राखली. ह्याचमुळे 'कर्मसिद्धांत' हा, 'विशेष परिष्कृत' झाला असावा. कर्मांची 'प्रबलता' मानली मात्र, 'अधीनता' स्वीकारली नाही. (द्र.सं. ३, स.सा. ४९, प.प्र.२/९९) हाच जैनदर्शनातील 'कर्मविपाक व कर्मस्वातंत्र्य' आहे.

♦ **उपसंहार :–**

जैनदर्शन 'नास्तिक, निरीश्वरवादी', दर्शन आहे, जैनांनी 'विश्वाला, द्रव्यांना, अनादि–अनंत, स्वयंचलित, स्वयंनिर्मित', मानले आहे. 'कर्म' ह्या शब्दाचा ढोबळ अर्थ, 'कार्य वा काम' असा केला जातो. 'सैद्धांतिक अर्थ' मात्र खूपच व्यापक आहे. परमार्थदृष्टीने, 'प्रत्येक द्रव्यात वा पदार्थात', प्रतिक्षण 'ज्या नव्या नव्या पर्याय उत्पन्न होवून नष्ट होतात, त्या नवीन पर्याय उत्पन्न होणे, हे त्या वस्तूचे कर्म' होय. ह्या दृष्टीने 'कर्ता–कर्म–क्रिया', हे एकच ठरते. ह्या निकषानुसार सर्व बाजूंनी, कर्मांचा 'सूक्ष्म, सांगोपांग' विचार केला गेला. ह्या 'शिस्तबद्ध, स्वयंचलित, स्वयंपूर्ण, विज्ञाननिष्ठ' विवेचनामुळेच, 'कर्मसिद्धांताला', तत्त्वज्ञानात 'अग्रस्थान' मिळाले. ह्या विवेचनाने, 'अनेक शंका, समस्यांचे, समाधान' अनायासच झाले, किंबहुना 'प्रश्नांना' जागाच उरली नाही. 'कर्मसिद्धांताला' प्राधान्य देवूनही, 'व्यक्तिस्वातंत्र्य आणि स्वावलंबनता', गौण मानली नाही. उलट 'कर्मसिद्धांतात पुरुषार्थाची' ज्योत सतत तेवत ठेवली, ज्यामुळे 'पुरुषार्थ' कधीच झाकोळला नाही, फक्त थोडा 'मलीन' झाला होता. असा हा 'कर्मसिद्धांताच्या' मूळाशी असणारा, 'स्वयंप्रकाशी पुरुषार्थ, अधिकच 'प्रकर्षाने प्रकाशित' करण्यास हा, 'प्रबंधउद्दम' केला आहे. ह्या तिसऱ्या प्रकरणात, ह्या 'पुरुषार्थदृष्टीनेच', ही 'मीमांसा वा समीक्षा' केली आहे.

# ‘अष्टकर्मांची पुरुषार्थदृष्टीने समीक्षा’

## १) कर्माचे स्वरूप-लक्षण-भेद : इत्यादिरूप सामान्य वर्णन :

**भूमिका :-** जैनांनी ‘कर्मसिद्धांताला’ तत्त्वज्ञानात, अग्रस्थानी का ठेवले? ह्याची चिकित्सा, अनेक मुद्दे देवून केली. ह्या कारणमीमांसेतून हे स्पष्टच आहे की, ‘सुखाची इच्छा असतांनाही व्यग्रता, अशांती प्राप्त होते, प्राणिगत विचित्रता ही, सर्वत्र दिसते’, ह्या सर्वांच्या मूळाशी, ‘कर्म’ हेच कारण आहे. जैनांनी ‘कर्माचे’ व्यापकरूप सांगितले. ‘कर्माचा’ संबंध, ‘वस्तूच्या परिणमनशील’ अंशीशी जोडला. ‘कर्माला’ नित्य न मानता, ‘उत्पाद-व्ययात्मक’ मानले. हे (त.सू.५/) ‘पर्यायाचे’ लक्षण आहे, म्हणून सैद्धांतिक दृष्टीने ‘कर्म म्हणजे पर्याय’ होय. ह्या ‘सिद्धांताचे अप्रतिम’ वर्णन, ‘करणानुयोगाचा’ विषय आहे. ह्या वर्णनातील, ‘प्रदेश, स्थिति, अनुभाग’, हे वस्तुत: ‘गणितीय प्रमाणांनी’ ओतप्रोत आहेत. ह्यामधे ‘बल, कारण, योग, कषाय’, इत्यादिने कशाप्रकारे परिवर्तन होते, ह्याचे ‘गणितीय विवेचन’ आहे. ही ‘मोक्षाची’ प्रथम पायरी आहे. ह्या ‘कर्मवादात’ हे, गणितीय प्रमाण देतांना, ‘न्याय वा दर्शनाचा’, यथासंभव उपयोग केलेला आढळतो.

ह्या ‘कर्मवादाची’ अपार सामग्री, १४ पूर्वांपैकी ‘विद्यानुवादाच्या’ पूर्वात दिली गेली होती. त्याचा एक अत्यल्प अंश, ‘धवलाटीका, गोम्मटसार’ इत्यादि, टीकांमधे आढळतो. हा अंशसुद्धा ‘मोक्षाप्रत’ नेणारा आहे, म्हणूनच ‘कर्मांना’ गहनतेने समजणे आवश्यक ठरते. ह्यातही, ‘जीवाची लिप्तता का? बंध कसा, किती, तो बंध वाढवणे, घटवणे, दाबणे कसे शक्य आहे’, ह्यातून अशा पद्धतीचा गणिताचा प्रवास सुरू होतो, ज्यात अशी कारणे आहेत की जी, ‘कर्माला उत्पन्न वा विनाश’ करू शकतात.

कर्माच्या ‘बंधांची कारणे व बंधप्रक्रिया’, ह्यात ‘योग व कषाय’, ह्यांचे गणितीय रूप आढळतात. ‘लब्धिसार’ इत्यादि ग्रंथात ही प्रक्रिया दिली आहे. ह्या ग्रंथांमधे, ‘धवला व कषायप्राभृत’, ह्या ग्रंथांचे सार, आचार्यांनी ‘बुद्धी व प्रज्ञा’ इत्यादींचा वापर करून, प्रभावीपणे सादर केले आहेत. ‘कर्मबंध, उपशम, क्षयोपशम, क्षय, गुणस्थान’, इत्यादींचे गणितीय प्रमाण दिले आहेत. जीवाचे ‘भाव व परिणाम’, ह्यानुसार वर्णन आहे. ह्या सर्वांना सूक्ष्मतेने समजणे आवश्यक आहे. ह्या ग्रंथांच्या ‘सूक्ष्म अध्ययनातून, चिंतन मनन, मंथनातून’, विषयाचा विस्तार स्थूलपणे करीत, त्यातील ‘पुरुषार्थाकडे’ दृष्टी नेणार आहे.

**कर्म :-** कर्मबंधनात ‘जीव आणि पुद्गल’, हे मुख्य घटक आहेत. त्यामुळे ‘पुद्गलाच्या’ वर्णनाशिवाय, ‘कर्म वर्णन’ हे अशक्यच आहे. त्यामुळेच जैन कर्मवर्णनात, ‘पुद्गलाचे विवेचन’, हा महत्त्वपूर्ण भाग आहे. त्यामुळेच ‘सूक्ष्म पुद्गल स्कंधरूप द्रव्यकर्म’, हा उल्लेख, हे जैनांचे ‘वैशिष्ट्य व वेगळेपण’ आहे. ‘कर्म’ शब्दाचे अनेक अर्थ आहेत.

१) त्यात प्रामुख्याने ‘कर्मकारक’, हा अर्थ प्रसिद्ध आहे.

२) ‘क्रिया’ ह्या अर्थाने, ‘समवदान, अधःकर्म, इत्यादि भेद कथन केले जातात. (ध.पु.१३)

३) कर्माच्या तिसऱ्या अर्थाच्या रूपाने, ‘जीवासह बंधणारे विशिष्ट जातीचे पुद्‌गल स्कंध’, हा अर्थ ‘जैनसिद्धांतातच’, विशेषरूपाने कथन केलेला आढळतो. (ध.पु.१४, गो.क. ६/६) तरी, ‘कर्माचा मौलिक’ अर्थ तर, ‘क्रियाच’ आहे.

आगमात ह्या विषयाचे विस्तृत वर्णन आढळते. त्या विवेचनाचा सारांश देवून, ‘लक्षण-भेद-प्रभेद’, स्पष्ट केले आहे. ह्या विभागात ‘कर्म’ ह्या संकल्पनेची स्थूल ओळख मात्र देवून, सामान्य कथन केले आहे, आणि ‘स्व निरीक्षण’ दिले आहे. (तक्ता क्र. ३)

**विषयविस्तार :-**

* आगमात ‘कर्माचे सामान्य’ लक्षण दिले आहे. त्यात ‘कर्मकारक, पुण्य पाप, क्रिया’, ह्या अर्थाने कर्माचे लक्षण[१] सांगितले आहे.

* कर्माचे ‘समवदान’, इत्यादि भेदांचे कथन, लक्षण सांगितले आहे[२].

* रा.वा. कारांनी विविध अपेक्षेने, ‘कर्माच्या’ व्याख्या केल्या आहेत[३].

* कर्माच्या ‘भेद-प्रभेदांचे’ वर्णन[४], ‘जीव अजीव, द्रव्य भाव, कर्म नोकर्म अशा विवक्षांनी करून, त्यांचे लक्षण कथन केले आहे’. पुद्‌गलाच्या २३ वर्गणांपैकी, ‘कार्मण, भाषा, मनो व तैजस’, वर्गणा सोडून, अन्य २३ वर्गणा ‘नोकर्म’ म्हटल्या आहेत. ‘औदारिक, वैक्रियक, आहारक, तैजस’ ह्यांना, ‘नोकर्म शरीर’ म्हटले आहे. ‘नोकर्माचा’ उल्लेख, ‘निषेधरूपाने आणि ईषत्‌रूपाने’, केला आहे.

आचार्यांनी, ‘द्रव्य-भाव’ कर्माचा उल्लेख करतांना[५], ‘‘कर्म जगताचा स्रष्टा, कर्माच्या अस्तित्वाची सिद्धी, कर्म नोकर्मातील अंतर, शरीरउत्पत्तीची कर्माधीनता, कर्म जाणण्याचे प्रयोजन’’, असा विस्तार केला आहे.

**उपसंहार :-**

१) संसारी सर्व प्राणी सुखाची इच्छा करतात मात्र, ‘विपरीत श्रद्धा, आणि योगाची शुभाशुभता’, याने ‘कर्माचे अर्जन’ होते. त्याच्या फळ रूपाने, ‘सुख-दुःखाचे’ वेदन होते.

२) ‘जीवाची आसक्ति, वर्तमान पुरुषार्थ व असावधानता’, हे तीन कारण, ह्या ‘बंध’ प्रकियेत महत्त्वाचे ठरतात.

३) वर्तमानात जीवाला, ही ‘परतंत्रता’ का? आणि ह्यातून ‘सुटण्याचा’ उपाय काय? ह्या प्रश्नाभोवती, ‘कर्मसिद्धांत’ गुंफलेले दिसते.

४) कर्मव्यवस्था 'स्वयंचलित, बलवान' असली तरी, 'सम्यक् पुरुषार्थाचा, पुरुषार्थ' घडू शकतो.

५) आगमात विविध प्रकारे, 'कर्माचे लक्षण, भेद, स्वरूप' आढळते. जीवाच्या 'कषाययुक्त परिणामांच्या' निमित्ताने, 'कार्मण वर्गणांचे कर्मरूप' बनणे, हे 'कर्म' ठरते. विविधविविक्षांनी विविध भेद आढळतात तरी, 'द्रव्य-भाव, घाति-अघाति, ज्ञानवरणादि आठ', हे प्रामुख्याने भेद, कथन केलेले आढळतात.

**स्वनिरीक्षण :-** ह्या विषयाच्या 'अभ्यासातून, मंथनातून', निदर्शनास आलेला, 'पुरुषार्थपर भाव', प्रकर्षाने कथन केला आहे.

♦ १) 'जीव व कर्म', हा बंध अनादि आहे. कर्मपिंड 'अनंतानंत परमाणुंचा समुह आहे, रूपी आहे, मूर्त आहे, अचेतन, ज्ञानरहित, कायावान, आहे.' प्रतिसमय, जीवाला 'समय प्रबद्धाचा बंध, व समयप्रबद्धाची निर्जरा', होत असते.

अ) 'कार्मणवर्गणा' शरीररूप आहे, 'प्रदेशप्रचयरूप'आहे, त्याला 'आकार' आहे, म्हणूनच 'नाश करणे शक्य' आहे.

ब) हा 'पुद्गलपिंड' आहे, 'अचेतन' आहे. त्यामुळेच 'चेतनमध्ये' तो बिघाड करू शकत नाही. जीवाला 'सुख-दुःख' देण्याचे, 'ज्ञान वा जाण' त्याला नाही. काही काळ 'विपरीत, अशुद्ध दशेत', तो जीवाला बांधून ठेवून, प्रभाव टाकू शकतो, पण निश्चयाने तो पण 'जीवाला', त्याच्या 'गुणांना बदलू शकत नाही वा नाश करू शकत नाही'.

क) 'कर्मणवर्गणा' हा 'पुद्गल स्कंध समूह आहे, 'ज्ञानविरहीत आहे, जड' आहे. याचा अर्थ जीव, 'चैतन्यमय, ज्ञानवान' आहे, म्हणूनच 'स्वज्ञान, स्वभान, स्वप्राप्ती', तोच 'स्व' प्रयत्नाने करू शकतो, ह्यात वादच नाही.

ड) प्रतिसमय सत्तेतील कर्माचा, 'उदय-त्याचे फळ-निर्जरा', ही चालूच आहे. प्रश्न फक्त 'प्रतिसमय होणाऱ्या नवीन बंधाचा, वा सत्तेतील कर्मात होणाऱ्या स्थित्यंतराचा' आहे. हे 'कसे, किती, कधी करायचे' ह्याची, 'जाणीव व ज्ञान' महत्त्वाचे आहे आणि हे सर्वस्वी, 'जीवाच्या स्वाधीन' आहे. ह्यातून दडलेला 'पुरुषार्थ' वा 'पुरुषार्थाला जागा ठेवून, पुरुषार्थाचीच', प्रेरणा ही सूचित केली आहे.

२) जैन आगमातील 'नोकर्म', ह्या भेदाचे वर्णन हे, महत्त्वाचे आहे. ह्या नोकर्माचीही 'निषेकरचना' होते. ह्या 'नोकर्म' वर्गणांना ग्रहण करून, जीव 'शरीर, मन' इत्यादिरूप परिणमवतो. 'विग्रहगती' संपताच, पहिल्या समयापासूनच, जीव 'अनंतानंत नोकर्मवर्गणांचे', पुद्गल ग्रहण करतो. अगदी मरण समयापर्यंत, हे चक्र चालू राहते. प्रतिसमय ह्यातून 'निषेक' सोडले जातात, ही निषेक रचना, 'अबाधारहित' असते.

ह्या नियमानुसार, ह्या 'वर्गणांची अंतिम मर्यादा', निश्चित होते. ती म्हणजे 'आयु मर्यादा' होय. त्यावरून 'आयुची निश्चितता' स्पष्ट होते. 'आयुष्य क्षणभरही कोणी वाढवू शकत नाही', ह्या विधानावर शिक्कामोर्तबच होते. ह्या निकषानुसार, 'अशरणता, अन्यत्व, एकत्वाची', अधिकच पुष्टी होते. 'ईश्वर तत्त्व न स्वीकारण्यामागची', विविक्षाही स्पष्ट होते. पुनश्च 'व्यक्तिस्वतंत्रता व स्वावलंबनता', अधिक प्रकर्षाने उजागर होते. ह्यातच 'पुरुषार्थाचे' दडलेले बीज, दृष्टीगोचर होते.

दुसरे, ह्या वर्गणांचे 'ग्रहण व सोडणे' प्रतिसमय घडते, ते निश्चित आहे. त्यावरून 'शरीर उत्पत्तीची कर्माधीनता' स्पष्ट होते. शरीराला 'पृष्ट, कृश, नाश, उत्पन्न करणे', इत्यादिंप्रती 'कर्तृव्याचा' छेद होतो. ह्या 'सम्यक् ज्ञानाने', शरीरावरचे, 'मिथ्या, ममत्व, मोह, व्यर्थ कर्तृत्व-भोक्तृत्व, अहंकार', नष्ट होण्यास मदत होते. कदाचित ह्या विविक्षेनेच, १२ भावनांमधे, 'अन्यत्व व अशुचि', भावनांवर विशेष भर दिला गेला असावा. 'वैराग्य वा संवेग' वृद्धिसाठी म्हणूनच ह्या भावना, महत्त्वाच्या ठरल्या असाव्यात. शरीराला 'स्व' मानण्याची चुक सुधारण्याचा, 'पुरुषार्थ' ह्यातून घडू शकतो. आपल्याच, 'मिथ्या मान्यता, विपरीत अभिप्राय, परद्रव्यांप्रती मोह, आसक्ति', आपल्याच 'बंधनात' कारण आहे, आपल्याच 'मुक्तीत बाधक' आहेत, ह्या 'सत्याची जाण' होणे, 'पुरुषार्थच' म्हणावा लागेल.

♦ ३) कर्माच्या 'चेतन-अचेतन', दोन्ही पक्षांचा विचार, 'जैन दर्शनाने' केला आहे. ह्या चिंतनातून, 'उपादान-निमित्त', 'नियति व पुरुषार्थ' अधिकच स्पष्ट होतो. 'उपादान आत्म्याचा, कषाययुक्त परिणामरूप पुरुषार्थाने कार्मणवर्गणा कर्मरूप' बनतात. जीवाच्या परिणामांचे 'निमित्त' घेवून, 'पुद्गलवर्गणा' स्वयमेव कर्मरूप होतात. 'उपादान निमित्ताचे' इतके सुंदर उदाहरण दुसरे असू शकत नाही. 'जीव वा पुद्गल', दोघांचा 'पुरुषार्थ' त्यांच्याच, 'स्व द्रव्य-क्षेत्र-काल-भावात' झाला, परंतु दोन्ही एकमेकांची 'नियति' ठरतात. एकमेकांना 'विकारी' बनवण्यात 'निमित्तकारण' ठरतात. 'द्रव्य परस्परात ढवळाढवळ करू शकत नाही', हा अकाट्य नियमही अबाधितच राहिला.

हा 'निमित्त-नैमित्तिक' संबंध असून, त्याकडे 'ज्ञाता-द्रष्टारूप' बघणे, हा खरा 'पुरुषार्थ' आहे. ह्या विषयाचे 'सम्यक् ज्ञान व श्रद्धान', 'नियति व पुरुषार्थातील' झगडा मिटवणारे आहे. किंबहुना 'पुरुषार्थाला' अधिकच प्रकर्षाने अधोरेखित करणारे आहे, त्याची खात्री होते.

४) 'कर्माचा' संबंध वस्तूच्या परिणमशील अंशाशी, म्हणजेच 'पर्यायाशी' आहे. 'पर्याय' 'उत्पादव्ययात्मक' असतात. ह्या विधानातूनच 'कर्माच्या नाशाची खात्री' दिली आहे. 'कर्म वा नियति', प्रबळ असली तरी, ती 'पर्याय' आहे, जी 'एक समयवर्ती' असते, ही खात्री 'पुरुषार्थाला' दृढ करणारी आहे. शिवाय कर्मांना 'उत्पन्न' ही जर, जीवच करतो तर, त्याचा

‘नाश व व्यय’ ही, ‘जीवच करणार’ हा विश्वास ‘पुरुषार्थप्रेरक’ आहे.

## संदर्भ–सूची

१) रा. वा. ६/१/३/५०४/११

२) ध. १३/५,४,२०/४५/९

३) रा.वा. ६/१/७/५०४/२६, आ.प.टी. ११३


४) स.सा. ८७,८८, आ.प.टी. ११३-११४, गो.क.६/६, ध.१४/५,६,७१/५२/५,६

## २) 'कर्मसिद्धांतील', महत्त्वाच्या, मूळ, संकल्पनांचा आढावा :

'जैन दर्शनाने', हा लोकाकाश, 'सहा द्रव्यांनी' युक्त मानला आहे. ह्यात 'पुद्गलाच्या २३ वर्गणा', खचाखच भरलेल्या आहेत. जीवाच्या 'कषाययुक्त परिणामांनी', ह्या वर्गणा 'स्वयमेव कर्मरूप' बनतात. हा 'जीव-कर्म बंधांचा', अनादि संतानक्रम आहे. दोन्हींच्या 'स्वाभाविक शक्तीने', हा बंध 'स्वयमेव' होतो. जीव 'भावाच्या' आश्रयाने 'द्रव्यकर्म', व 'द्रव्यकर्माच्या' आश्रयाने 'भाव', हे अन्योन्याश्रित चक्र, अव्याहत चालू आहे. ह्या 'कर्मसिद्धांतात', सूक्ष्मातिसूक्ष्म 'भावांना' जाणण्यास, 'द्रव्यकर्माचा' आश्रय घ्यावा लागतो. म्हणून 'कर्मसिद्धांत' हे, जीवाच्या 'भावांचे', मोजमाप करणारे जणू 'थर्मामीटर' आहे.

ह्या 'कर्मसिद्धांताच्या' मोजमापाच्या सिद्धांतात (शैलीत), अनेक 'परिभाषा, शब्द' परंपरागत आहेत. ह्या काही 'मूळ व महत्त्वाच्या संकल्पनांचा' आढावा घेणे, पुढच्या विवेचनाच्या दृष्टीने, अत्यंत महत्त्वाचे असल्याने, त्याचा आढावा येथे घेतला आहे. ह्या संकल्पना पुढच्या विभागांमधे, वारंवार येणार असल्याने, त्याची स्थूल ओळख, ही त्या प्रकरणांच्या विषयाच्या ऊहापोहासाठी आवश्यक आहे. त्या येथे निदर्शनास आणल्या आहेत.

**(१) अविभाग-प्रतिच्छेद :** आगमात[1], शक्तीच्या अंशाला 'अविभाग-प्रतिच्छेद' म्हटले आहे. 'जड वा चेतन', सर्व पदार्थांच्या गुणांमधे 'अविभाग-प्रतिच्छेद' असतात. हे कथन, 'अनुभागसंबंधी, योगसंबंधी, गुणसंबंधी', अशा विवक्षांनी केले जाते. 'जीव- पुद्गलाच्या', शक्तिअंश अपेक्षेनेही कथन आढळते. 'कर्म-नोकर्म' अपेक्षेनेही कथन केले जाते. प्रसंगानुरूप कोणत्या अपेक्षेने कथन आहे, हे लक्षात घेणे आवश्यक ठरते. थोडक्यात, 'शक्तीच्या अविभागी अंशाला अविभाग-प्रतिच्छेद म्हणतात'.




**(२) वर्ग :** आचार्यांनी[2], 'शक्तींच्या म्हणजेच अविभाग प्रतिच्छेदांच्या' समूहाला 'वर्ग' म्हटले आहे. समान 'अविभाग प्रतिच्छेदांनी' युक्त, प्रत्येक कर्म परमाणुला 'वर्ग' म्हणतात. प्रत्येक परमाणुत, 'अनंत अविभाग प्रतिच्छेद' असतात, म्हणून प्रत्येक परमाणुच एक 'वर्ग' आहे. सर्व 'जघन्य गुणवाल्या' प्रदेशांच्या 'अविभाग प्रतिच्छेदांच्या' राशीला, 'वर्ग' म्हणतात.

**(३) वर्गणा :** ''आगमानुसार[3] 'समान गुणवाल्या पुद्गल परमाणु पिंडाला वर्गणा म्हणतात.'' हे मुख्यत: 'पाच प्रकारचे', सूक्ष्म स्कंधांच्या रूपात, लोकाच्या सर्व प्रदेशांवर, स्थित आहेत.

जीवाची 'सर्व प्रकारची शरीरे व सर्व स्थूल भौतिक पदार्थांचे', हे उपादान कारण आहे. वास्तविक 'वर्गणा' २३ प्रकारच्या आहेत.

''समान अविभाग प्रतिच्छेदांनी युक्त, वर्गांच्या समूहाला 'वर्गणा' म्हणतात''.

१) ह्या 'वर्गणांपैकी' काही 'ग्रहणयोग्य तर, काही अग्रहणयोग्य' असतात.

२) ह्या 'वर्गणांपैकी' काही, 'ध्रुव, ध्रुव-शून्य, सांतर, निरंतर', वर्गणा असतात.

३) ह्या 'वर्गणांपैकी', त्या त्या 'जातीच्या वर्गणांपासून', त्या 'विशिष्ट जातीच्या' पदार्थांचीच निर्मिती होते, अन्य पदार्थांची होत नाही.

४) परमाणुंची 'हानी-वृद्धी' झाल्याने, 'वर्गणा' स्वयं आपली जात बदलून, अन्य जातीच्या वर्गणांमधे परिणत होतात.

**(४) स्पर्धक :** सर्वज्ञकथनानुसार[४], कर्मस्कंधात त्याच्या, 'अनुभागात', जीवाच्या 'कषाय व योगात', तसेच अन्यत्रसुद्धा, 'स्पर्धक' संज्ञा आढळते.

* 'जघन्य ते उत्कृष्ट पर्यंत, समान अविभाग प्रतिच्छेदांच्या समूहाला, 'वर्ग' म्हणतात'.

* 'समान अविभाग प्रतिच्छेदांच्या, वर्गांच्या समूहाला 'वर्गणा' म्हणतात'.

* 'जघन्य ते उत्कृष्टपर्यंत, एक एक अविभाग प्रतिच्छेदाच्या' अंतराने, 'वर्गणा' प्राप्त होतात. त्यांच्या समूहाला 'स्पर्धक' म्हणतात'.

'स्पर्धकाचे ', 'देशघाति-सर्वघाति, पूर्व-अपूर्व; जघन्य-द्वितीय', इत्यादि भेद आगमात दिसतात. (तक्ता क्र. ४)

**(५) निषेक :** धवलाकारांनी[५], 'निषेचनं निषेकः' अशा निरुक्तिनुसार,

* 'कर्म परमाणुंच्या स्कंधांच्या, निक्षेपणाला 'निषेक' म्हणले आहे'.

* 'एका समयात, जेवढे कर्मपरमाणु, उदयात येतात, त्यांच्या समूहाला 'निषेक' म्हणतात'.

* 'स्थिति दाखवणाऱ्या समूहाला 'निषेक' म्हणतात, म्हणून 'निषेकरचना' ही, 'कर्मांची स्थिति' आहे. स्थितिबंधात 'निषेकरचनांची' प्ररूपणा केली जाते.

* 'निषेकरचना', प्रदेशबंधांशिवाय शक्य नाही'.

* ह्या 'निषेकरचना' वर्णनात, 'गुणहानि', इत्यादींचा प्रामुख्याने विचार केला जातो.

'गोम्मटसार कर्मकांड ह्या ग्रंथातील' (९१९ ते ९४०), ह्या गाथांच्या आधारे, हे वर्णन केले आहे. सर्व कर्मांच्या स्थितिरचनेत, 'द्रव्य, स्थितिआयाम, गुणहानिआयाम, नाना गुणहानि, दो गुणहानि, अन्योन्यअभ्यस्तराशि', ह्या सहा संकल्पनांचे वर्णन केले जाते.

अ) 'कर्मरूपाने परिणत पुद्गलपरमाणुंचे, जे प्रमाण ती 'द्रव्यराशी' होय'.

ब) ‘कर्मस्थितीच्या समयांचे जे प्रमाण, ती ‘स्थितिराशी’ होय’.

क) ‘विशिष्टपटीने, ‘गुणित प्रमाणात होणारी हानी’, म्हणजे ‘गुणहानि’ होय’. ‘गुणाकाररूप हीन हीन द्रव्य’, ज्यात आढळते त्याला, ‘गुणहानि’ म्हणतात. जोपर्यंत ‘दुप्पट दुप्पट हीन द्रव्य’ दिले जात नाही, तो पर्यंत ‘एक गुणहानी’ राहते.

ड) ‘गुणहानींच्या’ समयाचे प्रमाण, ती ‘गुणहानि आयामराशी’ होय.

इ) सर्वस्थितीत जेवढ्या ‘गुणहानि’ आढळतात. त्यांचे प्रमाण ‘नानागुणहानिराशी’ होय. गुणहानीच्या समूहाला ‘नाना-गुणहानि’ म्हणतात.


ई) ‘गुणहानिआयामाच्या’ प्रमाणाला, दुप्पट केले असता, जे प्रमाण येते, ती ‘दोन गुणहानि’

फ) ‘नाना गुणहानीचे’, जेवढे प्रमाण, तितके प्रमाण दोनच्या अंकात लिहून, परस्परगुणाकार करून, जे प्रमाण येते, ती ‘अन्योन्याभ्यस्तराशी’ होय.

प) ‘गुणहानिआयामाच्या’ दुप्पट परिणामाला, ‘निषेकाहार’ म्हणतात.

म) ‘श्रेणी व्यवहार गणितात, समान हानी वा समान वृद्धीच्या परिणामांना ‘चय’ म्हणतात’.

**निषेक रचना ⟶**




**६) समयप्रबद्ध[६]:** ‘जीव व कर्म’, ह्यांचा अनादिपासून, प्रतिसमय बंध चालू आहे.‘जो समयासमयात, ‘कर्म नोकर्मरूप’ पद्गल स्कंधांचा, आत्म्याबरोबर संबंध होतो, त्याला ‘समयप्रबद्ध’ म्हणतात’. ह्या ‘समयप्रबद्धात’, सिद्धांच्या अनंतवा भाग, तसेच अभव्यांच्या अनंतगुणे, असे, मध्य, ‘अनंतानंत प्रमाण वर्गणांचा’, समूह असतो.

**७) आबाधाकाळ[७]:** ‘कर्मांचा’ बंध झाल्यावर, ‘कर्म’ लगेच उदयाला येत नाहीत. काही काळानंतर, ‘परिपक्व-दशा’ प्राप्त झाल्यावरच ते ‘उदयाला’ येतात. ह्या मधल्या काळाला ‘आबाधाकाळ’ म्हणतात.

* ‘बाधेचा अभाव म्हणजे अबाधा होय’.

* ‘उत्कृष्ट आबाधा मधून, जघन्य आबाधा वजा करून, शेष असणाऱ्या अंकात, एक अंक मिळवला असता ‘आबाधास्थान’ प्राप्त होते’.

* ‘कर्माच्या स्थितीच्या, जेवढ्या भागाची, एक प्रमाणवाली अबाधा असते. तेवढ्या स्थितीच्या,

भेदांना 'आबाधा कांडक' म्हणतात'.

* 'उदीरणा' अपेक्षेने 'आबाधा', सर्वत्र 'आवली मात्र' आहे. बंधानंतर इतका काळ 'उदीरणा' होत नाही.

* एक 'कोडाकोडी सागरोपमाची' आबाधा, १०० वर्ष असते.

* 'भुज्यमान' आयुचा शेष भागच, 'बद्धयमान' आयुची 'आबाधा' होय.

* 'नोकर्माची' आबाधा नसते, कारण असाच, त्यांचा स्वभाव आहे.

* अन्य कर्मांची 'आबाधा' काढण्याची पद्धती अशी दिली आहे.

'फळराशी गुणिले इच्छाराशी भागिले प्रमाणराशी'

↓ ↓ ↓

१०० वर्षे x ३० को.को.सागर=३००० ÷ १ को.को. सागर = ३०००

म्हणजे '३० को.को. सागरोपम प्रमाण कर्मांची, आबाधा ३००० वर्षे' आहे.

* 'अंत: कोडाकोडी' सागर, प्रमाण, स्थितीची आबाधा 'अंतमुहूर्त' असते. जघन्य स्थितीची 'आबाधा', अंतमुहूर्ताच्या संख्यातवा भाग असते.

**टीप** : 'अंत:कोडाकोडी सागर' म्हणजे, एक 'करोड सागरपेक्षा' जास्त, तथा 'एक कोडाकोडी सागरपेक्षा' कमी स्थिति होय.

८) **विस्रसोपचय :-** आचार्य म्हणतात की[८] 'विस्रसा' म्हणजे, 'आत्मपरिणामांनी निरपेक्ष, स्वभावत:च', 'उपयन्ते म्हणजे, मिळणे' होय.

* 'कर्म- नोकर्म- रूपाने' परिणमित झाल्याशिवाय, जे 'स्निग्ध- रूक्ष' गुणामुळे, एक स्कंधरूप होवून राहतात, यांना 'विस्रसोपचय' म्हणतात.

* 'कार्मण वर्गणा तथा नोकर्म वर्गणांच्या', त्या समूहाला 'विस्रसोपचय' म्हणतात, जो समूह पुढच्या समयात 'आत्म्यासह' बंधाला प्राप्त होणार आहे वर्तमानात हा समूह, त्याच आत्म्याच्या प्रदेशांवर, 'प्रतिक्षायादीत' (waiting list) असतो.

* प्रत्येक 'संसारी आत्मा' प्रतिसमय, 'समयप्रबद्ध' प्रमाण, 'कार्मणवर्गणा व नोकर्म वर्गणांना', ग्रहण करतो. 'कार्मणवर्गणा' कर्मरूप परिणमतात. 'नोकर्मवर्गणा' शरीररूप परिणमन करतात. प्रत्येक 'संसारी आत्म्याच्या', प्रत्येक प्रदेशावर, 'अनंतानंत कर्म' स्थित असतात. त्याहीपेक्षा 'अनंतगुणा कार्मणवर्गणा', प्रत्येक प्रदेशावर स्थित असतात. जे पुढच्या समयात 'कर्म तथा नोकर्मरूप', परिणमन करण्यासाठी तयार असतात अशा, अनंतानंत 'कर्म व नोकर्म' वर्गणा, 'विस्रसोपचयाच्या' रूपात, पुढच्या समयात बंधण्यायोग्य, प्रत्येक प्रदेशावर स्थित असतात. ह्याच तयार 'कर्म व नोकर्म' वर्गणांच्या समूहाला, 'विस्रसोपचय' म्हणतात.

**९) घाति-अघातिकर्म**[९] **:** जैन दर्शनाच्या, 'अत्यंत महत्त्वाच्या, अविभाज्य' घटक असणाऱ्या, अशा 'कर्मसिद्धांतात', आठ मुख्य कर्मांचा उल्लेख येतो. त्यात, 'चार घाति व चार अघाति' कर्मे आहेत.

* 'जीवांच्या देवत्वगुणांचा' घात करणाऱ्या, 'ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय व अंतराय', ह्या कर्मांना 'घातिकर्म' म्हटले आहे.

* 'ह्या व्यतिरिक्त 'आयु, नाम, गोत्र, वेदनीय', ह्या कर्मांचा 'अघातिकर्म' म्हणतात', कारण ह्या कर्मांमधे, 'जीवाच्या गुणांचा नाश' करण्याची शक्ती नसते.

* गोम्मटसार कर्मकांड (३९ ते ४४) नुसार, घाति कर्मांच्या प्रकृति, 'सर्वघाति व देशघाति', अशा दोन भेदरूपाने असतात.

* **सर्वघाति :** ज्या प्रकृति, बद्ध जीवाच्या 'गुणांचा, पूर्णतः घात' करतात, अशा स्वभावयुक्त प्रकृतींना 'सर्वघाति' म्हणतात. सर्व प्रकाराने 'आत्मगुण प्रच्छादक', अशा ह्या कर्मशक्ती असतात.

* **देशघाति :** विवक्षित एकदेशरूपाने, 'आत्मगुण प्रच्छादक' शक्तींना 'देशघाति' म्हणतात. विशेष म्हणजे 'सर्वघातिप्रकृतीतील', सर्वच स्पर्धक, 'सर्वघातिच' असतात.

* 'देशघाति प्रकृतीमधे, 'देशघाति व सर्वघाति', अशा दोन प्रकारचे स्पर्धक आढळतात.

* घातिकर्माच्या, 'ज्ञानावरणीयकर्माच्या पाच, दर्शनावरणीय कर्माच्या ९, मोहनीय कर्माच्या २८, आणि अंतरायकर्माच्या पाच', ह्या सर्व ४७ प्रकृति, 'पापरूपच' असतात. मात्र घातिकर्मात, 'सर्वघाति आणि देशघाति' स्पर्धक असल्याने, ''केवलज्ञानावरण एक, दर्शनावरण कर्माच्या, 'पाच निद्रा आणि केवलदर्शन' अशा सहा, 'चारित्र मोहनीय' कर्माच्या, 'अनंतानुबंधी, अप्रत्याख्यानावरण' प्रत्याखानावरण ह्या १२,' 'दर्शनमोहनीयाच्या 'सम्यग्मिध्यात्व आणि मिथ्यात्व', ह्या दोन'', अशा एकूण २१ प्रकृति व ह्यांचे सर्व स्पर्धक 'सर्वघातिच' असतात. ह्यात विशेषता म्हणजे, 'सम्यक्प्रकृतीचे' स्पर्धक 'देशघातिच' असतात. 'सर्वघाति' नसतातच. अन्य सर्व 'देशघाति' प्रकृतींमधे दोन्ही प्रकारचे स्पर्धक असतात. अशा प्रकारे एकूण ४७ 'प्रकृतिंपैकी', २१ प्रकृति 'सर्वघाति' असून, २६ प्रकृति 'देशघाति' आहेत. ह्या 'देशघाति' प्रकृतीचे स्पर्धक, 'देशघाति व सर्वघाति', अशा दोन प्रकारचे असतात.

गो.क. (१८० ते १८३) नुसार, 'घातिकर्मांची अनुभाग शक्ती' ही, 'लता, दारु, अस्थि, शैल', रूप मानली आहे. ह्यापैकी 'देशघाति प्रकृतीतील', दोन भाग सांगतात. 'स्पर्धक' हे, 'अनुभाग' दर्शवणारे असतात. (तक्ता क्र.५-६)

**१०) जीवविपाकी, पुद्गलविपाकी, क्षेत्रविपाकी, भवविपाकी कर्म**[१०] **:**

जीव अनादिकाळापासून, प्रतिसमय 'कर्म बांधत' आहे आणि प्रतिसमय ते, 'कर्म उदयाला'

येवून फळ देत आहेत. 'उदयकाळात कर्माचे हे फळ', चार प्रकारे दिसते.

**१) जीवविपाकी :** ज्या कर्मांचा विपाक, 'जीवाच्या गुणांवर' दिसतो, त्याला 'जीवविपाकी' कर्म म्हणतात. अशा ७८ प्रकृति सांगितल्या आहेत. 'ज्याचे फळ आत्म्यात दिसते, त्याचे 'औदायिक' भाव होतात. नामकर्मातील 'विहायोगती' ह्या कर्मोदयाने, 'आत्म्यात हीनाधिकताचे भाव' येतात, म्हणून 'जीवविपाकी' म्हटले आहे. ह्या ७८ प्रकृतीत : ''ज्ञानावरणीय कर्माच्या पाच, दर्शनावरणीय कर्माच्या नऊ, मोहनीयच्या २८, अंतराय कर्माच्या पाच, नामकर्माच्या २७, गोत्रर्माच्या दोन आणि वेदनीय कर्माच्या दोन'', प्रकृतींचा समावेश आहे.


**२) पुद्‌गलविपाकी :** ज्या कर्मांचे फळ 'पुद्‌गलशरीतच' दिसते, त्याला 'पुद्‌गलविपाकी' कर्म म्हणतात. नामकर्माच्या ६२ प्रकृति 'पुद्‌गलविपाकी' आहेत. 'संस्थान, संहनन, बंधन, संघात', ह्या प्रकृति 'पुद्‌गलविपाकी' आहेत, कारण त्याने 'भाव उत्पन्न' होत नाहीत.

**३) क्षेत्रविपाकी :** ज्या कर्मांचा विपाक, चार 'आनुपूर्वीत', विशेषरूपाने 'विग्रहगतीत' होते, त्याला 'क्षेत्रविपाकी' कर्म म्हणतात. उदा. मनुष्यगत्यानुपूर्वी इत्यादि.

**४) भवविपाकी :** ज्या कर्मांचा विपाक 'नरक' इत्यादि भवांमधे होतो, त्याला 'भवविपाकी' कर्म म्हणतात. उदा. चार भव (तक्ता क्र. ८/२ बघणे)

**११) कर्माचे नोकर्म[११] :** जीवपरिणामांद्वारे बद्ध ह्या 'कर्म, संकल्पनेचा विचार 'कर्मप्रकरणात' विविध विवक्षांनी केला गेला आहे. चार 'निक्षेपांच्या' आधारे सुद्धा, हे विवेचन केले गेले आहे.

जो कोणत्याही एका 'निर्णयात वा निश्चयापर्यंत' नेतो, म्हणजेच, 'अनिर्णित वस्तूंचे निर्णय करवितो', त्याला 'निक्षेप' म्हणतात. 'निक्षेप' हे, 'ज्ञेय' पर्यायात होतात तर, 'नय' हे 'ज्ञानात' होतात. ह्याचे मूळ चार भेद 'नाम- स्थापना- द्रव्य- भाव', असे आहेत. ह्यापैकी,




''कर्मस्वरूप परिणत द्रव्याहून भिन्न, बाह्यकारणरूप जे द्रव्य आहे, त्याला 'नोकर्म तदव्यतिरिक्त नोआगमद्रव्यकर्म'' म्हणतात. ''हीनता वा अधिकता, कर्मामधे ज्यामुळे येते, ते ते, त्या त्या कर्मांचे नोकर्म म्हणवले जातात''. अशा प्रकारे सर्व 'मूळ व उत्तर' प्रकृतींच्या, 'नोकर्मांचा'

ऊहापोह, 'कर्मकांड' ग्रंथात केला आहे. उदा. ज्ञानावरणाचे नोकर्म 'वस्त्र वा आवरण' आहे. पाच निद्रांचे नोकर्म 'गरिष्ट भोजन, म्हशीचे दूध', इत्यादि आहे. साता वेदनीयचे नोकर्म 'चांगले अन्न-पान-वस्त्र' इत्यादि आहेत.

* अशा प्रकारे 'आठ कर्मांचे नोकर्म', स्वयं तेथे असतात. ह्या बाह्य निमित्ताने, 'कर्मोदयात हीनाधिकता' येते. ''योग्य-अयोग्य निमित्त, हे नोकर्म होय''.

**१२) करण**[१२] **:** जीवाच्या शुभाशुभ इत्यादि परिणामांना, 'करण' म्हणतात. 'सम्यक्त्व, चारित्र' प्राप्तीत, सर्वत्र 'करणांचा' उल्लेख आढळतो. 'द्वितीयोपशमसम्यक्त्व, क्षायिक सम्यक्त्व, क्षायिक चारित्र, तसेच अनंतानुबंधीची विसंयोजना', ह्यापूर्वी तीन 'करण' आवश्यक असतात.

**१) अध:करण :** जेथे 'समान समयवर्ती' जीवांचे परिणाम आणि 'असमान समयवर्ती' जीवांचे परिणाम, 'भिन्न भिन्न वा एक समान' असतात त्याला 'अध:करण' म्हणतात.

**२) अपूर्वकरण :** जेथे 'समान समयवर्ती' जीवांचे परिणाम, 'समान वा असमान' दोन्ही प्रकारचे असतात, परंतु 'भिन्नसमयवर्ती' जीवांचे परिणाम 'असमानच' असतात, त्याला 'अपूर्वकरण' म्हणतात.

**३) अनिवृत्तिकरण :** जेथे 'समान समयवर्ती' जीवांचे परिणाम 'समानच' असतात व 'भिन्न समयवर्ती' जीवांचे परिणाम 'असमानच' असतात, त्याला 'अनिवृत्तिकरण' म्हणतात.

* 'अध:करणात', चार आवश्यक होतात : १) प्रतिसमय अनंतगुणी विशुद्धी २) अप्रशस्त प्रकृतींचा फक्त, द्विस्थानीय बंध (निंब व कांजीररूप) आणि त्यातही अनंतगुणी हानी ३)अप्रशस्त प्रकृतींच्या 'चतु:स्थानीय अनुभागबंधात', प्रतिसमय अनंतगुणी वृद्धी. ४) स्थितिबंधापसरण.

* 'अपूर्वकरणात', चार आवश्यक होतात : १) गुणश्रेणी २) गुणसंक्रमण ३) स्थिति खंडन (कांडकघात) ४) अनुभागखंडन (कांडकघान)

* 'अनिवृत्तिकरणात' चार आवश्यक होतात : १) स्थितिकांडकधात २) अनुभागकांडकधात ३) गुणश्रेणी ४) गुणसंक्रमण

**१) स्थितिबंधापसरण**[१३] : 'स्थितिबंध' कषायानुसार होतो. 'मिथ्यात्व व कषाय' हीन झाल्यामुळे, मंद झाल्यामुळे 'स्थितिबंध' घटतो. म्हणजे नवीन बंध, 'कमी स्थिति' असणारा होतो. हे 'कमी होणे वा घटणे', म्हणजे 'अपसरण' होय. स्थितिबंधाच्या घटण्याला 'स्थितिबंधापसरण' म्हणतात. विशिष्ट 'कर्मप्रकृतींचा बंध क्रमश: घटणे वा त्यांचा बंध होणे थांबणे, याला 'प्रकृतिबंधापसरण' म्हणतात.

**२) गुणश्रेणी**[१४]**:** 'श्रेणी' म्हणजे पंक्ती वा ओळ, निषेकांच्या पंक्ती, आणि 'गुण' म्हणजे 'गुणकार' होय. परिणामांच्या विशुद्धीमुळे, सत्तेतील कर्मांचे 'अपकर्षण' होते. 'अपकर्पित'

केलेले परमाणु ज्या विवक्षित, पंक्तिबद्ध निषेकांमधे, गुणित प्रमाणात दिले जातात. तेवढ्या निषेकांची 'गुणश्रेणी रचना' होते. अन्य विस्तार, 'दशकरणातील संक्रमण' विभागात केला आहे.

गुणश्रेणीनिर्जरेत, ''गुणश्रेणीशीर्ष, गुणश्रेणी आयाम, गलितावशेषगुणश्रेणी आयाम, अवस्थित गुणश्रेणी आयाम'', इतके अधिकार आवश्यक असतात.

**३) गुणसंक्रमण**[१५] **:** ज्या 'अप्रशस्त प्रकृतींचा' बंध होत नाही, त्या प्रकृतींचे जे द्रव्य (परमाणु) आहे, ते दर समयाला 'असंख्यात गुणाक्रमाने', ज्याचा बंध होत आहे, अशा 'स्वजातीय प्रकृतींमधे' संक्रमित होते, आपले 'स्वरूप सोडून, त्या अन्य प्रकृतिरूप' परिणमते, त्या विधानाला 'गुणसंक्रमण' म्हणतात. अधिक ऊहापोह 'दशकरणातील संक्रमण' विभागात केला आहे.

**४) स्थितिकांडकघात**[१६] **:** सत्तेतील कर्मांची 'स्थिति', अर्थात 'स्थितिसत्त्व', 'कांडकरूपाने हीन होणे, कमी होणे, याला 'स्थितिकांडकघात' म्हणतात. 'कांडक' म्हणजे तुकडा होय. अनेक निषेकांच्या समूहाला, येथे 'कांडक' म्हणतात. जेवढ्या 'निषेकांचा अभाव' होतो, त्याला 'कांडक' म्हणतात व तेवढ्या समयांना 'कांडकआयाम' म्हणतात.

**५) अनुभागकांडकघात**[१७] **:** एक एक 'अंतमुहूर्त' काळात, एक एक 'अनुभागकांडकघात' होतो. त्या अंतमुहूर्त काळाला, 'अनुभागकांडकोत्करणकाळ' म्हणतात. 'अनुभागकांडकघाताद्वारे' अप्रशस्त प्रकृतींचे, 'अनुभाग' घटते. 'अप्रशस्त प्रकृतींच्या', अनंत स्पर्धकांना, अनंतने भाग दिल्यास, त्यातील बहुभाग स्पर्धकांचा अनुभाग घटून, उरलेल्या एक भागरूप स्पर्धकांसमान होतो. अशाप्रकारे 'अनंतबहुभाग स्पर्धकांचा', एका 'कांडकाद्वारे घात' होतो, त्याला 'अनुभागकांडकघात' म्हणतात. संख्यात हजारवेळा 'अनुभागकांडकघात' होतात, तेवढ्या काळात एक वेळा, 'स्थितिकांडकघात' होतो. 'स्थितीकांडकघाताने, प्रशस्त-अप्रशस्त', दोन्ही 'प्रकृतींची स्थिति' घटते. 'अनुभागकांडघाताने', मात्र 'अप्रशस्त' प्रकृतींचे, 'अनुभागसत्त्व' घटते.

**१३) विसंयोजना**[१८]**:** 'क्षायोपशमिक सम्यग्दृष्टी जीव', परिणामांच्या विशुद्धीने, तीन करण करून, 'अनंतानुबंधीच्या' संपूर्ण द्रव्याला, उदयात येणाऱ्या 'कषाय वा नो कषायरूप' परिणमवतो. ह्यामुळे आत्म्यात, 'अनंतानुबंधीचे' सत्त्व समाप्त होते, ह्याला 'अनंतानुबंधीची विसंयोजना' म्हणतात. ह्या प्रकृतीचा 'क्षय' होत नाही, फक्त 'विसंयोजना' होते. जर तो जीव पुन्हा 'मिथ्यात्वात' न आला तर, ह्याचा पूर्णत: अभाव होतो. ही 'विसंयोजना', दर्शनमोहनीयची क्षपणा करण्याऱ्यासाठी आवश्यक असते. परंतु 'चारही गतीतले जीव, विशुद्ध परिणामांद्वारा' सुद्धा 'विसंयोजना' करतात.

**१४) दर्शनमोहनीयची क्षपणा**[१९] **:** 'दर्शनमोहनीय' कर्माच्या नाशासाठी, म्हणजेच 'क्षायिक सम्यग्दर्शनाच्या' प्राप्तिसाठी, कर्मभूमीचा 'द्रव्य पुल्लिंगी, प्रथमसंहननधारी, क्षायोपशमिक सम्यग्दृष्टी

मनुष्य, केवली अथवा श्रुतकेवलींच्या पादमूलात, तद्‌योग्य विशुद्ध परिणामांना' करीत, सर्वप्रथम तीन करणांद्वारे, 'अनंतानुबंधीची विसंयोजना' करतो. त्यानंतर पुन: 'तीन करण' करून, 'मिथ्यात्वाच्या सत्त्वाला सम्यमिथ्यात्वरूप, नंतर सम्यग्मिथ्यात्वाच्या सत्त्वाला सम्यक्‌प्रकृतिरूप' परिणमवितो. त्यानंतर 'सम्यग्‌प्रकृतीचा क्षय' प्रारंभ होतो. जेव्हा 'सम्यग्‌प्रकृतीचा' अनंतवा भाग शेष राहतो, तेव्हा 'कृतकृत्यवेदक' म्हणवला जातो. ह्या स्थितिपर्यंत, 'मरणाची' संभवना नसते. त्यानंतर तो विश्राम करतो. ह्या काळात जर त्याने, 'सम्यग्दर्शनापूर्वी' आयुबंध केला तर, विश्राम काळाच्या चार भागांपैकी, प्रथम भागात मरण करून 'देवगतीत', दुसऱ्याभागात मरणकरून, 'देव-मनुष्य' गतीत, तिसऱ्या भागात मरण झाले तर, 'देव-मनुष्य-तिर्यंच' गतीत, आणि चतुर्थ भागात मरण झाल्यास, 'चारही गतीत' जन्म ग्रहण करतो. ह्या मरणसहित जेव्हा तो जीव, अन्य पर्यायाला प्राप्त होतो तेव्हा, 'निवृत्यपर्याप्त अवस्थेतच', सम्यग्प्रकृतीच्या उरलेल्या अनंतव्या भागाचा क्षय करून, 'क्षायिक सम्यग्दृष्टी' बनतो. जर मरण न आले तर, 'कृतकृत्य वेदी' बनल्यानंतर, विश्रामानंतरच 'सम्यग्प्रकृतीचा' शेष भाग नष्ट करून, 'क्षायिक सम्यग्दृष्टी' बनतो.

* क्षपणासार (३९२) नुसार, 'चारित्रमोहनीय कर्माचीही क्षपणाविधि', कथन केली आहे. त्यात आचार्यांनी ''अध:करण, अपूर्वकरण, अनिवृत्तिकरण, वंधापसरण, सत्त्वापसरण, क्रमकरण अष्ट कषाय, १६ प्रकृतींची क्षपणा, देशघातिकरण, अंतरकरण, संक्रमण, अपूर्व स्पर्धककरण, अंतरकृष्टिकरण, सूक्ष्मकृष्टीअनुभवन'', असे १३ अधिकार कथन केले आहेत.

**१५) द्रव्य-क्षेत्र-काल-भाव :** प्रत्येक कर्माच्या, मूळ व उत्तर प्रकृतींचे 'नोकर्म' सांगितले जातात. कोणत्याही कार्यासाठी, 'अंतरंग व बहिरंग', दोन्ही कारणांची आवश्यकता असते. 'नोकर्म' नामक विशिष्ट बाह्य निमित्ताने, 'कर्मोदयात हीनाधिकता' येते. त्याचप्रमाणे 'कर्मोदय' हे कार्य असल्याने, बाह्य 'द्रव्य-क्षेत्र' इत्यादींची आवश्यकता वर्णिली जाते. कर्मोदयात हे 'द्रव्यादि चतुष्टय, स्व-पर चतुष्टय', महत्त्वाचे ठरते.

* क.पा. सूत्र, गा. ५९ च्या उत्तरार्धात, 'खेत्त-भव-काल-पोग्गल-ट्ठिदिविवागोदयखयदु' असा उल्लेख आहे.

* स.सि. ९/३६ टीकेत, 'विपाक-विचय धर्मध्यानाच्या' कथनात, आचार्य म्हणतात की, 'ज्ञानावरणादि कर्माच्या', 'द्रव्य-क्षेत्र-काल-भाव-भव', निमित्तक फळाच्या अनुभवांप्रती उपयोगाचे होणे, 'विपाकविचय धर्मध्यान' आहे.

* 'कालनिमित्ताने कर्मोदयाचा' विचार, दोन प्रकारे केला जातो. १) प्रत्येक कर्माचा, 'उदय-उदीरणा काळ' आणि २) असा काळ, ज्याने मधेच कर्मांची 'उदय-उदीरणा' होवून, बदल होतो. (श्लो.वा.अ.२., सू. ५३ ची टीका, श्लो. वा. खंड ५, पृ.२५७-२५८ स.सा. २४८ ते २५०)

* ह्या महत्त्वाच्या मुद्द्यातील[२०], 'द्रव्य' ह्या विभागात, 'मन-वचन-काय, संज्ञी, पर्याप्त, शरीर,

प्राण, योग-उपयोग, गुणस्थान, समास, मार्गणा, भाव, परिणाम', अशा विवक्षांनी 'बंध, उदय', इत्यादींचा विचार केला जातो. जसे 'वज्रवृषभनाराच संहननाशिवाय मोक्षप्राप्ती नसणे, पुरुषद्रव्यवेदी, मनुष्यगति शिवाय मोक्ष नसणे, जिनबिंब, जिनमहिमा इत्यादिने सम्यदर्शन होणे', इत्यादि उदाहरणे आहेत.

* पाच समवयात, 'काल' हे ही एक आहे. ''पंचम काळात मोक्षाचा अभाव, उत्सर्पिणीचा सहा, पाच, चर्तुथ काळ संपताच, तिसऱ्या काळाच्या प्रथम समयात, सूर्योदयाबरोबर क्षणमाप्राप्त, सर्व विकलेंद्रिय जीव मरणाला प्राप्त होतात, कारण भोगभूमीचा काळ व प्रभाव प्रारंभ होतो. पंचमकाळात सप्तम गुणस्थानावर जीव न जाणे, श्रेणी न चढणे'', इत्यादि उदाहरणे दिली जातात.

* 'क्षेत्र' अपेक्षेने, म्लेंच्छ खंडात 'व्रते' ग्रहण करता न येणे, 'नरक-तिर्यंच, मनुष्य' आयुचा बंध झाला असल्यास, 'अणु वा महाव्रते' धारण करू न शकणे, 'समवशरणात' जीवांमधील परस्पर वैर नष्ट होणे, इत्यादि.

* 'भाव' अपेक्षेने, 'औपशमिक-क्षायोपशमिक-क्षायिक' भाव महत्त्वाचे आहे. मात्र 'क्षायिक भाव', साक्षात् 'मोक्षाचे' कारण आहे.

अशा अनेक उदाहरणांनी, 'द्रव्य-क्षेत्र-काल-भावाचे', कर्मोदयातील महत्त्व सिद्ध केले आहे. कारण 'उपादान' एक असले तरी, 'निमित्तकारण' अनेक असतात. 'द्रव्यादि चतुष्टयानुसार' कर्म उदयाला येतात, अन्यथा पररूपाने उदयाला येतात. कार्य उत्पत्तीत 'पाच समवायांची' उपस्थिती असतेच.

**सारांश :** ह्या विभागात काही महत्त्वाच्या, मूळ, संकल्पनांचा स्थूल आढावा घेतला आहे. 'कर्मविभागात' ह्या संज्ञा वारंवार आढळतात. त्यांना एकत्रितपणे कथन केले आहे. ह्या संकल्पनांचा अभ्यास करताना, जे विशेष बिंदू जाणवले, ते सारांशरूपाने देत आहे.

♦ १) सर्व 'जड वा चेतन' पदार्थाच्या, 'गुणांमधे शक्तीचे अंश' असतात. त्या त्या 'शक्तीने', योग्य निमित्ताने, त्यात 'स्वयमेव बंध' होतो. 'जीवाला प्राप्त सर्व शरीरे व सर्व भौतिक' स्थूल पदार्थांचे, 'उपादान कारण' ह्याला मानले आहे. ह्यापासून 'वर्ग', त्यापासून 'वर्गणा' बनतात. ह्या 'वर्गणांपैकी', जीवद्वारा ग्रहणयोग्य, ह्या मर्यादित 'वर्गणाच' आहेत. 'द्रव्य व गुण' ह्यांना, वेगळे करता येवू शकत नाही. प्रत्येक गुणात 'शक्तीचे अंश' असतात म्हणजे, 'मी अनंत शक्तीचा धारक आहेच', हा विश्वास 'पुरुषार्थास' बळ देणारे आहे. हे 'बंध' स्वयमेव होतात, त्यात 'कर्तृत्व' नसून, तो 'बंध' होवू न देण्यात 'पुरुषार्थ' आहे. ह्या 'बंध प्रक्रियेची' ही, व्यवस्था इतकी, 'सुव्यवस्थित, शिस्तबद्ध व अचूक' आहे की, त्यात 'कोणाचाही हस्तक्षेप' चालतच नाही. 'पुद्गल द्रव्य', अनंतानंत असले तरी, 'जीव' ग्रहण फक्त, पाचच वर्गणा करतो. मात्र त्या पाचचे, 'ग्रहण ही भ्रमण' करविते तर, तेही 'ग्रहण कसे थांबेल', हा निर्णय, वा हा 'पुरुषार्थच',

सर्वश्रेष्ठ आहे.

♦ २) वर्गणांच्या समूहापासून 'स्पर्धक' बनतात, हे 'अनुभागशक्ती' दर्शवितात. ते 'घाति-अघाति-देशघाति-सर्वघातिरूप' असतात. प्रतिसमय जेवढे द्रव्य उदयात येते, त्याला 'निषेक' म्हणतात. ही 'निषेकरचना' स्थिति दर्शवते. एका समयात बद्ध 'निषेक', आबाधाकाळ संपल्यावर उदयाला येतात. प्रतिसमय एक 'निषेक' उदयाला येतो. म्हणजे प्रतिक्षण उदयाला येणाऱ्या त्या 'निषेकात,' कितीतरी 'भवांचे, समयांचे कर्म', उदयाला येत असतात. म्हणूनच उदयात, 'पुण्य-पाप, दु:ख-सुख', यांच्या 'उन-पावसाचा' खेळ अनुभवास येतो. कर्मांची ही आबाधा, 'पुरुषार्थाची' संधी आहे. कर्म उदयाला येण्यापूर्वी, फक्त 'आत्म्यात स्थित' असतात, म्हणून हा काळ 'पुरुषार्थदृष्टीने' महत्त्वाचा ठरतो. 'सर्वघाति-देशघाति' हे स्वरूप कळले की, 'कर्मप्रकृतींचा यथार्थ' स्वभाव कळतो व 'सम्यक् पुरुषार्थाला' चालना मिळते.

३) 'जीवविपाकी' कर्मात, सर्वात जास्त 'घातिकर्मांच्याच' प्रकृति आहेत. घातिकर्मातच 'क्षयोपशम' होतो, म्हणून खरी 'पुरुषार्थाची संधी' येथेच आहे. 'पुद्गलविपाकी' कर्मात सर्व 'अघाति कर्म' आहेत. 'शरीर-संस्थान' इत्यादित काही कर्तृत्व नाही. फक्त ह्या 'पुद्गलप्राप्त' गोष्टीत, 'अडकणे, मोह, ममत्व, भोक्तृत्व नसणे', हा 'पुरुषार्थ' आहे. अघाति कर्मांच्या फक्त, 'उदय वा क्षय' ह्या दोनच अवस्था आहेत. तेथे 'पुरुषार्थ' चालत नाही. मात्र 'सम्यक्ज्ञानाने', अभिमान-अहंकार दूर होवू शकतो.

४) कर्माचे 'नोकर्म व द्रव्य-क्षेत्र-काल-भाव', हे मुद्दे फारच महत्त्वाचे वाटले. 'कर्माचा उदय, अनुभागातील हीनाधिकता, फळाचा प्रभाव', ह्यात ह्या 'निमित्तांचे महत्त्व' आहे. 'द्रव्य-क्षेत्र-काल-भावानुसार', कर्म उदयाला येतात तर, ते निवडण्याचा 'विवेक, जागरूकता', जीवाधीन असू शकते. 'नोकर्म, बाह्य वातावरण, बाह्य वस्तू निवडण्याचे स्वातंत्र्य', जीवाला आहे. ह्या 'विवेकपूर्वक, सम्यक् निवडीने', कर्मोदय कथंचित् बदलता येवू शकतो, हा 'पुरुषार्थ' ठरेल. 'द्रव्य-क्षेत्रादितील' काही ठिकाणी, 'नियतीची' प्रधानता दिसते, मात्र ही 'नियति' सुद्धा, पूर्वभवाचा 'पुरुषार्थ' असतो तर, पुढची 'नियति' आत्ता ठरवण्याचा 'पुरुषार्थ', माझ्या हातात आहे, ह्या 'पुरुषार्थानेच', 'सत्तेत स्थित्यंतर' शक्य आहे.

व्यवहारातही म्हणतात की, 'प्रत्येक समस्येत, त्याचे उत्तर सामाविलेले असते, फक्त ते शोधण्याची 'गरज व नजर' हवी असते'. त्याचप्रमाणे कर्मांची व्यवस्था, 'स्वयंचलित आहे, खूप बलवान आहे, जीव परिणामात भूकंप आणणारी आहे', परंतु, त्यातील 'आबाधा, नोकर्म, द्रव्यादि चतुष्टय', रूपाने 'पुरुषार्थाची' संधी दिली आहे. किंबहुना 'पुरुषार्थ' घडू शकतो, ह्या शक्यतेवरच 'कर्मसिद्धांताचे' महत्त्व आहे. अन्यथा 'मोक्ष' प्रगटीकरणाचा, 'पुरुषार्थ' घडलाच नसता. फक्त त्या 'पुरुषार्थाच्या जागा व संधी' शोधणे महत्त्वाचे आहे. ह्या 'कर्मसिद्धांताच्या'

मूळाशी दडलेला, हा ‘पुरुषार्थ’ शोधण्यासाठीच, हा प्रबंधाचा ‘पुरुषार्थ ’ केला आहे.

## प्रकरण ३
## उपविभाग – २
## (२) संदर्भ–सूची


१) ध. १२/४,२,७,१९९/९२/१०,३; ध. पु.१४ पृ. ५०४,५४०; त. सू.५/३३–३६

२) रा. वा.२/५/४/१०७/६; ध.१२/४,२,७,१९९/९२/८; स.सा.आ. ५२

३) ध. १२/४,२,७,१९९/९३/९; ध.१४/५,६,७१/५१,५२/४; रा.वा. २/५/४/१०७/८

४) रा.वा. २/५/४/१०७/११; ध–१२ पृ १४५;ध.पु.१४ पृ ४३३ ;द्र.सं टी३४/४

५) ध.११/४,२,६,१०१/२३७/१६; गो–क.१६०/९६

६) गो.जी जी–प्र. २४६/५१०/११

७) गो.क ९१४,१५५;ध–६/१,९,–६.५/१४४/४

८) गो.जी. २४९, ध १४/५,६,५०२/४३०/११

९) ध. ७/२,१,१५/६२/१,४,६,७, गो.क ९,१०,७, पं. सं. प्रा. ४/४८३–४८६

१०) गो.क.४७ ते ५१

११) गो.क. ६९ ते ८६;५२ ते ६८

१२) गो.क.८९६;ध.६/१,९–८,४/२१४/५, ल.सा.३७–३९,५३–५४,८३–८४

१३) ल.सा. ८/९–१६;२२२–२२३

१४) ल.सा.५८३,१२८ ते१४३;ध.१२/४,२,७,१७५/८०/६

१५) गो.क.४११; ल.सा.जी.प्र. ७१ /१०९/१७;२२४/२८०/८

१६) ल.सा.६०

१७) ल.सा.८०–८१;क.पा.२/२–२२/२४६/२१९/२ते६;गो.क ३३६

१८) ध. ६/१,९–८,१२/२४७/२;ल.सा.११३,१३१,१४५, गो.क.५५०

१९) रा. वा. ४/२५४/१५;९/६५२–६२६/२०; ज्ञा. ४१/६–७, उत्तरपुराण पु.२, सर्ग ४८, श्लो १८–२० म.पु.पु. १३, १७, २२

## ३) 'अष्टकर्म' : मूळ व उत्तर प्रकृति : लक्षण-भेद : आस्रवांची कारणे :

**प्रस्तावना :**

जैन तत्त्वज्ञानात 'कर्मसिद्धांताला' अग्रगण्य स्थान आहे. 'जीव व कर्म' संबंध अनादिपासून असला तरी, तो 'निमित्त-नैमित्तिक' आहे. जैन दर्शनानुसार, हा लोक 'पुद्‌गल वर्गणांनी' भरलेला आहे. त्यापैकी 'कर्मणवर्गणा ह्या कर्मरूप' बनतात. (ध.१४/५, ६/७२०-७२६) ह्या प्रक्रियेत 'मिथ्यात्व, अविरति, प्रमाद, कषाय, योग', हे कारण आहेत. (त.सू.८-१) ह्या बंधनात, 'दोनच शक्ती' महत्त्वाच्या ठरतात, त्या म्हणजे 'योग व कषाय' होय. ह्या निमित्ताने होणारा बंध, 'चार प्रकारात' विभाजित होतो. (त.सू.८/३)

'जीव' ह्या निमित्तातच अडकतो, त्यानुसार चित्रविचित्र 'योग-उपयोग' करतो. त्या निमित्ताने तशाच 'शक्ती वा प्रकृति', कार्मणशरीरात पडतात. ह्या प्रकृति 'इंद्रियग्राह्य' नाही तरी, त्यामुळे होणारे 'भाव, कार्य, संयोग, शरीर', इत्यादि प्रत्यक्ष दिसतात. त्यावरून त्या 'प्रकृतींचा', अनुमान लावला जातो. 'उपादान वा वस्तू स्वभावाच्या' भाषेत, प्रत्येक 'प्रकृतीचे कथन' करणे अवघड असल्याने, 'कर्मसिद्धांतात' सर्वत्र 'निमित्तांची' भाषा प्रधानता दिसते. 'निमित्ताने' कार्य होत नाही पण, त्याचे 'ज्ञान' आवश्यक असल्याने, कथन महत्त्वाचे ठरते. 'बंध ते मुक्ती', ह्या प्रवासात, ''निमित्त-उपादानातील भेद, निमित्तांचे ज्ञान, 'स्व' ची जाण व भान'', यथार्थपणे करविणे, हेच 'कर्मसिद्धांताचे'काम आहे.

बंधापूर्वी 'आस्रव' कथन महत्त्वाचे असते. मात्र 'जैन दर्शनातील महत्त्वाचे मुद्दे' ह्या प्रकरणातील 'तत्त्व', ह्या विभागात, हे वर्णन केले आहे. ह्या 'प्रकृतिबंधाचे ' वर्णन, 'गोम्मटसार कर्मकांडातील, प्रकृतिसमुत्किर्तनाधिकार' (पृ. १ ते ४५, ४९ ते १०१) ह्या आधारे केले आहे.

'कर्मांचे आठ प्रकार, उपप्रकार', ह्यांच्या वर्णनात न जाता, स्थूल आढावा घेतला आहे. हे सर्व वर्णन, 'करणानुयोगातील', ग्रंथांमधे आहेच. पुनश्च 'पुनरावृत्ती वा कर्मग्रंथ निर्मिती' हा, प्रबंधाचा उद्देश नाही. त्यातील 'महत्त्वाच्या' मुद्द्यांवर लक्ष वेधून, 'गर्भित पुरुषार्थ, प्रकर्षाने अधोरेखित केला आहे.

**प्रकृतिबंध :** अनादिकाळापासून, 'राग-द्वेष' निमित्ताने, 'जीव व पुद्‌गलकर्म', हा बंध चालू आहे. त्यानुसार 'कर्मपरिणत' परमाणुंमधे स्वभाव पडतो. मूळतः ह्या 'प्रकृति' आठ असून, 'भेदरूपाने १४८', कथन केल्या आहेत. उत्तरोत्तर हे भेद 'असंख्यात' आहेत.

आगमात ह्या 'प्रकृतिबंधाचा' सविस्तर विचार केला आहे.

**कथनक्रम :** आचार्यांनी ह्या विषयविस्तारात, 'स्वभाव अर्थाने, एकार्थवाची नाम अर्थाने',

लक्षण सांगितले आहे[१].

* 'कर्मप्रकृतीचे' भेद कथन करताना[२], 'मूळ उत्तर, आठ भेद, १४८ भेद, असंख्यात भेद', वर्णन केले आहे.

* 'प्रकृतींच्या' विभागाचे वर्णन[३], ''पुण्य-पापरूप प्रकृति, जीवविपाकी इत्यादि, परिणाम, भव, परभविक प्रत्ययाच्या अपेक्षेने, बंध अबंध योग्य प्रकृति, सादि-अनादि, सांतर-निरंतर-उभय, ध्रुव-अध्रुव, सप्रतिपक्ष-अप्रतिपक्ष'', इत्यादि विवक्षांनी केले आहे.

* ह्या निर्देशात[४], ''आठ प्रकृतींची आठ उदाहरणे, पुण्य-पापाचे कार्य, अघातीचे कार्य, बध्यमान व उपशांत कर्म, एकच कर्म अनेक प्रकृतिरूप परिणमते, एकाच पुद्गल कर्मात अनेक कार्याची शक्ती, आठ प्रकृतींच्या क्रमाबाबत व त्यांच्या बंधाबाबतच्या नियमांचा ऊहापोह, अन्यही नियमांचा'' विस्तृत ऊहापोह केला आहे.

'कर्मबंधातील' चार भेदांपैकी, प्रथम 'प्रकृतिबंध' आहे. 'प्रकृति म्हणजे स्वभाव', हा 'आठ प्रकारांनी' सांगितला आहे. त्यांचा स्थूल आढावा घेवून, 'पुरुषार्थदृष्टीने' समीक्षा केली आहे.

**१) ज्ञानावरणीय कर्म :** 'प्रकृतिबंधातील' आठ कर्मांपैकी, जीवाच्या 'ज्ञानाला आवृत्त' करणाऱ्या, कर्मविशेषाला 'ज्ञानावरणीय' कर्म म्हणतात. 'ज्ञानात' विविधता असल्याने, 'कर्मातही' विविधता येते. म्हणूनच ह्याचे 'असंख्यात भेद' आहेत.

* ह्या 'कर्माचे ' वर्णन करताना आचार्यांनी[५], 'लक्षण सांगितले आहे. भेदाचे कथन पाच भेद, संख्यात-असंख्यात, इत्यादि कथन केले आहे. 'केवलाज्ञानावरणीयची' एक प्रकृति सांगितली आहे. 'ज्ञानावरण-दर्शनावरणीयच्या', बंध योग्य परिणामांचे' वर्णन केले आहे.

(१) ज्ञानावरणीयातील, 'मतिज्ञानावरणीयचे' वर्णन करतांना आचार्यांनी[६], ''मतिज्ञानाचा निरुक्ति अर्थ, अभिनिबोध म्हणजे इंद्रियज्ञान, 'अवग्रह, ईहा, अवाय, धारणा' इत्यादि भेद, स्मृति इत्यादि अपेक्षेने भेद, असंख्यात भेद, कुमतिज्ञानाचे लक्षण'' असा विस्तार केला आहे.

* 'मतिज्ञानाचे' वैशिष्ट्य नमूद करताना[७], ''मतिज्ञान हे 'दर्शनपूर्वक', इंद्रियांच्या निमित्ताने होते, मतिज्ञानाचा विषय, 'अनंत पदार्थ व अल्प पर्याय' आहेत, अतींद्रिय द्रव्यात, मतिज्ञानाच्या व्यापाराबाबत समन्वय, मतिज्ञान व अज्ञानाचा क्षायोपशमिकपणा, परमार्थाने इंद्रियज्ञानास, ज्ञानाचा दर्जा नसणे, भेद जाणण्याचे प्रयोजन'', ह्या विषयांचा उहापोह केला आहे.

* 'मतिज्ञानाचा' विशेष निर्देश करताना[८], ''अवग्रहादि अपेक्षेने 'मतिज्ञानाचा' उत्पत्तिक्रम, 'ईहा' इत्यादिला मतिज्ञान म्हणण्याची कारणे, 'स्मृति' इत्यादीचे लक्षण, 'बहु-बहुविधचे' लक्षण,अंतर, सिद्धी'', इत्यादि वर्णन केले आहे.

(२) 'श्रुतज्ञानावरणीय' ह्या भेदाचे कथन आचार्यांनी[९], ''लक्षण सांगून, शब्द-अर्थ-लिंग

इत्यादि भेद, द्रव्य-भाव, सम्यक्-मिथ्या इत्यादि भेद, कथंचित् मतिज्ञानाचे निमित्त, मनाचे निमित्त, विषय, त्रिकालज्ञता, मति-श्रुतची प्रधानता, भावश्रुताची प्रधानता, मति-श्रुत कथंचित्, एकता, कथंचित् भेद, कथंतिच् परोक्षता'', अशा विस्ताराने सविस्तर विवेचन केले आहे. 'अंगबाह्य व अंगप्रविष्टाचे' वर्णन केले आहे.

(३) 'अवधिज्ञानावरणीय' ह्या भेद वर्णनात[१०], ''त्याचे लक्षण, 'सम्यक्-मिथ्या, गुणप्रत्यय-भवप्रत्यय, देशावधि-परमावधि-सर्वावधि, वर्धमातादि, अप्रतिपाती-प्रतिपाती', इत्यादि भेदांचे कथन'' केले आहे.

* 'अवधिज्ञानाच्या' वैशिष्ट्य वर्णनात[११], ''पंचमकाळात कथंचित् संभावना, प्रत्येकवेळी नवीन ज्ञानाची उत्पत्ती, मोक्षमार्गात महत्त्व नाही, मिथ्यादृष्टीचे विभंगज्ञान, कर्मबद्धजीवांना प्रत्यक्ष जाणणे, कथंचित् मनाचा सद्भाव, चिन्हांचे आकार, इत्यादि माहिती, चारही गतीत संभावना, भवप्रत्यय फक्त देव-नारकी-तीर्थंकरांना होते, गुणप्रत्यय मनुष्य व तिर्यंचांना होते, भवप्रत्यय सम्यग्दृष्टी व मिथ्यादृष्टी दोघांना होते. गुणप्रत्यय मात्र सम्यग्दृष्टींनाच होते, रूपीला जानतात'', असा विस्तार केला आहे.

(४) मन:पर्ययज्ञानावरणीय[१२] : ह्या वर्णनात, ''लक्षणाचे कथन केले. ह्या ज्ञानाचा विषय, त्याचे भेद, ऋजु-विपुलमतीचे लक्षण, उत्पत्ति स्थान मन, इंद्रियनिरपेक्षता, स्वामी, गुणस्थान'', इत्यादि कथन केले आहे.

(५) 'केवलज्ञानावरणीय' ह्या भेदाचे कथन आचार्यांनी[१३], ''लक्षण, निरपेक्षता, असहायता, केवलज्ञान ही पर्याय आहे, ज्ञानावरणीयच्या क्षयाने, उत्पत्ती, अव्याकुळता, सर्वांगाने जाणणे, युगपत्, पृथकपृथक सर्व काही जाणणे, सर्व द्रव्य, सर्व पर्यायांना जाणणे, अतिशय पूज्यता'', इत्यादींचे अत्यंत विस्ताराने वर्णन केले आहे.

अशा प्रकारे 'ज्ञानावरणीयकर्माचा' ऊहापोह, त्याच्या 'पाच भेदांसह' केला गेला आहे. आगमातील ह्या विस्तृत विवेचनाच्या, सूक्ष्म अभ्यासाने, चिंतन-मननातून, त्यातून झळकणारा 'पुरुषार्थ ' उजागर केला आहे.

**ज्ञानावरणीयातील 'पुरुषार्थ ' :**

(१)'ज्ञानावरणीय' कर्माच्या उदाहरणरूपाने, 'वस्त्राने अच्छादित मूर्ती', दाखवली जाते. हे वस्त्र मात्र 'आवरण' आहे, ते मूर्तीच्या 'रंग-रूप-आकारात', बदल करू शकत नाही. त्याचप्रमाणे 'ज्ञानावरणीय कर्म ज्ञानाला झाकणारे, अज्ञानता वाढवणारे' आहे. 'ज्ञानगुणाची शक्ती', ज्ञानपर्यायात पूर्णपणे प्रगट होवू देत नाही. मात्र 'कर्म 'हे फक्त 'निमित्त' आहे. त्या अवस्थेतही, 'जीव व कर्म', भिन्न व स्वतंत्रच आहे. काहीही झाले तरी, 'पूर्ण ज्ञानगुणावर आवरण' शक्यच नाही, 'हीन अवस्था' असली तरी, 'ज्ञानाचा उघाड' राहणारच. ह्या 'उपादानाकडे दृष्टी व त्याचाच आश्रय',

हाच 'पुरुषार्थ 'आहे. 'निमित्ताधीन' दृष्टी सोडणेच 'पुरुषार्थ 'आहे. 'अज्ञानतावश ' झालेलीचुक सुधारणेच 'पुरुषार्थ' आहे.

♦ (२) 'ज्ञान' हा जीवाचा स्वभाव आहे. 'ज्ञानाच्या क्षयोपशमाने' थोडे ज्ञान प्रकट तर, थोडे अप्रकट आहे. जे प्रकट आहे, तो 'स्वभाव' आहे आणि 'स्वभाव', कधीच बंधात कारण होवू शकत नाही. जो भाग 'अप्रकट' आहे तो तर, अभावच आहे. 'अभावाने' बंध शक्य नाही, म्हणजे कर्मांच्या नव्या बंधात, 'ज्ञानावरणाचा उदय' हे, निमित्त नाही. तो बंध, त्यावेळच्या 'भाव वा परिणामरूप' होणार. हे 'भाव वा परिणाम' हे जीवाच्या 'स्वाधीन' आहे. हाच 'ज्ञानावरणात' दडलेला 'पुरुषार्थ' आहे.

(३)कर्म, 'मानसिक, भावनात्मक, आध्यात्मिक' प्रक्रिया आहे. 'कर्म' तर ह्या, कर्मभूमीत करावेच लागणार, फक्त ते 'कर्म कोणते निवडावे', हे 'स्वातंत्र्य' हाच 'पुरुषार्थ' आहे. पूर्वबद्ध कर्म 'अज्ञानतावश' बांधले तरी, ह्या भवातील 'सत्कर्माने त्यांचे परिमार्जन' करता येते, त्याची 'तीव्रता कमी' करता येते. त्यासाठी 'सावधनता, शुद्धलक्ष्य, शुभसंकल्प', हाच 'पुरुषार्थ' आहे. सतत जीवनाला, 'उज्ज्वल' बनवण्याचा संकल्प करणे, 'कर्मबंधाची कारणे, उदय, सत्ता', ह्यांना जाणणे, सतत 'सम्यग्ज्ञानाचा' प्रयत्न करणे, हाच 'पुरुषार्थ' ह्यातून सूचित केला आहे.

♦ (४) 'ज्ञानावरणीयाच्या' आस्रव कारणांची मीमांसा, 'राजवर्तिककारांनी' खूपच मार्मिकपणे केली आहे. त्याचा नीट, सूक्ष्म, अभ्यास जणू, जीव स्वभावाचा 'आरसाच' आहे. त्यांना जाणून कळते की, आपल्याच 'अज्ञानता व चुकीच्या व्यवहाराने', आज प्राप्त परिस्थिती लाभली आहे. ''कोणत्या भवात ते कर्म बांधले की, आज 'ज्ञानावर पडदा' आहे, 'अज्ञानता' आहे ? का असे भाव होत आहे ? का 'ईर्ष्या, मत्सर, द्वेष' आहे? का थोडे जास्त ज्ञान झाले की, लगेच 'अहंकार' आहे, का 'सत्याचे' ज्ञान नाही?'' इत्यादि प्रश्नांच्या उत्तरादाखल फक्त, 'स्व' परिणामांची असणारी चुक कळते. कर्म जर करायचेच आहे तर, 'त्यात आसक्ति कशी कमी होणार, तटस्थता कशी येणार, नैतिकता कशी येणार, माझे व इतरांचे कमीतकमी नुकसान कसे होईल?' ह्या स्थितिकडे 'लक्ष, जागरूकता, हाच 'पुरुषार्थ' आहे.

(५)सर्व संसारी जीवांना, 'मति-श्रुत' ज्ञान असतेच. ही ज्ञाने, 'सर्व द्रव्यांच्या असर्व पर्यायांना' जाणतात. ही ज्ञाने 'श्रेष्ठ' म्हटली आहेत. म्हणून सतत ''सम्यक्ज्ञानाची आस, ध्यास, प्रयास, ज्ञान व ज्ञानीची प्रशंसा, खुल्या दिलाने ज्ञानाचा प्रसार, कृतज्ञता, सतत ज्ञान-ध्यान-तपाराधना, आदर, अभिक्ष्णज्ञानोपयोग,'' हाच वर्तमानातला 'पुरुषार्थ' आहे. आज, 'प्राप्त क्षयोपशमाने, प्राप्त बुद्धी, स्मरणशक्तीने', अधिकाधिक 'सम्यग्ज्ञानाचा' प्रयत्नच, 'स्व' ची ओळख करवणारे आहे. त्या क्षयोपशमजन्य ज्ञानाचा, 'दुरुपयोग वा अभिमान' न करता, 'स्व-पर' कल्याणार्थ, 'उपयोग-योग' होणे, हाच 'पुरुषार्थ' आहे.

♦ (६) 'केवलज्ञान' सर्व, 'द्रव्यांना सर्व पर्यायांना' युगपत्, स्पष्ट जाणते तरी, त्यात 'तन्मयता, इच्छा, राग-द्वेष' नाही. सर्व जाणूनही, त्यात रत नाही, मात्र 'स्व' तच, रममाण असतात. संसारात जीवाला, 'प्राप्त क्षायोपशमिक, अल्प, अस्पष्ट, क्रमिक' ज्ञान तरी, 'गर्व, अभिमान, ईर्ष्या, मत्सर', जास्त असतो. हे जाणले की, 'ज्ञानाचा महिमा' कळतो आणि त्या 'ज्ञानस्वभावप्राप्तीकडचा पुरुषार्थ' सुरू होतो.

**२) दर्शनावरणीयकर्म :** जीवाची 'चैतन्यशक्ती', आरशाच्या 'स्वच्छत्वशक्ती', प्रमाणे आहे. ह्या ''स्वच्छ, शुद्ध, चेतनेचा निजप्रतिभास, म्हणजे दर्शन होय.'' 'ज्ञान म्हणजे विशिष्ट दर्शन परिपूर्ण चेतना' होय. 'दर्शनरूप' अंतरंग चित्प्रकाश विशेष हा, 'सामान्य व निर्विकल्प' असतो. वास्तविक 'दर्शन' सामान्यपणे एकच आहे, परंतु समजण्यासाठी, 'चक्षु' इत्यादि भेद सांगतात. संसारी अवस्थेत 'दर्शन व ज्ञान' क्रमपूर्वक होते. संसारी जीवांना, 'इंद्रियज्ञानापूर्वी दर्शन' अवश्य असतेच. निजस्वरूपाचे 'स्वसंवेदन व ओळख', 'दर्शनोपयोगानेच' होते म्हणूनच, 'सम्यग्दर्शनात', श्रद्धाऐवजी 'दर्शन' शब्द वापरले जाते.

'दर्शनावरणीय' कर्म, 'दर्शनावर' आवरण टाकते. 'स्व' दृष्टीला झाकणारा, 'सामान्य-प्रतिभासाला' शक्तिहीन करणारा म्हणून, 'दर्शनावरणीय कर्म' म्हणतात. आचार्यांनी ह्याचे सविस्तर विवेचन केले आहे.

**कथनक्रम :** ह्या विस्तारात[१४], ''दर्शनावरणीयचे सामान्यलक्षण, त्याचे मूळ ९ भेद, असंख्यात भेद, त्यांचे लक्षण'' वर्णिले आहे.

* आचार्यांनी, 'निद्रांनाही' दर्शनावरणीय म्हटले आहे[१५]. कारण ह्या 'निद्रा', आत्म्याच्या 'चेतन गुणाला' दूर नेणाऱ्या असल्याने, सर्व सर्वदर्शनविरोधी कर्माच्या, 'दर्शनावरणत्वाच्या', बाबतीत विरोध येत नाही. ह्या 'निद्रा', स्वसंवेदनांचा नाश करतात. ह्या 'निद्रा', बाह्य अर्थाच्या ग्रहणाला, उत्पन्न करणाऱ्या शक्तीचा, प्रयत्नविशेषाचा नाश करतात.

* 'ज्ञानवरणीय' कर्माच्या आस्रवात, ज्या कारणांचा सामावेश केला आहे, त्यानेच 'दर्शनावरणीय' कर्माचाही, 'आस्रव' सांगितला आहे.

**दर्शनावरणीयातील 'पुरुषार्थ' :**

१) ह्या कर्मांच्या स्वरूपाला जाणले की, एक गोष्ट स्पष्ट होते की, हे 'कर्म मी स्वत:च संचित केले आहे. ते मानसिक व भावनात्मक' आहेत व त्यात माझाच 'पुरुषार्थ' आहे. ह्या सद्य जीवनाकडे नजर टाकली तर, ह्या आजच्या प्राप्त परिस्थितीस जबाबदार कोण आहे? निदान इतके चिंतन तरी आवश्यक आहे. कर्मविषयक 'अज्ञानता व व्यर्थ विपरीत मान्यता', दूर करणे हाच प्रथम 'पुरुषार्थ' आहे. अन्यथा कर्मांचा नाश केवळ अशक्यच ठरेल. ह्या 'आत्मदर्शनाला' अडवणारे, फक्त 'माझेच परिणाम व अज्ञान आहे', ही खात्री होणे, 'पुरुषार्थाची' सुरुवात आहे.

२) 'दर्शनावरणीय' कर्म, दारावर उभ्या असलेल्या 'द्वारपालासमान' आहे. तो 'दर्शनात बाधा' आणतो. परंतु 'आत्म्यात ढवळाढवळ' करीत नाही. हे अडथळे ही, 'स्वईर्ष्या, ज्ञानाला झाकणे, मत्सर, प्रशंसा न करणे, द्वेष करणे, आदराभावाचा अभाव', इत्यादीने अर्जित केले आहे. ''अहंकार, अविनय, कृतघ्नता, इतरांचे श्रेय लाटणे, आळस, अंधश्रद्धा, स्वत:ची श्रेष्ठता व्यक्त करणे, व्यर्थ प्रलाप, दुराग्रह'', ह्या 'स्वअपराधाचेच' फळ आहे की, आज 'ज्ञानात-दर्शनात कमतरता, विघ्न', उत्पन्न झाले आहे.

♦ ३) ह्या आपल्या 'अवगुणांना' बघणे, त्यांना स्वीकारणे, ही 'पुरुषार्थाची प्रथम श्रेणी' ठरेल. सतत, 'आत्मकल्याणाचा ध्यास, आत्मज्ञानाची आस', लागणे हा 'पुरुषार्थ' ठरेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, 'प्राप्त सर्व सुख-दु:ख, प्रतिकूलता-अनुकूलता, ज्ञान-अज्ञान, कमतरता-प्रचुरता', ह्या सर्वांना जबाबदार फक्त, 'स्वभाव वा परिणाम' आहे, ह्यावर दृढ विश्वास हा 'पुरुषार्थ' आहे. इतरांवर 'दोषारोपण', बंद करणे 'पुरुषार्थ 'आहे. सद्य परिस्थितीत जर काही, 'पदार्थांपासून, ज्ञानापासून' वंचित आहे तर, माझ्या 'पूर्वबद्ध कर्माचे फळ' आहे. वर्तमानात 'खरे ज्ञान, सम्यक् श्रद्धान', कसे वाढवावे, बस ह्याचाच 'निदिध्यास', हाच ह्यातील, गर्भित 'पुरुषार्थ' आहे.

**३) वेदनीयकर्म :** 'जैन दर्शनात' मान्य आठ 'कर्मप्रकृतींमधे', हे 'अघाति कर्म' आहे, मात्र त्याचा क्रम 'मोहनीयाच्या' आधी ठेवला जातो. कारण 'वेदना' ही 'ज्ञान-दर्शनाची अव्यभिचारिणी' आहे, ती 'पुद्गलात' आढळत नाही. शिवाय बाह्य सामग्रीच्या, 'संयोग व वियोगाने', जीवाला बाह्य 'सुख-दु:खाला' कारण, हे 'वेदनीय' कर्म आहे. मात्र ह्या बाह्य पदार्थात 'इष्टानिष्टता' ही, 'मोहनीय' कर्माने होते. म्हणूनच 'मोहनीय कर्मासह, वेदनीय कर्म', हे घातिकर्मवत् ठरते. (ध.१३, पृ.६)

**कथन :** ह्या कर्माच्या विस्तारात आचार्यांनी[१६], ''लक्षण, भेद-प्रभेद, साता-असाताचे लक्षण, साता-असाताच्या बंधयोग्य परिणाम, काळ व अंतर, वेदनीयचे कार्य बाह्य सामग्री संपादन करविणे आहे, सातावेदनीय कथंचित् जीव-पुद्गल-विपाकी आहे, अघाति कर्म असल्याने, फक्त वेदनीय वास्तवत: सुखाचा विपक्षी नसणे, कथंचित् सुख-दु:खरूप व्यापार, समन्वय'', अशा विविध विवक्षांनी वर्णन केले आहे.

* ह्या 'साता-आसाताच्या' आस्रवांचा विचार, '(त. सू.६-११) रा.वा.', ह्या ग्रंथामध्ये, अत्यंत चांगल्या प्रकारे केला आहे.

* आगमात ह्या कर्माचे उदाहरण, 'बंध-उदय इत्यादि, महत्त्व व प्रभाव', ह्यांचे वर्णन केले आहे.

**गर्भित पुरुषार्थ :**

१) कर्म करण्याच्या 'कुशलतानुसार', जीवनाची 'श्रेष्ठता' ठरविली जाते आणि 'कर्मोदयात' जशी 'भावदशा' असेल तसे, पुढचे नवीन 'कर्मबंध' होणार आहे. हा सर्वस्वी 'व्यक्तिगत' प्रांत आहे. 'कर्म व जीव' खेरीज, तिसऱ्याचे तेथे कामच नाही. 'दुसऱ्यांच्या दु:खास कारण न बनणे, आणि आपल्या दु:ख व संकटाला स्वत:लाच कारण मानणे', ह्या विषयीची 'जागृकता' हीच 'कर्म करण्यातील कुशलता' होय. 'कोणालाही दोषी न ठरवणे, ना तक्रार करणे, फक्त 'कर्तव्य' करणे, आणि प्राप्त फलस्वरूप सुखदु:खाप्रती तटस्थता', हाच 'पुरुषार्थ' म्हणता येईल.

२) आज जे 'सुख-दु:ख' प्राप्त आहे, ह्यांची व्यवस्था 'स्व' नेच, 'पूर्वभवात' केली, 'दु:खाच्या निमित्ताने दु:खी होवून, इतरांनाही दु:खी केले, इष्टवियोग-अनिष्ट संयोगाने मोहापायी शोक केला. सदैव मन पीडाग्रस्त ठेवले, सतत दु:खी होवून, नव्या दु:खाला बांधले. कठोर, अप्रिय, कटूक वचनांचा वापर केला. जोरजोराने रडून, खोटे दु:ख प्रगट करून', असाताचा संचय केला. 'दु:खदाई कार्य, हिंसेची उपकरणे बनवणे-विकणे, पेस्टीसाईड, विष इत्यादि बनवणे', अशा व्यर्थ क्रियांनी बद्ध कर्म, 'असाता रूपानेच' फलित होतात. 'अज्ञाननावश, मोहवश, आसक्तिवशाने', हे कर्मार्जन केले. ह्यावर एकच उपाय आहे. (१) अपेक्षा कमी करणे (२) तक्रार कमी करणे (३) सदैव आपल्या दु:खाला कारण, स्वत:लाच मानणे (४) दुसऱ्यांच्या दु:खाने दु:खी होणे, अनुकंपा असणे. हीच 'कर्मातली कुशलता', खरा 'पुरुषार्थ' आहे.

(३)एक समयात बांधलेले हे कर्म, अनंत काळ उदयात येवून फळ देतात. जसे बांधले फळही तसेच मिळते कारण, संसार 'प्रतिध्वनिसमान' मानला जातो. 'जे देणार तेच मिळणार' हा नियम आहे. म्हणून 'देतांना विवेक व जागरूकता, हाच 'पुरुषार्थ' होय. त्यासाठी 'मला काय हवे, कसे हवे, काय प्राप्त करायचे आहे?' ह्याविषयी 'दृढता हवी, ध्येयनिश्चिती हवी, लक्ष्य स्पष्ट हवे' आणि ह्या 'ध्येयप्राप्तीत' कोणतीही ढिलाई नसावी.

'वेदनीय' कर्म 'सुख-दु:खाची' सामग्री देतात. या सुखाच्या क्षणात 'गाफिलता' व दु:खात 'निराशा' नसणे, हा 'पुरुषार्थ' आहे. आज सुखाची प्राप्ती, ही सुद्धा 'स्व' अर्जित कर्माचेच फळ आहे. पूर्व भवात केलेली ''प्राणिमात्रांवर, व्रतींवर दया-अनुकंपा, करुणा, दान, प्राणिरक्षा, इंद्रियविजय, संतोषभाव; शांति, शौच-शुचिता-पवित्रता; कषायांची मंदता, अनासक्ति'', अशी अनेक कारणे की, ज्या 'पूर्वपुरुषार्थाने' आज, 'सुख, शांति' प्राप्त झाली आहे. आज पुन्हा, ह्या गोष्टी घडत आहेत का? पुन्हा असेच कार्य होत आहे का? हे सूक्ष्म निरीक्षण वा चिंतनही 'पुरुषार्थच' ठरेल.

♦ (४) 'वेदनीय कर्म' मात्र, 'संयोग' देण्यात निमित्त आहेत. 'इष्टानिष्टता' तर, 'मोहनीय कर्माचे कार्य आहे. १३व्या गुणस्थानात, निरंतर 'साताचा' उदय आहे. 'अष्ट प्रतिहार्य, अष्टमंगल,

समवशरण, सेवेला देव, इंद्रादि, सर्व सुखांची वर्षा' होत आहे, मात्र 'मोहनीय नाही तर, वेदनीयाचा प्रभावच' नाही. हा 'पुरुषार्थाचा प्रकर्ष 'आहे कारण, 'संयोगाकडे मात्र संयोगाप्रमाणे' बघणे, कारण त्याचा 'वियोग निश्चित' आहेच, हा 'पुरुषार्थाचा' पाठच 'केवली' जणू, सतत देत आहेत. १३व्या गुणस्थानाइतका 'साताचा प्रकर्ष' अन्यत्र नसतो मात्र, त्या प्राप्त 'अनंत चतुष्टयांपुढे', त्या साताची तुच्छता प्रकर्षाने स्पष्ट होते. किंबहुना केवली हेच दर्शवतात की, 'स्व' ची प्राप्ती झाली की, 'साताचा प्रकर्ष होतो, मात्र ही प्राप्ती 'पुण्याचा भाग' आहे व 'स्व' ची प्राप्ती 'पुरुषार्थाचा' भाग आहे. 'पुण्यापासून पळून जाता येत नाही वा जायचेही नाही', फक्त त्यात 'हुरळायचे, मदोन्मत' व्हायचे नाही, हाच 'वेदनीयतला पुरुषार्थ' आहे.

**(४) मोहनीयकर्म :** 'जैन दर्शनात', मान्य आठ कर्मांमध्ये, ह्या 'कर्माला' अत्यंत 'महत्त्वाचे, प्रधान, राजा' मानले आहे. कारण हे 'कर्मच', ह्या 'दृश्य संसाराचे मूळ कारण' मानले आहे. ह्या कर्माचे मुख्यत्वे, 'दर्शनमोहनीय व चारित्रमोहनीय' हे भेद आहेत. त्यापैकी 'दर्शनमोहनीयकर्म', सम्यकत्वाला व 'चारित्रमोहनीय कर्म', साम्यतारूप स्वाभाविक चारित्राचा घात करणारे आहेत. ह्या दोन्ही कर्मांच्या फळरूपाने जीव, 'मिथ्यादृष्टी व रागी-द्वेषी' बनतो. ह्यात 'दर्शनमोहनीयचे तीन भेद व 'चारित्रमोहनीयचे २५ भेद आहेत.

**कथनक्रम :** अत्यंत महत्त्वाच्या अशा ह्या कर्माचा, खूपच विस्तृत ऊहापोह आगमात केला आहे. 'सर्व गुणस्थानांचा' विचार मुख्यत्वे, ह्याच 'कर्माच्या' अनुषंगाने केला गेला आहे.

* ह्या विस्तारात आचार्यांनी[१७], ''सामान्य लक्षण, भेद-प्रभेद, समस्त कर्म मोहाच्याच अधीन आहे, जन्ममरण परंपरारूप, संसार उत्पत्तीचे सामर्थ्य'', असा विषय कथन केला आहे.

* 'दर्शनमोहनीयचेही'[१८], लक्षण, भेद, अंतर, बंधयोग्य परिणाम वर्णन केले आहे.

* 'चारित्रमोहनीय कर्माचा' विस्तार[१९], 'लक्षण, भेद-प्रभेद, कषायउत्पत्तीत कारण, कषायवेदनीय, अकषायवेदनीयच्या बंधयोग्य परिणाम', अशा विवक्षांनी केला आहे. रा.वा. कारांनी (६/१४/३/५२५/५,८) केलेली, सर्व 'कषाय व नोकषायांच्या 'आस्रवांची मीमांसा, अत्यंत वाचनीय व चिंतनीय आहे.

**मोहनीयकर्मात पुरुषार्थाला स्थान :**

(१)''मोहनीयच्या दोन भेदांपैकी, दर्शनमोहनीयच्या उदयात श्रद्धेची विपरीतता होते तर, चारित्रमोहनीयच्या उदयात रागद्वेषाची उत्पत्ती होते.'' 'श्रद्धा, निष्ठा, आस्था, समर्पण, विश्वासाला', दर्शनमोहनीय विपरीत करतो. निजसंपदा, 'स्व' ची 'जाण व भानच' होवू देत नाही. संसाराकडे बघण्याची 'नजर बिघडवणारे वा विकृत करणारे' कर्म आहे. खरे 'देव-शास्त्रावर' श्रद्धा होवू देत नाही, 'स्व' हिताची गोष्टच आवडत नाही, अन्य कर्म, आत्मगुणांना 'आवरित' करतात, परंतु

त्यांचा 'क्षयोपशम' सदैव असतोच. हे 'कर्म सर्वात 'भयंकर' आहे जे, पूर्ण जीवनालाच 'विषाक्त व विकृत' बनवते. 'श्रद्धा व आचरण' दोन्ही बिघडवतात. हा संसार, 'जशी दृष्टी आहे तसा दिसतो'. मनात 'राग-द्वेष' असेल तर, त्यानुसार 'भाव' होतात. कारण पूर्वभवात, ''महापुरुषांमधे दोषाची कल्पना केली, केवलींवर दोष लावले, श्रुतात दोषारोपण केले, धर्म, गुरु, संघ, मुनि, देव, सर्वांना दोष लावलेत'', ह्या कर्माच्या फळरूपाने 'श्रद्धा' विपरीत झाली. कर्मांचे 'भेद-प्रभेद, कार्य, आस्रव, इत्यादिंचे 'सम्यक् ज्ञान' म्हणूनच आवश्यक आहे.

(२)अंतरंग 'आसक्ति व कषायानुरूप', बाह्य संसार दिसतो, म्हणून ही 'दृष्टी बदलणे', हाच 'पुरुषार्थ' आहे. अंतरंगात 'सम्यक् श्रद्धा, विश्वास, निर्मलता, विवेक', उत्पन्न करणे, हाच 'जीवाधीन' भाग आहे. पुद्‌गलांच्या पर्यायवरची दृष्टी, 'स्व' कडे आणणे गरजेचे आहे. आपल्या 'शुद्ध स्वरूपावर, विश्वास ठेवून, त्याचेच 'ध्यान, चिंतन' आवश्यक आहे. कारण 'द्रव्य स्वतंत्र आहे, परिणमनशील आहे, सदैव आहे, शक्ती व गुणांनी युक्त आहे', ह्या तत्त्वांवर 'दृढ श्रद्धान, विश्वास', हाच 'पुरुषार्थ' स्वाधीन आहे. 'पर्यायाला' जाणणारे 'ज्ञान' व त्यात 'आसक्ति व कषाय', ही 'स्वचुक' आहे, हे मानणे हा 'पुरुषार्थ' आहे.

♦ (३) ''कषाय, परिणामांना कलुषित करतात किंवा परिणामांची कलुषता म्हणजे कषाय होय''. 'कर्मबंध' नको असेल तर, 'कषाय' करणे बंद करणे, हा उपाय आहे. 'कषायाने', 'स्व' नियंत्रण नष्ट होते. परंतु 'कषाय', एकमेकांशी जोडलेले असतात व एक दुसऱ्यात बदलले जावू शकतात. 'कषाय', आत्म्यात 'असावधानता' उत्पन्न करतात आणि कर्म करण्याची 'प्रेरणाही' देतात. म्हणूनच 'तीव्र कषायोदयांनी चारित्रमोहनीयचा' बंध होतो. 'कषायांचे' हे प्रबळ संस्कार, ही 'तीव्र कलुषता, चुकीचा मार्ग' दाखवतात, 'व्रत- नियम' घेवू देत नाहीत, 'दर्शन, पूजन, मदत, सेवा', करू देत नाहीत. मात्र 'द्रव्य-क्षेत्रादिनुसार', कषाय उदयाला येतात वा ती 'अन्य कषायात परिवर्तित' केली जातात. 'कषायांची' दिशा बदलणे, 'पुरुषार्थाचे' काम आहे. 'कषायांना' नियंत्रित करण्याचे, 'संयमित' करण्याचे 'सामर्थ्य,वा पुरुषार्थ' आपल्यात आहेच. कषायांच्या प्रभावाला 'तीव्र-मंद' करण्याचा निर्णय, 'स्व' चा आहे. ह्यासाठी 'मनाला सदैव प्रसन्न, सकारात्मक ठेवणे, वा कषाय उत्पन्न होतील, अशा निमित्तांपासून संयोगांपासून लांब राहणे, हा सर्वस्वी 'जीवाधीन पुरुषार्थाधीन', भाग आहे. त्यासाठी 'कषायांना', ओळखण्याची, जाणण्याची' क्षमता आवश्यक आहे. सतत आपल्याच 'विचारांना, परिणामांना, भावांना, जाणण्याची, व बदलण्याची', कला शिकणे आवश्यक आहे. सम्यग्ज्ञानाने 'स्व' परिणाम सुधारणे, हेच खरे 'सम्यक्चारित्र' ठरेल. श्रावकदशेत तर हा 'पुरुषार्थ', जीवन जगण्याची कलाच ठरेल. शेवटी 'कर्म', द्रव्य-क्षेत्रादिनुसार फळ देतात तर, कोणते 'द्रव्यादि' द्यावे हा, सर्वस्वी 'स्वाधीन' भाग आहे. 'उज्ज्वल, समृद्ध, संपन्न', भविष्य घडविण्याचे सामर्थ्य, 'जीवातच' आहे. हा विश्वासच

श्रावकदशेतला उत्कृष्ट 'पुरुषार्थ' ठरेल.

(४) आठ कर्मांपैकी, 'ज्ञानावरण, दर्शनावरण, अंतराय', ह्या 'घातिकर्मांचा' सदैव 'क्षयोपशम' असतोच. 'प्रगट' भाग 'स्वभाव' असल्याने, आणि 'अप्रकट' भागाचा 'अभावच' असल्याने, 'बंधात' ते निमित्त नाही. 'अघातिकर्मांचे फळ, 'बाह्यसंयोग, शरीरादि' रूपाने मिळते. ते तर 'परद्रव्य' आहे म्हणून 'बंधात कारण' ठरत नाही. म्हणजे मात्र 'मोहनीय' कर्म बंधात कारण आहे. मात्र हे कर्म 'आवरण' घालत नाही वा 'बाधाही' आणत नाही. फक्त 'श्रद्धा व चारित्र' गुणांच्या पर्यायात, 'विपरीतता व विकार' आणतात. म्हणून 'मोहनीय कर्म प्रबल असले तरी, 'पुरुषार्थाला' वाव आहे.

'चारित्र मोहनीय' कर्माच्या उदयाने, 'व्रताचरण पालन' होत नाही. कथंचित् तेथे 'कर्माधीनता' श्रेष्ठ ठरू शकते. कारण त्यात, 'शारीरिक, मानसिक', सामर्थ्याची गरज आहे. मात्र प्राप्त, ह्या दुर्बलतेचा, स्वीकार करून, 'श्रद्धा, विवेक, शुभसंकल्प, विकसित विचारधारा, शुभभाव', इत्यादि करण्याचा 'पुरुषार्थ' घडू शकतो. कारण स्वत:ला 'सांभळणारे व सावरणारे, ज्ञानच श्रेष्ठ म्हटले जाते.

**(५) आयुकर्म :** जैनांनी 'कर्मांचा' विचार, अत्यंत सूक्ष्मपणे व समग्रपणे केला. 'प्रतिसमय जीव समयप्रबद्ध बांधतात व तितकेच उदयाला येतात'. ह्या 'आठकर्मांमधे, आयुकर्माचे चिंतन स्वतंत्रपणे, विस्ताराने केले आहे. 'आयुकर्माचा बंध, उदय, त्याची नियमावली' ही, इतर कर्मांहून भिन्न आहे. 'अनेक विवक्षांनी' हा विषय, आगमात मांडला आहे.

''जीवाचा कोण्या एका विवक्षित शरीरात, राहण्याचा कालावधि म्हणजे आयु होय.''

त्या 'आयुला' निमित्त असणारे ते, 'आयुकर्म' होय. 'गति व आयु दोन्हींचे, 'चार –चार भेद' असले तरी, त्यात अंतर आहे.

आगमातील विवक्षांचा स्थूल आढावा देवून, महत्त्वाचा विषय नमूद करून, सूक्ष्म अध्ययन, चिंतन, मननातून, 'पुरुषार्थाला' विशेषरूपाने, अधोरेखित केले आहे.

**कथनक्रम :** अत्यंत महत्त्वपूर्ण, भिन्न अशा, ह्या 'कर्माचा' विचार, आचार्यांनी सखोलपणे केला आहे.

* ह्या विस्तारात[२०], ''सामान्य लक्षण कथन करून, भेद कथन केले आहे. 'आयुकर्माचे वा आयुसत्त्वाचे' दोन भेद दिसतात. 'बध्यमान व भुज्यमान' ह्यापैकी, वर्तमानात, 'ज्या आयुचा उदय चालू आहे, ती भुज्यमान', व 'आगामी भवासाठी जी बांधली जाते, ती बध्यमान' आयु होय. ह्याशिवाय 'भवायु व अद्धायु' हे भेदही सांगतात. 'अद्धा' म्हणजे, 'काल' होय. द्रव्याचा जो स्थितिकाळ तो 'अद्धायु' होय. ह्या सर्वांचे लक्षण कथन करून, नरकायु'' इत्यादि भेद वर्णिले आहे.

* 'आयुकर्माचा' निर्देश करताना[२१], ''भवधारण करणे आयुच्या आधीन आहे. गतिबंध जन्माचे कारण नसून, आयुबंध आहे. ज्या भवाची आयुबांधली, जीव नियमाने तेथेच उत्पन्न होतो''. असे वर्णन केले आहे.

* 'आयुकर्माच्या' बंधयोग्य परिणामांबाबत, आचार्यांनी खूपच विस्तार केला आहे[२२] 'आयु नेहमी 'मध्यम परिणामात' बांधली जाते. 'लेश्यानुसार' ह्याचा विचार केला आहे. ह्यात 'अल्पायुची कारणे, नरकायु, तिर्यंच-कर्म व भोगभूमीज, कर्मभूमिज मनुष्य, शलाकापुरुष, सुभोगभूमी मनुष्यायु; कुभोगभूमिजमनुष्यायु, देवायु सामान्य रूपाने, चारही जातीचे देव', इत्यादिंच्या 'आयुबंध' योग्य परिणामांचा, सखोलपणेविचार मांडला आहे.

* 'गति', प्रतिसमय बांधली जाते, परंतु 'आयुबंध'ची योग्य वेळ, पूर्ण जीवनात, 'आठ वेळा येते,' त्यांना आगमात 'अपकर्षकाळ' म्हणतात, हा 'अपकर्षकाळही' 'कर्मभूमी, भोगमूभी, देव, नारकी', सर्वांच्या अपेक्षेने वर्णिला आहे. ह्या 'अपकर्षकाळात' बंध न झाल्यास, अंतसमयी 'आयुबंध' निश्चित होतो. आयुचा 'त्रिभाग' शेष असताना, 'अपकर्षकाळ' येतो, ह्या बाबत आचार्यांची भिन्न मते कथन केली आहेत. 'भुज्यमान आयुचा, आवलीचा असंख्यातवा भाग शेष असतांना, त्याला असंक्षेपाद्धा' काळ म्हणतात. ह्या समयी 'आयुबंध' झाला तर, 'अंतमुहूर्त प्रमाणच बंध होतो. ह्या 'आठ अपकर्षकाळात' जी, 'हीनाधिक स्थिति' बांधली जाते, त्यापैकी जी अधिक आयु आहे, तीच 'आयुस्थिति' समजली जाते. ह्या 'अपकर्षकाळांमधे', उत्तरोत्तर हीन 'आयुबंध' होतो. एकदा 'आयुबंध' झाल्यावर, त्याचा नाश शक्य नाही.[२३]

* 'आयुकर्माच्या' अन्य नियमाबाबत आचार्य म्हणतात की,[२४] ''बध्यमान व भुज्यमान, दोन्ही 'आयुंमध्ये' अपवर्तन होवू शकते. परंतु 'बध्यमान आयुची उदीरणा' होत नाही. 'असंख्यात वर्षायुष्क व चरमशरीराच्या', आयुची अपवर्तना होत नाही. 'भुज्यमान' आयुपर्यंत, 'बघ्यमान' आयुमधे' बाधा असंभव आहे. चारही आयुंमध्ये परस्परांमधे, 'संक्रमण' होवू शकत नाही. 'संयमाची विराधना' झाल्यास, 'आयुचे अपवर्तन' होते. आयुचे 'अनुभाग व स्थितिघात' बरोबरच होते. 'आयुबंध' झाल्यावर, तदनुसारच 'गतिबंध' होतो''.

* 'आयुकर्माबाबत' आचार्य म्हणतात की[२५], ''तिर्यचांची उत्कृष्ट आयु, भोगभूमी, स्वयंभूरमणद्वीप व कर्मभूमीच्या प्रथम चार काळातच संभवते. भोगभूमियांची आयु सद्धा हीनाधिक होवू शकते. देवांच्या, 'बद्धायुष्क व घातायुष्क', आयुंचेही वर्णन केले आहे. चार गतींचे परस्पर बंध, उदय'', इत्यादि संबंधी नियमांचा उहापोह केला आहे.

**अकालमरण :** जैन दर्शनात, 'आयु' कर्माचा विचार, वेगळ्या पद्धतीने, स्वतंत्रपणे केला आहे. ह्यात 'मरणाचे' पाच वा १७ भेदांचा ऊहापोह केला जातो. ह्यात 'अकाल-मरण', ह्या विषयी खूप चिंतन आढळते. 'विष खाणे, वेदना, रक्तक्षय, तीव्रभय, शस्त्राघात, तीव्र संक्लेश, आहार

व श्वासोच्छवासाचा निरोध', इत्यादीने 'आयु' क्षीण होते. ह्या प्रकारांनी जे 'मरण' येते त्याला, 'कदलीघात वा अकालमरण' म्हणतात.

* ह्या विषयी असणारी वैशिष्ट्ये आचार्य सांगतात[२६].'चरमशरीरी' जीवांचे 'अकालमरण' होते वा नाही, ह्याबाबत आचार्यांनी, विविध मते दिली आहेत, ह्यात विशेष म्हणजे, तद्‌भव मोक्षगामींना, 'अकालमरण' येत नाही.

* 'आयुकर्माच्या' क्षयाला 'मरण' म्हणतात. आयुकर्माची स्थिती पूर्ण होण्यापूर्वी, विशेष कारणांनी आयुकर्म क्षय होण्याला 'अकालमरण' म्हणतात.

* 'बद्धायुष्क' म्हणजे पराभव संबंधी आयु बांधल्यानंतर, 'भुज्यमान' आयुचे, 'कदलीघात' होत नाही.

* 'देव व नारकीयांना', अकालमृत्यू होत नाही. 'भोगभूमिज' जीवांना 'अकालमरण' येत नाही.

* 'कदलीघात' मरणात, शेष 'आयुचा' नाश होवून, कमीतकमी 'अंतर्मुहूर्ततर' राहणारच, कारण त्या काळात, 'पराभवसंबंधी आयुचा बंध' होतो. 'आयुबंधाशिवाय मरण' शक्य नाही. 'आत्महत्या केल्याने, नरकच गतीचा बंध होतो', असा एकांत नियम नाही.

* 'कषायवश' प्राणांचा घात, 'आत्मघात' आहे. ''आयुकर्माची स्थिति पूर्ण होण्यापूर्वी, शेष निषेकांची उदीरणा होवून, उदयात येवून मृत्यू होणे अकालमरण'' होय, म्हणून त्यात अंतर नाही.

* 'अविपाक निर्जरा', सम्यक् तपाने होते व संवरपूर्वक होते. 'अकालमरणात' आयुकर्माची अपकर्षणाद्वारे 'उदीरणा' होते, तेथे 'स्थितिकांडकघात' होत नाही.

* एकेंद्रियातही 'अकालमरण' संभवते. 'पर्याप्ति पूर्ण केल्यावर', त्या समयापासून 'अंतमहूर्त' काळपर्यंत 'अकालमरण' होत नाही.

* वास्तविक तर 'जन्म-मरण' ह्या पर्याय आहेत. निश्चयनयाचा विषय 'द्रव्य' आहे. 'काल वा अकाल', दोन्ही मरण, 'व्यवहारनयाचा' विषय आहे. 'निश्चयनयात 'तर, 'द्रव्य नित्य, ध्रुव' आहे. 'अकालमरणाचा काळ, कारणे, सिद्धी' इत्यादिंची, विस्तृत मीमांसा, आगमात आढळते.

'आयुकर्माचा', बंध-उदय-फळ, परिणाम-आस्रवाची कारणे, इत्यादि अन्यकर्मांपेक्षा भिन्न असल्याने, वर्णनाचा विस्तार केला. ह्यापेक्षा अन्य सूक्ष्म विवेचन, 'धवलादि' ग्रंथामधून अभ्यासनीय आहे. हया सर्व विषयांचे सूक्ष्म, नीट, काळजीपूर्वक वाचन-मनन-चिंतनाद्‌वारे दखल घेवून, 'गर्भित पुरुषार्थ ' उजागर केला आहे.

**गर्भित पुरुषार्थ :**

१) संसारात सर्व क्षेत्रात, दिसणारी विविधता, तफावत, तो कर्मांचा प्रभाव आहे. संसार

'प्रतिध्वनिसमान' आहे. हयात 'देव-घेव' ही होत राहते. कर्म 'करणे-भोगणे-संस्काररूपाने' चालूच आहे तरी, एकमात्र नक्की की जर 'कर्म करण्यात स्वतंत्रता आहे' तर, 'जे जीवनात हवे आहे तेच करणे', हा 'पुरुषार्थ' आहे.

२) आज आत्मा ज्या 'स्थितीत, भवात, परिस्थितीत' आहे, त्याकडे बघून, 'ते का आहे', ह्याचे गहरे चिंतन, 'आस्रवांची कारणे' जाणून, करण्यायोग्य आहे. 'प्रत्येक गतीच्या आस्रवांची' कारणे, आपल्या 'पाप-पुण्याचा' पाढाच आहे. ते 'जाणून, समजून घेतले तर, पुढच्या प्रवासाचा नकाशाच' स्पष्ट होईल. 'अति-आरंभ, अति-परिग्रह, अति-आसक्ति-ममत्व', याने नरकायुचा बंध होतो. 'दयाशून्य,क्ठोर, क्रोध, तिरस्कार करणे, संक्लेश' इत्यादि 'भावना वा परिणाम' तर नाही ना? ह्याचा 'शोध व जागृकता वा आस्रवांप्रती भीती'; हा ही श्रावक दशेतला 'पुरुषार्थच' आहे.

३) 'मायाचारी केल्याने तिर्यंचायुचा' बंध होतो. 'अहंकार, कुटिलता, कपट, आत्मप्रवंचना अधर्माचा उपदेश, खोटा अभिप्राय, जाति, कूळ, शीलात दूषण लावणे, भांडण, आर्ततेने मरण', इत्यादि कारणांना जाणून, चिंतन होणेच 'पुरुषार्थ आहे. मनुष्यायुचा बंध 'कमी आरंभ, कमी परिग्रह, स्वभावमार्दवता, विनय, कोमलता, भद्रपरिणाम, हित इच्छिणे, अल्प कषाय' इत्यादीने सांगितला आहे. 'स्व' परिणामांचे मोजमाप करण्याची, क्षमता येणे 'पुरूषार्थ' होय. आपल्याच 'भावविश्वाला', भिंगाच्या चष्म्यातून बघणे गरजेचे आहे, आपल्या 'प्राप्त उपलब्धींना' जाणून, परत त्याच्या 'प्राप्तीची खात्री' होण्यासारखा, 'व्यवहार आचरण करणे' हा 'पुरूषार्थ आहे. ''संयम, निर्मलता, नियंत्रण, परोपकार, प्रशस्तराग, विषयांची सीमितता, व्रत, पूजा, निस्पृहता आणि सतत सम्यदर्शनप्राप्तीचा प्रयत्न व निदीध्यास'', हाच ह्या पंचम काळातील श्रावकदेशातला 'श्रेष्ठ पुरुषार्थ' होय.

♦ ४) व्यवहार असो वा परमार्थ, 'ज्या दिशेने जाणार तेथेच पोहोचणार', हा नियम आहे. हे मनुष्यजीवन एका 'बीजाप्रमाणे' लाभले आहे, जे अत्यंत 'दुर्लभ' आहे. हे 'बीज' कोणत्या 'भावना व परिणामरूपी', जमिनीत पेरायचे, हा 'पुरुषार्थ' स्वाधीन आहे. ह्या 'मनुष्यभवातून' सर्व मार्ग प्राप्त आहे. 'मार्ग निवडण्याचा आधिकार' जीवला आहे. 'आस्रवांची कारणे व त्याचे गहन चिंतन', हेच 'दिशादर्शक' आहेत, त्या 'सम्यक् ज्ञानाने, सम्यक आचरण वा बदल घडला' तरी ,खरा 'पुरुषार्थ' ठरेल.

♦ ५) 'आयुबंध मध्यमपरिणामातच' होतो. 'कपोत ते पीत' लेश्येच्या, 'उत्कृष्ट अंशापूर्वी पर्यंतचे अंश', ह्यात कारण मानले आहेत. 'लेश्या' ह्या कषायांवर, आणि 'कषाय हे परिणामांवर' अवलंबून असतात. 'कषायांवर नियंत्रण वा कषायपुष्ट करणाऱ्या निमित्तांचा अभाव करणे', इतकेच शक्य आहे. कषायहानिवृद्धीने 'उत्कर्षण-अपकर्षण' होते, म्हणून सतत 'स्व' ला

'बघणे, जाणणे, परखणे', हाच पुरुषार्थ आहे. 'आयु मर्यादा' ही माहीत नाही, म्हणून 'अपकर्ष' काळही कळत नाहीत. त्यासाठी 'सतत सावधानता, शांतपरिणाम, धर्मपालन, शुभोपयोग', हा श्रावकांचा प्रयत्नच श्रेष्ठ आहे.

६) 'विशिष्ट आयुबंधाने, विशिष्टपरिणाम' होतात वा 'व्रतपालन' होते. हे जाणले तर, 'अजूनही वेळ आहे', हया विश्वासावर 'पुरुषार्थ' घडू शकतो, अथवा 'वेळ गेली तरी, परिणतीत सुधारणा', ही सुद्धा महत्त्वाची ठरेल, कारण जसे 'सादरीकरण तसे वातावरण परिवेश, गति, परिस्थिती' मिळणार, हा विश्वास 'पुरुषार्थाची' नांदीच आहे.

**(६) नामकर्म :** 'जैन दर्शनात' मान्य, आठ कर्मांपैकी, हे 'अघातिकर्म आहे. ह्या कर्माला 'चित्रकाराची' उपमा दिली जाते, कारण अनेक प्रकारांनी ह्या, 'कर्माचा विपाक' दिसतो. 'नाना प्रकारच्या रचना निवृत्त करणारे म्हणून नामकर्म' म्हणतात. ह्या कर्माच्या मूळभेदरूपाने ४२, उत्तरभेदरूपाने ९३ आणि जीव अपेक्षेने 'असंख्यात लोकप्रमाण प्रकृति' सांगितल्या जातात.

* **कथनक्रम :** ह्या 'कर्माच्या' विषय विस्तारात आचार्यांनी[२७], ''त्याचे लक्षण, भेद-प्रभेद वर्णन केले आहे. ह्यात शुभ व अशुभ नामकर्मांच्या आस्रवाच्या कारणांचा विस्तृत ऊहापोह केला आहे. 'कुटिलता, योग वक्रता, विसंवाद, पिशुनता, अस्थिरचित्त, खोटीसाक्ष, खोटे मोजमाप, मायाबाहुल्य, परनिंदा, अप्रिय, कटूक, कठोर वचन, व्यर्थ प्रलाप', इत्यादि अनेक कारणांनी, 'अशुभनामकर्माचा आस्त्रव' सांगितला आहे. ह्याउलट 'आर्जवता, आदर, भीरुता, अप्रमादता' इत्यादिंनी शुभनामकर्माचा आस्त्रव सांगितला आहे''.

* (त.सू.८/२५) नुसार, 'साता वेदनीय, शुभआयु, शुभनाम, शुभगोत्र', इत्यादिना 'पुण्य-प्रकृति' म्हटले आहे. विस्ताराने, भेदविवक्षेने ६८ तर, अभेदविवक्षेने ४२, 'पुण्यप्रकृति' सांगितल्या आहेत. अन्य सर्व 'पापप्रकृति' होय. ह्या ४२ 'नामकर्मांपैकी' १४ पिंड तर, २८ अपिंड प्रकृति आहेत.

* हे कर्म, अत्यंत 'सूक्ष्म' आहे. ह्या कर्माने, 'शरीर, जाति, गति, शक्ती, आकार', इत्यादि प्राप्त होते. हे एक 'शक्तिशाली कर्म' आहे, ज्याची सूक्ष्मता 'सर्वज्ञच' जाणू शकतात. ह्या कर्माचे, 'असंख्यात-अनंत' भेद, 'केवलींच्या' ज्ञानाचा विषय आहे.

**संभाव्यपुरुषार्थ :**

♦ (१) 'जैन दर्शनाने कर्मांचा, खूपच सूक्ष्म विचार केला. त्यातही 'आस्त्रवाच्या कारणांचे, खूपच गहरे चिंतन, 'रा.वा.' कारांनी केले. जसजसा हा 'सूक्ष्म अभ्यास, चिंतन, मनन,' होत गेले, ह्यातील 'गहनता व मर्म' उलगडू लागले. हे 'आस्त्रव व त्याची कारणे', ही जणू 'दिशादर्शक, पथप्रदर्शक, मार्गदर्शक, साक्षात गुरुप्रमाणेच' आहेत. कोणताही 'आडपडदा न

ठेवता', ही कारणे, 'मानवी स्वभावाच्या' एक एक पदरांना उलगडून दाखवतात. त्यातील 'विविध छटा, चित्रविचित्र स्वभाव, विविध अभिप्राय, मानवी मनाची गूढता, भावभावनांचे इंद्रधनुष्य, जणू चलचित्राप्रमाणे', स्पष्टपणे दर्शवितात. जो 'ज्ञानी', जागृक, सावध, स्वकल्याण, इच्छिणारा' आहे, तो हा चित्रपट बघून, 'आत्मचिंतन, परीक्षण' करून, परिवर्तन आणेल. परंतु जो 'अज्ञानी, असावधान, परद्रव्यांप्रती मोह, आसक्ति ठेवणारा',त्याला फक्त चित्रविचित्रतारूप बघूनही, आपले मानणारच नाही. ही आस्रवांची कारणे 'पूर्व पुरुषार्थाचा' लेखाजोखा सादर करतांना, नकळत नवीन 'सम्यक् पुरुषार्थाकडे', दिशानिर्देशही करतात.

(२)वर्तमान पर्यायात 'नामकर्माने प्राप्त उपलब्धींवर' नजर टाकली तर, आपल्या 'श्रीमंतीचा' अंदाज येवू शकतो. परंतु ह्या प्राप्त, 'उत्कृष्ट मन-वचन-कायेने परोपकार, सेवा केली का? दुसऱ्यांच्या सुखाचा विचार केला का ? हित-मित-प्रिय वचनांचा प्रयोग, शक्तीचा सदुपयोग, कल्याणाच्या गोष्टी करणे', ह्या क्रियांप्रती सजगता, हा 'पुरुषार्थ' होय. 'व्यर्थ चहाडी, व्यर्थ सल्ला, भांडणे, दावपेच', इत्यादींना दूर करणे, सहजशक्य 'पुरुषार्थ' आहे. कारण आचार्य सतत, 'अशुभोपयोगाच्या त्यागावर' भर देतात. आगमात 'शुभोपयोगात सतत प्रवृत्ति' सांगितली आहे. 'चांगुलपणा, हितचिंतन, सकारात्मक विचार, प्रामाणिकता', इत्यादिरूप 'शुभोपयोगात' प्रवृत्ति, हाच 'पुरुषार्थ 'आहे.

(३)'नामकर्म हे अघातिकर्म' आहे. ते 'जीवगुणांचा' प्रत्यक्ष घात करीत नाहीत, परंतु 'विपरीत परिस्थिती, प्रतिकूल परिवेश, शरीर', इत्यादीने, तसेच वातावरण प्राप्त होते. पर्यायाने तशाच 'भावना वा परिणाम' होतात. हे सत्य असले तरी, हे मात्र, 'निमित्त आहे, पर्यायापुरते आहे, प्रतिक्षण परिवर्तनशील' आहे. द्रव्यदृष्टीने 'आत्म्याहून भिन्न' आहे. हा विश्वास, ही 'स्व' दृष्टी, मुख्य आहे. कारण 'द्रव्य, प्रतिक्षण परिणमनशील आहे व पर्याय एक समयवर्ती' आहे. म्हणून प्राप्त पर्यायात, प्राप्त उपलब्धींचा, 'व्यर्थ अहंकार' वा उपलब्धींच्या कमतरतेने, 'व्यर्थ पराधीनता' ही नसणे, हाच 'सम्यक् चारित्ररूप पुरुषार्थ' आहे.

(४) 'कर्मबंधाची प्रक्रिया' सतत चालू आहे आणि प्रतिसमय 'उदय व विपाकही' चालू आहे. मात्र, 'कर्म' हे फळ, 'द्रव्य-क्षेत्र-काल-भावानुरूप' देते. 'कर्म व जीव' आपआपल्या 'स्व' द्रव्य-क्षेत्रादित, 'परिणमन करतात, बंध' करतात. त्यामुळे निश्चयनयाने, 'बांधणे वा भोगणे', हा भावच जीवात नाही. 'व्यवहार व निश्चयाच्या', यथार्थ स्वरूपाला समजून, 'योग्य समन्वय', हा खऱ्या अर्थाने 'पुरुषार्थाचा आरंभ बिंदू 'ठरू शकतो. पुढच्या भवाच्या दृष्टीने, 'द्रव्य-क्षेत्रादि' निवडण्याचे, 'स्वातंत्र्य' जीवाच्या हातात आहे. म्हणून त्यासाठी तसा 'सम्यक् प्रयास, प्रयत्न', हाच 'पुरुषार्थ' आहे.

◆ हा ‘पुरुषार्थाचा’ प्रांत थोडासा स्वार्थी आहे. ह्यात सतत, ‘मला, माझ्यासाठी, माझ्याकडे, माझ्याकडून’, सर्व उत्तमोत्तमच हवे, हा ‘निदिध्यास’ खऱ्या अर्थाने ‘आदहिंद च कादव्वं’ ला पुष्टी देणारे आहे. अर्थातच हा प्रयास होताना, होणाऱ्या ‘सम्यक् आचरणाने’, ‘परहिद’ हे नकळत होणारच आहे. सूक्ष्मतेने विचार केला तर, ‘परस्परोग्रहो जीवानाम’, ‘जिओ और जीने दो’, ह्याचाच ‘ध्वनि’ त्यातून निघतो. ह्या आस्रवांच्या कारणांचे, ‘‘सम्यक् ज्ञान व श्रद्धान हे, उपादान-निमित्त, नियति-पुरुषार्थ, हेय-उपादेयाला अनेकांतदृष्टीने’’, अधिकच अधोरेखित करतात.

**(७) गोत्रकर्म :** ‘जैनदर्शनानुसार’, आठ कर्मांपैकी, हे कर्म ‘अघाति कर्म आहे. ह्या कर्मोदयाने, ‘उच्च-नीच’ कुळात जन्म होतो. ह्या कर्मामुळेच, ‘ब्राह्मणादि’ चार प्रकारची वर्णव्यवस्था होते. अर्थात ह्या व्यवस्थेत, ‘जन्मापेक्षा गुणकर्मांची प्रधानता’ आहे.

‘आध्यात्मिक वा लौकिक’, दोन्ही दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या, ह्या विषयाचा विस्तार केलेला दिसतो.

**कथनक्रम :** ह्या कर्माच्या वर्णनात आचार्यांनी[२७], ‘‘लक्षण सांगून, भेद कथन केले आहे. त्या भेदांचेही लक्षणे वर्णन केली आहेत. ह्या भेदांच्या बंधयोग्य कारणांचा उहापोह केला आहे. त्यांचे स्वामी, क्षेत्र, अनुभाग, काल’’, इत्यादि उहापोह केला आहे.

* विशेषता कथन करतांना[२९], ‘‘कथंचित् गुणकर्माची प्रधानता सांगून, गुणवान नीच ही, उच्च मानला आहे. उच्च-नीच जातीत परिवर्तन मानले आहे. काही अपेक्षेने कथंचित् जन्माची प्रधानता सांगून, गुण व जन्मात समन्वय साधला आहे. निश्चयनयाने जीव अपेक्षेने उच्च-नीचता भेद मानला नाही’’. अशाप्रकारे विषय प्रस्तुत केला आहे.

जैन आगमापैकी[३०], श्वेतांबर परंपरेतील, ‘भगवती, नायाधम्मकहा, उत्तरअध्ययनाचे ३३ वे अध्ययन आणि शौरसंनीय, षटखंडागम’, इत्यादि, ग्रंथांमधे ह्या कर्माचे वर्णन आढळते. त्यात ‘गोत्रकर्म’ सातव्या क्रमांकावर सांगून, ‘नाम व गोत्र’ कर्मांचा, एकत्रितपणे उल्लेख आढळतो. ह्या कर्माचा ‘उच्चगोत्र’ भेद ‘अंतसमयापर्यंत’ राहतो.

* ह्या ‘कर्माच्या बंधहेतूचे’ वर्णन, ‘रा.वा.’कारांनी सविस्तरपणे केले आहे. ह्या कर्माच्या वर्णनात, ‘कुंभकाराचा दृष्टांत’ दिला जातो. ह्या कर्माचा ‘उत्कृष्ट स्थितिबंध’ २० कोडाकोडी सागरोपम आहे. (त.सू. ८.१७,२०)

* ‘नाम व गोत्र’ दोन्ही ‘अघाति कर्मे’ असून, अंतक्षणापर्यंत बरोबर राहतात. दोन्हींचा संबंध, ‘जन्माशी, शरीराशी’ आहे. ह्या दोन्ही कर्मांची, ‘जघन्य व उत्कृष्ट स्थिति’ सारखीच आहे. ‘उच्चगोत्राचे विविध निकष, मुख्यत: ‘नामकर्माने’ व इतरही कर्मांनी सिद्ध होतात. ‘गोत्रकर्माच्या’ क्षयाने प्राप्त ‘अगुरुलघु’ गुण हा ‘स्वभाव’ आहे, ज्याने जीव ‘शिद्धाशीलेवर’ आरूढ होवू शकतो.

* जनुकीयरीतीने[३१] प्राप्त झालेल्या गोष्टी, 'नाम व गोत्र' दोन्हीत, सम्मिलित असल्याचे दिसते. 'नामकर्मातील' अधिकांश उपप्रकार, प्राय: 'शारीरिक वैशिष्टरूप' आहे. आपल्याला, 'प्राप्त वर्ण, रूप, रंग, त्वचा, हाडे, केस, शरीराकृती, अवयवरचना' इत्यादि सर्व 'नामकर्माच्या' अंतर्गत येते. त्याव्यतिरिक्त, 'बौद्धिक क्षमता, विचार, स्मरणशक्ती, मानसिक सामर्थ्य, भावनिक क्षमता, प्रतिक्रिया, निर्णयक्षमता', या गोष्टी काही प्रमाणात 'अनुवंशिक' तर, काही प्रमाणात 'संस्कार, बाह्य भौगोलिक, सामाजिक परिस्थिती' यावर अवलंबून असतात. 'नामकर्मात' समाविष्ट होवू न शकणाऱ्या काही गोष्टी, 'गोत्रकर्माशी' जोडता येवू शकतात.

'मातापित्याच्या संयोगानंतर', जीवाचा 'जनुकीय' आराखडा तयार असतो. तो एखाद्या 'रेखाचित्राप्रमाणे' असतो म्हणून, 'चित्रकाराची' उपमा योग्य ठरते. त्यानंतर यथायोग्य 'वाढीनंतर, जन्मानंतर', हळूहळू 'जनुकीय आराखड्यानुसार', बाह्य वैशिष्ट्ये प्रगट होवू लागतात. नंतर 'कूळाचे नाव' इत्यादि प्राप्तच होते. म्हणून 'कुंभकाराची उपमा' सार्थ ठरते. 'गोत्रकर्मात' त्या त्या जीवाच्या, 'अनुवंशिकतेचा' समावेश असावा.

अर्थात, हा 'स्वतंत्र संशोधनाचा' विषय आहे. त्यातल्या फक्त एखाद्या अंशाचे कथन येथे केले आहे. ह्या कर्माचे चिंतन, 'सामाजिक, व्यावहारिक, निश्चय', पातळीनुसार करणे योग्य ठरेल. ह्या विषयाच्या सर्व संभावनांची, योग्य ती दखल घेवून, त्यातून झळकणाऱ्या 'पुरुषार्था' ला फक्त, अधोरेखित केले आहे. अन्य विस्तृत चिकित्सा, 'ज्ञानवंताद्वारे' करण्यायोग्य आहे.

**गर्भितपुरुषार्थ :**

♦ (१) अनादिकाळापासूनच्या कर्म संस्कारांमुळे, 'वस्तू वा व्यक्तीचा बरे-वाईटपणा' हा 'राग-द्वेषांनी' प्रेरित होवून ठरवला जातो. 'भाव' परिवर्तनानुसार, निकष ठरवले जातात. ह्या 'कर्मास्रवाच्या कारणात', 'परात्मनिंदा प्रशंसा... ' हे सूत्र दिले. आपल्या दृष्टीतील 'कलुषता वा निर्मलता' नुसार, त्या व्यक्तीचा 'वाईट वा चांगलेपणा' स्पष्ट होतो. हे सूत्र जणू त्या व्यक्तीच्या, 'प्रतिष्ठेचे प्रतिबिंबच' आहे. 'गोत्राची' उच्चता वा श्रेष्ठता, 'कूळातील धर्मपरंपरा, अभक्ष्य भक्षणाचा अभाव, तीन मकारांचा अभाव सदाचार', इत्यादिवरून ठरवली जाते. पूर्व भवात 'परप्रशंसा, परगुणांचे उद्घाटन', केले असल्याचे हे फळ आहे. ही 'प्रतिष्ठा, श्रेष्ठता, उच्चता', पूर्व 'पुरुषार्थार्जित' आहे. जर हेच पुढे हवे असेल तर, पुनःश्च 'तीच निर्मलता, स्व दोष स्वीकारण्याची तयारी, गुणीजनांचा सन्मान, पर-गुण शोधण्याची क्षमता, नम्रता', ह्यांचे 'प्रयत्नपूर्वक वर्धन,' हा 'पुरुषार्थ' आहे. पूर्ण जीवनपर्यंत, सतत, ''दुसऱ्यातील एक गुण शोधणे व स्वत:तील एक दोष प्रयत्नपूर्वक दूर करणे', इतकेही केले तरी, ह्या श्रावकदेशेतील तो उत्कृष्ट, 'उद्दम वा धर्म वा चारित्र' म्हणता येईल.

(२)‘सम्यग्दर्शनातील दोषातील’, आठ मदात, ‘कूलमद’ वर्णन केले आहे. आपल्या ‘जात व कूळाचा मद वा अभिमान, अहंकार, दुसऱ्याच्या यशाचा लोप करणे, अवज्ञा करणे, सम्यग्दर्शनात’ बाधक आहेत. ‘सम्यग्दर्शनाशिवाय’ मोक्षमार्गाचा प्रारंभ नाही. निश्चयनयाने आत्मा, ‘अनंतगुणधारी’ आहे. त्या गुणांपैकी, ‘श्रद्धा’ गुणाची, ‘सम्यग्दर्शन’ ही पर्याय आहे. मात्र ह्या ‘प्रगटीकरणात’, हे बाह्य, ‘व्यवहारनयाने’ असणारे, ‘कूळ, जात’ इत्यादि बाधक आहेत. ह्यात दोष, जीव ‘परिणाम व अभिप्रायांचा’ आहे. त्या ‘’अनंतगुणांवर’ दृढ श्रद्धानच, ‘पुरुषार्थप्रेरक’ आहे. खऱ्या अर्थाने तर, ‘मुक्तता, ज्ञान, श्रद्धा, दर्शन,’ हा जीवाचा ‘स्वभावच’ आहे. मात्र अनादिपासून, ‘कार्य वा कर्म वा उपाय, बंधनाचे’ चालू असल्याने, ह्या ‘स्वभावाची व्यक्तता नाही. ह्या ‘स्व’ प्राप्तीत, ही बाह्य, ‘कूळ-जातीची बंधणे’ फक्त, ‘व्यवहारनयाने’ आहे, हा विश्वासच, ह्या परद्रव्यातील ‘रचणे-पचणे-अडकणे ’, सोडविणारा ‘पुरुषार्थ’ आहे.

(३)‘गोत्रकर्माचे उच्चनीचत्व हे व्यवहारनयानेच’ आहे, आणि ते ‘दुय्यम’ आहे. ‘शुद्ध आध्यात्मिक उन्नतीत’, त्याला स्थान नाही. जैनांनी ‘गोत्रकर्माची उच्चनीचता’ मानली ती, ‘लोकमान्य वा लोकनिंद्य’ ह्या निकषावर मानली. हे कथन, ‘आध्यात्मिक उन्नतीच्या’ दृष्टीने आहे. व्यवहारातला ‘पुरुषार्थ’ येथे अपेक्षित नाही. ‘नीच गोत्रात जन्म घेवून, उच्च कोटीचे पुरुषार्थ’ घडू शकत नाही’, हे चिंतन ‘द्रव्य-क्षेत्र इत्यादिनुसार’ करणे योग्य ठरेल. ‘उच्चगोत्राची बंधव्युच्छित्ति’, १०व्या गुणस्थानात होते, मात्र ‘उदय १४ व्या गुणस्थानापर्यंत’ चालू असतो. ह्या ‘पंचमकाळात’ सत्‌शुद्र, पाचव्या गुणस्थानापर्यंतचा, ‘क्षुल्लक दीक्षापर्यंतचा’, उद्दम करू शकतात. ‘चतुर्थ काळातील सत्‌शुद्र’, कथंचित् ‘मोक्षाला’ जावू शकतात. नीच गोत्रधारी ‘तिर्यंचही’, अणुव्रत ग्रहणानंतर ‘उच्चगोत्री’ ठरतात. ‘गोत्रकर्माचा’ विचार ‘पर्यायार्थिक नय विवक्षेने’ आहे. निश्चयाने, ‘एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यात काही करू शकत’ नसले तरी, व्यवहारात ‘निमित्त-नैमित्तिक’ संबंध व ‘द्रव्य-क्षेत्रादिचा’ विचार, हा आवशयक ठरतो. ‘म्लेंच्छ खंडातून’ आलेला जीवही, ‘चक्रवर्तींच्या सानिध्यात’ राहून, ‘मोक्षाचा पुरुषार्थ’ करू शकतो. ‘सत्‌शुद्र’ समवशरणात १२ कोठ्यांमधे जावू शकतात कारण, ‘ज्यामधे भगवान बनण्याची योग्यता आहे, तो भगवंतचरणी जाणारच.’ हा नियम आहे.

♦ (४) थोडक्यात ‘गोत्रकर्माचा विचार, सैद्धांतिक, सामाजिक, भौगोलिक’, सर्व परिप्रेक्षांद्वारे करायला हवा. ह्या विवेचनातून, ‘मनुष्यगतीची श्रेष्ठता व दुर्लभता’, प्रकर्षाने सिद्ध होते. देवगतीतील जीव, ‘दिव्य शरीरधारी, भोगसामग्रीची दिव्यता, व शुभनामकर्म, आणि अहिंसक’, ह्या कारणांनी ‘उच्चगोत्री’ म्हणवले जातात. याउलट, ‘नारकीयांचे, देह, वेदना, विक्रिया, लेश्या, भाव, परिणाम’, सर्वच निंद्य असल्याने, ‘नीचगोत्र’ म्हणवले जातात. ‘गोत्रकर्माचे’, सूक्ष्मता अपेक्षेने म्हणूनच ‘सहा भेद’ आढळतात. ‘भाव-परिणामांच्या’ परिणतीवर, ही ‘उच्चनीचता’

ठरते, तेथे ‘बाह्यकारणांचा सद्भाव’ हा स्वयमेव असतोच. ह्या ‘उच्चनीचतेे दरम्यान’ अत्यंत पातळ ‘सीमारेखा’ आहे. त्या विवक्षेने कथंचित्, एक जीव आयुष्यभरात, क्षणाक्षणाला ‘उच्चनीचतेच्या’, ह्या झोक्यावर झुलत असावा.

ह्या चिंतनातून एक स्पष्ट होते की, आत्ता प्राप्त हा ‘मनुष्यजन्म, जैन कूल, संतसमागम, उत्तमशरीरसंपदा, सर्व अनुकूलता, प्रचुरता, खऱ्या देव-शास्त्रांवर श्रद्धा, ज्ञानाची आस, आवड, थोडा का होईना सम्यक् उद्दम’, हा केवळ ‘दुग्धशर्करा योगच’ म्हणावा लागेल. शिवाय ‘म्लेंच्छ वा शुद्र वा तिर्यंचही’, मोक्षमार्गातला उद्दम करू शकतात तर, आपल्याकडे तर सर्वच ‘उत्तमता’ आहे तर, ‘मी ही नक्की भव्यजीव असून, परमशुद्धता प्राप्त करणारच,’ ही खात्री होणेसुद्धा ‘पुरुषार्थ’ आहे.

♦ (५) ‘जन्म वा माता-पिता वा कूळ वा जात’, हे कर्माधीन आहे. त्याने ‘बाह्य श्रेष्ठता-कनिष्ठता, प्रतिष्ठा, मान’ ठरेल. मात्र जैनांनी, ‘जन्माधीन प्रधानता’ न मानता, ‘गुणकर्माची प्रधानता’ मानली. ‘द्रव्य-क्षेत्रादिनुसार’ कर्म उदयाला येतात. ह्या विधानाला पुष्टी देवून, ‘द्रव्यादि’ बदलण्याचा, ‘अधिकार व स्वातंत्र्य’ दिले. आणि ‘शुद्र व म्लेंच्छानाही’ दीक्षेचा अधिकार दिला, ‘तप-धर्म-त्यागाला’ स्थान दिले. ही ‘सामाजिक उदारता’ आणण्याचा, हा जैनांचा खास ‘पुरुषार्थच’ आहे.

♦ (६) व्यवहारनयाने ‘गोत्रकर्माचा’ विचार वेगळ्या परिप्रेक्षेतून करावा लेगेल. ‘जागतिकीकरणाच्या’ ह्या प्रवाहात हा ‘पुरुषार्थ’ प्रकर्षाने जाणवतो. सामाजिक संरचनेतील दर्जा, हा ‘गोत्रकर्माश्रित’ असला तरी, ‘पुरुषार्थाने’ त्यावर स्पष्टपणे मात करता येते. एकेकाळी प्राचीन वा मध्ययुगीन, काळात, ‘सामाजिक अवधारणा खूपच पक्या व विचित्र’ होत्या. वर्तमानात, ‘प्रखर पुरुषार्थाने’, त्यात झालेला बदल स्पष्टत: दिसतो. आवर्जून उल्लेख करावा असे, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मदर तेरेसा, डॉ. नरेंद्र जाधव, सुशिलकुमार शिंदे’, इत्यादि व्यक्तींनी आपल्या ‘ज्ञान, आचरण, जिद्द, समाजकल्याणाची प्रखर तळमळ’ ह्या ‘गुणांने, पुरुषार्थाने’, सर्व नियम बदलून टाकले. ह्या जन्मीचे, ‘उच्चआचरण, उच्च गोत्रासमान पूज्यता, नावलौकिक, मान-सन्मान, मिळवून देवू शकते, ’ हे ह्या महापुरुषांनी उदाहरणांनी स्पष्ट केले. कर्मप्राप्त ‘जन्मगोत्राच्या’ बेडीतच अडकून पडायचे वा त्यांचा ‘सम्यक् स्वीकार करून, पुरुषार्थाने सर्व मर्यादा व बंधने झुगारून सर्व परिभाषाच बदलायच्या’, हे ठरविणेच ‘पुरुषार्थ’ आहे.

**(८) अंतरायकर्म :** ‘जैन मान्यताप्राप्त’ आठ कर्मातील’ हे ‘अंतिम व घातिकर्म’आहे. ‘जीवाच्या गुणात बाधा आणणे’, हे या कर्माचे काम होय. ‘अंतराय’ म्हणजे विघ्न होय. हे कर्म ‘घाति’ असेल तरी, वर्णन व क्रम, ‘आघातिकर्मानंतर’ केले जाते. कारण ह्या कर्मात, ‘सर्वघाति प्रकृतिच’ नसतात. ह्याचे पाचही भेद, ‘देशघातिच’ आहेत. सर्व जीवांना ‘वीर्यांतराय कर्माचा’ सदैव

'क्षयोपशम' असतोच. ह्या कर्माचे स्थूलवर्णन देवून, अत्यंत सूक्ष्मविचार मंथनातून, सर्व शक्यतांचा आढावा घेवून, 'पुरुषार्थ' स्पष्ट केला आहे.

**कथन :** ह्या कर्माचा विस्तार करताना ह्याचे[३२], 'लक्षण, भेद, त्या भेदांचे लक्षण, ह्या कर्माचे कार्य आणि कर्मबंध योग्य परिणाम वा आस्रवांच्या कारणांचा सविस्तर आढावा घेतला गेला आहे. '

**पुरुषार्थचिंतन :**

१) कर्मप्रतिक्षण घडतच आहे. ते 'सहजतेने वा वीतरागतेने' कसे घडतात, ह्यावर 'बंधाची तीव्रता' ठरते. आचार्यांनी तर, मनच 'बंध व मोक्षाचे' कारण म्हटले, ''रत्तो बंधदि कम्मं, मुंचदि जीवो विरागसंपत्तो । एसो जिणोवदेसो तम्हा कम्मेसु मा रज्ज ॥१५० स.सा॥'' ह्या बंधनाला जबाबदार जीव स्वत:च आहे. कारण त्या, 'बंधनाची सवय झाल्यानेच, मुक्तीचा प्रयत्न' घडत नाही. म्हणून 'बंधानातूनच सुटण्याचा दृढनिश्चय', हीच प्रथम पायरी ठरेल.

(२) 'समयसारच्या' त्या गाथेतून, 'पुरुषार्थाचाच' पुरस्कार केला आहे. (१५०) कारण आचार्य खात्री देतात की , 'मुक्ती' हा जीवाचा स्वभाव आहे, त्याला वेगळा प्रयत्न नकोच, फक्त 'बंधनाचे उपाय', सोडण्याचा उशीर आहे, की 'मुक्ती' तेथे आहेच. म्हणून 'कर्मात रचणे; वा पचणे वा आसक्त न होण्याचा', उपदेश आचार्य करतात. 'आध्यात्मिक कर्म, पूजा, स्वाध्याय, सेवा, श्रद्धा, भक्तीचा उद्दम' आवश्यक आहे. परंतु ह्यात 'पूर्वबद्ध कर्मोदय विघ्न' आणू शकतात. 'अंतराय' कर्माला 'रहस्यमय' म्हटले आहे. कारण 'सर्व अनुकूलता, इच्छा, प्रयास, आवड' असतानाही, हे अचानक येवून 'विघ्न' उभे करतात, तरी, सतत त्या 'शुभक्रियांना', करण्याचा 'पुरुषार्थच' ह्यावर उपाय आहे. कोणत्याही 'कर्मोदयाने मुक्ती' मिळणार नाही मात्र, 'मुक्तीत बाधा', कर्म जरूर आणतात. 'मुक्ती पुरुषार्थानेच' शक्य आहे. ह्यात येणारे 'सर्व विघ्न दूर करणे', हाच 'पुरूषार्थ' आहे.

(३)संसारदशेत सतत, सर्वात जास्त ह्या कर्माचा बंध होतो. कारण सतत 'व्यर्थ सल्ले, व्यर्थ बाधा, व्यर्थ उपदेश, निषेध, अपमान करणे, संग्रह करणे', हे चालूच आहे. व्यर्थ दुसऱ्यांच्या कार्यात, कामात न अडकणे, हा 'पुरुषार्थ' आहे. 'अंतरायकर्म 'खूपच सूक्ष्म आहे. त्याचे 'गहनचिंतन, मनन, हे पुरुषार्थप्रेरक' आहे.

♦ (४) 'व्यवहार अपेक्षेने' बघितले तर, ह्या 'कर्माचा विपरीत अर्थ' लावलेला दिसतो. 'दानादिपासून अंग काढून' घेण्यास, 'अंतरायकर्माला ढाल' बनवून, वापर केला जातो. 'स्व पुरुषार्थाची कमतरता कर्मावर लादली' जाते. 'वीर्य' हा आत्म्याचा गुण आहे तर, 'पुरुषार्थ' ही त्याची पर्याय आहे. 'स्वभावाची रचना पर्यायात करणे', हे त्याचे काम आहे. ह्या कर्माच्या उदयाने 'पुरुषार्थ' प्रकट नाही, पण 'पुरुषार्थ होवू देणे वा नाही' हे ह्या कर्माचे काम नाही. ह्या

'वीर्य' गुणाचा कधीच घात होत नाही. हे विधानच, 'सुप्त पुरुषार्थ' जागवणारे आहे. ह्या 'शक्तीची व्यक्ती' करणे, हे जीवाचे कर्तव्यच आहे. 'पुरुषार्थाने' पर्यायात शुद्धता प्रगट करणे, हेच 'स्वदान, लाभ' इत्यादि होय, परंतु जर हे प्राप्त न करण्याचा 'पुरुषार्थ' जीवाचाच आहे तर, ह्यांना प्राप्त करण्याचा 'पुरुषार्थ' जीवाचाच आहे.

♦ (५) अंतरायकर्म खूप 'सूक्ष्म, गूढ व गहन' आहे. जीवाला, 'भोगोपभोग पुण्याने प्राप्त' होतात. त्यात 'बाधा अंतरायकर्माने' येते. वेगळ्या दृष्टीने विचार केला तर, 'कर्मोदयाने भोगही प्राप्त आहे, भोगण्याची शक्तीही आहे, क्षमता, अनुकूलता' आहे, अशावेळी स्वत:हून 'स्व संयमाने, बंधनाने', त्यांचा अस्वीकार करून, स्वत:च त्यात 'अंतराय' आणणे हे महत्त्वाचे आहे. खरा ज्ञानी, 'भोगोपभोग' मिळो वा न मिळो, 'अंतरायच' मानत नाही. कशाचाच अतिरेक करत नाही. 'स्वार्थ, दान, मान, सन्मान', कशासाठीही तडफड नाही. 'पुण्यप्राप्तिसाठी दान', जैनांना मान्य नाही. उलट 'पुण्याने प्राप्त भोगांचे सहज वितरण म्हणजे दान व पुरुषार्थ' आहे.खरे तर, भोगातले 'अंतराय दूर करा, खूप भोगघ्या, लिप्त व्हा, आसक्त व्हा, पाप बांधा'', असे विधान 'जैनधर्म' करीत नाही. हे 'अंतराय दूर व्हावे आणि भोग मिळावे' म्हणून, 'ऐहिक, बालतपाला' स्थानही दिले नाही. 'निदानबंधाचा'' कडाडून विरोध केला. 'आत्म्याच्या अनंत शक्ती, सामर्थ्य', यांचा वापर करता यावा म्हणून, 'पुरुषार्थ' सांगितला. ह्या 'आत्मशक्तींच्या विकासासाठी, प्राप्तिसाठीच', तीर्थंकरानी अफाट संपत्ती सहजी वितरित करून, भोगांकडे पाठ फिरवली आणि 'पुरुषार्थाने खऱ्या क्षायिक दानादिंना' प्राप्त केले.

सर्वसामान्य व्यक्ती, 'भोगोपभोग' न मिळाल्यास 'अंतरायमानून' व्याकूळ होतो. 'ज्ञानी' अशा 'स्वाधीन सामग्रींना' सहजी त्यागतो. 'उत्तरअध्ययानातील' (१३/३१,३२,३३) ह्या गाथा, ह्या विषयांचे सुंदर उदाहरण आहे. ह्याचा अर्थ व्यवहारात, 'गरिबी, हीनता, दीनता स्वीकारायची' असे नाही, उलट सर्वच तीर्थंकरांनी, 'अर्थ पुरुषार्थाचा' प्रकर्ष गाठला व 'आर्थिक सुबत्ततेने येणारी स्वतंत्रता' स्पष्ट केली. मात्र योग्य समयी, त्यात लिप्त न होता, 'दानाचाही प्रकर्ष' केला. म्हणूनच 'शक्ती असताना त्याग केलाच पाहिजे', असा आदर्श त्यांनी आचरणातून, 'दृढतेने व सम्यक् रूपाने' समोर ठेवला.

सर्व कर्म, 'गुणांचा, शक्तींचा, भोगांचा' घात करतात वा 'शरीरादी, गति' इत्यादित अडकवतात. ह्या गहनचिंतनातून, प्रत्येक कर्म, स्वत:च जीवाला 'पुरुषार्थाची प्रेरणा' देतानां दिसतात. कर्म 'निमित्त' आहे, ते जीवात 'ढवळाढवळ' करीत नाहीत. मात्र 'आळशी, निरुद्यमी, जीवकर्माचा आश्रय घेवून, पुरुषार्थाला दुर्लक्षित करतात', असे लोकच समर्थनासाठी कर्माचा आधार घेतात. त्यामुळेच 'कर्मसिद्धांताचा नियतिपर' अर्थ लावला जावू लागला. मात्र ह्या 'कर्मसिद्धांताच्या केलेल्या गहन अध्ययनातून खात्री झाली की, प्रत्येक कर्मात 'पुरुषार्थ' दडला आहे. पुढे येणारे 'उत्कर्षण' इत्यादि हे 'पुरुषार्थप्रेरक' आहे व जास्त भरवशाचे आहे हे स्पष्टपणे दिसते. 'कर्मसिद्धांतातील स्वतंत्रता व नियतता' नीट कळली की, 'नियति वा पुरुषार्थाचा' झगडा संपतो व 'कर्मसिद्धांतातील स्वयंप्रकाशी पुरुषार्थ' अधिकच प्रखरतेने उजागर होतो. (तक्ता क्र. ७)

## ४) 'स्थितिबंध': स्वरूप-भेद-वैशिष्ट्य इत्यादि विवेचन :

**भूमिका :** 'जैन दर्शनात', बंधाचे चार भेद सांगितले आहेत. त्यात 'स्थिति' हा एक भेद आहे. 'स्थिति' म्हणजे कर्मांचा, आत्म्यासह असण्याचा काळ होय. 'बंधानंतर' प्रतिसमय एक एक कर्म उदयाला येतात, अशाप्रकारे जोपर्यंत, त्या काळात बांधलेले सर्व द्रव्य समाप्त होईल, तेवढा काळ, त्या 'कर्माची स्थिति' होय. प्रतिसमय झडणाऱ्या त्या द्रव्याला 'निषेक' म्हणतात. संपूर्ण स्थितीत 'निषेक', एका नंतर एक स्थित राहतात. सर्वात प्रथम 'निषेकात', सर्वात अधिक द्रव्य असून, नंतर कमी कमी होत, अंतिम 'निषेकात' सर्वात कमी द्रव्य असते. 'कषायादिक तीव्रतेने, संक्लेश परिणामांनी', अधिक 'स्थिति', तर 'शुद्ध परिणामांनी', हीन 'स्थिति' बंध होतो. अत्यंत महत्त्वाच्या व विस्ताराने वर्णित, ह्या विषयाचा बारकाईने अभ्यास करून, सर्व महत्त्वाच्या नोंदी लक्षात घेवून, विषयविस्ताराचा स्थूल आढावा देवून, फक्त 'प्रतिबिंबित पुरुषार्थ' अधोरेखित केला आहे. ह्या ग्रंथात ह्या विषयवर्णनात मुख्य आधार, गो.क. (पृ.१०२, गाथा १२७ ते १६२), घेतला गेला आहे.

**कथनक्रम :**

(१) 'करणानुयोगाच्या ग्रंथांमधे' ह्या विषयाचे वर्णन[३३], ''सामान्य लक्षण देवून, नंतर 'उत्कृष्ट-सर्व; अग्र व उपरितन, सांतर-निरंतर, प्रथम-द्वितीय, सादी-अनादि', ह्या सर्व स्थितींचे लक्षण देवून'' नमूद केले आहे. 'स्थितींच्या विचारस्थानाचे' लक्षण देतांना (ध. ६/पृ.१५०) म्हटले आहे की-

वीचारस्थान = उत्कृष्ट स्थिति - जघन्यस्थिति वा अबाधाचे भेद-एक

आबाधाचे भेद = उत्कृष्ट स्थिति - जघन्यस्थिति +१

$$\text{आबाधा कांडक} = \frac{\text{उत्कृष्ट स्थिति}}{\text{उत्कृष्ट आबाधा}}$$

आगमात उदाहरणद्वारा विषयाला, अत्यंत सोप्या भाषेत समजवविले आहे.

(२) 'स्थितिबंधाचा' निर्देश करताना[३८], ''ह्या 'स्थितिबंधाच्या' प्रकरणात, चार 'अनुयोगद्वार' सांगितले आहे. ते, 'स्थितिबंधस्थान प्ररूपणा, निषेक प्ररूपणा; आबाधाकांडक प्ररुपणा, आणि अल्पबहुत्व' हे आहेत.''

* ह्याचबरोबर 'भवस्थिति व कायस्थिति', ह्यातील भेद सांगितला आहे.

* 'एकसमयस्थिति' असणाऱ्या बंधाला, 'बंध' म्हटले जात नाही.

* 'स्थिति व अनुभाग', बंधाची 'प्रधानता' सांगितली आहे.

(३) 'निषेकरचना' वर्णन करताना[३५], ''निषेकरचना ही कर्मांची स्थिति असल्याचे सांगतात. ही

रचना, 'प्रदेशांशिवाय' होवू शकत नाही. 'स्थितिबंधात' निषेकांची त्रिकोण रचना, सांगितली आहे. विवक्षित प्रकृतींचा 'उत्कृष्टस्थितिबंध' झाल्यावर, त्याच काळात, 'उत्कृष्ट स्थितीची आबाधा व स्थितीची रचना' ही होते.''

(४) कर्माच्या 'उत्कृष्ट व जघन्य स्थितिबंधाच्या' नियमात[३६], ''मरणसमयी उत्कृष्ट 'स्थितिबंध' शक्य नाही. नरकायुशिवाय तीन आयुंना सोडून, शेष सर्व प्रकृतींच्या स्थितीचा 'उत्कृष्टबंध उत्कृष्ट संक्लेशाने' व 'जघन्य बंध कमी संक्लेशाने' होतो. तिर्यंच, मनुष्य व देवायुचा, 'उत्कृष्ट स्थितिबंध, उत्कृष्ट विशुद्ध परिणामांनी व जघन्य बंध कमी संक्लेश परिणामांनी' होतो. 'उत्कृष्ट अनुभाग' बांधणारा जीव, निश्चयाने 'उत्कृष्टस्थितीचा बंध' करतो. उत्कृष्टस्थितिबंधाचा अंतरकाळ सांगून, जघन्य स्थितिबंधात 'गुणहानि' होत नसल्याचे सांगतात.'' आचार्यांनी असा विचार केला आहे.

(५) 'स्थितिबंधसंबंधी' अन्य ऊहापोहात[३७], ''साताच्या जघन्यबंधाबाबत, उत्कृष्ट अनुभागासह अनुत्कृष्ट स्थिति, भुजागार बंध'' इत्यादि वर्णन केले आहे.

**पुरुषार्थचिंतन :**

१) 'कर्मसिद्धांत' द्रव्यबंधाच्या मुख्यतेने कथन करणारे आहे. 'सूक्ष्मातिसूक्ष्म भावांना' जाणण्यास, 'द्रव्यकर्माचा' आश्रय घ्यावा लागतो. 'द्रव्य-क्षेत्र-काल-भावानुसार', कर्माच्या बंधाच्या 'चार शक्ती' ठरतात. त्यापैकी 'स्थिति व अनुभाग', हा बंध 'कषायाने' होतो. म्हणून 'कर्मसिद्धांतात' सर्वत्र 'अनुभाग व स्थिति', ह्या कर्मांचाचे 'बंध-उदय-उत्कर्षण' इत्यादिंची 'प्रधानता आहे. 'शुभ वा अशुभ', सर्वच कर्मांची 'स्थिति' ही, संसारात अडकवून ठेवणारी असल्याने ,अशुभच मानली जाते. ह्यासाठी 'कषाय, कमी करणे, तीव्रता कमी करणे, त्याचा काळ कमी करणे' हाच उपाय आहे. ह्या उपायांनेच, 'स्थितिबंध' कमी होईल.

(२) 'सम्यग्दर्शनापूर्वी' जीवाला, 'पाच लब्धि' होतात. त्यामुळे उपयोग 'शुद्ध आत्म्याकडे' लागतो. त्यात अनेक गोष्टी घडतात. प्रायोग्यलब्धीत, '३४ बंधापसरणात, ४६ प्रकृतींचे अपसरण', हे फक्त 'परिणाम विशुद्धीने' होते. 'परिणामांची गति खूपच विचित्र' आहे. त्यात 'हानी-वृद्धी' होतच राहते. 'परिणामांना सांभाळणे हे प्रखर पुरुषार्थाचे' काम आहे. अर्थात् ही लब्धि 'भव्य-अभव्य' दोघांना होवू शकते आणि थांबलेला बंधही परत होवू शकतो, हा धोका येथे कायम असतो.

(३) 'करणलब्धित' जीवाला, तीन 'करण' होतात. त्यात 'अपूर्व व अनिवृत्तिकरणात', 'स्थितिकांडकधात' होते. यात सत्तेतील, 'स्थिति-कांडकरूपात' कमी होते, म्हणजे विशिष्ट प्रमाणात कमी होते. त्यामुळे 'स्थितिसत्त्व' घटते. 'कांडकघाताशिवाय कर्मस्थितीचा' घात शक्य

नाही. ह्यात 'गुणहानिक्रमाने सत्त्व', कमी कमी होवू लागते. हे सर्व 'विशुद्धीने' घडते, कारण उपयोग 'शुद्ध आत्म्यातच एकाग्र' असतो.

(४)'स्थितिबंधात निषेकरचना' होते. 'समयप्रबद्धात' आठ कर्मांचे स्कंध, त्या प्रत्येक स्कंधात 'अनंत कार्मणवर्गणा' असतात, ज्याची 'स्थिति' समान नसते. एकेका समयावर, 'स्थितवर्गणांचा' जो पिंड, तोच त्या त्या समयाचा 'निषेक' होय. 'समप्रबद्धाचे' संपूर्ण द्रव्य, एकाच समयात उदयाला येत नाही, एक एक निषेक येतो. त्यामुळे एका समयात बांधलेले विवक्षित कर्म, गणणातीत काळपर्यंत उदयाला येत राहते. एक 'निषेक' एकापेक्षा अधिक समय पर्यंत फळ देत नाही, तो लगेच झडतो, हा नियम आहे. आगामी समयांवर स्थित असणाऱ्यांना, 'सत्तागत निषेक' म्हणतात. 'कर्म जसे बांधले, तसेच उदयाला येईल' असा नियम नाही. शिवाय बंधाच्या वेळी जितक्या 'परमाणुंचा निषेक' बनला, तेवढेच 'परमाणु' झडतील असाही नियम नाही. ह्या 'सत्तेत' कर्मात हवे ते बदल घडू शकतात हा 'पुरुषार्थावर निर्भर' भाग आहे. 'दशकरणात' ह्याचा अधिक उहापोह केला आहे.

## ५) अनुभागबंध : स्वरूप – लक्षण – भेद इत्यादि विवेचन :

**भूमिका :** 'कर्मसिद्धांत' सर्वात अधिक महत्त्व, 'बंधप्रक्रियेला' आहे. ह्या बंधात ज्या 'चार शक्ती' सांगितल्या, त्यात सर्वात प्रधान 'अनुभाग' आहे. 'आगमात' हा शब्द 'अनुभाग वा अनुभव', अशा दोन प्रकाराने दिसतो. 'कर्मोदयाने होणाऱ्या फळाचा अनुभव करणे', ह्या अपेक्षेने, 'अनुभव बंध' म्हटले जाते. 'कर्मबंधाच्या वेळी जी शक्ती बांधली जाते', त्या अपेक्षेने, 'तारतम्यता' विवक्षेने 'अनुभागबंध' म्हटले जाते. (त.सू.८/२१/२३) कारण आगमात, 'द्रव्याच्या शक्तीलाच अनुभाग' म्हणले आहे. जीवाच्या 'रागादि भावांच्या तरतमतेनुसार', त्यासह बंधणाऱ्या कर्मांच्या, 'फलदान शक्तीतही तरतमता' होते. मोक्ष प्रकरणात, 'कर्मांची ही शक्ती अनुभागरूपाने', होणे योग्य ठरते. 'कर्मबंध' प्रकरणात, 'कर्मप्रदेशांची' गणणा प्रधान नसून, 'अनुभागच' प्रधान आहे. कारण 'सुखदु:खरूप फळास' ते निमित्त आहे. म्हणूनच हा 'अनुभागबंधच बांधणेरूप क्रियात समर्थ मानला जातो. अन्य 'तीनबंध आत्म्याला बांधण्यासाठी, समर्थ नाही. 'हीन शक्तिवाला अनुभाग', फक्त एकदेशरूपाने गुणांचा घात करणारा असल्याने, 'देशघाति' म्हणवला जातो. 'अधिक शक्तिवाला अनुभाग', पूर्णरूपाने गुणांचा घातक असल्याने, 'सर्वघाति' मानला जातो.

हे संपूर्ण विवेचन मुख्यत्वे (गो.क.पृ. १३३ ते १४४, ७६७ ते ७७०), ह्या आधारे केले आहे. प्रसंगानुरूप अन्य आधार घेतले आहे. ह्या सर्व सूक्ष्मतेचे नीट अध्ययन करून, सर्व विषयांची गंभीर दखल घेवून, जो भाग 'पुरुषार्थप्रेरक' वाटला, तो उजागर केला आहे.

**कथनक्रम :**

१) ग्रंथपद्धतीनुसार सुरुवातीला[३८], ''लक्षण भेद सांगून, १४ भेदांचा निर्देश केला आहे. त्या सर्व भेदांचे लक्षण सांगून, अनुभागस्थानाचे सामान्य लक्षण सांगितले आहे आणि त्यांच्या भेद-प्रभेदाचे'' सविस्तर वर्णन केले आहे.

२) 'अनुभागबंधाचा' निर्देश[३९], ''अनुभागबंध कषायाने होतो. शुभप्रकृतींचा अनुभागबंध, विशुद्ध परिणामांनी उत्कृष्ट होतो आणि अशुभ प्रकृतींचा अनुभागबंध, संक्लेशपरिणामांनी उत्कृष्ट होतो. ४२ प्रशस्तप्रकृतींचा उत्कृष्ट अनुभागबंध, विशुद्धगुणाची उत्कटता असणाऱ्यांना होतो. ८२ अप्रशस्त प्रकृतींचा उत्कृष्ट अनुभाग, बंध उत्कृष्ट संक्लेशवाल्या मिथ्यादृष्टी जीवांना होतो. हा अनुभाग, शुभप्रकृतींचा गुड-खांड इत्यादि तर, पाप प्रकृतींचा अनुभाग निंबआदिरूप होतो.'' 'प्रदेशांशिवाय अनुभागबंध' शक्य नाही परंतु, प्रदेशांच्या हीनाधिकतेने, 'अनुभागाची हीनाधिकता', ठरत नाही.

३) ह्या बंधातील, 'घाति-अघाति, सर्व व देशघाति' वर्णन केले आहे[४०].'घाति-अघाति'

प्रकृतींचे, ‘लक्षण, विभाग, वेदनीयचा कथंचित् घातिपणा, अंतरायचा कथंचित् आघातिपणा’, सांगितला आहे.

* ‘सर्वघाति-देशघाति’ अनुभागाचा, ‘निर्देश, लक्षण, प्रकृति व त्यातील चतु:स्थानीय अनुभाग, सर्व कर्म प्रकृतीतील यथायोग्य चतु:स्थानीय अनुभाग, मोहनीय प्रकृतीची विशेष प्ररूपणा, सर्व कर्मांच्या सर्व देशघातिबाबत विशेष उहापोह’ केला आहे.’

* ‘ज्ञानावरण व दर्शनावरणाचे’ अनुभाग, परस्पर समान असतात. ‘केवलज्ञान, दर्शनावरण, असाता, अंतरायाचे अनुभाग’, परस्परसमान असतात. ‘तिर्यंचायुपेक्षा मनुष्यायुचा अनुभाग’, अनंतगुणा आहे. ‘अघातिकर्मांचा’ उत्कृष्ट अनुभाग, ‘सम्यग्दृष्टी’ जीवच बांधतो. ‘गोत्रकर्माचा’ जघन्य अनुभागबंध, ‘बादरअग्निकायिक व वायुकायिक’, पर्याप्त जीवच बांधतात.

**पुरुषार्थचिंतन :**

१) ‘पदार्थ आपल्या स्वभावापासून च्युत होवून, विजातीयरूप धारण करतो त्या भावविशेषाला, ‘बंध’ म्हणतात. ’

संसारस्थजीव न सर्वथा ‘शुद्ध अमूर्तिक, न सर्वथा अशुद्ध मूर्तिक’ आहे. ह्या मधली अशी दशा आहे की, ज्यामुळे त्यासह मूर्त पदार्थाचा ‘बंध’ होवू शकतो. ‘द्रव्यबंधाचे प्रकृति, प्रदेश,’ इत्यादि चार भेद हे, ‘वस्तूचे स्व चतुष्टय, द्रव्य-क्षेत्र-काल-भावच’ आहे. ते ‘कार्मण वर्गणापासून’ निर्मित म्हणून, ‘स्व-द्रव्य’ आहे. ‘कार्मण शरीराचा’ आकार आहे, कारण ‘प्रदेशांनी मोजमाप’ होते ते ‘स्वक्षेत्र’ आहे. ‘निश्चित समयापर्यंत’ जीवासह राहणे, हा ‘स्वकाळ’ होय. त्याची ‘फलदान शक्ती हा स्वभाव’ होय. ‘स्वचतुष्टयधारी’ म्हणून, ‘सत्ताभूत’ पदार्थ आहे, काल्पनिक नाही. ही सत्यताच ‘पुरुषार्थवर्धक’ आहे. कर्माला ‘सत्ता’ आहे म्हणूनच नाश शक्य आहे. शिवाय कर्म ‘जीवनिर्मित आहे, कृत्रिम आहे, निमित्ताने’ आहे, म्हणून नाशाचा ‘पुरुषार्थ’ शक्य आहे.

२) ‘कर्मसिद्धांताचा’ आधार, ‘जीव तथा पुद्गलाचा’, पारस्परिक ‘निमित्त- नैमित्तिक’ संबंध आहे, जो ‘वस्तूस्वभावश्रित’ आहे. जीवाच्या ‘योग-उपयोगाने, विपरीत अपराधाने’, ह्या वर्गणा बद्ध होतात. ह्या वर्गणांमधे ‘तीव-मंद फलदान शक्ती’ पडते जी, ‘अविभाग प्रतिच्छेदांनी’ मोजली जाते. ‘अनुभागच’, जीव गुणांना ‘हीनाधिक’ बाधा पोहचवतो, म्हणून त्यालाच ‘विघ्नकारी’ मानले आहे. हा बंध जीवाच्या, ‘राग-द्वेष कषायांवर’ आश्रित आहे. एकाच ‘परिणामाने’, आठ प्रकृतींचा ‘अनुभाग’ ठरतो, परंतु ज्या बाजूला जास्त ‘तीव्रता’ असते त्यात, ’अनुभाग विशेष होतो. सर्व खेळ ‘परिणामांचा’ आहे. परिणामांची सूक्ष्मता, त्याचे फळ जाणून, ‘सतत सजगता, सतत शुभोगयोग’, हाच ‘पुरुषार्थ’ सूचित केला आहे. अर्थात ‘संसारदशेत, व्यग्रतेत’, हे

बोलण्याइतके सोपे नाही तरी, अधिकाधिक 'भावशुद्धीचा प्रयत्न', इतकेच 'जीवाधीन' आहे.

३) 'बंधप्राप्त कर्म, उदयाला येणारच व फळही देणार, हे सत्य आहे'. मात्र 'कर्म जसे बांधले, तसेच उदयालाही येत नाही वा फळही देत' नाही. प्रतिक्षण होणाऱ्या 'परिणामांने', त्यात 'स्थित्यंतरे' होतात. यात होणाऱ्या, 'बदलांचे चिंतन', अपकर्षण, संक्रमण, इत्यादि विभागात नमूद केले आहे. मात्र 'बंधाची-आस्रवाची कारणे', इत्यादिंचा गहन विचार, चिंतन, 'पुरुषार्थप्रेरक' ठरू शकते. त्याचबरोबर 'कर्मोदयाच्या वेळची प्रतिक्रियाही' महत्त्वाची ठरते. उदयप्रसंगीची 'समता, तटस्थता, सावधानताही', नव्या 'बंधात' बदल घडवू शकतात.

४) 'करणप्रसंगी' स्थितिप्रमाणेच 'अनुभागकांडकघात' होतात. सत्तेतील 'अनुभाग' विशिष्ट प्रमाणात कमी होतात. 'विशुद्धपरिणामांनी' घडणारी ही क्रिया, 'पुरुषार्थसूचक' आहे.

## ६) प्रदेशबंध - लक्षण-भेद-वैशिष्टे इत्यादि विवेचन :-

**भूमिका :** अनादिकाळापासून 'जीव व पुद्गल' हा बंध चालू आहे. प्रतिसमय जीव 'समयप्रबद्ध' बांधतो. त्या बद्ध वर्गणा, 'चार रूपात' परिवर्तित होतात. 'पुद्गल कर्मांच्या प्रदेशांचे, जीव प्रदेशांसह, एकक्षेत्रावगाह बंध हा प्रदेश बंध', म्हणवला जातो. मूळतः 'प्रदेश' म्हणजे आकाशाचा लहानातला लहान, 'अविभागी अंश' होय. 'एक अविभागी पुद्गल परमाणु आकाशाच्या जेवढ्या भागाला व्यापतो, त्याला 'प्रदेश' म्हणतात'. अशा 'अनंतानंत कार्मण वर्गणा जीवाशी बद्ध होतात, त्यांच्या प्रमाणाची निश्चिती करणे 'प्रदेशबंध' होय'.

ह्या विषयाचा विस्तार करताना गो.क. (गो. १८५ ते २६०) ह्या ग्रंथाचा आधार घेतला आहे.

**कथनविस्तार :** 'प्रदेशबंधाचा' खूप विस्तार आगमात केला आहे[४१].

* 'प्रदेशबंधाचे' लक्ष्मण सांगून, त्याचे 'उत्कृष्ट, अनुत्कृष्ट, जघन्य, अजघन्य', भेदांचे वर्णन केले आहे.

* उत्कृष्ट 'योगाने'' उत्कृष्ट 'प्रदेशबंध' होतो. हा बंध 'एक क्षेत्रावगाही' असला तरी, 'जीव व कर्मांचे अस्तित्व निश्चयनयाने भिन्न असते. (त.सू. ८/२४) नुसार, 'प्रदेशबंध' सोप्या भाषेत सांगितला आहे. त्यात 'सहा प्रश्नांद्वारे', विषय स्पष्ट केला आहे.

(१) संसारी जीवाला प्रतिसमय होणारा कर्मबंध कसा होतो?- उ. ज्ञानावरणीय इत्यादिरूप

(२) ते केव्हा बांधले जातात? - उ. प्रतिसमय

(३) कोणत्या कारणांनी बांधले जातात? - उ. योगामुळे

(४) त्यांचा स्वभाव कसा आहे? - उ. सूक्ष्म

(५) बंधानंतर ते कोठे व कसे राहतात? - उ. आत्मप्रदेशासह एक क्षेत्रावगाह

(६) बद्ध परमाणुंची संख्या किती असून, त्याची वाटणी कशी होते? - अनंतानंत

ह्या प्रश्नांच्या उत्तराचा विस्तार गो.क. ग्रंथात (गा. १८५-२६०) विस्ताराने केला आहे. कर्मप्रदेशांची वाटणी, इतकी 'शिस्तबद्ध, स्वयंचलित' आहे की, त्यात कोणाच्या मदतीची अपेक्षा का ठेवली नाही हे स्पष्ट होते. कर्मसिद्धांताची 'स्वतंत्रता, स्वयंसिद्धता, शिस्तबद्धता', ते अग्रस्थानी का आहे? ह्याची पुष्टी करणारे आहे.

२) 'प्रदेशबंध योगाने' होतो. 'योगात तरतमता असेल तर, परमाणुतही तरतमता' येते. त्याचे विवेचन 'योगस्थानात' केले जाते. हे वर्णन गो.क. (गा. २१८) ग्रंथात, ४२ गाथांमधे केले आहे.

* ''मन-वचन-काय वर्गणांचे कंपन, हे ज्याचे लक्षण आहे, त्याला 'योगस्थान' म्हणतात.'' ह्यात, 'दहा प्ररूपणामधे, दहा अनुयोद्वार', जानण्यायोग्य आहेत. ह्यात 'उपपाद, एकांतवृद्धी आणि परिणामयोगाची' चर्चा केली आहे. एकएक भेदाचे, '१४ जीवसमास' अपेक्षेने, १४, १४

भेद आहेत व ह्या सर्वांचे, ‘सामान्य, जघन्य, उत्कृष्टादि’ भेद आहे. त्या सर्वांचे स्वरूप वर्णन केले आहे. त्या ‘परिणामयोगस्थानाची यवमध्यरचना’ होते. ह्यांचे ‘स्वामित्व, वृद्धी’ इत्यादि वर्णन केले आहे.

* ‘करणानुयोगाच्या’ ग्रंथांमधे, हा विषय अत्यंत विस्ताराने कथन केला आहे. त्याला स्थूलपणे सांगणेही कठीण आहे. त्या ग्रंथांचे सूक्ष्म अध्ययन, विषय समजण्यास मदत करणारे आहे.

♦ **निरीक्षण :** सर्व बंधाच्या प्रकारात, ‘प्रदेशबंधाचा’ पसार अत्यंत विस्तृत आहे. त्यातील मूळ व उत्तर प्रकृतीच्या ‘वाटणीचा ‘क्रम, त्याचे नियम’ तर, मंत्रमुग्ध करणारे आहे. त्या गणितीय विवेचनातून, ‘कर्मसिद्धांताची गहनता’ सिद्ध होते. सर्व गणित ‘असंख्यात व अनंताचे’ आहे. ‘विज्ञान व गणिताचे’, अत्यंत सुंदर उदाहरण म्हणजे ‘प्रदेशबंध’ होय. ह्या विवेचनाची, ‘सूक्ष्मता, गहनता, केवलज्ञानाची सिद्धी’, करणारे आहे. ‘प्रदेशबंध योगाने ’ होतो. ‘हा बंध, नव्या बंधात कारणही नाही व उपयुक्तही नाही.

♦ ह्या सूक्ष्मतेमळेच ‘करणानुयोगाचे’ हे विषय ‘ध्यानाचे विषय’ आहेत. ‘ध्यानात पलटणी’ ह्या विषयांची होते. त्यात ‘असंख्यातगुणी निर्जरा’ होते. ह्या ‘सूक्ष्म उपयोगात’, करणानुयोग साधन ठरते. बुद्धिपूर्वक ‘विषयाला ज्ञेय’ बनवतात व त्यामुळेच श्रेणीत आरोहनानंतर ‘आत्मानुभव’ होते. ‘करणानुयोगाच्या’ विषयातील उपयोगाने, ‘‘भेदज्ञानाला मदत होते, कषायांची मंदता होते, विषयांपासून निवृत्ति होते, मनाची एकाग्रता, उपयोगाची स्थिरता, ध्यान, तत्त्वज्ञान व चिंतन’’ होण्यास मदत होते. हाच ‘कर्मसिद्धांताला’ सम्यक्प्रकारे जाणण्याने घडणारा, ‘पुरुषार्थ’ आहे. किंबहुना ‘कर्मसिद्धांताचे’ सूक्ष्मज्ञानच ‘पुरुषार्थ’ आहे, हे म्हणणे अधिक योग्य ठरेल. आत्म्याच्या, ‘गुणांवर, शक्तींवर, भव्यत्वावर, दृढ श्रद्धान’, आत्म्याची ‘रुचि, आवड’ हाच, ह्यातून जाणवणारा ‘पुरुषार्थ’ आहे.

# प्रकरण ३

## उपविभाग २

## संदर्भ–सूची (३ ते ६)


१) पं.सं.प्रा.४/५१४-५१५;ध-१२/४,२,१०,२/३०३/२

२) प्रं. सं.प्रा. २११;त.सू.८/५

३) त.सू. ८/२३ ते २५, पं.सं.प्रा.४५३ ते ४५९,४९०-े ४९३, ४ /२३५ -२४०

४) पं.सं.प्रा. २/३,प.प्र.२/६३

५) रा.वा.८/५६७/ ३२,ध.६/१,९-१५/६/८;त.सू ६/१०;ध.पु.१२,१३

६) प.सं.प्रा. १/११४ ते १२१, त.सू.१/१३,१५,१९

७) त.सू.१/१४,२६,प.सा.४०,ध.पु. १३.१४

८) रा.वा. १/१५/१३/६१,६२/१,२६,२८

९) पं.सं.प्रा. १/१२२,१२९,त.सू. १/२०,२/२१

१०) पं सं.प्रा. १/१२० १२३,त.सू.१/३१

११) त.सू.१/२१,२५,२७,ध. १३ पृ.२९८,पं.सं.प्रा.१/१२०

१२) पं.सं.प्रा. १/१२५,त.सू १/२८

१३) ध.पु. १,६,१२,१३,प. सं.प्रा.१/१२६,प्र.सा. २१,२३,३७,३९,४७ -४९,नि.सा. १५९, १६७,१६८

१४) स.सि.८/३/१०,ध.पु. १२ पृ.४७९,५०१

१५) ध.६/१,९-१,१६/३२/६,ध.७ पृ.३५५

१६) त.सू.६/११,१२,रा.वा.६/५२१/१२,ध. ६/१,९-१,७/१०/२,५,७,९,३६

१७) पं.सं.प्रा. २/४,त.सू.८/९,ध.पु.१,६,१२,१३

१८) ध.पु.६ प.३६ ते३९,त.सू.६/१३

१९) ध.६ पृ.४०,स.सि.८/३/२

२०) त.सू. ८/१०,प.सं.प्रा. २/४,रा. वा ३/१९१/२४

२१) ध .१ पृ.३२४,रा.वा.८/५७५/१४

२२) गो.क. ५१८,८०४ ते ८०७,त.सू.६,१५ - २१

२३) ध.पु..६,१६,ध.१०पृ.२३३ -२४०,पु.७ पृ.२३ ,१९२- १९६

२४) गो.क ४१०,६३९ ते ६४३ त.सू.२/५३,ध.पु.१ पृ.३२४,पु.१५ पृ.४३,पु.६पृ.२१४

२५) ध. १४ पृ.८९,गो.क.६४१-६४४,पं स.प्रां.१/२०१

२६) ज.ध.पु.१/३६१,त.सू.२/५३,भा.पा. २५,२६ ध.पु. १० पृ. २३३ ते २३७

२७) प्र.सा.११७,ध.६/१,९,१,१०/१३/३,४,९,ष.खं.पु.१२ पृ.४८३

२८) ध.६ पृ.१३,पु. १२ पृ.४४० ,४४४,पु. १३ पृ. २०९, ३८७ -३८९, त.सू.६/२५,२६

२९) म.पु.७४/४९१ ते ४९५,३८/४६,१६/१८५ ते १८६,द.पु.१५ पृ. २ते८,प.प्र.२/१०७

३०) भगवती ६/३३,८/३१५,नायधम्मकाहा १.१.१४३,ष.ख. ५.५.१५१

३१) Genetics (3rd edition) A.m.winchester,oxford & I BH publishing Co,New Delhi 1972 cell biology, genetics,molecular biology, Evolution & Ecoloqy p.b.vorma, v.k. Agrawal, S.chamd & compamy Ltd Delih 2003
क्लोनिंग व कर्म सिध्दांत- डॉ. अनिलकुमार जैन- आस्था व अन्वेषण, ज्ञानोदय विद्यापीठ भोपाल पृष्ठ.१-१०

३२) त. सू.६/२७, ८/१३, ध.१३ पृ.३८९, पं.सं.प्रा.२/३३४

३३) क.पा.३/३-२२/५१४/२९२/५,३/१३-२२/२०/१५/२,पं.सं.प्रां.४/५१४-५१५, ध.पु.१४.पृ.३६७

३४) ष. खं.पु.११ सू.३६ पृ.१४०,ध.पु.१३ पृ.४

३५) ध.पु.६ पृ.२००,गो.क.९२०-९२१,९४०,मं.ध.२/५-१६/६-१२/,२/१९-२८/२२८-२२९

३६) ध.पु.१२ पृ.३७८,३९०,३९३,४९४,पं.सं.प्रां.४/४२५

३७) ध.६/पृ.१८६,पु.१२.पृ.३९३

३८) ध.१३ पृ.३४९,पु.१२ पृ.९१,१११,११२,त.सू.८/२१,२२,पं.सं.प्रा.४/४४१

३९) ष.खं.पु.१२ पृ.२८८,पं.सं.प्रा.४/४५१-४५२,४६७, ध.पु.६ पृ.२०१,पु.१२ पृ,११५

४०) ध.७/पृ.६२,६३,पु.१३/पृ.२१४,पु.१२/पृ.५५,४३१,४४१,४५१,पं.सं.प्रा.४/४८३-४८४,४८६

४१) पं.सं.प्रा.४/४९५,प्र.सा..१४०

# उपविभाग ३

## दशकरण : ‘कर्मांच्या दहा अवस्थांची पुरुषार्थदृष्टीने समीक्षा’

**प्रस्तावना :** जैन ‘कर्मसिद्धांताचे’ महत्त्व, त्याचे अग्रगण्य स्थान, प्रधानता स्पष्ट दिसते. कारण ह्या ‘कर्मसिद्धांताचे’, अत्यंत सांगोपांग, सर्व विवक्षांनी, सूक्ष्म वर्णन, जैनांनी केले आहे. ह्या ‘कर्मवर्णनात’ आठ कर्म, ‘त्यांचे भेद प्रभेद, त्यांची लक्षण, बंधाची कारणे, फळ,’ ह्यांचे विस्तृत विवेचन ‘करणानुयोगात’ अढळते. ह्याच वर्णनासह, ‘दशकरण’ विषयाचाही ऊहापोह सर्वत्र आढळतो. कर्माच्या ह्या ‘दहा अवस्था’, अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. ‘गुणस्थानानुसारही’ त्यांचे वर्णन आढळते. ‘संवर-निर्जरेचा क्रम’, त्यातून स्पष्ट होतो. ह्या ‘दशकरणांचा’ विस्तार, कषायपाहुड, धवलादि ग्रंथ, पं.सं.प्रा.’, इत्यादितून नीट काळजीपूर्वक अध्ययन करून, सर्व विवक्षांची यथायोग्य नोंद घेवून, ‘दशकरणातील पुरुषार्थ’ विशेषप्रकारे अधोरेखित केला आहे. ह्या ‘दशकरणांची पुरुषार्थ दृष्टीने समीक्षा’, एकत्रितपणे शेवटी करण्यात आली आहे. सुरुवातीला क्रमाने, ‘दशकरणांचा’ स्थूल आढावा मांडला आहे.

ह्या विवेचनासाठी मुख्य आधार ‘गो.क. ग्रंथातून (पृ. ४७ ते ४८, २२६ ते ३०२, ३०५ ते ४९५, ६६१ ते ६९५) घेतला गेला आहे. अन्य ग्रंथातील नोंदीचीही दखल घेतली गेली आहे.

आगमात, जीवाच्या शुभाशुभ परिणामांना ‘करण’ म्हटले आहे. ह्या व्यतिरिक्त ‘कर्मसिद्धांतात’ दहा मूळ अधिकारांना ‘दशकरण’ म्हटले जाते. गो.क. (गा. ४३७) नुसार, ह्या ‘दशकरणांचा’ क्रम; ‘बंध, उत्कर्षण, संक्रमण, अपकर्षण, उदारीणा, सत्त्व, उदय, उपशम, निधत्ति, निकाचना’, असा सांगितला आहे. त्याक्रमानुसार विवेचन केले गेले आहे.

**१) बंध :** ‘जैन दर्शनाने’ मानलेल्या, महत्वाच्या ‘द्रव्य व तत्त्वात’, पुद्गल हे, महत्त्वाचे द्रव्य आहे. ‘पुद्गल स्पर्शादि  चार प्रधान गुणयुक्त’ असून, त्यात ‘स्निग्ध-रूक्ष’ रूपाने परिणमण्याची, शक्तिसुद्धा ‘स्वाभाविक’ आहे. ही शक्तीच, जगातल्या ‘सर्व पदार्थ व शरीराची जननी’ आहे. ह्या ‘‘विषमपरमाणुंच्या संश्लेषाने, होणाऱ्या संबंधाला बंध’’ म्हणतात. पुद्गल परमाणुंचा बंध झाल्याने, ‘सूक्ष्मस्कंध’ रूप वर्गणा बनतात. ‘जीव प्रदेशांसह, ह्या वर्गणांच्या एकक्षेत्रावगाही, घनिष्ठ संश्लेषसंबधाने’, ‘बंध’ होतो. ‘‘ज्या प्रक्रियेने पदार्थ आपल्या स्वभावापासून, च्युत होवून, विजातीय रूप धारण करतात, त्या भावविशेषालाच ‘बंध’ म्हणतात.’’ अर्थात् हे पदार्थ, मूळ ‘स्वभाव’ सोडत नाही, त्यांची ‘स्वतंत्रता’ असतेच, फक्त तो ‘स्वभाव अव्यक्त’ असतो. म्हणूनच संसारीदशेत जीव, ‘कथंचित मूर्त तर, कथंचित अमूर्त’ ठरतो. संसारस्थ जीवाचे, ‘ज्ञान वा भाव’, मूर्तिक पदार्थांसह, ‘ममकाराने ’ बद्ध असतात. हे बंधाचे कार्य, ‘उपादान व निमित्त’ कारणाने होते. ‘बंधाचे’ अनेक भेद वर्णन केलेले आढळतात. तरी, मुख्यतः ‘द्रव्य-भाव’ हे भेद, कथन केले जातात. जीवाच्या ‘भावांच्या निमित्ताने, कर्माचा बंध’ होतो. त्यात योगाने ‘प्रदेशस्पंदनाने

द्रव्यात्मक', व 'उपयोग, रागद्वेष इत्यादिने भावात्मक' बंध होतो. ह्यात 'भावबंधच' प्रधान मानले आहे, कारण तेच 'बंधाचे कारण' आहे.

'मोक्षमार्गात' सर्वाधिक महत्त्व 'बंधाचे' आहे म्हणून, 'मोक्षाला' स्थान आहे. आगमातील विस्तृत विवेचनाला नीट अभ्यासून, स्थूलपणे आढावा घेतला आहे.

**कथनक्रम :** 'मोक्षमार्गातल्या' ह्या महत्त्वाच्या विषयाचा ऊहापोह करताना[१],

(१)'निरुक्ति अर्थ, गातिनिरोध हेतू, जीव व कर्मांचा बंध, अशा अपेक्षेने लक्षण' सांगितले आहे. बंधाच्या भेदाचे वर्णन करताना, ''एक ते आठ भेद सांगून, 'शब्द' अपेक्षेने 'संख्यात', 'अध्यवसायस्थान' अपेक्षेने 'असंख्यात', कर्म प्रदेश वा कर्मांच्या अनुभाग प्रतिच्छेदांच्या 'अपेक्षेने 'अनंत भेद', सांगितले आहे. 'नोआगम द्रव्य व भाव ' बंधाचे, भेद-प्रभेद वर्णिले आहेत.'' त्या सर्व भेदांचा विस्तार केला आहे.

(२) 'बंधाच्या' भेदांपैकी, 'द्रव्यबंधाचा' ऊहापोह करताना[२], ''शरीरापासून शरीरधारी अभिन्न कसे?; जीव व कर्म बंध कसा जाणला जातो? जीव प्रदेशात कर्म स्थित आहेत का अस्थित? जीवांसह कर्मांचे गमन कसे संभवते? अमूर्त जीवासह मूर्त कर्मांचा बंध कसा होतो? कर्म जीवासह कसे बांधतात? बद्ध जीवात चेतनता कशी राहते? विस्रसोपचय रूपाने स्थित वर्गणाच बद्ध होतात'', अशा सर्व प्रश्नांच्या उत्तरांसह विस्तार केला आहे.

(३) 'भावबंधाची' प्रधानता सांगताना[३], ''कर्म बंध नेहमी द्रव्य-क्षेत्रादिनुसार होतो. अज्ञान व रागच, वास्तवत: बंध आहे. ज्ञान इत्यादिसुद्धा, कथंचित् बंधाचे कारण ठरतात. ज्ञानाची कमी बंधात कारण नाही, परंतु तत्सहभावी कर्मच बंधात कारण आहेत. कषायाचा जघन्य अंश, स्वप्रकृतीचा बंध करण्यात असमर्थ असतो, परंतु बंधसामान्य होत असते. भावबंधाच्या अभावात, द्रव्यबंध होत नाही. कर्माचा उदय हा बंधात कारण नसून, रागादि कारण आहेत.'' इतक्या विविक्षांनी विचार केला आहे.

(४) 'द्रव्य व भावबंधाचा' समन्वय साधताना[४], ''हा बंध, मात्र प्रदेशांच्या संबंधाने होत नाही, जीव व शरीराची भिन्नता, जीव व शरीरात, निमित्त-नैमित्तिकपनाही, कथांचित मिथ्या आहे, जीव व कर्मबंध, फक्त निमित्त अपेक्षेने आहे. निश्चयनायाने तर, कर्म जीवाशी बद्धच होत नाहीत. बंधनानंतर, दोन्ही द्रव्यांमधे विभाव परिमणन होते. जीवबंध जाणण्याचे प्रयोजन, बंधाला टाळण्याचे उपाय,' इत्यादि अपेक्षांनी समतोल साधला आहे.

(५) 'बंधाच्या' कारणांमध्ये[५], 'योगस्थानांनाच प्रदेशबंध स्थान' म्हटले आहे.

* 'योगाने प्रकृति व प्रदेश' व 'कषायाने स्थिती व अनुभाग', बंध सांगितला आहे.

* 'द्रव्य-क्षेत्रादिनुरूप पुद्गलस्कंध कर्मरूप परिणमतात. '

* ह्या कारणांमधे, ‘मिथ्यात्व, अविरति, प्रमाद, कषाय, योग’ घेतले आहेत.

* ‘बंधाबाबतच्या’ अन्य अनेक नियमांचा ऊहापोह,’ गुणस्थानानुसार केला आहे.

**बंधव्युच्छित्ति** : ‘कर्मसिद्धांताचा’ विचार करतांना, प्रकर्षाने ‘गुणस्थानविचार’ केला जातो. ‘गुणस्थानानुसार कर्मांचा संवर’ होतो, तसतसा जीव ‘उर्ध्वगमन’ करतो. ‘परिणामांच्या विशुद्धीने’, निरंतर ‘संवर-निर्जरा’ वाढू लागते. ‘परिणामशुद्धीने’ बंधात हानी होते, त्यामुळे ‘उर्ध्वारोहनाला’ सुरवात होते.

‘व्युच्छित्ति’ म्हणजे थांबणे. ‘बंधव्युच्छित्तीचे’ दोन नय आहेत. ‘उत्पादानुच्छेद, ह्यालाच द्रव्यार्थिक नय’ म्हणतात, म्हणजे ‘जेथे सत्त्व आहे तेथेच नाही’ म्हणणे, ह्यालाच ‘उत्पादानुच्छेद’ म्हणतात. ‘अनुउत्पादानुच्छेद पर्यायार्थिक नयाचा विषय’ आहे. ‘जेथे सत्त्व नाही तेथेच नाही’ म्हणणे, ह्यालाच ‘अनुत्पादानुच्छेद’ म्हणतात. अशाप्रकारे बंधव्युच्छित्ति’ कथन केली जाते.

**बंधव्युच्छित्ति आलेख :**

| गुणस्थान | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व्युच्छित्ति | १६ | २५ | ० | १० | ४ | ६ | १ | ३६ | ५ | १६ | ० | ० | १ | ० |
| बंधयोग्य प्रकृति | ११७ | १०१ | ७४ | ७७ | ६७ | ६३ | ५९ | ५८ | २२ | १७ | १ | १ | १ | ० |
| अबंध प्रकृति | ३ | १९ | ४६ | ४३ | ५३ | ५७ | ६१ | ६२ | ९८ | १०३ | ११९ | ११९ | ११९ | १२० |

येथे अत्यंत स्थूल आढावा, सादर केला आहे. ह्याचा विस्तार, ‘कर्मकांडाच्या ग्रंथात केला आहे, बंधाचे अनेक भेद वर्णिले आहे. त्यांच्या परिभाषा येथे दिल्या आहेत.

**(१) सांतरबंध :** ज्या प्रकृतींचा,कालक्षयाने ‘बंधव्युच्छेद’ संभव आहे, त्याला ‘सांतरबंध’ म्हणतात. ‘एक समय बांधून, दुसऱ्या समयात, ज्या प्रकृतींचा बंध थांबतो, त्या ‘सांतरबंधी’ प्रकृति होय’. ह्या प्रकृति ३४ आहेत. (गो.क. ४०४-४०५)

**(२) निरंतरबंधी :** ज्यांचा बंधकाळ, जघन्यसुद्धा ‘अंर्तुहूर्तमात्र’ आहे, त्यांना ‘निरंतरबंधी’ म्हणतात. ‘अंतर्मुहूतात बंध होवून, ज्या प्रकृतीत अंतर पडत नाही, त्या ‘निरंतर बंधी’ होय’. ह्या ५४ प्रकृति आहेत. (गा.क. ४०४-४०७, पं.सं.प्रा. ३१७४ ते १०१)

**(३) ध्रुवबंधी :** जोपर्यंत ‘बंधव्युच्छित्ति’ होत नाही, तोपर्यंत ‘ज्या प्रकृतींचा प्रतिसमय अवश्य’ बंध होतो’ त्यांना ‘ध्रुवबंधी’ म्हणतात. ह्या ४७ प्रकृति आहेत. (पं.सं.प्रा. २/४२-४३, ४/२३७). अभव्यांच्या बंधाला, ‘ध्रुवबंध’ म्हणतात.

**(४) अध्रुवबंधी :** अंतरसहित बंधाला 'अध्रुवबंध' म्हणतात. ह्या ७३ प्रकृति आहेत. भव्यांच्या बंधाला, 'अध्रुवबंध' म्हणतात.

**(५) सादिबंध :** ज्या कर्माचा, 'बंधाचा अभाव' होवून, पुन्हा बंध होतो, त्या बंधाला 'सादिबंध' म्हणतात. (गो.क. १२४; पं.सं.प्रा. ४/२३५-२३६)

**(६) अनादिबंध :** ज्या कर्माच्या 'आदिचा अभाव' असतो, त्याला 'अनादिबंध' म्हणतात.

**(७) भुजगारबंध :** प्रथम समयात 'अल्पबंध' करून, नंतर 'जास्तबंध' करणे, 'भुजगारबंध' होय.

**(८) अल्पतरबंध :** प्रथम समयात 'अधिकचा' बंध करून, नंतर 'अल्पबंध' करणे, 'अल्पतरबंध' आहे.

**(९) अवस्थित बंध :** प्रथम समयात जेवढा बंध केला, नंतरच्या समयातही तेवढाच बंध करणे

**(१०) अवक्तव्यबंध :** 'बंधाच्या' अभावानंतर, 'पुन: बंध' होवू लागणे, 'अवक्तव्यबंध' होय. (गो.क. ४६९, ५६३-५९४);

ह्याचप्रमाणे १४८ कर्मप्रकृतींपैकी, १२० प्रकृति 'बंधयोग्य' असून, २८ प्रकृति 'बंधासाठी अयोग्य' मानल्या आहेत. ह्यात ११ प्रकृति 'अप्रतिपक्षी' असून, अन्य ६२ 'सप्रतिपक्षी' प्रकृति आहेत. 'बंधाच्या प्रकृति' इत्यादि मूळ भेदाचे ही, प्रत्येकी 'उत्कृष्ट, अनुत्कृष्ट, जघन्य अजघन्य' असे भेद दिसतात. अशाप्रकारे 'बंधाचे' वर्णन, खूपच विस्तारपूर्वक केले गेले आहे. त्यातील महत्त्वाच्या अंशांना कथन केले आहे. (तक्ता क्र. ८)

**(२) उत्कर्षण :** जैन दर्शनाप्रमाणे, 'द्रव्य अनादिअनंत' आहेत. त्याप्रमाणे 'जीव व कर्म ' हा बंधही, अनादिपासून आहे. त्यात अनेक 'स्थित्यंतर'' घडतात. कर्मांचा 'स्थित्यनुभाग' वाढवणे, वर करणे ह्याला 'उत्कर्षण' म्हटले आहे. ''नवीन कर्मबंधाच्या कारणाने, पूर्व स्थितीतील कर्मपरमाणुंची स्थिति वाढणे 'उत्कर्षण' होय.'' म्हणूनच 'उत्कर्षणाला बंधानुगामी' म्हटले जाते. त्यात अन्य प्रकाराने, 'प्रदेशरचना' होवू शकत नाही.

**नियमावली :** ह्या 'करणा' बाबत आचार्यांनी नियम सांगितले आहेत[१].

(१) 'उत्कर्षण फक्त बंधाच्या वेळीच होते'

(२) 'ज्या ज्या प्रकृतींची, जेथे बंधव्युच्छित्ति होते, त्या त्या प्रकृतींचे बंध व उत्कर्षणही तेथपर्यंतच नियमाने होतात'

(३) 'संक्रमणसंबंधी ज्या प्रकृतींचे परमाणु, उत्कर्षित केले जातात, ते आपल्या विशिष्ट आवली काळपर्यंत, अवस्थित राहतात. त्यानंतर ते भजनीय होतील वा अवास्थित राहतील व स्थिति इत्यादि वृद्धी-हानी, इत्यादि रूपही होवू शकतात'

(४)‘उत्कर्षण झाल्यावर, अनुभागस्थानाच्या अविभागी-प्रतिच्छेदांची वृद्धी होत नाही. कारण बंधाशिवाय त्यांचे उत्कर्षण शक्य नाही. ’

(५)‘उदयावलीच्या स्थितीच्या प्रदेशांचे व उदयावलीच्या बाहेरच्या सर्व स्थितींचेही उत्कर्षण होवू शकत नाही. काही अपवादात्मक यथायोग्य उत्कर्षण होते’

(६)‘उत्कर्षण सर्व कर्मपरमाणुंचे होत नसून, काहींचे होते व काहींचे होत नाही. ज्यांचे होत नाही, ‘त्याबाबतीत संक्षेपाने कथन आहे’.

* ‘उदयावलीच्या आतस्थित, कर्मपरमाणुंचे उत्कर्षण होत नाही. ’

* ‘उदयावलीच्या बाहेरही सत्तेत स्थित ज्या कर्मपरमाणुंची स्थिति, उत्कर्षणाच्या वेळी, बंधणाऱ्या कर्माच्या, आबाधाच्या बरोबर वा कमी राहिली असेल, त्यांचेही उत्कर्षण होत नाही.’

* ‘ज्या समयप्रबद्धाची शक्तिस्थिति, वर्तमानात बांधलेल्या कर्माच्या अंतिम स्थितिसमान असते, त्या समयप्रबद्धाचे, वर्तमानात बद्ध कर्माच्या, अंतिम स्थितिपर्यंत उत्कर्षण केले जाते. ’

* ‘सर्व प्रकृतीत उत्कर्षण करण होते व १३व्या गुणस्थानपर्यंत हे संभवते’

* ‘उत्कर्षित होणाऱ्या द्रव्याची स्थिति, बध्यमान स्थितिसमान वा हीन असते, अधिक असू शकत नाही. आयुकर्मान बध्यमान आयुचे उत्कर्षण होऊ शकते, परंतु भुज्यमानआयुचे उत्कर्षण होवू शकत नाही.’

* ‘अनुभाग उत्कर्षणात, अंतिम वा द्विचरमस्पर्धक, उत्कर्षित केला जात नाही.’ अनंत स्पर्धक ‘अपसरण’ करून, जघन्य अतिस्थापना व जघन्यनिक्षेप‘ प्रमाण स्पर्धकांना सोडून, जो स्पर्धक प्राप्त होतो तो, ‘उत्कर्षित’ केला जातो. त्याखालील जघन्य स्पर्धकापर्यंत जेवढे स्पर्धक आहेत, त्या सर्वांचे ‘उत्कर्षण’ होते. ‘उत्कर्षण-अपकर्षण’, दोन्हीत ’जघन्य निक्षेप व जघन्य अतिस्थापना, परस्पर समान असतात.

* ‘उदयावलीच्या आत स्थित स्पर्धकांचे उत्कर्षण होत नाही’. ज्या नवीन बंधात ‘उत्कर्षण’ होते, त्याच्या ‘आबाधाप्रमाण’ स्थितीत, ‘उत्कर्षित स्पर्धकांचा’, निक्षेप होत नाही. तात्काळ बंधाला प्राप्त कर्मस्पर्धक, ‘बंधावली काळपर्यंत, उत्कर्षण व अपकर्षण’ दोन्हीस ‘अयोग्य’ असतात.

* ‘जो प्रदेशपूंज, स्थिति वा अनुभागाने उत्कर्षित केला जातो तो, एक आवलीकाळापर्यंत अपकर्षित, उत्कर्षित वा संक्रमित करणे शक्य नसते.’

* ‘उत्कर्षित द्रव्य जेथे दिले जाते, त्याला ‘निक्षेप’ म्हणतात. जेथे वा ज्या स्थितीत, उत्कर्षित द्रव्य दिले जात नाही, त्याला ‘अतिस्थापना’ म्हणतात. ’

* 'ज्या उत्कर्षित द्रव्याची अतिस्थापना, एक आवलीपेक्षा कमी असते, तेथे होणाऱ्या उत्कर्षणाला 'व्याघात उत्कर्षण' म्हणतात.' ज्या ठिकाणी 'एक आवलीप्रमाण अतिस्थापना होते त्या ठिकाणी होणाऱ्या उत्कर्षणाला 'अव्याघातविषयक उत्कर्षण' म्हणतात'. जघन्य युक्तासंख्यात समयाची, एक 'आवली' होते. 'प्रकृतिबंधानंतर, आवली कालमात्र, उदय-उदीरणादि रूप होण्यायोग्य न होणे, ह्याला 'अचलावली वा बंधावली' म्हणतात. ' जेव्हा इतकी स्थिति राहते की, त्यात 'विसंयोजन, उपशम, क्षपण' होवू शकत नाही, त्याला 'उच्छिष्टावली' म्हणतात. 'आबाधाकाळ पूर्ण झाल्यावर, आवलीत येण्यायोग्य समूहाला 'उदयावली' म्हणतात.'लब्धिसार' आदि ग्रंथात, हा विषय, अत्यंत सविस्तरपणे, उदाहरणांद्वारे समजाविला आहे.

**(३) संक्रमण :** 'कर्मसिद्धांतात' महत्त्वपूर्ण असणाऱ्या, 'दशकरणातील' संक्रमण हे 'तृतीयकरण' आहे. 'पुरुषार्थदृष्टीने संक्रमणाचे ' विशेष महत्त्व आहे. 'जीवाच्या परिणामांमुळे, कर्मप्रकृति बदलून, अन्य प्रकृतिरूप होणे, संक्रमण होय'. वास्तविक आगमग्रंथात ह्याचे भेद हे, संक्रमण भागाहार' म्हणवले जातात. उपचाराने ह्यांना 'संक्रमण' म्हटले जाते. ह्यात फक्त, परिणामांची उत्कृष्टता इत्यादिंप्रती, संकेत केला गेला आहे. 'संक्रमणाचा' अर्थ येथे 'परिवर्तन' असा घेतला आहे.

ह्या विषयाचा विस्तार, गो. क. ग्रंथानुसार (पृ. ४०५ ते ४२२) केला आहे. यथायोग्य अन्य ठिकाणी संदर्भही नोंदवले आहेत.

**कथनक्रम :** ह्या करणानुयोगाच्या ग्रंथामध्ये[७], ''लक्षण, सांगून भेद वर्णिले आहेत. ह्या भेदांमध्ये, 'प्रकृति-स्थिति-अनुभाग-प्रदेश, स्वस्थान-परस्थान; फालि-कांडक; उद्वेलन-विध्यात-अध:प्रवृत्त, गुण-सर्व' संक्रमण असे वर्णन आढळते. ह्या पाच संक्रमणाचा क्रम सांगितला आहे.''

**नियमावली :** 'प्रकृतिसंक्रमणात', मूळ प्रकृतींचे संक्रमण होत नाही, कारण 'मूळ प्रकृतींचे प्रदेशाग्र, अन्य मूळ प्रकृतिरूप संक्रमित होत नाहीत. उत्तर प्रकृति संक्रमण उदेलनादि पाच रूप होते.'

(२) 'मिथ्यात्व गुणस्थानात मिथ्यात्वाचे, मिश्र गुणस्थानात मिश्र प्रकृतीचे, चार ते सात गुणस्थानात सम्यक् प्रकृतीचे, दुसऱ्या गुणस्थानात दर्शनमोहनीयच्या कोणत्याही प्रकृतीचे संक्रमण होत नाही.

(३) 'चार आयुंचे, परस्परात संक्रमण होत नाही. '

(४) 'दर्शनमोहनीयचे, चरित्रमोहनीयप्रकृतीत संक्रमण होत नाही. '

(५) 'ज्या प्रकृतीचा बंध होतो, त्याच प्रकृतीचे संक्रमणही होते. '

(६) 'अचलावली काळपर्यंत, संक्रमण होत नाही. संक्रमणानंतर, आवलीपर्यंत प्रकृतींमधे अचलता असते.

(७) 'ज्या प्रकृतींची, परस्परात प्रत्यासत्ती आहे, त्यांच्यात परस्पर संक्रमण होते' उदा. कषायांचे नोकषायात संक्रमण होते.

(८) 'बंधरूप प्रदेशांचे संक्रमणही, १० व्या गुणस्थानापर्यंत होते, म्हणजे स्थितिबंध पर्यंतच संक्रमण संभवते. ८ ते १० गुणस्थानपर्यंत सुरवातीचे सातच करण असतात. त्यापुढे १३ व्या गुणस्थानापर्यंत संक्रमणाशिवाय सहाच करण असतात.'

**पंचभागाहार :** 'कर्मकांड' ग्रंथामधे, 'भागाहार संक्रमणाचे' पाच भेद सांगितले आहेत. हे वर्णन गो.क.नुसार (पृ.४०५ ते ४२२) केले आहे.

**(१) उद्वेलनासंक्रमण :** ''करणपरिणाम म्हणजे, परिणामांची विशुद्धी व संक्लेशाने निरपेक्ष, कर्म परमाणुंचे अन्य प्रकृतिरूप परिणमन होणे वा दोरीचा पीळ उकलावा, त्याप्रमाणे त्याच प्रकृतिरूप होणे, ह्याला उद्वेलना म्हणतात.'' ह्याचा 'भागाहार', अंगुलाच्या असंख्यातावा भाग, म्हणजे 'सर्वात अधिक' आहे. म्हणजे प्रत्येक समयी, 'अत्यंत कमी द्रव्य', ह्या द्वारा परिणमित केले जाते. कारण 'परिणामांशिवाय हळूहळूच कार्य 'होते. 'जी प्रकृति त्यावेळी बांधली जात नाही वा जी बांधण्याची त्या जीवात योग्यता नाही, त्याच प्रकृतींची उद्वेलना होते'. ही 'मिथ्यात्व गुणस्थानातच' होते. ही 'कांडकरूपाने' होते, आणि 'उपान्त्यकांडक' पर्यंतच होते. हे संक्रमण, प्रकृतीच्या 'सर्वहीन निषेकांना परिणमित' केल्यावर होते. प्रत्येक 'कांडक, पल्याचा असंख्यात स्थिति, असणारा असतो.' हे 'अध:प्रवृत्तपूर्वकच' होते. अशा १३ प्रकृति 'उद्वेलनायोग्य' आहेत. त्या प्रकृतींच्या उद्वेलना काळाचे इत्यादींचे, मार्गणादि, विवक्षेने वर्णन केले जाते.

**(२) विध्यात संक्रमण :** 'अपकर्षण विधानात सांगितलेल्या, स्थिति व अनुभागकांडक व गुणश्रेणीरूप परिणामात प्रवृत्त होणे विध्यात संक्रमण' होय. ह्याचा भागाहारही, अंगुलाच्या असंख्यात भाग असून, तो उद्वेलना भागाहाराहून 'असंख्यात गुणाहीन' आहे. म्हणून ह्या संक्रमणाद्वारे, प्रतिसमय खूप 'जास्त द्रव्य' उचलले जाते. 'मिथ्यात्व व मिश्र मोह', ह्या दोन प्रकृतींना, जेव्हा 'सम्यक्प्रकृतिरूपाने' परिणमवतो, तेव्हा हे 'संक्रमण' होते. 'वेदकसम्यक्त्वी' जीवाला तर, सर्वच आपल्या 'स्थितिकाळात', तोपर्यंत होत राहते, जोपर्यंत 'क्षपणा' प्रारंभ करून, 'अध:प्रवृत्त' परिणामाचा, अंतिम समय प्राप्त होत नाही. 'उपशम सम्वक्त्वातही' सर्व काळात, त्याचप्रकारे होत राहते परंतु, येथे प्रथम अंतर्मुहूर्तात 'गुणसंक्रमण' करतो, नंतर काळ समाप्त झाल्यावर, 'विध्यात' प्रारंभ करतो. अशा ६७ प्रकृति 'विध्यात संक्रमणवाल्या' आहेत.

**(३) अध:प्रवृत्त संक्रमण :** 'सत्ताभूत प्रकृतींचे, आपआपल्या बंधासह, संभावणाऱ्या यथायोग्य प्रकृतीत, त्यांचा होणाऱ्या समयातच, प्रवेश करणे, अध:प्रवृत्त होय.' ह्याचा भागाहार, 'पल्याचा

असंख्यातवा' भाग आहे. तो 'विध्यातपेक्षा', 'असंख्यात गुणाहीन' आहे. त्यामुळे प्रतिक्षण ग्रहण केले जाणारे द्रव्य, 'विध्यातपेक्षा खूपच जास्त' असते. 'बंधकाळात वा त्या प्रकृतीच्या बंधाची योग्यता' असतांनाच, 'त्याच गुणस्थानात', हे होते, ज्यात ती प्रकृति 'बंधव्युच्छित्ति' होत नाही. हे थोड्या द्रव्याचे होते, सर्व द्रव्याचे होत नाही, कारण ह्यानंतर, 'उद्वेलना वा गुणसंक्रमण वा विध्यात संक्रमण' सुरू होते. हे नियमाने 'फालिरूप' होते, 'अंतर्मुहूर्तपर्यंत' होते. 'मिथ्यात्व गुणस्थानाला' प्राप्त झाल्यावर, 'सम्यक्मिथ्यात्व व मिश्रमोहनीयाचे ',अंतर्मुहूर्त पर्यंत 'अध:प्रवृत्त संक्रमण' होते. अशा ३९ प्रकृतीत, 'अध:करण संक्रमण' होते. मिथ्यात्व प्रकृतिशिवाय, १२१ प्रकृतींचे अध:करण संक्रमण होते.

**(४) गुणसंक्रमण :** 'प्रतिसमय 'असंख्यात गुणश्रेणी' क्रमाने, परमाणु प्रदेश अन्य प्रकृतिरूप परिणमविणे, याला गुणसंक्रमण' म्हणतात. ह्याचा भागाहारही, 'पल्याचा असंख्यातावा' भाग असला तरी, अध:प्रवृत्तपेक्षा 'असंख्यात गुणा हीन हीन' असतो. त्यामुळे प्रतिसमय ग्रहण केलेले द्रव्य, 'खूपच जास्त' असते. 'उपान्त्य कांडपर्यंत', विशेष 'हानी क्रमाने, द्रव्य उचलले जाते.' येथपर्यंत तर 'उद्वेलना संक्रमण' असते. परंतु 'अंतिम कांडकाची, अंतिम फालिपर्यंत गुणश्रेणी रूपाने ', द्रव्य उचलले जाते. ज्या 'प्रकृतींचा बंध' होत आहे, त्यांचे 'गुणसंक्रमण' होत नाही. 'अबंधरूप' प्रकृतींचे होते व 'स्वजातीतच' होते. 'अपूर्वकरणाच्या' प्रथम समयात 'गुणसंक्रमण' होत नाही. 'अनंतानुबंधीच्या गुणसंक्रमणाला विसंयोजना' म्हणतात. 'मिथ्यात्व व मिश्रप्रकृतीचे गुणसंक्रमण, त्यांच्या क्षपणात' होते. अन्य प्रकृतींचे, 'गुणसंक्रमण' 'उपशम व क्षपक', श्रेणीत होते'

* **गुणश्रेणीत :** 'गुणश्रेणी, अंतरस्थिति, द्वितीया स्थिति' हे तीन पर्व होतात.

* **गुणश्रेणी निर्जराचे :** 'गुणश्रेणीशीर्ष, गुणश्रेणीआयाम, गलितावशेषगुणश्रेणी आयाम व अवस्थित गुणश्रेणी आयाम', हे आवश्यक अधिकार आहेत.

* 'गुण' म्हणजे गुणाकार, 'श्रेणी' म्हणजे पंक्ती होय. 'अपकृष्ट केलेले द्रव्य, सूक्ष्मपासून असंख्यात गुणाक्रमाने, अवस्थितादि आयामात दिले जाणे, ह्याला गुणश्रेणी' म्हणतात.

* 'गुणश्रेणी आयामाचा, अंतिम निषेक म्हणजे, गुणश्रेणिशीर्ष होय.'

* 'उदयावलीच्या बाहेर, गलितावशेषरूप जो गुणश्रेणि आयाम आहे, त्यात अपकर्ष द्रव्याचे निक्षेपण होते.'

* 'वर्तमानसमयापासून, जेथे गुणश्रेणी आयामप्राप्त होतो ते उदयादि होय, त्यात एक एक समय व्यतीत होत होत, एक एक समय गुणश्रेणी आयाम कमी होत जाणे, त्याला गलितावशेष गुणश्रेणी आयाम म्हणतात. '

* 'उदयावलीतून उदयाविषयी एक समय व्यतीत झाल्यावर, वरच्या स्थितीचा एक समय मिसळून, गुणश्रेणी आयामाचे प्रमाण, समय व्यतीत होवूनही, जसेच्या तसे राहतात, त्याला अवस्थित गुणश्रेणि आयाम म्हणतात.'

* ह्यात गुणश्रेणि निक्षेपण विधान, निर्जरा विधान, अन्य स्थितींचे लक्षण वर्णिले आहे. ७५ प्रकृतींचे गुणसंक्रमण होते.

**(५) सर्वसंक्रमण :** 'अंतिम फाळीतील उरलेले सर्व प्रदेशांचे, अन्य प्रकृतिरूप होणे सर्वसंक्रमण होय' ह्याचा भागाहार एक आहे. ५३ प्रकृतीत हे संक्रमण होते.

**(६)आनुपूर्वीसंक्रमण :** 'विशिष्ट क्रमाने, विशिष्ट प्रकृतीतच संक्रमण होणे' हे आनुपूर्वी संक्रमण' होय कषाय नोकषाय कर्मांचे' होते.

**(७) स्तिबुकसंक्रमण :** 'उदयातयेण्यापूर्वी, उदयातयेणाऱ्या प्रकृतीचे, अन्य सजातीय प्रकृतिरूप, संक्रमित होवून उदयात येणे, स्तिबुक संक्रमण होय'.

**(८) फालि :** 'समुदायरूप एक क्रियात, वेगवेगळे खंड करून, भेद करणे, याला फालि' म्हणतात.

**(९) कांडक :** 'एक अंतर्मुहूर्तपर्यंत, संक्रमित करण्यास जे द्रव्य निश्चित केले जाते, त्याला कांडक' म्हणतात.

(गो.क. ३४९, ३५१, ६१३ ते ६१७, क.पा. २/२, २२/१२३/१०५/१, २३७/१२६/२, २४८/१११/६; ल.सा.गा.७५ची टीका, गा. ५८३, १४३, १२८, १४९).

**(४) अपकर्षण :** 'कर्मसिद्धांतातील' दशकरणातील, हे 'चतुर्थ करण' आहे. 'अपकर्षण म्हणजे कमी होणे' होय. आगमानुसार (ध. १०/३), म्हणतात की –

''कम्मपदेसाणं ट्ठिदिणमोवट्टणा ओक्कड्डणा णाम:''

'कर्मप्रदेशांच्या स्थितींचे अपवर्तन होणे अपकर्षण होय.' 'सम्यग्दर्शन ज्ञानचारित्राने स्वयमेव वा तपाचरणादिने', साधक पूर्वेपार्जित कर्मांच्या, 'स्थिति व अनुभागाचा' घात करत उर्ध्वगमन करतो, म्हणून मोक्षमार्गात 'अपकर्षण' चांगले मानले जाते. संसारी जीवांचेही, प्रतिक्षण शुभाशुभ परिणामाने, 'पुण्य व पाप' प्रकृतींचे 'अपकर्षण' होते. हे अपकर्षण, 'साधारण व गुणाकाररूपाने' होते. 'प्रथम भेदाला अपकर्षण व अपसरण' तर 'दुसऱ्या भेदाला कांडकघात' म्हणतात. कारण यामधे, 'कर्मांचे जत्थेच्या जत्थे', एकेका वेळी तोडले जातात. हा 'कांडकघातच', मोक्षाचे साक्षात् कारण आहे आणि हे 'उच्चध्यानस्थ साधकांना' होते.

**कथनक्रम :**

१) 'मोक्षमार्गात' महत्त्वाच्या असणाऱ्या ह्या विषयाचा विस्तार[१], ''सामान्य लक्षण देवून, भेद

कथन केले. ह्यात 'अव्याघात व व्याघात' अपकर्षणाचे स्वरूप कथन केले''

* 'व्याघात अपकर्षणाचे दुसरे नाव कांडकघात आहे'. ह्यात 'स्थितिकांडकघात' होते.

* 'ज्यात स्थितिकांडकघात होत नाही त्याला अव्याघात म्हणतात'.

* 'ह्यातही अतिस्थापना व निक्षेप वर्णन येते.'

२) 'अपकर्षणाची नियमावली' दिली आहे[१०].

* 'बद्धद्रव्याचे एक आवलीकाळपर्यंत अपकर्षण होत नाही.'

* 'अपकर्षणात बंधाची आवश्यकता नसते. उदयावली, सर्व करणांसाठी अयोग्य असल्याने, उदयावलीच्याआत स्थित, कर्मपरमाणुंचे अपकर्षण होत नाही. उदयावलीच्या बाहेर स्थित कर्मपरमाणुंचे अपकर्षण अवश्य होवू शकते.'

* 'उदयावलीच्या बाहेर स्थित कर्मपरमाणुंमधले, 'अप्रशस्त उपशम, निधत्तिकरण निकाचनाकरणरूप' अवस्थांवाले पुद्गल, 'अपकर्षणाला' प्राप्त होत नाही. हे परमाणु 'अनिवृत्तिकरण' परिणामांच्या वेळी, त्याच विवक्षित उदयावलीच्या बाहेरच्या स्थितीत असतानाही, 'अपकर्षण' योग्य होतात.

* 'विवक्षित निषेकांचे अपकर्षण झाल्यावर, निषेक समाप्त होत नाही. मात्र त्या निषेकातील काही परमाणुच अपकर्षित करून, खालच्या स्थितीत दिले जातात. ह्यासाठी अपकर्षण भागाहार होते, ज्याने भाजित निषेकाचे, एक भाग द्रव्यच अपकृष्ट केले जाते.'

* 'कर्मप्रदेशांचे अपकर्षण, स्थिति व अनुभागाच्या मुखानेच होते, अन्य प्रकारे होत नाही. स्थिति वा अनुभागाचे अपकर्षित झाल्यानंतर, दुसऱ्या समयातच पुनः त्या परमाणुपूंजाचे, अपकर्षण इत्यादि प्रवृत्ति होवू शकते. अपकर्षित द्रव्याचे उदयावलीत येणे आवश्यक नाही.'

(३)'आचार्यांनी[११], 'अव्याघात अपकर्षणाचे विधान, स्थान, प्रकृति, स्थितिबंध अपसरण स्थितिसत्त्वापसरण, इत्यादि वर्णन केले आहे.'

(४)'आगमात[१२] 'व्याघात वा कांडकघाताचा' निर्देश करून, घात-विधान स्पष्ट केले आहे.'

* 'कांडकघाताशिवाय स्थितिघात शक्य नाही.'

* 'आयुचे स्थितिकांडकघात होत नाही.'

* 'स्थितिकांडकघात व स्थितिबंधापसरणात अंतर आहे.'

* 'अनुभाग कांडकघात विधान सांगून, अनुभागकांडकघात व अपवर्तनघात अंतर सांगितले आहे.'

* 'शुभप्रकृतींचा अनुभागघात होत नाही. प्रदेशघाताने स्थिति घटते, पण अनुभाग घटत नाही.'

* ‘स्थिति व अनुभाग-घातात, परस्परसंबंध स्पष्ट केला आहे.’

* ‘प्रतिभग्न झाल्याच्या प्रथम समयापासून, अंतर्मुहूर्तकाळ व्यतीत होईपर्यंत, अनुभाग कांडकघात शक्य नाही.’

* ‘स्थितिघात झाल्यावरच, सर्व आयुंचा अनुभागाचा नाश होतो. आयुसोडून अन्य कर्मांच्या, अनुभागनाशाशिवाय ही स्थितिघात होतो.’

**(५) उदीरणा :** ‘कर्मसिद्धांतातील’ अत्यंत महत्त्वपूर्ण, ‘दशकरणातील’ हे ‘पाचवे करण’ होय. ‘कर्माच्या उदयाप्रमाणेच, कर्मफळांच्या व्यक्ततेला उदीरणा’ म्हणतात. ‘विशिष्ट क्रिया वा अनुष्ठान विशेषांद्वारा’, कर्माला वेळेपूर्वीच पक्व केले जाते. ‘अपकर्षणद्वाराही’ वेळेपूर्वीच उदयात आणले जाते. त्यानुसार ‘अपक्व पाचनाला उदीरणा’ म्हणतात. ‘कर्मबंधानंतर, कर्मस्कंध आवलीकाळपर्यंत, उदीरणा योग्य नसल्याने, तदवस्थ राहतात’.

**कथन :** ह्या विषयाचे कथन करताना[१३] ‘‘लक्षण सांगून, भेद कथन केले आहेत. ‘जे महान स्थिति व अनुभागात स्थित कर्मस्कंध अपकर्षण करून, फळ देण्यायोग्य केले जातात त्याला उदीरणा’ म्हणतात. कषायांच्या उदयाने, उदीरणा झाल्यास तीव्र परिणाम उत्पन्न होतात’’, असा विस्तार केला आहे.

**नियमावली[१४]:** ‘बंधावली काळ व्यतीत झाल्यावर, अपकर्षणद्वारा, त्याचे जे द्रव्य उदयावलीत दिले जाते त्या कर्माला उदीरणा म्हणतात.’

(२)‘उदीरणेतही, उदयवत् फलदानाची प्रधानता आहे. त्यात यथाकाल व अयथाकाळ हा भेद आहे. ही उदीरणा उदीयमान कर्मांचीच होते.’

(३)‘जेवढ्या प्रकृतींची, जेथे उदय-व्युच्छिति होते, त्याच्या पुढच्या गुणस्थानात उदयाप्रमाणे, उदीरणाचाही अभाव होतो. जेथे जेथे, ज्या ज्या प्रकृतीचा, उदय असतो. तेथे तेथे, त्या त्या प्रकृतीची उदीरणाही अवश्य होते’

**(६) सत्त्व :** (गो.क.पृ. ३०५ ते ३३६) दशकरणातील ‘सत्त्व’, हे सहावे ‘करण’ होय. ह्याचा सामान्य अर्थ ‘अस्तित्व, गुण, प्रकृति’ इत्यादि केला जातो. ह्या ‘कर्मसिद्धांत’ प्रकरणात, ह्याचा अर्थ ‘कर्मांची सत्ता’ घेतला जातो. ‘एकदा बंध झाल्यावर, जो पर्यंत उदयात येवून, विवक्षित कर्माचे निषेक, पूर्णरूपाने निर्जरित होत नाहीत, तोपर्यंत त्या ‘कर्माची सत्ता’ म्हटली जाते’.

**कथन :** ह्या विषयाचा विस्तार करताना[१५], ‘’त्याचे लक्षण, अस्तित्व अर्थाने जीवाच्या अर्थाने, कर्मसत्ता अपेक्षेने, उत्पन्न व स्वस्थान सत्त्वाच्या लक्षणरूपाने, वर्णिले आहे. त्याच्या सत्त्वयोग्य प्रकृतींचा निर्देशही केला आहे.’

* उदयागत कर्म नियमाने फळ देते, परंतु ‘बंध व सत्त्व अवस्थाप्राप्त कर्म, फळ देत नाहीत.

बंधानंतर दुसऱ्या समयापासून, 'निर्लेपण' म्हणजे, 'क्षपणाच्या' अंतिम समयापर्यंत, 'सत्कर्म वा सत्त्व' म्हणवला जातो.

* 'सत्त्वाचे' कारण, 'बंधच' आहे आणि 'सत्त्वरूप कार्य उदयाचे कारण' आहे. जीवाच्या वर्तमानकालीन विकारी पर्यायांचे कारण, 'उदयकरण' आहे, तसेच 'उदयकरण' हे, 'सत्त्वकरणाचे' कार्य आहे.

* 'सत्व', स्वयं कधीच फळरूप होत नाही, जीवाला फळ, फक्त 'उदयकरण' देतो.

* हे सत्त्व, 'प्रकृति, स्थिति, अनुभाग, प्रदेश'रूप असते.

* 'ज्ञानावरणीयच्या' पाच प्रकृतींचे 'सत्त्व', सर्व संसारी जीवांमधे, १२व्या गुणस्थानापर्यंत असते. 'साता असाताचे' सत्त्व, १३व्या गुणस्थानपर्यंत असते. अशाप्रकारे सर्व कर्मांच्या 'स्थितीचा' उहापोह केला आहे.

**(७) उदय :** (गो.क. २२६ ते ३०२ पृ.) 'कर्मसिद्धांतात', अत्यंत महत्त्वाचे असणारे, असे हे 'सप्त करण' होय. जीवाचे 'पूर्वकृत' जे शुभाशुभ कर्म, त्याच्या 'चित्तभूमीवर' अंकित आहेत, ते आपआपल्या वेळेवर 'परिपक्व दशेला' प्राप्त होवून, जीवाला फळ देवून निर्जरित होतात. त्यालाच 'उदय' म्हणतात. कर्मांचा उदय, 'द्रव्य-क्षेत्र-काल-भावाच्या' अपेक्षानुसार होतो. कर्मांच्या उदयात जीवाचे परिणाम, त्या 'कर्मप्रकृतिनुसारच' नियमाने होतात.

**कथन :** ह्या विषयाचे कथन करतांना, त्याचा विस्तार[१६], ''अनेक अपेक्षांनी उदयाचे भेद सांगून केला आहे. हा उदयानुभव स्वमुख वा परमुखाने होतो. हा उदय सविपाक, अविपाकरूप असतो. द्रव्यकर्मोदयाचे लक्षण कथन केले आहे. भावकर्माचेही लक्षण वर्णिले आहे. उदयस्थानाचे लक्षण, सामान्यउदययोग्य प्रकृति, ध्रुवोदयी प्रकृतीचे वर्णन केले आहे.'' असा केला आहे.

**नियम[१७] :** (१) फळ दिल्याशिवाय, 'कर्म निर्जरित' होत नाहीत, त्याला कोणी अडवू शकत नाही. 'उदयावलीत' प्रविष्ट कर्माचे, 'स्वपर मुखाने' उदय होणारच. म्हणून संसारात, 'उदित कर्मांचाच' सर्व खेळ आहे. 'अबुद्धिपूर्वक रागादिभाव, जीवप्रदेशांचा संकोच विस्तार, चालणे, बोलणे इत्यादि, ज्ञान अज्ञान,' सर्व कर्मोदय निमित्ताने होते.

(२)मूळ प्रकृतींचा, 'स्वमुखानेच' उदय होतो. उत्तरप्रकृतींचा, 'परमुखाने उदय' संभवतो. विवक्षित 'सर्वघातींच्या' उदयासह, त्याच्याच 'देशघातीचा' उदय होवू शकतो. परंतु 'देशघातीच्या उदयासह', सर्वघातीचा उदय होवू शकत नाही.

(३)एका जीवात, एका भवात, एकच 'गति, आयु, आनुपूर्वीचा' उदय संभवतो.

(४)'देवगतीत उच्चगोत्राचाच' तर, 'नारकी, तिर्यंचात, नीच गोत्राचाच' उदय असतो.

(५)तीर्थंकर प्रकृतीचा उदय, १३ पासून १४व्या गुणस्थानाच्या अंतपर्यंत असतो.

(६)एका समयात, एकच 'कषायाचा' उदय असतो.

**(८) उपशम :** 'दशकरणातील', आठव्या क्रमांकाचे हे 'करण' होय. 'कर्मांच्या उदयाला काही काळासाठी अडवणे उपशम होय.' ह्यात कर्मांच्या 'उदयाचा अभाव' असल्याने, त्या काळापर्यंत जीवाचे परिणाम 'अत्यंत शुद्ध' असतात. परंतु त्या विशिष्ट्य वेळेनंतर, 'कर्म पुन्हा उदयाला येतात व जीव परिणाम बिघडतात.' 'उपशमकरणाचा' संबंध मात्र, 'मोहनीय कर्म व तज्जन्य परिणामांशीच', आहे, ज्ञानादि अन्य भावांशी नाही, कारण 'रागादि विकारांमधे, क्षणिक उतार-चढाव' संभावतात. 'कर्मांच्या दबण्याला उपशम व त्याने उत्पन्न जीवाच्या, शुद्ध परिणामांना औपशमिक भाव म्हणतात.'

**कथन :** आचार्यांनी[१८] लक्षण कथन केले आहे.

**(१) सदवस्थारूप उपशम :** 'भविष्यकाळी उदययोग्य कर्मपरमाणु, उदीरणेला अयोग्य होणे, याला 'सद्वस्थारूप उपशम' म्हणतात. येथे 'सत्ता हाच उपशम' होय. अनुदयप्राप्त सर्वघाति स्पर्धकांची, सत्तारूप अवस्था असते.'

**(२) प्रशस्तोपशम :**'अध:करण, अपूर्वकरण, अनिवृत्तीकरण, ह्या परिणामांद्वारा, जी मोहनीय कर्माची उपशमना होते, त्याला 'प्रशस्तोपशमना' म्हणतात.'

**(३) अप्रशस्तोपशम :** 'कितीतरी कर्मपरमाणुंचे, बाह्य-अंतरंग कारणवश, उदीरणाद्वारा, उदयात अनागमरूप अवस्थेला, 'अप्रशस्तोपशमना' म्हणतात. '

**(४) अंत:करणरूपउपशम :** 'भविष्यकाळासाठी उदयाला येणाऱ्या कर्मपरमाणूंच्या, निषेकमालिकेत अंतर पडणे, म्हणजे विशिष्ट काळातील कर्मपरमाणूंचे, मागे पुढे होणे, ह्याला 'अंतरकरणरूप' उपशम म्हणतात'. हा फक्त मोहनीय कर्माचाचा होतो.

* 'दर्शनमोहनीय, चारित्र मोहनीयच्या', उपशमाचे विधान सविस्तर वर्णिले आहे.

* जेवढ्या काळातील 'निषेकांचा' अभाव होतो, तो काळ म्हणजे 'अंतरायाम' होय.

* नवक प्रबद्धाचे एक आवलीपर्यंत ''उपशम'' शक्य नाही.

**(९) निधत्ति-निकाचित :** (गो.क.पृ. ४३५ ते ४३५) : कर्मकांडात 'दशकरण' अधिकारात, 'निधत्ति निकाचित' शब्दांचा प्रयोग आढळतो. हे 'जैनांचे पारिभाषिक' शब्द आहेत. 'करणानुयोगात' हा 'निधत्त शब्द', कर्मांची एक 'अवस्थाविशेषाचा' वाचक आहे. ज्या कर्मांचा, 'उदय व संक्रमण' होवू शकत नाही, त्याला 'निधत्त' म्हणतात. ही कर्मावस्था, 'आठव्या' गुणस्थानापर्यंतच असते. त्यानंतर 'निधत्तिस्वरूप' कर्मही, 'अनिधात्तिरूप' होतात.

* जो कर्मपदेश, 'अपकर्षण, उत्कर्षण, संक्रमण, उदय', योग्य नाही, त्याला 'निकाचित म्हणतात. ह्याचे सुद्धा, 'प्रकृति' इत्यादिरूप चार भेद सांगतात. ही कर्मावस्था, 'अपूर्वकरण

गुणस्थानपर्यंतच' असते. 'अनिवृत्तिकरण' परिणामद्वारा 'निकाचितकरण' संपते व सर्व कर्म 'अनिकाचितरूप' होतात. कर्मप्रृतींचे, 'निकाचितरूप प्रदेशाग्र ', खूप असतात. 'मिथ्यात्व' इत्यादि प्रकृतींचे, 'निकाचित' इत्यादि अवस्थाप्राप्त हे प्रदेशाग्र, 'जिनदर्शन' इत्यादि पुण्यातिशय कार्याने, 'अनिकाचितादिरूप' होतात. (ध.पु.६ पृ. ४२७-२८) जिनबिंबाच्या दर्शनाने 'निधत्त-निकाचितरूप ही, मिथ्यात्व इत्यादि कर्मकलापांचा' क्षय होतो. 'जिनदर्शनाने पापसंघातरूपी, घातिकर्माचेही खंड खंड होतात. (ध.पु.१०पु.२८९) 'जिनपूजा, वंदना, नमस्काराने' पुष्कळ कर्मप्रदेशांची निर्जरा मानली आहे. (मू.आ. ७-९ )

* 'उपशम, निधत्त, निकाचित', ह्या तीन करणांचा, 'जघन्यकाळ एक समय' व 'उत्कृष्टकाळ संख्यात सागर' प्रमाण आहे कारण, 'शक्तिस्थितिपेक्षा' अधिक काळ ते थांबू शकत नाही. 'निधत्त व निकाचित' प्रदेश, उत्कृष्टतः सुद्धा, सर्वकर्म प्रदेशांच्या 'असंख्यातावा' भाग प्रमाण असतात.

अशाप्रकारे 'करणानुयोगांतर्गत' ग्रंथांमधे, 'दशकरणाचा' विस्तृत उहापोह आढळतो. त्या 'दशकरणाच्या' स्वरूपाची स्थूल ओळख व 'नियमावलींचा' स्थूल आढावा घेतला आहे. मात्र ह्या विषयाचा निरंतर 'अभ्यास, चिंतन, चर्चा, चिकित्सा' करून, ह्या अवघड विषयाला जाणण्याचा प्रयत्न केला. ह्या सर्व प्रयत्नांमधून, दृष्टीगोचर झालेला 'पुरुषार्थ' सविस्तरपणे वर्णन केला आहे.

**'दशकरणांमधे पुरुषार्थाचे स्थान' वा 'पुरुषार्थावर स्थित कर्मसिद्धांत' :**

(१) हा संसार 'कर्मप्रधान' आहे. 'मन वचन कायेने' होणाऱ्या, 'ज्ञातृत्व, भोक्तृत्व, कर्तृत्व', सर्व प्रवृत्ति 'कर्म' आहेत. हे 'कषाययुक्त' असल्यास, त्याला 'भावकर्म' म्हणतात. त्या निमित्ताने परमाणुद्वारा निर्मित 'द्रव्यकर्म' येते. शरीर इत्यादिरूपाने 'नोकर्म' असते. कर्मसिद्धांतात 'कार्मणशरीर' नावाचे, हे शरीरच प्रधान आहे. 'कारण-कार्य' संबंधाने, वरचे तीन प्रकार आहेत. हे 'कार्मणशरीर' जड असले तरी, 'चेतनेमुळे' होणाऱ्या कर्मसंस्कारांनी ते, 'चेतनवत्' प्रतित होते. अर्थात, कर्मसिद्धांतात 'द्रव्यकर्माला' प्राधान्य दिले नाही कारण, ते 'बंधनकारी' नाही. दर्शनशास्त्रात, 'स्निग्धरूक्षत्वाद्‌बंध' तर, आचार शास्त्रात 'रागद्वेषत्वाद्‌बंध' म्हटले जाते. 'रागद्वेषाशिवाय' बंध शक्य नाही. करणानुयोगात 'द्रव्यकर्माच्या' प्रधानतेने वर्णन असते तर, आध्यात्मशास्त्रात, 'चित्तगत संस्कारांच्या' प्रधानतेने विवेचन असते. ह्या संस्कारांचे अंकन, 'द्रव्यकर्म वा कार्मणशरीरावर' होते. ''प्रतिसमय होणाऱ्या कर्मांचा संस्कार, द्रव्य वा कार्मणशरीवर, वेळोवेळी अभ्यासाने दृढ होणारी सवय म्हणजे 'बंध' होय.'' दशकरणांमधे सर्वात महत्वाची 'बंधप्रक्रिया' आहे. संसारात 'द्वंद्व' बरोबर चालतात. 'बंध' आहे म्हणून, 'मोक्षाचे' स्थान आहे, किंबहुना 'बंध आहे तेथेच मोक्ष' आहे. 'बंधामुळेच मोक्षाचे' महत्त्व आहे.

* अनादिकाळापासून घडणाऱ्या ह्या, 'संश्लेषबंधाने', मूळपदार्थ 'विजातीयरूप' धारण करतो., मात्र आपला 'स्वभाव' कधीच सोडत नाही. 'बंधानंतरही' असणारी ही, 'स्वतंत्रताच पुरुषार्थाचा आधार' आहे. कारण कोणतेही शुद्ध द्रव्य, 'सदैव एकच, स्वचतुष्ट्यात्मक, स्वप्रदेशप्रमाणच, शुद्ध गुणरूपाने' असतेच. पुद्‌गलाचीही 'परमाणु' ही, 'शुद्ध पर्याय' आहे. परंतु 'कार्मणशरीर वा कर्म' ही, 'स्कंधात्मक' अशुद्ध पर्याय आहे. शिवाय ती 'जीवाद्वारे निर्मित' आहे, म्हणूनच 'कर्मांवर' जोर चालू शकतो. कारण 'निर्मिती ही निर्मात्यापेक्षा' श्रेष्ठ असू शकत नाही. ह्या 'बंध प्रक्रियेत' जबाबदार, 'आसक्ति व मोह, असावधनाता' आहे. तेथे कथंचित् 'परवशता' संभवते. ह्या 'बंधाला' थांबवण्यात महत्त्वाचे म्हणजे, 'वर्तमानातील पुरुषार्थ व कर्मबंधाची प्रक्रिया आहे' व हे दोन्ही 'स्वाधीन' आहे.

* अनादिकाळापासून अविरत चाललेल्या ह्या प्रक्रियेत, प्रतिसमय 'बंध व उदय' आहेच. उदयागत कर्म, 'कृती करण्याची प्रेरणाही' देतात. अज्ञानाने, 'आसक्ति व रागद्वेषमोह' अधिकच प्रोत्साहित केले जातात. मात्र 'अंतरात्म्याचा आवाज' कोणतेही कर्म दाबू शकत नाही. म्हणून वर्तमानातला, 'सम्यक् पुरुषार्थ, अरिहंताप्रति श्रद्धान, धर्मरुचि, दया, करुणा', इत्यादि जीवाधीन आहे. सतत 'शुभोपयोग' हाच, वर्तमानातला 'सम्यक् पुरुषार्थ' आहे.

* ह्या उपायात, 'कर्मबंधाला' जाणणे सर्वात महत्त्वाचे आहे. कर्मबंधाची 'अज्ञानता' कर्मबंध वाढवतात. 'पुरुषार्थ व ज्ञानाने ' ही प्रक्रिया बदलली जावू शकते. 'बंध प्रक्रियेचे सम्यक्ज्ञान, पुरुषार्थाला' योग्य दिशा देणारे आहे. 'जैन धर्म कोणत्याही' एकाच समवयाचा पुरस्कार करत नाही', मात्र 'व्यक्ति-स्वतंत्रता, व स्वावलंबनावर', ते भर देणारे आहे. 'कर्म कसे, किती, केव्हा, कोणते करायचे'', हा 'पुरुषार्थाधीन' भाग आहे. 'बद्ध कर्म, योग्य काळी उदयाला येवून, फळ देणारच' हे सत्य आहे. मात्र -

♦ अ) ते कर्म 'मला हवे तसे फल देणार नाही व जसे 'बांधले तसे' भोगण्याचे बंधनही' जीवावर नाही. 'अज्ञानतेने, पुरुषार्थ हीनतेने, मोहाचे वर्चस्व वाढल्याने परवशता' येते व त्याने कर्मबंध होतो. मात्र 'अज्ञानाने बद्ध कर्म, अज्ञानातच, अज्ञानानेच भोगावे', हा नियम नाही. ते 'ज्ञानपूर्वकही' भोगता येते. जर कर्मांना बांधणारा 'जीव' आहे तर, वर्चस्वही 'जीवाचेच' आहे. कर्म ही 'जीवाची कृती', आहे व त्यांचा 'स्वामीही जीवच' आहे, ही खात्री 'पुरुषार्थाचा प्रारंभ' आहे.

♦ आ) कर्म फळ देण्याच्या एक क्षण आधीपर्यंत, 'जीव परिणामांचा' प्रभाव चालू शकतो, उदयात येण्याच्या एक समयपूर्वीही, त्याचा 'रस, स्वाद', बदलून फळ बदलता येते. जर 'योगद्वारा' कर्मांना अर्जित केले तर, 'भावना, विचार, परिणामांना' बदलून, त्यांची 'शक्ती' नष्ट करता येवू शकते, 'योगद्वारांना' बंद करता येते, त्यांची 'स्थिति, काळ, शक्ती', हवे ते 'परिवर्तन'

करता येते, हा विश्वासच 'पुरुषार्थ ' आहे.

♦ इ) कर्म हे 'कार्य' आहे, 'एकसमयवर्ती' आहे, 'पर्याय' आहे. जी 'उत्पाद-व्ययात्मक' आहे. म्हणजे 'कर्म नष्ट' होणारच. शिवाय ते 'कर्म अशुद्ध आहे, निर्मित आहे, कृत्रिम आहे, निमित्ताधीन' आहे, म्हणजे अनादिपासूनची 'जीवाची अवस्था अशुद्ध' आहे, 'निमित्तांमुळे आहे व जीवाच्या विभावामुळे' आहे ही, खात्री 'पुरुषार्थ प्रेरक' आहे. इतरांवर 'दोषारोपण' करणे वा कर्मांचा 'उगाच बाऊ' करणे , त्यांची 'व्यर्थ भीती' वाटणे, हे थांबण्यास मदत होते. शिवाय कर्म हे 'पर्याय' आहे म्हणून, नष्ट होणारच हा दिलासा 'पुरुषार्थाचा आधार' आहे. 'मी कर्मांचा विधाता आहे तर, भोगणे वा न भोगणे हे ठरविण्याचा आधिकारही माझाच आहे ', हीच 'कर्मावरची जीवाची' पकड आहे. हाच 'बंधात गर्भित पुरुषार्थ' आहे. 'वर्तमान पुरुषार्थ व कर्मबंध प्रक्रियेचे सम्यक ज्ञान', ह्या दोन 'स्वाधीन' गोष्टी आहेत तर, 'त्यांना वाढवणे, दिशा बदलणे, निवडीचा अधिकार, हेय-उपादेयाची जाण', हा खरा 'पुरु षार्थ' आहे. 'कर्म वा भाग्य वा परमेश्वर, कशावरही विसंबून न राहणे वा व्यर्थ दोषारोपण वा तक्रार न करणे, हा पुरुषार्थ' आहे.

२) ह्या 'निमित्त-नैमित्तिक' खेळात, जीवाच्या 'योग-उपयोगाच्या अपराधाने, विपरीततेने, हा बंध-उदयाचा' खेळ चालू आहे. 'समता-शमतारूप' मूळ स्वभाव सोडल्याने, ज्ञाताद्रष्ट न राहिल्याने, हे चक्र चालू आहे. मात्र हे सर्व 'निमित्ताधीन' आहे. त्या निमित्तालाच, 'सर्वस्व, प्रभावी, बलशाली' मानल्याने, 'कर्मांची धास्ती घेवून, आगतिकता' आलेली दिसते. त्यामुळे 'उपादानशक्तीकडे' लक्ष जात नाही व 'पुरुषार्थाला' खीळ बसते. मात्र 'अज्ञानतावश बद्ध, सत्तेतील कर्मांवर जीवाचा सर्वथा वश' असल्याने, 'पुरुषार्थ' नष्ट झाला नाही कारण -

अ) ते 'फळ देईपर्यंत, फळ देण्याची तयारी करतांनाही,' त्यात 'बाधा व विघ्न' जीव आणू शकतो. त्या 'संस्कारांनाही' नष्ट करण्याची ताकद जीवात आहे. त्यांचा 'अनुभाग, स्थिति' कमी करता येते, 'परिवर्तनही' होवू शकते. चांगल्या कर्मांची 'शक्ती व काळ', वाढवता येवू शकतो. 'दिशा व तीव्रता' बदलता येते.

आ) कर्म फळ नेहमी, 'द्रव्य-क्षेत्रादि' नुसारच देतात. ह्या 'द्रव्यादि चतुष्टयांच्या परिवर्तनाची', कला शिकणे महत्त्वाचे आहे. पुण्योदयाने आज, 'सर्व अनुकूलता, शक्ती, ज्ञान, बुद्धी, सामर्थ्य, स्वास्थ्य, विवेक, उत्तमजन्म, देह, संत समागम', सर्व प्राप्त आहे तर आजच, भविष्यात उदयाला येणाऱ्या कर्मांनाही जीव भोगून नष्ट करू शकतो. 'संचित कर्मसत्तेतून' पुष्कळ कर्म नष्ट करू शकतो. 'अधिक जागरूकतेने आसक्ति, कषाय' दूर करता येवू शकते. 'धर्मध्यान वाढवून, समता, साधनेने', कर्माला उपशमित, उदीरित करण्याचे, 'सामर्थ्य वा पुरुषार्थ ' जीवाचा आहे.

♦ इ) कर्माच्या 'उदयाचे' रडगाणे वा भीतीही योग्य नाही. कारण 'उदय', जीवाचे बरे-वाईट

न करता, त्या 'उदयात' जीवाची, 'आसक्ति' बरे वाईट करणारी आहे. त्यासाठी 'उदयात सामंजस्य, बाह्यवातावरणाशी ताळमेळ, प्रतिक्रियांचा अभाव, प्राप्त सामग्रींचा सदुपयोग, कर्तव्यांचे निरपेक्ष पालन, धर्माचरण, सकारात्मकता, दक्षता, शुभातप्रवृत्ति, शांतभाव, शुभसंकल्प', हाच उपाय आहे. श्रावकावस्थेत हाच 'उत्कृष्ट उद्‌म' आहे. 'कर्मबंधाच्या' ह्या अनादि संतान प्रवाहात, कोणाचीही गरज नाही. हे 'स्वयमेव होते, स्वयंसिद्ध आहे' मात्र, ह्याचा विच्छेद शक्य आहे कारण, 'मुमुक्षुंना मोक्षाचे द्वार' कधीच बंद होत नाही, त्या, 'पुरुषार्थाचा मार्ग' सदैव खुला आहे.

♦ ३) जीव ज्या भावाप्रमाणे, ज्या 'तीव्रतेने' बंध करतो, त्याच 'तीव्रतेने उदयाला' येण्याचा नियम नाही. 'बंध व उदयात सत्तेची दरी' आहे. ह्या सत्तेत, प्रतिक्षण, 'परिणामांनुसार, समतायुक्त तपाने हवे ते व हवे तसे परिवर्तन' घडू शकते. 'सत्तेतल्या' ह्या कर्मांना 'संक्रमण, अपकर्षण, उत्कर्षणाच्या', परिवर्तनातून जावे लागते. जे परिणाम 'बंधात' कारण असतात, तेच ह्या 'तीन परिवर्तनांना' कारण ठरतात. 'तप, व्रत रूप द्रव्यउद्दम व समता, शमता, ध्यानरूप भावउद्दमाने', कर्मांची प्रकृति बदलते, स्थिति- अनुभागात 'हानी-वृद्धी' होते. करोडो करोडो वर्षांची 'स्थितिनष्ट' होते. 'समतापूर्वक, सम्यक् तपाने, अंतरंगशक्तीचा विकास करून, ज्ञाता-द्रष्टा बनण्याच्या साधनेने', हे तीन परिवर्तन सत्तेत घडतात. ज्यामुळे 'उदयात' येईपर्यंत, कर्म पूर्ण 'परिवर्तितरूप' होवून उदयाला येतात.

४) अधःप्रवत्त इत्यादि तीन करणांद्वारा, ह्या 'अनादिप्रवाहाला' छेद दिला जातो. 'उर्ध्वगमन' सुरू होते. ह्या 'साधनेने', सत्तागत कर्मात 'संक्रमणादि' होत राहते. ह्यात निरंतर वृद्धी झाल्याने, हेच 'संक्रमणादि उपशमादिचे' रूप धारण करतात. ह्या 'पुरुषार्थाने' काही काळ कर्म दाबले जातात. हा 'उपशम मोहनीय कर्माचाच' होतो. 'तत्त्वदृष्टी' जागृत झाल्याने, 'समताशमतारूप अनुभूतीने', ही उदयाची श्रृंखला खंडित होते व क्षणमात्र का होईना, जीवाला 'स्वानुभूती' होते. त्याचा 'स्वाद' तो जीव अनुभवतो. 'उपशम म्हणजे विशेष रूपाने, अपकर्षन व उत्कर्षाचे फळच आहे'. त्यानंतर पुन्हा 'कर्माचा उदय' निश्चित असतोच. मात्र कधी, 'आंशिक उदय व आंशिक उपशमरूप' 'क्षयोपशम' होते तर, कधी 'पुरुषार्थाने' त्यांचा क्षयही होतो. हा 'चढउताराचा प्रयत्न' बराच काळ चालू राहिल्यावर, शेवटी 'साधक' पुरुषार्थाने, पूर्ण 'जागृतावस्था' प्राप्त करतो. कारण ह्या अद्‌भूत अनुभवानंतर, पुनःपुनः त्याचा अनुभव घेतला जातो. 'पुरुषार्थाला' अधिकच प्रेरणा मिळते. पुन्हा पुन्हा 'समतेचा प्रयास' केला जातो. त्या 'तप साधनेने' विघ्न दूर होतात, सत्तेचे उन्मूलन होते. 'उत्कृष्ट पुरुषार्थाचा' प्रयास सुरू होतो.

♦ ५) 'कर्मसिद्धांतात' म्हणूनच, 'जीव परिणाम व ह्या दहा अवस्था' महत्त्वाच्या आहेत. हे सर्व 'एकाच समयात, होत असते. ह्यात तीन गोष्टी महत्त्वपूर्ण ठरतात. त्या म्हणजे 'परिणाम-

बंध- उदय' यात 'परिणामाने बंध, बंधाने उदय, उदयाने परिणाम' हे विकल्प होतात. 'प्रथम व तृतीय' विकल्प सत्य असला तरी, दुसरा विकल्प 'शंकास्पद' आहे. कारण 'बंधानुसारच उदय' शक्य नाही. 'उदय' सदैव सारखा नसतो. 'उदय' हा 'पाप-पुण्यमिश्रित' असतो व त्या मिश्रणाने, 'भोगासक्तीच' अधिक आढळते. 'तीव्रपापोदयात मोक्षपुरुषार्थाची जागृतीच' नसते, कारण ज्ञानाचा 'क्षयोपशम नाही, विवेक' नाही. 'पुण्योदयाने उदयात मंदता' आली, व 'इच्छा व सम्यक् पुरुषार्थ' झाला, तरच वाटचाल सुरू होते. प्रथमावस्थेतला हा 'अव्यक्त पुरुषार्थ' हळूहळू व्यक्त होवू लागतो, त्यालाच 'पंचलब्धि' म्हणतात. कर्मोदयाच्या अखंड प्रवाहातही, ही संधी 'स्वयमेव' प्राप्त होते. ह्या प्राप्त संधीने 'विवेक व पुरुषार्थाने बुद्धिविकासरूप क्षायोपशमलाब्धि' लाभते. 'विशुद्धिलब्धिने हृदय शुद्धीकरणाची' संधी मिळते. त्या 'विशुद्धीने गुरुकृपेने देशनालब्धि' लाभते. त्यामुळे 'सत्तेत स्थित्यंतर'' घडू लागतात. क्रमश: 'विशुद्धी वाढते, 'संसारस्थिति घटणेरूप प्रायोग्यलब्धि' प्राप्त होते. शेवटी 'पुरुषार्थ प्रकर्षाने 'करणलब्धिद्वारा तात्त्विक रहस्याला स्पर्श' होतो त्याने अधिकाधिक, 'संक्रमणादि, गुणश्रेणीनिर्जरा' घडू लागते. अत्यंत निर्मलता प्राप्त होते. 'निधत्ति-निकचित' सारख्या कर्मांच्याही, 'दशा व दिशा' बदलतात.

♦ ६) ह्या साठीच कर्मांच्या ह्या 'अवस्थांचे ज्ञान' करणे गरजेचे आहे. कर्मांची 'चिंता न करता, चिंतनाचा पुरुषार्थ' महत्त्वाचा आहे. 'स्व अस्तित्व, स्वातंत्र्य, स्वभाव व शक्तिवर', पूर्ण विश्वास व त्याचे 'सम्यक्ज्ञानच खरा पुरुषार्थ' आहे ह्या 'अवस्था व परिणाम' एका समयात होतात पण, 'सम्यक्रूप जाणणे हेच स्वाधीन' आहे. 'शास्त्राभ्यास, तत्त्वदृष्टी, तत्त्वनिर्णय, आत्मसन्मुखता, शुद्धात्मभावना', हाच स्वाधीन 'पुरुषार्थ ' आहे. त्यानेच 'सत्तेत स्थित्यंतरे' स्वयमेव घडणार आहे. ह्या अवस्थांना जाणून विश्वास होतो की, 'जीवच बलवान आहे, अन्यथा ह्या अनादिभ्रमणात कर्मसंपर्काने जीवच पुद्‌गल झाला असता' पण तसे न होता 'मी होते, मी आहे, मी असेन', हा दृढविश्वास आगामी 'पुरुषार्थाचा' पाया आहे. 'निमित्त, परद्रव्य, संयोगांनाच' श्रेष्ठ मानणारे, 'पुरुषार्थहीनच', कर्मसिद्धांताचा 'नियतिपर' चुकीचा अर्थ लावून, 'हतबलतेने' त्याचा आश्रय घेतात.

* 'सत्यता फक्त सम्यक् पुरुषार्थाची' आहे. सम्यग्दर्शनाचे 'नि:शंकित' इत्यादि अंगांचा खरा उपयोग येथे आवश्यक आहे. विश्वासाने 'सतत मार्गक्रमण, अहंकार व उपहासाचा त्याग, सहकार्य, सहयोगाची साथ' हाच 'पुरुषार्थ' आहे. ह्या प्रवासात 'चालणे महत्त्वाचे' आहे. 'गती, स्थिति' महत्त्वाची नाही. ह्या मार्गात कोणी 'लहान, मोठा, श्रेष्ठ, कनिष्ठ' नाही. 'यथाशक्ती, विवेकपूर्ण प्रयास' हीच, परीक्षा आहे. 'गुणग्रहण, गुणवृद्धि, चित्तशोधन, विकल्पत्याग' हाच उपाय आहे.

* अशाप्रकारे कर्मोदयातही, 'सत्तागत कर्मांच्या संक्रमणादिमुळे ' निर्वाध रीतीने साधना घडू

शकते. मोक्षमार्ग अक्षुण्ण आहे. ‘कर्मसिद्धांत’ कशातच बाधा आणत नाही, हाच जैनांचा ‘विचित्र कर्मसिद्धांत’ आहे जो, ‘’द्रव्यादिंच्या तात्त्विक’ व्यवस्थेवर उभारला आहे. ही ‘द्वंद्वधारा’ चालत आली आहे व चालणार आहे. सूक्ष्मातिसूक्ष्म दोषानेही, कर्म ‘बंध-उदय-फळ’ आहेच. तेथे ‘अनुनय, वा क्षमेला’ थारा नाही.

♦ * ही व्यवस्था अत्यंत चोख आहे. त्यात ‘करण्यासारखे’ काही नाहीच. फक्त ज्ञानाच्या, ‘ज्ञाता द्रष्टा’ स्वभावाचा आश्रय घेणे, ‘उपादानवर’ दृष्टी ठेवणे आणि प्राप्त ‘सर्व दुर्लभ अनुकूलता, सामग्री, साधनांचा सदुपयोग आत्मोन्नतीकडे लावणे’ हाच ‘पुरुषार्थ’ आहे. इतका ‘परिपूर्ण, परिष्कृत, स्वयंचलित’ असा हा कर्मसिद्धांत, ‘नियति, दैव, भाग्याच्या’, सर्व बेड्या तोडणारा आहे. ‘पाच समवायांचा सम्यक् समन्वय, उपादान-निमित्तांच्या सम्यक् स्वीकार, अनेकांताचा जयघोष’ करणारा, असा हा ‘पुरुषार्थाश्रित कर्मसिद्धांत’ आहे. किंबहुना ‘कर्मसिद्धांतातील पायाभूत पुरुषार्थ’, सूर्यप्रकाशाइतका ‘सत्य, स्वच्छ, प्रकाशित’ आहे, हेच निश्चित आहे.

## प्रकरण– ३

## उपविभाग –३

## संदर्भ–सूचि

१)	रा.वा. १/४/२६/३,८/५६६/१४,ष.खं.पु.१४ पृ.२६–२८–६१
२	ध.पु.९ पृ.२७०,पु.१२ पृ.२७७–२९७, ३६४–३६६,पु.१३ पृ.११,३३३, प्र.सा.१७४,१७०,१६८
३)	पं.का.१/२८,१४८,प्र.सा.१७९,ध.पु.८ पृ.५४,७७,पु.१२ पृ.२८१,स.सा.१५३,२३७–२४० १७१,१७२
४)	ध.पु.९ पृ.२७१,पु.१ पृ.२३४,स.सा.५७,७१,१६९
५)	ष. खं. पु.१२.पृ.५०५,२७८–२९०,पं.सं.प्रा. ४/५१३,९६५
६)	ध.पु.१० पृ.४३,४९,५२,क्ष.सा.४०२.ल.सा.६१–६४.ज.ध.८/२५३,२५०–६१
७)	गो.क.४३८ ची टीका,ध.१६ पृ.३४०,३७५,४०८
८)	ध.५ पृ.५६.ध.पृ.१६ पृ.३४१,३४७–३४९–३७४
९)	गो.क. ४३८ ची टीका, ल.सा.५६–५८,ज.ध–७/२३७
१०)	ज. ध.७/२४१,२३९,२४०,ध.पु.१६ पृ.३४७,पु.१ पृ.९९.पु.१२ पृ.३८,५८,४५०,१३८,९६,१४२,१
११)	ल.सा.५६–८८,२२२–२२३,१७/५४,१८/५५,१९/५५,१५/४७,ध ६.पृ.३४०,१३५
१२)	ध.पु.१२ पृ.१८,३२,४३१,३९३,३९४,४८९,ल.सा.६०,७९,८०–८१
१३)	पं.सं.प्रा.३/३,४७,ध.पु.१५ पृ.७,५,१,पु.६/पृ २१४,२१३ गो.क.२२६–३०२
१४)	ध.पु.६ पृ.२०२,२१४,ध.१५ पृ.१११,५४,५६,६२,२४,७२,पं.स.प्रा.५१९,५२१
१५)	पं.सं.प्रा.३/३,ध.पु.१२/४९५
१६)	ध.पु.१५ पृ.२८५–२८६,९,पं.सं.प्रा.३/३,४/५१३,३६८,२/७,स.सा.१३२–१३३
१७)	ध.पु.१२ पृ.४६,४७,पु.१३ पृ.५३,५४,३५७–३८९,पं.स.प्रा.१/५२
१८)	ध.९/पृ.२३६,पु.१५/२७६,पु.१२/३०५

# उपसंहार (निष्कर्ष)

'जैन कर्मसिद्धांत आणि पुरुषार्थ (कर्मविपाक आणि कर्मस्वातंत्र्य), ह्या प्रबंधातील सर्व विषयांच्या , समग्र अध्ययन- मनन-चिंतनातून,' प्रकाशित पुरुषार्थ वा सारभूत' विवेचनातून, अंततः मी ह्या निष्कर्षाप्रत पोहचले आहे.

अनेकांतवादी जैन दर्शनात, कोणत्याही विषयाचा ऊहापोह, 'व्यावहारिक दृष्टीने, द्रव्य-क्षेत्रादिनुसार, नय-निक्षेप-गुणस्थान-मार्गणाप्रमाणे, आणि निश्चयाने शुद्ध आध्यात्मिक विवक्षेने,' अशा क्रमबद्ध पद्धतीने केला जातो. हे विवेचन 'व्यवहार-निश्चय, हेय- उपादेय, मुख्य- गौण, द्रव्य- भाव, उपादान- निमित्त, नियति-पुरुषार्थ, द्रव्यार्थिक- पर्यायार्थिक नय', अशा विवक्षांनी करणे ही तर, जैनांची खास 'शैली वा वेगळेपण,' म्हणता येईल. अशा सर्व बाजूंची 'निरपेक्ष समीक्षा,' हाच मला जैनांचा 'खास पुरुषार्थ' वाटतो. ह्या सर्व अनुषंगाने विषयांचा 'अभ्यास, मनन, चिंतन,' करतांना आढळलेला 'पुरुषार्थ आणि कर्मसिद्धांत' मी प्रकर्षाने निदर्शनास आणला असून, त्याच विवक्षांनी हा निष्कर्ष मांडत आहे.

जैन 'तत्त्वज्ञानाची गुंफण द्रव्य, तत्त्व, कर्मसिद्धांत, आचार, रत्नत्रय, अनेकांत, अहिंसा , गुणस्थान, ध्यान,' अशा विषयांनी झालेली स्पष्ट दिसते.

**१) द्रव्य** : ह्या विवेचनातील काही अकाट्य व अटळ असे नियम (पृ.क्र.२४) नमूद केले आहेत. द्रव्याविषयीची ही 'अनादि-अनंताची' मान्यता मला 'पुरुषार्थवर्धक' वाटते, ही मान्यता, ' पर्याय, नियति, निमित्ताच्या,' मर्यादा अधिकच प्रकर्षाने उजागर करतात. ह्या 'द्रव्य वा द्रव्यार्थिक' दृष्टीला, समोर ठेवूनच, सर्वत्र 'पुरुषार्थ' शोधणे सोपे गेले. म्हणून 'द्रव्य- गुण-त्याचे भेद - प्रभेद, पर्याय, ह्यांचे सम्यकज्ञान, व श्रद्धान,' हेच ह्या 'पुरुषार्थाचा आधार वा मूळ आहे', ही खात्री झाली.

**२) चार अभाव** : जैन आगमात वर्णित, 'प्राग्भाव इत्यादि अभावांमुळे, पर्यायांच्या मर्यादा,' अधिक स्पष्ट झाल्यात. (प्राग्भाव इत्यादि, पृ. क्र. vi to x) जैन दर्शन 'निमित्ताचा निषेध न करता, निमित्ताने कार्य होते,' ह्या मान्यतेचा निषेध करणारा आहे, ह्याची खात्री झाली. आत्मद्रव्याच्या 'त्रिकाली अविनाशीपणाची, अनंतगुणांची, अस्तित्वाची, सामर्थ्यांची, सम्यक् ओळख,' ह्यामुळे झाली. त्यामुळे विषयांच्या विवक्षा समजणे अधिकच सोपे झाले.

**३) सर्व 'द्रव्य व तत्त्वांमध्ये महत्त्वाचे जीवद्रव्य' आहे** : द्रव्याच्या सम्यक् ज्ञानाने,'स्व चतुष्ट्याच्या', सामर्थ्यांचा बोध झाला. ह्या स्व-पर' च्या यथार्थ ज्ञानाने खात्री झाली की, 'द्रव्यायार्थिकनयविवक्षेने होते, मूळतः शुद्ध, परिपूर्ण 'स्व' मधे करण्यासारखे काही नाहीच. व्यवहारात जबाबदारी टाळण्यास वापरले जाणारे, 'मला काय त्याचे वा माझा काय संबंध? हे धोरण 'मला माझ्या कषाय, विकार, विभाव, मोह,' ह्या प्रांतात ठेवणेच, मुक्तीपर्यंत नेणारे

आहे, ही खात्री झाली. 'पुद्गल हे आत्मकल्याणात बाधक नसून,साधनरूप आहे,' आणि अन्य द्रव्यांचे जीवावरील उपकारही, जीव शक्तींना प्रेरित करणारे आहे. असे माझे ठाम मत आहे. (पृ.क्र. २२)

**४) विस्ताराने वर्णित 'तत्त्ववर्णनातील,'** आस्रव तत्त्व, ' बंधाची खरी ओळख' करवून देणारे आहे. 'जन्म ते मरण ह्या प्रवासात, कर्म विवेकपूर्वक करण्याची प्रेरणा देवून, आवश्यक आचार संहिता, नीतिनियम, कायदे शिकवणारे', असे हे आस्रव तत्त्व वाटले. मोक्षमार्गात महत्त्वाचे 'बंध व निर्जरातत्त्व' आहे. 'बंधप्रक्रिया, बंधव्युच्छित्ति ह्यांचे, परिपूर्ण सम्यग्ज्ञानच बंधाला तोडण्याचा उपाय असून, संवर-निर्जरेला जन्म देणारे आहे,' हा विश्वास वाटतो. अत्यंत 'विज्ञाननिष्ठ व तर्कनिष्ठ असे, संवर-निर्जरातत्त्वाचे वर्णन, हा जैनांचा खासच पुरुषार्थ' आहे, जो अन्य दर्शनात आढळत नाही. त्यामुळेच 'मोक्षाची प्राप्ती, स्वावलंबनाने पुरुषार्थाने सांगून, व्यक्तिस्वातंत्र महत्त्वाचे मानले आणि ईश्वरतत्त्व स्वीकारण्याची' निकड भासली नाही. ह्यांत 'विज्ञाननिष्ठ असे त्रैलोक्यज्ञान, विश्वव्यवस्था, अनेकांतदृष्टी,' ह्यांचे ज्ञान हे महत्त्वाचे घटकच सिद्ध होतात.'पतंजलींचे योगशास्त्र वा भगवद्गीता, मनाचे वर्णन, चित्त व अंत:करण,' अशा दृष्टीने करणारे आहे.'मनापर्यंत पोहचणे वा त्याला जिंकणे,' ह्या निष्कर्षाप्रत ते थांबतात. जैनांनी' मनाला पुद्गलाचे उपकार मानून, पुद्गलापासून निर्मित मानले. विशिष्ट मर्यादेपर्यंत त्याचे महत्त्व मानले मात्र, 'मनावर नियंत्रण, त्यावर ताबा, त्याच्या शक्ती जागृतीने प्राप्त रिद्धी-सिद्धी इत्यादीत इतिश्री मानली नाही, उलट त्या मनाच्या शक्तिसामर्थ्याने, अनंतचतुष्टयधारी आत्मापर्यंत पोहचून, त्याची परमशुद्ध, सिद्धदशा प्राप्त करणे,' हे अंतिम ध्येय ठेवले. म्हणून 'मनाचा स्वीकार योगरूपाने' केला, जो मात्र ह्या, 'आत्म्यापर्यंत पोहचण्यास सेतू' म्हणून स्वीकारला. हा विचार 'खूपच प्रगल्भ, कर्म सिद्धांताला परिपूर्ण बनवणारा, आणि पुरुषार्थ प्रेरक सिद्ध' झाला.(पृ.क्र. २७,५५ ते ५८)

**५) चार पुरुषार्थांचा** विचार करणाऱ्या भारतीय परंपरेतील, 'वैदिक दर्शनात' हा विचार, 'प्रथम त्रिवर्गरूपाने' आढळला. पुढे तो 'चार पुरुषार्थरूपाने' रूढ झाला. जैनदर्शनात मात्र प्रथम पासूनच,'चार पुरुषार्थाचा पुरस्कार' केलेला दिसतो. त्यामुळेच त्यांच्या पुरुषार्थ प्रधानतेवर शिक्कामोर्तबच' होते. 'अर्थ पुरुषार्थात कदाचित् पुण्योदयाची प्रधानता मानली तरी, तीर्थंकरांपासून अर्थपुरुषार्थाचा उत्कृष्ट उद्दम' आढळतो. त्यामुळेच 'पुण्यपात्र व प्रयत्नसाध्य अर्थाच्या, सम्यक् विनियोगाची,' अधिकच प्रकर्षाने निकडही भासली. जैनांनी ती, निकड 'दान, त्याग, सेवा, परोपकार, वैयावृत्य, कला, साहित्य,' इत्यादि विधायक रूपाने पूर्णही केली. 'अर्थातून धर्माचा पुरुषार्थ सम्यक् प्रकारे' साधला (पृ.क्र.९४-९५) म्हणून, 'आर्थिक सुबत्तता स्वतंत्रता आणते,' असे माझे मत आहे. ह्या 'स्वतंत्रतेला शिस्तबद्ध, सम्यक् धर्माची जोड देणे,' हे जैनांचे वैशिष्ट्य पूर्ण योगदान आहे. कामपुरुषार्थरूपाने 'स्वदारसंतोष व्रताचे,' कथन करणे, हे अन्य दर्शनात आढळत नाही. ''नैतिकता व मूल्यांच्या,' ह्या वर्णनाचे महत्त्व 'मनुष्यगतीचे' श्रेष्ठत्व ह्या अनुषंगाने देवून,

'पुरुषार्थ प्रेरणा' दिली. 'प्रत्येक कार्यसिद्धीत पाच समवायांचा सम्यक् स्वीकार,' जैन दर्शनातील ' प्रमाण- नय, उपादान-निमित्त, पुरुषार्थ-नियति, ह्यांना प्रकर्षाने प्रकाशित करणारे आहे.

६) **ह्या 'पाचसमवायांचा सम्यक् स्वीकार व समन्वय'**, साधण्यासाठी 'साधू-श्रावक' स्वतंत्रमार्ग सांगितले. 'श्रावकाचार, श्रावकव्रते, प्रतिमारूपाने,' पुरुषार्थाचा उपायच हातात दिला. ह्या मार्गात 'भावना वा अनुप्रेक्षा,' चिंतन हा खासच मुद्दा वाटतो. 'भावना चिंतन, भावना -भवनाशिनी, वैराग्यवर्धिनी, 'अशा दृष्टीने कोणीही ' भावना विचार वा उपाय,' कथन केला नाही. ह्या 'भावना-भावनाने (चिंतनाने) अनायासच सामायिक व ध्यानाला' प्रेरणा दिली. अंततः 'श्रावकांनाही सल्लेखनेचा अधिकार देणे,' ही खरी क्रांतीच ठरते.'धर्मपुरुषार्थात ती सल्लेखना मानाचा तुरा ठरते, जी पुढे मोक्षाप्रत नेते.'

७)'**धर्मपुरुषार्थात विविध क्रिया** सर्वच दर्शने सांगतात. जैनांनी मोक्षमार्ग 'रत्नत्रयात्मक' सांगितला. 'दृढश्रद्धान, खरे व वास्तवज्ञान, योग्यकृती,' ह्याला 'मोक्षमार्ग म्हणण्याचा हा पुरुषार्थच,' श्रेष्ठ ठरला आहे. प्रत्येक दर्शनाने 'मोक्षाची साधने' नमूद केलीत, पण त्या साधनांमध्ये 'तपाला अग्रस्थान' फक्त जैनांनी दिले. ह्या तपातील, 'स्थूल ते सूक्ष्म, बाह्य ते अंतरंग, हा क्रम खूपच परिपक्व' सिद्ध होतो. त्या तपपालनात 'यथाशक्ती व द्रव्य-क्षेत्रादींची मर्यादा दिल्याने, 'तप हे जैनांचे भूषण' ठरले आहे.'तपाने निर्जरा व संवर' होत असल्याने, त्याचा आढावा 'गुणस्थानांद्वारे' घेतला. जीवाला त्याच्या,'प्रत्येक अवस्था, भाव-भावना, परिणाम, स्थान, व्यवहार, संवर, निर्जरा, मोह-योग, निमित्त-उपादानाचा,' चलचित्रपट दाखवणारे म्हणजे 'गुणस्थान' होय. हा इतका 'शिस्तबद्ध, क्रमबद्ध, गुणस्थानविचार,' अन्यत्र आढळत नाही. 'गुणस्थानात उर्ध्वारोहन ध्यानाने' होते. ह्या 'ध्यान विषयातील आर्त-रौद्र ध्यान' हा विचार, जैनांना भिन्न पंक्तीत नेणारा आहे. कारण 'श्रावकदशेत हे दोन्ही ध्यान का, कसे, कधी घडतात, त्याचे फळ, उपाय काय? ह्याचे 'ज्ञान, व भान' मला व्यवहारपातळीवर खूपच महत्वाचे वाटले. ' धर्म व शुक्लध्यानाचे समग्र वर्णनही' जैनांचे वेगळेपण सिद्ध करते.

८) **व्यवहारात उत्कृष्ट कार्यपूर्तीत** ' आलंबन, प्रेरणा, आदर्श,' खूपच महत्त्वाचे ठरतात. तसेच आध्यात्मिक मार्गातही ते आवश्यक ठरतात. जैनांनीही 'तीर्थंकर, गुरु, आगम, श्रुत, धर्म संगति' ह्यांना दर्जा व स्थान दिले. 'प्रेरणास्थान' म्हणून स्वीकारले. मात्र मोक्षमार्गात त्यांच्या मर्यादा प्रकर्षाने स्पष्ट केल्यात. त्याचे वर्णन (पृ.क्र.२०६ ते २०९) केले आहे. त्यामुळेच जैनांनी ईश्वरतत्त्वाचा स्वीकार का केला नाही, हे स्पष्ट होते. किंबहुना ह्या 'मर्यादाच मला पुरुषार्थ प्रेरक' वाटल्या.

९) **ह्या पद्धतीने प्रबंधविषयाचा** अभ्यास, चिंतन करतांना, 'जन्म कशासाठी, जीवनाचे उद्दिष्ट कोणते, साध्य वा लक्ष्य काय साधायचे आणि मी कोण? अशा गंभीर चिंतनाला सुरुवात झाली. जैनांनी 'जीव व कर्मसंबंध अनादि' मानला. 'व्यवहारनयाने, पर्यायार्थिकनयाने कर्मांची प्रबळता,

प्रखरता, महत्त्व,' अजिबात नाकारले नाही. तरीही ह्या 'कर्मशक्तींना त्याच्या स्वरूपाला, बंधाला, मोक्षाला, जाणणाऱ्या जीवाची, ज्ञानाची, आत्म्याची, अफाट, अमर्याद, शुद्ध शक्ती,' त्यापेक्षा नक्कीच 'श्रेष्ट, ध्रुव, नित्य, सदैव, अनादि-अनंत' आहे, हा दृढविश्वास झाला. ह्या विश्वासानेच 'कर्मातील सत्तेत स्थित्यंतरे, परिवर्तन' होवू लागतात.'स्थिति-अनुभाग' हीन होवू लागतो, 'कर्म संक्रमणाने, कर्माची जात वा स्वभाव बदलू' लागतात. 'निधत्ति- निकाचितरूपही कर्म, अकर्म' होवू लागते. 'माझा अंतरंगाकडचा प्रवास, स्वचाच निदिध्यासन, स्वचाच अंतर्नाद, कर्मांची दशा व दिशा बदलू शकते,' अशी दृढ खात्री झाली. 'आस्रवबंधानुरूप उदय होतो तरी, जसे बांधले तसाच उदय, वा जे बांधले त्याचेच फळ,' असा नियम नाही, ह्या ज्ञानाने 'उदयाची भीती नष्ट होवू लागते, उदय हा पूर्वपुरुषार्थाच्या फळांचा चित्रपट वा दृश्यरूप मात्र आहे, त्या फळाचा आस्वाद घ्यायचाच, हे बंधन जीवावर नाही, अशी नवी दृष्टी लाभली. 'उदयात काय व कशी प्रतिक्रिया देणे, ह्यात असणारी ही, कर्मस्वतंत्रताच, कर्मनियततेतून सोडावून, मुक्ती देणारी आहे व हे मी माझ्या पुरुषार्थाने, अन्यमदतीशिवाय करू शकते,' हा ठाम निश्चय झाला. कारण 'कर्म द्रव्य- क्षेत्रादिनुसार' फळ देतात. ते निवडणे 'नियति' नाही.'धर्म वा आध्यात्म वा सम्यक्त्व वा मोक्ष, माझ्याच अवस्था आहेत, माझ्यातच आहेत, फक्त त्या मला पुरुषार्थाने, पर्यायात व्यक्त करायच्या आहेत आणि हा पुरुषार्थ कर्मभूमीतच, मनुष्यपर्यायातच' शक्य आहे. 'माझ्या बंध वा मोक्षात, मी स्वतंत्र आहे, कर्म कशातही बाधा आणत नाही. त्या मुक्तिसाठी समता, शमता, रामता, मौन, आत्मसन्मुखता, शुद्धात्मभावना, दृढतेने मार्गक्रमण, ही माझी शक्तिस्थाने' आहेत.

असा हा जैनांचा परिपूर्ण कर्मसिद्धांत, 'व्यक्तिस्वतंत्रता, स्वावलंबन, पुरुषार्थ, पाच समवायांचा समन्वय,' कशातही बाधक नाही. 'पुरुषार्थाला वाव आहे म्हणूनच कर्म सिद्धांताचे' महत्त्व आहे. अन्य दर्शनांनीही कर्मविचार केला मात्र,'पुरुषार्थावर स्थित जैनांचा हा विचित्र कर्मसिद्धांत, ज्याचा आधार चेतन-अचेतन, वस्तूंची तात्त्विक व्यवस्था आहे, तो कर्मनियतता व कर्मस्वतंत्रता अबाधित ठेवून, समन्वय साधणारा' म्हणून भिन्न वाटला. अशाप्रकारे 'प्रगल्भ, परिपूर्ण, सूक्ष्म', अशा 'कर्मसिद्धांतही पुरुषार्थ प्रधानता निहित आहे,' ह्या अंतिम निष्कर्षाप्रत मी पोहचले आहे.

# तक्ते (Tables)

**तक्ता क्र.१**

## कषायांच्या शक्ती, कार्य, स्थिति

| कषायांची अवस्था | शक्तींचे दृष्टांत | | | | फळ |
|---|---|---|---|---|---|
| | क्रोध | मान | माया | लोभ | |
| अनंतानुबंधी | दगडावरची रेष | शैल | वेणूचे मूळ | किरमीजीरंग वा डाग | नरक |
| अप्रत्याख्यानावरण | पृथ्वीवरची रेष | अस्थि | मेष(हरिणाचे) शिंग | वंगणासमान | तिर्यंच |
| प्रत्याख्यानावरण | धूळीवरची रेष | दारु (काष्ठ) | गोमूत्राप्रमाणे | चिखलाप्रमाणे | मनुष्य |
| संज्वलन | पाण्यावरची रेष | वेत (बांबू) | खुरप्याप्रमाणे | हळदीप्रमाणे | देव |

---

**तक्ता क्र.२**

## द्रव्य

**गुण**

द्रव्याच्या सर्व भागात व सर्व अवस्थेत असतात. 'गुण' हे नित्य असल्याने, तेच 'ध्रौव्यत्वाचा' आधार आहे, गुणांना 'अन्वयी' विशेष म्हणतात

- सामान्य गुण
  - अस्तित्व, वस्तुत्व, द्रव्यत्व, प्रमेयत्व, अगुरुलघुत्व प्रदेशत्व
- विषेशगुण (क्रमाने सहा द्रव्यांचे)
  - चैतन्य, ज्ञान, दर्शन,
  - स्पर्श, रस, गंध, वर्ण
  - गतिहेतुता
  - स्थितिहेतुता
  - अवगाहनत्व
  - परिणमन (वर्तना)

**पर्याय**

'गुणांच्या परिणमनाला म्हणतात,' पर्याय एक समयवर्ती असून, त्या क्रमवर्ती असतात. म्हणून 'उत्पाद-व्ययाचा आधार पर्याय', आहे.''कर्मसुद्धा पुद्‌गुल द्रव्य आहे., स्कंधात्मक आहे, मूर्त आहे, पर्याय आहे, उत्पाद-व्ययात्मक असून, जीव द्वारा निर्मित आहे,कृत्रिम आहे, प्रदेश-प्रचयरूप,कायावान, बंधशक्तियुक्त आहे.'' हा 'बंध स्वयंचलित, शिस्तबद्ध, स्वयंपूर्ण, विज्ञाननिष्ठ' आहे.

**तक्ता क्र.३**

- जीव / अजीव — **कर्म**
- **कर्म**
  - द्रव्यकर्म
  - भावकर्म
    - राग
    - द्वेष
  - नोकर्म
    - सहा पर्याप्ति
    - तीन शरीर
- **कर्म**
  - कर्मकारक
    - पुण्यरूप
    - पापरूप
  - क्रिया
    - समवदान, अधःकर्म, प्रयोगकर्म चितिकर्म इत्यादि
  - कर्म
    - जीवासह बद्ध विशिष्ट जातीचे 'पुद्गल स्कंध यांनाच द्रव्यकर्म' म्हणतात.
      - ज्ञानावरणीय
      - दर्शणावरणीय
      - वेदनीय
      - मोहनीय
      - आयु
      - नाम
      - गोत्र
      - अंतराय

---

**तक्ता क्र.४**

**शक्तीचा अविभागी अंश**

अविभाग-प्रतिच्छेद

समूह

वर्ग

समन अविभाग-प्रतिच्छेदयुक्त वर्गांचा समूह

वर्गणा

- प्रथम, द्वितीय इ., द्रव्य-क्षेत्रादि, २३भेद आहारक इ. ग्राह्य अग्राह्य ध्रुव ध्रुवशून्य सांतर निरंतर विशिष्ट जातीच्या

वर्गणांचा समूह

स्पर्धक (अनुभागशक्ती दर्शविणारे)

- देशघाति
- सर्वघाति

**तक्ता क्र.५.**

**कर्म**

घाति (सर्व पापप्रकृति)

- ज्ञानावरणीय - ५
- दर्शनावरणीय - ९
- मोहनीय - २८
- अंतराय - ५

४७ (सर्व -अप्रशस्त-पापप्रकृति)

सर्वघाति

- केवज्ञानावरण - १
- केवलदर्शनावरण-१
- निद्रा - ५
- अनंतानुबंधी, अप्रत्याख्यान, प्रत्याख्यान } १२
- सम्यग्मिध्यात्व- १
- मिथ्यात्व - १

एकूण - २१

देशघाति

- ज्ञानावरणीय - ४
- दर्शनावरणीय - ३
- दर्शनमोहनीय -१
- संज्वलन - ४
- नोकषाय - ९
- अंतराय - ५

एकूण - २६

अघाति

- वेदनीय - १
- आयु - ४
- नाम - ९३
- गोत्र - २

एकूण - १०१

प्रशस्त (पुण्य)

- ६८ प्रकृति

अप्रशस्त (पाप)

- असातावेदनीय-१
- अशुभआयु - १
- अशुभनाम- ५०
- नीचगोत्र - १

एकूण - ५३

---

**तक्ता क्र.६**

**'देशघाति प्रकृति'-अनुभाग शक्ती**

सर्वघाति —— ह्यांचे स्पर्धक, —— देशघाति

सर्वघाति:
- शैल,
- अस्थि,
- दारुचा अनंत बहुभाग

दोन प्रकारचे असतात. ते अशाप्रकारे मंद ते तीव्र अनुभागवाले असतात.

देशघाति:
- दारुचा अनंतवा भाग
- लता

गो.क. (१६३-१८४) नुसार, 'अघाति कर्मांच्या' प्रकृति, 'पुण्य पापरूप वा प्रशस्त अप्रशस्तरूप' असतात. 'अघाति प्रकृतीतही', चार भावरूप स्पर्धक असतात.

**'अघातिकर्म'-अनुभाग शक्ती**

प्रशस्त —— स्पर्धक —— अप्रशस्त

प्रशस्त:
- गुड
- खांड
- शर्करा
- अमृत

अशाप्रकारे ते 'मंद ते तीव्र' अनुभागवाले असतात. अशा चाररूपाने परिणत होतात.

अप्रशस्त:
- नींव
- कांजीर
- विष
- हलाहल

**तक्ता क्र.७**

**१) ज्ञानावरणीय कर्म**

मति | श्रुत | अवधि | मन:पर्यय | केवल

**२) दर्शनावरणीय कर्म**

चक्षु | अचक्षु | अवधि | केवल | निद्रा | निद्रा-निद्रा | प्रचला | प्रचला-प्रचला | स्त्यानगृद्धी

**३) मोहनीय कर्म**

- दर्शनमोहनीय
  - मिथ्यात्व
  - सम्यग्मिथ्यात्व
  - सम्यक्प्रकृति
- चारित्रमोहनीय
  - कषाय
    - अनंतानुबंधी, अप्रत्याख्यान, प्रत्याख्यान, संज्वलन } क्रोध, मान, माया, लोभ
  - नोकषाय
    - हास्य,रति, अरति
    - स्त्रीवेद, पुंवेद,न.वेद
    - शोक,भय,जुगुप्सा

**४) वेदनीकर्म**

साता | असाता

**५) आयुकर्म**

देवायु | मनुष्यायु | तिर्यंचायु | नरकायु

**६) नामकर्म**

गति, जाति, शरीर, बंधन, संघात, संस्थान, संहनन, अंगोपांग,स्पर्श, रस, गंध, वर्ण, गत्यानुपूर्वी, विहायोगति, अगुरुलघु, उपघात, परघात, उच्छवास, आतप, उद्योत, त्रस, स्थावर, बादर, सूक्ष्म, पर्याप्त, अपर्याप्त, प्रत्येक, साधारण, स्थिर, अस्थिर, शुभ, अशुभ, सुभग, दुर्भग, सुस्वर, दुस्वर, आदेय, अनादेय, यशःकीर्ति ,अयशःकीर्ति, तीर्थंकर, निर्माण

**७) गोत्रकर्म**

उच्च | नीच

**८) अंतराय कर्म**

दान | लाभ | भोग | उपभोग | वीर्य

**तक्ता क्र.८**

**१) बंध** - कारण-(मिथ्यात्व, अविरति, प्रमाद, कषाय,योग)

- द्रव्य
  - प्रकृति — योगने होतो
  - स्थिति — कषायाने होतो
  - अनुभाग — कषायाने होतो
  - प्रदेश — योगाने होतो
- भाव
  - राग
  - द्वेष

**२) कर्म**

- १४८ प्रकृति
  - बंधयोग्य — १२० प्रकृति
  - बंधअयोग्य — २८ प्रकृति
  - अप्रतिपक्षी — ११ प्रकृति
  - प्रतिपक्षी — ६२ प्रकृति
  - जीवविपाकी — ७८ प्रकृति
  - पुद्गलविपाकी — ६२ प्रकृति
  - क्षेत्रविपाकी — ४ प्रकृति
  - भवविपाकी — ४ प्रकृति

## संदर्भ - ग्रंथ- सूची

(प्रबंधात घेतलेल्या आधाराभूत ग्रंथांचे नाव व प्रकाशन इत्यादींची यादी)


१) अ. पा. = अष्टपाहुड, आ. कुंदकुदाचार्यरचित, श्री महावीर, ज्ञानोपासना, समिती, कारंजा वी.नि.से. २५२८
२) आ. प. = आप्तपरीक्षा श्लोक सं.,वीरसेवा मंदिर सरसावा, वि.सं.२००६
२) आप्त. मी. = आप्तमीमांसा - आ. समंतभद्र, मुनि अनंतकीर्तिग्रंथमाला समिति, मुंबई
३) आ. सा. = आराधनासार - देवसेनाचार्य, भारतीय जैन सिद्धांत प्रकाशिनी संस्था, कलकत्ता
४) क. पा. = कषायपाहुड, दिंगबर जैनसंघ मधुरा, वि.स.२०००
५) का. अ. = कार्तिकेयानुप्रेक्षा, शुभचंद्रविरचितया संस्कृतटीकया समेता - पं- कैलासचंद्र शास्त्रीकृत हिंदी अनुवादसह, प्रकाशन- श्री परमश्रुत प्रभावक मंडल, श्रीमद् रायचंद्र आश्रम, आगास, वि. सं. २०४६
६) क्ष. सा. = क्षपणासार मूळ व टीका गाथा सं. , जैन सिध्दांत प्रकाशिनी संस्था, कलकत्ता
७) गो. क. = गोम्मटसार कर्मकांड, आ. १०८ श्री.शिवसागर ग्रंथमाला, शांतिवीर दिगंबर जैन संस्थान,श्री महावीरजी. वि.सं.२०६०
८) गो. जी. = गोम्मटसारजीवकांड,कर्णाटवृत्ती व जीवतत्त्व प्रदीपिका टीकासह, भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन
९) ज्ञा. = ज्ञानार्णव, रायचंद्र ग्रंथमाला, ई- १९०७
१०) त. सू. = तत्त्वार्थसूत्र उमास्वामीकृत, श्री दिगंबर साहित्य प्रकाशन समिति, बरेला, जबलपूर, २००७
११) ति. प. = तिलोयपण्णत्ति- यतिवृषभाचार्यरचित, जैन संस्कृति संरक्षण संघ सोलापूर ई.स. १९४३
१२) त्रि. सा. = त्रिलोकसार, जैन साहित्य मुंबई, १९१८
१३) बृ. द्र. सं. = बृहद द्रव्यसंग्रह- मूळ व टीकासह, श्री ब्रह्मदेवस्थसंस्कृतवृत्ति, श्री परमश्रुत प्रभावक मंडळ, श्रीमद् रायचंद्र आश्रम, आगास, १९८९
१४) ध. = धवला आ. वीरसेनरचित, जैनसाहित्योद्धारक फंड कार्यालय, अमरावती, १९३९
१५) नि. सा. = नियमसार, जैन स्वाध्याय मंदिर ट्रस्ट, सोनगढ
१६) पं. का. = पंचास्तिकाय मूळ व टीकासह, परमश्रुत प्रभावक मंडळ,मुंबई, १९७२
१७) पं. वि. = पद्मनंदी पंचविंशतिका, जीवराज ग्रंथमाला सोलापूर, १९३२
१८) पं. सं. प्रा. = पंचसंग्रहप्राकृत,भारतीय ज्ञानपीठ बनारस, वि.सं.२०६०
१९) प. पु. = पदमपुराण सर्ग- श्लोकसं, भारतीय ज्ञानपीठ बनारस, वि.सं.२०१६
२०) प. प्र. = परमात्मप्रकाश तथा योगसार, टीकासह, श्री वीतरागसत् साहित्य प्रसारक ट्रस्ट भावनगर
२१) पु. सि.उ. = पुरुषार्थसिद्ध्युपाय, श्री सुरेश सी. जैन, इ-१/३०-अ खास, नई दिल्ली
२२) प्र. सा. = तत्त्वप्रदीपिका, तात्पर्यवृत्ती टीकासह, श्री कुंदकुंद कहान दिगंबर जैन तीर्थ सुरक्षा ट्रस्ट
२३) बा. अ. = बारसअनुप्रेक्षा ( बारासाअनुवेक्खा गाथा सं)
२४) भ. आ. = भगवती आराधना - शिवकोट्याचार्य, विजयोदया टीकासह, बाल ब्र.श्री.हिरालाल दोशी, फलटण, वि.स.२५१६ हिरालाल खुशालचंद जैन ग्रंथमाल, मांडवे
२५) म. पु. = महापुराण सर्ग सं./श्लोक सं. भारतीय ज्ञानपीठ, बनारस, १९५१
२६) म. बं. = महाबंध, भारतीय ज्ञानपीठ बनारस , १९५१
२७) मू. आ. = मूलाचार, अनंतकीर्ति ग्रंथमाला समिति, मुंबई, १९७६
२८) मो. मा. प्र. = मोक्षमार्ग प्रकाशन, सस्ती ग्रंथमाला देहली, वि.सं.२०१०
२९) र. क. श्रा. = रत्नकरंड श्रावकाचार, जैन संस्कृति संरक्षक संघ सोलापूर, १९८४
३०) रा. वा. = राजवर्तिक( तत्त्वार्थवर्तिकम्) भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, वि. सं .२४७०
३१) ल. सा. = लब्धिसार, सिद्धांतचक्रवर्ती नेमिचंद्राचार्य, जैन सिद्धांत प्रकाशिनी संस्था, कलकत्ता
३२) व. श्रा. = वसुनंदी श्रावकाचार, भारतीय ज्ञानपीठ बनारस, वि. सं.२००७
३३) श्लो. वा. = श्लोकवार्तिक, कुंथुसागर ग्रंथमाला सोलापूर, १९४९ - १९५६
३४) ष. खं. = षट्खंडागम, जैन संस्कृती संरक्षक संघ, सोलापूर
३५) स्या. मं. = स्याद्वादमंजरी, परमश्रुतप्रभावक मंडळ, श्रीमद् रायचंद्र आश्रम आगास
३६) स. सा. = समयसार, आत्मख्याती, तात्पर्यवृत्ती टीकासह, श्री महावीर ज्ञानोपासना समिति, कारंजा, वी.नि.सं. २५११
३७) स. सि. = सर्वार्थसिद्धि, भारतीयज्ञानपीठ बनारस, वी.नि.सं.२५१२
३८) सा.ध. = सागरधर्मामृत, श्रावका-चारसंग्रह जीवराज ग्रंथमाला प्रकाशन, जैन संस्कृति संरक्षक संघ, सोलापूर, १९९८
३९) ह.पु. = हरिवंशपुराण सर्ग/ श्लोक स. भारतीय ज्ञानपीठ बनारस


## अन्य-संदर्भ-ग्रंथ-सूची


१) सांख्यकारिका : ब्रजमोहन चतुर्वेदी, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, दिल्ली ६, १९६९
२) अथर्ववेद : प्रथमखंड, वेदमूर्ति तपोनिष्ठ पं. श्रीराम शर्मा, आचार्य, संस्कृति, संस्थान बरेली, १९८६
३) मुंडक उपनिषद : प.पू. गुरुदेवस्वामी चिन्मयानंद, सेंट्रल चिन्मय मिशन ट्रस्ट, पवई, १९८५
४) शतपथ ब्राम्हण : डॉ. चमनलाल गौतम, संस्कृति संस्थान, बरेली, १९७३
५) कौटिल्य अर्थशास्त्र : कै. बळवंत रामचंद्र टि. वरगांवकर, 'वरदा' बुक्स, सेनापती बापट मार्ग, १९२७
६) मनस्मृति : मुकुंद गणेश मिरजकर, रा.रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ पुणे, शके १८४९
७) ऋग्वेद : सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, भारतीय चरित्रकोश मंडळ, पुणे, १९६९
८) तैतरीय उपनिषद : सानुवाद शांकाभाष्यसहित, गीता प्रेस, गोरखपूर, १९६३
९) महाभारत : ५ वे उद्योगपूर्व, श्री. दा. सातवळेकर, सं. २०२६, शके १८९१, सन १९६९ १२ वे शांतिपर्व, किल्लापारडी, जि. बलसाड, गुजरात, १९७९ १३ वे अनुशासनपर्व, जि. बलसाड, गुजरात, १९७८
१०) आचारांग, सूत्रकृतांग, स्थानांग : लाडनू, जैन विश्वविद्यालय.
११) उत्तरअध्ययनसूत्र : श्री अमोल जैन ज्ञानालय, धुलिया, २००१
१२) पातंजल योगसूत्र : कृ. के. कोल्हटकर, आदित्य प्रतिष्ठान, सदाशिव पेठ, पुणे ३०, २००३